

# सद्धर्म संपादकीय

डॉ. विजय बेडेकर

# सद्धर्म संपादकीय

डॉ. विजय बेडेकर

**सद्धर्म संपादकीय**

**प्रकाशक**
**डॉ. विजय बेडेकर**
शिवशक्ती, महर्षी कर्वे पथ,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४४ २५२५

**मुद्रितशोधन**
**प्रदीप गुजर**
ठाणे

**मुद्रणस्थळ**
**विलास सांगुर्डेकर**
परफेक्ट प्रिण्टस्,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१ / २५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

**प्रथमावृत्ती** : २ ऑक्टोबर २०२२

# प्रस्तावना

धर्म हा अनादी काळापासून अनेकांच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. 'धारणात् धर्म:' अर्थात 'जो धारण करतो तो धर्म' अशी परंपरेने धर्माची व्याख्या केली आहे. आदि शंकराचार्यांनी गीताभाष्याच्या प्रस्तावनेत धर्माची ''यत: प्राणीनाम् साक्षात् अभ्युदय: निश्रेयस सिद्धी: स धर्म:'' अशी मोठी सुंदर व्याख्या केली आहे. त्यांच्यामते प्राण्यांचा साक्षात अभ्युदय व श्रेयसाची सिद्धी करवून देणारे साधन म्हणजे धर्म. 'धर्म' हा शब्द भारतीय परंपरेत कर्तव्य या अर्थाने देखील वापरला जातो. माहितीचा स्फोट झालेल्या व तांत्रिक प्रगती सतत होणाऱ्या २१व्या शतकात मानवी मूल्यांची धूळधाण उडालेली आहे. प्रख्यात इंग्रजी कवी मॅथ्यू अर्नोल्ड याच्या 'डॉवर बीच' या प्रसिद्ध कवितेत आधुनिक युगातील व्यक्तीची द्विधा मनस्थिती शब्दबद्ध झालेली आहे. या परिप्रेक्षात प्रस्तुत पुस्तकाचे औचित्य ठसठशीतपणे पुढे येते.

ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशामध्ये सद्धर्म या त्रैमासिकाने मोलाची भर घातली आहे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सद्धर्मसाठी लिहिलेल्या संपादकीय लेखांना संग्रहित करून जिज्ञासू वाचकांना प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने एक अनमोल ठेवा मिळाला आहे. डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथरूपाने त्यांचे अनमोल वाग्-वैभव पुनर्प्रकाशित होत आहे याचा विशेष आनंद आहे. ''अभ्यासे प्रकट व्हावे'' या समर्थ उक्तीला साजेसे हे लिखाण आहे.

सुरुवातीला गिरगावातील मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या माध्यमातून सद्धर्म हे त्रैमासिक चालवले जात होते. याचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६५ ला श्री. गोविंद महादेव नवाथे यांनी प्रकाशित केला. 'सुसंस्कृत, सदाचारी, नीतिमान आणि प्रामाणिक तरुण पिढीच्या निर्मिती करिता एक साधन' म्हणून सद्धर्मची सुरुवात करण्यात आली होती. या मासिकात गुंडोपंत हरिभक्त या टोपण नावाने श्री. नवाथे यांचे लेख प्रकाशित होत असत. पुढे साधारणतः १९९६-९७ दरम्यान श्री. उत्तम जोशी यांनी हा ट्रस्ट ठाण्यात आणला व संपादकीय लेखनाची जबाबदारी डॉ. विजय बेडेकर यांनी घेतली. तेव्हापासून डॉ. बेडेकर अविरतपणे या त्रैमासिकाचे संपादकीय लेख लिहितात. इसवी सन २०१४ - १५ हे सद्धर्मचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते.

प्रस्तुत पुस्तकातील पहिला लेख हा ऑगस्ट १९९७ मधील असून, त्यावर्षी भारताच्या स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली होती. आज स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना डॉ. विजय बेडेकर यांनी मागच्या पंचवीस वर्षांमध्ये लिहिलेल्या ८८ लेखांची सूत्रबद्ध मांडणी प्रस्तुत पुस्तकात आपल्याला अनुभवास येते. लेखांची शीर्षके मोठी बोलकी आहेत. 'धर्म आणि जीवन', 'अर्थ आणि मूल्य', 'विसावे शतक आणि धर्म', 'मंदिर-सांस्कृतिक केंद्र', 'धर्म आणि निसर्ग', 'साहित्य आणि संस्कृती', 'सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची गरज', 'उत्सवांची अरेरावी', 'विज्ञान आणि धर्म' इत्यादी शीर्षके लक्षवेधक आहेत. संस्कृत,  धर्म, विज्ञान, समाज, जीवनशैली, साहित्य इत्यादी वेगवेगळ्या विषयांवरील अर्थगर्भ मांडणीही प्रस्तुत लेखांमध्ये पहावयास मिळते.

पेशाने वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉ. बेडेकरांची क्रांतीदर्शी प्रतिभा ही धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, स्थापत्य, कला, विधी, साहित्य, प्राच्यविद्या इत्यादी अनेक विषयांमध्ये दृग्गोचर होते व त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व हे यामध्ये प्रतिबिंबित होते. संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे म्हणजे डॉ. बेडेकर म्हणजे 'चालते ज्ञानाचे बिंब' आहेत.

अनेक शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून युवा पिढीमध्ये मूल्य-शिक्षणाची रुजवात करण्यासाठी दक्ष असलेल्या डॉ. बेडेकरांच्या चिंतनाचा हा अमोल ठेवा पुढील पिढीला नक्कीच दीपस्तंभासारखा मार्गदर्शन करत राहील.

**- डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | संपादकीय | ५ |
| २ | संपादकीय | ८ |
| ३ | संपादकीय | ११ |
| ४ | संपादकीय | १३ |
| ५ | संपादकीय | १५ |
| ६ | सुधारणा की मोडतोड? | १७ |
| ७ | शपथेचे महत्त्व | १९ |
| ८ | संस्कृतचे महत्त्व | २१ |
| ९ | विसावे शतक आणि धर्म | २४ |
| १० | अर्थ आणि मूल्ये | २६ |
| ११ | विज्ञानक्रांती आणि धर्म | २९ |
| १२ | धर्म आणि जीवन | ३१ |
| १३ | जनुकांचा धर्म | ३३ |
| १४ | सर्व धर्म सम की विषम? | ३६ |
| १५ | मंदिर - सांस्कृतिक केन्द्र | ४० |
| १६ | भ्रष्टाचार आणि धर्म | ४२ |
| १७ | वर्णभेद | ४५ |
| १८ | आतंकवादी - धर्म की अनुयायी? | ४८ |
| १९ | क्लोनिंग आणि धर्म | ५१ |
| २० | व्यक्तिस्वातंत्र्य आणि अमेरिका | ५४ |
| २१ | कालचा गांधार आजचा अफगाणिस्तान | ५७ |

| | | |
|---|---|---|
| २२ | बलात्कार - जबाबदार कोण? | ५९ |
| २३ | 'ठेंगू'' वाद | ६२ |
| २४ | धर्म आणि निसर्ग | ६४ |
| २५ | प्रा. यशपाल, नारळीकर आणि विज्ञान | ६७ |
| २६ | हिंदू धर्म की रिलिजन? | ७१ |
| २७ | मानव अधिकार / मानवी प्रतिष्ठा : एक चिंतन | ७६ |
| २८ | पेराल तसे उगवेल ! | ८० |
| २९ | धर्म आणि निवडणुका | ८३ |
| ३० | न्यूटन, धर्म आणि अंधश्रद्धा | ८५ |
| ३१ | हिंदू धर्म | ८९ |
| ३२ | दिशाहीन समाज | ९३ |
| ३३ | धर्मांतराचा धंदा | ९७ |
| ३४ | अशांत धर्म / देश | १०० |
| ३५ | संपादकीय... | १०३ |
| ३६ | धर्म का हवा ? | १०६ |
| ३७ | जीवनशैलीचा धर्म | १०९ |
| ३८ | इस्लाम - एक परिवर्तनीय पंथ ? | १११ |
| ३९ | चमत्कार, अंधश्रद्धा आणि विज्ञान | ११४ |
| ४० | लैंगिक शिक्षण आणि विज्ञान | ११७ |
| ४१ | स्वातंत्र्य की स्वैराचार ? | १२१ |
| ४२ | साहित्य आणि संस्कृती | १२४ |
| ४३ | जागतिक चित्पावन संमेलन | १२८ |
| ४४ | मनुवादी मुंबई विद्यापीठ | १३१ |

| | | |
|---|---|---|
| ४५ | मानवी जनावर | १३४ |
| ४६ | पेराल तसे उगवेल ... | १३८ |
| ४७ | पंचतंत्र शोध आणि बोध | १४१ |
| ४८ | डार्विनचा उत्क्रांतिवाद आणि धर्म | १४५ |
| ४९ | ब्रह्मचर्य आणि ब्रह्मचर्याश्रम | १४८ |
| ५० | हिंदू दत्तक कायदा | १५१ |
| ५१ | धर्म, संस्कृती आणि विज्ञान | १५४ |
| ५२ | चिंतन आणि चिंता | १५९ |
| ५३ | व्यक्तिस्वातंत्र्य : एक सावळा गोंधळ | १६२ |
| ५४ | सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची गरज | १६५ |
| ५५ | भाषा आणि संस्कृती | १६८ |
| ५६ | भ्रष्टाचार, जबाबदार कोण? | १७१ |
| ५७ | पण लक्षात कोण घेतो !.. | १७४ |
| ५८ | भ्रष्टाचार झाला शिष्टाचार ! | १७७ |
| ५९ | पुन्हा भ्रष्टाचार | १८० |
| ६० | निर्णयाचे अधिकार | १८३ |
| ६१ | भारतातला भ्रष्टाचार | १८६ |
| ६२ | स्वातंत्र्य फक्त ! | १८९ |
| ६३ | 'मी कोण?...' | १९२ |
| ६४ | धर्मशास्त्र की घटना ? | १९५ |
| ६५ | हतबल केदारनाथ | १९८ |
| ६६ | अधर्म जेंव्हा धर्म होतो ! | २०१ |
| ६७ | वंदनीय कोण? | २०४ |

| | | |
|---|---|---|
| ६८ | 'सद्धर्म' सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१४-२०१५ | २०७ |
| ६९ | विज्ञान आणि समाज | २१० |
| ७० | मंगळ आणि 'मंगळ' | २१४ |
| ७१ | संस्कृतचा अभ्यास | २१९ |
| ७२ | धार्मिक सण की संकट? | २२४ |
| ७३ | योग-दिवस | २२९ |
| ७४ | उत्सवांची अरेरावी! | २३३ |
| ७५ | भारतीय राज्यघटना आणि बिचारा मनु | २३९ |
| ७६ | बोले तैसा चाले त्याची... | २४६ |
| ७७ | वसाहतवाद, धर्मप्रसार आणि भारतीय संस्कृती | २५१ |
| ७८ | आजच्या 'उन्मादी' उत्सवांच्या पार्श्वभूमीवर 'धर्म' आणि 'परंपरा' | २५८ |
| ७९ | 'विशेष ज्ञान' ते 'विज्ञान' | २६५ |
| ८० | गुढीपाडवा, पंचांग आणि ढोल | २७१ |
| ८१ | होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।। | २७७ |
| ८२ | भोंदूबाबा आणि आपले अध्यात्म | २८३ |
| ८३ | वदनी कवळ घेता....अन्न हे पूर्णब्रह्म... | २९१ |
| ८४ | धर्मरक्षण - गरज आणि धोका | २९७ |
| ८५ | धर्म आणि अल्झायमर | ३०३ |
| ८६ | उत्सवांची परंपरा आणि इतिहास | ३११ |
| ८७ | व्यवस्था परिवर्तन आणि त्याचे परिणाम | ३१६ |
| ८८ | विज्ञान आणि धर्म | ३२२ |

# संपादकीय

**{ जुलै १९९७ }**

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारत देश स्वतंत्र झाला. १५ ऑगस्ट १९९७ रोजी आपल्या स्वातंत्र्याला अर्धशतक पूर्ण होईल. ५० वर्षांपूर्वी परकीय सत्तेचा या देशांतली वसाहतवाद संपून स्वकीयांची राजसत्ता या देशात चालू झाली. सर्व जग झोपलेले असताना मध्यरात्री भारत स्वतंत्र झाला. त्या वेळी तत्कालीन स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राष्ट्राला उद्देशून एक भावनापूर्ण भाषण केले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, तसेच समता आणि बंधुत्व या सिद्धांतावर आधारित नवसमाज आणि नवराष्ट्राच्या निर्मितीची ग्वाही त्यांनी त्या दिवशीच्या आपल्या भाषणात दिली. १९९७ साली म्हणजे स्वतंत्र भारताच्या ५० वर्षांच्या कालावधीत या स्वातंत्र्याला काय फळे आली याची चर्चा होणे अपरिहार्य आहे.

मनुष्याच्या आयुष्याच्या संदर्भात खरे म्हणजे वाढदिवस, कमी झालेल्या आयुष्याची वर्षे दाखवितो! याचे नाव 'वाढदिवस' असले तरी तो खरा 'काढदिवस' असतो. वाढलेला असतो तो माणसाचा अनुभव. हाच अनुभव त्याला आत्मपरीक्षण करायला लावतो. चिंतनशील आणि संयमी बनवतो. चुकांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करायला शिकवतो. पुढील आयुष्यातील समस्या सोडवण्याला मार्गदर्शन करतो. स्वातंत्र्याच्या वाढदिवसाचे विश्लेषण सुद्धा याच पार्श्वभूमीवर करणे हिताचे ठरले.

भारताचे स्वातंत्र्य हा अपघात नव्हता. तो एका लढ्याचा शेवट होता व दुसऱ्या लढ्याची सुरुवात होती. अनेकांच्या आयुष्याचे बलिदान आणि हजारोंच्या सुख-स्वप्नांच्या राखरांगोळीची किंमत या स्वातंत्र्याकरिता आपण दिली आहे.

स्वतंत्र भारताची ५० वर्षांनंतरची आजची स्थिती मन विषण्ण करणारी आहे. सत्तांतर म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ती नाही. तसेच भौतिक, आर्थिक प्रगतीचे निर्देशांकही स्वातंत्र्याचे मोजमाप नाही. कायदा किंवा शिस्त म्हणजेही स्वातंत्र्य नाही. तुरुंगामध्ये कायद्याचे आणि शिस्तीचे काटेकोर पालन असते; पण म्हणून कोणी तुरुंगात राहणे पसंत करणार नाही. १४ ऑगस्ट १९४७ ला भारत पारतंत्र्यात होता. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. लोकसंख्या, पर्यावरण, भौतिक वस्तू, संपूर्ण चराचर यांमध्ये या दोन दिवसांत तसा काहीच बदल झाला नव्हता. तरीही १४ ऑगस्टचा भारतीय नागरिक हा परतंत्र होता व १५ ऑगस्टचा ऑगस्टचा भारतीय नागरिक हा स्वतंत्र होता. 'स्वातंत्र्य' ही काही वस्तू नाही की जी दाखविता येते, बदलता येते किंवा जिची देवाण-घेवाण करता येते. स्वातंत्र्य ही एक संकल्पना आहे. स्वातंत्र्य हे एक मूल्य आहे. स्वातंत्र्य हा एक अधिकार आहे. स्वातंत्र्य ही एक जबाबदारी आहे. या पृथ्वीची निर्मिती देशांच्या सीमांची कुंपणे घालून झालेली नव्हती. तसेच मनुष्याची निर्मिती ही सुद्धा कुठल्याही एका विशिष्ट देशात झालेली नव्हती. शरीररचना आणि बाह्यांगांनी जगातील सर्वच माणसे सारखी असतात. राष्ट्राची निर्मितीच मानवनिर्मित आहे आणि म्हणूनच एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य हिरावून घेता येत नाही.

मनुष्य ज्या गर्भातून निर्माण होतो त्या सुरुवातीच्या गर्भपेशींना अवयव नसतात. पण याच पेशी विकसित होत अनेक अवयवाचा मनुष्य जन्म घेतो. या प्रत्येक अवयवाच्या पेशी वेगवेगळे कार्य करतात. हात, पाय, जीभ यांचे कार्य म्हणजे धर्म, संपूर्णतः वेगळे आहे. हाताला आणि पायाला हालचालींचे स्वातंत्र्य असते; नाक किंवा कान आपली जागा सोडू शकत नाहीत. हाताला किंवा पायाला हालचालीचे स्वातंत्र्य असले तरी कोणी हात आणि पाय उडवत चालत नाही. माणसाच्या गरजा, क्षमता, सोय इ. अनेक गोष्टी हातांच्या आणि पायांच्या हालचालींचे नियंत्रण करतात आणि हे नियंत्रण त्याच माणसाच्या स्वाधीन असते. या नियंत्रणाची अंमलबजावणी नकळत तोच करीत असतो. अशा नियंत्रणाचे स्वातंत्र्य तो जन्मजातच उपभोगत असतो. कवायतीच्या वेळीही त्याच्या हातापायांची हालचाल होत असते. पण ह्या हालचाली बाह्य नियंत्रणाने होत असतात. हे नियंत्रण जेव्हा असे बाह्य शक्तींकडे जाते व त्याचे अवयव दुसऱ्याच्या तालावर नाचू लागतात तेव्हा स्वतःचा विकास करण्याची क्षमता असली तरी दुसऱ्याच्या विकासाला तो हातभार लावतो आणि त्या विकासाचा वाटेकरी मात्र तो नसतो.

स्वातंत्र्य म्हणजे नियंत्रणशून्यताही नाही. स्वातंत्र्य जेव्हा नियंत्रणशून्य होते तेव्हा त्याचे परिवर्तन स्वैराचारात होते. असा स्वैराचार समाजाचे संतुलन बिघडवतो. व्यक्तीचा आणि समाजाचा विकास साधायचा असेल तर दोन्ही घटकांनी एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करायला हवा. मानवी अधिकार म्हणजे स्वैराचार किंवा दुसऱ्याचे अधिकार हिसकावून घ्यायचा परवाना नाही. नीती आणि मूल्यांचे आचारावरील नियंत्रण माणसाला चारित्र्यशील बनवते, स्वैराचाराला लगाम घालते आणि स्वातंत्र्य उपभोगू देते. चारित्र्य माणसाला नम्र करते, पण लाचार करीत नाही. आत्मसन्मान शिकवते, पण उर्मट करीत नाही. दुर्दैवाने गेल्या ५० वर्षांत भारतामध्ये स्वातंत्र्यापेक्षा स्वैराचार बोकाळला. गांधीजींनी राजकारण, नीती आणि मूल्यांनी बांधू पाहिले, पण स्वातंत्र्यानंतर राजकारण्यांनी नीतिमूल्यांच्या मुसक्या बांधल्या; गुन्हेगारी, स्वैराचार आणि चारित्र्यशून्यतेला सामाजिक प्रतिष्ठा यांनी मिळवून दिली. सज्जन दुर्बळ झाले, दुर्जन सबळ झाले. भाट आणि स्तुतिपाठक मानाच्या जागा पटकावून बसले. सामाजिक हिताकरता अप्रिय निर्णय घेणेही अव्यवहार्य होऊन सवंग लोकप्रियतेचे निर्णय हा राजकीय व्यवहार होऊन बसला. ढोंग, दांभिकता आणि खोटेपणा हे तर सामाजिक आणि राजकीय नेत्याच्या यशाचे गमक बनले. या सर्वांची परिणती म्हणजे स्वातंत्र्यानंतर ५० वर्षांनंतरचा आजचा आळशी, सवलतग्रस्त, लाचार, बेजबाबदार समाज. असा समज लवकरच आपली संस्कृती हरवून बसतो आणि दुसऱ्याच्या संस्कृतीचे भ्रष्ट अंधानुकरण करायला लागतो. भौगोलिक पारतंत्र्यापेक्षा, सांस्कृतिक पारतंत्र्य अधिक भीषण असते. १४ ऑगस्ट १९४७ ला भारत देश पारतंत्र्यात होता, पण भारतीय संस्कृती स्वतंत्र होती; १५ ऑगस्ट १९९७ ला भारत देश स्वतंत्र आहे पण भारतीयांची सांस्कृतिक गुलामगिरी वाढताना दिसत आहे. हीच या स्वातंत्र्याची शोकांतिका आहे. भविष्यात भौगोलिक स्वातंत्र्याबरोबरच आत्मसन्मान आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यही टिकवायचे असेल तर हीच आत्मपरीक्षणाची वेळ आहे. 'वस्तुनिष्ठ आत्मपरीक्षण' हाच या वाढदिवसाचा संदेश आहे आणि तीच भविष्यात त्या स्वातंत्र्याच्या सुरक्षिततेची हमी आहे.

✧✧✧

# संपादकीय

{ ऑक्टोबर १९९७ }

'जीवन हे रहस्यमय आहे' असे विधान जर एखाद्याने केले तर त्या विधानासंदर्भात फारसा वाद होणार नाही. स्वानुभवावरून प्रत्येक व्यक्तीला हे उमगलेले असते की, त्याच्या आयुष्यात मागे पडलेल्या घटना जशा तर्कसुसंगत नव्हत्या तशा भविष्यातल्या घटनाही तर्कसंगत होतील अशी तो खात्री देऊ शकत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे कुठलाच मनुष्य वेगळा एकटा जगत नसतो. त्याचे जीवन इतके परस्परावलंबी असते की, त्याच्या स्वतः व्यतिरिक्त इतर घटकांची खात्री तो घेऊच शकत नाही. ही अनिश्चितता, अस्थिरता, अनिर्णितपणा, समाजशास्त्र आणि नागरिकशास्त्राच्या आखणी, बांधणी आणि बुडाशी आहे. मोटारीची वैयक्तिक वेगक्षमता कितीही असली तरी रस्त्यावरून जेव्हा ती चालते त्यावेळी तिचा वेग, मार्ग, दिशा या सगळ्यांवर नियंत्रण घालून गाडी रस्त्यावरून चालवावी लागते. याचेही कारण हेच आहे की गाडी रस्त्यावर एकच नसते, तिच्या सुरक्षित प्रवासाकरता आणि त्यामधील प्रवाशांच्या हिताकरिता रस्त्यावरील सर्वच घटकांना आपल्या क्षमता आणि हालचालींवर बंधन घालून घ्यावे लागते. हे बंधन हा स्वातंत्र्याचा संकोच नसतो, उलट तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर असतो. मनुष्याच्या जीवनामध्ये सुद्धा आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याच्या बौद्धिक आणि शारीरिक क्षमता बदलत असतात. त्याचा अनुभव त्याला शहाणा करीत असतो. समाजामध्ये एकाच वेळेला त्या त्या स्थितीमधल्या व्यक्तींनी आत्मकेंद्रित बनून, आपल्या क्षमतांच्या स्वातंत्र्याचा अनिर्बंध वापर करणे शक्य असले तरी समाजाला घातक असते. रानटी आणि सभ्य, असंस्कृत आणि सुसंस्कृत यांमधील फरक हा या बंधनाचाच आहे. सहजीवन, सुसह्य आणि निर्मितीक्षम व्हावे म्हणून अनेक समाजसंस्थांची निर्मिती केली जाते.

जन्म, मृत्यू या फक्त घटना न रहाता त्यांना जीवनसंदर्भ प्राप्त होतो. हा सर्वच समाज आणि व्यक्तिव्यवहार संस्कृतीला जन्म देत असतो. ज्या समाजाला विवेकी, दूरदर्शी आणि संयमी नेतृत्व लाभते त्या समाजामधील समाजसंस्थांची निर्मिती व्यवहार्य आणि परिपक्व होते. वाहत्या काळामध्ये या संस्थाही स्थिर न राहता त्यांची पुन्हा पुन्हा बांधणी होत रहाते. या प्रक्रियेमध्ये या दीर्घ अस्तित्वाचे कारण समजावून घेणे हिताचे असते. ही कारणमीमांसा समजून घेताना याआधीचा समाज हा अप्रगत, अशिक्षित, असंस्कृत आणि मूर्ख होता आणि म्हणून त्यांनी या संस्थांमध्ये बदल केला नाही असे मानणे नुसतेच त्या समाजावर अन्यायकारक असते असे नाही, तर ते वस्तुस्थितीचाही विपर्यास करणारे असते. आजचे मानवंशशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अनक अभ्यासकांचे अशा समाजसंस्थाबद्दलचे विवेचन वाचले की या भूमिकेचे स्वरूप स्पष्ट होते. स्त्रीपुरुष संबंध, लैंगिक स्वातंत्र्य, लग्न आणि कुटुंब या समाजसंस्था आणि घटक, हे कुठल्याही संस्कृतीचा पाया असतात. उथळ, आत्मकेंद्रित भूमिकेवरून या संस्थांची निर्मिती आणि बांधणी अल्पकाळ, पुरोगामी किंवा स्वातंत्र्यवादी वाटली तरी दूरगामी ती समाज कमकुवत, भरकटलेला, दिशाहीन आणि स्वार्थी करणारी असते. सुधारणा म्हणजे मोडतोड नाही किंवा स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. पाश्चिमात्य समाजामध्ये आलेली सुबत्ता ही अलीकडील काही शतकांमधील घटना आहे. ही सुबत्ताही बहुतांशी भौतिक आणि आर्थिक वस्तूंच्या उपलब्धतेशी निगडित आहे. वस्तुरुपी नसलेल्या समाजसंस्थांची या समाजाची निर्मिती, ही आदर्श, प्रगतशील आणि संतुलित आहे असा निष्कर्ष काढणे ही तर्क फसवणूक आहे. या समाजातील आजची मुलांची व थोरांची परिस्थिती भीतिदायक आहे. पुरुष आणि स्त्रिया दोन्हीही पराकोटीचे आत्मकेंद्रित असल्यामुळे एकमेकांचे शत्रू झाले आहेत. हा मानवी संघर्ष एवढा जीवघेणा आहे की त्यातून पळवाट म्हणून भोकाड, आरडाओरडा करणारे संगीत, अमली पदार्थांचे सेवन आणि विक्षिप्त, आचरट, विदुषकी जीवनपद्धतीचा स्वीकार करण्यात येत आहे. यातूनच निर्माण झालेल्या हव्यास आणि लालसेपोटी या समाजाने निसर्गाचे संतुलनही बिघडविले आहे. भारतीय सभ्यता आणि संस्कृती यांचा कालपटल फार मोठा आहे. या समाजाने कदाचित खूप वेळा सुबत्ता आणि अधोगती या चक्रातून प्रवास केला असल्याची शक्यता आहे. या चुकांमधून, अनुभवांतून धड घेऊन या समाजाच्या सामाजिक संस्थांची निर्मिती झाल्याची दाट शक्यता आहे. जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, आश्रमरचना या पायांवर निर्माण झालेल्या लग्न, कुटुंब, नीती-अनीतिच्या कल्पना काळजीपूर्वक

तपासायला हव्यात. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून व्यवसाय करणारे समाजशास्त्रज्ञ, इतिहास आणि संस्कृतीचे प्राध्यापक किंवा सिद्धान्तवादाचे झापड बांधलेले साम्यसमाजवादी विचारसरणीचे गुलाम यांच्याकडून या संस्थांची तपासणी करून घेणे संस्कृतिरक्षणापेक्षा संस्कृतिभंजक ठरेल. पुरोगामित्व आणि प्रगतीच्या नावाखाली आपल्या कायद्यात आपण करीत असलेले बदल आणि स्त्रीमुक्ती चळवळीची वाटचाल याच मार्गाने जाताना आज दिसत आहे. सवंग लोकप्रियतेला हपापलेले भ्रष्टाचारी आणि खुजे राजकीय, तसेच सामाजिक नेतृत्व हे या घसरणीचा वेग वाढवत आहे. तथाकथित धर्ममार्तंडही आपले आश्रम, स्थावरजंगम टिकवण्यामध्ये मशगूल आहेत. अशावेळी काळामध्ये तावूनसुलाखून निघालेले श्रीमत् भगवत गीता, रामायण, महाभारत आणि संतवाङ्मय मार्गदर्शक ठरू शकेल. याकरता अहंकार बाजूला सारून आत्मपरीक्षणाची मानसिक तयारी मात्र हवी.

✧✧✧

# संपादकीय

**{ जानेवारी ११९८ }**

भारतीय धर्म आणि त्यावरील आधारित संस्कृती आणि पाश्चात्त्य धर्म आणि संस्कृती (इसाई, यहुदी, इस्लाम इत्यादी) यांमध्ये काही मूलभूत फरक आहेत. सद्‌भावनेतून, सर्व धर्म सारखे आहेत ही भूमिका जरी स्वागतार्ह असली तरी ते वास्तव नाही. अनेक विद्यापीठांमध्ये असलेले इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र धर्म यांचे विभाग याची साक्ष देतात. सृष्टीची निर्मिती आणि मानव-सृष्टिसंबंध याबाबतीत या सर्वच धर्मांची आपापली भूमिका आहे. यातूनच आपल्या भोवतालचा परिसर, इतर नैसर्गिक साधन संपत्ती, पशू, पक्षी, प्राणी आणि इतर मानव यांच्याशी करायचा व्यवहार धर्मसंकल्पनेतून मांडला जातो. धर्मसंकल्पनेच्या या मूळ स्रोताकडे, मानवानेच आज निर्माण केलेल्या भयावह परिस्थितीवर उत्तर शोधताना दुर्लक्ष करून चालणार नाही.

नुकतीच (डिसेंबर १ ते १०) जपानमध्ये क्योटो येथे संयुक्त राष्ट्रांतर्फे, पृथ्वीच्या वाढत्या तापमानाबाबत विचार करण्याकरिता एक जागतिक परिषद झाली. एकशेसाठहूनही अधिक राष्ट्रांनी त्यात सहभाग घेतला. पृथ्वीचे तापमान आज वाढत आहे आणि त्याला बहुतांशी मानवी व्यवहार जबाबदार आहे हे जगातील जवळ जवळ सर्व शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर एकविसाव्या आणि पुढील शतकांत सर्वच मानवजातीला नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागेल, हा वैज्ञनिकांचा सावध इशारा आहे आणि म्हणूनच या वाढत्या तापमानाला कारणीभूत असलेल्या मानवी व्यवहारांवर नियंत्रण टाकणे हा एकच उपाय याकरिता शिल्लक राहतो. आपल्या भौतिक गरजांच्या पूर्तीकरिता

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अनिर्बंध वापराला पाश्चात्त्य संस्कृतीची धर्ममूल्ये अटकाव करू शकली नाहीत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मुख्य उद्देश हाच मुळी निसर्गाला आपला दास बनविणे असा झाला. पर्यावरणाचा आजचा समतोल, हा औद्योगिक क्रांतीनंतरचा अविभाज्य भाग आहे. आपल्या जीवनशैलीमध्ये याला सुसंगत असा बदल या राष्ट्रांनी घडवून आणला. जो समाज किंवा धर्म अशा प्रकारे बदलत नव्हता त्यावर या राष्ट्रांनी अविकसित किंवा अप्रगत असा शिक्का मारला. त्यांच्या धर्मसंकल्पनेमधील अनेक आचार, अंधश्रद्धा कालबाह्य ठरवून त्यांची कुचेष्टा आणि हेटाळणी केली. डाव्या राजकीय सिद्धांतवादी आणि जडवाद्यांनी या देशात हीच भूमिका उचलून धरली. निधर्माखाली केलेल्या अधर्माची किंमत अखिल मानवजातीला आज द्यावी लागत आहे. जी संस्कृती आणि राष्ट्रे याला जबाबदार आहेत ते आज ही किंमत द्यायची टाळाटाळ करीत आहेत. वरवर अर्थकारणाशी निगडित असणारा हा प्रश्न मूलभूत धर्मसंकल्पनांशी निगडित आहे हे समजून घेणे फार महत्त्वाचे आणि भारतीयांच्या दृष्टीने फायद्याचे आहे.

✧✧✧

# संपादकीय

**{ एप्रिल १९९८ }**

नुकत्याच अमेरिकेमध्ये घडलेल्या एका घटनेने संपूर्ण जग स्तंभित झाले. हे कारण 'डॉली' या मेंढीचा जन्म चंद्रावर मानवाचे पाऊल किंवा मंगळावर पाथफाइंडरचा संचार यापैकी काहीच नसून हे कारण मानवाच्या वागणुकीशी संबंधित आहे. ११ आणि १३ वर्षांच्या दोन शालेय मुलांनी आपल्याच वर्गबांधवांवर बेछूट गोळीबार केला. यामध्ये काही मुले मृत्युमुखी पडली. गेल्या २ वर्षांत अमेरिकेत सुमारे ३ ते ४ प्रसंग घडले की ज्यात शालेय मुलांनी आपल्या सहकाऱ्यांवर गोळीबार केला. गेल्या २ वर्षांत इंग्लंडमध्ये एका माथेफिरूने शाळेत जाऊन गोळीबार करून सुमारे २०-२५ मुलांना मारून टाकले. ऑस्ट्रेलियामध्येही असाच प्रकार झाला. गेल्याच आठवड्यात आयर्लंडमधील एका ख्रिस्ती पंथाने, आपल्या शालेय संस्थांमधून विद्यार्थ्यांवर झालेल्या लैंगिक व्यभिचाराबद्दल जाहीर माफी मागितली. गेल्या १० वर्षांमध्ये आपल्याच मुलांवर लैंगिक व्यभिचार करण्याचे प्रकार विकसित राष्ट्रांमधून मोठ्या प्रमाणावर उघडकीस आले आहेत. किळस वाटावी आणि मानवाला आपल्या अस्तित्वाची शरम वाटावी असे हे प्रकार आहेत. ज्या देशांमध्ये हे प्रकार पडत आहेत ते देश आर्थिक दृष्ट्या सुबत्तेमध्ये नांदणारे आहेत. गरिबीमुळे या घटना घडलेल्या नाहीत. आत्मकेंद्रित, चंगळवादी, भौतिक सुखांमध्ये लोळणाऱ्या समाजामध्ये मानवाचे हे हिडीस स्वरूप वारंवार दिसत आहे. अर्थातच सिद्धांतवादाला बांधलेले समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ कंटाळा येणारी तीच-तीच चर्चा करण्यात आणि असंबद्ध आणि बालिश निष्कर्ष काढण्यात दंग आहेत.

मानवी अधिकार आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या आचरट संकल्पना तात्पुरत्या स्वातंत्र्याचा आभास निर्माण करतात. हेच स्वातंत्र्य पुढे स्वैराचाराचे रूप घेते.

साहजिकच यामध्ये पहिला बळी समाजसंस्थांचा पडतो. अशा उद्ध्वस्त समाजसंस्था विकृत समाज निर्माण करतात. स्त्री–पुरुष संबंधच फक्त मानव निर्माण करू शकतो आणि मानववंश अखंडपणे चालू रहातो. हा जेव्हा नुसताच वासनापूर्तीचा खेळ होतो तेव्हा त्यातून होणारी निर्मिती 'राक्षसी' स्वरूप धारण करते. अमेरिकेतील आणि विकसित राष्ट्रामधील मूल आज वासनेची निर्मिती झाली आहेत. त्यांचे पोषण करणारी कुटुंबसंस्था आज उद्ध्वस्त आहे. दिशाहीन, वैफल्यग्रस्त मुले स्वतः आततायी होतात किंवा आततायी वासनांना बळी पडतात. संयमी आणि विवेकी समाजनेतृत्व अशा विकृत समाजाची निर्मिती टाळू शकते. भौतिक वस्तूंची निर्मिती म्हणजेच प्रगती, हा मंत्र स्वीकारण्याआधी भारतीयांनी डोळस होऊन आपल्या लग्न आणि कुटुंब इ. समाजसंस्थेचे रक्षण करणे भविष्यातील पिढ्यांच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

✧✧✧

# संपादकीय

## { जुलै १९९८ }

रूपक, दृष्टांत आणि उपमा यांना साहित्यामध्ये एक विशेष स्थान आहे. सर्वात कठीण आणि गहन गोष्ट थोडक्यात आणि सोपी करून सांगायची असेल तर रूपक आणि उपमांचा आधार घ्यावाच लागतो. (लेखक किंवा कवी अलंकार म्हणून उपमा, रूपक इत्यादींचा उपयोग करतात. संत हेच आध्यात्मिक पातळीवर दृष्टान्ताच्या रूपात प्रभावीपणे मांडतात.) काही वचने ही जीवनाचा फार मोठा आशय थोडक्यात सांगून जातात.

उक्ती आणि कृती यामधला फरक आपल्या नेहमीच्या पाहण्यातला आहे. प्रत्यक्ष अनुभवामुळे सुद्धा आपल्याला हे समजते की, ज्या अनेक गोष्टी आपण चांगल्या म्हणून सांगत असतो त्या स्वतःच्या बाबतीत कृतीत उतरवणे फार कठीण असते. ही विसंगती ज्यांच्या बाबतीत कमीत कमी असते ती व्यक्ती खरोखरच आदरणीय आणि अनुकरणीय असते. कुठल्याही प्रचाराशिवाय किंवा व्यक्तिमत्त्व स्तोमाशिवाय सामान्य माणूस अशा लोकांपुढे नतमस्तक होतो. आजच्या राजकीय पुढाऱ्यांचे चित्र मात्र वेगळे आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या या नेत्यांना आपल्या खुशमस्कऱ्यांकडून सत्कार करून घ्यावे लागतात. वर्तमानपत्रामधून फोटो देऊन आपले वाढदिवस साजरे करावे लागतात. असे लाचार आणि लोटांगण संस्कृती जपणारे अनुयायी, समाज जीवनांत यशस्वी होताना आपण पाहतो. संतांनी हिच गोष्ट एका वाक्यात सांगून ठेवली आहे. ''बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.'' आपल्या धर्मग्रंथांमधून सृष्टीची आणि जीवनाची अनेक गूढ तत्त्वे अशा रूपक आणि उपमांच्या माध्यमामधून सांगितलेली आहेत. हजारो लेख किंवा व्याख्यानं देऊन जी गोष्ट स्पष्ट करता येणार नाही अशा गोष्टी या रूपकांच्या माध्यमामुळे

सामान्यमाणसालाही समजू शकतात. कारण ही रूपकं म्हणजे दैनंदिन जीवनातील अनुभवाचेच एक प्रतीक असते. स्वानुभवाच्या सिद्धतेकरता वेगळे स्पष्टीकरण लागत नाही. पण अशी उदाहरणे शोधणे कठीण असते. कल्पक आणि सर्जनशील चिंतकच अशी रूपके सहजतेने देऊ शकतात. असे वाङ्मय चिरंतन टिकते. उपनिषदे आणि संतवाङ्मय हे याचे उत्तम उदाहरण आहे. संस्कारक्षम वयामध्ये पूर्वी लहान मुलांना आजी-आजोबांकडून गोष्टीरूपाने हे ज्ञान मिळत असे. नकळत या गोष्टी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत होत्या. विभक्त कुटुंबसंस्थेने आज हे माध्यमच हरवले आहे. सुधारणा आणि सिद्धांतवाद्यांनी धर्मसंकल्पना म्हणून या गोष्टींची अवहेलना केली. या सुधारणांची किंमत आज आपण मोजीत आहोत. भविष्यात अशा सुधारणा तपासूनच स्वीकारायला हव्यात. सुसंस्कृत पण आर्थिकदृष्ट्या गरिब समाज श्रीमंत होऊ शकतो; पण असंस्कृत, चंगळवादी समाज आधी भ्रष्ट होतो आणि मग नष्ट होतो.

✧✧✧

# सुधारणा की मोडतोड?

**{ ऑक्टोबर १९९८ }**

उत्क्रांतिवादाप्रमाणे लाखो वर्षांच्या विकासातून माकडापासून आजचा माणूस निर्माण झाला. संपूर्ण सृष्टीची निर्मिती ही एका पेशीपासून अनेक पेशींपर्यंत कशी होत गेली हा विशेष अभ्यासाचा भाग आहे. आजच्या स्वरूपाचा मानवाचा विचार केला तरी तोही या स्वरूपात लाखो वर्षे अस्तित्वात आहे. या हजारो वर्षांमध्ये त्याच्या बाह्य स्वरूपामध्ये मात्र प्रचंड बदल झाला आहे. त्याचे खाणे-पिणे, समूहाने राहणे, विशिष्ट जीवनपद्धतीचा अवलंब करणे हा त्याच्या बाह्य बदलांचा एक भाग आहे. शुद्ध वास्तव स्वरूपातील मानवाचे सत्य म्हणजे नर आणि मादी इतक्या भेदापुरतेच मर्यादित आहे. पुढे नराचा माणूस, गृहस्थ, वडील, मुलगा, भाऊ इ. तर मादीची स्त्री, नारी, आई, बहीण, पत्नी, मुलगी इ. रूपे निर्माण होतात. हा बदल शरीररचनाशास्त्रापेक्षा त्यांच्या सामाजिक भूमिकेशी निगडित आहे. यातूनच पुढे समूह-जीवन चालू होते. समूह-जीवनातील विकासाचा पुढील टप्पा म्हणजे लग्न, कुटुंब इ. सामाजिक संस्था. आजही जंगलामध्ये काही मानव नग्न अवस्थेत टोळ्या करून राहतात. आपण समूह करून वस्त्रे नेसून राहतो. आता वस्त्रे नेसणे हा बाह्य संस्कृतीचा भाग आहे. याचा अर्थ आपण सत्य लपवतो असा होत नाही. पण तसा युक्तिवाद कोणी करायला लागला तर शुद्ध तर्कावर त्याला उत्तर देणे फार कठीण आहे. समूह-जीवन सुसह्य करायचे तर व्यक्तिगत क्षमतेवर नियंत्रण पाळणे आवश्यक होते. सहजीवनामध्ये असे नियंत्रण म्हणजे स्वातंत्र्याचा संकोच धरला जात नाही. स्वैराचार आणि अशा स्वातंत्र्याच्या कल्पनेमध्ये फरक हा फक्त सांस्कृतिक आहे. सर्व सामाजिक संस्थांची निर्मिती हीच मुळी सांस्कृतिक आहे. नीती, मूल्य आणि चारित्र्य यासुद्धा सांस्कृतिक संकल्पना आहेत. समाजअंगाचा तो

एक भाग आहे, तो भाग शरीररचनेचा नाही. या मूल्यांचा विकास हा संस्कारांतून करावा लागतो. नारीच्या आई, पत्नी आणि मुलगी या सामाजिक भूमिका आहेत. नर म्हणजे पुरुष जेव्हा पती किंवा मुलगा असतो, तेव्हा तोही बदल त्याच्या भूमिकेतलाच असतो, तरीही सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर या नात्यांच्या परस्पर वागणुकीवर नियंत्रणे असतात. ही नियंत्रणे नैतिक असतात. घटना किंवा कायदा करून त्यांची अंमलबजावणी करता येत नाही. अशी मूल्ये, नातीगोती एकमेकांचा आदर करत ज्या समाजामध्ये विकसित होतात तो समाज सुसह्य जीवन जगतो. कालानुरूप या रचनांमध्ये बदलही करायला लागतो. हा बदल नाकारणारा समाजही फार काळ सुसंस्कृत राहू शकत नाही. उत्क्रांतीमध्ये शरीररचनेत बदल हा फार धिम्या गतीने होत असतो आणि या बदलाला इतर शरीररचनेतील पेशी आणि अवयवही जुळवून घेत असतात. यालाच 'शरीररचनेतील सुधारणा' म्हणता येईल. कुटुंब किंवा लग्न अशा समाजसंस्था किंवा त्यांना बांधणाऱ्या नीतिमूल्यांच्या संकल्पनांमध्येही बदल होत असतो. सिद्धान्तवाद किंवा चिल्लर लोकप्रियतेच्या नावाखाली जी मोडतोड केली जाते त्यांना सुधारणा म्हणता येत नाही. आजच्या समाजातील सुधारणांचे स्वरूप हे या मोडतोडीचे आहे. ही वाटचाल संस्कृतिसंवर्धनापेक्षा सांस्कृतिभंजनाकडे आहे. आजची स्त्रीमुक्तीची चळवळ ही स्त्री-विकासापेक्षा पुरुषद्वेषावर आधारित आहे की अशा स्वरूपात राबवली जाताना दिसत आहे. नर आणि मादी एवढेच सत्य मानले तर या चळवळीचा प्रवास बरोबर आहे. कुठल्या दिशेने प्रवास करायचा हे स्वातंत्र्य समाजाला आहे.

✧✧✧

# शपथेचे महत्त्व

**{ जानेवारी १९९९ }**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. क्लिंटन यांचे 'शपथ प्रकरण' सध्या चांगलेच गाजत आहे. माणसाचा भौतिक विकास हा त्याच्या चारित्र्य आणि नीतिचा किंवा सामाजिक बांधिलकीचा स्तर उंचावू शकत नाही याचे हे चांगले उदाहरण आहे. वस्तुतः शपथ घेणं ही क्रीया अतिशय साधी आणि सोपी आहे. मनुष्य ज्या वेळेस शपथ घेतो त्यावेळी तो कोणतीही दृश्य वस्तू सादर करत नसतो. आपल्या शपथेला अधिक विश्वासार्हता प्राप्त व्हावी म्हणून तो आपली प्रिय वस्तू, व्यक्ती किंवा धर्मग्रंथांचा आधार घेऊन शपथ घेतो. पण हा व्यवहार एका अदृश्य, अव्यक्त, निराकार 'विश्वास' या संकल्पनेचा विश्वास देण्याकरिता केलेली धडपड असते. 'मी शपथेवर खरं सांगेन' या माणसाने दिलेल्या विश्वासाच्या सत्यतेचा पडताळा, कोठलेही भौतिक यंत्र किंवा कायद्याची चौकट तपासून निर्णय देऊ शक तनाही. वस्तुरूप म्हणून साकार झालेल्या गोष्टींच्या निर्मितीची कारणमीमांसा तर्क आणि पुरावे यांच्या आधारे करता येते. अनेक मानवी व्यवहार, संभाषण आणि संबंधांचा पुरावा, निव्वळ तर्क किंवा कारणमीमांसेच्या कसोटीवर सिद्ध करता येत नाही. व्यवहार्य जीवनामधील फायदा, तोटा यांचा प्रभाव पडू न देता तटस्थ आणि अलिप्त भूमिका माणसाला घेता येणे ही एका उन्नत, प्रगत, सुसंस्कृत समाजाचे लक्षण आहे. अपघाताने असा समाज निर्माण होत नसतो. जबाबदार समाजसंस्था आणि नाती निर्माण करून असा कर्तव्यदक्ष समाज, हेतुपुरस्सर निर्माण करावा लागतो. आत्मकेंद्रित, स्वैराचारी, फक्त जडवादाचा पुरस्कार करणारा समाज असा उन्नत नागरिक घडवू शकत नाही. वर सांगितल्याप्रमाणे निव्वळ भौतिक समृद्धीतूनही असा समाज निर्माण होत नाही. पाश्चात्त्य संस्कृतीतील 'अनिर्बंध' स्वातंत्र्य किंवा मानवी अधिकार

यांच्या संकल्पना या किती उथळ आणि फसव्या आहेत हेही क्लिंटन यांच्या उदाहरणावरून दिसून येते. एकांतात किंवा संधी असतानाही जो मनुष्य आपल्या नैसर्गिक क्षमतांचा दुरूपयोग करत नाही तोच खरा दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आणि अधिकाराचा सन्मान करत असतो. ज्या समाजामध्ये अशा उन्नत व्यक्तींची संख्या जास्त असते अशा समाजामध्ये शपथ घेण्याला काही अर्थ असू शकतो. मनुष्य स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीलाच फक्त घाबरू शकतो. याची संपूर्ण जाणीव भारतीय स्मृतीकारांना होती, हे मनु, याज्ञवल्क्य व इतर नंतरच्या स्मृतीकारांचे ग्रंथ वाचून दिसून येते. आजची आपली 'स्मृती' म्हणजे घटनेने गेल्या ५० वर्षांत कोठला समाज निर्माण केला याचा आपण सर्वांनीच गंभीर विचार करायला हवा.

✧✧✧

# संस्कृतचे महत्त्व

## { एप्रिल १९९९ }

भारत सरकारनी या गुढीपाडव्यापासून पुढील वर्ष संस्कृत वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या निर्णयाबद्दल भारत सरकार अभिनंदनास पात्र आहे.

संस्कृत भाषेला भारतीय जीवनात एक अनन्य साधारण महत्त्व आहे. जगामध्ये आज हजारों भाषा आहेत. भारताचे पंचवीस प्रांत आहेत व प्रत्येक प्रांताची एक भाषा आहे. सर्वच भाषा आपापल्या परीने श्रेष्ठ आहेत. अनेक भाषा कालाच्या प्रवाहात निर्माण होतात व पुढे लोप पावतात. अस्तित्वात असलेल्या भाषांच्या शैली व उच्चारामध्ये सतत फरक होत असतो. मराठी भाषेचा इतिहास बघितला की या गोष्टी सहज स्पष्ट होतात. बाराव्या-तेराव्या शतकातील मराठी आज विसाव्या शतकात अनाकलनीय आहे. हीच परिस्थिती अनेक उत्तर व दक्षिणेकडील भाषांची आहे. हे असं का घडतं याचा अभ्यास करणे संस्कृत भाषेचे महत्त्व समजण्याकरिता महत्त्वाचे आहे.

भाषा हे माणसाला उपलब्ध असलेले एक महत्त्वाचे संपर्काचे साधन आहे. आपल्या जीवनातील अनुभव मनुष्य या माध्यमातून व्यक्त करीत असतो. हे विचार तो जसे बोलून व्यक्त करतो, तसेच पुढे चिन्हांचा वापर करून लिखित स्वरूपातही तो व्यक्त करू लागतो. यातूनच त्याची प्रत्यक्ष बोली-भाषा व त्यातून त्या भाषेची लिपी तयार होते. या बोली-भाषा व लिपीमध्ये वारंवार स्थित्यंतरे होत गेली तर ती भाषा किंवा लिपी मूळ अर्थ आणि नियंत्रण आणून त्याची पद्धती ठरवावी लागते. यातूनच पुढे भाषेचे व्याकरण तयार होते. भाषा ही अधिकाधिक व्यापक, अनुभव व्यक्त करण्यास समर्थ आणि बराच काळ टिकवून धरण्याकरिता भाषेला प्रमाणबद्ध करणे अनिवार्य होऊन बसते.

मनुष्याची संस्कृती जशी विकसित होत जाते तसतसे त्यांचे भौतिक व्यवहार वाढू लागतात. त्याच्या कला आणि तत्त्वज्ञानाचा विकास होऊ लागतो. त्यातून साहित्य, वाङ्मय निर्माण होते. मनुष्य हा अत्यंत सृजनशील प्राणी आहे. नुसता सूर्योदयाचा अनुभव दहा जणांना व्यक्त करण्यास सांगितला तर वय, लिंग, भौगोलिक परिस्थिती, इत्यादी अनेक बाबींवर अवलंबून या दहाही व्यक्ती सूर्योदयाचे वर्णन तेच किंवा वेगवेगळे शब्द वापरून किंवा वाक्यरचनेत बदल करून व्यक्त करतील. हा अनुभव व्यक्त करण्याकरता ही भाषा जर का प्रमाणबद्ध असेल तर त्यांनी व्यक्त केलेली प्रतिभा सर्वांना कळू शकेल. कित्येकवेळा एकच शब्द संस्कृतिच्या विविध छटा व्यक्त करण्याकरता ही भाषा जर का प्रमाणबद्ध असेल तर त्यांनी व्यक्त केलेली प्रतिभा सर्वांना कळू शकेल. कित्येक वेळा एकच शब्द संस्कृतिच्या विविध छटा व्यक्त करतात. सभ्यतेच्या सांस्कृतिक श्रीमंतीचेच ते एक लक्षण आहे. नुसत्या स्त्रिला मादी, बाई, आई, बहीण, पत्नी, वामा, वारांगना, नारी, इ. शब्द उपलब्ध आहेत. परंतु ही एक सांस्कृतिक छटा आहे. स्त्री जीवनाचा तो एक अनुभव आहे. सामाजिक स्थानाचे ते एक प्रतिबिंब आहे. ज्या भाष्येमध्ये असे अनुभव व्यक्त करणारे, या सांस्कृतिक छटा दर्शविणारे अनेक शब्द जेव्हा तयार होतात, तेव्हा ते त्या भाषेची समृद्धी दाखवतात. या पात्रतेवर संस्कृत एवढी समृद्ध भाषा जगात मिळणे कठीण आहे. पाणिनीने ज्या भाषेवर संस्कार केले त्या भाषेला संस्कृत भाषा म्हणतात. अडीच हजारांहून अधिक वर्ष भारता मधील वैज्ञानिक, आध्यात्मिक आणि वाङ्मयीन साहित्य या भाषेतून निर्माण झाले. काश्मीर मधील पंडित केरळ मधील पंडितांशी, मातृभाषा वेगळी असूनही त्यांच्याशी सहजपणे संवाद साधत होते. तत्त्वज्ञान, अध्यात्म, अर्थशास्त्र, स्थापत्य, पदार्थ विज्ञान, रसायन, वैद्यक इ. अनेक शास्त्रांचे हजारोंनी ग्रंथ आज भारतामधील अनेक ग्रंथालयात संस्कृत भाषेतून उपलब्ध आहेत. या एकाच कारणामुळेही संस्कृत भाषा भारतीयांनी जिवंत ठेवणे आवश्यक होऊन बसले आहे. भारतीयांचा गेल्या दोन/तीन हजार वर्षांचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहासच या ग्रंथामधून साठवला आहे. सतराव्या अठराव्या शतकामध्ये व्यापार आणि धर्म प्रसाराकरिता जेव्हा पाश्चिमात्य या देशात येऊ लागले तेव्हा त्यांना संस्कृत भाषेचे भारतीय जीवनातील महत्त्व समजले आणि त्यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास हिरिरीने चालू केला. नुसत्या प्रांतिक भाषेच्या अभ्यासावर ते थांबले नाहीत. सुरवातीच्या संस्कृत अभ्यासकांमध्ये बहुसंख्य ख्रिस्ती धर्मप्रसारक आहेत. रॉय या धर्मप्रसाराने सतराव्या शतकातच पाणिनीच्या व्याकरणाचे 'लॅटिन'मध्ये भाषांतर करून ठेवले आहे. अरबांनी ९व्या ते ११व्या

शतकामध्ये अनेक भारतीय 'शास्त्र' ग्रंथांचे 'अरेबिक' मध्ये भाषांतर करून ठेवले आहे.

दुर्दैवाने काही सिद्धांतवादी व राजकारणी लोकांनी संस्कृतचा संबंध जातीयवादाशी जोडला. असल्या आत्मघातकी व अदूरदर्शी धोरणामुळे संस्कृतचे अध्ययन व प्रसारावर अत्यंत विपरीत परिणाम झाला. त्याचे दूरगामी अनिष्ट परिणाम या राष्ट्राला भोगावे लागतील. भाषेच्या गुलामी इतकी वाईट गुलामी नाही. अनेक तर्कवाद व युक्तीवादाच्या माध्यमातून भाषातज्ज्ञच समाजाचा बुद्धीभेद करीत असतात. अशा विद्वानांच्या अनेक पिढ्या गेल्या तरी अखिल मानव जातीला आकलन होईल अशी प्रमाणबद्ध भाषा ते निर्माण करू शकणार नाहीत.

संस्कृत भाषेची निर्मिती ही भारताची मानवतेला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. या भाषेमध्ये न संपणारे ज्ञानाचे भांडार आहे. अनेक वैज्ञानिक व जीवनानुभवांना न्याय देईल असे शब्द भांडार आहे. सर्व भारतीय भाषांनी त्यामध्ये यथेच्छ डुंबावे. त्याचा हवा तेवढा आस्वाद घ्यावा तरीही तो न आटणारा असा एक स्रोत आहे. भारतीय भाषा जेवढ्या अधिकाधिकच इतर प्रांतिक भाविकांना आकलनीय होतील, अनुभव व्यक्त करण्याची त्यांची क्षमता वाढेल आणि याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे सांस्कृतिकदृष्ट्या विघटनाकडे चाललेला हा भारत पुन्हा एकसंघ होईल.

✧✧✧

# विसावे शतक आणि धर्म

{ जुलै १९९९ }

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात साम्यवादी सिद्धान्त युरोपात मांडला गेला. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी २० व्या शतकाच्या दुसऱ्या ते पाचव्या दशकात रशिया व चीन इ. राष्ट्रांमध्ये सुरू झाली. मूलतः अर्थवादाशी निगडित असलेल्या या सिद्धान्ताची दिवाळखोरी आज स्पष्ट झाली आहे. हे जरी खरे असले तरी साम्यवादाचा विजय सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आज दिसून येते. साम्यवादी अर्थकारणाचा स्वीकार न करणाऱ्या भांडवलवादी देशांमध्येही आज उघडपणे अथवा भौतिक भरभराटीमुळे जडवादी जीवनशैलीचा स्वीकार झालेला दिसतो. साम्यवादपूर्व युरोपात मानवी संस्कृतीचे नियंत्रण धर्मसत्ता मोठ्या प्रमाणावर करीत असे. १६ व्या शतकात चालू झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे निसर्गनिर्मिती व त्यामागील अव्यक्त शक्ती यांबद्दलच्या शास्त्रीय व धार्मिक संकल्पनांत तफावत पडत चालली होती. या धर्मसंकल्पनांनी प्रभावित होऊन व त्यांवर उभ्या असलेल्या अनेक सामाजिक संस्थांच्या उपयुक्ततेबद्दलही युरोपात यामुळे साशंकता निर्माण झाली. प्रत्यक्षात वैज्ञानिक किंवा औद्योगिक संकल्पना व सिद्धांत यांच्या विकासाला साम्यवादी सिद्धांताने काडीचाही हातभार लावलेला नाही. तरीही साम्यवादाने मात्र असा आव आणला की, भौतिक विकासासाठी धार्मिक संकल्पनांना मूठमाती देणे आवश्यक आहे. या औद्योगिक क्रांतीचे मोठे शिल्पकार देकार्त, न्यूटन, गॅलिलियो, कोपर्निकस इ. नास्तिक किंवा जडवादी नव्हते. ते आस्तिक किंवा अज्ञेयवादी होते. त्यांची धर्मावरील किंवा देवावरील श्रद्धा त्यांच्या विज्ञानाच्या आड आली नाही. साम्यवादी व समाजवादी यांनी मात्र असा आभास निर्माण केला की, वैज्ञानिक प्रगतीला जडवादच जबाबदार

आहे. साम्यवादी देशांत काय किंवा आर्थिक सुबत्ता असलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत काय मानवामानवामधील आजचा व्यवहार हा १६ व्या शतकातील युरोपातील संस्कृती किंवा सभ्यतेपेक्षा काडीमात्रही सुधारलेला दिसत नाही. उलट होत अधिक आत्मकेंद्रित, स्वार्थी, हिंसक आणि असंस्कृत झालेला दिसतो.

आशिया खंडातील सभ्यता युरोपातील सभ्यतेपेक्षा किती तरी प्राचीन आहे. त्यांची धर्मसंकल्पनाही युरोपपेक्षा भिन्न आहे. परिस्थितीत फरक पडल्यावर परंपरांमध्ये काही बदल होणे अपरिहार्य असते. ख्रिस्तपूर्व शतकांपासून ते अगदी सोळाव्या शतकापर्यंत आपल्या संस्कृतामधून भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती सतत होत होती. शतकानुशतकांच्या अनुभवातून त्यांनी आपल्या सामाजिक संस्था व नीतिअनीतीच्या संकल्पना निर्माण केल्या होत्या. त्या केव्हाही त्यांच्या वैज्ञानिक विकासाच्या आड आल्या नव्हत्या. पाणिनीचे व्याकरणशास्त्र असो, आर्यभट्टाचे ग्रहगणित असो किंवा वात्स्यायनाचे कामसूत्र असो; कुठल्याच शंकराचार्यांनी त्यात हस्तक्षेप केला नाही. युरोपमधील व आपल्याकडील धर्मसंकल्पना व धर्मसत्तांमध्ये हा फार मोठा फरक आहे याचा काडीचाही विचार न करता साम्यसमाजवाद्यांनी आपल्या अर्थवादाबरोबरच धर्मभंजन आणि संस्कृतिभंजन हिरिरीने केले. आजची आपली परिस्थिती ‘न घरका, न घाटका’ अशी होण्याला हेच सिद्धांत कारणीभूत आहेत. पर्यायी जीवनपद्धती देण्याची त्यांची क्षमताही नाही. आज आपण विवेकी धर्मविचारही हरवून बसलो आहोत. आजचा भ्रष्टाचार हे त्याचेच फलित आहे. केवळ कायदा समाजाचे नियंत्रण करू शकत नाही, कारण नीतीभ्रष्ट समाज हा कल्पकतेने कायदा निष्प्रभ करतो. कायदा एकवेळ भीतीवर आधारलेला समाज निर्माण करू शकतो, पण तो माणसाचे शील किंवा चारित्र्य निर्माण करू शकत नाही. त्यांचा उगम संस्कारित माणसामध्येच होऊ शकतो. प्राचीन भारतात हे संस्कार धर्म नियंत्रित करीत होता. तोच खरा मानवी धर्म आहे. आज पुन्हा त्याच धर्मस्थापनेची आवश्यकता आहे.

✧✧✧

# अर्थ आणि मूल्ये

{ ऑक्टोबर १९९९ }

आज आपल्या समाजात 'अर्थाला' मोठे मूल्य प्राप्त झाले आहे. याउलट मूल्ये 'अर्थहीन' झाली आहेत. भारतीय विचारधारेमध्ये जे चार पुरुषार्थ सांगितले आहेत त्यांमध्ये अर्थाचा समावेश आहे. धर्म आणि मोक्षाबरोबर कामाचाही त्यांमध्ये अंतर्भाव आहे. भारतीयांचा जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन यातून व्यक्त होतो.

आपल्या सभोवतालचे पर्यावरण अनेक घटकांनी बनलेले असते. यातले सर्वच घटक अव्यक्त असतात. तरीही त्यांचे अस्तित्व आपण नाकारत नाही. या प्रत्येक घटकाचे अंतिम परिणाम हे त्यांच्या मात्रेवर अवलंबून असतात. या घटकांमध्ये जेव्हा संतुलन असते, तेव्हा पर्यावरणातील समतोल साधला जातो.

मानवी जीवन हे सुद्धा अनेक पदर आणि स्थित्यंतरे यांनी भरलेले आहे. त्यांमध्ये स्त्री आणि पुरुष आहेतच. पण अनेक वयोगटही त्यामध्ये समाविष्ट असतात. ह्या प्रत्येक घटकाच्या गरजा आणि क्षमता भिन्न असतात. एकाच व्यक्तीच्या संबंध दिवसातील सामाजिक आणि सांस्कृतिक भूमिकांमध्येही बदल होत असतो. सर्वसाधारण पुरुष हा गृहस्थ, पती, वडील, भाऊ, मुलगा, मित्र, नागरिक अशा अनेक भूमिका एकाच दिवसात पार पाडीत असतो. या प्रत्येक भूमिकेचा संदर्भ, जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात.

या सर्व बदलणाऱ्या भूमिका, लिंग आणि वय यांमध्ये संघर्ष न होता एकमेकांमध्ये संवाद, लय आणि पूरकता निर्माण करण्याकरिता विशिष्ट आचारसंहितेचे पालन करावे लागते. या आचारसंहितेमध्ये अधिकाधिक समाजघटकांना न्याय

देण्याचा प्रयत्न केलेला असतो. म्हणूनच यात अनेक सवलती, नियंत्रणे यांचा अंतर्भाव असतो. या सूत्रांमध्ये अनेक वेळा विरोधाभासही असतो. तरीही संतुलित जीवनाकरिता या आचारसंहितांचे पालन बहुसंख्यांनी करावे लागते. प्रत्येक व्यक्तीचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन हे वरवर स्वतंत्र वाटले तरी सर्वस्वी परावलंबी किंवा सभोवतालच्या समाजावर अवलंबून असते. एकट्या व्यक्तीचे अधिकार किंवा स्वातंत्र्य आणि तीच व्यक्ती जेव्हा समाजाची घटक असते तेव्हा त्या व्यक्तीचे अधिकार आणि स्वातंत्र्य हे भिन्न असतात. आपण एकटे असतो तेव्हा कसेही हातवारे करू शकतो. पण गर्दीध्मये असे हातवारे करता येत नाहीत. इतरांच्या अस्तित्वाचा विचार करावा लागतो. पुरुष 'वडील' झाल्यावर किंवा स्त्री 'आई' झाल्यावर 'पुरुष' किंवा 'स्त्री' म्हणून असलेल्या स्वातंत्र्यावर नियंत्रणे येतात. स्त्री-पुरुषांनी विवाहसंस्कार स्वीकारल्यानंतर त्यांचे स्वातंत्र्य परस्परावलंबी होते. रस्त्यावरील वाहनांचे नियंत्रण करण्याकरिता सिग्नलचा वापर करावा लागतो. काही ठिकाणी वाहतूक एकेरी करावी लागते. वाहनाची वैयक्तिक क्षमता काहीही असली तरी त्याच्या वेगांपासून सर्वच गोष्टींवर नियंत्रणे आणावी लागतात. एका दृष्टीने हा स्वातंत्र्याचा संकोचच असतो. पण व्यापक वाहतूक सुसह्य आणि विना अपघात घडवायची असेल तर नियंत्रणाने भरलेली वाहतूकसंहिता अवलंबावी लागते. बहुसंख्यांचे जीवन सुसह्य करण्याकरता जी आचारसंहिता पाळावी लागते त्यालाच आपण 'धर्म' म्हणतो. तो 'बहुजनसुखाय, बहुजनहिताय' असतो.

या संहितेतील नियमांनाच कालांतराने सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांचे स्वरूप प्राप्त होते, मूल्यांमध्ये रूपांतर होते. एखादा क्षण, व्यक्ती किंवा घटना यांकरिता अशी संहिता किंवा मूल्ये निर्माण होत नाहीत. अनेक वेळा ही संहिता किंवा मूल्यं जाचक किंवा स्वातंत्र्याचे नियंत्रण करणारीही असतात. पण व्यापक जीवन संदर्भात, त्यांचा आदर आणि पालन करणे हितावह असते. मात्र हा दृष्टिकोन न ठेवता, प्रगतीच्या किंवा सिद्धांतवादाच्या नावाखाली जेव्हा सुधारण केल्या जातात तेव्हा प्रत्यक्षात सुधारणेपेक्षा मोडतोडच जास्त होते.

पुरुषार्थातील 'अर्था'ला जेव्हा अवास्तव महत्त्व प्राप्त होते, तेव्हा इतर पुरुषार्थ 'मूल्य'हीन ठरतात. असा 'मूल्य'हीन समाज फार काळ टिकू शकत नाही. अनेक वैभवशालीन संस्कृत्यांचा अस्त झाल्याची साक्ष इतिहास देतो. प्रथम समाजाचा धर्म जातो आणि नंतर समाजच नष्ट होतो.

आजच्या भारतीय समाजाने इतिहासापासून धडा घेणे आवश्यक आहे. ज्या समाजामध्ये 'अर्था'ला अवास्तव 'मूल्य' प्राप्त होते त्या समाजात मूल्ये 'अर्थ'हीन होतात. असा समाज आत्मकेंद्रित होतो आणि संदर्भहीन स्वातंत्र्याची तो मागणी करू लागतो.

आज भारतीयांनी 'अर्था'ला अवास्तव मूल्य देण्याऐवजी 'मूल्यां'ना अर्थ द्यावा, यातच धर्माचे खरे पालन आहे.

✧✧✧

# विज्ञानक्रांती आणि धर्म

{ जानेवारी २००० }

विश्वाचे रहस्य किंवा त्याचे 'गूढ' समजून घेण्याचा प्रयत्न मानवी इतिहासामध्ये वारंवार होताना आपण पाहत आहोत. आपल्या या ज्ञानाची माहिती जगामध्ये अनेक मानवी समूहांनी जतन करून ठेवली आहे. अर्थातच यामध्ये एकवाक्यता नाही. या प्रत्येक मानवी समूहाचा एक पंथ किंवा धर्म निर्माण झाला. निसर्गाची रचना, निर्मिती आणि मानवाचे यामध्ये स्थान या संबंधात या सर्व पंथ वा धर्मांचे आपले स्वतःचे असे एक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञावर आधारित आचार, व्यवहार, नीती अनितीच्या संकल्पना विकसित झाल्या. पाश्चात्त्य जगामध्ये प्रामुख्याने यहुदी, ख्रिस्ती आणि इस्लाम आणि पौर्वात्य जगामध्ये हिंदू तत्त्वज्ञान अस्तित्वात आले. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच व्यवहार म्हणजे भौतिक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक यांची आपापली वैशिष्ट्ये व समजुती, त्यांच्या धर्म-संकल्पनेमध्ये दिसून येतात.

१५ व्या शतकामध्ये पाश्चात्त्य जगामध्ये निसर्गाची जडणघडण व त्याचा मानवाशी असलेला संबंध यांच्या समजुतीमध्ये एक क्रांती घडून आली. १५ व्या शतकापर्यंत या विश्वाच्या निर्मितीच्या मध्यभागी मानव होता. थोडक्यात, त्याची निर्मिती मानवकेंद्रित होती. हे तत्त्वज्ञान प्टोलमी (टॉलमी), ॲरिस्टॉटल आणि नंतर बायबलमधील वचन आणि दृष्टांतावर आधारित होते. कोपर्निकस सारख्या वैज्ञानिकांनी विश्व रचनेच्या या संकल्पनेला पहिला धक्का दिला. 'विश्व हे अनेक सूर्यमंडल, ग्रह, तारे यांनी बनले असून, पृथ्वी आणि त्यावरील मानव हा त्याचा एक अत्यंत नगण्य भाग आहे' असा सिद्धांत त्यांनी मांडला. केपलर आणि पुढे गॅलिलियो यांनी कोपर्निकस यांनी मांडलेल्या सिद्धांताना पुष्टी मिळेल अशी निरिक्षणे आणि गणिती सूत्रे मांडली. अर्थातच, या मांडणीमुळे ख्रिस्ती पंथाच्या मूलभूत तत्त्वज्ञानाला धक्का

बसला व त्याची विश्वासार्हता संपुष्टात आली. साहजिकच ख्रिस्ती धर्मगुरुंनी या सिद्धांतांना कडाडून विरोध केला. पुढे न्यूटन यानेही कोपर्निकस आणि गॅलिलियो यांचे सिद्धांत भक्कम होतील अशी गणिती सूत्रं मांडली. या सर्वांची परिणीती म्हणून एक 'नव विज्ञान' पाश्चात्त्य देशांमध्ये विकसित होऊ लागले. या मूलभूत सिद्धांतावरील आधारित तंत्रज्ञानही विकसित झाले. हा सर्व विकास प्रामुख्याने पदार्थविज्ञान व गणितावर आधारित होता. १९ व्या शतकाच्या मध्यावर डार्विनने प्रसिद्ध असा आपला उत्क्रांतीवाद मांडला. मेंडलेच्या आनुवंशिकतेच्या सिद्धांतासंबंधांतील नवीन माहितीमुळे डार्विनच्या सिद्धांताला पुष्टी मिळाली. ही जैविक विषयांवरील क्रांतीची सुरुवात होती. या शतकाच्या मध्यावर पेशींमधील DNA चे रहस्य उलगडले गेले. यामुळे एका नवीन जैव क्रांतीला सुरुवात झाली. टेस्टट्यूबबेबीपासून क्लोनिंगपर्यंतचे संशोधन हे या जैव क्रांतीची परिणीती आहे. थोडक्यात, आधी मूलभूत सिद्धांत मांडला जातो. त्या नंतर त्याचे एक तत्त्वज्ञान तयार होते. पुढे त्यावर आधारित तंत्रज्ञान विकसित होते आणि मानवी जीवनशैलींवर त्याचा मोठा परिणाम होतो. कोपर्निकसपासून १५ व्या शतकांत सुरू झालेली वैज्ञानिक क्रांती ही प्रामुख्याने पाश्चिमात्य देशांमध्ये झाली. पाश्चिमात्यांचाच प्रमुख धर्म ख्रिस्ती धर्म. या क्रांतीमुळे त्यांच्या काही मूलभूत सिद्धांताना धक्का बसला. म्हणूनच कोपर्निकस, डॉर्विन ते आजच्या क्लोनिंगपर्यंत या सर्व सिद्धांतांना ख्रिस्ती धर्माने अत्यंत कडाडून विरोध केला आहे.

हिंदू धर्मियांनी या विज्ञानक्रांतीवरील तंत्रज्ञान सहज स्वीकारले, परंतु या विज्ञानक्रांतीमागील तत्त्वज्ञानाच्या व हिंदू धर्म तत्त्वज्ञानामध्ये साम्य आहे का विरोध आहे याचा फार थोडा अभ्यास आपल्या धर्मचिंतकांनी व वैज्ञानिकांनी केला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या शतकांतील थोर वैज्ञानिक श्रोडिंगर, ऑपनेहायमर, जोसेफसन इत्यादी अनेक शास्त्रज्ञांना आजच्या भौतिकशास्त्रांतील सिद्धांतांची चौकट आणि उपनिषदे आणि वेदांत इत्यादी पौर्वात्य तत्त्वज्ञानामध्ये मांडलेल्या संकल्पना यांमध्ये आश्चर्यकारक साम्य दिसून आले. अर्थातच भारतीय वैज्ञानिक आणि धर्म चिंतक यांनी एकत्र येऊन अधिक अभ्यास करणे हिताचे आहे.

ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने शनिवार, २३ डिसेंबर २००० रोजी 'जैविक क्रांती आणि हिंदूधर्म' या विषयांवर एक चर्चासत्र आयोजित केले आहे. यामुळे या विषयाला चालनाच मिळणार आहे. अभ्यासकांनी याचा अवश्य फायदा घ्यावा.

✧✧✧

# धर्म आणि जीवन

**{ एप्रिल २००० }**

जगामध्ये अनेक संस्कृत्या उदयास आल्या आणि अस्तंगतही पावल्या. पुरातत्त्व खात्याच्या संशोधनापुरत्याच त्या शिल्लक आहेत. याउलट चिनी आणि भारतीय सभ्यता आजही अखंडपणे अस्तित्वात आहेत. हजारो वर्षांच्या अस्तित्वातून अनेक रूढी, परंपरा, नीतिन्यायाच्या संकल्पना आणि समाजसंस्थांचा विकास झालेला असतो. व्रत-वैकल्यांबरोबरच आहार-व्यवहार आणि रोटीबेटीच्या संकल्पना एक विशिष्ट जीवनशैली निर्माण करतात. यामध्ये काही गोष्टी अनुकरणीय, अत्यावश्यक; तर काही निषिद्ध मानल्या जातात. समाज ज्यावेळी अशा काही पद्धती आग्रहपूर्वक पिढ्यान्‌पिढ्या आचरणात आणत असतो तेव्हा त्याचा काहीतरी व्यापक फायदा व्यक्ती आणि समाजाला होतच असतो. आपल्या धर्मांमध्ये वनस्पती, वृक्ष, इतर प्राणिमात्र, पंचमहाभूतं यांना महत्त्व देणारे अनेक सण आहेत. साहजिकच यामुळे या सर्वच चराचराबद्दल एक पावित्र्याची, आदराची भावना निर्माण होते. त्यांचे संवर्धन होते आणि नाशापासून त्यांचे संरक्षण होते. यामुळे पर्यावरणाचे संतुलन सहज साधले जाते. यामागचा संदर्भ लक्षात न घेता निव्वळ तर्क किंवा युक्तिवाद आणि सुधारणावादाच्या नावाखाली या सामाजिक रूढी कालबाह्य किंवा अंधश्रद्धा म्हणून ठरविण्यात आल्या तर त्याचे दूरगामी परिणाम समाजालाच भोगायला लागतात. आजची पर्यावरणाची समस्या हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. दुसरे चांगले उदाहरण म्हणजे आजच्या शहरी जीवनपद्धतीमुळे स्वास्थ्यावर होणारे विपरीत परिणाम. धूम्रपान किंवा मद्यपान हे चांगल्या स्वास्थ्याला हानिकारक आहेत, म्हणून भारतीय समाजामध्ये त्यांना कधीच प्रतिष्ठा दिली गेली नव्हती. सर्व स्तरांवर या सवयींचा नेहमीच निषेध करण्यात आला. याउलट अशी

व्यसनं नसलेल्या व्यक्तीला समाजामध्ये सन्मान आणि प्रतिष्ठा मिळत होती. सर्वसाधारणपणे मानवी प्रवृत्तीचा कल बघता नीतिनियमाच्या संकल्पना किंवा तत्सम धर्मसंकल्पनेतून अशा गोष्टींवर बंधनच घालण्यात आले होते. दुर्दैवाने 'स्वातंत्र्या'च्या नवीन कल्पना आणि सुधारणेकरिता धर्म या संकल्पनेला विरोध यामुळे स्वैराचार, उपयुक्ततावाद आणि जडवाद फोफावला. ही व्यसने वाईट आहेत हे वैद्यकशास्त्र सिद्ध करू शकले, पण व्यसनी माणसाला मुक्त करण्याचे औषध त्याच्याकडे नाही. धर्मामधील नीतिमूल्यांच्या संकल्पनांचा योग्य तो आदर हाच यावरील खरा उपचार ठरेल.

✧✧✧

# जनुकांचा धर्म

{ जुलै २००० }

जनुकांची कुंडली किंवा नकाशा मांडण्यात शास्त्रज्ञांना आलेले यश ही आजच्या विज्ञानाने केलेली मोठी क्रांतीच आहे.

आनुवंशिकतेची उमज शास्त्रज्ञांना १९ व्या शतकाच्या मध्यासच आली होती. साहजिकच या आनुवंशिकतेची कारणे शोधताना जनुकांचा सहभाग आणि प्रभाव प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येऊ लागला. यामुळे जनुकांची रचना आणि कार्य यांच्या अभ्यासाला सुरुवात झाली.

२०व्या शतकाच्या मध्यावर जनुकांच्या रचनेतील मुख्य घटक म्हणजे डी.एन.ए.चा शोध लागला. डी.एन.ए. हा काही रासायनिक मूलतत्त्वांच्या रचनेतून तयार झालेला असतो. डी.एन.ए.चे असे सुमारे ३ अब्ज उपघटक आहेत. साहजिकच याची मांडणीक्रम आणि परस्परसंबंध यांचे कोडे उलगडणे अजूनपर्यंत शक्य नव्हते. म्हणूनच हे काम ५ प्रगत देशांमध्ये वाटण्यात आले. संगणकाच्या संचयक्षमतेच्या वाढीमुळे हे संशोधन करणे शक्य झाले. १९८७ साली सुरू झालेला हा प्रकल्प २००५ साली पुरा होणार होता.

मानवाप्रमाणेच निसर्गातील सर्वच प्राणिमात्र आणि वनस्पती यांच्या पेशींमध्ये जनुके असतात. सामान्य माशी आणि मानव यांच्या जनुकांच्या रचनेमध्ये सुमारे ६०% साम्य आहे, तर चिम्पांझी आणि मानवाच्या जनुकांमध्ये ८५% साम्य आहे. मानवापुरता विचार करायचा म्हटले तरी हे 'साम्य' फसवे असते. यांचे रसायन घटक जरी एक असले तरी प्रत्येक मानव हा आपल्या क्षमतांमध्ये भिन्न आहे आणि म्हणूनच निसर्ग आणि मानवामध्येही जैविक वैविध्य अस्तित्वात आहे. अनियंत्रित

उपभोगशीलतेमुळे नैसर्गिक साधनांचा बेसुमार वापर मानवाने केला. यामुळे काही प्राण्यांच्या जाती आणि वनस्पतींचे वर्गच नष्ट झाले. यातून निर्माण झालेल्या असंतुलनाने पर्यावरणाचा समतोल आणि सर्व मानवजातीलाच त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. उत्क्रांतिवादामध्येच या जैविक विविधतेची बीजे आहेत. याकरिता लागणारा कालावधी हा लाखो वर्षांचा असतो. विविधता निर्माण होत असताना लागणाऱ्या या दीर्घ काळामुळेच हा बदल निसर्गातील सर्वच घटक सामावून घेऊ शकतात. हे परस्पर सहकार्य जातीच्या अस्तित्वाकरता आवश्यकच आहे.

जनुकांच्या रचनेची आणि घटकांची माहिती जेव्हा मानवाला होऊ लागली तेव्हा तो तिचा वापर जैविक तंत्रज्ञानाकरता करू लागला. या हस्तक्षेपामुळे ज्या विविधतेला किंवा विषमतेला निर्माण होण्याकरिता हजारो वर्षे लागली असती ती विषमता मानवी हस्तक्षेपामुळे काही दिवसांतच निर्माण झाली. या तंत्रज्ञानाचे मानवी दुष्परिणाम हे त्याच्या उपयुक्तेपेक्षा भयंकर आहेत आणि म्हणूनच या सर्वच ज्ञानाच्या उपयुक्ततेबद्दल वैज्ञानिकांमध्ये साशंकता आहे. ही भीती विज्ञान उपलब्ध करीत असलेल्या माहितीबद्दल नसून, या माहितीच्या होऊ शकणाऱ्या गैरवापराबद्दल आहे. पुन्हा ही भीती साधार असल्याचे मानवानेच सिद्ध केले आहे. रासायनिक, जैविक आणि आण्विक विज्ञानाचा आधार घेत प्रचंड संहारक शस्त्रे या मानवानेच निर्माण केली आणि म्हणूनच जनुकरचनेच्या क्रमाच्या माहितीमुळे अशी माहिती असणारे समाज घटक व्यक्तीची आणि पर्यायाने समाजाची दिशाभूल किंवा हानी करू शकतील अशी भीती समाजचिंतकांना वाटते.

भारतामध्ये 'विज्ञान' किंवा 'तत्संबंधी क्रांती' म्हणजे काही जणांना हर्षवायूचा झटकाच येतो. अपण पुरोगामी आहोत हे दाखवण्याकरता याचा चांगला उपयोग होतो. सर्वसाधारण प्रसिद्धी माध्यमांतून या संदर्भात आलेल्या बातम्या हे याचे चांगले उदाहरण आहे. माणसाची आयुमर्यादा वाढणार इथपासून ते हृदरोग व कॅन्सरवर विज्ञान मात करणार अशा बातम्या लगेचच झळकल्या. यामध्ये नुसतेच अर्धसत्य नसून समाजाची दिशाभूलही आहे. जगातील सर्वच चिंतनशील आणि क्रियाशील वैज्ञानिकांनी याबद्दल सावधानी आणि सबुरीचा सल्ला दिला आहे. या माहितीमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक, धार्मिक आणि नैतिक प्रश्नांबद्दल सखोल विचार करण्याचे या सर्वांनीच सुचवले आहे. खरे म्हणजे आनुवंशिकतेपासून जनुकरचनेच्या या माहितीमुळे मनुष्य आपला जीवनक्रम, भवितव्य आणि अंतसुद्धा

जन्माला घेऊनच आलेला असतो हे सिद्ध होते. अनुभवातून हे ज्ञान मानवाला आज अनेक शतके आहे.

धूम्रपान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला फुप्फुसाचा कर्करोग का होत नाही याचे कारण जनुक रचनेची माहिती देऊ शकेल, पण ही निव्वळ माहिती कर्करोग टाळू शकणार नाही. धूम्रपान हे आयुष्याला धोकादायक आहे हे सिगरेटच्या प्रत्येक पाकिटावर छापलेले असते. पण ही माहिती मिळूनसुद्धा मनुष्य धूम्रमान करतोच. बहुतांशी अशा गोष्टी या मानवाच्या जीवनशैलीशी निगडित आहेत. अनियंत्रित स्वैराचारी जीवनशैलीमध्ये अशा घातक सवयी, प्रलोभने आणि मोह यांना काबूत ठेवण्याची क्षमता नसते. कारण तिथे विचार हा फक्त आत्मकेंद्रित आणि दुष्परिणाम आता कुठे आहेत? अशा युक्तिवादाशी निगडित असतात. कायदाही अशा प्रवृत्तींना आळा घालू शकत नाही. फक्त सद्सद्विवेकबुद्धी आणि आत्मनियंत्रणच काही प्रमाणात माणसाला अशा जीवनशैलीपासून प्रवृत्त करू शकतात.

अशी ''आत्मनियंत्रित मानवनिर्मिती'' ही अनेक शतकांच्या प्रयत्नांतून होऊ शकते. यातूनच माणसाला दुसऱ्या माणसाशी असलेले नाते व परस्परावलंबित्व समजून येते. समाजातल्या अधिकाधिक लोकांचा उत्कर्ष आणि त्यांच्यामध्ये सामंजस्य आणि संतुलन सांभाळण्याकरिता आपल्या जीवनपद्धतीवर, क्षमतांवर नियंत्रणे घालावी लागतात. नीती-अनीतिच्या कल्पना आणि चांगल्या सामाजिक मूल्यांची निर्मिती यातूनच होते. या सर्व घटकांना बांधून ठेवणारी रचना म्हणजे 'धर्म'. निव्वळ विज्ञान किंवा वैज्ञानिक माहिती ही तटस्थ असते. तिचा चांगला किंवा वाईट वापर 'माध्यमावर' अवलंबून असतो. म्हणून हे माध्यम जेवढे अधिक धर्मनिष्ठ असेल तेवढे विज्ञान समाजाला अधिक हितकारक होईल. स्वैराचारी जडवादी मानवाच्या हातांत जनुकांच्या नकाशाचे रहस्य 'विघातक' हत्यार होईल; तर संस्कारित, धर्मनिष्ठ, विवेकी समाजाच्या हातांत हीच माहिती 'विधायक' अस्त्र होईल.

✧✧✧

# सर्व धर्म सम की विषम?

{ ऑक्टोबर २००० }

या वर्षाच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत धर्मसलोखा आणि विश्वशांती यांचा संदेश देणाऱ्या तीन मोठ्या जागतिक परिषदा पार पडल्या.

२८ ते ३१ ऑगस्टच्या दरम्यान संयुक्त राष्ट्रांच्या आधिपत्याखाली जगातील सर्व धर्मपंथांची या सहस्रकातील पहिली ''जागतिक शांतिपरिषद'' न्यू यॉर्क, अमेरिका येथे भरविली गेली. १५ धर्म आणि धर्मांतर्गत पंथ यांचे सुमारे १००० प्रतिनिधी या परिषदेला हजर होते. गरिबी, पर्यावरण, सर्वधर्मसमभाव आणि वांशिक तंटे किंवा भांडणे सोडविण्याकरता धर्मतत्त्वज्ञानाचा उपयोग इ. अनेक विषयांवर या परिषदेमध्ये चर्चा झाली. वास्तविक संयुक्त राष्ट्रांकरता एक कायम स्वरूपी धर्मविषयक सल्लागार मंडळ स्थापन करण्याचा या परिषदेचा मानस होता. अर्थातच तो साध्य होऊ शकला नाही; यातच परिषदेचे अपयश स्पष्ट झाले.

चेचनिया, बोस्निया, स्वांडापासून इंडोनेशियापर्यंत चाललेले बहुतेक सगळे झगडे हे 'धार्मिक' आहेत. पॅलेस्टाइन, इस्रायल या संघर्षांच्या मुळाशी सुद्धा 'धर्म'च आहे. ख्रिस्ती, इस्लामी धर्म हा संस्थात्मक असून, त्यांमध्ये वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत धर्माधिकारांची विभागणी केलेली असते. या सर्व धर्माचे एक पवित्र पुस्तक असते. या धर्मांच्या सर्व ऐहिक आणि पारमार्थिक व्यवहाराची मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक संस्थांची निर्मिती, ही त्या त्या प्रेषितांची वचने आणि त्यांच्या पवित्र ग्रंथांतील आज्ञा, यांच्या कक्षेतच तयार झालेली असतात. विज्ञान, तर्कवाद किंवा इतर धार्मिक मतांशी देवाण-घेवाण यांचा कुठलाही अधिकार अथवा प्रभाव अशा धर्मग्रंथांमधील वचनांवर पडू शकत नाही. अशा परिघाबाहेरील कुठल्याही

संस्था, परिषदा यांनी घेतलेल्या निर्णयांनी या धर्मांचे प्रमुख बांधलेले नसतात.

हिंदू धर्माची जडणघडण आणि रचना ही सर्वथा यापेक्षा भिन्न आहे.

या संदर्भाने हिंदू धर्म संस्थात्मक नाही. त्याच्या अनुयायांना ईश्‍वराचे अस्तित्व नाकारण्याचाही अधिकार आहे. उपासनापद्धतीपासून ते आध्यात्मिक मार्गाच्या स्वीकारापर्यंत त्याला स्वतःला 'संपूर्ण' स्वातंत्र्य आहे. हिंदूधर्म आणि इतर धर्मांच्या रचनेतील हा मूलभूत फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाची आणि चांगली गोष्ट म्हणजे ख्रिस्ती, इस्लामी आणि ज्यू धर्मप्रमुख या बाबतीत प्रामाणिक आणि स्पष्ट आहेत. गोंधळ आहे तो हिंदूधर्मियांमध्ये.

भारतीय उपखंड सोडले तर जगातील कोठल्याही वांशिकवादाला हिंदू जबाबदार नाहीत. भारतातील, विशेषतः पूर्वेकडील राज्ये आणि काश्मीरमधील समस्यांना मात्र अनुक्रमे ख्रिस्ती आणि इस्लाम धर्मानुयायी जबाबदार आहेत. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. तरीही गरिबी, पर्यावरण आणि सर्वधर्मसमभाव असल्या चावून चोथा झालेल्या विषयांवर हिंदूंनी वारंवार पुढाकार घ्यावा, याच्या इतकी आणखी हास्यास्पद गोष्ट नाही.

वर उल्लेखिलेल्या जागतिक परिषदेचे कार्याध्यक्षपद हे एका जैन व्यक्तीकडे होते. ही परिषद संयुक्त राष्ट्रांच्या मार्गदर्शनाखाली भरली होती. पोपपासून इतर सर्व धर्मांचे प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले होते. तरीही ही परिषद हिंदू जैन लोकांच्या प्रभावाखाली झाली म्हणून ख्रिस्ती आणि इस्लामी पंथीयांनी या परिषदेवर टीका केली. या परिषदेकरिता चीनने, अप्रत्यक्षरित्या दबाव टाकल्यामुळे दलाईलामा त्यामध्ये स्वतः सहभागी होऊ शकले नाहीत. उपचार म्हणून त्यांनी आपले प्रतिनिधी पाठवले. ज्या जागतिक परिषदेला अशा दबावांना निर्भीडपणे तोंड देता येत नाही, ती जागतिक परिषद जगात कुठली शांतता स्थापन करणार? १९५१ साली चीनने तिबेट गिळंकृत केला, १९५९ साली दलाई लामा पळून भारतात आले आणि भारताने त्यांना आश्रय दिला. बुद्ध धर्म आणि शांततेच्या मार्गाने जे दलाई लामा आपल्या स्वतःच्या मातृभूमीची सुटका करू शकत नाहीत, ते सर्व जगाला मात्र शांततेचा संदेश देत हिंडत असतात! एक प्रयोग म्हणून त्यांनी चीनचे हृदयपरिवर्तन करून शांततेच्या मार्गाने तिबेट मुक्त करून दाखवावा!!

संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने अशीच एक जागतिक परिषद जगामध्ये "शांतता आणि सद्‌भावना" निर्माण व्हावी म्हणून ६ ते ८ सप्टेंबर २००० रोजी न्यू यॉर्क,

अमेरिका येथे भरविण्यात आली. सुमारे १५० राष्ट्रांचे प्रतिनिधी या परिषदेला हजर होते. पुन्हा तीच भाषणे आणि तेच ठराव. भारतातर्फे आपले पंतप्रधान, त्यांचे अनेक सहकारी आणि १५० पत्रकार आणि विद्वान यांचा ताफा या परिषदेकरिता गेला होता. वृत्तपत्रातील बातम्या सोडल्या तर या परिषदेची निष्पती शून्य. इस्लामने काश्मीरमध्ये पुकारलेल्या धर्मयुद्धामुळे अनेक निरपराध नागरिकांचे आणि सैनिकांचे बळी पडणे आजही चालूच आहे. काश्मीर स्वतंत्र होईपर्यंत पाकिस्तानचा या धर्मयुद्धाला सक्रीय व उघड पाठिंबा आहे. याच दौऱ्यांमध्ये आपल्या पंतप्रधानांनी अमेरिकन काँग्रेसमध्ये एक भाषण केले. या भाषणाच्या सुरुवातीला ईशस्तवन म्हटले गेले. आज अमेरिकेतील प्रभावी ख्रिस्ती गटांनी याबद्दल प्रखर निषेधाची प्रतिक्रिया नोंदवली आहे.

तिसरी अशीच एक ''जागतिक हिंदू परिषद'' १७ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २००० च्या दरम्यान कॅरेबियन द्वीपसमूहात भरली होती. त्रिनिदादचे पंतप्रधान श्रीयुत वसुदेव पांडे यांनी तिचे उद्‌घाटन केले आणि दक्षिण अमेरिकेतील गयाना देशाचे अध्यक्ष श्री. भारत जगदेव यांच्या पत्नीने या परिषदेत एक मुख्य भाषण दिले. हजारो अनिवासी भारतीय या परिषदेला हजर होते. संपूर्ण परिषदेमध्ये श्री. सुभाष काक यांचे भाषण सोडता बहुतांशी भाषणे ही भावनेने भारलेली होती. धर्मपरिवर्तनापासून अनेक विशेष मुद्दे तेथे मांडले गेले. पण कोणाकडेच आकडेवारी नाही किंवा साधार विश्लेषणात्मक पुरावे नाहीत. सगळा प्रकार म्हणजे शिस्तबद्ध कुंभमेळाच. ख्रिस्ती धर्मसभांचे स्वरूप यापेक्षा कितीतरी भिन्न असते. करोडो रुपयांच्या अपव्ययापलीकडे 'हिंदू' किंवा 'हिंदुत्वा' बद्दल ठोस मार्गदर्शन ही परिषद करू शकली नाही. एक चांगली संधी वाया गेली.

या परिषदा होत असतानाच पोप महाराजांच्या संमतीने प्रदर्शित झालेल्या निवेदनाची माहिती घेणे उद्‌बोधक ठरेल. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पोप यांच्या संमतीने व्हॅटिकनमधून एक दस्तऐवज प्रकाशित झाला. सर्व धर्म समभावाचा पुरस्कार करणाऱ्यांनी हा दस्तऐवज अवश्य वाचावा. या दस्तऐवजाद्वारे सर्व धर्म 'सम' आहेत ही संकल्पना ख्रिस्ती धर्माने संपूर्णतः नाकारली आहे. एवढेच काय, पण इतर सर्व धर्मपंथांचे अनुयायी ख्रिस्तांचे अनुकरण करत नसल्यामुळे ते मोक्षही गाठू शकत नाहीत याचाही पुनरुच्चार त्यामध्ये केला गेला आहे. गेली २०० वर्षे ख्रिस्ती धर्मप्रसारक प्रामाणिकपणे हेच सांगत आहेत. इस्लाम आणि ज्यू लोकांनी या वास्तवाचा स्वीकार करून आपल्या परीने ख्रिस्ती धर्माशी टक्कर देणे चालू

ठेवले आहे. दुर्दैव एवढेच आहे की, काही हिंदूंना, पोपपेक्षा ख्रिस्तीधर्म आपल्याला चांगला समजला आहे असे वाटते आणि म्हणून ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्मांबद्दल जास्त वादविवाद आणि झगडा हा दोन हिंदूंमध्येच होताना दिसतो. हिंदूंनी एक वेळ आपले धर्मतत्त्वज्ञान वाचू नये, पण कमीत कमी ख्रिस्ती आणि इस्लामी धर्माची मूलतत्त्वे तरी प्रामाणिकपणे वाचावीत. यामुळे कमीत कमी ख्रिती आणि इस्लामी धर्मियांच्या मूलभूत धर्मसंकल्पनेवर तरी अन्याय होणार नाही आणि वारंवार, 'आम्ही वेगळे आहोत' हे सांगण्याची त्यांच्यावर पाळी येणार नाही. कुठल्याही धर्माचा परमेश्वर हिंदूंना ही सद्‌बुद्धी देवो आणि जगात शांतता नांदो!

✧✧✧

# मंदिर - सांस्कृतिक केन्द्र

**{ जानेवारी २००१ }**

आज हिंदुस्थानात अगणित मंदिरे आणि धर्मस्थळे आहेत. प्रत्येक गावात मंदिर हे असतेच. काही गावांच्या मंदिरांच्या वाट्याला गर्दी येते, तर काही निर्मनुष्य असतात. अनेक जुनी मंदिरे पुरातत्त्व खात्याच्या संरक्षणाखाली येतात. त्यांची देखभालही सरकारी खर्चाने होत असते.

दक्षिणेकडील काय किंवा उत्तरेकडील काय अनेक मंदिरे शिक्षणाचे कार्य पूर्वी करत असत. यामध्ये वेद, शास्त्रे, व्याकरण, संगीत, नृत्य आदी विषयांचे शिक्षण दिले जात असे. अनेक ठिकाणी अशी शिक्षणपीठे भारतातील मंदिरांतून दिसून येत होती. हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. आज अनेक जगमान्य गुरूंची गुरूपरंपराही या मंदिरांतच जन्माला आली व फुलली. त्यांचा शिष्यगण सर्वत्र पसरला.

दुर्दैवाने अलीकडच्या काही शतकात मंदिरांचे हे सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व नष्ट होत आहे. मंदिरांचे सांस्कृतिक महत्त्व जाऊन तेथे झपाट्याने व्यापारीकरण होत आहे, कोणालाही मंदिरात गेल्यास हे जाणवते. टेबले टाकून पावत्या फाडणे, भक्तांचा पैशांसाठी पाणउतारा करणे इ. घटना सतत घडत असल्याचे आपण वाचतो. सगुण उपासकाची पूजा-अर्चा शांततेने व्हावी, मानसिक शांती मिळावी अशी मंदिरात जाण्यामागची अपेक्षा असते. याकरता मंदिराचे पावित्र्य राखणे, स्वच्छता ठेवणे, पुजारी वर्गाच्या आदरतिथ्यपूर्ण वागण्याची स्वाभाविकच अपेक्षा असते. परंतु आज या बाबींकडे अभावाने लक्ष दिले जाते.

कुटुंबसंस्था आज विस्कळीत झाल्यामुळे कुठेतरी मानसिक आधार शोधण्याचा माणूस प्रयत्न करीत असतो. यातून निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे जीवन अशांत व

अशाश्वत होते. कुटुंबातील नाती व जबाबदाऱ्या नाहीशा झाल्यामुळे व कौटुंबिक प्रश्नांच्या सोडवणुकीकरता कुटुंबबाह्य केन्द्रे निर्माण झाली. यातून निर्माण होणाऱ्या शारीरिक व मानसिक यातनांतून मुक्त करण्याची जबाबदारी डॉक्टरांकडे गेली. अर्थातच या कुठल्याच संस्था कुटुंबसंस्थेची जागा घेऊ शकल्या नाहीत. माणसाला मंदिर व त्यातील सगुण मूर्ती हा आधार वाटतो. वयस्क-चिंतनशील, आदरणीय व्यक्तीपुढे नतमस्तक व्हावे व आपल्या चिंता, अडचणी त्याच्यापुढे मांडाव्यात व मार्गदर्शन घ्यावे असे आज माणसाला वाटते. त्यासाठी मंदिरातील पुजारी वर्ग, तपस्वी, उपासक यांची जरुरी समाजाला वाटते. माणसामाणसातील आपुलकी, ओलावा नाहीसा होत असलेल्या या युगात माणसाला आधार व आत्मविश्वास मिळवून देण्याचे काम ही मंदिरे व साधुपुरुष करीत असतात.

देवळाभोवती व्यापाऱ्यांचा गराडा, भिकाऱ्यांच्या रांगा, भक्तजनांचा कोलाहल हे आजच्या मंदिरांचे चित्र आहे. ते बदलणे आवश्यक आहे. हे चित्र कसे बदलेल यासाठी कठोर आत्मपरीक्षणाची गरज आहे.

समाजाला दिशा दाखवण्याची आजच्या सर्वच क्षेत्रांतील नेतृत्वाकडून अपेक्षा आहे. मंदिरांचे पावित्र्य राखणे, पुजारी वर्गास धार्मिक शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, मंदिरातून शिक्षण प्रसार करणे व ते सांस्कृतिक केंद्र होणे इ. गोष्टी आज काळाची गरज आहे. या गोष्टींवर गंभीर विचार व्हावा हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

✧✧✧

# भ्रष्टाचार आणि धर्म

{ एप्रिल २००१ }

२६ जानेवारी २००१ ला कच्छ गुजरातमध्ये प्रचंड धरणीकंप झाला. हजारोंनी लोक मृत्युमुखी पडले व अब्जावधी रुपयांची वित्तहानी झाली. नैसर्गिक उलथापालथी पुढे मनुष्य हतबल असतो हे पुन्हा एकदा दिसून आले. तरीही नाउमेद न होता भारतातूनच नव्हे तर संपूर्ण जगातून सर्व तऱ्हेच्या मदतीचा ओघ चालू झाला. यातूनच आज कच्छच्या नवनिर्मितीला सुरुवात झाली. या धक्क्यातून बाहेर पडत असतानाच मार्चमध्ये भारतामध्ये प्रचंड राजकीय भूकंप झाला. भ्रष्टाचाराचे अत्यंत ओंगळ-किळसवाणे दर्शन लोकांना यातून घडले. भ्रष्टाचार तसा आपल्याला नवीन नाहीच. पण ज्या संस्था आणि व्यक्ती भ्रष्टाचारी असू शकत नाहीत या विश्वासाला जेव्हा तडा जातो तेव्हा मन सुन्न होते. तर्कवाद आणि युक्तीवादाचा वापर करून अशा भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्याचा प्रयत्नही कदाचित करता येईल. पण तसा प्रयत्न केविलवाणाच ठरेल. आजच्या भ्रष्टाचाराचे स्वरूप एवढे प्रचंड आहे की, त्याला झाकेल एवढे पांघरुण मिळणेही अशक्य आहे! सर्वच राजकीय पक्षांची आजची भ्रष्टाचाराच्या बाबतीत परिस्थिती 'आपला तो बाळ्या व दुसऱ्याचे कार्टं' अशी आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये व आघाड्यांवर समाज नेतृत्वहीन झाला आहे. आत्मपरिक्षणाकरिता सुद्धा किमान प्रामाणिकपणा लागतो. स्वतःच्या चुका कबूल करायलाही एक धारिष्ट्य लागते. या अधःपतनाची कारणे शोधणे हेच खरे आत्मपरिक्षण ठरेल.

धर्माचा उपासना हा जसा एक भाग असतो, तसाच त्याचा एक सामाजिक आणि सांस्कृतिक पदरही असतो. आपल्या परंपरेमध्ये धर्म ही संकल्पना पंथ किंवा उपासनेपुरतीच मर्यादित नव्हती, तर ती एक सर्वव्यापक कल्पना होती. उपासनेपेक्षा

धर्मांचा जास्त संबंध सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी येतो. निसर्गातील घटकांचे अंतरंग, मूळ स्वभाव आणि लक्षणं या अर्थानेही त्यांचा वापर होतो. जसे जीवधर्म, प्राणिधर्म, शरीरधर्म, सृष्टिधर्म इत्यादी. व्यवहारामध्ये संतुलन आणि सुरक्षितता यावी म्हणून धर्मसंकल्पनेच्या माध्यमातून काही नीती-नियमांच्या पालनाचा आग्रह धरला जातो. समाजातील प्रत्येक व्यक्ती आपले वय आणि नाते लक्षात घेऊन एक भूमिका बजावीत असते. एकच व्यक्ती एकाच दिवसात अशा अनेक भूमिका बजावते. पुरुष कधी वडील असतात, तर कधी शिक्षक होतात, कधी भाऊ होतात, तर कधी मित्र होतात. आपल्या क्षमतेवर अनेकवेळा बंधनेही घालावी लागतात. अशी बंधने हा स्वातंत्र्याचा संकोच नसतो. बहुतेक वेळा तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर असतो. यातूनच सामाजिक नीती, नियम, शिष्टांचार ह्यांची निर्मिती होत असते.

संपूर्ण आयुष्याचा क्रम लक्षात ठेवून अनेक शतकांचा अनुभव गाठीस बांधून काही सामाजिक संस्था व त्यांच्या संहिता निर्माण होतात. स्त्री-पुरुष हा संबंध लग्नसंस्थेमध्ये का बांधावयाचा असतो याचा अर्थ, महत्त्व आणि दूरगामी परिणाम त्या वयोगटातील स्त्री-पुरुषाला जरी समजत नसले, तरी व्यापक सामाजिक हिताकरिता 'संस्कार' म्हणून या बंधनाचा स्वीकार करणे आवश्यक असते. व्यापक सामाजिक हीत व संतुलनाकरिता अशा सामाजिक संस्थांचा आदर करावा लागतो. या जीवनपद्धतीचा विकास करण्याकरिता सामाजिक नीती-नियमांचे पालन करणाऱ्याला पुरस्कार, फायदा आणि सन्मान द्यावा लागतो आणि ते नाकारणाऱ्या किंवा चुकवणाऱ्या घटकांना दंड, शिक्षा व समाजात दुय्यम स्थान द्यावे लागते. अशा प्रकारे सामाजिक पुरस्कार किंवा दंड ही यंत्रणा जेव्हा तटस्थ आणि प्रभावीपणे राबवली जात नाही तेव्हा धर्म ही संकल्पनाच कमकुवत आणि प्रभावहीन होते. 'बळी तो कान पिळी' हाच समाज धर्म होऊन बसतो. सामाजिक कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांच्या बाबतीत समाज बधीर होतो. रस्त्यावरील वाहतूक सुरक्षित करावयाची असेल तर वाहनाच्या गतीवर मर्यादा घालावी लागते. कुठे कुठे ती एकेरी करावी लागते. रस्त्यांचा आकार ठरवावा लागतो. या बंधनांमुळे स्वातंत्र्याचा संकोचच होत असतो. अशी बंधने आणि नीती-नियम यांचे पालन केले नाही तर स्वैराचारी वाहतुकीमुळे अपघातच होण्याची शक्यता जास्त.

असे अपघात टाळण्याकरिता रस्त्यांवर पोलिसांची किंवा सिग्नलची निर्मिती केलेली असते. जीवनामध्ये नीती-नियम किंवा त्यांची संहिता म्हणजे 'धर्म' यांची

निर्मिती सामाजिक अपघात टाळण्याकरिताच केलेली असते.

'निधर्मा'च्या नावाखाली समाज जेव्हा धर्माचाच त्याग करतो तेव्हा तो पराकोटीचा आत्मकेंद्रित आणि स्वार्थी बनतो. अशा समाजाचा भ्रष्टाचार, हा स्थायीभाव बनतो.

आत्मपरिक्षणाची सुरुवात धर्माच्या 'खऱ्या' स्वरूपाची ओळख करून घेण्यात होणार असेल तरच आपण आजच्या परिस्थितीवर मात करू शकू. चारित्र्यवान समाजाची निर्मिती अशा आत्मपरिक्षणातूनच होऊ शकते. भ्रष्टाचार हे एका सडलेल्या समाजाचे फक्त बाह्यदर्शन आहे. भोग की त्याग?, निधर्म की सतधर्म? याचा विवेकी निर्णय जेव्हा समाज घेईल तेव्हांच भ्रष्टाचाराचे भवितव्य ठरेल.

✧✧✧

# वर्णभेद

**{ जुलै २००१ }**

रविवाद दि. २४ जूनच्या अकॉनॉमिक टाईम्सचा अग्रलेख अमेरिकेतील वर्गभेदासंबंधी हेन्रीने कैसर प्रतिष्ठानने केलेल्या सर्वेक्षणाबद्दल आहे. या सर्वेक्षणातील माहिती व निष्कर्ष धक्कादायक आहेत. मुलाखत घेतलेल्या कृष्णवर्णियांपैकी जवळ जवळ एक तृतीयांश कृष्णवर्णियांनी आपल्याला वंशभेदामुळे नोकरीत घेणे नाकारले जाते, किंवा कृष्णवर्णामुळे पदोन्नती नाकारली जाते असे सांगितले. एक पंचमांश लॅटिन व अशियाई लोकांचाही हाच अनुभव आहे. अनेकांनी आपल्याला स्टोअर्समध्ये अगर हॉटेलात देण्यात येणारी दुर्लक्षित सेवा किंवा उपरोधिक शेरे किंवा संशयाने पाहणे अशा तऱ्हेचे वर्णभेदाचे अनुभव येतात असे सांगितले.

इतकेअसूनसुद्धा हे लोक केवळ अमेरिकेतील श्रीमंतीचा फायदा मिळेल या आशेवर तिथे राहतात. अमेरिकेतील एक दिवसाचे माणशी उत्पन्न हे आशियाई देशातील माणसाच्या एक महिन्याच्या उत्पन्नाइतके असते. येथे मिळणाऱ्या उत्पन्नात बचत करून बँकेत टाकणे अगर रिटायरमेंटसाठी पुंजी जमविणे व सुखात राहणे एवढेच या अशियाई लोकांचे ध्येय असते. अशियाई उद्योगपती सूक्तासूक्त मार्गाचा अवलंब करून धंदे वाढवतात व यशस्वी होतात. याची रुखरुख अफ्रिकन, लॅटिन उद्योगपतींत आहे व यासंबंधी त्यांच्या रागाचे प्रत्यंतर लॉस एंजेलिस मधील रॉइने किंग दंगलीत दिसून आले. जवळजवळ २००० आशियाई मालकीच्या उद्योगधंद्यांची या दंगलीने लक्ष्य करून जाळपोळ व लूटमार करण्यात आली.

व्यवस्थापनातील वरच्या जागांना आशियाई लोक लायक नाहीत, फक्त तांत्रिक नोकऱ्यांत त्यांना गती आहे, बिगर तांत्रिक कामास ते योग्य नाहीत अशा तऱ्हेचे त्यांच्यावर आरोप केले जातात.

अमेरिकेतील वर्णभेदासंबंधी सर्वेक्षणाचा हा अहवाल आम्हा भारतीयांसही विचार करावयास लावणारा आहे. वंश, वर्ण, जाती इ. भेदांनी ग्रस्त अशा भारतीय समाजालाही वरील अहवाल विचार करणारा ठरावा यात शंका नाही.

प्रत्येक माणूस व्यक्तिशः किंवा समाज म्हणून पुष्कळसा स्थितीप्रिय असतो व असेल त्या स्थितीच्या चौकटीत आपला व आपल्या वंशाचा, समाजाचा उत्कर्ष साधण्यास प्रयत्न करीत असतो. त्यामुळे त्यांना स्थळ, काळाचे भान असते व जवळ असलेल्या उत्पादन साधनांच्या स्थानिक नियोजनामुळे सुखात राहता येते. कोणत्याही अशा व्यवस्थेतही शोषक व शोष्य वर्ग राहतोच. परंतु अशा वर्ग संघर्षाची व्याप्ती फोर मोठी किंवा जास्त हानीकारक नसते. माणुसकीचे बंध या समाजातील विकृतींना बांधून ठेवतात.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, शहरीकरणामुळे व वाहतुकीतील क्रांतीमुळे खेड्याकडून शहराकडे लोंढे वाहू लागले आणि यातूनच अर्धाधिष्ठीत समाज तयार होऊ लागला. कुटुंब व्यवस्थेला सुरुंग लागला. सारे वंश, समाज विखुरले गेले व आर्थिक विषमतेमुळे समाजातील संघर्ष विकोपाला जाऊ लागले.

आर्थिक व सामाजिक समतेचे गोडवे गात गात समाजात विषमता केव्हा निर्माण झाली हे समजलेच नाही. समता आणि विषमता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक प्रकृती आहे तर एक विकृती आहे. सिद्धांतवाद्यांनी या वस्तुस्थितीचा विपर्यास करून संघर्षाचे वातावरण निर्माण केले. कोणत्याही समाजात या प्रवृत्ती असतातच. त्या फक्त बळकट व शोषक होणार नाहीत या पद्धतीने सामंजस्याचे वातावरण निर्माण करणे आवश्यक ठरते.

त्या कसोटीवर वर्ण, वंश, अतिभेद कमीत कमी राहतील याची समाजधुरिणांनी व राजकारण्यांनी काळजी घेणे जरुरीचे आहे. परंतु आज समाज उलट्या दिशेकडे चालला आहे असे वाटते. ही चिंताजनक बाब आहे. भारतीय सभ्यता व तिची संस्कृती आज हजारो वर्षे टिकून आहे. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवांतून अनेक सामाजिक व सांस्कृतिक संस्था त्यांनी निर्माण केल्या. या रचनेमध्येही विकृतीही या येणे स्वाभाविक आहे. सुधारणा म्हणजे या विकृतींना दूर करण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

दुर्दैवाने आजचा सुधारणेचा प्रयत्न हा संस्कृती भंजनाचा आहे. केवळ सुबत्ता किंवा केवळ विज्ञान नीतिमूल्यावर आधारित समाज निर्माण करू शकत नाही, हेच

अमेरिकेसारख्या समृद्ध देशात घडणाऱ्या या घटनांवरून दिसून येते. सुधारणेच्या नावाखाली कुटुंब आणि सामाजिक संस्था उद्ध्वस्त करायला निघालेल्या ‘भारतीय सुधारकांनी’ यापासून खूपच शिकण्यासारखेही आहे आणि अशा कथित सुधारणांना आपण समाजाने किती स्वीकारायचे याचाही पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

✧✧✧

# आतंकवादी - धर्म की अनुयायी?

**{ ऑक्टोबर २००१ }**

'धर्म ही अफूची गोळी आहे' असे माओने म्हटले होते. अफू माणसाला तात्पुरती उत्तेजित करते. आपल्यामध्ये नसलेले बळ आल्यासारखे त्या व्यक्तिला वाटू लागते. खूप वेळा तो आक्रमकही होतो आणि थोड्यावेळाकरिता का होईना त्याचा हा अनुभव त्याला आनंददायी वाटतो. अफूची नशा उतरल्यावर वास्तवाचे त्याला भान होते आणि पुन्हा त्या अवास्तवाकडे जाण्याकरिता तो अफूचे सेवन करत रहातो. धर्मांचासुद्धा असाच कैफ चढतो आणि या कैफ चढलेल्या समूहाकडून आक्रमक, विध्वंसक कृत्य करून घेता येतात. सारासार बुद्धी आणि विवेक हा अशा वेळी गहाण ठेवलेला असतो. ख्रिस्ती आणि ईस्लामी धर्माच्या उदयापासून त्यांचा प्रसार आणि प्रचाराची तंत्रे बघितली की धर्म आणि अफूमधील हे साम्य पटायला लागते. ख्रिस्ती आणि ईस्लामी धर्मियांनी युरोप आणि मध्य आशियामध्ये आपल्या धर्माचा प्रभाव प्रस्थापित करण्याकरिता अनेक लढाया केल्या. जुलूम, जबरदस्त्या करत हजारो लोकांची त्यांनी कत्तल केली. हा सर्व इतिहास विसरू म्हटले तरी विसरला जात नाही. हे धर्म बहुतांशी 'सेमिटोक' गटातील आहेत. आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका खंडात या मंडळींनी मानवतेला काळीमा फासतील अशी क्रूर कर्मे आपल्या धर्मप्रसाराकरिता केली.

माओचा चीन हा बुद्ध धर्म व त्या आधी 'कन्फ्यूशिअस' धर्मप्रणाली खाली होता. चीनने बुद्ध धर्माचा केलेला स्वीकार हा या विचार प्रक्रियेचा एक भाग होता. युद्ध हरल्याचा तो एक परिणाम नव्हता. हिंदू धर्म त्याच्या बुद्धमतासह दक्षिण पूर्व आणि मध्य आशियामध्ये अनेक शतके प्रभावी होता. पण हा प्रभाव युद्धाचा विजय नव्हता. आणि म्हणूनच आपल्या इतिहासामध्ये हे देश पादाक्रांत केल्याच्या

युद्धाच्या शौर्यकथा अस्तित्वातच नाहीत. भारतीयांना अभिप्रेत असलेली ‘धर्म’ संकल्पना काय आणि सेमिटोक पंथीयांची ‘धर्म’ संकल्पना काय हे समजण्याकरता या इतिहासावर दृष्टीक्षेप टाकणे आवश्यक आहे.

इस्लामी कट्टर पंथीय आज जगातल्या कित्येक देशांमध्ये हैदोस घालत आहेत. पण अमेरिकेमध्ये जेव्हा हल्ला होतो तेव्हा या ‘जिहाद’ चे उच्चाटन करण्याची भाषा बोलली जाते.

आपल्या धर्मातील कर्मसिद्धान्त एक महत्त्वाचे सूत्र सांगतो. ‘जसे पेराल तसे उगवेल’. यातूनच ‘आपल्या कर्माची फळे भोगा’ असे वाक्प्रचार निर्माण होतात. खऱ्या अर्थाने अमेरिका आज आपल्या कर्माची फळे भोगते आहे. भारत तर कुठलेही कारण नसताना गेले १५०० वर्षे या असभ्य विचारप्रणालीला बळी पडला आहे. निदान ऐतिहासिक आठवणीमध्ये तरी हिंदूंनी आपला पहिला गमावलेला भू-भाग हा अफगाणिस्तानच आहे. इस्लामपूर्व अफगाणिस्तान हा कला आणि विकासाचा स्रोत होता. १५०० वर्षांचा अफगाणिस्तान हा आज जग नष्ट करायला निघालेला ‘जिहाद’ चा स्रोत आहे.

अमेरिका आपल्यावर झालेल्या हल्ल्याची काळजी घेण्यास समर्थ आहे. इस्लाम हा ‘शांतते’चा संदेश देतो असे सांगणारे हे जेहादी कट्टर पंथियांपेक्षा भयावह आहेत. इस्लामी धर्मियांपेक्षा इस्लाम त्यांना चांगला कळला आहे असा त्यांचा दावा असेल तर इस्लाममधील शांततेचा संदेश देणारा हा विचार त्यांनी सर्व इस्लाम पंथीयांपुढे विस्ताराने मांडावा. इस्लाम मधील आजची स्त्रियांची परिस्थिती आणि इसलमी देशामधील इतर धर्मियांना दिलेले दुय्यम नागरिकत्व हे इस्लामच्या शिकवणुकीनुसार अंमलात आणले जाते. या सर्व गोष्टी दृष्टीआड करायच्या आणि इस्लाम शांततेचा संदेश देतो म्हणून सांगायचे ही नुसतेच धाडसाचे नाही तर अखिल मानवजातीच्या अहिताचे आहे. इस्लाम धर्माचे सत्य स्वरूप म्हणजे त्यांचे धर्मग्रंथ-कुराण आणि हडीस यांचा अभ्यास समाज-शास्त्रज्ञ आणि राजकारणी यांनी करणे आज आवश्यक आहे. तथाकथित इस्लामी आतंकवादी हा इस्लाम मधील शिकवणुकीचे पालन करत असतो. तोही प्रमाणिकपणे हे कबूल करतो. अफगाणिस्थान, पाकिस्तान, इंडोनेशिया, चीन पासून येतेन पर्यंत पसरलेल्या या चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये या बाबतीत एकवाक्यता आहे. ही सर्व मंडळी अप्रामाणिक आहेत असे म्हणणे हा नुसताच त्यांच्यावरती अन्याय नाही, तर ती आपलीही फसवणूक

करून घेणे आहे. आतंकवादाचा खरा मुकाबला म्हणजे इस्लामधर्माचे 'खरे' स्वरूप समजावून घेणे हाच आहे.

२१ व्या शतकाच्या सुरुवातीचे हे १ ले युद्ध खरेखुरे धर्मयुद्ध आहे आणि म्हणूनच या धर्मयुद्धांमध्ये विजय मिळवायचा असेल तर पुन्हा एकदा भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेला संदेश अंमलात आणणे आवश्यक आहे.

✧✧✧

# क्लोनिंग आणि धर्म

{ जानेवारी २००२ }

१९९७ साली 'डॉली' नावाच्या एका मेंढीने आपल्या जन्मामुळे विज्ञानातील एका नवीन पर्वाला सुरुवात केली. बहुतेक सर्व प्राण्यांचे व मानवांचे प्रजोत्पादन हे स्त्री–पुरुषांच्या मिलनातून होते. परंतु डॉलीचा जन्म हा वेगळ्या म्हणजे 'क्लोनिंग' पद्धतीने झाला.

प्रत्यक्षात नर–मादी यांच्या मीलनाशिवाय प्रयोगशाळेमध्ये स्त्रीबीज व पुरुषबीजांचा संयोग करून प्राण्यांची निर्मिती गेली काही दशके होत आहे. सुमारे २०/२२ वर्षांपूर्वी एका नलिकावालिकेलाही प्रयोगशाळेत निर्माण करण्यात आले व नंतर तिच्या आईच्या गर्भाशयात तिचे रोपण करण्यात आले. अनेक कारणांमुळे ज्यांना प्रजोत्पादन करणे शक्य होत नाही अशा वंध्य जोडप्यांना या तंत्रामुळे अपत्यप्राप्ती होत आहे.

मानवी कल्पनाशक्ती नेहमीच प्रगतीशील असते व नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्याचा सतत प्रयत्न चालू असतो. प्राणिमात्रांवर यशस्वी झालेल्या क्लोनिंग तंत्रज्ञानाचा वापर मानवी प्रजोत्पादनाकरिता करण्याचा प्रयत्न आधुनिक शास्त्रज्ञांनी लगेचच सुरू केला. अमेरिकेतील ॲडव्हान्सड् सेल टेक्नॉलॉजी (एसीटी) या कंपनीने २५ नोव्हेंबर २००१ रोजी कायिक पेशी केंद्र संक्रमण (सोमटिक सेल न्युक्लिअस ट्रान्सफर) तंत्रज्ञानाने गर्भनिर्मिती करण्यात यश मिळवले. याच प्रक्रियेला क्लोनिंग असे म्हणतात. या प्रक्रियेत स्त्रीगंतुकातील (गॅमट) केन्द्र (न्यूक्लिअस) काढण्यात येते व कायिका पेशीमधील केन्द्राचे त्यात रोपण करण्यात येते. या प्रक्रियेतून गर्भनिर्मितीची सुरुवात होते. यामध्ये कुठेही पुरुषबीज गर्भनिर्मितीकरिता

वापरले जात नाही. एका अर्थाने ही अप्राकृतिक किंवा अनैसर्गिक गर्भनिर्मिती आहे. यास अनिषेक (पार्थिनोजेनेसिस) असे शास्त्रीय परिभाषेत म्हणतात.

शास्त्रज्ञांचा हा सगळा अट्टाहास निदान मानवाच्या बाबतीत तरी प्रजोत्पादनापेक्षा अनेक रोग उदा. मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, मज्जातंतूंचे रोग यावरी उपचारांकरता आहे. गर्भधारणेनंतर अगदी सुरुवातीला तयार होणाऱ्या पेशी या पूर्णक्षम (टोटीपोटंट) असतात. पुढे त्यांचे विभाजन होते व वेगवेगळ्या पेशी व अवयवांची निर्मिती होऊन पूर्ण गर्भ तयार होतो.

या अगदी सुरुवातीच्या पेशी ज्या कुठल्याही अवयवपेशींमध्ये परिवर्तित झालेल्या नसतात त्यांना वीजपेशी (स्टेमसेल्स) म्हणतात. गर्भधारणेनंतर तात्काळ या वीजपेशी काढून प्रयोगशाळेत त्यांचा विकास गरजेच्या अवयवपेशींमध्ये करण्याचा प्रयत्न आज चालू आहे.

वैज्ञानिकांनी या तंत्रात यश मिळवले तर खरोखरच गर्भशास्त्राच्या अभ्यासात व असाध्य रोगांवरील उपचारांमध्ये क्रांती घडून येणार आहे. म्हणूनच या संशोधनाचे प्रामुख्याने दोन भाग पाडले जातात. १) रोगोपचाराकरिता २) प्रजोत्पादनाकरिता. सर्वसाधारणपणे रोगोपचाराकरिता या क्लोनिंग अगर वीजपेशी विकसित तंत्रज्ञानाच्या वापराला मान्यता मिळण्याची शक्यता आहे.

परंतु प्रजोत्पादनाकरिता या तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मात्र सर्वांचाच विरोध दिसून येतो. आज हे तंत्रज्ञान जरी पूर्ण विकसित नसले तरी ते लवकरच विकसित होणार आहे याबद्दल शास्त्रज्ञांना खात्री आहे. म्हणूनच आज जगभर जो चर्चेचा किंवा वादाचा विषय आहे तो तंत्रज्ञानातील प्रकारांपेक्षा त्यामुळे निर्माण होणाऱ्या नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक प्रश्नांमुळे आहे.

या तंत्रज्ञानाचा व्यापारी गैरवापर होऊ नये या बद्दलही दुमत असण्याचे कारण नाही. पण या तंत्रज्ञानामुळे धार्मिक संकल्पनांना जो मूलभूत छेद जाणार आहे तोच काही पंथांना व धर्मांना बेचैन करीत आहे. प्रामुख्याने ख्रिस्ती धर्मगुरू याला कडाडून विरोध करतात. ही बाब हिंदू धर्मियांनी किंवा निधर्मी समाजधुरीणांनी समजून घेणे अतिशय आवश्यक आहे. ख्रिस्तीधर्म उत्क्रांतिवाद (इव्होल्युशन) मानत नाही. ख्रिस्तीपंथानुसार मानव हा परमेश्वरनिर्मित आहे व इतर सर्व प्राणिजन दुय्यम दर्जाचे असून मानव आपल्या उत्कर्षाकरिता त्यांचा वापर करू शकतो. निसर्ग व मानवनिर्मित

या संदर्भात हिंदूधर्मियांचे तत्त्वज्ञान ख्रिस्ती, इस्लामी किंवा यहुदी तत्त्वज्ञानापेक्षा सर्वतः भिन्न आहे. या चराचरातील प्रत्येक निर्मितीमध्ये तो चैतन्यतत्त्व बघतो.

गेल्या ५०० वर्षांच्या भौतिक व जैविक विज्ञानाचा इतिहास पाहिला तर ख्रिस्ती मूलतत्त्वाला हा विकास छेद देऊन जाणारा आहे. म्हणूनच गॅलिलिओ, डार्विनचा उत्क्रांतिवाद ते आजच्या वीजपेक्षा किंवा मानवी क्लोनिंगला पोप व ख्रिस्ती धर्मगुरूंचा विरोध आहे.

धर्म परिवर्तनवाद्यांनी किंवा समाजसुधारकांनी विज्ञान आणि ख्रिस्तीधर्म यांच्यातील या संबंधाची प्रामाणिक नोंद घेणे आवश्यक आहे. हिंदूधर्म व त्यावर आधारलेली त्याची नीती व त्याच्या परंपरा या मूलभूत विज्ञानविकासाच्या विरोधात नाहीतच.

पण त्यामुळे एकंदरीतच सृष्टी व मानवनिर्मिती संदर्भात विज्ञानामुळे ज्ञात झालेली माहिती ही त्याच्या मूलभूत तत्त्वज्ञानाशी सुसंगतच दिसते.

आजही जगातील सर्वच विकसित देशांचा या तंत्रज्ञानाला जो विरोध होत आहे तो प्रामुख्याने उघड व छुप्या ख्रिस्ती धर्मगुरूंच्या प्रभावामुळे आहे. डॉलीची निर्मिती करणाऱ्या वैज्ञानिकालाही स्कॉटलंडमधील ख्रिस्ती धर्मगुरूंपुढे आपली बाजू मांडून त्यांच्याकडून मान्यता घ्यावी लागली. आपल्याकडील 'निधार्मिकता' ही सैद्धांतिक व राजकीय आहे. धर्म समजावून घेण्यापेक्षा धर्मभंजन व संस्कृतीभंजन हाच त्याचा अंतिम उद्देश आहे. याची दखल घेणे आज आवश्यक आहे.

✧✧✧

# व्यक्तिस्वातंत्र्य आणि अमेरिका

{ एप्रिल २००२ }

११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेवर झालेल्या आतंकवादी हल्ल्यानंतर एका नव्या अमेरिकेचा उदय होताना आपण पहात आहोत. अमेरिका हा एक प्रगत आणि समृद्ध देश समजला जातो. ही प्रगती त्यांच्या विज्ञानपुरतीच मर्यादीत नसून कला, विद्वत्ता, समाजरचना, सामाजिक संस्था, अर्थकारण, राजकारण या सर्व क्षेत्रांमध्ये अमेरिकेची प्रगती दिसून येते. एकाच शब्दात या प्रक्रियेचे वर्णन करायचे तर त्याला प्रगत, पुढारलेला, आधुनिक या विशेषणांनी संबोधावे लागते. जगातील सर्वच राष्ट्रे आज प्रगत, आधुनिक होऊ पहात आहेत. अमेरिकेचं अनुकरण फक्त विज्ञानापुरतेच मर्यादित नसून अमेरिकेची राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक रचना आणि मूल्येही ती आत्मसात करण्यात मग्न आहेत. अमेरिकेच्या या प्रगतीला समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टीकोन, व्यवहारातील पारदर्शकता या मूल्यांचा त्यांनी केलेला स्वीकार कारणीभूत धरला जातो. यातही अमेरिकन समाजाच्या 'स्वातंत्र्य' आणि 'मानवी अधिकार' या संकल्पना त्यांच्या विकासाला अधिक कारणीभूत आहेत असे समजले जाते.

अमेरिकन राष्ट्राचा इतिहास हा अवघा २०० वर्षांचा आहे. मानवी इतिहासाच्या कालपटात हा काळ फार नगण्य आहे. विशेषतः भारतीय संस्कृती आणि सभ्यतेच्या इतिहासाचा कालपट हा कमीत कमी ५००० वर्षांचा आहे. साहजिकच जेवढा काळ जास्त तेवढे यशापयशाचे चढ-उतार जास्त. इतिहासाला भारताप्रमाणेच इतर अनेक देश प्रगत सभ्यता होऊन गेल्याचे माहीत आहे. त्यांचे अस्तित्व आज केवळ इतिहासाच्या पानावरच शिल्लक आहे. फक्त नैसर्गिक आपत्तींमुळे या सभ्यता अस्तंगत झाल्या असे म्हणणे धाडसाचे ठरेल. भारतानेही अनेक नैसर्गिक

आपत्तींना तोंड दिल्याचे दिसून येते. तरीही भारतीय सभ्यता अस्तित्वात राहिली याचे काहीतरी कारण हे असणारच. स्वातंत्र्य, मानवी अधिकार यांच्या आदराशिवाय कला आणि संस्कृतींचा विकास होऊच शकत नाही. भारतीयांनी यामध्ये गाठलेली उंची वादातीत आहे. संस्कृतीच्या किंवा सभ्यतेच्या यशापयशाच्या मोजमापाची परिमाणे त्या समाजाच्या रूढी, परंपरा आणि तत्त्वज्ञानांतच शोधावी लागतात.

व्यक्ती समुहाने राहू लागली म्हणजे त्याचा समाज होतो. हा समाज चिरकाल टिकावा आणि उन्नतही व्हावा या करता समूह आणि व्यक्ती यामध्ये सुसंवाद असणे आवश्यक असते. व्यक्ती आत्मककेंद्रित झाली की हा सुसंवाद होऊ शकत नाही. आत्मकेंद्री व्यक्ती ही फक्त स्वतःच्या स्वातंत्र्यापुरताच विचार करते. सामाजिक हिताकरता आपल्या स्वातंत्र्याचा संकोच करणे तिला मान्य नसते. व्यापक समाजहिताकरता व्यक्तींना काही नियम हे पाळावेच लागतात. समाजातील अनेक प्रवृत्तींना मर्यादा घालाव्या लागतात. या मर्यादा आणि नियमांना जेव्हा संघटीत स्वरूप मिळते तेव्हा त्यामधून सामाजिक संस्था निर्माण होतात. अशा समाजाचे काही नीतीनियम, आचार, रोठी वेटो व्यवहार यांचीही एक संहिता तयार होते. यालाच भारतीय परिभाषेत 'धर्म'ही म्हणतात. धर्म म्हणजे कर्मकांड नाही. पण कर्मकांड हा धर्माचा भाग असू शकतो. मनुस्मृती आणि तत्सम पुढच्या सर्वच स्मृती हे धर्मशास्त्राचे ग्रंथ आहेत. आजची स्वतंत्र भारताची घटना हा आपला आजचा धर्मग्रंथ आहे. धर्मग्रंथामध्ये समाजाच्या आशा-आकांक्षा आणि संस्कृतींचेच प्रतिबिंब असते. म्हणूनच समाजाचे संदर्भ जेव्हा बदलू लागतात किंवा कालबाह्य ठरतात तेव्हा नवे धर्मग्रंथ लिहिले जातात. यांचा संबंध हा व्यक्ती आणि सावली या सारखाच असतो. धर्मग्रंथ हे उसनवारी किंवा दुसऱ्या सभ्यतांची नक्कल करून लिहिले असतील तर ते फार काळ टिकू शकत नाहीत. एकतर समाज तरी त्यांना बदलतो किंवा धर्मग्रंथच समाजाचा नाश करून टाकतात. भारतीय संदर्भात 'धर्म' ही संकल्पना व्यापक आहे. देव, देवपूजा म्हणजे धर्म ही संकल्पना पाश्चात्त्य आहे. धर्म आणि समाज रचना यांची चर्चा करताना या मूलभूत फरकांचे भान ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

११ सप्टेंबरच्या घटनेनंतर, अमेरिका गेली २०० वर्षे आपल्या उराशी बाळगलेल्या काही मूलभूत संकल्पनांचा पुनर्विचार करू लागलेली दिसते. व्यक्ती जेवढी आत्मकेंद्रित होते तेवढी ती अधिक स्वातंत्र्य मागू लागते. असे अनियंत्रित अधिकार जेव्हा व्यक्तीला बहाल होऊ लागतात तेव्हा त्यांना 'सुधारणा' असेही नाव मिळू लागते. भारतीय संदर्भात त्यांना 'पुरोगामी विचार' असे संबोधले जाते.

त्यात पहिला बळी पडतो तो समाज संस्थांचा. असे 'अनियंत्रित' 'दिशाहीन' स्वातंत्र्य जेव्हा समाजातल्या बहुसंख्य व्यक्ती उपभोगू लागतात तेव्हा समाजाचे अस्तित्वच धोक्यात येते. अमेरिकेला आज आपले अस्तित्वच धोक्यात आल्यासारखे वाटू लागले आहे. अनिर्बंध, अनियंत्रित स्वातंत्र्याला मान्यता न देण्याचे अमेरिकेने ठरवलेले दिसते. अमेरिकेचे अनुकरण युरोपमधील त्याचे मित्र देशही करू लागलेले आहेत. समता, बंधुत्व आणि मानवी अधिकार यांच्या व्याख्या आता अमेरिका बदलू पहात आहे.

११ सप्टेंबर नंतर काही जिवाणू आणि रसायनांचा व्यापकमानवी संहाराकरता अस्त्र म्हणून अमेरिकेतच झालेला वापर अमेरिकन सरकारला चिंतीत करत आहे. मूलभूत वैज्ञानिक सिद्धान्त आणि माहिती मिळवण्याच्या अधिकारावरच अमेरिकन सरकारने नियंत्रण आणले आहे. १९४०-५० पासून कोणालाही सहज उपलब्ध असणाऱ्या वैज्ञानिक माहितीचे सुमारे ७००० शोध-निबंध इंटरनेट आणि सरकारी माध्यमातून काढून घेण्यात आले. मूलभूत अणू, रासायनिक आणि जैविक शोध निबंध प्रसिद्ध करण्यावर विद्यापीठ आणि नियतकालीकांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. २० हून अधिक इस्लामी राष्ट्राच्या नागरिकांना अमेरिकेमध्ये प्रवेश बंद करण्यात आला आहे. पोटो पेक्षा भयानक कायदा अमेरिका आणि ब्रिटनमध्ये फारसा वाद न होता ''राष्ट्रीय हिताकरता'' संमत करण्यात आला.

अमेरिकन संस्कृती आणि राष्ट्रीय हिताच्या आड येणाऱ्या सर्वच संकल्पनांचा आम्ही पुनर्विचार करू असे अमेरिकन नेते उघडपणे सांगत आहेत. अमेरिकेचा अनुनय करणाऱ्या भारतासारख्या देशाला यापासून खूप काही शिकण्यासारखे आहे. योग्य-अयोग्यतेचा विचार करताना शेवटी आपल्या अंतर्मनाला आणि सद्सद्विवेकबुद्धीला विचारा आणि त्यांनी संमती दिली तर त्याप्रमाणे वागा, असा प्रगल्भ समाज निर्माण करणारी संस्कृती आणि हे सांगणारा मनुसारखा धर्मग्रंथकार मिळायला अजून अमेरिकेला बरीच शतके घालवायला लागतील. बाल्यावस्थेतील या संस्कृतीला प्राचीन भारतीय धर्मग्रंथांकडून बरेच शिकण्यासारखे आहे. 'नियंत्रित' स्वातंत्र्य आणि 'कर्तव्या' शिवाय चिरकला टिकणारा संतुलित समाज निर्माण होऊ शकत नाही. ज्ञान किंवा शास्त्रीय माहिती अपात्र, आत्मकेंद्रित आणि असंस्कृत लोकांच्या हातात पडली तर ती समाजाचा नाशच करते. कुटुंब संस्थेपासून लग्नसंस्थेपर्यंत सर्वच समाज संस्थांचा विचका करणारे भारतीय 'पुरोगामी' सुधारक अमेरिकेच्या या बदलत्या चेहऱ्याची ओळख करून घेतील काय?

✧✧✧

# कालचा गांधार आजचा अफगाणिस्तान

{ जुलै २००२ }

अफगाणिस्तान इ.स. पूर्व ४००० पासून हिंदकुश पर्वताच्या उत्तरेस शेतकऱ्यांची वस्ती होती. ऋग्वेदात 'पक्थ' या जमातीचा निर्देश पठाणांचा असावा असे मत आहे.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाशी निकटचे नाते सांगणारा अफगाणिस्तानचा सांस्कृतिक इतिहास आहे. ह्यू एन् त्संग हा चिनी प्रवासीही काबुलच्या उत्तरेस ८० किलोमीटर असलेल्या वेग्राम (प्राचीन कापिषी नगर) याचा 'किआ पिशे' असा उल्लेख करतो.

प्राचीनकाळापासून पाश्चिमात्य व पौर्वात्य देशातील व्यापारी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण ज्या खुष्कीच्या मार्गाने होत आली, त्यावरील अफगाणिस्तान हा महत्त्वाचा टप्पा होता. म्हणूनच येथे अनेक संस्कृतींचे ठसे उमटलेले दिसतात. याच प्रदेशाला 'गांधार' असेही नाव होते.

इ.स. पूर्व ५व्या शतकापासून इ.स. १६ व्या शतकापर्यंत गांधार प्रांताचा व्यापार उदीम तेजीत होता. या प्रदेशावर राज्य करणाऱ्या बहुतेक राजांनी स्वतःची नाणी प्रचलित केली. चांदीच्या नाण्यांवर सूर्याचे चित्र आढळते. इ.स.पूर्व ५व्या, ६ व्या शतकातील 'चक्र' हे खूण असलेली तेथील राजांची नाणी आढळतात. तर इ.स.१०व्या शतकातील राजा भीमदेवाची नाणी आढळतात. या नाण्यांवर मोर, सिंहही आढळतात. विशेष म्हणजे हत्तीचे चित्रही आढळते. हत्ती हे भारतीय राजांचे व संपन्नतेचे मानचिन्ह मानले जाई, की जे अफगाणिस्तानातील नाण्यांवर प्रचलित होते. हाही भारत अफगाणिस्तानचा एक सांस्कृतिक प्राचीन ऐतिहासिक दुवा असे म्हणता येईल.

अनेक फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी व उत्खनन शास्त्रज्ञांनी खूप मेहनत घेऊन या भागात संशोधन केले आहे. काबूल, गार्देश, कंदाहार, जलालाबाद, वेग्राम, वमियान आदी शहरांतून अनेक मूर्ती व वस्तू मिळाल्या आहेत. त्या प्रामुख्याने काबूल म्युझियम, युरोप, अमेरिका व भारत येथील म्युझियम मध्ये आहेत.

वेग्राम (प्राचीन नाव कपिषा) येथील उत्खननात भारत व अफगाणिस्तान यातील निकटचा प्राचीन सांस्कृतिक इतिहास सांगणारा पुरावा मिळाला आहे. या उत्खननात चैनीच्या वस्तू, शृंगार पेट्या तसेच अतिशय सुंदर हस्तीदंती वस्तूही मिळाल्या आहेत. यांनाच 'वाग्राम हस्तीदंती वस्तू' अगर 'वाग्राम आयव्हरीज्' या नावाने ओळखले जाते. कनिष्काच्या आता पडित असलेल्या राजवाड्यात, सिरिया व अलेक्झांड्रियातील काचेचे सामान, हेलिनिस्टिक ब्रॉन्झ वस्तू, तसेच चीनी रंग रांगणेही सापडली आहेत.

ऊर्ध्वरेतस गणेशाचे अप्रतिम शिल्प गार्देझ येथे सापडले होते ते आता काबूलमध्ये आहे व त्यावर ब्राह्मी लिपीतील मजकूर कोरलेला आहे. शिव, विष्णू, ब्रह्मा, सूर्य, इंद्र, दुर्गा आदी देवतांच्या देखण्या मूर्तिही अफगाणिस्तानातील अनेक ठिकाणच्या उत्खननात मिळाल्या आहेत.

गेली ३० वर्षे रशिअन व अमेरिकन साम्राज्यवादाच्या लढाईत होरपळून निघालेल्या अफगाणिस्तानला नुकतीच भेट देण्याचा योग आला. तालिबानांचे राज्य अमेरिकन फौजांनी नष्ट केले व आता लोकशाही अफगाणिस्तानची पायाभरणी चालू आहे.

१० व्या शतकापर्यंत अफगाणिस्तान हा भारताच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग होता. ईस्लामी जुलूम आणि आक्रमणाचा सुमारे २ शतके प्रतिकार अफगाणिस्तानमधील हिंदू राजांनी केला. महम्मदापासून (१० वे शतक) विन लादेनपर्यंत (२०वे शतक) 'खरा ईस्लाम' आणण्याचा प्रयत्न सुमारे १००० वर्षं अफगाणिस्तानात झाला. राष्ट्र ही भाबडेपणा आणि स्वप्नांवर जगत नसतात. जे राष्ट्र आपला इतिहास विसरते किंवा विकृत होऊ देते त्याचा भूगोलही बदलतो. या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तानचा इतिहास आणि भारताचा तत्कालीन आणि आजचा भूगोल यांचा अभ्यास होणे हितावह ठरेल.

✧✧✧

# बलात्कार - जबाबदार कोण?

{ ऑक्टोबर २००२ }

नुकत्यास घडलेल्या दोन घटना - मुंबई मधील उपनगरीय रेल्वेमध्ये झालेला एका स्त्री वरील बलात्कार आणि गुजरातची राजधानी गांधीधाम येथील अक्षरधाम मंदिरावर आतंकवाद्यांनी केलेला हल्ला, मन सुन्न करणाऱ्या या घटना आहेत. खरं म्हणजे यातल्या कुठल्याच घटना नवीन नाहीत. या घटनांवर वेगवेगळ्या प्रसिद्धी माध्यमांतून व्यक्त झालेल्या प्रतिक्रियांमध्ये ही काही नवीन नाही. आतंकवाद हा खूपसा राजकीय चर्चेचा भाग आहे. पण बलात्कार आणि त्यावरील प्रतिक्रियांचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. बलात्काराचा संबंध स्त्री-पुरुष संबंधाशी आहे. विशेषतः शरीर संबंध, फरक असतो तो फक्त संदर्भात. स्त्री आणि पुरुषांच्या संमतीनी होतो असा शारीरिक संबंध फारच कमी वेळा वादाचा विषय बनतो. पण हा संबंध जेव्हा संमतीशिवाय, प्रामुख्याने स्त्रीच्या संमतीशिवाय होतो तेव्हाच तो बलात्कार होतो.

मानवाची निर्मितीच स्त्री-पुरुष संबंधात आहे. या संबंधाचा जेवढा नैसर्गिक पदर आहे त्याही पेक्षा मोठा त्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू आहे. कुठलीही स्त्री किंवा पुरुष एकमेकांशी संबंध ठेवायला शारीरिक दृष्ट्या जरी सक्षम असले तरी असे संबंध ठेवण्याकरिता काही सामाजिक आणि सांस्कृतिक पात्रता घालून दिलेल्या आहेत. मानवाच्या सांस्कृतिक विकासामधील हा एक फार महत्त्वाचा टप्पा आहे. यामधूनच लग्नसंस्था, पति-पत्नी संकल्पना आणि त्या अनुषंगानी सर्वच नाती निर्माण होतात. स्त्री आणि पुरुष जेव्हा अशा नात्यांच्या भूमिकेत वावरू लागतात तेव्हा त्यांच्या परस्पर संबंधांचा संदर्भ लक्षात घेऊन एका सुनियंत्रित सामाजिक आणि सांस्कृतिक परिघातच असे संबंध ठेवावे लागतात. हे

नियंत्रण आणण्याकरिता स्त्री-पुरुषांची एक मनो-सामाजिक मानसिकता निर्माण करावी लागते. अशी मानसिकता सक्षम व्हावी म्हणूनच नीती-अनीती, पवित्र-अपवित्र अशा सामाजिक मूल्यांची निर्मिती करावी लागते.

याचाच आधार घेत व्रतवैकल्ये, सण, उपास-तापास, पाप-पुण्य या संकल्पना पुढे निर्माण होतात. याचेच एक साहित्य तयार होते. परिभाषा तयार होते. उन्नत समाजात अशा नीतिनियमांचे पालन हा यामुळेच एक स्वेच्छेचा भाग बनतो. उद्दीपीत होणे ही जरी एक नैसर्गिक क्रिया असली तरी अनेक होणारे बलात्कार यामुळे टळू शकतात. या संदर्भात स्त्री आणि पुरुषांची जबाबदारी सारखीच आहे. स्त्री-पुरुषांनी वेष कसा परिधान करावा यापासून समाजात वावरताना आपले चालणे, बोलणे व हालचाली कशा असाव्यात याचीही एक व्यवस्था घालून दिलेली असते. सुसंस्कृत समाज अशा व्यवस्थेचा नेहमीच पुरस्कार करतो. अशा व्यवस्थेत राहूनही अतिशय चांगले साहित्य किंवा कुठल्याही कलेची निर्मिती करता येते. अशा मानवा-मानवांमधील संबंधांच्या व्यवहारावर, मानव आणि निसर्गामधील विविधता लक्षात घेऊन, आवश्यक ती लवचिकता ठेवून जी नियंत्रण व्यवस्था निर्माण केलेली असते, त्या व्यवस्थेलाच 'धर्म' म्हणतात. सुरक्षित, सुसह्य, सुसंस्कृत, समाजरचना ही अशा 'धर्म' संकल्पनेशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही.

दुर्दैवाने 'धर्मा'ची ही संकल्पना समजणारे सामाजिक आणि राजकीय नेतृत्व आज दिसत नाही. नवीन समाजरचनेशी धर्माचा संबंध मुळीच असू नये, एवढेच नाही तर 'धर्म हा प्रगतीमधील एक अडथळा आहे, विज्ञान आणि धर्म एकत्र नांदू शकत नाहीत, अशी बाष्कळ समजूत समाजाची करून देण्याचा केविलवाणा प्रयत्न अशा नेतृत्वाचा कायम चालू असतो. यांना कुठला समाज निर्माण करायचा आहे आणि तो निर्माण करण्याकरिता लागणारी यांची साधनं कुठली हेही ही मंडळी नीटपणे सांगू शकत नाहीत.

आजच्या दूरदर्शनवरील जाहिराती आणि चित्रपटामधील स्त्रीचे स्वरूप बघता बलात्कार इतके कमी का होतात? असाच प्रश्न पडतो! कठोर कायद्यांमुळे अशा घटना बंद होतील अशी बालिश कल्पनाही खूप वेळा व्यक्त केली जाते. या घटनेच्या संदर्भात आलेल्या बहुतांशी प्रतिक्रिया या म्हणूनच हास्यास्पद आणि उथळ आहेत. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' या मधला फरक अजून यांच्या लक्षात आलेला नाही किंवा भोगवादी, मूल्यहीन असा समाज हेतुपुरस्सर यांना निर्माण करायचा आहे असे यांच्या प्रतिक्रिया आणि लेखनामधून दिसून येते.

आजची स्त्रीमुक्तीची चळवळ ही स्त्रीच्या उद्धारापेक्षा पुरुष द्वेषाची चळवळ झाली आहे. जडवादी सिद्धान्ताचे ते एक हत्यार बनले आहे. स्त्रीला जास्तीत जास्त उपभोग्य वस्तू याच मंडळींनी बनविली आहे. दिशाहीन, भ्रष्टाचारी, आत्मकेंद्री, लाचार आणि भेकड समाजाची आजची निर्मितीची जबाबदारी यांच्या शिरावर आहे. अशा बेगडी सुधारणावाद्यांना स्त्रीमुक्ती चळवळीपासून आज दूर ठेवण्याची गरज आहे.

आजचे कुठलेच वृत्तपत्र, दूरदर्शनची वाहिनी किंवा सिनेमा, शंकराचार्य म्हणजे धर्मसंस्था निर्माण करीत नाहीत. ही सर्व माध्यमे आज तथाकथीत 'सुधारणावादी' आणि 'पुरोगामी' यांच्या हातात आहेत. तेव्हा अशा बलात्काराची जबाबदारी यांच्या शिरावरच आहे. आत्मपरिक्षणाची खरी गरज अशा बेजबाबदार स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या सामाजिक आणि राजकीय नेतृत्वालाच आहे. हे समाजाला जेवढे लवकर उमजेल तेव्हाच अशा बलात्कारांची संख्या कमी होईल.

✧✧✧

# ‘ठेंगू’’ वाद

**{ जानेवारी २००३ }**

जोशी-तेंडुलकर वाद महाराष्ट्रात सध्या चांगलाच गाजत आहे. साहित्यिक किंवा राजकीय लोकांमधील वादविवाद हे बहुतेक वेळेला आपापसातील मत्सर, सल किंवा क्वचित प्रसंगी तात्विक, राजकीय हिशोब चुकते करण्याकरिता केलेले खटाटोप असतात. वाद निर्माण करण्याचे अव्यक्त हेतू जरी असे असले तरी वादाचे व्यक्त स्वरूप मात्र नीती, अश्लीलता, स्वातंत्र्य, चारित्र्य इ. अनेक जीवनातील महत्त्वाच्या विषयांना छेदून जाणारे असते.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्यात अनेक अनपेक्षित, कूट आणि विसंगत प्रसंगांना सामोरे जावे लागते. हे वास्तव घेऊनच धर्मातील नीती-अनीती या संकल्पनाची योजना झालेली असते. कधी परंपरा म्हणून त्या समोर येतात, तर कधी संस्कार म्हणून त्या लोकांवर बिंबवाव्या लागतात.

आपल्या जीवनामध्ये एवढ्या अनाकलनीय घटना घडत असतात की, त्यांची सुसंगत उकल शुद्ध तर्कवाद आणि युक्तिवादाने करणे हे जवळजवळ अशक्य असते.

पुरुषांमध्ये जेवढा धर्म आणि मोक्ष आहे तेवढाच काम आणि अर्थही आहे. हे सर्वच घटक उन्नत, सुसंस्कृत जीवनाकरिता आवश्यक आहेत. तसेच ते परस्परावलंबीही आहेत. फक्त नर आणि मादी हे जीवशास्त्रामधील तर्कसंगत सत्य आहे, पण नर आणि मादी जेव्हा सांस्कृतिक भूमिकेमध्ये नांदू लागतात तेव्हा ते फक्त नर आणि मादी नसतात. त्यांची नाती, त्यांच्या भूमिका यामुळे जीवनातील घटनांचे संदर्भ बदलतात. आईने घेतलेले चुंबन आणि प्रेयसीने घेतलेले चुंबन

यामध्ये फरक फक्त नातं आणि संदर्भाचाच असतो. बहिणीला राखी का बांधायची या मागील सामाजिक, सांस्कृतिक संदेश हा म्हणूनच तर्क किंवा जीवशास्त्रातील वास्तवापलीकडे असतो.

सगळेच चांगले-वाईट अनुभव एकाच व्यक्तीला त्याच्या आयुष्यात मिळतील हाही संभवही फारच कमी. म्हणूनच दुसऱ्याने सांगितलेल्या अनुभवांचा आदर करावा लागतो. खरं बोला, सत्याचा आदर करा, हा संस्कार हेतू पुरस्सर आणि आग्रहाने करायला लागतो. कारण खोटं बोलणाऱ्याची सरशी हा जवळजवळ अलिखीत नियमच आहे. त्याला व्यवहारवाद असे गोंडस नावही खूपवेळा दिले जाते. समाजाने अशा सरशीला किंवा व्यवहाराला प्रतिष्ठा मिळवू न देणं हे प्रगल्भ समाजाचे लक्षण ठरते.

पारितोषिकं, बक्षिसं, पुरस्कार, मान-सन्मान हे प्रतिष्ठा मिळवण्याचे एक साधन आहे. जेवढी व्यक्ती पात्र व अधिकारी तेवढा पुरस्कार हा अधिक प्रतिष्ठावान. जेव्हा अपात्र व्यक्ती पुरस्कार पात्र होते तेव्हा पुरस्कार प्रतिष्ठाहीन होतो. ज्या समाजात पात्रता आणि अधिकारांना तिलांजली दिली जाते त्या समाजात सर्वच पुरस्कार प्रतिष्ठाहीन बनतात. आजच्या पद्मश्री आणि भारतरत्नांची खिरापत बघितल्यावर कुठल्याच स्वाभिमानी प्रतिष्ठित व्यक्तीला हे पुरस्कार मिळावेत असे वाटणार नाही. गल्लीतील पुरस्कारांबद्दल तर कमी बोललेलेच बरे!

उंच माणसांनी लांब टाकलेल्या पाऊलाइतके अंतरही ठेंगू माणसाची ऊंच उडी गाठू शकत नाही. जेव्हा दोन ठेंगू उड्या मारू लागतात आणि वाद अंतरापेक्षा ऊंचीचा होऊ लागतो तेव्हा वाचणाऱ्याची करमणूकच जास्त होते. आजचा जोशी-तेंडुलकर वाद हा असाच करमणूक म्हणून बघायला हरकत नाही. वाद मात्र 'पात्रता', 'अधिकार' या सनातन मूल्यांवर आहे. ठेंगूना वाद घालण्याचा अधिकार असतो, पण त्यांनी एकमेकांच्या ऊंचीवर मात्र वाद घालू नये. कारण त्याला मात्र ते अपात्र असतात.

✧✧✧

# धर्म आणि निसर्ग

**{ एप्रिल २००३ }**

मानवाचा निसर्गाशी संबंध हा मानवी अस्तित्वाच्या इतिहासा इतकाच जुना आहे. निसर्ग म्हणजे संपूर्ण चराचराचा विचार केला तर मानव त्याचा महत्त्वाचा घटक जरी असला तरी एक नगण्यच घटक म्हटला पाहिजे. तरीही मानवाचा निसर्गाशी जो संघर्ष चालू आहे त्याचे स्वरूप संपूर्णतः भिन्न आहे. जगातल्या सगळ्याच तत्त्ववेत्यांना 'मी आलो कुठून, मी जाणार कुठे' हे प्रश्न आज हजारो वर्षे पडले आहेत. सृष्टीच्या निर्मितीबद्दलच्या संकल्पना या म्हणूनच प्रत्येक धर्मग्रंथाच्या मुळाशी असतात. जेवढे धर्मग्रंथ प्राचीन तेवढे नैसर्गिक घटक आणि घटना म्हणजे वारा, पाऊस, दिवस, रात्र, चंद्र, सूर्य इत्यादींच्या रूपक कथा त्यामध्ये अधिक. अनेक वैदिक देवता आणि वेदातीत 'ऋत' ही संकल्पना हे ह्याचे एक चांगले उदाहरण आहे. हिंदू तत्त्वज्ञान आणि त्यावरच आधारलेल्या त्याच्या समाज संस्थांचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा संघर्षापेक्षा संवादाचा आहे, निसर्गाच्या संरक्षण आणि संवर्धनाचा आहे. चराचरातील प्रत्येक अंशामध्ये तो ईश्वरी अस्तित्व पहातो आणि म्हणूनच त्यापुढे नतमस्तक होतो. त्यामुळेच आपल्या भौतिक गरजा भागवताना त्यानी निसर्गाचे संतुलन बिघडवलं नाही.

सोळाव्या शतकानंतर पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. त्यातूनच पश्चिमी विज्ञानाचा उदय झाला. साहजिकच या आधीचा कालखंड हा माणसाच्या मागासलेपणाचा आणि अलीकडचा कालखंड हा प्रगतीचा कालखंड असे मानले जाऊ लागले. प्रगती म्हणजेच आधुनिकीकरण असेही समीकरण त्यातून निर्माण झाले. या मानसिकतेतूनच नैसर्गिक साधन संपत्तीचा विध्वंस सुरू झाला. आजचा पर्यावरणाचा प्रश्न हा मानव-निर्मित आहे, हे मान्य होऊन सुद्धा

पर्यावरणाचे संतुलन पुनः प्रस्थापित करण्यासाठी हवा असलेला संयम आजचा प्रगत मानव मान्य करण्यास तयार नाही. अशा बेजबाबदार वागण्यामुळे येऊ घातलेला विनाश हा अजून खूप लांब आहे, आज त्याची कशाला चिंता कशाला (?) या भूमिकेतूनच त्याचे सर्व व्यवहार आज चालू आहेत. विसाव्या शतकाच्या मध्यानंतर मानवाने विज्ञानामध्ये काही क्रांतीकारक शोध लावले. जनुकांची रचना हा त्यातील एक महत्त्वाचा शोध होता. या शोधामुळे विसाव्या शतकाच्या शेवटी जैविक तंत्रज्ञानात त्यानी बरेच प्रभुत्व मिळवले. त्याचाच एक भाग म्हणून मानवाने प्रत्यक्ष मानव निर्मिती मध्येच हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. नलिका बालके (Test Tube Babies), तसेच क्लोनिंग, मानवी जनुकांचा नकाशा हे सर्व यामुळेच शक्य झाले. अर्थातच या हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे सांस्कृतिक आणि सामाजिक प्रश्न त्याचा त्यांनी कधीच गांभीर्याने विचार केला नाही.

२००३ साल मात्र वेगळाच संदेश घेऊन जन्माला येत आहे. क्लोनिंग तंत्रज्ञानातून निर्माण केलेल्या डॉली या पहिल्या सस्तन प्राण्याचे जीवन विषारी इंजेक्शन देऊन संपवावे लागले. क्लोन केलेल्या प्राण्यांमधील रोगांचे प्रमाण बघता त्या सर्वच गोष्टींचा पुनर्विचार करण्याचा सल्ला वैज्ञानिकांनी दिला आहे. गेल्या ३० वर्षांमध्ये हजारांनी नलिका बालके जन्माला आली. नेदरलँड येथील एका अभ्यास गटाला गेल्या काही वर्षांत जन्माला आलेल्या अशा बालकांमध्ये डोळ्यांमधील काही पेशीत कर्करोगांचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले. स्वीडन हा जगातील सर्वात समृद्ध देश मानला जातो. मुक्त स्त्री-पुरुषांचे प्रमाण तिथे अधिक असणे हे ओघाने आलेच. कुमारी/अविवाहित मातांचे सर्वात अधिक प्रमाण स्वीडनमध्ये आहे. लग्न हा पुरुषी गुलामगिरीचाच एक भाग समजला गेल्यामुळे विवाहीत स्त्री-पुरुषांची संख्या तेथे मोठ्या प्रमाणावर घटली. एकच पालक असलेल्या मुलांच्या मनो-सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीची माहिती देणाऱ्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या शोध निबंधाचे निष्कर्ष मन सुन्न करणारे आहेत. या मुलांमध्ये मादक द्रव्यांचे सेवन, आत्महत्येचे आणि सर्व मनोविकारांचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून आले. ब्रिटन आणि अमेरिकेमधील अशा अभ्यासामध्येही असेच निष्कर्ष दिसून येत आहेत.

पाश्चात्त्य स्त्री मुक्तीची भ्रष्ट नक्कल करणे याला भारतामध्ये पुढारलेपणाचे लक्षण मानले गेले आहे. लग्न आणि कुटुंब या संकल्पना नष्ट करण्याकडेच आजच्या आपल्या सामाजिक सुधारणा आणि त्याला सुसंगत अशी कायद्याची

पुनर्रचना करण्यात सध्या आपण मग्न आहोत. अनेक सामाजिक संस्था अनेक शतकाच्या अनुभवांतून निर्माण झालेल्या असतात. अशा संस्था संवर्धित करणे, त्यामधील कालबाह्य भाग काढून टाकणे आणि नागरिकाला आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणे याला सुधारणा म्हणता येईल. पण त्या नष्ट करणे हा सुधारणेचा भाग कसा होईल, हे कळत नाही.

निसर्ग आणि नैसर्गिक लयीमध्ये हस्तक्षेप करणे फार सोपे आहे, कारण याचे परिणाम बहुतेक वेळेला पुढील पिढ्यांनाच भोगावे लागतात. म्हणूनच नैसर्गिक संतुलन टिकवणे हाच कोठल्याही प्रगतीचा केंद्रबिंदू हवा. हिंदू धर्मामधील व्रतवैकल्ये, नीती-अनीतीच्या कल्पना यांच्या केंद्रस्थानी म्हणूनच निसर्ग आहे. यामुळे स्वीकारावी लागणारी सामाजिक नियंत्रणे आणि संयम हीच खरी मुक्ती आहे; हे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक नेतृत्वाला जेव्हा समजेल तोच खरा सुदिन.

✧✧✧

# प्रा. यशपाल, नारळीकर आणि विज्ञान

{ जुलै २००३ }

विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्राध्यापक यशपाल ह्यांनी मुंबई येथे प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर ह्यांच्या निवृती संदर्भात आयोजित केलेल्या एका समारंभात वैज्ञानिकांबद्दल व्यक्त केलेली मते नक्कीच विचार करण्याजोगी आहेत. 'वैज्ञानिक, मानवी विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याऐवजी कोणाच्यातरी हातातील खेळणे बनून राहिले आहेत' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. 'महत्त्वाच्या सामाजिक घटनांवर वैज्ञानिक निर्भीड आणि प्रामाणिक मतप्रदर्शन न करता गप्प राहणे पसंत करतो' असेही ते खेदाने म्हणाले. संदर्भादाखल त्यांनी 'अयोध्येतील मंदिर-मस्जिद वाद, भेदाभेद मिटतील तेंव्हाच ती खरी प्रगती असेल' असे त्यांनी सांगितले.

यशपाल ह्यांच्या मताबद्दल दुमत असण्याचे काहीच कारण नाही. पण यशपाल ह्यांनी प्रश्न विचारण्याऐवजी जर उत्तर शोधण्याचा मार्ग सांगितला असता तर जास्त योग्य झाले असते. प्रा. नारळीकर ह्यांच्या संबंधात हा कार्यक्रम होता. म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोन, अंधश्रद्धा ह्या गोष्टींचा ऊहापोह होणेही गैर नव्हते. अशा प्रकारचे मत प्रदर्शन करणाऱ्या विचारवंतांमध्ये असा दृढ समज दिसून येतो की, विज्ञानाचा अभ्यास किंवा विज्ञानाच्या अभ्यासाकरिता ईश्वर, देव, अध्यात्म इत्यादी संकल्पनांचा प्रभाव किंवा त्यावरील विश्वास हा संशोधन किंवा विज्ञान प्रक्रियेच्या आड येतो, त्याला विज्ञानाने लावलेला हातभार ह्याचा दाखला याकरता खूप वेळा दिला जातो. दुर्दैवाने अगदी पाश्चात्त्य देशांचा धरला तरी विज्ञानाच्या इतिहासाचे अज्ञानच ह्यातून प्रकट होते. पाश्चात्त्य जगतात १६ व्या शतकानंतर झालेले प्रबोधन त्यामुळे झालेली औद्योगिकक्रांती आणि ख्रिस्ती धर्माच्या मूलभूत

संकल्पनांवरती ह्या विज्ञान प्रगतीने आघात केल्यामुळे एकतर ख्रिश्चन धर्मसंकल्पना मान्य होऊ शकतील किंवा विज्ञानाचे निष्कर्ष मान्य होऊ शकतील अशी परिस्थिती त्यामुळे पाश्चात्त्य जगात निर्माण झाली. वास्तवात विज्ञानाच्या प्रगतीला हातभार लावलेले १६ व्या–१७ व्या शतकातील न्यूटन, प्रिसलेपासून ते २० व्या शतकातील जॉन्सन पर्यंत बहुतांशी वैज्ञानिक हे ख्रिस्ती धर्मातील 'ईश्वर' संकल्पना मानणारे होते. त्यांच्या वैज्ञानिक शोधांमध्ये ह्यामुळे कुठल्याही प्रकारची बाधा आली नाही. आजही जगातील अनेक शास्त्रज्ञ हे ख्रिस्ती धर्म मानणारे आहेत. पाश्चात्त्य देशांमध्ये म्हणूनच 'अथिइझम' म्हणजे नास्तिकवाद ह्याची निर्मिती ही ह्या ख्रिस्ती धर्म आणि विज्ञान ह्या संघर्षातून झाली. थोडक्यात, ईश्वरावरील श्रद्धा किंवा अध्यात्मावरील विश्वास म्हणजे वैज्ञानिक दृष्टीपासून फारकत आणि निरीश्वरवाद, नास्तिकता किंवा जडवादाचा स्वीकार हे समीकरण तयार झाले. असा विचार नुसता हास्यापदच नाही तर अवैज्ञानिकही आहे. खूपवेळा बुवाबाजी तसेच तत्सम थोतांडांबद्दल खूप बोलले जाते. अशा बुवाबाजांचा सर्व शक्तीनिशी बिमोड व्हायला हवा ह्याबद्दल विरोध असण्याचे कारणच नाही. बहुतेक वेळेला बुवाबाजीला विरोध हे दाखवायचे कारण असते, परंतु प्रामुख्याने जडवाद किंवा नास्तिकतेचा छुपा प्रसार हेच त्याचे मूळ ध्येय असते. ह्याचे साधार विवेचन 'शोध अंधश्रद्धेचा' ह्या पुस्तकातील प्रस्तावनेत मी केला आहे. ती प्रस्तावना अभ्यासकांनी आवश्यक वाचावी.

प्रा. यशपालांपासून ते विज्ञाननिष्ठ नारळीकरांपर्यंत बहुतांशी मंडळींचा हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाशी, मूलभूत संकल्पनांशी फारसा संबंध आलेला दिसत नाही. हे धाडसाचे विधान मी एवढ्याचकरिता करतो आहे की, त्यांनी लिहिलेल्या साहित्यांमधून किंवा त्यांनी दिलेल्या भाषणांमधून ते कुठेही दृश्य होत नाही. हिंदू तत्त्वज्ञानाबद्दल आज इंग्रजीमध्येही मोठ्या प्रमाणावर साहित्य उपलब्ध आहे. म्हणजे संस्कृत भाषा ह्या करिता यायला लागते ही सबब फारशी 'वैज्ञानिक' ठरू शकणार नाही. १६ व्या शतकामध्ये औरंगजेबाचा भाऊ दाराशुके यानी उपनिषदांचे जुजवी भाषांतर अरेबी भाषेत केले जे पुढे पाश्चात्त्य देशात पोहोचले व त्याचे भाषांतर फ्रेंच, जर्मन इत्यादी भाषांमध्ये झाले.

१९ व्या शतकात डॉयसन यांनी महत्त्वाच्या उपनिषदांचे जर्मनमध्ये भाषांतर केले. पुढे त्यांचे इंग्रजी भाषांतर बाजारात आले. युरोपमध्ये अगदी प्रबोधनकाळापासून ते २० व्या शतकातील शास्त्रज्ञ श्री डिंगर यांच्या पर्यंत अनेक विचारवंत व वैज्ञानिकांना आपले सिद्धांत मांडतांना उपनिषदामधील विचारांचा आपल्या

चिंतनप्रक्रियेवर पडलेल्या प्रभावाचा उघडपणे उल्लेख केला आहे. दुर्दैवाने आपलाच हा चिंतन ठेवा आमच्या वैज्ञानिकांना वाचावासा वाटत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे विज्ञान म्हणजेच जडवाद, नास्तीकता हा समज त्यांनी करून घेतला आहे किंवा डाव्या सिद्धांतवादाने तो पसरवला आहे.

नास्तिकवाद किंवा जडवाद हा पाश्चात्यांना जरी नवीन असला तरी भारतीयांना तो नवीन नाही. 'चार्वाक मत' हे हिंदूंच्या दर्शनापैकी एक आहे. 'चार्वाक्‌वादी नास्तिक', जडवादी हिंदू असू शकतो. परंतु ख्रिस्ती, इस्लामी किंवा ज्यू पथांमध्ये नास्तिकाला अस्तित्व नाही. सांख्य आणि योग ही हिंदू तत्त्वज्ञानाची दोन महत्त्वाची दर्शने आहेत. सांख्यांना आपल्या तत्त्वज्ञानाच्या संकल्पनेच्या विस्ताराकरिता ईश्वर ह्या संकल्पनेची गरज भासत नाही, तर योगाकरिता ईश्वराचे अधिष्ठान महत्त्वाचे असते. हीच गोष्ट पुढील दर्शनांच्या बाबतीतही लागू होते. 'छांदोग्य' उपनिषदामधील प्रजापती, इंद्र आणि विरोचन ह्यांची कथा प्रा. यशपाल व श्री. नारळीकरांनी अवश्य वाचावी.

प्रा. यशपालांनी वैज्ञानिकांकडून अपेक्षित असलेल्या निर्भीड मतप्रदर्शनाबद्दल बोलायचे झाले तर तो उपदेश चांगलाच आहे. पाश्चात्त्य विज्ञानाशी फारसा संबंध नसणारे समाजसेवक अण्णा हजारे कुणाच्याही हातचे बाहुले न होता थोडातरी निर्भीडपणा दाखवू शकतात.

प्रा. यशपाल किंवा नारळीकरांसारख्या वैज्ञानिकांकडून अमेरिका-इराकयुद्ध, महिलांवरील अत्याचार, गरिबी यां सारख्या चोथा झालेल्या विषयांपेक्षा विज्ञानानेच उभ्या केलेल्या अनेक सामाजिक, सांस्कृतिक समस्यांवर सडेतोड विचार मांडणे आवश्यक होते. महिलांवरील अत्याचाराला धर्मापेक्षा जडवाद जास्त कारणीभूत आहे. लिंग तपासणी आणि गर्भपात वैज्ञानिक मदतीने होतो. कायदे करून असे सामाजिक प्रश्न सुटत नसतात. समाज-मनाची जडणघडण ही सामान्यांचे विश्वास, श्रद्धा समजून घेऊन त्यांचा आदर करूनच समजू शकते. जीवनातील कुठलीच घटना गणिती सूत्राने होत नाही किंवा अनेक सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्न तर्काच्या कसोटीवर सुटत नसतात. हिंदूंचे धर्मशास्त्र हे समाज-मनाला, तसेच व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमता, कमतरता, भेद इत्यादी वास्तवांचा स्वीकार करून निर्माण केलेली रचना आहे. नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक वास्तव विषमतेचा तिने स्वीकार केला आहे. 'अवास्तव' समानतेचा त्याने कधीच अट्टाहास धरलेला

नाही. कुठलीही रचना ‘बहुजन हिताय किंवा बहुजन सुखाय’ होऊ शकते. सर्व हिताय सर्वसुखाय होऊ शकत नाही. प्रा. यशपाल आणि नारळीकर ह्यांना ज्या दिवशी हे वास्तव उमजेल तेव्हाच ‘‘वैज्ञानिक अंधश्रद्धा’’ दूर व्हायला लागेल. धर्म आणि विज्ञान यांचे अतूट नाते उलगडेल आणि कदाचित भारतही पुन्हा एकदा प्रगत राष्ट्र बनेल.

✧✧✧

# हिंदू धर्म की रिलिजन?

{ ऑक्टोबर २००३ }

प्रत्येक शब्दाला आपला एक अर्थ असतो. बहुतांशी हा अर्थ त्याला संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर मिळतो. शब्दांना अर्थ कसे प्राप्त होतात याचे एक शास्त्र आहे. त्याला व्युत्पत्तिशास्त्र म्हणतात. अशा ग्रंथांना व्युत्पत्तिग्रंथ किंवा निरुक्तग्रंथ म्हणतात. सर्वसामान्य माणसं आपल्या शब्दांचे अर्थ शब्दकोशांमधून शोधतात. या शब्दांच्या माध्यमातूनच आपण आपले साहित्य निर्माण करतो. बोलण्याच्या सरावातून, जीवनाच्या अनुभवांतून आणि शिक्षणातून हे अर्थ आपल्याला एवढे अंगवळणी पडलेले असतात की, त्याकरता एखादे पुस्तक वाचताना वेगळे प्रयास करावे लागत नाहीत किंवा शब्दकोश घेऊन बसावे लागत नाही. भाषा जेवढी समृद्ध आणि प्राचीन तेवढे मानवी अनुभव व्यक्त करणारे शब्द त्यात अधिक. आता पुरुष हाच शब्द आपण घेऊ या. या शब्दाचा अर्थ फक्त एक विशिष्ट लिंगवाचक व्यक्ती एवढाच होईल. परंतु हीच लिंगवाचक व्यक्ती जेव्हा समाजात अनेक भूमिकांतून वावरू लागते तेव्हा त्या त्या भूमिकेचा अर्थ समजावणारा एक शब्द निर्माण होतो. भाऊ, दीर, पिता, मित्र, वडील, पती इ. अनेक शब्द त्या पुरुषांच्या भूमिकांचे अर्थ सांगत असतात.

तत्त्वज्ञान आणि विज्ञानामध्ये जेव्हा काही विशिष्ट शब्द वापरले जातात तेव्हा त्यांचेही काही संदर्भ असतात, परंपरा असतात. शब्दांचे अचूक अर्थच वाचकांसमोर यावे लागतात कारण विज्ञान आणि तत्त्वज्ञानामध्ये थोडीही अर्थाची कसूर होऊन चालत नाही. असे अर्थवाहक शब्द जेव्हा दुसऱ्या भाषेमध्ये भाषांतरीत करावे लागतात तेव्हा मोठी अडचण निर्माण होते. खूप वेळा एका परंपरेमध्ये जेव्हा मोठ्या काळाचे अंतर पडलेले असते तेव्हा त्या परंपरेमध्ये सुद्धा अशा शब्दांचा अर्थ अनेक

वेळा वेगवेगळ्या संदर्भाने व्यक्त झालेला दिसतो. वेदांचे अर्थ आज आपल्याला समाधानकारक लागत नाहीत किंवा अनेक अभ्यासक वेगवेगळा अर्थ लिहितात हे याच कारणामुळे. सिंधू संस्कृतीतील काही शिक्के आपल्याला मिळाले आहेत. ते शिक्के म्हणजे शब्द आहेत, लिपिचा एक भाग आहेत हे गृहीत धरून प्रत्येक अभ्यासक आपला अर्थ सांगत आहे. कारण अचूक अर्थ देतील असे प्रमाण कुठेच मिळालेले नाही किंवा हे शिक्के म्हणजे लिपी नाही असेही असू शकते.

भाषा हे एक संवादाचे माध्यम आहे. भाषेला जेव्हा लिपी मिळते तेव्हा ते लिखित स्वरूपामध्ये व्यक्त होते आणि असे साहित्य अनेक पिढ्या पुढे सरकते. भाषेला शाश्वत आणि चिरकाल स्वरूप येणे आवश्यक असेल तर त्याचे उच्चारण, शब्दातून होणारे प्रकटीकरण याकरिता काहीतरी नियम असणे आवश्यक असते. या नियमांना आपण व्याकरण म्हणतो. जगामध्ये अशा फार थोड्या भाषा आहेत की, ज्यांच्यामध्ये लिहिलेले साहित्य आज फारसा वादाचा मुद्दा न होता वाचकाला हजारो वर्षे समजू शकते. संस्कृत ही त्यातलीच एक भाषा आहे.

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्त्यांचा संस्कृतशी जेव्हा संबंध आला तेव्हा त्यातूनच तौलनिक भाषाशास्त्र निर्माण झाले. याच काळात संस्कृतचा आणि त्यामधील लिहिलेल्या साहित्याच्या माध्यमातून पाश्चिमात्यांना भारतीय संस्कृतीची आणि जीवनशैलीची ओळख व्हायला लागली. ही ओळख करून घ्यायची म्हणजे एकतर संस्कृत भाषा शिकायला हवी, तसेच त्यामधील साहित्याचे युरोपमधील भाषांमध्ये भाषांतर व्हायला हवे. साहजिकच या दोन्हीही गोष्टींना सुरुवात याच काळात झाली. युरोपमध्ये याचवेळी काही महत्त्वाच्या चळवळींचा उगम झाला होता, की ज्यामुळे संपूर्ण युरोपियन संस्कृती एका संक्रमण अवस्थेत होती. आपल्या मूळ संस्कृतीच्या शोधात युरोप होता. युरोपचा मुख्य उपासनापंथ म्हणजे ख्रिस्तीपंथ. समाज, संस्कृती, साहित्य, विज्ञान या सगळ्याच घटकांवर ख्रिस्ती उपासनापंथाचा प्रभाव होता. १६ व्या शतकामध्ये रोमन चर्च परंपरेमध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार आणि अनीतीच्या विरुद्ध 'प्रोटेस्टंट' हा एका नवीन सुधारणावादी ख्रिस्तीपंथाचा, तसेच १७ व्या आणि १८ व्या शतकामध्ये प्रबोधन चळवळीचा युरोपमध्ये उगम झाला. याच काळामध्ये औद्योगिक क्रांतीलाही सुरुवात झाली होती. भारतासारख्या नवीन ज्ञात झालेल्या संस्कृतीचा जो युरोपियन मंडळींचा अभ्यास सुरू झाला त्याला ही पार्श्वभूमी होती. साहजिकच प्रत्येक नवीन गोष्टींची तुलना ही ख्रिस्तीपरंपरा आणि साहित्यातील संकल्पनांशी ताडून होऊ लागली. याला कळत नकळत

सांस्कृतिक आणि वांशिक श्रेष्ठत्वाची जोड मिळाली. भारतीय संकल्पना आणि संस्कृतिचा अभ्यास आणि भाषांतर करणाऱ्या अभ्यासकाची ही पार्श्वभूमी होती हे लक्षात घेणे म्हणूनच अतिशय महत्त्वाचे ठरते. इथेच शब्द, भाषा आणि भाषांतर यांचा महत्त्वाचा संबंध येतो. कारण काही संकल्पना या उपलब्ध शब्दांच्या माध्यमातून भाषांतरीत होऊ शकत नाहीत. साहजिकच भाषांतरकार स्वतःच्या संस्कृती आणि परंपरेमधील जवळचे शब्द अशा वेळी वापरतो. यामुळेच एखादी संकल्पना जेव्हा भाषांतरीत होते तेव्हा त्या भाषांतरीत शब्दांमागील असलेली सांस्कृतिक परंपरा त्या शब्दावर साहजिकच लादली जाते.

आपण 'धर्म' या शब्दाचे एकच उदाहरण घेऊ या.

भारतीयांच्या 'धर्म' संकल्पनेमध्ये त्याच्या 'उपासना' पद्धती बरोबर सर्वच सामाजिक आणि सांस्कृतिक धारणांचा समावेश होतो. यामध्ये नीती-अनीतीपासून वैयक्तिक व सामूहिक कर्तव्यांपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. ही एक सर्वसमावेशक संकल्पना आहे. दोन भिन्न उपासना पद्धती, तत्त्वज्ञानाच्या शाखा, भिन्न सांस्कृतिक चालीरिती, रूढी, परंपरा, विश्वास या सगळ्यांचाच त्यामध्ये अंतर्भाव होतो. यामध्ये वाद होते, मतभिन्नता होती, तरीही ते एकमेकांना पोषक, व्यापक आणि जीवनाला सुसंगत होते. मूलभूत चिंतनामध्ये माझी भूमिकाच तेवढी सत्य आणि बाकी सर्व भ्रष्ट अशी भूमिका नव्हती. उलट 'अंतिम सत्य' कळले आहे का? याला उत्तर 'नेतिनेती' असेच होते. अशी ही सर्व समावेशक, अनेक शतकांमधील सांस्कृतिक, सामाजिक स्थित्यंतरांना छेदून जाणारी संकल्पना जेव्हा 'रिलिजन' (religion) या शब्दामध्ये भाषांतरीत होते त्यावेळी साहजिकच 'रिलिजन' या शब्दाचा अर्थ आणि इतिहास 'धर्म' या संकल्पनेवर रोपण होतो. दुर्दैवाने 'रिलिजन' ही संकल्पना सर्वतः 'धर्म' या संकल्पनेच्या बऱ्याच अंशी विरुद्ध अर्थ वाहणारी होती आणि म्हणूनच 'रिलिजन' या शब्दाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या सांस्कृतिक, बौद्धिक घटनांचा इतिहास आणि क्रम बघणे आवश्क ठरते.

ख्रिस्तीधर्माचा प्रेषित जरी जेरुसलाम आणि जवळच्या परिसरांतील असला तरी ख्रिस्तीधर्माचा प्रसार आणि प्रचार हा रोमन संस्कृती आणि साम्राज्यातून झाला. रिलिजन हा शब्द मूळ लॅटीन धातू रिलिजिओ (religio) मधून तयार झाला आणि म्हणूनच याच्या अर्थाकरता ख्रिस्तपूर्व रोमन संस्कृती आणि उपासनापद्धती समजावून घ्यावी लागते. ख्रिस्तपूर्व रोममध्ये 'पॅगनपंथ' आणि धर्म अस्तित्वात होता. 'पॅगन' संस्कृतीमध्ये रिलिजिओचा अर्थ आपल्या पूर्वजांचे स्मरण करणे व त्याकरिता

कराव्या लागणाऱ्या पूजा-अर्चा पद्धती एवढ्यापुरताच मर्यादित होता. या 'पॅगन' संदर्भात या पूजापद्धती खऱ्या आहेत का भ्रष्ट आहेत हा मुद्दाच नव्हता. अनेक पॅगन समूह आपापल्या पूर्वजांचे स्मरण आणि पूजा-अर्चा करीत. यामध्ये एका पॅगन समूहाचे पूर्वज दुसऱ्या पॅगन समूहापेक्षा भिन्न असायचे. या 'रोमन' पॅगन समूहामध्ये म्हणूनच विलक्षण सहिष्णुता होती आणि एकमेकांबद्दल आदर होता. रोमन साम्राज्यामध्ये ख्रिस्ती पंथाचा जेव्हा उदय झाला तेव्हा ती साहजिकच एक नवीन उपासना पद्धती होती. त्याची ख्रिस्ती अशी परंपरा नव्हती, त्यांचे पूर्वज ख्रिस्ती नव्हते. ख्रिस्ती पंथामधील एकेश्वर वाद आणि इतर उपासना पद्धतींबद्दल असलेली पराकोटीची असहिष्णुता जेवढी आज आहे तेवढीच त्याच्या बाल्यावस्थेतही दिसून येते. अभ्यासकांनी याकरता बायबल जरूर वाचावे.

'पॅगन' ही एक शतकानुशतके चालत आलेली परंपरा होती. नवीन ख्रिस्तीपंथाला ती नव्हती म्हणूनच ख्रिस्तीपंथांनी पॅगन लोकांचे पूर्वजांचे स्मरण आणि पूजा-अर्चा या नुसत्याच सर्वतः नाकारल्या असे नाही तर त्या भ्रष्ट आहेत म्हणून नष्टही केल्या. आपला देव तेवढा खरा आणि इतरांचे विश्वास आणि संकल्पना म्हणजे अंधश्रद्धा (superstition) हे ख्रिस्तीपंथाचे स्वरूपही अगदी त्याच्या सुरुवातीपासून दिसून येते. तत्कालीन रोमन साहित्यामध्ये ख्रिस्तीपंथीयांचा उल्लेख 'नास्तिक' असाही आढळतो. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे ख्रिस्तीपंथाच्या संकल्पनांना, विश्वासांना जो मान्यता देत नाही तो 'पॅगन' आणि ख्रिस्ती एकेश्वरवाद आणि त्याला अनुसरून इतर संकल्पना आणि विश्वास म्हणजेच खरी 'रिलिजन' हा विश्वास दृढ झाला. लॅकटॅनटिअस (Lactantius) या ३ ऱ्या शतकातील ख्रिस्तीपंथीयाच्या लिखाणामध्ये हे चांगल्याप्रकारे दिसून येते. ख्रिस्तीपंथाच्या उदयाआधी पॅगन रोमन संस्कृतीमधील अभ्यासक सिसेरो (Cicero) यांची रिलिजिओ (religio) ची दिलेली व्युत्पत्ती लॅकटॅनटिअसनी संपूर्णतः नाकारली आणि ख्रिस्ती पंथाच्या विश्वासांना सोयिस्कर अशी बनवली. तेव्हा रिलिजनचा अर्थ म्हणजे एकेश्वरवाद, बायबलवर विश्वास आणि या परिघाबाहेरील सर्व असत्य, भ्रष्ट आणि भोळसटपणाचे असा करण्यात आला. युरोपमधील ज्यू आणि इस्लामी पंथीयांशी झालेले वाद आणि युद्ध यांनाही हिच पार्श्वभूमी आहे. गेल्या १७००-१८०० वर्षांमध्ये ख्रिस्तीपंथाव्यतिरिक्त असलेल्या उपासनापद्धती आणि विश्वासांबद्दल ख्रिस्तीपंथीयांच्या भूमिकेमध्ये आजही काडीमात्र बदल झालेला नाही. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात 'व्हॅटिकन २' या ख्रिस्ती मार्गदर्शक लिखाणामध्ये इतर संस्कृत्यांबद्दल थोडी

सहिष्णुता प्रथमच दिसत असली तरी धर्मपरिवर्तन घडवून आणणे आणि ख्रिस्तीपंथ हा एकच 'शाश्वत' सत्यमार्ग हा आग्रह तसूभरही कमी झालेला नाही.

'रिलिजन' या शब्दाचा हा इतिहास बघितल्यावर 'धर्म' या संकल्पनेचे भाषांतर 'रिलिजन' असे करणे नुसतेच चुकीचे नाही तर किती अन्यायकारक आहे याची वाचकाला कल्पना येईल. गेल्या २०० वर्षांमध्ये या संकल्पनेला मूलभूत आणि संशोधनपूरक विरोध भारतामधल्या इंडॉलॉजिस्ट (Indologist) नी केलेला दिसत नाही. काही अपवाद वगळता जो थोडाफार विरोध करण्यात आला आहे तो जास्त भावनिक होता. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र प्राच्यविद्येच्या पाश्चात्त्य अभ्यासकांना याची जाणीव होऊ लागली आणि गेल्या ३०–४० वर्षांमध्ये या संदर्भात बरेच गंभीर लिखाणही करण्यात आले. 'हिंदू' हा धर्म आहे 'रिलिजन' नाही, ख्रिस्ती पंथ हा 'रिलिजन' आहे धर्म नाही हे बहुधा आपल्याला पाश्चात्त्यांकडूनच शिकायला लागेल अशी लक्षणे आज दिसत आहेत. 'सर्वधर्म समभाव' या संकल्पनेचा समाजकारणी, सिद्धांतवादी आणि राजकारण्यांनी लावलेला अर्थही भोळसट आणि दिशाभूल करणारा आहे हे तेव्हाच लक्षात येईल. आजची हिंदूंची परिस्थिती बघता हिंदूंनी 'धर्म' याच संकल्पनेला टिकून रहायचे की 'रिलिजन' ला अभिप्रेत असलेल्या संकल्पनेप्रमाणे कृती करायची हे ठरविण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे.

✧✧✧

# मानव अधिकार / मानवी प्रतिष्ठा : एक चिंतन

{ जानेवारी २००४ }

ब्रिटिश मेडिकल जर्नलच्या २० डिसेंबर २००३ च्या अंकातील 'डिग्निटी इज् ए युसलेस कॉन्सेप्ट' (Dignity is useless concept) ह्या शीर्षकाच्या संपादकीयामुळे वैचारिक जगतामध्ये खळबळ माजली. लेखामध्ये डिग्निटीची मूलभूत संकल्पना आणि वैद्यकीय नीतीशास्त्राबरोबर त्याच्या जोडलेल्या संबंधाबद्दल प्रश्न उपस्थित केला गेला आहे. 'डिग्निटी' म्हणजे प्रतिष्ठा, सन्मान, अधिकार ह्या सर्व संकल्पनांचा विचार करताना पाश्चात्त्य जीवनशैली, तत्त्वज्ञान आणि संस्कृतीची माहिती असणे आवश्यक आहे. 'ह्युमन डिग्निटी' म्हणजे मानवी प्रतिष्ठा सन्मान हा 'मानव अधिकार' संकल्पनेचा अंगीभूत भाग आहे.

१९४८ साली जिनिव्हा येथे राष्ट्रकुल (United Nations) परिषदेमध्ये मानवी अधिकाराच्या मसुद्यामध्ये मानवी प्रतिष्ठा / सन्मानाचा प्रथम उल्लेख केला गेला. ह्यानंतरच्या सर्व मानवी अधिकार व तत्सम मसुद्यांमध्ये 'ह्युमन डिग्निटी' हा शब्द परवलीसारखा वापरला गेला. खरं म्हणजे ह्यामध्ये आक्षेपार्ह असण्यासारखं काहीच नाही. परंतु अशा संकल्पना जेव्हा एखाद्या गणिती, वकिली किंवा शुद्ध तांत्रिक अर्थांनी वापरल्या जाऊ लागतात तेव्हा मागील व्यापक अर्थ आणि संकल्पना नाहीशी होऊ लागते. ह्या संकल्पना म्हणजे एक सांस्कृतिक रचना असतात, त्या वस्तू नसतात. वस्तूची लांबी, रुंदी मोजता येते. 'संकल्पने'चे तसे करता येत नाही. शिवाय संकल्पनांना जीवनशैली आणि संस्कृतीचा एक संदर्भ असतो. त्याचे कितीही सार्वत्रिकीकरण (युनिव्हर्सल) करू म्हटले तरी करता येत नाही. म्हणूनच मानव अधिकार आणि त्याचा भाग असलेली मानवी प्रतिष्ठा ह्यांचा पुनर्विचार करण्याची वेळ पाश्चात्त्य विचारवंतांवर आज येऊन ठेपली आहे.

पाश्चात्त्यांचं अंधानुकरण करणाऱ्या भारतीय विचारवंतांनीही ह्या मानवी अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेचा आपल्या प्रत्येक मसुद्यात पुरस्कार करण्यास सुरुवात केली. ह्यामध्ये पाश्चात्त्यांच्या मानवी अधिकार आणि प्रतिष्ठेला अभिप्रेत असलेली पाश्चात्त्य जीवनशैली, संस्कृती आणि धर्मविचारांची बैठक हे भारतीय विचारवंत समजू शकले नाहीत. मानवी अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेला भारतीय संस्कृती आणि धर्मसंकल्पनेत दिलेले महत्त्व ह्यांच्या गावीही नव्हते. मानवी अधिकार आणि प्रतिष्ठा ह्या मुळी एक सांस्कृतिक संकल्पना आहेत ह्याचेही भान ह्यांना नव्हते. साम्य-समाजवादाच्या सिद्धांतामध्ये संस्कृती भंजनाला महत्त्वाचे स्थान आहे. साहजिक पुरोगामित्वाचा टेंभा मिरवणाऱ्या विचारवंतांना आपल्या नाटक, काव्य, साहित्य ह्या सर्व माध्यमांतून सांस्कृतिक भंजनच करायचे होते. रूढी आणि परंपरा ह्या मुळी वाईटच असतात अशा समजुतीमुळे त्या मोडणे हाच मुळी प्रगतिशील पुरोगामित्वाचा (?) भाग होऊन बसला. अशा सवंग संकल्पनांच्या उसनवारीमुळे भारतीयांना ना त्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञान धार्मिक संकल्पनांच्या मागील विचारांची पार्श्वभूमी कळली किंवा ना ह्या संकल्पनांमागील भारतीय संस्कृतीची, भारतीयत्वाची आणि त्यावर आधारित धार्मिक, सांस्कृतिक चालीरितींची भूमिका समजली.

पाश्चात्त्य विचारवंतांची एक गोष्ट चांगली आहे की, एखाद्या संकल्पनेमुळे त्यांची जेव्हा दमछाक होऊ लागते तेव्हा त्याचा ते पुनर्विचार करू लागतात. अमेरिकन संस्कृती ही अनेकांच्या दृष्टीने विकास आणि प्रगतीचं मापदंड होऊन बसली आहे. साहजिकच अमेरिकन अर्थव्यवस्थेचा गाभा असलेली भांडवलशाही, लोकशाही, स्वातंत्र्य या संकल्पनांची उसनवारी करण्याची चढाओढच चालू झाली. ह्याची एक फार मोठी सामाजिक किंमत अमेरिकन समाजाला द्यावी लागत होती हे मात्र सोयीस्कररीत्या दुर्लक्षिले गेले. एकंदरीतच अमेरिकन जीवनात बोकाळलेला लैंगिक आणि सांस्कृतिक स्वैराचार आज अमेरिकन विचारवंत, समाजशास्त्रज्ञ आणि राजकारणी ह्या सर्वांनाच आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांचा पुनर्विचार करायला लावत आहे.

अमेरिकेतील शिक्षणक्षेत्र, सरकारी धोरण, परराष्ट्र धोरण ह्या सर्वांमध्येच आता राष्ट्रवादाचा अंतर्भाव होऊ लागला आहे. ज्या पराकोटीच्या स्वातंत्र्याबद्दल अमेरिका एककाळ प्रसिद्ध होती त्याच अमेरिकेमध्ये आज संशोधक, व्यापारी, प्रवासी ह्या सर्वांवरच निर्बंध येऊ लागले आहेत. अनियंत्रित स्वातंत्र्य हेच मुळी खऱ्या स्वातंत्र्य संकल्पनेवर आघात करते हे आता त्यांना उमगू लागले आहे.

मानवी अधिकार, मानवी प्रतिष्ठा ह्या संकल्पना कितीही चांगल्या असल्या तरी जेव्हा त्यांचा संदर्भ सोडून वापर केला जातो तेव्हा त्या मानवी प्रगतीला पूरक ठरायच्या ऐवजी मारक ठरू लागतात. पर्यावरण वाद आणि पाश्चात्त्य स्त्री-मुक्तीच्या संकल्पना ह्यांनी गाठलेला अतिरेक, पाश्चात्त्य विचारवंतांच्याही आज नक्कीच लक्षात येऊ लागला आहे; उसनवारीवर जगणाऱ्या भारतीय विचारवंतांच्या मात्र नाही!

जैवशास्त्रामध्ये आज मोठ्या प्रमाणावर प्रगती होत आहे. जनुकांची रचना, जैवयांत्रिकी ह्या विज्ञानाच्या शाखांनी आज प्रचंड प्रगती केली आहे. क्लोनिंग, स्टेमसेलस् इत्यादीमुळे अनेक नवीन सांस्कृतिक आणि नैतिक प्रश्न आज पाश्चात्त्यांसमोर उभे आहेत. ह्या प्रश्नांमागील संदर्भ हा ख्रिस्ती धर्माच्या मानवाच्या निर्मितीशी निगडित आहे आणि मानवी अधिकार आणि प्रतिष्ठेचा जेव्हा तेथे ऊहापोह केला जातो तेव्हा त्यामागे ह्या धार्मिक संकल्पना उभ्या असतात. भारतीय जीवनशैली आधि धर्मरचनेमध्ये त्याचा संदर्भ वेगळा आहे. सृष्टीची आणि मानवाची निर्मिती या संदर्भातील आपले आणि पाश्चात्त्य विचार भिन्न आहेत. समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी ह्यांनी ह्या पाश्चात्त्य संकल्पनांचा स्वीकार करण्याआधी त्यामागील भिन्न संदर्भांचा विचार करणे आवश्यक आहे. क्लोनिंग, स्टेमसेलस् किंवा तत्सम वैज्ञानिक शोधांचा व्यापारी गैरवापर थांबणे हे केव्हाही योग्यच आहे. पण मानवी अधिकार किंवा प्रतिष्ठेच्या पाश्चात्त्य संकल्पनांवर आधारित त्यांना विरोध करणं योग्य होणार नाही.

ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जैविक वैज्ञानिक प्रगतीमुळे निर्माण झालेले प्रश्न आणि ह्यांचा गुन्हेगारी संदर्भात कायदा आणि त्याला होणारी मदत ह्यावर एक चर्चासत्र हैदराबाद येथे आयोजित केले होते. भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम ह्यांनी त्याचे उद्घाटन केले. ह्यामध्ये अनेक वैज्ञानिक आणि विधितज्ज्ञांनी भाग घेतला होता.

कार्यक्रमाच्या शेवटी 'हैदराबाद जाहीरनामा' म्हणून एक मार्गदर्शक सूची संमत करण्यात आली. ह्यामध्येही साहजिकच 'ह्युमन डिग्निटी' म्हणजे मानवी प्रतिष्ठेचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

ब्रिटिश मेडिकल जर्नलमधील संपादकीय म्हणूनच महत्त्वाचे आहे. आजचे मानवी अधिकार किंवा प्रतिष्ठेच्या संदर्भातील कायदे ह्या जैविक प्रगतीच्या आड

येत असून त्याची घोषणाबाजी आता थांबवावी हे संपादकीयात सूचीत करण्यात आले आहे. ह्या संपादकीयाची लेखिका रुथ मॅक्लीन ह्या स्वतः वैद्यकनीतिशास्त्राच्या (मेडिकल इथिक्स) प्राध्यापिका आहेत. त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे –

Why then, do so many articles and reports appealed to human dignity as it means something over and above respect for persons for for their Autonomy? A possible explanation is the many religious sources that refer to human dignity, especially but not exclusively in Roman Catholic writings. However, this religious source cannot explain how & why dignity has crept into the secular literature in medical ethics. Nor can the prominence of the concept in human rights documents. Since only a small portion of the literature in medical ethics addresses the links between health and human rights.

Although the actiology may remain a mystery, the diagnosis is clear. Dignity is a useles concept in medical ethics and can be eliminated without any loss of content.

पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये ‘मानवी अधिकार आणि मानवी प्रतिष्ठे’ संदर्भात होणाऱ्या ह्या बदलांची ओळख तरी भारतीय विचारवंतांनी करून घेणे आवश्यक आहे. भारतीय परंपरा आणि संस्कृतीमध्ये मानवी अधिकार आणि प्रतिष्ठेला जे महत्त्व दिलेले आहे, ते तारतम्य, विवेकी आणि पक्व विचारांचा परिपाक आहे. मनुस्मृतीमध्ये ब्राह्मणाला जी शिक्षा दिली आहे ती देहदंड नसून त्याला प्रतिष्ठाहीन आणि अधिकारहीन केले आहे. जिवंतपणी प्रतिष्ठा हरविणे आणि ह्यामुळे मानसिक यातना होणे हा फक्त एका संवदेनशील विकसित संस्कृतीचा भाग होऊ शकतो. पण पाश्चात्त्य संकल्पनांची उसनवारी करणाऱ्या भारतीय विचारवंतांना हे कोण समजावून सांगणार?

✧✧✧

# पेराल तसे उगवेल !

{ एप्रिल २००४ }

'पेराल तसे उगवेल' ही म्हण एक साधं, नैसर्गिक सत्य सांगून जाते. सर्व म्हणीच तशा आशयगर्भ असतात. ते अनुभवाचेच बोल असतात. तुम्ही जमिनीत काही पेरलंच नाही, तर जमिनीतून उगवणार तरी कसे? वरील म्हणीमध्ये मात्र पेरण्याबरोबर उगवण्याचा संबंध जरी लावला असला तरी त्याही पलीकडचा अनुभव ही म्हण सांगून जाते. म्हणजे तुम्ही काय पेराल, त्यावर काय उगवणार हे अवलंबून आहे. तुम्ही भात पेरलात तर गहू उगवणार नाही.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना या म्हणीमागील महत्त्वाचे सूत्रही लक्षात येईल. ते म्हणजे हिंदू तत्त्वज्ञानातील कर्मसिद्धांत. हेच सांगणारी आणखी एक म्हण म्हणजे, 'करावे तसे भरावे'. कर्मसिद्धांत हे एक कठीण पण शाश्वत, वैश्विक सत्य आहे. सर्वसामान्य माणसाला नुसता तर्कवाद किंवा बुद्धिवादावर या सिद्धांताचे आकलन होणे कठीण आहे. कारण कर्मसिद्धांत आला की पुनर्जन्म पण आला. या म्हणीमध्ये चांगले आणि वाईट हा शब्दप्रयोग कुठेच नाही. परंतु सवय आणि शिक्षण यांच्या प्रभावामुळे साहजिकच चांगलं पेरलं तर चांगलं उगवेल आणि वाईट पेरलंत तर वाईट उगवेल, असाच अर्थ अपेक्षित असतो. 'चांगले पेराल तर चांगलं भोगाल' अशी म्हण नाही. 'करावे तसे भरावे' म्हणजे चांगले कराल तर चांगले भोगाल, वाईट कराल तर वाईट भोगाल. या दोन्ही म्हणीत 'तसे' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. अर्थात कुठल्याच गोष्टीचा कीस न पाडता या म्हणी सांगायचा तो अर्थ सहज सांगून जातात. हीच तर या म्हणींची खासियत आहे. पण भारतीय किंवा हिंदू समाज मात्र या म्हणींचा खरा अर्थ समजून घ्यायला तयार नाही. त्याला काहीही न पेरता जसे उगवायला हवे, तसेच तांदूळ पेरल्यावर गहूही उगवायला हवा!

नुकत्याच एका वृत्तपत्रात आलेल्या बातमीचा आपण विचार करू. (गोळीबार ते हनीमून... गुरुवार, १८ मार्च, २००४ लोकसत्ता). सांगली येथील एका तरुणाने आपल्या प्रेमाला प्रतिसाद देत नाही महणून आधी प्रेयसीवर गोळी झाडली आणि नंतर आपल्यावरही गोळी झाडून घेतली. सुदैवाने दोघेही बचावले. नेहमीप्रमाणेच मुलीचे मानवी अधिकार वगैरे वगैरेच्या संरक्षणाकरिता अनेक सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला. स्त्री किती असुरक्षित आहे, पुरुषी अहंकार, सामाजिक असुरक्षितता इत्यादी अनेक गोष्टींवर चऱ्हाटे झाली. दोघेही बहुधा वरच्या वर्णाचे असल्यामुळे जातीयवादाचा हुकमी एक्का मात्र या सामाजिक संस्थांना वापरता आला नाही. या सर्वांवरती कळस, शेवटी या युवतीनेच केला. तिने चक्क त्या युवकाशी विवाह केला. सामाजिक संस्था, पोलीस आणि या बातम्या रंगवून छापणारी वृत्तपत्रे सर्वच तोंडघशी पडले. खरं म्हणजे सामाजिक समस्या सोडविण्याऐवजी या सर्वच संस्था समस्यांचा गुंताच वाढवित आहेत. शिवाय सर्वच सामाजिक समस्यांचे मूळ 'मनुवाद' असल्याची पक्की धारणा या संस्थांनी करून घेतल्यामुळे 'आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी' अशीच या समस्यांची परिस्थिती झाली आहे. अर्थात अशा समस्या सोडविण्याचा आभास निर्माण केल्यामुळे पाश्चात्त्य संस्थांकडून यांना पैसा मात्र खूप मिळू शकतो. याच वृत्तपत्राच्या बातमीमध्ये अशाच अनेक प्रेमकथांची जंत्री दिली आहे.

प्रश्न साधा आहे. तुम्ही 'पेराल तेच उगवेल' आधी सर्व सामाजिक संस्था नष्ट करायच्या, व्यक्तीला पराकोटीचे आत्मकेंदी आणि स्वार्थी बनवायचे, सवै सिनेमावाहिन्यांवरील धारावाहिक, वृत्तपत्रांमधील रकाने यातून दिसणारी भयावह गुन्हेगारी, शृंगाराच्या नावाखाली स्त्रीचे वस्त्रहरण आणि तेवढीच भयावह नाच-गाण्यांची रेलचेल, सामाजिक न्यायाच्या नावाखाली गुन्हेगारी, विवाहबाह्य संबंध यांचे समर्थन, राष्ट्रीय सणासारखा 'व्हॅलेन्टाईन डे' सारखा तद्दन व्यापारी भूमिकेतून आणलेला दिवस महोत्सवी स्वरूपात साजरा करणे, या सर्व गोष्टी आपण पेरल्यावर काय उगवावे अशी आपली इच्छा आहे? अशा कथा, नाटके, सिनेमा, कादंबऱ्या, लिहिणाऱ्या महाभागांना त्यांच्या महान कलेकरिता राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर पुरस्कारांची बरसात केली जाते.

आजच्या गुन्हेगारीचे खरे जनक हे बेगडे समाजसुधारकच आहेत. नवीन समाज निर्मिती किंवा मनुसंहिता लिहिण्याचीच त्यांची कुवत नाही. मानवाच्या चांगल्या आणि वाईट क्षमतांची यांना कल्पना नाही. समानतेची झिंग आलेल्या या बकवास समाजसंस्थांना स्त्री आणि पुरुषांमधील फरक तर सोडूनच द्या; परंतु त्यांच्या सामाजिक भूमिकांचीही समज नाही.

रक्षाबंधन, दिवाळीतील पाडवा, दसऱ्याचे सोने लुटणे, सर्वच परंपरा म्हणा किंवा सण म्हणा, स्त्री-पुरुषांच्या वेगवेगळ्या भूमिका आणि एकंदर समाजामध्ये प्रेम निर्माण करण्याचेच निरनिराळे मार्ग आहेत. सणामागच्या भूमिका, त्याचे अगदी देशी आणि सांस्कृतिक असलेले स्वरूप समजावून सांगणे हीच खरी समाजसुधारणा. ज्या कुठल्या धर्ममार्तंडांना असे सण, दिवस निर्माण करावेसे वाटले ते एका व्यापक गुंतागुंतीच्या मानवी स्वभावाचे आकलन झाल्यावरच आहे. ती कुठल्याही एका व्यापारी संस्थेकरिता निर्माण केली गेलेली व्यवस्था नाही. जाहिराती देऊन हे सण साजरे करावे लागत नाहीत. अगदी हळुवारपणे, स्वेच्छेने आपल्या जबाबदारीची जाणीव या सणांतून दिली जाते. ही एक नकळत चांगल्या संस्कारांची पेरणी असते. यातून जे बंध निर्माण होतात, सामाजिक जबाबदाऱ्या आणि जाणिवा तयार होतात, त्या कुठल्याच कायद्याचे भाग नसतात. त्याकरिता कुठलीच पोलीस यंत्रणा राबवावी लागत नाही. या सणांचे मांगल्य-पावित्र्य नुसतं जपले किंवा सन्मानाने हे सण साजरे केले तरी पुरते. पण ज्या समाजामध्ये शिमगा, धुळवड, व्हॅलेन्टाईन डे सारखे सण राष्ट्रीय नेत्यांपासून कलाकारांपर्यंत जाहिराती देऊन साजरे करताना दिसतात तेव्हा त्या समाजाची कीव करावीशी वाटते. अमिताभ बच्चन किंवा आपले पंतप्रधान आपल्या बहिणीला राखी बांधताहेत असे दूरदर्शनवर दाखवणे, हे मागासलेपणाचे लक्षण झाले आहे.

कर्मसिद्धांत किंवा पुनर्जन्म कळणं फार कठीण आहे. कारण या सिद्धांताची पार्श्वभूमी किंवा काळपटल फार मोठा असतो. काही सहस्रावधी वर्षांचा अनुभव यामध्ये संचित झालेला असतो. म्हणूनच या गोष्टी समजण्याकरिता बुद्धीपेक्षा प्रज्ञेची गरज जास्त असते. पण साध्यासुध्या म्हणी तरी माणसाला कळू शकतात की नाही? कारण त्या कळण्याकरिता मोठ्या काळाची गरज नसते. आपले सीमित आयुष्य आणि अनुभवांवरती त्याचा पडताळा घेता येतो.

या अनुभवांतून जो समाज शिकत नाही तो समाज नष्ट तरी होतो किंवा गुलाम म्हणून जगतो. आजच्या भारतीय समाजाची वाटचाल दुर्दैवाने याच दिशेने चालली आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक सर्वच क्षेत्रांवर तो नेतृत्वहीन झालेला आहे. तुम्ही जे पेरणार आहात तेच उगवणार आहे!

✧✧✧

# धर्म आणि निवडणुका

{ जुलै २००४ }

नुकत्याच झालेल्या निवडणुकीतील भाजपचा पराभव आणि काँग्रेसचा विजय ह्याची कारणमीमांसा सध्या चालू आहे. हा निकाल म्हणजे धर्मांधतेचा पराजय आणि धर्मनिरपेक्षितेचा विजय असा सूर डाव्या राजकीय पंडितांनी लावलाय. भारतीय लोकशाहीमध्ये विजय आणि पराजय का होतात ते सांगण्यासाठी मोठ्या विद्वानांची गरजच नाही. खरं म्हणजे एकंदरीतच आजचे लोकशाहीचे स्वरूप 'लोकशाही' बद्दल पुनर्विचार करायला लावणारे आहे. मतांच्या टक्केवारीचा जरी विचार केला नाही तरीही काँग्रेसला मिळालेली मतं ही धर्मसंकल्पनेबद्दल सांगोपांग विचार करून दिलेली मते होती असे सांगणे धाडसाचे होईल. मात्र प्रत्यक्षात हे प्रतिबिंब अशा विचारप्रक्रियेचे असेल तर ते स्वागतार्ह मानायला पाहिजे. दुर्दैवाने वस्तुस्थिती तशी नाही. सुमारे शंभर वर्ष रशिया आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये साम्यवादी सरकार होते. शंभर वर्ष हा कालावधी निधर्मतेचा फायदा समजण्याकरिता कमी नाही. परंतु साम्यवादाच्या पतनानंतर ह्या सर्वच देशांमध्ये उफाळून आलेला धर्मवाद स्तंभित करणारा आहे. इतिहासापासून धडा घ्यायचा नाही असे एकदा ठरविल्यावर सुसंगत आणि तार्किकविश्लेषणापेक्षा युक्ती आणि अज्ञानावर आधारित हवे ते निष्कर्ष काढण्यास आपण मोकळे असतो.

पाश्चात्त्य आणि पौर्वात्य धर्म संकल्पना ह्या भिन्न आहेत. पाश्चात्त्य धर्मसंकल्पनेमध्ये प्रेषित, धर्मग्रंथ आणि पूजा पद्धती केंद्रीय आहेत. तर पौर्वात्य धर्मसंकल्पनेमध्ये त्या परीघावर असून, केंद्रस्थानी परस्पर मानवी संबंधाला महत्त्व देणारी, नैसर्गिक प्रेरणांचा आदर करणारी आणि समाज आणि निसर्गातील असमानता मान्य करून संतुलन साधणारी विचारधारा आहे. प्रेषित, धर्मग्रंथ आणि पूजा पद्धती

हे ह्या संकल्पनेची महत्त्वाची अंगे नक्कीच आहेत, परंतु त्याच्या स्वीकार्यतेचे स्वातंत्र्य हे संपूर्णतः त्या व्यक्तीला देण्यात आले आहे. आणि म्हणूनच जेवढ्या व्यक्ती तेवढी दैवतं समाजामध्ये गुण्यागोविंदाने नांदत होती. भिन्नतेचा आदर होता आणि समानतेची बळजबरी नव्हती. व्यक्त-अव्यक्त, सगुण आणि निर्गुण, निराकार आणि साकार ह्या संकल्पनांच्या मुळाशी असलेले 'तत्त्वज्ञान' म्हणूनच फक्त पौर्वात्य धर्मसंकल्पनेमध्ये विकसित होऊ शकलं. दृष्टी पलीकडील सृष्टीच्या संकल्पनेचा तिथे विचार होऊ शकला. आणि ह्या सर्वांवर कळस करणारी अध्यात्माची संकल्पना तिथे विकसित झाली. ते साध्य करण्याचे मार्ग, व्यक्ती आणि समाजाला देण्यात आले. म्हणूनच ताज्या निवडणुकीचे निकाल म्हणजे धर्मसंकल्पनेचा पराजय ही वस्तुस्थिती नाही. तशी ती खरोखरच असेल तर ती शोकांतिकाच ठरेल. हा पराजय असलाच तर ते धर्मसंकल्पनेचा आणि धर्मभावनांचा राजकारण करणाऱ्या व्यक्ती आणि पक्षांचा आहे. काँग्रेस पेक्षाही धर्माचं राजकारण करणाऱ्या व्यक्ती आणि पक्षांनी आत्मपरीक्षण करण्याची आज जास्त गरज आहे. उक्तीप्रमाणे जो कृती करतो तो संत आणि महंत. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' असे म्हणूनच म्हटलं जातं. अंगाला भस्माचे पट्टे फासून डोमकावळे जेव्हा संत आणि महंत होतात तेव्हा 'धर्म' खरा धोक्यात येतो. आजच्या भारतीय समाजाला आणि धर्मसंकल्पनेला निधर्मापेक्षा ह्या अधर्माची जास्त भीती आहे.

✧✧✧

# न्यूटन, धर्म आणि अंधश्रद्धा

{ ऑक्टोबर २००४ }

सतराव्या शताकतील ब्रिटिश शास्त्रज्ञ न्यूटन ह्याने विज्ञानाला दिलेले योगदान निर्विवाद आहे. किंबहुना २० व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंतच्या पदार्थ विज्ञानाच्या प्रगतीला त्याने मांडलेले सिद्धांतच कारणीभूत आहेत. २० व्या शतकापर्यंत झालेल्या विज्ञानाच्या प्रगतीवर आणि विज्ञानाच्या परिभाषेवर न्यूटनच्या सिद्धांतांची छाप आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीला मॅक्स प्लॅकनी मांडलेला पुंज सिद्धांत आणि त्याच सुमाराला आइन्स्टाईनच्या सापेक्षितवादानी विज्ञान विश्वामध्ये एक नवीन क्रांती घडून आली. न्यूटन प्रणीत रूढ भौतिकीमुळे विश्वरचनेतील ज्या समस्यांना उत्तर मिळत नव्हते त्याची उकल भौतिकशास्त्रातील ह्या नव्या सिद्धांतामुळे शक्य झाली. भौतिकविज्ञानाला आलेली ही नवीन दृष्टी इतकी नवीन होती की, अणूच्या अंतरंगांतील उमजू लागलेल्या घटनांचे वर्णन करायला शास्त्रज्ञांकडे परिभाषा नव्हती. अनुभवाशिवाय भाषेतील शब्दांना अर्थ प्राप्त होत नाही आणि नवभौतिकीतील अनुभव व्यक्त करायला जेव्हा शब्द अपुरे पडू लागले तेव्हा वैज्ञानिक हे रूपकांचा आधार घेऊ लागले. जीवनातील अनेक अनुभव अशा रूपकांतून मांडण्याची पौर्वात्यांची पद्धत फार जुनी आहे. उपनिषदांमध्ये अशा रूपकांचा वापर केलेला दिसतो. उपनिषदांचा विषय हाही निसर्ग आणि मानवांची निर्मिती आणि परस्परांचा संबंध हाच आहे. कदाचित ह्यामुळेच नवभौतिकीच्या निर्मितीला कारणीभूत झालेले शास्त्रज्ञ नील्स बॉर (Niels Bohr). हायजेन्बर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger), जे. रॉबर्ट ऑपेन हायनर (J. Robert Oppenheimer) आणि डेव्हीड बॉम ह्या सर्वांना उपनिषद आणि भगवतगीतेमधील अनेक वर्णने ही नवभौतिकीतील अनुभवांच्या जवळची वाटली. ह्यातील अनेकांनी तर आपल्या

नवीन दृष्टीला उपनिषदांनी स्फूर्ती आणि ऊर्जा पुरविल्याचे नमूद करून ठेवले आहे.

येथे हे सांगण्याचे कारण असे की, वर उल्लेखलेले कोणीही शास्त्रज्ञ हिंदू नव्हते अथवा कुठल्याही धर्माचे प्रसारक नव्हते. विज्ञानातील अत्यंत कठीण समस्यांचा ऊहापोह करणारे ते विज्ञानाचे भाष्यकार होते. विज्ञानाची व्याख्या करून ते विज्ञान शोधत नव्हते तर त्यांची शोध प्रक्रिया आणि अनुभव विज्ञानाची व्याख्या होत होती. धर्मावर प्रामाणिक विश्वास ठेवणारा सुफां चांगला वैज्ञानिक होऊ शकतो किंवा भौतिकीत काम करणारा एखादा शास्त्रज्ञ चांगला धर्मचिंतक किंवा भाष्यकार होऊ शकतो. विज्ञानाच्या पातळीवर धर्म आणि धर्माच्या पातळीवर विज्ञान हे एकमेकांना कायम पूरकच असतात. किंबहुना सत्यशोधनामध्ये ह्या दोघांनाही आपल्या अनुभवांची देवाणघेवाण आणि उसनवारी करावी लागते.

२० व्या शतकातील विज्ञानात मूलभूत विचार मांडणाऱ्या जगदीशचंद्र बोसांपासून ते श्रीनिवास रामानुजांपर्यंत सर्वच शास्त्रज्ञ हे ह्याच पथडीतील होते. रामानुजम हे तर एक महान कोडेच समजावे लागेल. ते एक अद्वितीय गणिती होते. इंग्रजी भाषा फारशी येत नसल्यामुळे ते शालेय परीक्षेत अनेकदा नापास होत. तत्कालीन पाश्चात्त्य गणितशास्त्र पद्धती त्यांना जुजबीच ठाऊक होती. तरीही विलक्षण प्रतिभा आणि प्रज्ञेच्या जोरावर त्यांनी गणितामध्ये अनेक सिद्धांत मांडून ठेवले. महाविद्यालयीन पदवीचे ओझे वाहणाऱ्या गणितातील शास्त्रज्ञांना त्यातले काही सिद्धांत कळायला पन्नास वर्षांहून अधिक काळ घ्यावा लागला. गणित हा सर्वच विज्ञानाचा पाया समजला जातो. रामानुजम ह्यांनी एक मोठी अडचण निर्माण करून ठेवली आहे. रामानुजम हे पक्के देवीभक्त होते. आपल्या अनेक गणिती सिद्धांतांना ह्या देवीमुळे स्फूर्ती मिळाल्याचे त्यांनी सांगून ठेवले आहे. थोडक्यात, देवीवरील अगदी ठार अंधश्रद्धा सुद्धा त्यांच्या सृजनशीलतेच्या आड येऊ शकली नाही.

अशीच एक मोठी समस्या न्यूटननेही निर्माण करून ठेवली आहे. न्यूटनचे भौतिकेवरील लिखाण आज २०० वर्षे उपलब्ध आहे. भौतिकीशिवायही त्याने लिखाण केल्याचे अभ्यासकांना माहिती होते. परंतु संकलित रूपात ती हस्तलिखिते उपलब्ध नव्हती. आज काही हजारांनी त्यांची ही हस्तलिखिते अभ्यासकांना नुकतीच उपलब्ध करून देण्यात आली आहेत. (http://www.newtonproject.ic.ac.uk)

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ही हस्तलिखिते उपलब्ध झाल्यावर अभ्यासकांच्या लक्षात आले की, भौतिकी व्यतिरिक्त न्यूटनचे लिखाण हे त्याच्या भौतिकी

लिखाणापेक्षा जास्त आहे. ह्यातही पुढची धक्कादायक बाब अशी की, हे सर्व लिखाण बहुतांशी ख्रिस्तीधर्म आणि तत्त्वज्ञानाशी निगडित आहे. त्याच्या लिखाणातून स्पष्ट होते की, ख्रिस्ती पंथातील अँग्लीकन पंथाचा तो कट्टर पुरस्कर्ता होता. पोप बद्दल आणि एकंदरीत कॅथलीक पंथाबद्दलची त्याची मते धक्कादायक आणि आजही वाद निर्माण करू शकतील अशी आहेत. येशू क्रिस्त हा पुन्हा दुसऱ्यांदा अवतरणात आहे ह्यावर त्यांचा ठाम विश्वास होता. इलीफ (Iliffe). ह्या विज्ञान इतिहासाच्या अभ्यासकांनी ह्या संदर्भात नोंदवलेलं मत बोलकं आहे, (नेचर, १९ ऑगस्ट २००४, ८१९, न्यूज.)

"What he belived would have been hideous to virually everbody in Oxford and Cambridge for decades to come."

जी कथा न्यूटनची तीच तत्कालीन आणि आजच्याही अनेक वैज्ञानिकांची आहे. धर्मावरील विश्वास, श्रद्धा किंवा अंधश्रद्धासुद्धा कुठल्याही व्यक्तीच्या सृजनशीलतेच्या आड येतांना दिसत नाही.

पण ही गोष्ट वैज्ञानिक भाकड कथा लिहिणारे थोर वैज्ञानिक जयंत नारळीकर यांना कोण सांगणार? पुरुषार्थच्या सप्टेंबर-ऑक्टोबर २००३ च्या पू. स्वामी वरदानंद भारती विशेष अंकात 'विज्ञान आणि धर्म - एक संवाद' हा लेख डॉ. नारळीकर ह्यांनी लिहिला आहे. ह्या विषयावरील त्यांच्या आधीच्या लिखाणामध्ये आणि ह्या लेखामध्ये नवीन काहीच नाही. विज्ञान हे प्रयोगसिद्ध असते तर धर्म कोणीही सांगेल ते केवळ श्रद्धेपोटी निमूटपणे मान्य करतो. नारळीकरांनी उदाहरण गीतेतलंच दिलं आहे. ते म्हणतात, 'वस्तू पडल्यानंतर वेग वाढतो हा त्याचा सिद्धांत कुणाला मानावयाचा असेल तर तसा प्रयोग करूनच तो मानावा लागेल. कुणी सांगितला म्हणून मानायचा नसतो. पण धार्मिक अनुभवांची मात्र वेगळी गोष्ट आहे. जेव्हा कृष्णाने अर्जुनाला विश्वदर्शन घडवले तेव्हा तो अर्जुनास म्हणाला, ''हे कुरुवीर श्रेष्ठ! वेदांनी, यज्ञांनी, स्वाध्यायाने, दादानी, कर्मांनी किंवा उग्रतपाने माझे या प्रकारचे स्वरूप ह्या मनुष्यलोकी कुणास पाहावयास मिळणे शक्य नाही. ते फक्त तुलाच शक्य आहे.''

म्हणजे कृष्णाचे हे रूप पाहण्यास लायक फक्त अर्जुन ही एकमेव व्यक्ती! बाकी कुणीही नाही. असे विज्ञानात चालत नाही, चालणार नाही. विज्ञानात सिद्ध करून, तपासून खरेपणा स्वीकारला जातो आणि तो अधिकार कुणालाही असतो.

सत्याच्या आकलनाबाबतीत हा खरा फरक आहे, विज्ञान आणि धर्म ह्या

दोहोंमध्ये. वैज्ञानिक इंद्रियग्राह्य (वस्तुनिष्ठ) अनुभव आणि एखाद्या धार्मिक व्यक्तीचा अगदी व्यक्तीनिष्ठ अनुभव, ह्या दोन विरोधी टोकाच्या गोष्टी आहेत. वैज्ञानिकांना ह्या निवडक लोकांचे अनुभव स्वीकारण्यास पाचारण केलं जातं तेव्हा वाद निर्माण होतात. आपण जे अनुभवलेलं नाही ते वैज्ञानिक स्वीकारू शकत नाही. पण धर्मानुनयाच्या बाबतीत हे घडणं अशक्य. ते गुरूंचे सांगितलेलेच न अनुभवता, न पडताळून पाहता, खरं धरून चालतात. ह्या लोकांना वैज्ञानिक हे दुराग्रही व हट्टी वाटतात.''

खरा वैज्ञानिक आणि फक्त विज्ञानवादी या दोहोंमधला फरक रॉबर्ट ओपनहायनर आणि जयंत नारळीकर यांच्या भगवद्‌गीतेकडे बघण्याच्या दृष्टीकोनातून स्पष्ट दिसून येतो. सत्याच्या आकलनाबाबतीत धर्म आणि विज्ञानामध्ये काहीही फरक नाही.

सुदैवाने नवभौतिकी सर्व तथाकथित वस्तुनिष्ठ प्रायोगिक निरीक्षणांमध्ये व्यक्तीनिष्ठता नाकारत नाही. पुंजसिद्धांताने तर हे दाखवून दिलं आहे की, निरीक्षक व निरीक्षित विषय हे स्वतंत्र नसून ते एकमेकांशी निगडित आहेत. अर्थात वैज्ञानिकाला हे माहीत असतं. पण विज्ञानावर अंधश्रद्धा ठेवणाऱ्या विज्ञानवाद्याला मात्र त्याच्या कालबाह्य विज्ञानश्रद्धांमुळे त्याचे आकलन होणं शक्य नसतं.

नारळीकरांचे वरचे विचार वाचल्यावर धर्म आणि अंधश्रद्धेवर एवढे विपुल लिखाण करूनही नारळीकर अव्वल दर्जाचा शोध का लावू शकले नाहीत ह्या करता वेगळे संशोधन करण्याची जरूरी नाही. विज्ञानाप्रमाणेच मानव्यशास्त्रामध्ये काही मूलभूत सिद्धांत मांडणारे सर विलियम जोन्स आणि मॅक्सम्युलर हे सुद्धा येशू क्रिस्तावर आणि बायबलवरील कथांवर ठाम विश्वास ठेवणारे होते.

विज्ञान आणि धर्म ही प्रत्येक व्यक्तीमध्ये अस्तित्वात असलेली धारणा आहे. एकाचा अभ्यास करण्याकरिता दुसऱ्याचा संकोच करावा लागत नाही. निदान तसा 'वैज्ञानिक पुरावा' तरी नाही. न्यूटनची ही नवीन उपलब्ध झालेली हस्तलिखिते ह्यापेक्षा वेगळं काय सांगतात?

✧✧✧

# हिंदू धर्म

{ जानेवारी २००५ }

मानवाच्या निर्मितीचा इतिहास हा काही लक्षावधी वर्षांचा आहे. प्रत्यक्षात मानवाची आणि एकंदर सृष्टीची निर्मिती कशी झाली याची कुठलीही माहिती किंवा इतिहास आज उपलब्ध नाही. जो मानवाचा इतिहास आज आपल्याला उपलब्ध आहे असे आपण जे समजतो तो एकतर त्यानेच निर्माण केलेल्या पदार्थांचा साहित्याचा असतो. उत्खनन आणि तत्सम शास्त्रे ही मानवाने निर्माण केलेल्या वस्तूंची माहिती उपलब्ध करून देतात. तर तत्त्वज्ञानापासून विज्ञान, कला इ. चे साहित्य हे त्याच्या कल्पना आणि अनुभवांचे प्रतिबिंब असते. वास्तविक तसचे सामूहिकजीवन, हालचाल, परस्परसंबंध, या संदर्भात त्यानेच घालून दिलेले नियम, बंधने त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक संस्था आणि त्यांचे नियमन यांचा असतो. मानवजातीच्या अस्तित्वाचा कालपट अतिशय मोठा असल्यामुळे 'मानवीसमूहा'च्या हित आणि अहिताच्या गोष्टी आणि 'वैयक्तिक' मानवाच्या आयुष्यात घडणाऱ्या गोष्टी यांचा कालक्रम आणि स्तर हे वेगळे आहेत. थोडक्यात, एका मानवाचे अस्तित्व हे सीमित असते. तर मानव जातीचे अस्तित्व हे कालगणनेच्या आजच्या आकडीवारीतही मांडता येणार नाही इतके मोठे आणि प्रचंड आहे. हे सांगण्याचा उद्देश असा की, व्यक्तीच्या किंवा मानवी समूहा करता जे नियम आणि बंधने निर्माण केली जातात त्यांच्या मार्गदर्शकतत्त्वांमध्ये या मोठ्या कालखंडातील अनुभवांचा आधार घेतलेला असतो.

अगदी अलीकडचेच उदाहरण घ्यायचे झाले तर कुटुंबनियोजनाच्या धोरणाचे घेता येईल. प्रत्येक कुटुंबाला २ किंवा ३ मुले असावीत हे मार्गदर्शक सूत्र मानवसंख्या वाढीच्या अनुभवातून निर्माण केले गेले आहे. एखाद्या भौगोलिक

क्षेत्रामध्ये मानवसमूहाच्या समाधानकारक अस्तित्वाकरता उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्ती ही मर्यादित असते आणि म्हणून मानवाच्या लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवायला लागते. प्रत्यक्षात मानवी क्षमता ही २ किंवा ३ पेक्षा अधिक मुले निर्माण करण्याची असूनसुद्धा त्याने २ किंवा ३ च अपत्ये निर्माण करावीत असे बंधन घालावे लागते. येथे एखाद्या व्यक्तीचा किंवा पंथाचा विचार करून चालत नाही किंवा एखाद्या व्यक्तीने किंवा गटाने आपल्यापुरताच मर्यादित विचार करूनही चालत नाही, असे निर्बंध हे संपूर्णतः स्वेच्छवरही सोडता येत नाहीत. कुठेतरी कायदा, ऐहिक जीवनातील फायदा-तोट्याचे आमिष, शिक्षण, प्रबोधन इ. अनेक माध्यमांतून हा कार्यक्रम यशस्वी करायला लागतो. आता जे निर्बंध भारतासारख्या देशामध्ये आहेत, बरोबर त्याच्या विरुद्ध परिस्थिती सिंगापूर किंवा स्वीडनसारख्या देशामध्ये आहे. तेथे लोकसंख्यावाढ एवढी कमी आहे की, कुटुंबांना मुलांची संख्या वाढवण्याकरता विनंती करावी लागते. आणखी एक उदाहरण बघू या. मोठ्या शहरांमधून रेल्वेमध्ये स्त्रियांकरिता राखीव डबा ठेवला जातो. या डब्यामध्ये पुरुषांना कायद्याने प्रवेश करता येत नाही. आता हा निर्बंध आणि त्यामागील व्यावहारिक भूमिका लक्षात घेतली नाही तर स्त्री-पुरुष समानतेच्या धोरणांना हरताळ फासणारा हा निर्बंध ठरेल. थोडक्यात, स्वातंत्र्य आणि निर्बंध यांना एक सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाच्या चौकटीतच त्यांचा विचार केला तरच त्यांमागील मार्गदर्शक तत्त्वांचे आकलन होऊ शकते.

हिंदू धर्म हा एक अतिशय प्राचीन धर्म आहे. अनेक स्थित्यंतरे या समाजाने या कालावधीत अनुभवली आहेत. साहजिक हिंदू धर्माकरता निर्माण झालेल्या मार्गदर्शक सूत्रांचा कालपटही फार मोठा आहे. वर्णाश्रम धर्म, पुरुषार्थ, पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त या संकल्पना हा कालपट लक्षात घेतला तरच समजू शकतील. एखादा मनुष्य जेव्हा प्रवासाला निघतो तेव्हा त्याच्या दृष्टीपलीकडील जगाचे अस्तित्व त्याला अमान्य करावे लागेल. हाच मनुष्य जेव्हा स्वतः पुढे सरकतो तेव्हा त्याला त्याच्या पुढचा प्रदेश दिसायला लागतो आणि कालांतराने त्याच्या हेही लक्षात येते की, जेवढा तो पुढे चालत जातोय तेवढा नवीन प्रदेश त्याच्या दृष्टीपथात येतो. हाच मनुष्य जेव्हा मागे वळून बघतो तेव्हा त्याच्या दृष्टिपथात पडणारा प्रदेश हाही सीमितच असतो. तरीही त्याच्याही आधी प्रदेश आहे, हे त्या वेळेस तो प्रदेश दिसत नसूनही तो मान्य करतो. प्रत्येक व्यक्तीचा आयुष्यकाल वेगळा असतो. कोणी अल्पायुषी असतो तर कोणी दीर्घायुषी असतो. याचा थोडक्यात अर्थ असा आहे की, एखाद्या व्यक्तीचे अनुभव म्हणजेच सर्व मानवजातीच्या अनुभवांची मर्यादा

नाही. व्यक्तिगत अनुभवाच्या मर्यादा किंवा कक्षा, काही बाह्य उपकरणे उदा. दुर्बीण, विमान किंवा अवकाशयानातील प्रवासामुळे प्राप्त होणारे फायदे आज समजता येण्यासारखे आहेत. पण मानसिक व्यायाम किंवा त्याच्या शास्त्राची उपलब्धता म्हणजेच योगशास्त्र याचे आकलन होणे फार कठीण आहे. याचेच एक उदाहरण बघू. बाह्य औषधाच्या मदतीने एखाद्या व्यक्तीच्या हृदयाची स्पंदने किंवा श्वसन कमी-जास्त करता येते. हीच गोष्ट काही योगी कुठलेही औषध किंवा बाह्य गोष्टींचा वापर न करता करून दाखवू शकतात. २० व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये काही हे प्रयोग जेव्हा डॉक्टरांनी केले तेव्हा त्याची सत्यता त्यांना दिसून आली. एखादे औषध निर्माण करायला किती कष्ट पडतात हे आपल्याला ठाऊक आहे. योगशास्त्र हा सुद्धा अपघात नाही. अनेक प्रयत्न आणि साधनांतून त्याची निर्मिती झाली आहे. जे 'योगा'चे तेच 'तंत्रा'चे. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, 'योग' आणि 'तंत्र' हे फक्त हिंदू धर्माच्या ज्ञानसाधनेचा भाग आहेत. हिंदू धर्माच्या मार्गदर्शक सूत्रांमध्ये अशा अनेक योग्यांच्या चिंतनाचा अंतर्भाव आहे.

उपनिषद्‌े हे खरे म्हणजे मानव व निसर्ग यांचा एकमेकांशी संबंध आणि त्यांची निर्मिती यांचा ऊहापोह करणारे गुरू-शिष्यांमधील संवादाचे वाङ्‌मय आहे. हे अतिशय गहन आणि कूट प्रश्न, साधीसाधी निसर्गातील उदाहरणे आणि रूपके घेऊन उपनिषदांमध्ये समजावून सांगितले आहेत. आजच्या आधुनिक विज्ञानाचे भाष्यकार श्रोडिंगर, ऑपेनहायमर, हायजेनूयर्ग, नील्सबॉर, डेव्हिड बॉम इ. अनेकांनी उपनिषदांमधील विचार आणि आधुनिक विज्ञान यातील साम्य स्थळे दाखवून दिली आहेतच, तर काहींनी उपनिषदांनी आपल्याला ही नवी दृष्टी दिल्याचेही मान्य केले आहे. जी गोष्ट उपनिषदांची तीच रामायण महाभारतांची. विशेषतः महाभारत हे तर मानवी जीवनातील प्रकृती आणि विकृती यांचे जिवंत वर्णन आहे. म्हणूनच महाभारतातील व्यक्तिरेखा या महाभारतातून बाहेर काढून त्यांचा अभ्यास करणे नेहमीच दिशाभूल करणारे ठरते. अनेक आधुनिक मराठी लेखकांना तो कधी सूडाचा प्रवास वाटतो, तर कधी वर्ग संघर्षाचे ते वर्णन वाटते ते यामुळेच. काहींना तर कर्णाचा इतका पुळका येतो की, महाभारताचा तो नायकच असल्याचे ते लिहितात. कथा, कादंबऱ्या आणि कल्पनाविलासाला कोणीच आक्षेप घेऊ शकत नाहीत. पण महाभारतावर लिहायचे तर जे महाभारतकारांनी लिहिलेल्या त्या संपूर्ण घटनाक्रमाचा आदर करूनच लिहिणे आवश्यक आहे. वैदिक काव्य, उपनिषदे, रामायण, महाभारत या सर्वांचा हिंदू जीवनशैली आणि विचारधारेवर प्रभाव आहे. त्यांच्या मार्गदर्शक सूत्रांचा तो पाया आहे. म्हणूनच या सर्व वाङ्‌मयामधील परस्परसंबंध आणि त्यांचा सांस्कृतिक,

सामाजिक संदर्भ नीट समजून घेणे महत्त्वाचे आहे. कथा, कादंबऱ्या लिहिण्याकरता किंवा आधुनिक सिद्धांतवादांना गैरसोयीचे म्हणून या साहित्याचा विपर्यास करणे नुसतेच धोक्याचे नाही तर आत्मघातकीही आहे. असा विपर्यास आणि तार्किक भ्रम निर्माण करणे हे संस्कृतिभंजनाचे एक मोठे हत्यार आहे.

आजच्या हिंदू धर्माच्या संकल्पना आणि विचारधारा यांच्या अभ्यासाचा पाया हा बहुतांशी पाश्चात्त्य आहे. मध्ययुगीन प्रवाशांनी लिहिलेली वर्णने आणि १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात सर विल्यम जेम्स यांच्या भारत विद्येच्या अभ्यासापासून सुरू झालेल्या परंपरेवर आधारित पाश्चात्त्य अभ्यासकांच्या लिखाणावर आजचे विश्लेषण उभे आहे. या पाश्चात्त्यांची परिभाषा, तौलनिक अभ्यासाची साधने आणि अगदी सुरुवातीला सांगितलेल्या मानवी क्षमतांच्या मर्यादित परिघामध्ये हो हिंदू धर्माचा अभ्यास झालेला आहे. यामध्ये हिंदू धर्माचा प्रचंड गौरवही आहे आणि टीकाही आहे. अभ्यास म्हणून हे सर्व जरी उपयुक्त असले तरी हिंदू धर्मातील आचार-विचारांच्या संकल्पना कळण्यास ते नक्कीच अपुरे आहे. अपुरे असलेलेही एकवेळ चालले असते, पण अनेकवेळा ते दिशाभूल करणारे आहे.

मानवी जीवन म्हणजे गणित नाही. अनेक अतर्क्य आणि अविश्वसनीय घटना आपल्या जीवनात घडतात. जीवनामध्ये जेवढी सुसंगती आहे तेवढीच विसंगती आहे. चांगलेही आहे आणि वाईटही आहे. स्त्री आणि पुरुष हा भेद तर आहेच, शिवाय हा मानवी समाज वय आणि अनुभवाच्या अनेक टप्प्यांवर उभ्या असलेल्या व्यक्तींचा मिळून बनलेला आहे. म्हणूनच जास्तीत जास्त लोकांच्या हिताकरिता या समाजाला अनेक नियम आणि निर्बंध यामध्ये बांधून ठेवावे लागते. यातूनच नीती-अनीती, पाप-पुण्य या संकल्पनांची निर्मिती होते. या सगळ्यांना त्या व्यापक सामाजिक संदर्भामध्येच बघावे लागते आणि जो बदल करायचा असतो तो या संदर्भाचा आदर करून घडवायचा असतो. विवेकी, चिंतनशील आणि अनुभवी नेतृत्त्व असा बदल घडवू शकते. सुधारणा म्हणजे मोडतोड नाही. मोडतोड फार सोपी असते. निर्मिती कठीण असते. आजचा बहुसंख्य हिंदू समाज हा नेतृत्वहीन, स्वाभिमानशून्य, दांभिक आणि निस्तेज झालेला आहे. एका विशाल, व्यापक परंपरेचा त्याला मिळालेला ठेवा तो विसरू पहात आहे. त्याच्या उत्थानाची साधने त्याच्या जवळच आहेत. हिंदू धर्म ही एक विचारधारा आहे, एक जीवनशैली आहे. इतर धर्मासारखी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था त्याचे नियंत्रण करीत नाही. हे एक मोठे स्वातंत्र्य हिंदूंना मिळालेले आहे.

✧✧✧

# दिशाहीन समाज

{ एप्रिल २००५ }

आजच्या हिंदू समाजाची परिस्थिती ही खरंच शोचनीय आणि चिंताजनक आहे. तो इतका भांबावलेला, गोंधळलेला आणि आत्मघातकी झालाय की, येणारा प्रत्येक दिवस आणि घटना त्याच्या दिशाहीनतेमध्ये भर टाकीत आहेत. सध्या दूरदर्शनवरील 'इंडिया' वाहिनीवर दाखविल्या गेलेल्या स्वामीनारायण पंथातील आणि शक्ती कपूर, अमन वर्मा ह्यांचे चाळे दाखविणाऱ्या चित्रफिती बघून सुन्न व्हायला होतं. ह्याहीपेक्षा दुःख अमन वर्मांचे समर्थन करताना त्यांचे सहकारी संजय दत्त, गोविंदा, सलमान खान, अरबाज खान, फिरोज खान, महेश भट इत्यादिंनी जी काही मुक्ताफळे उधळली ती ऐकून होतं. ह्या मंडळींनी ह्याकरता पुढे केलेला युक्तीवाद, तर्कवाद आणि ह्यातूनच आपल्या कृत्याचे केलेले समर्थन ह्याचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न खरोखरच ह्या व्यक्तींपुरता मर्यादित नसून तो काही मूलभूत सामाजिक, सांस्कृतिक धारणांचा आहे.

सामाजिक जीवन सुसह्य व्हावं म्हणून प्रत्येक व्यक्तीवर काही नियंत्रणं घातलेली असतात. ह्या नियंत्रणांचा उद्देश व्यक्तिगत स्वातंत्र्याचा संकोच करण्याचा नसून, इतर व्यक्ती किंवा समूहांच्या स्वातंत्र्याचा आदर करण्याचा त्यात हेतू असतो. मानवी क्षमता, शारीरिक आणि बौद्धिक दोन्ही अमर्याद आहेत असे म्हटले तरी ते गैर होणार नाही. प्रत्येक व्यक्ती जर आपल्या अमर्याद क्षमतेचा स्वातंत्र्याच्या नावाखाली उपभोग घेऊ लागली तर समाजात गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल. रस्त्यावरून चालताना आपल्याला एका विशिष्ट पद्धतीने किंवा लयीने चालावे लागते, कारण या नियंत्रणामुळेच अनेक व्यक्ती, वाहनं रस्त्यावरून चालण्याच्या स्वातंत्र्याचा एकमेकांना त्रास होऊ न देता उपभोग घेऊ शकतात. आता हातापायांना

हलविण्याची क्षमता आहे म्हणून वेडेवाकडे हात-पाय हालवून एखादी व्यक्ती चालू लागली किंवा अनेक व्यक्ती तसं स्वातंत्र्य घेऊ लागल्या तर त्यांच्यापैकी प्रत्येकालाच व्यक्तिगत इजा होईल आणि रस्त्यावरून चालणंही अशक्य होईल.

स्त्री-पुरुष संबंध हा एक सनातन विषय आहे. त्यांच्यामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक सुसह्यता यावी म्हणूनच विवाहासारख्या सामाजिक संस्था निर्माण होतात. ह्यातूनच स्त्री-पुरुषांनी एकमेकांशी ठेवायचे संबंध, एकांतातले आणि समाजातले ह्याचे काही नियम ठरलेले असतात. हे नियम केवळ समाजामध्ये सुसह्य, सुसंगत आणि सुसंस्कृत व्यवस्था यावी म्हणूनच असतात. ह्याचा अर्थ त्या व्यक्तींना ह्या क्षमता नसतात असा नसतो. हे निर्बंध किंवा ही रचना समाजातल्या बहुसंख्य व्यक्तींनी पाळायची नाही असं ठरवलं तर वर सांगितलेला रस्त्यावरचा गोंधळ समाजव्यवस्थेमध्ये दिसेल.

कला आणि साहित्य ही सुद्धा मानव निर्मितच असतात. ह्यांचे स्वातंत्र्य हा सुद्धा एक मोठा चर्चेचा विषय आहे. पण ह्या क्षेत्रामध्येसुद्धा स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचाराचा अवलंब झाला तर गोंधळाचीच परिस्थिती निर्माण होते. बिभत्स, विकृत, अनैसर्गिक लिहिणं किंवा नाट्यकला, चित्रपट ह्यातून तसे सादर करणं हे काही फारसं कठीण काम नसतं. किंबहुना सवंग लोकप्रियता मिळविण्याचा तो एक झटपट मार्गच असतो. ह्या उलट अशा तंत्रांचा अवलंब न करता प्रभावी आणि भेदक साहित्य आणि कलानिर्मिती करणं हे अतिशय कठीण असतं. लेखकांच्या आणि कलाकारांच्या प्रतिभेचा तिथे कस लागतो. अत्यंत शृंगारगर्भ, सोपे आणि सुटसुटीत लिहिणं हे तर महान कठीण असतं. पण ते अशक्य नसतं. सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ आणि नियंत्रण सांभाळून सृजनात्मक साहित्य आणि कला निर्माण करता येते. पण ही क्षमता ज्यांच्याकडे नसते त्यांना मात्र विकृत आणि विदुषकी लिखाण आणि कलेचा आधार घ्यावा लागतो. ह्याची उदाहरणे अनेक देता येतील. सनसनाटी निर्माण करणे, सामाजिक बांधिलकीचा आभास निर्माण करणे इ. तंत्रांचा वापर ह्या करिता केला जातो. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मराठीतील महान लेखक विजय तेंडुलकर आणि त्यांची कलाकृती 'घाशीराम कोतवाल' ह्याची देता येईल. शुद्ध चारित्र्यहनन आणि सुप्त जातीद्वेष ह्याला मुलामा सामाजिक आशयाचा देऊन धादांत खोटं सुद्धा कसं प्रभावीपणे मांडता येऊ शकते ह्याचा हा एक उत्तम नमुना आहे. ही नाट्यकृती रंगमंचावरील एक सुंदर सादरीकरण म्हणता येईल आणि अशा उत्कृष्ट सादरीकरणातून जेंव्हा थापा मारल्या जातात तेव्हा त्या जास्त हानीकारक असतात. आज मराठी माणसाला नाना फडणीसांचा

मुत्सद्दीपणा ठाऊक नाही, पण एक लिंगपिसाट व्यक्तिमत्त्व म्हणून ते डोळ्यांसमोर येतात. सिद्धांतवाद्यांकडून संस्कृतीभंजनाकरता वापरल्या गेलेल्या अशा अनेक नाट्य आणि चित्रपटांची इथे यादी देता येईल.

अशा कलाकृती, लेखन आणि लेखकाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणं हा एक वेगळा धंदा असतो. विजय तेंडुलकर आणि संजय दत्त ह्यांच्यामध्ये एक समानसूत्र आहे आणि ते सूत्र म्हणजे अशा भाटांच्या माध्यमांतून प्रसिद्धी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवणं. मुळातच संशयास्पद प्रतिभा असणाऱ्या कलाकृती आणि कलावंतांकडे ह्या प्रसिद्धी वलयांमुळे अनेक तरुण-तरुणीं आकर्षित होतात. अशा लोकांची संख्या मोठी झाली की साहित्य, कला पारितोषिकांचा वर्षाव ह्यांच्यावर होऊ लागतो. ह्या सर्वच गोष्टी तकलादू आणि सीमित क्षमतेच्या असल्यामुळे अधिक सवंगता, विदुषकी चाळे आणि मग ह्या यशाकरता कुठल्याही थराला जाण्याची तयारी असा तो क्रम लागतो.

संजय दत्त बहुधा मुंबई विस्फोटातून निर्दोष सुटण्याचे लक्षण दिसत आहे. आज १२ वर्षे हा खटला चालू आहे. १० वर्षांपूर्वीच संजय दत्त निर्दोष असल्याच्या हाकाट्या महान राजकारणी आणि सिनेमा क्षेत्रातील दिग्गज आर्तस्वरात देत आहेत. संजय दत्त ह्याच्या संदर्भात त्यावेळचे न्यायाधीश श्रीयुत पटेल ह्यांनी प्रथमदर्शनी पुरावे आणि निष्कर्ष दिले आहेत ते सर्व भारतीयांनी अवश्य वाचावे. असे असताना सुद्धा संजय दत्तला आज मिळणारी प्रसिद्धी आणि समाजस्थान हे समाजाच्या अधोगतीचे द्योतक आहे. अमन वर्माच्या मदतीला संजय दत्त, सलमान खान आणि गोविंदा ह्यांना का यायला लागते हे सांगण्याची वेगळी गरज नाही.

ह्या सगळ्या गोष्टींतून हिंदू समाज काही शिकणार आहे की नाही हाच मोठा प्रश्न आहे. कायदा अशा गोष्टींवरती निर्बंध ठेऊ शकतो हाही एक भाबडा समज आहे. समाज आणि कायदा हे काही वेगळे नसतात. भ्रष्ट समाजाचे कायदे हे नेहमीच कमकुवत, अस्पष्ट आणि दिशाहीन असतात. ह्यातूनच नवीन नवीन कायदे निर्माण होतात. आज आपल्याकडे एवढे कायदे आहेत की, वकील आणि न्यायाधीशांनासुद्धा ते ठाऊक आहेत की नाहीत अशी शंका आहे.

आज हिंदू समाज चारित्र्यहीन झाला आहे हीच खरी खंत आहे. असा चारित्र्यहीन समाज संस्कृती भ्रष्ट होतो आणि मग तो नष्ट होतो. आज आपल्या समाजाला खंबीर नेतृत्वाची गरज आहे. दुर्दैवाने आज हिंदूंच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये दिवाळखोर नेतृत्व आहे. तरी

अजूनही वेळ गेलेली नाही. तेंडुलकर, संजय दत्त आणि अमन वर्मांसारख्या दांभिकांना आजही त्यांची जागा दाखवून देणं शक्य आहे. असे धारिष्ट्य हा समाज जेव्हा दाखवेल तो दिवस त्याच्या उत्थानाची सुरुवात असेल. सहनशीलतेच्या पांघरुणाखालून आलेली निष्क्रीयता हे समाजाच्या सहिष्णुतेचे लक्षण नसून त्याच्या षंढपणाचे ते द्योतक आहे.

ह्यापुढे ही सर्वंच मंडळी आणि त्यांचे समर्थक वृत्तपत्रे, दूरदर्शन, चर्चासत्र ह्या सर्व माध्यमांचा वापर करून, आपण निर्दोष कसे आहोत एवढेच नाही, तर सामाजिक मूल्यांची व्याख्याच कशी बदलायला हवी ह्याचा आक्रोश करायला लागतील. वकिली तर्क, युक्तिवाद, अनेक घटना विसरण्याची समाजाची वृत्ती ह्या सर्व गोष्टींचा फायदा घेतला जाईल. दुर्दैवाने ह्याचा प्रतिकार करतील असे साहित्यिक आणि कलाकार ह्यांची संख्या आज क्षीण झालेली दिसतेय. वृत्तपत्रे, दूरदर्शन आणि चित्रपट ह्यांच्या माध्यमातून स्त्रीचे आज चाललेले वस्त्रहरण हे स्त्री-'मुक्त' झाल्याचं लक्षण नसून ती अधिक गुलाम होत असल्याचं ते चित्र आहे. स्त्रीवरील आजचे होणारे बलात्कार आणि एकंदरीत ह्या बाबतीत होणारे शोषण ह्याला वृत्तपत्र, चित्रपटांमधील आजचे स्त्रीचे रूप जबाबदार असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. आई, बहीण, पत्नी ह्या सर्वंच नात्यांचे अवमूल्यन हिरिरीने केल्यावर दुसरे काय फळ पदरात पडणार? स्त्रियांनी ह्याचा अत्यंत गांभीर्याने विचार करणं आवश्यक आहे. स्वातंत्र्य आणि स्वैराचारातील फरक ओळखणं जरूरीचे आहे.

स्त्रियांच्या आणि एकंदरीत ह्या 'लिंग' संस्कृतीचा हिरिरीने पुरस्कार करणारी दुसरी जमात म्हणजे समाज शास्त्रज्ञ आणि मानसोपचार तज्ज्ञ. आयुष्य हे गणित नाही आणि ते अनेक विरोधाभासांनी भरलेले असते. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरती आणि नात्यांमध्ये सुसंवाद व्हावा म्हणूनच मनाची आणि विचारांची मशागत अगदी लहानपणापासून संस्कार, नीती-अनीतीच्या कल्पना आणि संस्कृतीच्या माध्यमांतून करावी लागते. सुजाण आई-वडील आणि शिक्षक-मित्र-मैत्रीणीं इतका चांगला दुसरा मानसोपचार तज्ज्ञ नसतो. हीच मंडळी आपलं व्यक्तिमत्त्व घडवत असतात, आपल्या विचारांना दिशा देत असतात. परंतु ही सर्वच नाती, भूमिका ह्या स्वैर झाल्या तर आजच्यासारखा गोंधळलेला आणि दिशाहीन समाज निर्माण होतो. समाज नासवणारे साहित्यिक आणि कलाकारांना कुठलीही सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणं हे कठीण असलं, तरी हा एकच त्यावरील प्रभावी उपाय आहे.

✧✧✧

# धर्मांतराचा धंदा

{ जुलै २००५ }

ओरिसातील एका न्यायालयाने नुकताच दिलेला एक आदेश बोलका आहे. तुलनेने ओरिसा हे भारतातील एक कमी प्रगत राज्य असून मोठ्या प्रमाणावर आदिवासी, वनवासींची तेथे वस्ती आहे. त्यांचे अज्ञान, गरिबी, त्यांच्या परिसरात असलेली दळणवळणाची तुटपुंजी साधनं यांच्यामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांतही फारसा फरक पडलेला नाही. राज्यांतील या सर्व अडचणींचा फायदा घेऊन अनेक ख्रिस्ती धर्म प्रसारक तेथे आपले बस्तान मांडून बसले आहेत. या ख्रिस्ती धर्म प्रचारकांकडे परदेशाकडून येणारा प्रचंड पैसा, चांगले नियोजन, त्यागमय वृत्ती आणि दूरदृष्टी असणाऱ्या कार्यकर्त्यांची जोड यामुळे धर्मांतराचा धंदा येथे चांगलाच तेजीत आहे. याविरुद्ध गेल्या काही वर्षांत तिथल्या समाजाने आपला असंतोष अनेक चांगल्या वाईट मार्गाने प्रकटही केला आहे. डावे विचारवंत, नेहमीच मानवतेचे भोकाड पसरणारे अनेक समाजसुधारक, मानव अधिकाराच्या नांवाखाली उघडल्या गेलेल्या धंदेवाईक संस्था, राज्य आणि केंद्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या अल्पसंख्यांक संस्था आणि आयोग या सर्वांनी त्यांच्या सिद्धांतवादाला पोषक असेच निर्णय, वक्तव्य आणि हिंदूंना दोष देण्याची एकही संधी या काळांत वाया घालवली नाही. ख्रिस्ती धर्म प्रसारकांची कार्यपद्धती, धर्मांतरीत केल्या गेलेल्या व्यक्तींची तटस्थ चौकशी, तेथील सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीची जाणीव या सर्व गोष्टींचा एकतर हेतू पुरस्सर विपर्यास किंवा डोळेझाक करून वर निर्देशिलेल्या अनेक संस्था आणि व्यक्तींनी आपले पहाणी अहवाल सादर केले. या सर्व अहवालांमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांची भलावण आणि हिंदू समाजावर सडकून टीका यापेक्षा वेगळे काहीच नाही. ख्रिस्ती धर्मप्रसारकांची कार्यपद्धती, त्यांचे अंतस्थ हेतू, त्यांना मिळणारा पैसा

आणि या आधी त्यांनी धर्मांतरीत केलेल्या लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक स्तरावरील काही बदल यांची कुठलीही तटस्थ चर्चा या अहवालामध्ये नाही. साहजिकच ख्रिस्ती धर्म प्रसारकांना, त्यांच्या ह्या धर्मांतराला नैतिक पाठिंबाच या सर्व महाभागांनी वेळोवेळी दिला. या पार्श्वभूमीवर ओरिसा न्यायालयाचा हा निर्णय फार महत्त्वाचा आहे. सुमारे २०० स्थानिक कार्यकर्त्यांनी दाखल केलेल्या तक्रारींची नोंद घेऊन न्यायालयानी अशा धर्मांतराच्या बाबतीत आपली नाराजी तर व्यक्त केलीच आहे, पण तिथल्या जिल्हाधिकाऱ्यांनाही या धर्मांतरामागे सकृत दर्शनी दिसणारी बळजबरी, लालूच, पैसा आणि इतर सुखसवलतींचे आमिष इ. गोष्टींचा प्रभाव आहे का याचा शोध घेण्यास सांगितले आहे. अर्थात् जिल्हाधिकाऱ्यांकडून याची तटस्थ चौकशी होईल आणि कुठल्याही राजकीय प्रभावाशिवाय ते आपला अहवाल सादर करतील याची शक्यता फार कमी आहे. अशा प्रसंगी अनेक तांत्रिक अडचणींमुळे आरोप सिद्ध करणे फार कठीण असते. या २०० जणांनी केलेले आरोप हे गृहीत न धरता वस्तुस्थिती जाणून घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना अप्रत्यक्षरित्या मदत करणे, हे हिंदू स्वयंसेवी संघटनाना सहज शक्य आहे. हिंदू वकील, समाजसेवक यांनी गांभीर्यांनी या प्रकरणांत लक्ष घालून न्यायालय प्रक्रियेत लक्ष घालणे आवश्यक आहे. हिंदूंच्या नसलेल्या प्रश्नांबद्दल आक्रस्ताळेपणे दूरदर्शनवर मूर्खासारखी व्यक्तव्ये करणाऱ्या हिंदू संघटना आणि नेत्यांकडून ही अपेक्षा करणं खुळेपणाचे ठरेल. ख्रिस्ती धर्मप्रसारक जसे धर्मप्रसाराचे कार्य करतात तसेच इतर राष्ट्रांमध्ये त्यांच्या ख्रिस्ती बांधवांवर कुठल्याही प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक अन्याय होत असतील तर त्याकरता अभ्यासपूर्ण लढा देतात. हिंदूंच्या आजच्या संघटनांमध्ये हा अभ्यास तर सोडाच, पण असे काही वैध मार्ग असतात याचीही त्यांना जाणीव नाही. या संदर्भात असलेल्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याचे ज्ञान नाही. यावर भाष्य करणारे प्रचंड ग्रंथ, शोध निबंध आणि शोध-पत्रिकांची यांना माहिती नाही. हिंदूंच्या या दृष्टीकोनात आणि मानसिकतेत हिंदूंमध्ये आहे तो नुसता भावनेचा, तर्काशी संबंध नसेलला थयथयाट. जो पर्यंत बदल होत नाही तोपर्यंत अशा धर्मांतरांना आळा घालणे अशक्य आहे. तात्पुरता किंवा दिशाहीन उद्रेग, मोडतोड, हाणामारी हाही यावरचा कायम स्वरूपी तोडगा नाही. मूळ प्रश्नांचे आकलन करून घेणे आणि उपलब्ध सर्व वैध मार्गांचा उपयोग करणे हा एकच यावरचा उपाय आहे.

ख्रिस्ती धर्माचा पाश्चात्त्य देशांमध्ये कमी होत असलेला आजचा प्रभाव हा ख्रिस्तीधर्म ग्रंथांमधील अंधश्रद्धा, स्त्रियांच्या बाबतीत असलेले मागासलेले विचार,

कुटुंबनियोजन आणि जनन प्रक्रियेशी असलेल्या विज्ञानाला विरोध या मुळेच आहे. तेथे चर्चेस ओस पडत असून धर्मगुरुंची संख्या रोडावत चालली आहे. दुर्दैवाने आशिया, आफ्रिका इ. खंडामध्ये मात्र ख्रिस्तीधर्माचा प्रभाव वाढत चालला आहे. आफ्रिका, लॅटिन अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडांमधील मूळ रहिवाशांवर धर्म प्रसाराकरता केलेल्या अत्याचारांची आज व्यवस्थित नोंद झाली आहे. दुसऱ्या महायुद्धात छुपेपणे हिटलरला दिलेले समर्थन आज उघड झाले आहे. 'हिंदू' म्हटले की फेफरे भरणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांचे संपादक, डावे विचारवंत, जातियवाद आणि गरिबीला घट्ट कवटाळून बसलेले समाज-सेवक यांना हिंदू धर्मातील नसलेले दोष दिसतात, परंतु ख्रिस्तीधर्माचे हे उघड स्वरूप दिसत नाही हे मोठे आश्चर्य आहे. ज्यांना फक्त हिंदूंचा द्वेष आणि मत्सर आहे त्यांना हिंदूंमध्ये सुधारणा वगैरे करण्याचा काहीही अधिकार नाही. ज्याला स्वतःला हिंदू असल्याचा अभिमान आहे त्यालाच स्वतःच्या धर्मात सुधारणा सुचविण्याचा अधिकार आहे. हिंदूंना ही सुबुद्धी लवकर मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

✧✧✧

# अशांत धर्म / देश

{ ऑक्टोबर २००५ }

आजच्या हिंदू समाजाइतका भांबावलेला आणि आत्मघातकी समाज संपूर्ण भूतलावर नसेल. यामुळे त्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवास दिशाहीन झाला आहे. हिंदू आईवडिलांच्या पोटी जन्माला येणे या पलीकडे हिंदू होण्याकरता काहीच पात्रता लागत नाही. या अमर्याद स्वातंत्र्यामुळे तो कुठलीही जीवनशैली जगू शकतो, शाकाहारी असू शकतो, मांसाहारी असू शकतो, आस्तिक असू शकतो किंवा नास्तिक असू शकतो, वैदिक असू शकतो किंवा अवैदिकही असू शकतो. इतकं व्यापक स्वातंत्र्य आणि अमर्याद विविधता असूनही हा समाज गेले कित्येक हजार वर्षे नुसताच अस्तित्वात राहिला असे नाही, तर अध्यात्मापासून कला, भाषा इ. विविध भौतिक क्षेत्रांमध्ये त्यांनी अनेक मूलगामी आणि सर्जनशील विचार आणि साहित्य निर्माण केले. सुसह्य सामाजिक जीवनाकरता अनेक सामाजिक संस्था निर्माण केल्या. निराकार, अमूर्त, अनंत, निर्गुण, अनुभूतीलाच समजू शकतील असे अनेक वैश्विक आणि शाश्वत विचार रूपकांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांना उमगतील अशा साकार, मूर्त, सगुण पातळीवर समजावून सांगण्याची विलक्षण कल्पकताही याच समाजाने दाखवली. या हजारो वर्षांच्या प्रवासातून आणि अनुभवांतूनच त्यांच्या धर्मसंकल्पना आणि हा धर्म शाश्वत रहावा म्हणूनच अनेक नीती-अनीतीच्या, पापपुण्याच्या संकल्पना त्यांनी निर्माण केल्या. त्यांचे आदरपूर्वक पालनही केले. त्यांच्या ह्या सहिष्णुतेमुळेच इतकी विविधता आणि मतभिन्नता असूनही अराजक आणि गोंधळ निर्माण झाला नाही. नीती-अनीतीचे पालन हे व्यक्तीपेक्षा समाजाकरता करायचे असते. त्यामध्ये कदाचित व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा संकोच होत असला तरी त्यामुळे व्यापक समाजस्वातंत्र्य अबाधित

रहाते. स्त्री-पुरुषांच्या क्षमता अमर्यादित असल्या तरी त्यांच्या क्षमतांवरतीही मर्यादा घालावी लागते. या सर्व गोष्टींचा विचार करून जो जीवन जगत असतो तोच खऱ्या सत्धर्माचे पालन करीत असतो.

व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या वागण्याचे वैयक्तिक किंवा सामाजिक परिणाम बहुतांशी दूरगामीच दिसून येतात. म्हणूनच एखाद्या व्यक्तीला 'तू आज असा वागू नकोस' असे सांगितले जाते ते या अशा दूरगामी परिणामांच्या पार्श्वभूमीवर असते. केवळ तर्काला ते पटते किंवा पटत नाही. एवढ्या एकाच निकषावरच आपले वागणे अवलंबून ठेऊन चालत नाही. प्रचंड अनुभव, आकलनशक्ती किंवा उक्ती किंवा कृतीमधील अंतर कमी केलेल्या महाजनांचे मार्गदर्शन घेणे हे नेहमीच अशा वेळी हितावह असते. अशा अभिजनांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हा समाजाला विवेकी नेतृत्व मिळते. अप्रिय सांगण्याची क्षमता या विवेकी नेतृत्वामध्ये असते. हिंदू समाजाची आजची शोकांतिका खरं म्हणजे त्याच्या आध्यात्मिक असो वा भौतिक असो, राजकीय असो वा सामाजिक असो, नेतृत्वाच्या दिवाळखोरीत आहे.

दैवतपूजा हे हिंदूंचे एक वैशिष्ट्य आहे. चराचरांतून तो दैवी-शक्ती बघतो. त्याच्या या चराचरांतील शक्तिच्या आदरातूनच अनेक दैवतं त्यांनी निर्माण केली. त्याला मिळालेल्या एका व्यापक स्वातंत्र्याचाच तो भाग आहे. 'गणपती' हे असेच एक दैवत. बुद्धीचे, विद्येचे, मांगल्याचे. शतकानुशतके त्याची घरांत, देवळांत पूजा होते. सामाजिक उत्थानाकरता लोकमान्यांनी गणपती उत्सव सार्वजनिक केला. त्याला एक प्रबोधनाची पार्श्वभूमी होती. आजच्या गणपती उत्सवाचे स्वरूप मात्र लोकमान्यांच्या मूळ हेतूचे विडंबन करणारे होऊन बसले आहे. बुद्धी, विद्या आणि मांगल्य हे त्याचे स्वरूप केव्हाच हवेत विरून जाऊन, बुद्धिहीन आणि मांगल्यहीन, बिभत्स आणि हिडीस प्रवृत्तींनी त्याची जागा घेतली आहे. घरगुती असो अगर सार्वजनिक असो 'श्री' ची स्थापना आणि विसर्जन या आदरपूर्वक आणि एका शिष्टाचाराने करायच्या गोष्टी आहेत. आजचे समाज जीवन, शहरांची रचना, आपली जीवनशैली संघर्षमय झाली आहे. खरं म्हणजे गणपती सारखे उत्सव हे अशा संघर्षापासून मुक्ती देणारे, समाज घटकांना जवळ आणणारे, कला, वक्तृत्व गुणांना वाव देणारे असायला हवेत. आजचे गणपती - उत्सव मात्र नीतीहीन राजकीय पुढारी, वर्गणी आणि नवसाच्या कल्पनेतून समाजाला आर्थिकदृष्ट्या लुबाडणाऱ्या गुंडांची आणि पुंडांची मक्तेदारी होऊन बसले आहेत. या सार्वजनिक

गोंधळातून, ध्वनिप्रदूषणातून सर्वसामान्यांची सुटका उच्चतम न्यायालयानी केली. साहजिकच या बकवास आणि स्वार्थी नेतृत्वाची कुचंबणा झाली. न्यायालयाचा हा निर्णय ही या उत्सवाला पुन्हा एकदा लोकमान्यांना अपेक्षित असलेल्या प्रबोधन चळवळीचे स्वरूप प्राप्त करून देण्याची संधी होती. आमच्या सरकारला आणि राजकीय नेतृत्वाला मात्र त्याच्या सध्याच्या 'शिमगा' स्वरूपाचे रक्षण करण्याची अहमहमिका आणि घाई. गेले काही वर्ष अचानक आमची वृत्तपत्रे आणि दूरदर्शन यांना या उत्सवाबद्दल आपुलकीही वाटायला लागली. कुठलीही स्वच्छ भूमिका न घेता एका प्रकारे या धिंगाण्याची आणि गोंगाटाचे समर्थन करणारी भूमिकाच बुहसंख्य माध्यमांनी घेतलेली दिसली. जे गणपती उत्सवाचे तेच कृष्णाष्टमी आणि नवरात्रीचे. आजच्या उत्सवांचा आणि धर्माचा काडीचाही संबंध नाही. दुर्दैव आहे या समाजाचे की, संपूर्ण देशाला राजकीय आणि सांस्कृतिक नेतृत्व देणाऱ्या पुणे शहरातील काही महत्त्वाच्या गणपती उत्सवानीच एका अनिष्ट आणि संस्कृतीशून्य उत्सवाच्या स्वरूपाचे समर्थन करावे !

ही अशांतता फक्त उत्सवाचीच नाही तर ते हिंदूंच्या संवेदनांचे अधःपतनच आहे. उठसूठ पाश्चात्त्य समाजाला संस्कृतीहीन म्हणायच्या आधी, आपण कुठली संस्कृती वाढवित आहोत हे बघणे हिताचे ठरेल.कुठल्याही इतर धर्मीयांपेक्षा हिंदू समाजाला आज आत्मपरिक्षणाची सर्वात अधिक गरज आहे हे जेव्हा त्यांच्या लक्षात येईल तोच सुदिन!

✧✧✧

# संपादकीय...

## { जानेवारी २००६ }

नुकत्याच झालेल्या विधान परिषदेमध्ये (डिसेंबर २००५, नागपूर) अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा पारीत झाला. हा कायदा पारीत होण्याकरता प्रयत्नशील असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अ.नि.स.) साहजिकच आपल्या विजयाचे ढोल वाजवले तर नवल वाटायला नको. अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत दुमत असण्याचे काहीच कारण नाही. आणि म्हणूनच अशा कायद्याचं स्वागतच करायला हवे. मुख्यप्रश्न मात्र वेगळाच आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी दिलेली भाषणे, त्यांचे लिखित साहित्य यामधून अंधश्रद्धा संदर्भात त्यांचा दृष्टीकोन सर्वांनीच समजावून घ्यायला हवा. जादूटोणा, चेटूक, अध्यात्मातील बुवाबाजी, देवदेवतांचा गैरवापर इ. गोष्टींच्या बाबतीमध्ये सुद्धा मतभेद असण्याचे काहीच कारण नाही. समाजाला फसवणाऱ्या अशा प्रवृत्तींचे निर्मूलन होणे आवश्यकच आहे. परंतु अ. नि. स. या संस्थेची भूमिका ही याही पलीकडे काही मूलभूत सिद्धांतांशी निगडित आहे. देवावरील विश्वास, अध्यात्म, ज्योतिष आणि या संदर्भात येणाऱ्या विचार, तत्त्वज्ञान आणि शाखा याचमुळी थोतांड आहेत असे त्यांचं म्हणणं आहे. शिवाय धर्म हा विज्ञान विरोधी आहे आणि विज्ञाननिष्ठ व्हायचं तर नास्तिक होणं आवश्यक आहे, हाही अ. नि. स.चा महत्त्वाचा सिद्धांत आहे. डॉ. श्रीराम लागू, श्याम मानव, निळू फुले, सदाशिव अमरापूरकर, स्वतः डॉ. दाभोळकर इ. अ. नि. स. च्या प्रमुख विचारवंतानी आपली प्रामाणिक मते या संदर्भात अनेक वेळा मांडली आहेत.

खरं म्हणजे, जडवाद आणि अध्यात्म यांचा झगडा नवीन नाही. विशेषतः गेल्या काही शतकांतील साम्यवाद, समाजवाद इ. सिद्धांत पद्धतींनी आपल्या मूलभूत विचारसरणीचा तो एक अविभाज्य भागच केला आहे. प्रत्यक्ष सिद्धान्त

समजावून सांगून हा विषय लोकांना पचनी पडणार नाही म्हणून सुधारणेचा मुखवटा घेतलेल्या अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमांतून, खरं म्हणजे लोकांची फसवणूक आणि दिशाभूल करूनच युक्तीवाद, तर्कवाद सफाईने वापरून मूळ जडवादी सिद्धांतच लोकांच्या माथी मारण्याचा हा प्रयत्न असतो. स्त्रीमुक्तीची चळवळ असो, पर्यावरणवाद असो किंवा मानवी हक्कांची संघटना असो, या सगळ्याच मुखवट्यांचा वापर करून जडवाद, आणि याचेच बाह्यअंग असलेले साम्यवाद, समाजवाद या वैचारिक सिद्धांताचा प्रभाव लोकांवर टाकण्याचा हा प्रयत्न असतो.

गेली अनेक शतके निदान हिंदू धर्म तरी नेतृत्वहीन आहे. संत, महंत, अध्यात्मिक गुरू अशी बिरुदे लावणाऱ्या अनेक महाभागांच्या उक्ती आणि कृती मध्ये मोठी तफावत दिसून येते. शुद्ध अध्यात्मिक मार्गदर्शन हे अशा ठिकाणी फारच कमी बघायला मिळते. गेल्या काही शतकांतील अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या नावांनी स्थापन झालेल्या संस्था आणि त्यांच्या अनुयायांचे आचरण, त्यांच्यामधील विकोपाला गेलेली भांडणे, या सर्वच गोष्टी या व्यक्ती आणि संस्थांचा दांभिकपणा दाखवण्यास पुरेशा आहेत.

भारतीय विचारधारेतील दर्शने असोत किंवा १२ व्या शतकानंतरचा विशेष विकसित झालेला भक्तिमार्ग असो, मानवी जीवन सुसह्य, आनंदमय, समाधानी करणारी ती तत्त्वज्ञाने आहेत. या संदर्भात वाङ्मयही उपलब्ध आहे. सुदैवाने भारतामध्ये उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अनेक संतमहात्म्यांनी लोकभाषेमधेही याचे लिखाण करून ठेवले आहे.

जीवन म्हणजे गणित नाही. मानवी संबंध हे इतके गुंतागुंतीचे असतात की, त्यावर तर्कसंगत उत्तर शोधणं हेही शक्य नसते. जितक्या व्यक्ती तितक्या प्रवृत्ती. तरीही धर्माच्या माध्यमातून रीतीरिवाज, नीती-अनीती, पाप-पुण्य, चांगलं-वाईट इ. अनेक संकल्पनांतून अशा चांगल्या-वाईट प्रवृत्तींवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केलेला असतो. या प्रत्येक वागणुकीचा मला आता काय फायदा? इतका सीमित विचार करून चालत नसतो. जडवाद हा आत्मकेंद्रित जीवनशैली शिकवतो. मी आणि माझा होणारा फायदा यापलीकडे तो काहीच विचार करू शकत नाही. आज खा, प्या, मजा करा, उद्याची चिंता आज कशाला ? हाच मूलमंत्र अशा सिद्धान्तांचा गाभा आहे. पाश्चात्त्य प्रगत जगामध्ये आधुनिकतेचा भाग म्हणून या जीवनशैलीचा स्वीकार गेले काही शतके केला गेला. लग्नसंस्था, त्यातून निर्माण होणारी कुटुंबसंस्था, नातीगोती, आणि याला पूरक असणाऱ्या अनेक सामाजिक संस्था आज तेथे बहुतांशी

नष्ट झाल्या आहेत. युरोप आणि अमेरिकेमध्ये कुमारी मातांचं प्रमाण ३० ते ५०% पर्यंत गेले आहे. आत्मकेंद्रित जीवनशैलीमुळे स्त्री आणि पुरुष एवढे स्वतंत्र झाले आहेत की, एकमेकांची एकमेकांना गरजच राहिलेली नाही. असा आभास निर्माण झाला आहे. याच भूमिकेतून आज समाज जगताना दिसतोय. या स्वातंत्र्याचाच एक भाग हा मोठ्या प्रमाणावर दिसणारा समलिंगी शरीरसंबंध ठेवणाऱ्या लोकांचा आहे. पाश्चात्त्य जग ही अशा सिद्धांतांची प्रयोगशाळा धरली तर तेथील बालकांवर होणारे अत्याचार, बलात्कार, स्त्रीयांचे योनशोषण, अमली पदार्थांचे प्रचंड सेवन, ज्येष्ठ नागरीकांना आलेला एकटेपणा आणि या सर्वांतूनच येणारे वैफल्य, निराशा या गोष्टी डोळ्यांआड करता येणार नाहीत. या राष्ट्रांची असलेली प्रचंड सुबत्ता कदाचित काही काळ या उद्ध्वस्त समाजाचे पोषण करू शकेल; पण ते काही अल्प काळच. अशा देशांमधील विचारवंत, शास्त्रज्ञ यांना या सर्वच गोष्टींची जाण झाली असून अशा जीवनशैलीचे धोके ते आपल्या लोकांना आता समजावून सांगताना दिसतात.

दुर्दैवाने आपला समाज मात्र त्यांनी टाकून दिलेल्या सर्वच गोष्टींचे अंधानुकरण करताना आज दिसतो. आपले दूरदर्शन, वृत्तपत्रे आणि सिनेमे यांनी तर हा समाज नासवण्याचा धंदा केवळ आपल्या फायद्यापोटी जोरात चालू ठेवला आहे. लठ्ठपणा कमी कसा कराल? उंची कशी वाढवाल? मलम लावून त्वचा नितळ आणि गोरी कशी करता येईल ? अंतर्वस्त्राच्या जाहिरातींमधून धादांत खोट्या पौरुषत्व वाढीच्या कथा, अशा अनेक शुद्ध फसवणूक करणाऱ्या जाहिराती लाखो लोकांची दिशाभूल करत आहेत. चेटूक आणि जादूटोण्यापेक्षा असल्या जाहिरातबाजींमुळे फसवणूक होणाऱ्यांची संख्या ही कित्येक हजार पटींनी अधिक आहे. परंतु या जाहिराती एका जीवनशैलीला पोषक असल्यामुळे त्यांचा समावेश अंधश्रद्धेत होत नाही.

आज या सर्वच गोष्टींचा व्यापक विचार होण्याची गरज आहे. अ. नि. स. चा दांभिकपणा आणि वैचारिक भूमिका, माझ्या ''शोध अंधश्रद्धेच्या'' तसेच वायुदलातील एक अधिकारी श्री. ओक यांच्या ''बोध अंधश्रद्धा'' या पुस्तकांतून साधार मांडलेली आहे. धर्माचा वापर करून निर्माण झालेल्या अंधश्रद्धे बरोबरच विज्ञानातून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धेचा बिमोड होणेही आवश्यक आहे. अंधश्रद्धा समाजापेक्षा श्रद्धाहीन समाज अधिक अमानुष होऊ शकतो. समाजाने या सर्व गोष्टींचा नीट विचार करूनच योग्य तो निर्णय घ्यायला हवा. जे कायदे अंमलात आणता येऊ शकत नाहीत अशा कायद्यामुळे भ्रष्टाचार बोकाळतो. प्रबोधन हा एकच यावरचा मार्ग आहे.

✧✧✧

# धर्म का हवा ?

{ एप्रिल २००६ }

आज भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती बघून मन उद्विग्न होते. एकीकडे आर्थिक परिस्थिती नक्कीच सुधारत असताना बहुसंख्य भारतीय समाजामध्ये नीती आणि मूल्य या घटकांनी चिंताजनक नीचांक गाठला आहे. बहुसंख्य भारतीय हा हिंदू आहे, आणि म्हणूनच ही अधोगतीची परिस्थती ही हिंदू समाजाचीच आहे असं म्हणावंस वाटतं. क्षणाक्षणाला आपल्या भव्य, थोर आणि उदात्त परंपरेचे गोडवे गात असताना आपली एवढी अधोगती का झाली, याचा हा समाज विचारच करायला तयार नाही. गेल्या २००० वर्षांत झाले नसतील एवढे संत, महंत, योगाचार्य, पंडित, सध्या या देशामध्ये संचार करत आहेत. तरीही ही अधोगती वेगाने चालू आहे. या सर्वच संत आणि महंतांच्या उक्ती आणि कृतीमधे मोठी विसंगती आहे. आणि हीच आपल्या समाजाची आजची खरी शोकांतिका आहे. आपले बहुसंख्य उच्चपदस्थ, श्रद्धास्थानं, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक नेतृत्व हे नीतिहीन, भ्रष्ट तर आहेतच; पण ते एका वैचारिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरही उभे आहे.

समाज हा अनेक व्यक्तींनी बनलेला असतो. व्यक्तीची उन्नती किंवा अधोगती हीच त्या समाजाची उन्नती किंवा अधोगती असते. ही व्यक्ती म्हणजे सुद्धा एकच ठरलेली वस्तू नसून ती स्त्री, पुरुष, अनेक वयोगट, त्याला सुसंगत भिन्न सामाजिक जबाबदाऱ्या, या सर्वांनी मिळून बनलेली असते. 'जेवढ्या व्यक्ती तेवढ्या प्रकृती' असे आपण नेहमीच म्हणतो. इतक्या भिन्न प्रवृत्तींना किमान न्याय मिळेल, त्यांच्या मधील व्यवहार सुरळीत होतील, या सर्व भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या क्षमतांचा किमान फायदा दुसऱ्याला होईल, या करता एका आचार संहितेचं पालन करावं लागतं. या करताच अनेक सामाजिक संस्था निर्माण कराव्या लागतात. जीवनाच्या

वेगवेगळ्या टप्प्यांवरील व्यक्तींना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. हा सगळा व्यवहार संतुलितपणे पार पाडावा म्हणून पाळावी लागणारी आचारसंहिता म्हणजेच 'हिंदूं'ची 'धर्म' ही संकल्पना, देव आणि उपासना पद्धती ही धर्माचा भाग नक्कीच आहे, पण 'धर्म' ही कल्पना तेवढ्या पुरतीच सीमित नाही. ईश्वराचे अस्तित्व मान्य करणाऱ्याला किंवा ते अस्तित्व नाकारणाऱ्याला, ते दोन्हीही समाजाचेच घटक असल्यामुळे या आचारसंहितेचा आदर करावा लागतो. इतकी व्यापक आचारसंहिता दोन-चार शतकांच्या अनुभवांतून निर्माण होऊ शकत नाही. आणि म्हणूनच या आचारसंहितेचा कालपट हा मोठा असायला लागतो. एखाद्या व्यक्तीच्या क्षमता किंवा त्याच्या अनुभव कक्षा या त्याच्या आयुष्यापुरत्याच मर्यादित असतात. या आपल्या सीमित आयुष्यात, आपण सगळीच सुखदु:ख आणि सामाजिक अनुभव घेतले आहेत असा दावा कोणालाच करता येणार नाही. समाज किंवा काळ हा स्थिरही नसतो. तो प्रवाही असतो. साहाजिकच अनेक सामाजिक संदर्भ बदलत असतात. या सर्व अनुभवांचं प्रतिबिंब त्या आचारसंहितेमधे पडावं लागतं. समाज हा भिन्न प्रवृत्ती, क्षमता, आणि अनुभव संचितांनी बनलेला आहे, हे वास्तव म्हणूनच या संहितेला स्वीकारायला लागतं. सर्व 'समाज' हा समान आहे हे 'अवास्तव' म्हणूनच अशा संहितेला स्वीकारता येत नाही. हे 'अवास्तव' जी संहिता स्वीकारते तेव्हा तो कायदा होतो किंवा राजकीय पक्षांचा जाहीरनामा होतो. आजच्या आपल्या राजकीय पक्षांचे जाहीरनामे आणि कायद्यांनी जी दिवाळखोरी आणली आहे, ती या अशा 'अवास्तव' संकल्पनांचा स्वीकार केल्यामुळेच आहे.

कायद्याचे नियमन हे बाह्य संस्था किंवा व्यक्ती करत असते. धर्म संहितेचे पालन हे त्या व्यक्तीला स्वयं प्रेरणा आणि सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून करायला लागते. नीती अनीतीच्या संकल्पनांचा उदय आणि संदर्भ याच संहितेतून झालेला असतो. मानवी स्वभावातील कमकुवतपणा आणि शक्तिस्थाने लक्षात घेता संहितेचे अधिकाधिक प्रभावी पालन व्हावे म्हणून बक्षीस आणि शिक्षा यांचाही व्यवहारात अवलंब करावा लागतो. या सर्व संकल्पनांची व्यापकता, त्याची आवश्यकता लक्षात घेतली तरच आजचा कायदा आणि हिंदूंची धर्म संकल्पना यातला फरक लक्षात येईल.

कर्मसिद्धान्त, वर्णाश्रम धर्म आणि पुनर्जन्म या हिंदू धर्मसंहितेच्या आधारभूत संकल्पना आहेत. या संकल्पनेमागील आशय आणि विचार, स्थळ आणि काळ छेदून जाणारी त्याची व्यापकता म्हणूनच समजावून घेणे नितांत गरजेचे आहे.

सर्वसामान्य माणसाला या संकल्पना कळतील अशी उदाहरणे, दृष्टान्त यांचाही उगम यातच कसा आहे हे मग लक्षात येते. रामायण आणि महाभारत यामधील व्यक्तिरेखा, त्यांच्यामध्ये झालेला संघर्ष, यातून निर्माण होणारे गहन प्रश्न आणि त्यांची उत्तरे ही मानवी स्वभाव आणि त्यांच्या भिन्न प्रवृत्तींचेच प्रतिबिंब असल्यामुळेच ही महाकाव्ये जणू आपणच जगत आहोत असा अनुभव यामुळेच येतो. समाज निर्मितीमधील त्यांचे महत्त्व म्हणूनच लक्षात घ्यायला लागते आणि यामुळेच आपल्या धर्मसंहितेचा आधार सुद्धा ही महाकाव्ये बनतात.

हिंदूंना आपली आजची परिस्थिती बदलायची असेल तर मोठ्या आत्मपरीक्षणाची गरज आहे. आधुनिकतावाद आणि सुधारणेच्या नावाखाली आपल्या धर्मसंहितेचं आपण संपूर्ण वाटोळ केलं आहे. जुनी व्यवस्था मोडकळीस आलेली आणि नवीन व्यवस्था म्हणजे पाश्चात्त्याचं अंधानुकरण अशा कात्रीत हा समाज सापडला आहे.

लाचार आणि दांभिक समाजाचं नेतृत्वही लाचार आणि दांभिकच असतं. आपली धर्मसंहिता सक्षम आणि व्यापक आहे. त्यामधील मूलभूत संकल्पनांचा आदर करणे आणि त्याप्रमाणे आपली जीवनशैली नियंत्रित करणे याचीच आज फार मोठी आवश्यकता आहे. गेली काही शतके जुलमी आक्रमणं व वसाहतवादाचे आपण बळी आहोत. अत्यंत कल्पकतेने, तर्क आणि युक्तीवादाचा प्रभावी वापर करून आपल्या धर्माबद्दल अनेक गैरसमज आणि न्यूनगंडे निर्माण करण्यात आली. या आक्रमणांचा प्रभावी प्रतिकार करेल असे नेतृत्व आज आपण गमावलं आहे. अराजकतेच्या उंबरठ्यावर उभा असलेला हा समाज म्हणूनच 'सांस्कृतिक' वसाहतवादाला सहज बळी पडताना दिसतो आहे. विवेकहीन, चंगळवादी आर्थिक सुबत्ता, रुचिहीन, मूल्यहीन समाज निर्माण करते. आत्मसन्मान आणि निर्भयतेला आर्थिक निकष नसतात. म्हणूनच विकासाच्या नावाखाली आपण आज कोणती जीवनशैली स्वीकारत आहोत याचा विचार गांभीर्याने करायला हवा. आपल्याला 'इतिहासजमा' व्हायचे नसेल तर 'धर्म का हवा' याचा विचार होणे म्हणूनच गरजेचे आहे.

✧✧✧

# जीवनशैलीचा धर्म

{ जुलै २००६ }

निरोगी शरीर आणि मन ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. हे लिहिणे आणि सांगणे जरी सोपे असले तरी प्रत्यक्षात अशी परिस्थिती सापडणे हे दिवसेंदिवस दुर्मीळच होऊ लागले आहे. चांगले सकस अन्न खाल्लं की शरीर निरोगी होऊ शकतं आणि सुबत्तेमुळे ऐहिक चैनीचे जीवन जगता आलं की मनही सुखावतं, या संकल्पनांतील भ्रांतपणा आता वैज्ञानिक आणि अभ्यासक यांच्या लक्षात येऊ लागला आहे.

गेली काही शतके ही वैज्ञानिक क्रांतीची शतके आहेत. ही क्रांती ही पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि त्यांच्या विचारप्रक्रियांत झालेल्या बदलावर आधारित आहे. १७व्या शतकामधील रेने देकार्त व न्यूटन हे या क्रांतीचे आधारस्तंभ आहेत. 'शरीर' आणि 'मन' या दोन भिन्न गोष्टी असून त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही या देकार्तच्या मतावरच पाश्चात्त्य तत्त्वज्ञान उभे राहिले. अर्थातच भारतीय विचारधारेमध्ये मन आणि शरीर यांचे नाते अतूट आहे. एवढेच नाही तर, चांगल्या आरोग्यासाठी त्यांच्यामध्ये संतुलन आवश्यक समजले गेले. पाश्चात्त्य आणि भारतीय तत्त्वज्ञानामध्ये हा अतिशय महत्त्वाचा फरक आहे. या फरकाचे परिणाम त्यांच्या जीवनशैली आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संस्कृतीवर दिसून येतो. आपल्या जीवनशैलीमध्ये यामुळे आमूलाग्र बदल झाला. आपल्या आवडी-निवडी, सांस्कृतिक संदर्भ, समाजाची जडण-घडण या सगळ्याचीच रचना या बदलाला सुसंगत होईल अशी आपण केली. तशी ती करून घेणे म्हणजेच आधुनिकता आणि सुधारणा असे आपण समजू लागलो. सुदैवाने जीवनशैलीतील झालेला बदल हा शरीर आणि मन या दोघांकरता चांगला नाही हे आता पाश्चात्त्य अभ्यासकांना पटू लागले आहे.

ऐहिक सुख आणि अन्नधान्याची रेलचेल असलेला अमेरिका हा एक देश.

या देशातील जीवन आणि जीवनशैली म्हणजे जणू आदर्श आणि सुखी जीवनाची गुरुकिल्लीच! खाणे-पिणे, संगीत, कला, साहित्य, स्थापत्य या सगळ्यांमध्येच एक अमेरिकन शैली निर्माण झाली. जगातील इतर सर्वच जीवनशैल्या या एकतर मागासलेल्या किंवा असंस्कृत ठरू लागल्या. बघता बघता मानवी अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य यांचे अर्थच बदलू लागले. एवढा सगळा बदल घडूनही अमेरिकेतील माणसाचे शारीरिक स्वास्थ्य आणि मानसिक संतुलन या सर्वांची घसरण होत असल्याचे निष्कर्ष अमेरिकेतल्याच अनेक संशोधकांनी आता सप्रमाण दाखवून दिले आहेत. काही संसर्गजन्य रोग कमी झाले असले तरी जीवनशैलीमुळे अनेक नवीन रोग निर्माण झाले. सकस अन्नाचेही अनियंत्रित सेवन केल्यामुळे निर्माण झालेला लठ्ठपणा हाही अमेरिकेत एक रोग होऊन बसला. भारतीयांनी यापासून धडे घेणे, म्हणजे अशा जीवनशैलीतील धोके समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.

शरीर आणि मन यांच्यामध्ये संतुलन साधून सुखी जीवन जगण्याची कला योगाच्या माध्यमातून भारतानेच जगाला दिली. भारताचे वैद्यक म्हणजे आयुर्वेद हेही रोग निवारणापेक्षा सुदृढ जीवनशैली निर्माण करेल असा आहार, व्यायाम इ. चा आग्रह धरते. भारतीय धर्म हाही अनेक माध्यमांतून आपली जीवनशैली नियंत्रित करतो. बेजबाबदार स्वातंत्र्य स्वैराचार निर्माण करते. खा, प्या, मजा करा, सर्व नियंत्रण झुगारून द्या, असा जडवादी संदेश देणारी अमेरिकन जीवनशैली अनेकदा व्यक्ती आणि समाज यांचा विकास करण्याऐवजी ते उद्ध्वस्त, भकास आणि परावलंबी करते. हा प्रश्न खरे म्हणजे अमेरिका आणि भारत असा नसून, 'अनियंत्रित' सुबत्ता आणि 'नियंत्रित' सुबत्ता यामधला आहे.

अमेरिकेच्या जीवनशैलीचे जसे आपण अंधानुकरण करतो, तसे त्यांच्या प्रामाणिकपणे वैज्ञानिक निष्कर्ष काढण्याच्या पद्धतीकडे संपूर्णत: दुर्लक्ष करतो, धूम्रपानामुळे स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतात हे कळल्यावर धूम्रपानाची सांस्कृतिक भलावण बंद करणे आणि सामाजिक नियंत्रण आणून तंबाखूचे सेवन कमी करणे, याकरता ते करत असलेल्या प्रयत्नाकडे आपण दुर्लक्ष करतो. पर्यावरण असो किंवा कुमारी मातांचा प्रश्न असो, आजच्या अमेरिकेतील अभ्यासकांनी त्याचे केलेले विवेचन हे अतिशय मोलाचे आहे. निरोगी जीवनशैली निर्माण होण्याकरता हवी असलेली सांस्कृतिक आणि सामाजिक रचना आपल्या धर्माने फार पूर्वीच देऊन ठेवली आहे. आपल्या धर्मामध्ये जीवनशैलीची सर्व अंगे अंतर्भूत आहेत. भारतीयांना आपल्या धर्माचे हे खरे स्वरूप जेव्हा उमगेल तेव्हाच भारतामध्ये खरा प्रबोधनाचा काळ सुरू होईल.

✧✧✧

# इस्लाम - एक परिवर्तनीय पंथ ?

{ ऑक्टोबर २००६ }

आदरणीय पोप बेनेडिक्ट यांनी जर्मनी येथील रेजन्सबर्ग विद्यापीठात दिलेल्या भाषणातील इस्लाम धर्माविषयीच्या उद्‌गारांमुळे जगात खळबळ माजली. (मंगळवार, १२ सप्टेंबर २००६) 'आपला हेतू हा इस्लाम धर्मीयांचा अनादर करण्याचा नव्हता आणि असं काही झालं असेल तर मी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो' असेही त्यांनी नुकतेच सांगून टाकले. पोप बेनेडिक्ट हे कॅथलीक पंथीयांच्या संघटनेच्या अत्युच्च पदावर आहेत. त्यांची विधाने ही नेहमीच गांभीर्याने घेतली जातात. इस्लाम धर्माबद्दलच्या आपल्या विधानांनी गदारोळ माजणार याची कल्पना त्यांना असलीच पाहिजे. म्हणूनच अत्यंत धूर्तपणे आणि शिताफीने, बायझेंथीन राजा मॅन्युअल पॅलीओलॉगस २, यांनी कित्येक शतकांपूर्वी इस्लाम धर्माबद्दल मांडलेले आपले मत, संदर्भ म्हणून पोप यांनी भाषणात वापरले, साहजिकच जेव्हा वादाचा मुद्दा उपस्थित होईल तेव्हा ते माझे मत नसून, दुसऱ्याचे मत मी संदर्भ म्हणून वापरले, याची सोयही त्यांनी करून ठेवली.

सोय म्हणून हे ठीक असले तरी इस्लाम धर्माबद्दल बायझेंथीन राजाने व्यक्त केलेल्या मताची शहानिशा होणे आवश्यक आहे. कित्येक शतकांच्या कालावधीनंतरही पोप महाशयांना हा संदर्भ का द्यावासा वाटला याचाही विचार व्हायला हवा. इस्लाम धर्मीयांनी आपल्याबद्दल असे मत का झाले आहे, याचे आत्मपरीक्षणही करायला हवे.

भारताला इस्लाम धर्म नवीन नाही. तैमुरलंग ते औरंगजेब यांनी स्वत:च किंवा त्यांच्या समकालीन धर्मबांधवांनी लिहून ठेवलेला आपला पराक्रम हे अखिल मानवजातीस कलंकित करण्यास पुरेसे आहेत.

इस्लाम अंतर्गत स्त्रियांचे स्थान काय याचा कधी ऊहापोह होऊ शकतो का? इस्लामेतर सर्व राष्ट्रांमध्ये इस्लाम धर्मीयांचे सामाजिक स्थान आणि इस्लामी राष्ट्रांमध्ये इतर धर्मीयांना मिळणारा सामाजिक दर्जा याबद्दल कधी चर्चा होऊ शकते का ? पोप यांना दिलगिरी व्यक्त करायला लावणारे अनेक उदारमतवादी इस्लामच्या या अंगावर इस्लामी धर्मगुरूशी चर्चा करू शकतात का ? सलमान रजदीपासून 'लज्जा' सारखी कादंबरी लिहिणाऱ्या बंगलादेशीय विदुषीबद्दल फतवे काढणारे हे इस्लामी धर्मगुरूच आहेत ना ?

राग, मत्सर, असहिष्णुता हे मानवी गुण आहेत. कमी-अधिक प्रमाणात दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येक मानव त्यांचा वापर करतच असतो. या मानवी स्वभावाचा वापर दैनंदिन जीवनात किती प्रमाणात करायचा असतो या करता मात्र एक सामाजिक, सांस्कृतिक चौकट लागते. प्रत्येक धर्म कमी-अधिक प्रमाणात अशी चौकट देतच असतो. अन्यायाविरुद्ध चीड आणि राग यायलाच लागतो. आपल्या विरुद्ध झालेली प्रत्येक गोष्ट म्हणजे अन्यायच असतो असेही म्हणून चालत नाही. व्यवहारात धर्म-अधर्म, सत्य-असत्य, न्याय-अन्याय, नीती-अनीती, यांच्या सीमारेषा अस्पष्ट असतात. स्थळ, काळ, सामाजिक, सांस्कृतिक जडण-घडण या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर याचे मूल्यमापन होत असते. व्यक्तिगत, तसेच व्यापक समूहाकरता असे मार्गदर्शन, धर्म किंवा पंथ करीत असतात. धर्माच्या या नियंत्रण आणि अधिकार क्षमतेमध्ये, धर्म संकल्पनेनी लवचिकता आणली नाही तर अशा धर्मसंस्था कालबाह्य व्हायला लागतात. लवचिकता म्हणजे स्वैराचार असाही याचा अर्थ नाही.

एकंदरीतच निसर्ग आणि निसर्गावर अवलंबून असलेले मानवी जीवन यामध्ये परिवर्तन होत असते. बहुतेक वेळा हे परिवर्तन अतिशय सूक्ष्म असते आणि त्याला व्यापक स्वरूप यायला अनेक शतके जावी लागतात. तर काही बदल हे तुलनेने कमी कालावधीत होत असतात. पर्यावरणामध्ये मानवाने केलेल्या हस्तक्षेपामुळे होणारे बदल हे आता आपल्याला समजू लागले आहेत. याचे कारण म्हणजे मानवाची आधुनिक जीवनशैली हे कळल्यावर आपल्या जीवनशैलीमध्ये सुसंगत बदल घडवणे हेच व्यापक हिताचे असते. तसे जर का आपण केले नाही तर अखिल मानवजातच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. समाजाला ते समजावून सांगण्याकरता एकमेकांमध्ये संवाद घडवावा लागतो आणि परिवर्तनाकरता आपली मानसिकता तयार करावी लागते. जी व्यक्ती, जो समूह, जो पंथ किंवा धर्म स्वत:ला अपरिवर्तनीय करून घेतो, तेव्हा ती व्यक्ती, समूह किंवा धर्म इतर

मानवजातीला त्याच्या परिवर्तनशीलतेला बाधा आणत असतो. अशा सुधारणा या सर्वच धर्म/पंथांमध्ये कमी-अधिक प्रमाणात समांतर व्हाव्या लागतात. कारण समाज हा या सर्वांचा मिळून झालेला असतो.

इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मग्रंथांमध्ये इतर धर्मीयांबद्दल संपूर्णत: असहिष्णुता दर्शविली गेली आहे. सर्व वादाचा उगम हा तिथेच आहे. ख्रिस्ती धर्मामध्ये नसली तरी ख्रिस्तिधर्मीयांमध्ये आत्मपरीक्षण करण्याची तयारी आणि सहिष्णुता नक्कीच आहे. युरोपमध्ये प्रबोधनाचे युग हेच मुळात धर्मसंस्थेमधे आलेल्या ताठरपणाच्या विरोधातून सुरू झाले. यातूनच त्यांच्या वैज्ञानिक क्रांतीला सुरुवात झाली. एकीकडे ख्रिस्ती धर्मप्रसारक भारतामधे अमानुष धर्मप्रसाराचे काम करत होते, त्याचवेळी युरोप मधे हिंदूधर्मामधील व्यापक विचारांचा सहानुभूतीपूर्वक अभ्यास होत होता. ख्रिस्ती धर्म जरी परिवर्तनशील नव्हता, तरी अनेक ख्रिस्तीधर्मीय परिवर्तनशील होते.

दुर्दैवाने इस्लाममधे गेल्या १५०० वर्षांमधे अशी प्रक्रिया दिसून येत नाही. 'सुफी' विचार हा सुद्धा एक फार क्षीण विचारप्रवाह इस्लाममध्ये जेमतेम तग धरून आहे. थोडक्यात, इस्लाम धर्म आणि इस्लाम धर्मीय दोघेही अपरिवर्तनशील रहातील तर पोप महाशयांनी दिलेल्या संदर्भामधे काहीच गैर नाही. पोप महाशयांची दिलगिरी किंवा इतर भोंगळ मानवतावाद्यांचे भोकाड पसरणे शुद्ध ढोंगबाजी आहे. यामुळे इस्लाम आणि इस्लामपंथीय अधिक कट्टर होणार आहेत. यातूनच इतर धर्मीयांचा कट्टरपणाही वाढणारच आहे. यामुळे होणारे संघर्षही अटळ आहेत. इतर धर्मीयांनी आपल्यामध्ये खूपच परिवर्तन घडवले आहे. इस्लाममधे अशा आत्मपरीक्षणाची सुरवात जेव्हा होईल तेव्हा असे संघर्ष टळू शकतील. पुढील काळच या विवेचनातील सत्यता पडताळू शकेल.

पोप यांनी दिलेला संदर्भ "Show me just what Mohammad brought that was new, and there you will find things only evil and inhuman, such as his command to spread by the sword, the faith he preached".

✧✧✧

# चमत्कार, अंधश्रद्धा आणि विज्ञान

{ जानेवारी २००७ }

मानवी शरीर आणि बुद्धीच्या क्षमतांच्या सीमा शोधणं हे एक महाकठीण काम आहे. सर्वसामान्य मनुष्य आपल्या अशा क्षमतांचा दैनंदिन जीवनांत नेहमीच कमी-अधिक प्रमाणात वापर करत असतो. सामान्य माणसांनी दाखवलेल्या असामान्य क्षमतांच्या बातम्याही वृत्तपत्रांतून नेहमीच छापून येत असतात. सर्वसाधारणपणे अशा गोष्टी या, अचाटशक्ती किंवा स्मरणशक्तीशी निगडित असतात. परवाच पुणे येथील २।। वर्षांच्या एका मुलाने उत्कृष्ट तबला वाजून दाखवला. या गोष्टी नुसत्या आश्चर्यकारकच नसतात, तर आपल्या विज्ञान समजुतीलाही त्या आव्हान देत असतात. अशा गोष्टी किंवा व्यक्तींचा तटस्थपणे सर्व उपलब्ध साधनांनी अभ्यास करणे आणि या घटनांची कारणमीमांसा शोधणे हे एक अतिशय कठीण काम होऊन बसते. अशा गोष्टींना चमत्कार समजून किंवा त्यांचं अस्तित्व नाकारून त्या अंधश्रद्धेचा भाग आहेत असं समजणे, या दोन्हीही गोष्टी धोकादायक आहेत.

उत्तर पाकिस्तानमधील काही कुटुंबांमध्ये दुःख सहन करण्याची क्षमता असामान्य असल्याचे काही शास्त्रज्ञांना दिसून आले. किंबहुना त्यांना कुठल्याही बाह्य उत्तेजनामुळे दुःख होत नसल्याचे आढळून आले. शारीरिक दुःख हे माणसाला मिळालेले एक संरक्षण कवच आहे. रोग किंवा अपघातामुळे होणारे दुःख हे तापदायकच असते. वैद्यकशास्त्रामध्ये दुःख कमी करणारी अनेक औषधं आहेत. पण दुःख संपूर्णतः नाहीसे करणारे औषध अजून सापडलेले नाही. दुःख का व कसे होते हे कळले तरच त्यावर उपचार शोधता येईल. पाकिस्तानमधील या कुटुंबावरती केंब्रिज, इंग्लंड येथील प्रयोगशाळांमधे संशोधन करण्यांत आले.

या व्यक्तींमधे दुःखाचा अभाव का आहे हेही त्यांनी शोधून काढले आणि एकदा ही माहिती मिळाल्यावर त्यांचा प्रयत्न आता दुःखावर नवीन औषध शोधण्याचा चालू आहे. या सर्वच घटनेपासून आपण बोध घेणे आवश्यक आहे.

'भानुदास गायकवाड' हा बारामतीचा एक साधा मनुष्य; तो ज्या गोष्टींना हात लावतो किंवा त्याच्या हातावरून जर पाणी सोडले तर ते गोड होते. भानुदासांने स्वतः कधीही आपल्याला काही दैवी-शक्ती प्राप्त झाली आहे असा दावा केलेला नाही. अशा गोष्टी घडूच शकत नाहीत. अशी ठाम अंधश्रद्धा असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीनी 'भानुदास' हे थोतांड आहे हे जाहीर करून टाकले. भानुदासाने आपली क्षमता उघडपणे लोकांसमोर सादर केली आहे. मी स्वतः भानुदासाचा सखोल अभ्यास करून भानुदास हा प्रामाणिक असल्याचे दाखवून दिले आहे. 'शोध अंधश्रद्धा' या माझ्या पुस्तकात एक संपूर्ण प्रकरणच लिहून अंधश्रद्धा समितीची थापेबाजी आणि त्यांनी लोकांची केलेली फसवणूक सप्रमाण दाखवून दिली आहे. खरं म्हणजे भानुदासवर अत्याधुनिक वैज्ञानिक चाचण्या केल्या तर जैव शास्त्रातील एखादे कोडेही उलगडू शकेल.

वास्तवाचे अस्तित्व नाकारणे म्हणजे अंधश्रद्धा दूर करणे नाही. आपल्याकडील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ हा जडवाद आणि नास्तिक वादाच्या प्रचाराचा एक भाग आहे. समाजसुधारण्याचा त्याचा काडीचाही संबंध नाही. आज देवावरील अंधश्रद्धेपेक्षा विज्ञानवरील फाजील श्रद्धेमुळे समाजाचे अधिक नुकसान होत आहे. खरा विज्ञानवाद जोपासायचा असेल तर, असल्या फाजील अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांना समाजाने दूर ठेवणे जास्त योग्य. आता तर ही मंडळी सरकारवर असा कायदा करण्याकरिता दबाव टाकत आहेत. अनेक भोंदूबाबा समाजाला फसवत असतात ही गोष्ट खरी आहे. पण प्रचलित कायदा आणि प्रबोधन हे यांना आळा घालण्यास समर्थ आहे. पण देवावर विश्वास किंवा देवळांत जाणे हीच अंधश्रद्धा आहे अशी समजूत करून घेणाऱ्यांना, ना श्रद्धा समजली ना अंधश्रद्धा उमगली.

विज्ञानातील मूलभूत संकल्पना तटस्थ असतात. निसर्गाची सर्वच रचना, त्यामधील असलेल्या घटकांचा परस्पर संबंध, यामुळे निर्माण झालेले संतुलन, मानव आणि अन्य प्राणिजनांचे त्यामधील स्थान, या सगळ्यांच्या मुळाशी याच मूलभूत संकल्पनांचे अस्तित्व असते. उपनिषद लिहिणाऱ्या ऋषींनाही हेच मूलभूत प्रश्न भेडसावत होते. अर्थातच यामधे पौर्वात्यांचा दृष्टीकोन हा

पाश्चिमात्यांपेक्षा निश्चितच वेगळा आहे. हा वेगळा दृष्टीकोन समजावून घेणे हे फार महत्त्वाचे आहे. धर्मसंकल्पनेच्या मुळाशी सुद्धा हाच फरक अस्तित्वात आहे. ''मनुष्य'' हाच धर्माचे आणि विज्ञानाचे  माध्यम आहे. धर्म किंवा विज्ञान संकल्पना तर्कक्रमाने समजलेला मनुष्य, त्याचा दुरुपयोग करणार नाही अशी काहीही खात्री नाही. आजच्या पर्यावरणाचा प्रश्न हा अशा नैसर्गिक साधनांच्या अविवेकी वापरातूनच निर्माण झालेला आहे. म्हणूनच धर्माला काय किंवा विज्ञानाला काय नीती-अनीतीच्या चौकटीत बसवावे लागते. नीती-अनीतीचा संदर्भ हा सांस्कृतिक असतो.

वास्तवामध्ये धर्म हा विज्ञानाच्या आड नाही किंवा विज्ञान धर्माच्या आड नाही. दोघांचेही विवेकी संतलुन हेच समाजाला अधिक उपकारक आहे.धर्मवादी आणि विज्ञानवादी हे ज्यावेळेला या गोष्टींची जाण करून घेतील त्याचवेळी या दोन्हीही गोष्टींच्या अतिरेकापासून समाज वाचू शकेल.

✧✧✧

# लैंगिक शिक्षण आणि विज्ञान

{ एप्रिल २००७ }

''वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवा, विज्ञानवादी व्हा'' हा मंत्र सांगितला जात नाही असा दिवस आता राहिलेला नाही. विशेषतः धर्म किंवा देऊळ यांच्या लोकप्रियतेवरती जेव्हा बोलले किंवा लिहिले जाते तेव्हा तर या उत्साहाला उधाण आलेले असते. यातच लेखक किंवा चर्चा करणारा मानसशास्त्रज्ञ, समाजसुधारक, खगोलशास्त्रज्ञ किंवा स्त्री-सुधारक वगैरे असेल तर मग विचारायलाच नको.

समाज-जीवन सुसह्य व्हावे म्हणूनच काही पद्धती, संकेत, नियम इ.ची निर्मिती झालेली असते. समाज सुसंस्कृत होतो तेव्हा तो आपल्यावर अधिक नियंत्रण लादून घेतो. आजही अमेरिका, युरोपियन देशांमध्ये व्यवसाय, औषधनिर्मिती, माध्यम यावर एवढी नियंत्रणे आहेत की, या व्यवस्थेला 'मुक्त अर्थव्यवस्था' का म्हणावे असा प्रश्न पडतो!

मुक्तता किंवा स्वातंत्र्य खऱ्या अर्थानी जगवण्याकरता प्रबुद्ध, विवेकी समाज निर्माण करायला लागतो. आणि असा दृष्टीकोन ठेवून जेव्हा समाजसंस्थांची निर्मिती केली जाते तेव्हा अनेक वेळेला व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होतो. व्यापक सामाजिक संतुलना करिता ते अनिवार्य असते.

बहुसंख्य मानव हा जननक्षम असतो. तो जन्माला येतो त्यावेळेलाच त्याला लिंग प्राप्त झालेलं असते. नैसर्गिकरित्या ही लिंगक्षमता जरी प्राप्त झालेली असली तरी त्यांच्या क्षमतांवर आणि वापरांवर, समाजसंस्था, नीती-अनीती

यांच्या माध्यमातून नियंत्रणे घातलेली असतात. यामधे वैज्ञानिक क्षमता, स्वातंत्र्य आणि सामाजिक नियंत्रण यांची गफलत घालून चालत नाही.

गेली हजारोवर्षे सुसंस्कृत समाज स्त्री-पुरुष संबंध 'लग्न' या संस्थेतून नियंत्रण करत आला आहे. मानवांची लैंगिक भूक आणि क्षमता यांची इतकी सुंदर रचना सुरवातीला ज्या मानवसमुहात निर्माण झाली त्यांचे कौतुक करायला हवे.

गेल्या शे-दीडशे वर्षांमध्ये अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि आर्थिक सुबत्ता आली. हे देश महासत्ता झाले आणि आपल्या या सुबत्ता आणि स्थैर्याला जगातील कुठलीच ताकद धक्का लावू शकत नाही अशी त्यांची खात्री झाली. १९व्या शतकापर्यंत गुलामगिरी आणि वसाहतवादाचा पुरस्कार करणारे हे देश जगाला 'स्वातंत्र्य' शिकवू लागले. त्यांच्या स्वतःच्या संस्कृतीमध्ये स्वातंत्र्याच्या भ्रामक कल्पनेमुळें स्वातंत्र्याचे परिवर्तन स्वैराचारांत झाले. पराकोटींच्या व्यक्तिस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य, आणि स्त्री-स्वातंत्र्य यांच्या कल्पनेतून 'आत्मकेंद्रित' समाज निर्माण झाला. असे बेजबाबदार स्वातंत्र्य काही दशकं तरी फारशी समस्या निर्माण करीत नाही. परंतु सर्व समाजच जेव्हा 'स्वैराचारी' आणि 'आत्मकेंद्रित' होतो तेव्हा स्त्री-पुरुष संबंध, कुटुंब आणि लग्नसंस्था यांची वाताहत होते. येणारी नवीन पिढी व्यसनाधीन होऊ लागते. हा सर्व गोंधळही सुबत्ता असली तर काही काळ टिकू शकतो. यामुळे व्यक्तीची पर्यायाने समाजाची जशी हानी होत असते, तशीच अनियंत्रित उपभोगाच्या लालसेमुळे नैसर्गिक संपत्ती आणि पर्यावरणाचीही हानी होत असते. गेली काही दशकं अमाप व्यक्ती-स्वातंत्र्य उपभोगल्यावर या जीवनशैलीचे तोटे आणि त्यामुळे सर्वांचेच होणारे नुकसान, पाश्चात्त्य संस्कृतीला आता उमगू लागले आहे.

लग्नसंस्था बरबाद केल्यावर स्त्री-पुरुष संबंधावर कुठलेच नियंत्रण राहिले नाही. यामुळे निर्माण होणारी अपत्ये संयुक्त पालकत्वाच्या छत्रापासून दूर फेकली गेली. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. अशी अपत्ये निर्माण करणाऱ्या आईवडिलांना खूप स्वातंत्र्य मिळाले पण या अपत्यांची शारीरिक आणि मानसिक परिस्थिती खराब झाली. व्यसनाधीनता आणि गुन्हेगारी त्यांच्यामधे मोठ्या प्रमाणावर बोकाळली. संस्कारक्षम वयामध्ये मायेचा ओलावा न मिळालेली ही पिढी सगळ्या जगाकडेच एक तिरस्कार आणि बदल्याच्या भावनेतून बघायला

लागली. यांतूनच कुमारी मातांचे प्रमाण वाढले. यावर उपाय म्हणून शाळांमधून लैंगिक शिक्षणाला सुरवात झाली. गर्भ निरोधक गोळ्या, निरोधचा वापर इ. अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना शिकवण्यात येऊ लागल्या. खरं म्हणजे 'आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी' अशातला हा प्रकार होता. २० जानेवारी २००७ च्या ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये या शिक्षणाचा परामर्श घेणारा एक वैज्ञानिक शोध-निबंध प्रकाशित झाला आहे. याचे निष्कर्ष धक्कादायक आहेत. इतके वर्ष दिलेल्या या शिक्षणामुळे शालेय मुलींमध्ये गर्भधारणा आणि गर्भपात यांच्या संख्येमध्ये काहीही बदल न पडल्याचे आढळून आले आहे. बाटली बाहेर काढलेल्या या राक्षसाला आता परत बाटलीबंद कसे करायचं याचे उतर सापडत नाही. पण उत्तराकरता जीवाचा आटापिटा करून पळापळ चालू आहे. एकंदरीतच या स्वैराचारी जीवनशैलीमुळे शरीर आणि मनाची होणारी हानी वैज्ञानिकांनी अनेक शोधनिबंधांतून दाखवून दिली आहे. पण विज्ञानाला विचारतो कोण? पदार्थ, रसायन किंवा जैवशास्त्र म्हणजे तेवढेच विज्ञान. मन, मानवीसंबंध, नातीगोती, समाजसंस्था, संस्कृती यांचा विज्ञानाशी संबंध काय?

दुर्दैवाने पाश्चात्त्यांचे सर्वच क्षेत्रांमधे अंधानुकरण करणारा भारतीय समाज यामुळेच आज नासवला गेला आहे. वृत्तपत्रांमधून आणि दूरदर्शन वरून मानसशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि बहकलेले स्त्रीमुक्तीवादी आजही लैंगिक शिक्षणाचा आग्रहाने पुरस्कार करताना दिसतात. खरं म्हणजे आजच्या वृत्तपत्रांमधील स्त्रीची वस्त्र गळती, सर्व दूरदर्शन मालिकांमधून दिसणारी अनैतिक नात्यांची भलावण आणि सिनेमामधील भयावह, हिडीस गाणी या व्यतिरिक्त वेगळ्या लैंगिक शिक्षणाची गरज आहे का? आपल्या इतका दांभिक आणि भोंगळ समाज जगाच्या पाठीवर कुठेही नसेल.

'नियंत्रण' हा लैंगिक शिक्षणाचा मूळ आत्मा आहे. पण त्याकरता चकार शब्दही उच्चारायचा नाही. एड्स संबंधातल्या जाहिराती म्हणजे कहर आहे. काही अपवाद वगळता एड्सची लागण ही स्वैराचारी लैंगिक संबंधांतून झालेली असते. थोडा वेळ 'मजा' आणि आयुष्यभर 'सजा' असा प्रकार असतो. या रुग्णांना योग्य उपचाराचा अधिकार मिळणे वेगळे आणि त्यांची सामाजिक भलावण करणे वेगळे. या सर्वच जाहिराती या कल्पकता हीन आणि लैंगिक स्वैराचाराला अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणाऱ्या आहेत. लैंगिक शिक्षणाचा आत्मा सांभाळणाऱ्या सर्व सामाजिक संस्था उद्ध्वस्त करून आज दिले जाते ते लैंगिक

शिक्षण नसून, अनियंत्रित शारीरिक भुकेचे शमन करण्याकरता वापरायच्या साधनांची बाजारी माहिती आहे. यामुळे भूक कमी न होता ती अधिक विकृत स्वरूप धारण करते. पाश्चात्त्य समाजाला उमगू लागलेले हे सत्य, भारतीय समाज मात्र डोळ्याआड करू पाहतो आहे.

आज गरज आहे ती खऱ्या विज्ञानाची. विज्ञानाची झूल पांघरलेल्या विज्ञान भाटांची नाही.

✧✧✧

# स्वातंत्र्य की स्वैराचार ?

{ जुलै २००७ }

''गर्भधारणेच्या सुरुवातीच्या काळामध्ये स्त्रीवर मानसिक-शारीरिक तणाव असेल तर त्याचे विपरीत परिणाम अपत्यावर होतात,'' ही बातमी गुरुवार ३१ मेच्या ''The Guardian'' या इंग्लंड मधील वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर झळकली. याच कालावधीत ब्रिटिश सरकारच्या स्वास्थ्य विभागाने गरोदर स्त्रियांनी मद्यपान व धूम्रपान करू नये असाही सल्ला दिला. एवढेच काय, पण गर्भधारणा अपेक्षित असेल त्या कालावधीतही स्त्रीने आपली जीवन शैली, जेवण-खाण इ. गोष्टींवर नियंत्रण ठेवावे असेही सुचविण्यात आले. प्रगत आणि पुढारलेपणाचा टेंभा मिरवणारा पाश्चिमात्य समाज आणि त्यांचे अंधानुकरण करणारे भारतीय, यांना हे वैज्ञानिक सत्य जरी आज कळलं असलं, तरी भारतातील तथाकथित महिलेला मात्र याची जाण परंपरेनीच आलेली आहे. या वैज्ञानिक सत्यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवाचे परस्परावलंबीत्व.

आपण सगळेच जन्मापासून मृत्यूपर्यंत एकमेकांवर अवलंबून असतो. म्हणून यातून निर्माण होणाऱ्या नात्यागोत्यावर कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक नियंत्रणे असावी लागतात. स्वातंत्र्याच्या नावाखाली प्रत्येक व्यक्ती जर आत्मकेंद्रित आणि स्वैराचारी बनेल, तर सर्व समाजातील प्रत्येक घटकालाच त्याची किंमत मोजावी लागेल.

अपत्य निर्मिती ही एक अत्यंत गंभीर बाब आहे. जीवनातल्या एका परमोच्च आनंदातून त्याची निर्मिती होते. ही निर्मितीही परस्परावलंबी आहे. आज आपल्याला आनंद हवा, पण आनंदातून निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या नकोत.

अशा जबाबदार समाजाची निर्मिती ही एका दिवसात किंवा एका शतकांत होत नसते. तो एक प्रदीर्घ प्रयत्न असतो.

२० व्या शतकाच्या मध्यावर पाश्चात्त्य देशामध्ये, विशेषतः अमेरिकेमध्ये प्रचंड सुबत्ता आली. याचा परिणाम म्हणून अनियंत्रित स्वैराचारी जीवनपद्धती म्हणजेच 'प्रगती' असा संकेतही रूढ झाला. सर्व सामाजिक आणि धर्मसंस्थांची नियंत्रणे मोडीत काढण्यात आली. अधिकार, स्वातंत्र्य यांच्या नवीन व्याख्या निर्माण होऊ लागल्या. एक नवीन 'चंगळवाद' प्रगती म्हणून उदयास आला. आपल्या आत्मकेंद्रित आणि बेताल वर्तणुकीमुळे पर्यावरण आणि पुढील पिढ्यांवर त्याचे काय परिणाम होतील याचा थोडासुद्धा विचार करण्यात आला नाही. खा, प्या, मजा करा. उद्याची चिंता आज कशाला? हाच यशस्वी जीवनाचा मंत्र होऊन गेला. कला, साहित्य इ. सर्व प्रसारमाध्यमांमधूनही हाच संदेश हिरिरीने मांडला गेला. सर्जनशीलतेच्या नावाखाली बीभत्स, हिडीस कल्पना आणि सौंदर्यशून्य नाटक-सिनेमांची निर्मिती होऊ लागली. प्रत्यक्ष कलेपेक्षा, कलेच्या 'बाजारी' सादरीकरणाला महत्त्व प्राप्त झाले. आजच्या दूरदर्शनवरील अंताक्षरीपासून, चित्रपटांच्या बक्षीस समारंभांपर्यंत कलाकारांचे केश, वेष आणि आरडा-ओरडा हा आता आपल्या सर्वांच्या परिचयाचा झाला आहे. साधेपण सुंदर असू शकते ही कल्पनाच आता इतिहासजमा झाली आहे.

अपत्य-निर्मिती सर्वच प्राणीमात्र करू शकतात. प्राणी आणि मानवामध्ये फरक एवढाच आहे की, प्राण्याला, 'मी स्वतंत्र आहे, मुक्त आहे, प्रगत आहे' हे आपल्या कळपाला सांगायला लागत नाही आणि म्हणून अपत्य निर्मिती हा सुद्धा त्यांच्या एका सहज प्रेरणांचाच भाग असतो. नव-मानवाला मात्र कोणतेच भेद मान्य नाहीत. 'मी स्वतंत्र आहे, माझं खाणं-पिणं आणि वर्तणुक हे माझं मीच ठरवणार', हाच 'स्वातंत्र्या'चा अर्थ त्याला अभिप्रत आहे. सामाजिक, सांस्कृतिक नियंत्रण मोडीत काढणं हीच मुळी 'साहस' आणि कर्तृत्वाची कल्पना झाली आहे. खरं म्हणजे जबाबदार, नियंत्रित स्वातंत्र्य उपभोगायला 'साहस' लागते.

गरोदर स्त्री हे आजच्या समाजाचे एक प्रतीकच आहे. आपल्या उदरातील गर्भाला सशक्त आणि निरोगी अवस्थेत प्रसूत करणे ही त्या गरोदर स्त्रीची जबाबदारी आहे. आजच्या समाजालाही पुढील भविष्यात सुसंस्कृत समाज निर्माण करायचा असेल तर बेजबाबदार, आत्मकेंद्रित जीवनशैलीचा त्याग करावा

लागेल. ज्या पाश्चात्त्य समाजांनी अशी आत्मघातकी जीवनशैली अंगीकारली तो समाजच आज प्रामाणिकपणे आपल्या 'स्वातंत्र्य', 'अधिकार', 'प्रगती' इ. संकल्पनांचा पुनर्विचार करू लागलं आहे. उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे निर्माण होणारा 'नवश्रीमंत' भारतीय समाज मात्र पाश्चात्त्यांनी टाकून दिलेल्या धोकादायक जीवनशैलींचा 'प्रगती' म्हणून स्वीकार करताना दिसतो. आजच्या 'नेतृत्वहीन' भारतापुढे हा सर्वात मोठा धोका आहे.

भारत हा एक प्राचीन देश आहे आणि भारतीय समाजाने असे प्रगतीचे अनेक चढ-उतार बघितले आहेत. या अनुभवांतूनच त्याची धर्मसंकल्पना आणि त्यावर आधारित सामाजिक संस्थांची निर्मिती झाली आहे. 'लग्न' संस्था हा त्याचाच एक भाग आहे. या संस्थेला 'पवित्र' संस्कारांमध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. संस्कारांचे परिवर्तन करारात होणे ही समाजाची अधोगती आहे. पाश्चात्त्य जीवनशैलीचे निर्माण केलेले 'भयावह' प्रश्न हे याचे चांगले उदाहरण आहे. भारतीय संकल्पनांचा आपण आदर केला तरच आपला हा विनाश टळू शकेल.

✧✧✧

# साहित्य आणि संस्कृती

{ ऑक्टोबर २००७ }

साहित्य निर्मिती ही मानवाच्या सांस्कृतिक उत्क्रांतीमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे साहित्य म्हणजे मानवी स्वभावाचा आरसाच असते. गेल्या हजारो वर्षांत साहित्याचे अनेक प्रकार निर्माण झाले आणि आजही निर्माण होत आहेत. कुठल्याही सभ्यतेच्या श्रेष्ठत्वाचा निर्देशांक हा त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यावरून ठरत असतो. मानवाची स्त्री आणि पुरुष ही प्रमुख अंगे. प्रत्येक अंगाची आपापली स्वभाव वैशिष्ट्ये. मानव जन्मापासून मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या वयोगटांतून जात असतो. जसे जसे त्याचे वय वाढते, तसे तसे, अनुभव आणि वास्तवाची जाणीव ह्यांच्या संचितातून तो प्रगल्भ होत असतो. अशा प्रगल्भतेचा वेगही प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगळा असतो. वाढत्या वयाबरोबर त्याच्या सामाजिक आणि कौटुंबिक भूमिका आणि जबाबदाऱ्याही बदलत असतात. ह्यातूनच नाती निर्माण होतात. गृहिणी, आई, मुलगी, मैत्रीण ह्या सर्व भूमिका एकच स्त्री साकारत असते. पण ह्या प्रत्येक भूमिकेतील तिच्या जबाबदाऱ्या आणि त्यातून निर्माण होणारी नाती याचे तिचे अनुभवविश्व वेगळे असते. शिवाय ह्या समान भूमिका बजावणाऱ्या दोन स्त्रियांचे अनुभवविश्व सारखे असेलच असेही नाही. कारण जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. या मानवी स्वभाव आणि नात्यांच्या विविधतेमुळे, साहित्य निर्मितीला विषयांची कमतरता कधीच भासली नाही. गेल्या हजारो वर्षांत मानवाच्या स्वभावात बदल झालेला दिसत नसला तरीही साहित्य निर्मिती चालूच आहे.

मानवाच्या इतक्या विविध कथा, व्यथा आणि छटा व्यक्त करण्याकरिता त्याची भाषा परिपक्व असावी लागते. प्रत्येक शब्द हा अर्थवाहक असतो. त्याला

सांस्कृतिक संदर्भ असतो. या अर्थाचा गाभा हा त्याचा अनुभव असतो. नुसत्या स्त्रीकरिता नारी, अर्धांगिनी, वामांगिनी, वामा, योषिता असे अनेक शब्द संस्कृतमध्ये आढळतात. हा प्रत्येक शब्द त्या स्त्रीची सामाजिक आणि कौटुंबिक भूमिका व्यक्त करत असतो. अशा अर्थपूर्ण शब्द-निर्मितीकरिता फार मोठा काळ जावा लागतो. संस्कृत भाषेमध्ये हे शब्द भांडार एवढे प्रचंड आहे की, त्याची माहितीकरून घ्यायला एखादे आयुष्य पुरे पडायचे नाही. आणि म्हणूनच सुरवातीलाच आपण 'साहित्य हा मानवी स्वभावाचा 'आरसा' आहे', असे म्हटले आहे.

मानवी जीवनामधील साहित्याची 'संपर्का'ची ही भूमिका लक्षात आल्यावर, साहित्य निर्मितीतील विविधताही लक्षात येते. काही साहित्य करमणुकीकरिता निर्माण झालेले असते, तर काही धर्मविषयक संकल्पना मांडण्याकरिता. अशी मांडणी ही प्रभावी, नेमकी आणि आकलनक्षम व्हावी म्हणूनही साहित्याचे अनेक प्रकार निर्माण होतात. संस्कृतमधील 'सूत्र' वाङ्मय हा ह्याचाच एक नमुना. पाणिनीने आपले व्याकरण सुमारे चार हजार सूत्रात मांडले आहे. पाणिनीने हेच लिखाण विस्ताराने करायचे ठरविले असते तर त्याला शेकडो खंड लिहावे लागले असते. काही शतकांच्या अंतरानंतर पुढील पिढीला हा अर्थ समजावा म्हणून कात्स्यायनाला 'वार्तिक' लिहायला लागली तर पुढे पातंजलीला 'महाभाष्य'. असे अनेक सूत्रग्रंथ आज उपलब्ध असले तरी नावाने माहीत असलेले कित्येक सूत्रग्रंथ आज नष्ट झाले आहेत.

महत्त्वाचे मानवी अनुभव व्यक्त करिण्याकरिता साहित्यामध्ये वापरली गेलेली इतर साधनं म्हणजे उपमा, अलंकार आणि रूपके. अशा साधनांचा वापर करून संस्कृतमध्ये प्रचंड साहित्य निर्माण झालेले आहे. हे माध्यम एवढे प्रभावी आहे की, सूत्राप्रमाणेच हजारो पानांमध्ये संपवता न येणारा आशय एका वाक्यात सांगता येतो. उदाहरणच द्यायचे तर मराठीतील म्हणी. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले', 'शितावरून भाताची परीक्षा' इत्यादी. ह्याही पुढे जाऊन प्राण्यांच्या स्वभाववैशिष्ट्याचा रूपकात्मक वापर करून मनुष्य स्वभावाचे दर्शन कथांच्या माध्यमातून दाखवण्यात आले. बौद्धांच्या 'जातक कथा', जैनांच्या 'चूर्णकथा', आणि ह्यातूनच पुढे निर्माण झालेले 'पंचतंत्र' ही याची उत्कृष्ट उदाहरणं आहेत. माणसाला नीतीबोध देण्याकरिता ह्यांचा कौशल्याने वापर करण्यात आला.

भारताने जगाला व्याकरण, अंक आणि शून्य दिले, तसेच नीतीकथांचे माध्यमही दिले. मानव जातीला भारतीय साहित्याचे हे फार मोठे योगदान आहे.

पाश्चात्त्यांच्या 'परीकथा' आणि 'प्राणीकथां'चा बहुतांश उगम हा आपल्या जातककथा आणि पंचतंत्रामध्ये आहे. आपले शेजारी श्रीलंका, ब्रह्मदेश, नेपाळ येथे तर या कथा पोहचल्याच; परंतु त्याहीपलीकडे तिबेट, चीन, मंगोलीया येथेही मोठ्याप्रमाणावर त्यांचा प्रसार झाला. तेथूनच पुढे त्या मध्य आशिया, मध्यपूर्व आशिया करत इराणपर्यंत पोहोचल्या. हा प्रवास असाच पुढे चालू राहून त्या १२ व्या शतकापर्यंत युरोप आणि आफ्रिका खंडात पोहोचल्या. जो प्रकार या प्राणीकथांचा तोच प्रकार सुभाषितांचा. विशेषतः महाभारतातील काही सुभाषिते, बोध किंवा नीतीवचनं म्हणून ख्रिस्तीधर्म ग्रंथातही सापडतात.

पंचतंत्राचे पहिले भाषांतर ससानीअन राजा अनुशिर्वानच्या पुरस्काराखाली बुर्झो या वैद्याने इ.स.५७० च्या सुमारास 'पेहलवी' भाषेत केले. आज हे भाषांतर उपलब्ध नसले तरी त्यावरून रूपांतरित झालेले अरेबिक आणि जुन्या सिरिअन भाषेतील हस्तलिखिते आज उपलब्ध आहेत. सिरिअन धर्मगुरू 'बूद्' यांनी केलेले भाषांतर अर्धेच उपलब्ध असले तरी जुन्या अरेबिक भाषेतील इ.स. ७५० च्या सुमारास 'इब्न अल् मुकाफा' या अभ्यासकाने केलेले 'कालीला वा दिम्ना' म्हणजेच 'फेबल्स ऑफ बिडपाय' हे बुहतांशी पूर्ण हस्तलिखित उपलब्ध आहे. युरोपीयन भाषांमध्ये पुढे झालेली सर्व भाषांतरं ह्याच हस्तलिखितावरून झालेली दिसतात. ११व्या शतकात पुन्हा एकदा सिरिअन भाषेत त्याचे भाषांतर झाले. ११व्या शतकातच 'सायमिऑन सेथ' यानी याचे ग्रीक भाषेत भाषांतर केले आणि ह्याच हस्तलिखितावरून पुढे इटालीयन, जर्मन आणि स्लॅवॉनीक भाषांमध्ये भाषांतरे झाली. १२व्या शतकात त्याचे 'हिब्रू' मध्ये भाषांतर झाले आणि १३व्या शतकात ह्या भाषांतराचे लॅटीन भाषेत भाषांतर झाले. पुढे पुन्हा पुन्हा ह्याची जर्मन, स्पॅनीश आणि इटालीअन भाषांमध्ये भाषांतरे झाली. धर्मग्रंथ नसलेल्या अशा नीतीपर ग्रंथांची इतकी भाषांतरे इतर कुठल्याही भाषेतील साहित्याची झालेली नाहीत.

मध्ययुगामध्ये चाणाक्याची नीतीवचने इराणमध्ये 'परशियन' भाषेमध्ये भाषांतरित झाली. जोसेफ जेकॉब्स या अभ्यासकाने दाखवून दिले आहे की, पंचतंत्राची सुमारे ३८ भाषांमध्ये एकशे-बारा भाषांतरे झाली आहेत आणि त्यातील सुमारे वीस इंग्रजीमध्ये आहेत. 'विक्रम आणि वेताळ', 'शुकशपतती', आणि सोमदेवाचे १२व्या शतकातील 'कथासरितसागर' या सगळ्यांची भाषांतरं युरोपीअन भाषांमध्ये झालेली आहेत. बर्लास आणि जोसाफत, इसापनीती, अरेबिअन नाईटस् यांचा कमी-अधिक

प्रमाणात उगम हा भारतातून पाश्चात्त्य देशात गेलेल्या ‘जातक–कथा’ आणि ‘पंचतंत्रात’ आहे. अभ्यासकांनी म्हणूनच भाषेची शुद्धता जोपासणे महत्त्वाचे आहे. आजच्या दूरदर्शन आणि वृत्तपत्र या प्रभावी माध्यमांना याची जाणीव अजिबात दिसत नाही. म्हणूनच भाषेचे शिक्षण आपण सर्वांनीच अधिक गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. हे आता मान्य केले आहे. शेक्सपीअरच्या नाटकातील काही रूपकांचा उगमही या कथांमध्ये आहे हे फारच थोड्याना माहीत असेल.

१९७५ साली विलकिनसन् या इंग्रज संस्कृत अभ्यासकाने भगवद्गीतेचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. १७८९ साली विल्यम जोन्स ह्यांचे शाकुंतलाचे आणि १७९५ मध्ये मनुस्मृतीचे त्यांनीच केलेले इंग्रजी भाषांतर प्रकाशित झाले. इटालिअन, फ्रेंच, जर्मन इत्यादी युरोपीअन भाषांमध्ये पुढे १० ते १२ वर्षांत त्या ग्रंथाची भाषांतरे झाली. या आधी अब्राहम रोजर्स या डच धर्मप्रसारकाने १६५१ साली भर्तृहरीच्या वैराग्य आणि नीतीशतकांची डच भाषेत भाषांतरे केली होती. लगेचच त्याचे जर्मन भाषांतर आणि १६७० साली त्याचे फ्रेंच भाषांतर उपलब्ध झाले.

या सगळ्या इतिहासावरून भारतीयांनी पाश्चात्त्यांना नीती शिकविली असे म्हटले तर अयोग्य ठरणार नाही. गेल्या दोनशे वर्षांत या उसनवारीचा अभ्यास पाश्चात्त्य अभ्यासकांनी हिरिरीने करून भारताचे ऋणही मान्य केले आहे. पाश्चिमात्यांच्या ओंजळीने भारताच्या संस्कृतीचा अभ्यास करणारे आपले इतिहासकार मात्र ही माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यास अपयशी ठरले आहेत. म्हणूनच शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये याची ‘त्रोटक’ माहितीही उपलब्ध होत नाही.

इंग्रजांच्या प्रभावामुळे प्रांतीक भाषांची परिस्थिती आज शोचनीय आहे. भाषेचे संस्कृतीशी नाते अतूट आहे. म्हणूनच भाषेचे शिक्षण सर्वांनीच अधिक गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

✧✧✧

# जागतिक चित्पावन संमेलन

{ जानेवारी २००८ }

चित्पावन ब्राह्मणांचे जागतिक संमेलन पुणे येथे रविवार दि. २३ डिसेंबर २००७ रोजी संपन्न होत आहे; ही आनंदाचीच बाब आहे. संमेलनाची फलश्रुती काय असायला हवी याचाही विचार होणे गरजेचे आहे.

एकूणच भारतीय समाजात ब्राह्मणांबद्दल मोठ्या प्रमाणावर अपप्रचार आणि गैरसमज आहेत. याचा प्रभाव इतका प्रचंड आहे की, खुद्द ब्राह्मणांच्या मनात देखील अपराधित्वाची भावना पहावयास मिळते. जाती, वर्ण यांच्या निर्मितीबाबत बरेच संशोधन आजवर झालेले आहे. वास्तविकपाहता कोणताही समाज सर्वार्थाने चांगला किंवा वाईट नसतो. तसे समजणे देखील चूक आहे. व्यावहारिक दृष्ट्या समाजधारणेसाठी आवश्यक असलेल्या गरजा भागवणे हाच (श्रमविभागणी) वर्णव्यवस्थेमागील हेतू होता. या विभागणीत श्रेष्ठ व कनिष्ठ हा फरक अपेक्षित नव्हता. सर्वच वर्ण एकमेकांना पूरक होते आणि आजही आहेत. कार्ये वेगळी असली तरी सर्व अवयव मिळूनच शरीर बनते.

ज्ञान प्रसार, संवर्धन आणि बुद्धिविषयक कामे करणारा तो ब्राह्मण, समाजाचे रक्षण करणारे क्षत्रिय, व्यापार उदीम ही बाजू सांभाळणारे वैश्य आणि या व्यवस्थेतील एकूण लोकांच्या सेवा पुरविण्याचे काम करणारे शूद्र. या विभागणीला आक्षेप असण्याचे तत्त्वतः काहीच कारण नाही. विकसित म्हणविल्या जाणाऱ्या आजच्या सर्व राष्ट्रांमधेही हे वर्णव्यवस्थेचे अस्तित्व वेगळ्याप्रकारे दिसून येते. याच व्यवस्थेने भारतातील प्राचीन कला, साहित्य आदींच्या निर्मितीला आणि प्रसाराला हातभार लावला होता हे विरोधकही मान्य करतात.

बुद्धाने वर्णाश्रमास विरोध केला असे सांगितले जाते. परंतु बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांकडूनच त्याच्या विचारांची आणि साहित्याची निर्मिती झाली हे वास्तव दृष्टिआड करण्यात येते.

कालांतराने, भारतीय समाजाच्या वर्णव्यवस्थेच्या मूळ रूपामध्ये आलेल्या विकृती दूर करणे ही एक बाब, तर संपूर्ण वर्णव्यवस्थाच विकृत मानणे ही दुसरी गोष्ट. एकूण भारतीत समाजजीवनाचेच या दुसऱ्या बाबीमुळे मोठ्या प्रमाणात अधःपतन होताना दिसते. भारतीय माणूस दांभिक बनत चालला आहे. सर्वच क्षेत्रांत निर्मितिसंवेदना बधिर झाल्याचे दिसते. याची बीजे दिशाहीन सुधारणांच्या अट्टाहासात आहेत.

समाजात ब्राह्मणद्वेषाची बीजे रुजवण्याचे काम प्रामुख्यानं ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि वसाहतवादाच्या शिल्पकारांनी केले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी लिहून ठेवलेली माहिती याच्या सिद्धतेकरता पुरेशी आहे. वसाहतवादाच्या विरुद्ध, निदान सुरवातीच्या झगड्यांमध्ये तरी ब्राह्मण अग्रक्रमाने होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील नानासाहेबांपासून फडके, चापेकर, सावरकर, टिळक, आगरकर, गोखले, रानडे ही सर्व मंडळी ब्राह्मणच होती. बंगालमध्येही परिस्थिती वेगळी नव्हती. साहजिकच या नेतृत्वाच्या खच्चीकरण्याचे काम वसाहतवाद्यांनी चालू केले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरवातीला त्यांच्या या श्रमाला अपेक्षेबाहेर यश आले. भारतीय समाजामध्ये ब्राह्मण द्वेषाची बिजे रुजली. ‘ब्राह्मण’ विरुद्ध ‘बहुजन समाज’ हे त्याचे स्वरूप यशस्वी झाले. २० व्या शतकाच्या सुरवातीला भारतात रुजू झालेल्या साम्यवादी/समाजवादी चळवळींने सुद्धा हाच मंत्र अंगीकारला आणि आजपर्यंत ही ब्राह्मणद्वेषाची चळवळ अव्याहतपणे चालू ठेवली.

गोध्रा प्रकरणानंतर झालेल्या दंगलीबद्दल दमछाक होईपर्यंत विरोध करणाऱ्यांना गांधीवधानंतर महाराष्ट्रात झालेल्या ब्राह्मणांच्या जाळपोळीबद्दल मात्र स्मृतिभ्रंश झालेला दिसतो.

‘ब्राह्मण’ समाज सद्‌गुणांचा पुतळा आहे आणि त्याच्यामधे काही दोष नाहीत असा याचा अर्थ नाही. मानवी स्वभावामधे असलेले सर्व गुणदोष ब्राह्मणांमध्ये आहेत. हेकेखोरपणा, न पटणाऱ्या विचारांबद्दलची पराकोटीची असहिष्णुता, खुनशीपणा, इ. सर्व दुर्गुणांची लागण ब्राह्मणांमधे मोठ्या प्रमाणावर दिसून येते. आपल्या मताबद्दल आग्रही असणे किंवा निर्भीडपणे मत मांडणे, आणि हट्टी,

दुराग्रहीपणा यामधील ‘सीमारेषा’ फार अस्पष्ट आहेत. आग्रही आणि निर्भीडपणामधे विनय आणि विवेक नसेल तर तो दुराग्रह आणि हट्टीपणा होतो. अनेक वेळा हा समतोल ब्राह्मणांमध्ये बिघडलेला दिसतो. व्यसनाधीनतेची कीडही ब्राह्मण समाजाला अलीकडे मोठ्या प्रमाणावर लागलेली दिसते.

ब्राह्मण समाज हा बुद्धिजीवी समाज आहे. यामुळेही त्याच्यामध्ये अनेक गुण–अवगुण निर्माण होतात. पराकोटीची आत्मटीका, आत्मपरीक्षण ही बुद्धिजीवी समाजाची लक्षणे आहेत. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा, उहापोह हाही त्याचाच एक भाग आहे. जगातल्या सगळ्या बुद्धिवादी समाजामध्ये कमी–अधिक प्रमाणात हे दिसून येते. वक्तशीरपणा, स्वच्छता, निटनेटकेपणा यांचाही आग्रह ब्राह्मणांमधे प्रकर्षाने दिसून येतो.

चित्पावनांचे हे जागतिक संमेलन म्हणूनच स्वागतार्ह आहे. अशा संमेलनातून आत्मप्रौढी आणि आत्मस्तुती  मात्र कटाक्षाने टाळायला हवी.अशा गोष्टी नवा द्वेष निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. शिवाय सर्व समाजाचे भले करण्याचा ठेका आपल्या समाजाने घेतला आहे असा दुराग्रहदेखील वाढतो.  तो घातक असतो.

हे संमेलन, भविष्यातील सर्व संमेलनांसाठी ‘आदर्श’ निर्माण करेल अशी अपेक्षा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर चित्पावन एकत्र येत आहेत हाच एक विक्रम आहे. ह्याकरता आवश्यक असलेला संयम सर्वांनीच पाळला तर या संमेलनाच्या यशाबद्दल खात्री बाळगायला हरकत नाही.

✧✧✧

# मनुवादी मुंबई विद्यापीठ

{ एप्रिल २००८ }

मुंबई विद्यापीठाने बी. ए.च्या काही अभ्यासक्रमामध्ये मनुस्मृतीचा समावेश केला आहे. यामुळे अनेक प्रगतिशील आणि पुरोगामी विचारवंतांना धक्का बसला. मनुस्मृती जाळून ५०हून अधिक वर्षे होऊन सुद्धा, मुंबई विद्यापीठाच्या या मागासलेपणाबद्दल या विचारवंतांनी आश्चर्य व्यक्त केले. मुंबई विद्यापीठात अजूनही 'मनुवादी' शिल्लक असल्याचा शोधही त्यानी लावला. साहजिकच मुंबई विद्यापीठाला या गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक होते. मनूचे 'स्त्री संबंधांचे जहाल विचार' तेवढेच शिकवले जाणार असल्याचा खुलासा विद्यापीठानी केला. यामुळे मनूबद्दल थोडाफार आदर शिल्लक असेल तर तोही नष्ट होऊन मनु विषयी तिरस्कार निर्माण होईल हा मुंबई विद्यापीठाचा उदात्त हेतूही समजावून सांगण्यात आला.

आता परमेश्वरच त्या मनूचे आणि मनुवाद्यांचे रक्षण करो. मूर्खांशी वाद घालण्यामधे आपल्या वेळेचा अपव्यय असतो. अभ्यास आणि संशोधन यांची दुर्दशा या देशामध्ये का आहे, हे जाणून घेण्याकरता आता नवीन पुरावे शोधण्याची गरज नाही. सुदैवाने जगामधे मात्र अजूनही 'मनुस्मृती' हा अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रकाशकांनी नुकताच मनुस्मृतीवरील तौलनिक आणि संशोधनपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला.

पॅट्रिक ऑलीवेल या भारतीय वंशाच्या अमेरिकन अभ्यासकांनी हा ग्रंथ संपादित केला असून त्याची प्रस्तावना वाचनीय आहे. १७९४ साली विल्यम जोन्स यांनी मनुस्मृतीचे इंग्रजी भाषांतर केले. त्यांना मनुबद्दल इतके आकर्षण होते की, लंडनच्या सेंटपॉल कॅथेड्रलमधे त्यांचा जो भव्य पुतळा उभारला आहे,

त्याच्या हातात 'मनुस्मृती' हा ग्रंथ दाखविण्यात आला आहे. हिंदूधर्मशास्त्राचे जगभर पसरलेले अनेक अभ्यासक आजही मनुस्मृतीचा चिकित्सक अभ्यास करताना दिसतात. यामधे मनूच्या विचारांवर भरपूर टीकाही असते. परंतु हा अभ्यास संदर्भ सोडून किंवा सोईस्कर संदर्भ घेऊन होत नाही.

'स्त्री' संदर्भातच बोलायचे तर ख्रिस्ती आणि इस्लामी पंथांमध्ये 'स्त्री' ला काय दर्जा देण्यात आला आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ख्रिस्ती स्त्रियांना आजही पौरोहित्य करता येत नाही किंवा स्वेच्छेने गर्भपात करता येत नाही. इस्लामी स्त्रियांच्या बाबतीत समान दर्जा तर दूरच राहो, पण त्यांना उजळ माथ्याने हिंडण्याचीही मुभा नाही. आजही त्यांना बुरख्यामधेच बाहेर पडावे लागते. या पंथांमधील 'स्त्रियांच्या' या परिस्थितीबद्दल बोलताना मात्र या सर्व विचारवंतांचा जीभ नांवाचा अवयव लुळा पडलेला दिसतो. मनूचाच न्याय सर्वांना लावायचा तर या पंथांच्या संस्थापकांबद्दलही, तत्त्वज्ञान आणि इतिहासाच्या अभ्यासक्रमामध्ये त्यांची स्त्रीविषयक मते समाविष्ट करणे तर्काचे ठरेल.

रविवार, २३ मार्च २००८ च्या लोकसत्ते च्या 'लोकरंग' या पुरवणीमधे २ ऱ्या पृष्ठावर अच्युत गोडबोले यांनी सॉक्रेटिस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांची माहिती दिली आहे. ॲरिस्टॉटलचे विचार हे पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा गाभा आहेत. पण याच ॲरिस्टॉटलचे काही चमत्कारिक विचार गोडबोले यांनी दिले आहेत. उदा. ''आपली बुद्धी हृदयांत असून, मेंदू रक्त थंड करतो ... जड वस्तू हलक्या वस्तुंपेक्षा लवकर जमिनीवर पडतात... सूर्य पृथ्वीभोवती फिरतो... बायकांना पुरुषांपेक्षा कमी दात असतात... मुलाचे लिंग हे जन्माच्या वेळेच्या वाऱ्याच्या दिशेवरून ठरते.'' इ. प्लेटोने गुलामगिरीचे समर्थन केले होते.

ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य, तर ॲलेक्झांडर द ग्रेट हा ॲरिस्टॉटलचा शिष्य. ग्रीक सभ्यता ही सर्वश्रेष्ठ आणि इतर सभ्यता रानटी हे ॲरिस्टॉटलचे विचार आजही पाश्चात्त्य संशोधकांमधे प्रकर्षाने दिसून येतात. मुंबई विद्यापीठामधे आता या ग्रीक विचारवंतांच्या कुठल्या वचनांचा समावेश होणार, हा एक मोठा यक्षप्रश्न उभा राहिला आहे. अर्थात काळजी करण्याचे काहीच कारण नाही. कारण भारतीय पुरोगामित्वात मनूला जो न्याय आहे तो न्याय इतरांना लावायचा नसतो. शिवाय विचारवंत होण्याकरता जेथे मनुस्मृती वाचायला लागत नाही तिथे इतर पंथ किंवा ग्रीक तत्त्ववेत्यांचे विचार वाचण्याची गरजच काय?

भारत एक महासत्ता होऊ पहातोय. आजचे विद्यापीठीय संशोधन बघता महासत्ता तर सोडाच, पण हा देश एकसंघ तरी राहील की नाही हे सांगणेही कठीण होऊन बसले आहे. जातीचे राजकारण आणि त्याच्या राखीवपणाबद्दलची चर्चा उबग आणणारी आहे. ज्या मनूला वर्ण आणि जातीच्या निर्मितीचा दोष दिला जातो, त्याचे विरोधक मात्र त्याच जाती आणि वर्णाच्या नावाखाली आरक्षणाचे समर्थन करून जातीय भिंती घट्ट करू पहात आहेत.

सवंग लोकप्रियतेवर आरूढ झालेले आजचे धार्मिक, सामाजिक आणि राजकीय नेतृत्व  दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे आहे. मनूने प्रत्येक वर्णावर काही जबाबदाऱ्या तरी टाकल्या होत्या. आरक्षणाच्या ढालीखाली जातीयवाद भक्कम करणाऱ्यांची मात्र कुठलीच जबाबदारी घेण्याची तयारी नाही. गेल्या २००० वर्षांत नव्हता एवढा आजचा भारत जातीयवादी आहे. मनूपेक्षा आजचे राजकारणीच त्याला जबाबदार आहेत.

मनूचा स्त्रीच्या स्वातंत्र्याबद्दलचा दाखला हा संदर्भ सोडून देण्यात येतो. स्त्रीच्या रक्षणाच्या जबाबदारीशी त्याचा संबंध आहे, स्त्रीच्या स्वातंत्र्याशी नाही. मनूला स्त्रीबद्दल आदरच नाही तर प्रचंड सहानुभूती होती. मुळातच ते श्लोक वाचणे आवश्यक आहे. (पहा. पृ.२४) चांगल्या संस्कारांकरिता प्रत्येक अभ्यासक्रमात त्यांचा समावेश होणे आवश्यक आहे.

मनुस्मृती हा एक संस्कारित, सुसंवादी, समाज निर्माण करण्याकरता लिहिला गेलेला मार्गदर्शक ग्रंथ आहे. मनूआधी आणि मनूनंतरही असे अनेक ग्रंथ लिहिले गेले. मनुस्मृती १५०० वर्षांहून अधिक जुनी आहे. मनुच्या वेळी अपेक्षित असलेली समाजरचना आज मान्य होईलच असे नाही. या पार्श्वभूमीवर मनूचे स्त्री- विषयक किंवा इतर अनेक विचार आज कालबाह्य असू शकतात. फक्त ५५ वर्षांत आजची भारतीय घटना १०० वेळा बदलायला लागली. याचा अर्थ घटनाकारांना दूरदृष्टी नव्हती असा लावायचा का? संशोधन किंवा अभ्यास हा कुठल्याही सिद्धांतवादाच्या समर्थनार्थ करण्यात येऊ नये. बहुतांशी मनुस्मृती आजही कालबाह्य का होऊ शकत नाही याचा विचार होणे आवश्यक आहे. पण हिंदू आणि विशेषत: ब्राह्मण द्वेषाची कावीळ झालेल्यांना हे कोण समजावून सांगणार?

✧✧✧

# मानवी जनावर

{ जुलै २००८ }

मानव आणि इतर सजीव प्राणी यांच्या शरीररचना, पेशीरचना आणि कार्य यांच्यामध्ये गुणात्मकरीत्या काहीही बदल नाही हे विज्ञानाने नुकतेच सिद्ध केले. सजीवांमध्ये मानव आणि वानर सदृश प्राण्यांच्या जैव नकाशामध्ये ९८ ते ९९% साधर्म्य आहे. फरक इतका नगण्य आहे की, त्यामुळे मनुष्य हा कुठल्याच कसोटीवर वेगळा 'प्राणी' होऊ शकत नाही. अनेक मानवी भावना म्हणजे राग, लोभ, मत्सर यांचे अस्तित्वही इतर सजीव प्राण्यांमध्ये दिसून येते. थोडक्यात म्हणजे 'जनावरे' आणि 'माणूस' यामध्ये पेशीकार्याच्या दृष्टीने काहीही फरक नाही. डार्विनच्या उत्क्रांतिवादामुळे वैज्ञानिकांना याची उकल करणे शक्य झाले.

पाश्चात्त्य जडवादाची मुळे ही प्रामुख्याने ख्रिस्तीधर्मामध्ये मानवाला दिलेल्या श्रेष्ठत्वाच्या स्थानामध्ये आहे. सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीचा उपभोग घेण्याचा अमर्याद अधिकार या संकल्पनेमुळे मानवाला मिळाला. म्हणूनच ख्रिस्ती धर्माचा डार्विनचा सिद्धांत आणि सजीवांच्या समानतेला विरोध आहे. हिंदूंच्या सृष्टिनिर्मितीच्या संकल्पना या संपूर्णत: भिन्न आहेत. सजीव आणि निर्जीवांमध्ये तो समान दैवी अंश पहातो. आणि त्याच्या या भूमिकेमुळे निसर्गाच्या उपभोगाच्या बाबतीतही त्याच्या संकल्पना या पाश्चांत्त्यांपेक्षा संपूर्णपणे भिन्न आहेत. पर्यावरणाच्या आजच्या ऱ्हासाला पाश्चांत्त्यांची उपभोग आणि जडवादी वृत्ती कारणीभूत असल्याचे आज सर्वमान्य आहे. आणि यामध्ये बदल घडवायचा असेल तर आपल्या 'जीवनशैली' मध्ये बदल करायला हवा हेही आता सर्वमान्य झाले आहे.

'जीवनशैली' चा हा मुद्दा पर्यावरणापुरताच मर्यादित नसून मानवी-अधिकार, स्त्री - पुरुष समानता, तंत्रज्ञानाचा विकास ते धर्म आणि विज्ञान, या सगळ्यांना तो छेदून जातो. जीवनशैली म्हणजे दुसरं काहीही नसून आपण आपल्या वागण्याच्या पद्धती ज्या सिद्धान्तावर विकसित करतो, त्याचा तो बाह्याविष्कार असतो. 'मानव हा श्रेष्ठ' हा सिद्धान्त मान्य केला की इतर सर्व प्राणिमात्र व निर्जीव वस्तुंना दुय्यम स्थान तर मिळते आणि यांच्या अनियंत्रित उपभोगाला मान्यताही मिळते. यातून जे असंतुलन निर्माण होते ते सर्वच सृष्टीला विनाशाकडे नेते. म्हणजे अनियंत्रित, स्वैराचारी, आत्मकेंद्रित विचार आणि त्यावर आधारलेली जीवनशैली 'संतुलित' समाज निर्माण करू शकत नाही.

मानवाची 'जनावरां'पासून असलेली भिन्नता येथेच सुरू होते. शरीररचना आणि पेशीमध्ये जरी साम्य असले, तरी मनुष्य आपल्या सहज भावना किंवा प्रेरणांवरती नियंत्रण आणू शकतो, त्यांचा विकास करू शकतो. उत्क्रांतिवाद हा शरीररचना आणि पेशींच्या विकासाच्या क्रमाचा आलेख देतो, पण मानवाच्या भावना किंवा वैचारिक विकासक्षमतेची तो उकल करू शकत नाही. सर्वच सजीवांना भूक असते. बहुतेक सजीव भूक भागल्यावर जास्त खात नाहीत. मनुष्य पोट भरल्यावरही खाऊ शकतो. हा भाग जरी वगळला तरी ते न खाण्याचा किंवा उपाशी रहाण्याचा निर्णय हाही मनुष्यच घेऊ शकतो. म्हणून शाकाहार ही संकल्पना उत्क्रांत समाजाचे लक्षण आहे.

लैंगिक प्रेरणा या कमी-अधिक प्रमाणात सर्व सजीवांच्या सारख्याच असतात. पण त्यावर नियंत्रण आणि त्यांना दिशा देण्याचे काम फक्त मनुष्यच करू शकतो. त्यातूनच त्याची 'जीवनशैली' विकसित होते. म्हणजे स्वैराचारी प्रवृत्ती ही नैसर्गिक प्रेरणांच्या अनियंत्रित उपभोगाचा भाग झाली तर ब्रह्मचर्य हे या नैसर्गिक प्रेरणांवर मानवाने हेतुपुरस्सर किंवा स्वेच्छेने स्वीकारलेले नियंत्रण झाले.

व्यक्ती तसेच व्यापक समूहाचे हित/ अहित लक्षात घेऊन समाजाला जी मार्गदर्शक सूत्रे दिली जातात त्यांनाच आपण 'धर्म' म्हणतो. या व्यवस्थेत 'जबाबदार' स्वातंत्र्य आणि 'नियंत्रण' निषिद्ध नसतात. शिवाय यामध्ये एका मानवी आयुष्याचा विचार न करता मोठ्या कालखंडातील अनुभवांच्या संचिताचा विचार केलेला असतो. एखादी व्यक्ती अनियंत्रित वागली तर फारसा फरक पडत नाही. पण संपूर्ण समाजच जर आत्मकेंद्रित होऊन स्वैराचारी झाला तर गोंधळ

निर्माण होतो. समाज विनाशाकडे जातो. आपल्या दैनंदिन जीवनामध्येही अपघात होऊ नयेत म्हणून सोईकरता एकेरी वाहतूक आपण स्वीकारतो. त्या व्यवस्थेचा काही जणांना तोटा होत असला तरी अशी नियंत्रणही घालावी लागतातच.

सामाजिक संस्थांची निर्मिती हे सुद्धा 'मानवा'चेच खास वैशिष्ट्य आहे. 'लग्न' ही संस्थासुद्धा मानवनिर्मितच आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या अतिरेकाचा एक भाग म्हणून पाश्चात्त्य देशांमध्ये लग्न ही संस्था मोडीत काढण्यात आली. कुमारी मातांचे प्रमाण बेसुमार वाढले. व्यक्तिस्वातंत्र्याच्या भ्रामक संकल्पनेपोटी बाटलीतून बाहेर काढलेला हा राक्षस पुन्हा बाटलीत घालणे आता शक्य दिसत नाही. भारतामधेही डावे, पुरोगामी व कुडमुडे सुधारक यांच्या प्रयत्नांना यश येऊन लग्नसंस्था मोडीत निघण्याच्या मार्गावर आहे. 'हिंदू' धर्मामध्ये लग्न हा एक संस्कार आहे, सध्या कायद्याने तो करार आहे. घटस्फोटांच्या आजच्या वाढत्या प्रमाणावर उच्चतम कोर्टाच्या न्यायाधीशांनी केलेली टिपणी म्हणूनच महत्त्वाची आहे. (आजचा हिंदू लग्नासंबंधीचा कायदा घटस्फोट सुलभ करीत आहे.)

माणूस आणि इतर सजीव प्राण्यांमध्ये फरक आहे तो फक्त विवेकक्षमतेचा. ही विवेकक्षमताच माणसाला जबाबदारीची जाणीव देते. अशा जाणिवेतूनच तो संस्कृती निर्माण करतो. परंतु अशा जाणिवा जेव्हा ढिसूळ होतात, संवेदना जेव्हा बधिर होतात, तेव्हा 'विकृती' निर्माण होते. आई - वडील आपल्या मुलांचे पालनपोषण जबाबदारीच्या जाणिवेतून करतात. पुढे हीच मुले आपल्या आई-वडिलांचे पालनपोषण करतात तेही एका जबाबदारीच्या जाणिवेतूनच. अशा जबाबदाऱ्या म्हणजे त्याग नाही आणि म्हणूनच अशा समाजाला पाळणाघर किंवा वृद्धाश्रमांची गरज लागत नाही. या जबाबदाऱ्या जेव्हा अदृश्य होतात किंवा त्यांचे व्यापारी मूल्यमापन व्हायला लागते तेव्हा पाळणघरं आणि वृद्धाश्रम दृश्य व्हायला लागतात. कुमारी माता, वाढते घटस्फोट किंवा वृद्धाश्रमांची गरज ही माणसांनी स्वीकारलेल्या जीवनशैलीशी निगडित आहेत. नियंत्रित समाजाला अनियंत्रित करणे एक वेळ सोपे असते, पण अनियंत्रित समाजाला नियंत्रित करणे फारच कठीण असते. अनियंत्रित पेशीची वाढ कर्करोगाकडे जाते, की जिचा अंत हा विनाशातच असतो.

वानर आणि मानव यांची शरीररचना समान असली तरी त्यांची संस्कृती भिन्न आहे. प्राणवायूच्या अणूंची रचना जरी सर्वत्र सारखी असली तरी विरळ प्राणवायू जीव कासावीस करतो. गरजा, क्षमता, अनुभव या सर्व स्तरावर प्रत्येक

मानव भिन्न आहे. सांस्कृतिक समानता त्यांच्यावर लादणे म्हणजे सर्वांवर सारखा अन्याय करणे. पाश्चात्त्यांच्या जंगली भांडवलवाद आणि साम्यवादांनी निर्माण केलेली 'अधिकारां' ची आणि 'मुक्ती'ची भूते संतुलित समाज निर्माण करू शकत नाहीत.

पाश्चात्त्य जीवनशैलीचे अंधानुकरण करणाऱ्या भारतीय समाजाला जेव्हा याची जाणीव होईल तो सुदिनच म्हणावा लागेल. नाहीतर शतकानुशतकांच्या प्रयत्नांतून वेगळा केलेला 'मानव' पुन्हा 'जनावर' व्हायला वेळ लागणार नाही.

✧✧✧

# पेराल तसे उगवेल ...

{ ऑक्टोबर २००८ }

'पेराल तसे उगवेल', किंवा 'करावे तसे भरावे' या म्हणी आपणा सर्वांना परिचित आहेत. खरे म्हणजे आपले आयुष्य जसे उलगडत जाते तसतसा या म्हणींचा अर्थ अधिकाधिक पटायला लागतो. अत्यंत थोड्या शब्दांत मोठे वास्तव असे वाक्प्रचार सांगून जातात. या म्हणींचा मूळ स्रोत हिंदूंच्या कर्मसिद्धांतात आहे. हा सिद्धांत आपणहोऊन चांगले काय आणि वाईट काय हे सांगत नाही; पण काही शाश्वत आणि सनातन मूल्यांचा आदर जीवनात करायला तो शिकवतो. यातूनच सर्वसाधारण चांगले आणि सर्वसाधारण वाईट यांच्या दिशा आणि कक्षा आखल्या जातात.

बच्चन कुटुंबीयांवरची सध्याची आपत्ती हे या सिद्धांताचे एक चांगले उदाहरण आहे. व्यावसायिक कुठलाही असला तरी एका व्यापक नीतीचे पालन होणे आवश्यक असते. व्यवसायात फक्त आत्मकेंद्रित आणि तात्कालिक फायद्याचाच विचार केला गेला तर त्याचे विपरीत परिणाम मूळ व्यवसायावर तर होतातच, पण समाजाचीही न भरून येणारी हानी यातून होते. सौ. बच्चन यांच्या विधानानंतर झालेल्या प्रतिक्रिया या नक्कीच समर्थनीय नव्हत्या. सुसंस्कृत समाजात विरोध प्रदर्शित करण्याचे मार्ग अधिक संयमित असतात. इथे संयम म्हणजे शरणागती नसते. कायदा व सुव्यवस्थेचा आदर करूनही विरोधी मत नोंदवता येते. फक्त याकरता हवा असतो तो सामाजिक विवेक. असा संतुलित आणि संयमी समाज हा अपघाताने निर्माण होत नसतो. अनेक शतकांच्या संस्कारांतून असे समाजमन विकसित व्हावे लागते. हिंदू धर्मसंकल्पनेच्या मुळाशी हीच भूमिका आहे. अनेक चालीरीती, आचारविचार, पाप-पुण्यविचार, शिक्षा व प्रोत्साहन, व्रतवैकल्ये यांच्या मध्ये हाच हेतू दिसून येतो.

जीवन सुसह्य होण्यासाठी नुसता कायद्याचा आदर करून चालत नाही, तर त्याचे पालनही करावे लागते. याचाच दुसरा अर्थ असा की जो समाजघटक किंवा व्यक्ती अशा कायद्यांचे पालन करीत नाही त्याला शिक्षा व्हावी लागते. असे न होता कायदा मोडणाऱ्याला बक्षिशी मिळू लागली तर कायद्याचे पालन करणारा मूर्ख ठरू लागतो. अपराध्याला शिक्षा म्हणजे भविष्यातील अपराधावर नियंत्रण असते. येथेही एखाद्या व्यक्तीच्या सुखदु:खापेक्षा व्यापक सामाजिक हिताचाच विचार केलेला असतो. 'म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो' ही म्हण असेच सांगते. बच्चन कुटुंबीयांच्या बाबतीत सुद्धा त्यांनी 'पेरले तेच उगवले' असे म्हणावेसे वाटते.

अमिताभ बच्चन यांची प्रतिमा 'क्रोधी तरुण' अशी बनवण्यात आली. त्यांच्या दीवार, डॉन, शोले अशा चित्रपटांतून दिलेला संदेश हा कायद्याच्या आदरापेक्षा तो तोडून आपले ईप्सित साधा असा होता. नायकाकडून गुंड, धटिंगण प्रवृत्तींचे प्रदर्शन, स्पर्धेत त्यांचा विजय यामुळे अशा अपप्रवृत्तींना प्रतिष्ठा मिळू लागली. चित्रपटातील अशा भूमिकांतून मिळालेले यश हे एका नव्या सामाजिक चारित्र्याची निर्मिती करीत होते हे लक्षातच घेतले गेले नाही. व्यक्तिगत आयुष्यात मात्र उतारवयात त्यांना अशाच एका नव्या 'क्रोधी तरुणा'पुढे साक्षात् लोटांगण घालावे लागते, तिथे पडद्यावरचा विजय उपयोगी पडला नाही. जे त्यांनी पेरले तेच उगवले. सामाजिक अर्थाने अमिताभ बच्चन हा एक अयशस्वी नट आहे.

**जीवनाचे वास्तव –**

> **'अरे संसार संसार।**
> **जसा तवा चुल्यावर।**
> **आधी हाताला चटके।**
> **तेव्हां मिळते भाकर।।'**

या बहिणाबाईंच्या रचनेत मिळते. काहीतरी मिळवायला दुसरे काहीतरी गमवावे लागतेच. नुसते वय वाढले म्हणून कोणी शहाणा होत नाही. 'शहाण्या'चा अधिकार प्राप्त होण्याकरिता वादातीत कर्तबगारीही दाखवावी लागते. कर्तबगारांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हाच समाज प्रगतीचे पाऊल पुढे टाकू शकतो. आपल्या शासनाला मात्र हे मान्य नाही. यामुळेच कार्यक्षमतेची आणि शासकीय सेवांची कधीच फारकत झाली आहे. बढतीकरिता सेवा/वय/ज्येष्ठता हा एकच मापदंड तेथे योजला जातो. यामुळे अनेक कर्तबगार व्यक्तींवर अन्याय होतो. हा

अन्याय कर्तबगारीवरच होतो असे नसून, यात सर्वात जास्त नुकसान हे समाजाचेच असते. बढतीच्या संदर्भात उच्चतम न्यायालयाने अलीकडेच दिलेल्या एका निर्णयामुळे मात्र 'कर्तबगारीला' एक नवीन आशेचा किरण दिसू लागला आहे. या निर्णयात स्पष्टपणे म्हटले आहे की, बढती देताना सेवाकालाने ज्येष्ठ असणाऱ्यापेक्षा, सेवाकालाने कनिष्ठ परंतु कार्यक्षमतेत श्रेष्ठ अशा कर्मचाऱ्याला प्राधान्य दिले पाहिजे. उशिरा का होईना, पण वास्तवाचे भान येणे हे केव्हाही चांगलेच.

सुधारणा, मानवता, समानता अशा बाष्कळ संकल्पनांचे भूत मानगुटीवर बसलेल्यांनी समाज घडविण्यापेक्षा तो बिघडवलेलाच अधिक आहे. आजची सामाजिक परिस्थिती ही भयावह आहे. दहीहंडीपासून गणपती, नवरात्रापर्यंत ज्या रीतीने आपले सण आपण साजरे करीत आहोत ते याचे एक उत्तम उदाहरण आहे. बेसूर कानठळ्या बसवणारे ढोल आणि बीभत्स नाच यांच्या गर्दीला 'श्रद्धाळूंचा महासागर' म्हणून त्याचे माध्यमांनी केलेले वर्णन हे वैचारिक दिवाळखोरीचे लक्षण आहे. अशा सणांचा आणि आपल्या धर्माचा काडीचाही संबंध नाही. जगातल्या इतर कुठल्याही धर्माने स्वत:च्या सणांची एवढी विकृती केलेली दिसत नाही. तुम्ही जे पेरणार आहात तेच उगवणार आहे. कडुलिंबाच्या झाडाला आंबे लागणार नाहीत!

✧✧✧

# पंचतंत्र शोध आणि बोध

{ जानेवारी २००९ }

पंचतंत्र, सुभाषित आणि कथा वाङ्मय हे संस्कृत साहित्यातील एक संपन्न दालन आहे. भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती यांचे ते प्रतिबिंबच आहे. या साहित्याच्या निर्मितीचा कालावधीही मोठा आहे. भौगोलिक दृष्ट्या भारताच्या कुठल्याही प्रांतात त्यांची निर्मिती झाली असली तरी त्यांची उपलब्धता भारतभर आहे. बहुतांशी हे साहित्य नीतीपर आणि बोधपर आहे. यातल्या अनेक रचनांचे लेखक आज आपल्याला माहीत नाहीत. पण या रचना बघता या रचनाकारांची निरीक्षण शक्ती, कल्पकता प्रचंड आहे यांत शंका नाही. बहुतेक सुभाषितं ही लहान असून, त्यामधील उदाहरणं आणि माध्यमं ही इतकी चपखल बसवली आहेत की ती वाचल्यानंतर त्यातल्या तात्पर्याकरता वेगळ्या निबंधांची गरज नाही. पण त्यांत व्यक्त केलेल्या विचारांवर मात्र निबंधच काय तर मोठाले ग्रंथही लिहिता येतील.

या सर्व साहित्याचा, त्यातल्या सांस्कृतिक कंगोऱ्यांचा सूक्ष्म आणि तौलनिक अभ्यास हा पाश्चात्त्य संस्कृतच्या अभ्यासकांनी १९ व्या व २० व्या शतकात चालू केला. भारताप्रमाणेच यातल्या अनेक साहित्य प्रकारांचा प्रसार जगभर झाला. या प्रसाराचा इतिहास विस्मयकारक आणि रंजक आहे. या साहित्यानी भारतात आणि भारताबाहेरील कलाकारांनाही स्फूर्ती दिली. अजंठा, एरोला मधील गुफांमध्ये जातक कथा दिसतात, तर दक्षिणेकडील मंदिरामध्ये रामायण-महाभारताबरोबर पंचतंत्राचाही अंतर्भाव दिसतो. इराण-इराक, सिरीया, अफगाणिस्तान येथील कलाकारांनी तर भाषांतरित पंचतंत्रावर हजारोंनी चित्रे काढली आहेत. भारतातल्याच काय तर जगातील कुठल्याही साहित्याचा प्रभाव मानवी कल्पकतेवर इतका पडलेला दिसत नाही. उदाहरणा करिता आपण पंचतंत्राची निर्मिती आणि प्रसाराचा इतिहास बघू या.

पंचतंत्राचा निर्मितीकाळ आपल्याला ठाऊक नाही. त्याच्या कर्त्याचे नावही आपल्याला ठामपणे सांगता येत नाही. पंचतंत्रामध्ये कौटिल्याचे अर्थशास्त्र, वात्सायनाचे कामसूत्र, मनुचे धर्मशास्त्र, तसेच इतरही अनेक साहित्यांचा उल्लेख बघून पंचतंत्राच्या निर्मितीचा काळ ठरवावा लागतो. परंपरेनी भारतीय अभ्यासक, त्याची निर्मिती ख्रिस्तपूर्व २ ऱ्या किंवा ३ ऱ्या शतकांत मानतात, तर पाश्चात्त्य अभ्यासक याच्या निर्मितीचा काळ ख्रिस्तानंतर ३ रे ते ५ वे शतक मानतात. हाच काळ हा गुप्तकाळ म्हणजे भारतीय सभ्यतेचा सुवर्णकाळ धरला जातो. कालीदासापासून आर्यभट्ट इत्यादींचे साहित्य याच कालावधीत निर्माण झाले.

पंचतंत्राचे पहिले पाश्चात्त्य भाषांतर ६ व्या शतकात इराणमध्ये पहेलवी भाषेत झाले. ससानियन राजा अनुशीर्वान याच्या पदरी असलेल्या बूर्झा या वैद्यकाने पंचतंत्राचे १ ले भाषांतर केले. तो स्वत: भारतात आला होता. त्याच्या या भाषांतराकरता त्याला काही संस्कृत पंडितांनीही मदत केली होती. याच काळामध्ये इराणमधील गुंडीशापूर या विद्यापीठात ग्रीक आणि भारतीय साहित्याची भाषांतरे झालेली दिसतात. या पहेलवी भाषांतरापासून पंचतंत्राचा भाषांतराचा चालू झालेला प्रवास हा रंजक आहे. पहिल्या पहेलवी भाषांतराचे हस्तलिखित आज उपलब्ध नाही. पण त्याच काळामध्ये पहेलवी भाषांतरावरून जुन्या सिरीयन भाषेत बुद् या अभ्यासकानी ५७० मध्ये केलेल्या भाषांतराची काही पाने उपलब्ध आहेत. पुढे गुंडीशापूरहून ज्ञानाचे हे केंद्र इराकमधील बगदादमध्ये स्थलांतरित झाले आणि पुन्हा एकदा भारतीय महत्त्वाच्या संस्कृत शास्त्र ग्रंथांचे भाषांतर चालू झाले. ७५० मध्ये इब्न–अल्–मुकाफा या मूळच्या झोरास्ट्रीयन, पण नंतर इस्लाममध्ये धर्मांतरीत झालेल्या अभ्यासकाने अरबी भाषेत पंचतंत्राचे भाषांतर केले. त्याचे नांव त्यांनी ठेवले ‘कलील आणि दिम्न’. पंचतंत्रातील पहिल्या पुस्तकातील करटक आणि दमनक या दोन अस्वलांच्या नावांचे ते भ्रष्ट भाषांतर आहे. पुढील जवळ जवळ सर्व युरोपियन भाषांमधील भाषांतरं ही या मूळ अरबी भाषांतरावरूनच केली गेली आहेत. मुकाफाच्या या भाषांतरावरून ११व्या शतकात पुन्हा एकदा त्याचे नव्या सिरीयन आणि ग्रीक भाषेत भाषांतर झाले. या ग्रीक भाषांतरावरून लॅटीन, जर्मन आणि स्लॅवोनिक भाषांमध्ये ते रूपांतरीत झाले. पुढे मुकाफाच्याच अरेबिक भाषांतरावरून त्याचे नवीन पर्शियन आणि स्पॅनिश भाषेमध्ये १२५१ मध्ये भाषांतर झाले. या आधी १२ व्या शतकामध्ये ‘जोएल’ या ज्यू धर्मगुरुनी त्याचे हिब्रूमध्ये भाषांतर केले. या हिब्रूचे पुन्हा लॅटीनमध्ये भाषांतर जॉन ऑफ कपूआने १२६३ ते

१२७८ च्या दरम्यान केले. १४८० मध्ये ते छापलेही गेले आहे आणि त्यामुळेच मध्ययुगीन युरोपमध्ये त्याचा प्रसारही मोठ्या प्रमाणात झाला. याच लॅटीन भाषांतरावरून १५५२ मध्ये 'डोनी' या अभ्यासकाने त्याचे इटालीयन भाषांतर केले. पुढे डोनीच्या इटालीयन भाषांतरावरून १५७० मध्ये सर 'थॉमस नॉर्थ' यानी त्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले आणि अगदी १८ व्या शतकापर्यंत हा भाषांतराचा प्रवास चालू राहिला. १५०० वर्षांच्या या भाषांतराच्या प्रवासात पंचतंत्राचे जगातील ६० भाषांमध्ये सुमारे २०० भाषांतरं झाली. या कथांमधील आशयाचा प्रभाव इतका प्रचंड होता की, इसापनीतीपासून अरेबियन नाईट्स, सिंदबाद आणि युरोपमधील अनेक बालगीते आणि नीतीकथांचा उगम हा पंचतंत्रामधील कथांमध्ये दिसतो. लाफोते या फ्रेंच अभ्यासकानी तर त्याच्या बोधपर कथांच्या २ ऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्ये (१६७८) भारतीय कथांचे हे ऋण मान्यच केले आहे.

मूळ पंचतंत्र आणि त्याचा भाषांतराचा प्रवास अनेक सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची स्थित्यंतरं दाखवून देतो. म्हणूनच पंचतंत्राचा अभ्यास हा खरं म्हणजे भाषेप्रमाणेच संस्कृतीचाही अभ्यास आहे. पंचतंत्राच्या ५ व्या पुस्तकातील ब्राह्मण, मुंगुस आणि सर्प यांची कथा सर्व परिचित आहे. या कथेचे जेव्हा वेल्श भाषेमध्ये रूपांतर झाले तेव्हा ब्राह्मणाचा सरदार झाला, मुंगुसाचा कुत्रा झाला आणि सर्पाचा कोल्हा झाला. ब्राह्मण, मुंगुस आणि सर्प यांना भारतीय संस्कृतीमध्ये एक वेगळ व्यक्तिमत्त्व आहे, सांस्कृतिक कंगोरे आहेत. वेल्श संस्कृतीमध्ये सरदार, कुत्रा आणि कोल्हा यांची आपापली व्यक्तिमत्त्व आहेत आणि म्हणूनच भाषांतरकाराने या पात्रांमध्ये हा बदल घडवून आणला. अशी रूपांतरं आणि स्थित्यंतरं जवळ जवळ सर्वच भाषांमध्ये झाली. पण या सर्व कथांचा गाभा आणि त्यांचे तात्पर्य मात्र कुठेच हरवले नाही. भारतामध्ये ही इतर भाषांमध्ये जेव्हा त्याची भाषांतरं झाली तेव्हाही आपल्याला हा बदल दिसून येतो. हे साहित्य आणि त्याची भाषांतरे हा एका मोठ्या संशोधनाचा आणि अभ्यासाचाच भाग आहे. पंचतंत्राच्या उपलब्ध हस्तलिखितांवरून हर्टेल (१९०९-१४) आणि एडगर्टन (१९२४) या पाश्चात्त्य अभ्यासकांनी त्याची तौलनिक प्रत तयार करण्याचा महाप्रयत्न केला. सुभाषितांचा संग्रह करण्याचा हाच प्रयत्न स्टर्न बँक या अभ्यासकाने केला. तर नॉर्मन ब्राऊन या अमेरिकन अभ्यासकानी भारतीय खंडातील लोककथांवरच प्रबंध (१९१०) लिहिला.

दुर्दैवाने समृद्धी आणि प्रगतीच्या उंबरठ्यावर उभा असलेला आजचा भारत मात्र या सगळ्याच साहित्याकडे पाठ करून उभा आहे. वास्तविक आजच्या शालेय

आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमामध्ये सुभाषितं आणि पंचतंत्रांचा समावेश व्हायला हवा. ‘एडगर्टन’च्या पंचतंत्राच्या पुस्तकाचा समावेश युनेस्कोनेही आपल्या प्रकाशन सूचीत केला आहे. आजच्या एवढी या बोध आणि नीतीग्रंथांची गरज या आधी भारताला कधीही नव्हती. म्हणूनच याचे संशोधन पाश्चात्त्यांवर न सोडता, भारतीय अभ्यासकांनी नव्या उमेदीने ते करणं आवश्यक आहे.

✧✧✧

# डार्विनचा उत्क्रांतिवाद आणि धर्म

{ एप्रिल २००९ }

आजच्या आपल्या भौतिक प्रगतीला व अनेक क्षेत्रांतील विकासाला पंधराव्या शतकामध्ये युरोपात सुरू झालेले प्रबोधनयुग कारणीभूत असून या वाटचालीचे श्रेय ढोबळमानाने या युगाला दिले जाते. सूर्य पृथ्वी भोवती फिरत नसून पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा सूर्यकेंद्रित सिद्धांत कोपर्निकसने मांडला व वैज्ञानिक युगातील क्रांतीला सुरुवात झाली. बायबल आणि टॉलेमीचा चौदाशे वर्षे मानण्यात येणारा भू-केंद्रित विश्वाचा विचार कोपर्निकसच्या 'De revolutionibus orbium coelertium' या ग्रंथाने रद्द ठरवला. त्या काळापासून विज्ञानातील शोध आणि धर्मातील बोध यामध्ये पाश्चात्त्य जगतात संघर्ष चालू झाला.

२००९ साली विख्यात जीवशास्त्रज्ञ व उत्क्रांतिवादाचे प्रणेते म्हणून जीवशास्त्रात मान्यता पावलेले चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांची जन्माची द्विशताब्दी जगभर साजरी होत आहे. २००९ मध्येच त्यांच्या उत्क्रांतीचा विचार स्पष्ट करणाऱ्या ''ओरिजीन ऑफ स्पिशिज'' या ग्रंथाच्या प्रकाशनाला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. वयाच्या बाविसाव्या वर्षी धर्मशास्त्रातील पदवी प्राप्त करणारे डार्विन हे एच. एम. एस. बीगल या सरकारी जहाजाच्या सफरीतून केलेल्या निरीक्षणांमुळे व विचारमंथनामुळे वेगळ्याच वाटेने गेले.

उत्क्रांतिवादाचा 'सक्षम असेल तो जगेल' हा सिद्धांत ख्रिस्ती धर्मविचारांना मानवणारा नव्हता. त्यामुळे विश्वनिर्मितीशी नाळ जोडणाऱ्या या सिद्धांतावर जगभरच टीका झाली. ऑक्सफर्डच्या धर्मगुरुंनी (बिशप) एक निबंध लिहून या सिद्धांताची आलोचना केली. पाश्चात्त्य विज्ञानाच्या इतिहासाचा ढोबळ आढावा घेतला तरी

निसर्गनिर्मितीसह सर्व नवीन विचारांवर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव दिसून येतो. डॅंपियर यांच्या ''सिव्हिलायझेशन ऑफ सायन्स'' या ग्रंथात या द्वंद्वावर उद्‌बोधक भाष्य केले गेले आहे. हा प्रभाव तर्कसंगत तर नव्हताच, शिवाय त्याचे स्वरूप इतके व्यापक होते की, त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झालेला दिसून येतो. या प्रभावापासून जशी मुक्ती मिळत गेली तसे पाश्चात्त्य विज्ञान पुढे जाऊ लागले.

युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. या घटनेमागे वाफेच्या इंजिनाचा शोध हा प्रेरणा ठरला. विज्ञानाच्या क्षेत्रातील विचारमंथनाला यानंतर गती मिळू लागली. या क्रांतीने कळस गाठला तो डार्विनच्या सिद्धांताच्या रूपाने. निर्मितीवादाची बाजू मांडणाऱ्यांनी बायबलमधील जेनिसिसचा कितीही उदो उदो केला तरी त्यांच्यासह निसर्गनिर्मितीच्या सर्व पारंपरिक समजुतींना डार्विनच्या सिद्धांताने छेद दिला. या सिद्धांताची प्रचिती आल्यानंतर विज्ञानाची घोडदौड पुन्हा एकदा सुरू झाली. दुर्दैवाने एकविसाव्या शतकात विज्ञानाच्या शिखरावर असणाऱ्या अमेरिकेत मात्र आजही ख्रिस्ती मूलतत्त्ववाद्यांचा या सिद्धांताला विरोध आहे. अमेरिकेतील अनेक राज्यांत शालेय शिक्षणक्रमातून डार्विनचा हा उत्क्रांतिवाद काढला जावा यासाठी आजही प्रयत्न चालू आहेत.

कोपर्निकसच्या सूर्यकेंद्री विश्वाच्या संकल्पनेला ख्रिस्ती धर्मवेत्त्यांनी केलेल्या विरोधापेक्षा डार्विनच्या सिद्धांताला केला गेलेला विरोध वेगळा नाही, फरक फक्त व्हॅटिकनने पाठपुरावा केला नाही, इतकाच आहे.

भारतामधील एकोणिसाव्या शतकातील सुधारकांना युरोपमधील ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या प्रभावाची सुतराम कल्पना होती असे दिसत नाही. ख्रिस्ती धर्मग्रंथांचा त्यांचा अभ्यास यथातथाच होता. युरोपात विज्ञान व धर्म यांत विरोध होता. हिंदू व हिंदू धर्मातून निर्माण झालेले इतर पंथ यांच्यात हा विरोधाभास केव्हाही नव्हता, आणि म्हणूनच अनेक वैज्ञानिक ग्रंथांची निर्मिती करणारे धर्म जाणणारे होते. आर्यभट्ट, भास्कराचार्यांपासून ते अगदी कामशास्त्र लिहिणाऱ्या वात्सायनापर्यंत कोणालाही धर्मशास्त्राचा विरोध झाला नाही वा शंकराचार्यांनी त्यांच्या विरुद्ध फतवे काढले नाहीत.

याचा अर्थ आपल्या प्रचलित धर्म-संकल्पनांत बदलाची आवश्यकता नव्हती, असे नाही. अनेक कालबाह्य परंपरा आपल्याही व्यवहारात होत्या. बदल किंवा परिवर्तनाची गरज तेवढ्यापुरतीच रहायला हवी होती. पण पुरोगामित्व व आधुनिकतेमध्ये

आपण मागे पडत नाही हे दाखवण्यासाठी या शर्यतीत विज्ञानाची भलावण व धर्माची अवहेलना हे सूत्र प्रस्थापित झाले. ख्रिस्ती धर्मातील संकल्पना आजच्या विज्ञानाच्या विरोधात आहेत. त्यामुळे डार्विनच्या सिद्धांताला विरोध झाला आणि या पार्श्वभूमीवर त्याचे कार्य व त्याचा सिद्धांत समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

डार्विनला सर्वकाही समजले होते, असे दुसरे टोक गाठणे हाही वैज्ञानिक अंधश्रद्धेचा भाग आहे. डार्विन पूर्ण समजायचा असेल तर ख्रिस्ती धर्मही संपूर्ण समजायला हवा. व्हॅटिकनने वेळोवेळी घेतलेल्या आक्षेपांचा इतिहास ज्ञात हवा. डार्विनच्या द्वि-शताब्दीच्या निमित्ताने आपल्याकडे होणाऱ्या चर्चा, परिसंवादांमध्ये पाश्चात्त्यांच्या अनुकरणापलीकडे काही होत नाही हे दुर्दैवाने वास्तव आहे. एकंदरच धर्म संकल्पना व विज्ञान यांच्याबद्दल असलेल्या अनास्थेमुळेच हे घडते. दोन्ही गोष्टी समजायला अभिनिवेशा पेक्षा प्रामाणिकपणाची गरज अधिक आहे. म. गांधी आणि संतांच्या शिकवणीचे खरे मारक त्यांचे अनुयायीच असल्याचे आपण सध्या बघत आहोतच. विज्ञान काय किंवा धर्म काय, दोन्ही आघाड्यांवर सध्या दिवाळखोर नेतृत्व दिसते. विवेक आणि आत्मपरिक्षणच यातून मार्ग काढू शकेल.

पाश्चात्त्य जगतातील जडवादी आणि नास्तिकांना डार्विनचा सिद्धांत ख्रिस्ती धर्माला झोडपायला एक चांगले हत्यार मिळाले. याचीच परिणीती विज्ञाना विरुद्ध अध्यात्म या वादात झाली. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणाऱ्या भारतीय पुरोगामी आणि विज्ञान भाटांनी त्यांचीच री ओढायला सुरवात केली. ख्रिस्ती, इस्लामिक अध्यात्म आणि भारतीय अध्यात्म यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. अध्यात्मातील विज्ञान किंवा विज्ञानातील अध्यात्म आणि त्यांचा परस्पर संबंध यांचा खरा अभ्यास करायचा असेल तर अभ्यासकाला दोन्ही प्रवाहांबद्दल आदर हवा. दुर्दैवाने दोन्ही पक्षांकडे आज याचा अभाव दिसतो. डार्विनच्या निमित्ताने का होईना पण या विचारमंथनाला एक नवीन दिशा मिळो हीच डार्विन चरणी प्रार्थना.

✧✧✧

# ब्रह्मचर्य आणि ब्रह्मचर्याश्रम

{ जुलै २००९ }

डार्विनच्या उत्क्रांतिवादाची द्विशताब्दी आपण साजरी करत आहोत. विज्ञानाने हा सिद्धांत जरी मान्य केला असला, तरी ख्रिस्ती मूलतत्त्ववाद्यांचा याला विरोध आहे. याचा ऊहापोह आपण आधी केलेलाच आहे. या चर्चेत प्राणिमात्रांच्या शरीररचनेतील विकासाच्या टप्प्यांचा ऊहापोह अधिक केला गेला. माकड हा मानवाचा पूर्वज आहे का, या विचारांभोवती ही चर्चा रेंगाळत राहिली. डार्विनचा सिद्धांत जरी मानवाच्या शरीर विकासाशी निगडित असला, तरी शरीररचनेच्या पलीकडे मानवी संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या ज्ञानशाखांमध्येही त्याचा अंतर्भाव केला गेला. विशेषत: समाजशास्त्र, संस्कृतिशास्त्र व मानववंशशास्त्र यांनी याचा आग्रहाने पुरस्कार केला.

मानवी शरीराचा जसा विकास होत होता, तसाच मानवांचा एकमेकांशी असलेला संबंध व समूहाशी असलेला संबंध, यातून निर्माण होणारी समाजरचना, व ती समाजरचना स्थिर होण्याकरता लागणाऱ्या रीतीरिवाजांची ही निर्मिती होत होती. या रीतीरिवाजांचे पुढे नीतीनियम, मूल्ये व समाजसंस्थांत परिवर्तन होत राहिले. हा सर्वच व्यवहार कुठल्यातरी चौकटीत, तत्त्वज्ञानामध्ये, तर्कामध्ये बसवला गेला. यालाच आपण 'धर्मशास्त्र' म्हणतो.

या सर्वांमधला महत्त्वाचा मुद्दा हा, स्त्री-पुरुष संबंध व त्यातून निर्माण होणारा गुंता याच्याशी निगडित आहे. मानवी 'क्षमता' या प्रत्येक मानवाच्या भिन्न तर आहेतच, पण त्यांची आपापली 'कार्यशक्ती'ही भिन्न आहे. या सर्वांचे संतुलन उपरोक्त चौकटीत करण्याचा प्रयत्न केलेला असतो. यामध्ये व्यक्ती व समष्टी या

दोघांचाही विचार असतो. हे संतुलन साधण्याकरता अशा चौकटीत लवचिकपणा आणावा लागतो. पण स्वातंत्र्य म्हणजे जसा स्वैराचार नाही तसेच लवचिकपणाचा अर्थ अव्यवस्था किंवा शिथिलता नाही.

या पार्श्वभूमीवर आपण ब्रह्मचर्याचा विचार करणार आहोत. वर्णाश्रमातील पहिल्या अवस्थेला 'ब्रह्मचर्याश्रम' म्हणतात, तर पुढील अवस्था 'गृहस्थाश्रमा'ची असते. चार आश्रमांमधील हे दोन अतिशय महत्त्वाचे असे आश्रम आहेत. यामध्ये शारीरिक क्षमता व नैसर्गिक शरीरवाढीचा क्रम पाळला गेला आहे.

पण जेव्हा ब्रह्मचर्याश्रमापलीकडच्या आश्रमांत 'ब्रह्मचर्य' अपेक्षित केले जाते तेव्हा ते अनैसर्गिक होते. कोणत्याही अनैसर्गिक प्रवृत्तीकरता मानवी मनाची एक वेगळी चौकट बांधावी लागते. हे 'स्त्री' व 'पुरुष' दोघांनाही लागू आहे. गृहस्थाश्रमातील जबाबदाऱ्या नाकारून पंथसेवा व प्रसाराला बांधून घेण्यासाठी ब्रह्मचर्याचा आग्रह धरला जातो. बौद्ध, जैन, ख्रिस्ती धर्मगुरुंना किंवा सेवकांना म्हणूनच ब्रह्मचर्याची दीक्षा त्यांच्या ब्रह्मचर्याश्रमाच्या पलीकडे दिली जाते.

यामधील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नैसर्गिक प्रेरणांचा संकोच करणे किंवा त्यावर नियंत्रण आणणे हा आहे. हे कायद्यापेक्षा जास्त 'मना'च्या मशागतीवर अवलंबून आहे. हे द्वंद्व शरीराच्या नैसर्गिक 'क्षमता' व त्यांच्या 'प्रेरणा' विरुद्ध मनाची मशागत असे असते. आणि म्हणूनच हिंदू समाजरचनेत अपवाद वगळता ब्रह्मचर्याचा आग्रह धरलेला नाही, आणि याचे परिवर्तन स्वैराचारात होऊ नये म्हणून या आश्रमाला गृहस्थाश्रमात परावर्तित करण्यात आले आहे. निसर्गनियमाविरुद्ध मनाची मशागत ही सोपी नाही. जंगलात जाऊन एखादवेळी ब्रह्मचर्य पाळता येईल; पण समाजात राहून त्याचे पालन करणे फार कठीण आहे. आपण सर्वच धर्मांचा आढावा घेतला तर जेव्हा जेव्हा अशा अनैसर्गिक ब्रह्मचर्याचा आग्रह धरला गेला, तेव्हा तेव्हा ही संकल्पना पराभूत झाली आहे. बौद्ध, जैन भिक्षूंपासून सद्याच्या ख्रिस्ती धर्म प्रचारकांपर्यंत या संकल्पनेचे अपयश आपण पाहात आहोत. माणसावर असे नियंत्रण आणणे अशक्य नाही, पण त्याकरता हवी असणारी आयुधे व साधने आजच्या समाजात तरी तोकडी आहेत. अशा प्रकारे मनाची 'मशागत' करणारी सर्व साधने, नियंत्रणे आपल्या समाज बांधणीतून आपण हद्दपार केली आहेत.

एखाद्या व्यक्तीच्या यशस्वी ब्रह्मचर्याबद्दल आपण येथे विचार करत नसून मोठ्या प्रमाणात तशी व्यवस्था समाजात आणणे शक्य आहे का याचा विचार करत

आहोत. शंभर टक्के ब्रह्मचर्य दूरच राहो, पण लैंगिक प्रेरणांना नियंत्रित करणे ही संतुलित, सुसंस्कृत समाजाची किमान आवश्यकता असते. हिंदू धर्मशास्त्राची रचना या पार्श्वभूमीवर पाहिली तर त्याचे महत्त्व व त्याच्या रचनाकर्त्यांची दूरदृष्टी लक्षात येते. संकल्पना वा तत्त्वज्ञान नुसते चांगले असून चालत नाही तर, त्याच्या व्यापक अंमलबजावणीसाठी बऱ्याच सर्वंकष अशा नीतीनियमांची व नियंत्रणाची गरज असते.

अलीकडे अमेरिकेपासून आयर्लंडपर्यंत ख्रिस्ती धर्मगुरुंनी केलेले बलात्कार व बालकांचे लैंगिक शोषण यांचे अहवाल मन व्यथित करणारे आहेत. यातून घ्यायचे धडे फक्त ख्रिस्ती धर्मापुरते मर्यादित नसून सर्वच पंथांना ते सारखेच लागू आहेत. हिंदू धर्मातील आध्यात्मिक व भौतिक पातळीवरील ब्रह्मचर्याचा विचार हा म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. ब्रह्मचर्याचा अनैसर्गिक आग्रह व्यभिचारास आमंत्रित करतो तर नियंत्रित ब्रह्मचर्य सुसंस्कृत समाज निर्माण करते. मनाची मशागत व कायद्याचे बंधन अशा दोन्ही गोष्टी सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीत पोषक ठरतात.

आज कोणत्याही वृत्तपत्रात, प्रसारमाध्यमात व्यभिचाराच्या बातम्या मोठ्या प्रमाणात येतात. समाजाला लागलेली ही कीड प्रक्षेपित करण्यात या माध्यमांचा वाटा सिंहाचा आहे. याचा विरोध करणारांना बूझ्या ठरवले जाते, तर या घटनांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष समर्थन करणाऱ्या नेतृत्वाला सामाजिक प्रतिष्ठा मिळते. अर्थातच आजच्या या भयावह परिस्थितीला ब्रह्मचर्याची संकल्पना जबाबदार नसून, बीभत्स्य व अश्लीलतेचा कलेमधील पुरस्कार व विवाहबाह्य संबंधांना मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा ही जास्त कारणीभूत आहे. म्हणूनच पुन्हा म्हणावेसे वाटते की हिंदू धर्मशास्त्र रचनाकारांची दूरदृष्टी व अशा प्रेरणा, व्यक्तिगत व सामाजिक स्तरावर संतुलित ठेवण्याचा त्यांचा आग्रह याची आवश्यकता चिरंतन आहे. या पार्श्वभूमीवरच ब्रह्मचर्य, ब्रह्मचर्याश्रम, व गृहस्थाश्रम या संकल्पना आणि त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक संस्थांचा विचार व्हायला हवा.

✧✧✧

# हिंदू दत्तक कायदा

{ ऑक्टोबर २००९ }

२० सप्टेंबर २००९, रविवारच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' मुंबई आवृत्तीत हिंदू दत्तक कायद्यामधील बदलाची बातमी पहिल्याच पानावर मथळ्याला दिली आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया' हे अत्यंत महत्त्वाचे वृत्तपत्र असून त्यातील अशा बातम्यांना देशांत आणि जगांत महत्त्व दिले जाते. हिंदू दांपत्याला हिंदू दत्तक कायद्यानुसार एक मुलगा किंवा मुलगी असेल तर दुसरे मूल दत्तक म्हणून घेताना भिन्न लिंगाचे घ्यावे लागते. १९९२ साली मुलांच्या अधिकारा संबंधात एक जागातिक करार झाला जो भारतानेही मान्य केला. या पार्श्वभूमीवर भारतामध्ये २००२ साली अनाथ आणि निराधार मुलांच्या सुरक्षित भवितव्याकरता एक कायदा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये सर्वच मुलांचा आणि त्यांच्या अधिकारांचा व्यापकतेने विचार केला आहे.

सर्वसाधारणपणे आफ्रिका, भारत या देशांमध्ये अनाथ मुलांचा विकास त्यांना योग्य पालक मिळत नसल्यामुळे होत नाही अशी एक दृढ समजूत आहे. विकसित आणि श्रीमंत देशांमधील अशा अनाथ मुलांची संख्या कमी आहे अशीही यामुळे समजूत होण्याची शक्यता आहे. यातील आकडेवारी जरी सोडून दिली आणि 'पालकत्व' एवढाच विचार घेतला तर विकसित आणि सधन देशांमधील मुलं ही अधिक सुरक्षित हवीत. दुर्दैवाने वस्तुस्थिती वेगळी आहे. पाश्चात्त्य देशात लग्नसंस्था व कुटुंबसंस्था या जवळ जवळ संपुष्टात आल्या आहेत. अपत्यच होत नसल्यामुळे कित्येक देशांमधे लोकसंख्येचे संतुलनही बिघडले आहे. या देशांमधून आपल्या मुलांवर त्यांच्याच पालकांनी केलेल्या लैंगिक, शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे अहवाल मन विषण्ण करणारे आहेत. विशेषत: ख्रिस्ती धर्मगुरुंनी मुलांचे केलेले

लैंगिक शोषण हे तर मानवतेला काळीमा फासणारे आहे. म्हणजे मुलांच्या 'सुरक्षितते'चा प्रश्न आणि 'पालकत्व' यांचा विचार सांस्कृतिक संबंधातच करायला हवा. या सधन देशांमधे, विशेषत: नटनट्या आणि अतिश्रीमंत वर्गामधे, आफ्रिका खंड आणि काही प्रमाणात भारत आणि बांगला देशांतील मूल दत्तक घेण्याचं एक खूळ पसरलं आहे. या विकसित राष्ट्रांमधून अनाथ गृहांमधील मुलं आणि दत्तक गेलेली मुलं यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा कुठलाही तुलनात्मक किंवा शास्त्रीय अभ्यास झालेला नाही. भारतामधेही तशाप्रकारचा कुठलाही अभ्यास उपलब्ध नाही.

तरीही 'दत्तक घ्या' असा प्रचार करणाऱ्या जगात आणि भारतात अनेक सामाजिक संस्था आज अस्तित्वात आहेत. त्यांच्या सद्हेतू आणि सद्भावनांचा आदर करूनही अशाप्रकारच्या चळवळी या समाजाला किती उपयुक्त आहेत याचा तटस्थपणे अभ्यास होणे जरूरीचे आहे. आपण फार पुरोगामी आहोत, प्रगत आहोत, परंपरा झुगारून देण्यात पुढे आहोत या आविर्भावांचा अशा चळवळींना वास येतो. वर सांगितलेली 'टाइम्स ऑफ इंडियातील बातमी' हे याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. वास्तविक पाहता हिंदू दत्तक कायद्यामधील दत्तक घेणाऱ्या मुलाच्या लिंगाच्या संदर्भात केलेली तरतूद ही जास्त संतुलीत आणि विवेकी आहे. पण हा सूज्ञपणा आणि विवेक सनसनाटी निर्माण करू शकत नाही. आदरणीय न्यायाधीशांनी पाश्चिमात्य जगांतील कायदे आणि एकंदरीत गरिबी, व्यक्तिमत्त्व विकास, मुलांचे अधिकार या संदर्भात नोंदलेली अनेक मते आपल्या समर्थनार्थ खुमासदारपणे पेरली आहेत. साहजिकच आपण एक क्रांतिकारक निर्णय दिल्याचा आविर्भाव या बातमीमुळे दृढ झाला आहे.

सुमारे ५० वर्षांपूर्वी आपले १ले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली हिंदू विवाह कायद्यामध्ये एक 'क्रांतिकारक' बदल करण्यात आला. हा बदल म्हणजे सहजतेने घटस्फोट मिळण्याची केलेली सोय. या बदलावरती भारतीय धर्मशास्त्रांवरचे एक गाढे पाश्चिमात्य अभ्यासक श्री. डेरेट यांनी लिहिलेला निबंध हा प्रत्येक भारतीयाने वाचायला हवा. हिंदू धर्मशास्त्र आणि त्यातून निर्माण झालेल्या लग्नासारख्या संस्था आणि नीतीनियमांचे जाळे हे हजारो वर्षांच्या अनुभवाचे एक फलीत आहे. मानवधर्मशास्त्रामधे तर 'गांधर्व' विवाहाचीही नोंद आहे.

हिंदू धर्मशास्त्रामध्ये 'दत्तक' या संकल्पनेवरतीही अत्यंत मूलभूत विचार केला गेला आहे. आदरणीय न्यायाधीशांनी वर निर्देश केलेल्या निकालामध्ये त्याचा

व्यवस्थित ऊहापोह केल्याचा कुठेही मागमूस दिसत नाही. पण परिवर्तन आणि पुरोगामित्वा करता अशा अभ्यासाची फारशी गरज लागत नाही.

याच महिन्यात क्योटो, जपान येथे १४वी जागतिक संस्कृत परिषद भरली होती. ३६ देशांतील सुमारे ५०० अभ्यासकांनी यात भाग घेतला होता. वेद, भाषाशास्त्र, महाभारत, रामायणापासून विज्ञानापर्यंत सुमारे १७ विभागांमध्ये तेथे शोध-निबंध सादर करण्यात आले. धर्मशास्त्र आणि समाज या विभागांतील १३ शोध निबंधात फक्त दोन भारतीय होते. धर्मशास्त्राच्या श्री. मेनस्की या पाश्चिमात्य अभ्यासकानी धर्मशास्त्रामधील बदल, लवचिकता आणि व्यापकता यावरचा अप्रतिम निबंध वाचला. श्री. गॅलेंटर, डेरेट पासून मेनस्की या सर्वांचा पाश्चिमात्य कायदा, सध्याचा भारतीय कायदा आणि धर्मशास्त्र यांचा तौलनिक अभ्यास आहे. दुर्दैवाने भारतीय धर्मशास्त्राला त्यांनी जेवढा न्याय दिला आहे तेवढा न्याय गेल्या ५० वर्षांत भारतीय न्यायसंस्थेनेही दिलेला नाही. ही शोकांतिका संपूर्ण भारतीय समाजाचीच आहे. आणि म्हणूनच म्हणावंसं वाटतं की 'दत्तक' कायद्यातील हा बदल, सुधारणा, परिवर्तन इ. पुरोगामी लाटेवर आरूढ होण्याचा एक केविलवाणा प्रयत्न वाटतो. 'जबाबदार' पालकत्व आणि मुलांचे 'अधिकार' या करता संवेदनाशील, जबाबदार समाजघटक निर्माण होण्याची गरज असते. भौतिक आणि आर्थिक गणितामधे गुंतलेल्या आजच्या समाजामधे म्हणूनच असले कायदे उदंड होतात आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास चालूच राहतो.

✧✧✧

# धर्म, संस्कृती आणि विज्ञान

{ जानेवारी २०१० }

शनिवार २६ डिसेंबर २००९ रोजी प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे यांच्या वतीने ‘भारतीय विज्ञानाने औद्योगिक क्रांतिपूर्व काळात पाश्चात्त्य जगताला दिलेले योगदान’ या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या परिषदेचे शीर्षक वाचताच अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. विज्ञानाचा जो अर्थ आपण आज जाणतो, त्या अर्थाने कोणत्याही प्राचीन संस्कृतीने विज्ञानाला योगदान दिलेले नाही. हा गैरसमज खोलवर आपल्या मनावर रुजलेला आहे. विज्ञान म्हणजे बुद्धीला पटणारी, तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ विचारसरणी आणि ती पुरेशा प्रमाणात प्राचीन लोकांमध्ये अस्तित्वात नव्हती, हा समज यामुळे दृढ झाला. या प्राचीन लोकांचे जीवन, वैज्ञानिक वृत्ती व स्वतंत्र विचारसरणी यांचा अभाव असणाऱ्या अंधश्रद्धायुक्त धर्माने नियंत्रित केले होते, आणि हा समज वादातीत सत्य म्हणून एकदा का स्वीकारला गेला की पाश्चात्त्य जगत हे विज्ञानाचे ‘उगमस्थान’ हा निष्कर्ष आपोआपच मान्य करावा लागतो.

‘धर्म’ ही संकल्पना विज्ञानाच्या शंभर टक्के ‘विरोधी’ आहे ही विचारसरणी पाश्चात्त्य असून आपण ती नीटपणाने जाणून घ्यावयास हवी. या संदर्भातील अभिप्रेत धर्म म्हणजे ‘ख्रिश्चन’ धर्म व विज्ञान म्हणजे ‘आधुनिक विज्ञान’ होय! ही पाश्चात्त्य स्वरूपाची धर्म व विज्ञान यातील विसंगती आपोआपच पौर्वात्य धर्म व विज्ञानाशी त्यांचा असणारा संबंध यावर कलम केली जाते. परंतु ‘पाश्चात्त्य’ व ‘पौर्वात्य’ धर्म संकल्पनेत अनेक बाबींमध्ये मूलभूत फरक आहेत. पाश्चात्त्य धर्मकल्पनेत धर्माला ‘धर्मगुरु’ व ‘धर्मग्रंथ’ असला पाहिजे आणि अनुयायांनी या दोहोंची शिकवण

पाळलीच पाहिजे हे बंधकारक आहे. पौर्वात्य धर्मामध्ये, विशेषत: हिंदू धर्मात अशा प्रकारे एकच एक धर्मगुरु वा धर्मग्रंथ नाही. आपल्याला योग्य असणाऱ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा स्वीकार वा अव्हेर करण्याचे स्वातंत्र्य अनुयायांना आहे. बौद्ध व जैन या धर्मात धर्मगुरु व धर्मग्रंथ यांची शिकवण आहे; पण त्यांनी आपल्या अनुयायांच्या कला व विज्ञानातील, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील अभिव्यक्तीवर बंधने घातली नाहीत. तिसऱ्या शतकात 'कामसूत्रे' लिहिणाऱ्या वात्सायनावर धार्मिक भूमिकेवरून कधी टीका झाली नाही. पंधराव्या शतकापर्यंत त्याच्या सूत्रांवर भाष्ये केली गेली. पद्मश्री या बौद्ध भिक्षूने वैषयिक व भौतिक सुखांवर अकराव्या शतकांत 'नागरसर्वस्व' हा ग्रंथ लिहिला. स्वत:च्या धार्मिक श्रद्धेशी संघर्ष न होऊ देता जैन धर्मातील अनेक साधूंनी गणित व ऐहिक विषयक भौतिक विज्ञानावर ग्रंथ लिहिले. वैज्ञानिक लिखाण करण्याला कन्फ्यूशियस तत्त्वज्ञानाने व चीनमधील बौद्ध धर्माने कधीही विरोध केला नाही व बंधने घातली नाहीत.

यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम हे सेमिटिक (semetic) पंथ असून त्यांच्यात निदान सुरुवातीला उगम, इतिहास, प्रचार व भूगोल या बाबींमध्ये सातत्य आहे. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात हिंदू, बौद्ध व जैन या धर्मांबाबतही असेच म्हणता येईल. पाश्चात्त्य व पौर्वात्य यांचे विज्ञानातील योगदान समजावून घेण्यासाठी, पाश्चात्त्य व पौर्वात्याची विज्ञानाशी असणारी ही 'सांस्कृतिक' बद्धता महत्त्वाची आहे. अशा प्रकारे पाश्चात्त्य व पौर्वात्य जगतातील वैज्ञानिक इतिहासातील धर्माची भूमिका व त्याचे योगदान हे सारखे नाही. 'सर्व धर्म सारखे असतात' यांसारखी विधाने राजकीय अर्थाने खरी असली तरी व आपली कितीही इच्छा असली तरी खरी नसतात. तसेच मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या काळात विज्ञानाचे असे वैश्विकरण करण्यावर भर देण्याचा प्रयत्न हा सुद्धा सत्याचा अपलाप करतो. पाश्चात्त्येतर विज्ञानाच्या इतिहासलेखनात त्यामुळे अनेक चुकांचा शिरकाव होतो. तसेच तो सांस्कृतिक बंधांमधील चौकस वृत्तीला बधिर करतो. त्याचबरोबर विविध संस्कृतींमधील कल्पनानिर्मितीच्या शक्यता आणि ज्ञानमीमांसेच्या भिन्नतेलाही आपण नाकारतो. युक्लिडच्या गृहीत-पुरावा पद्धतीप्रमाणे जेव्हा आपण आर्यभटाच्या लेखनाचे विश्लेषण करू पाहतो तेव्हा मग त्यामध्ये आश्चर्य उरत नाही ते यामुळेच.

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी किमान २००० वर्षे तरी भारतात आयुर्वेद वैद्यक अस्तित्वात आहे. पण ते आज 'पर्यायी' वैद्यक ठरले आहे. वास्तविक हे या उलट, म्हणजे 'ॲलोपॅथी' हे 'आयुर्वेदा'ला पर्यायी असले पाहिजे. ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर

अशी जी 'कालगणना' आपण करतो, तिच्याबाबतही असेच म्हणावे लागेल. आजकाल अनेक विद्वान, बीपी (BP) म्हणजे 'आताच्या पूर्वी' (बीफोर प्रेझेंट) असा प्रयोग वापरतात. पुरावस्तुशास्त्रज्ञ व भूगर्भ शास्त्रज्ञ ब्राँझयुग, लोहयुग असा निर्देश करतात. वास्तविक या गणनेचा मध्यबिंदू हा सुद्धा ख्रिश्चन धर्माची सुरुवातच आहे. अशा प्रकारे शिक्कामोर्तब करणे वरकरणी साधे, सरळ वाटले तरी तसे ते नाही. यामधून अतिशय खुबीदारपणे पाश्चात्त्योतर संस्कृतींपेक्षा पाश्चात्त्य संस्कृती श्रेष्ठ असल्याचे सूचित होते. मानवी विकासाचा इतिहास मांडतांना 'मानव शरीर' रूपक म्हणून वापरले जाते. साहजिकच आधीच्या म्हणजे प्राचिन संस्कृत्यांच्या प्रगतीला किंवा विकासाला 'बाल्यावस्था' म्हणून बघितले जाते.

प्राचीन पाश्चात्त्येतर विज्ञानांना व कल्पनांना अलीकडे 'एथनिक' हे विशेषण लावण्याचा प्रवाह आहे. उदा. एथनिक वैद्यकशास्त्र, एथनिक गणित, एथनोबॉटनी, एथनो झूलॉजी इ. या संदर्भात अनेक शास्त्रज्ञांनी यशस्वी असे संशोधन केले आहे. परंतु 'एथनो' हे विशेषण मुख्य प्रवाहातील विज्ञानापासून या योगदानाची फारकत करते. या विशेषणातून मागासलेपणा, जातीय, योगायोग, आधुनिक विज्ञानाला लागणाऱ्या विश्लेषक दृष्टीचा अभाव अशा अनेक अर्थच्छटा सूचित होतात. न्यूटन- कार्टेशियन चौकसपणाची प्रतिकृती जी वैज्ञानिक निष्कर्षापर्यंत पोहोचण्यास आवश्यक आहे व जी ग्रीक आहे ती अर्थातच या संस्कृत्यांमध्ये अभिप्रेत नाही. साहजिकच पाश्चात्त्य वा ग्रीक योगदानाला जेव्हा काळ झुकते माप देत नाही तेव्हा पौर्वात्य कल्पनांची अग्रिमता, अस्सलपणा नाकारला जातो. याचे चांगले उदाहरण म्हणजे कलनशास्त्र (Calculus). १४व्या शतकातील माधव याच्या लेखनात कलनशास्त्राच्या विकासाला आवश्यक असणारे अनेक उल्लेख आहेत, जे न्यूटन वा लेबनीझ यांच्या दोनशे वर्षांपूर्वीचे आहेत; तरीही त्यांचा उल्लेख कलनशास्त्राचे संशोधक असा होतो. ही वस्तुस्थिती विद्वानांना सुमारे दोनशे वर्षे तरी माहीत आहे. हे शास्त्र युरोपात कसे गेले हा पुढील अभ्यासाचा विषय असू शकतो. पण माधवाची ही 'मूळ' कल्पना असल्याचे का नाकारले जाते! अतिशय तार्किकतेचा व विद्वत्तेचा आव आणून शक्य असतील ते सर्व युक्तिवाद करून माधवाचे योगदान नाकारले जाते. हे जुन्या व विद्यमान विज्ञानेतिहास लेखकांच्या मनोवृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. या लेखकांना 'भव्य' विज्ञान कल्पनांचा उगम हा ग्रीक व पाश्चात्त्य परंपरांच्या योगदानाचा भाग असल्याचे 'प्रशिक्षणच' दिले गेले आहे. हे 'गृहीतप्रमेय' फक्त सिद्ध करावयाचे एवढेच त्यांच्यावर बिंबवले गेले आहे. या उलट असे गृहीत धरले गेले की, पाश्चात्त्येतर संस्कृतीमध्ये 'पारंपरीकरीत्याच' या क्षमतेचा 'अभाव' होता,

मग पुरावे उपलब्ध असूनही या समजुतीच्या जोरावरच अस्सल पुराव्यांनाही दुय्यम स्थान दिले जाते.

रेनासान्स (Renaissance) म्हणजे मुळांकडे परत जाणे. पाश्चात्त्यांचा असा विश्वास आहे की, त्यांची मुळे ख्रिस्तपूर्व काळातील ग्रीक व रोमन संस्कृती आणि तत्त्वज्ञानात आहेत. प्लेटो, पायथागोरस, आर्किमिडीज, युक्लिड व त्यांचे अनेक समकालीन या संस्कृतीचे शिल्पकार आहेत. 'रेनासान्स' ही एक सांस्कृतिक चळवळ होती, की ज्यात कला, विज्ञान, धर्म, तत्त्वज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील मानवी नवनिर्मितीचा समावेश झाला. पाश्चात्त्य विज्ञानाच्या विकासातील 'रेनासान्स चळवळ' ही एक मैलाचा दगड होता हे आता स्वीकारले गेले आहे. विशुद्ध व उपयोजित या दोन्ही कला आणि मानवी जीवनातील सर्व ज्ञानशाखांनी या बदलाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. रेनासान्सची चळवळ ही 'औद्योगिक' क्रांतीची नांदी होती. गॅलिलिओ, ब्रूनो पासून ते आधुनिक काळातील क्लोनिंग पर्यंत ख्रिश्चन धर्माचा असणारा विरोध हा सर्वश्रुत आहे.

युरोप व इतर जगाला असणारे पौर्वात्य संस्कृतीचे, खास करून भारतीयांचे विज्ञान क्षेत्रातील योगदान जाणून घ्यायचे असेल तर, धर्म-संस्कृती-विज्ञान यांतील 'परस्परावलंबित्व' व 'परस्परपूरकता' यांची गुंतागुंत समजावून घ्यावी लागेल. अलीकडील पुरातत्त्वीय शोध, ज्यात सामुद्री पुरातत्त्वाचाही समावेश आहे, यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीचाही या करता उपयोग होतो. गणितीय-खगोल विज्ञान व बीजगणितातील भारताचे योगदान सर्वश्रुत आहे. इतर अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संशोधन साहित्य आज उपलब्ध आहे. त्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

आधुनिक विज्ञानाचे वर्चस्व व त्याच्या वैश्विकरणामुळे प्राचीन विज्ञानाला 'ढेंगूपण' मिळाले आहे. सोळाव्या शतकापासून पाश्चात्त्यांनी उर्वरित जगाचे केलेले 'वसाहतीकरण' ही या भावनेस कारणीभूत ठरते. 'ओरिऐंटेलिझम' (Orientalism) हे या सर्वांचे अंतिम फलित आहे. पाश्चात्त्येतर जगातील आर्थिक संसाधनांची कमतरता व संशोधनाच्या अपुऱ्या सोयी यांनी वसाहतोत्तर काळात पाश्चात्त्यांवरील अवलंबित्व वाढवले. प्राचीन किंवा मध्ययुगीन काळात पाश्चात्त्यांबरोबरचा भारतीय व्यापार हा जरी 'दुतर्फा' असला तरी कल्पनांच्या अग्रिमतेचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा दर्शक मेसापोटोमिया व ग्रीस यांच्या दिशेने वळतो.

औद्योगिक क्रांतिपूर्व काळातील भारतीय विज्ञानाचे युरोपाला झालेले प्रेषण हे समजण्यास सोपे नाही. या प्रेषण क्रियेत आपण आधी पाहिले त्यानुसार व्यापाराने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या विषयावर आता बरेच लेखी व पुरातत्त्वीय साहित्य ही उपलब्ध आहे. भारताचा व्यापार पाश्चात्त्यांपुरताच मर्यादित नव्हता. ख्रिस्तपूर्व काळातील काही शतकांपूर्वीच बौद्ध धर्म चीन व काही मध्य आशियायी देशांत पोहोचला होता. ख्रिस्त काळाच्या सुरुवातीपासून भारतीय व्यापार व संस्कृती दक्षिण पूर्व आशियायी देशांतही पोहोचले होते. तत्त्वज्ञान, धर्म आणि विज्ञानावरील शेकडो ग्रंथांचे चिनी, तिबेटी, खोतानी, वीगर व दक्षिणपूर्व आशियायी भाषांत भाषांतर झाले होते. चीनकडे जाणारा व्यापारी-मार्ग मध्य आशियातूनच जातो. चीन व मध्य आशियायी भाषांत असणारे अनेक ग्रंथ मुळातून व भाषांतरीत अशा दोन्ही रूपात या व्यापारी मार्गातून पाश्चात्त्य संस्कृतीपर्यंत पोहोचले. वास्तविक संस्कृत-पार्शियन/अरेबिक-लॅटिन यांतील प्रेषण संस्कृत-चिनी-मध्य आशियाई-ग्रीक, लॅटिन प्रेषणानंतर चालू झाले. प्रेषणाचा शेवटचा मार्ग हा सोळाव्या शतकातील मिशनरी व वसाहतवादी राज्यकर्त्यांचे लेखन हा होता. अश्मीभूत व पुरातत्त्वीय वनस्पतीशास्त्र, पुरातत्त्वीय प्राणीशास्त्र व वंशशास्त्र या सर्वांसह आंतरशाखीय व विज्ञानांचा संग्राहक व समावेशक अभ्यास कमीत कमी ‘पूर्व ग्रहरहित’ दृष्टीने आपणांस निष्कर्षांप्रत पोहोचविण्यात उपयुक्त ठरेल. आणि तेच खरे भारतीयांच्या विज्ञानाचा इतिहास लिहिण्यास योगदान ठरेल.

(हा संपूर्ण निबंध प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या संकेत स्थळावर वाचता येईल. http://www.oriental thane.com.)

✧✧✧

# चिंतन आणि चिंता

{ एप्रिल २०१० }

२०१० सालातील मार्च महिन्यात आधुनिक चरित्र कोशकार श्रीराम कामत व विंदांसारखा एक मोठा कवी यांच्या निधनामुळे साहित्यात एक पोकळी निर्माण झाली. या महान व्यक्तींचे चरित्र व चारित्र्य नवतरुणांना स्फूर्ती देऊन नव्या उमेदीने नवे संशोधक व कवी निर्माण करेल ही आशा. हे जीवनाचे रहाटगाडगे असेच नित्य चालू राहते. किती आले आणि किती गेले अशीच त्याची नोंद होऊ शकते. यांच्यातील किती जणांची मानवी इतिहासावर ठसा उमटवण्याची क्षमता होती, हे भविष्यच ठरवू शकेल.

भूत, वर्तमान व भविष्य अशी काळाची विभागणी आपण करतो. पण इतिहासातून धडे घेऊन वर्तमान जेव्हा स्फुल्लिंगित होते, प्रेरित होते, तेव्हाच भविष्य घडते. जगातील अनेक महान संस्कृत्या इतिहासजमा झाल्या, पण भारतीय संस्कृती मात्र आजही जिवंत आहे. याचे श्रेय वर्तमानातील भारतीयांपेक्षा शाश्वत सांस्कृतिक चौकट, जिला आपण धर्म म्हणतो जी देणाऱ्या इतिहासातील भारतीयांना द्यावे लागेल. उपासना पद्धती हा आपल्या धर्मातील एक अविभाज्य भाग असला तरी आपला धर्म फक्त उपासना पद्धतीपुरता मर्यादित नाही.

याच महिन्यात थोर संशोधक श्री. रा. चिं. ढेरे यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. रविवार १४ मार्चच्या लोकसत्ता दैनिकात पृ. ९ वर ''विवेकवादाचा विसर खेदजनक'' या शीर्षकाखाली हा पुरस्कार स्वीकारताना श्री. रा. चिं. ढेरे यांनी व्यक्त केलेले चिंतन प्रकाशित झाले आहे. वास्तविक सर्वच संवेदनशील नागरिकांच्या मनातील खंत श्री. रा. चिं. ढेरे यांनी या चिंतनातून व्यक्त केली आहे. त्यांच्याच शब्दात, ''धर्माची सांगड आपण कायम नीतीशी घालत आलो आहोत. धर्माधिष्ठित

समाजव्यवस्थेत ती स्वाभाविक प्रक्रियाच होती, पण आज नवसमाजनिर्मितीचा प्रयत्न करताना आपण धर्म दूर सारला, तशी नीतीही दूर सारण्याची अक्षम्य चूक केली आहे. धर्म कोणताही असो, किंबहुना धर्म असो वा नसो, नैतिकता ही माणसाच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक चारित्र्याचं संवर्धन करणारी गोष्ट आहे. त्याच्या सामूहिक जगण्याचा निरोगी नियमन-संगोपन करणारी शक्ती आहे. त्या नैतिकतेचा सर्व क्षेत्रांमधला पाडाव आज कोणाही संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारा आहे.''

आजच्या आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय नेतृत्वाकडे बघितल्यावर ढेरे यांनी व्यक्त केलेल्या या खंतीकरता वेगळे काहीच सांगायला नको. पण, आपण आज या परिस्थितीला का पोहोचलो याचे आत्मपरीक्षण होणे मात्र गरजेचे आहे. नवसमाजनिर्मितीची भाषा ही सर्वच सुधारकांनी आलटून पालटून आग्रहाने मांडली आहे. समाजात ज्या अनेक चालीरीती असतात, मग त्या सामाजिक असोत की उपासना पद्धतीशी निगडित असोत, हळूहळू संदर्भहीन होतात. पण ही समाजव्यवस्था इतकी अंगवळणी पडलेली असते की ती झटकन टाकूनही देता येत नाही. या अशा प्रत्येक चालीरितीच्या मुळाशी कुठेतरी महत्त्वाचे नैतिक अधिष्ठान असते. अनेक सणसमारंभ, उत्सव यांच्या मखरात ते बसवलेले असते. काळानुरूप याची वरची पुटे काढून आतील नैतिक गाभ्याचे स्वरूप लोकांपुढे आणणे गरजेचे असते. गेली लक्षावधी वर्षे मानवी स्वभावधर्म बदलल्याची कोठेही वैज्ञानिक पुष्टी झालेली दिसत नाही. किंबहुना राग, लोभादी, षड्रिपु यांची मात्राही काळाच्या ओघात कमी झाल्याचे दिसत नाही. या षड्रिपुंना काबूत ठेवण्यासाठी जे अनेक मार्ग सांगितले जातात तीच समाजाची नीती असते. बहुतेक वेळा खरे बोलून फायदा होत नाही, तरी खरे बोलण्याचा आग्रह धरावा लागतो. फायदातोट्यांची गणिती कोष्टके मांडून खरे बोलण्याची उपयुक्तता ठरवता येत नाही. दुर्दैवाने मोडतोड करणे म्हणजे समाजसुधारणा व पुरोगामित्व असा मंत्र मांडला गेला. जुने मोडून नवीन होत नसते; आणि खरे सांगायचे तर नवीन काहीच नसते. आपण काहीतरी नवीन करतोय हा आपल्या अज्ञानाचाच भाग असतो.

श्री. रा. चिं. ढेरे यांनी धर्माबरोबर आपण नीतीही हद्दपार केली याची खंत व्यक्त केली आहे. सामान्य माणसापेक्षा 'नवसमाज' निर्माण करण्याची आरोळी फोडणाऱ्या, बढाई मारणाऱ्या सामाजिक, साहित्यिक, राजकीय धुरीणांनी यांची दखल अधिक घ्यायला हवी. ज्यांचे नाव उच्चारताही आंघोळ करून यावे अशा

स्तरातील व्यक्ती आपल्या सांस्कृतिक, भाषिक व सामाजिक जीवनाचे नेतृत्व करताना आपण अनुभवत आहोत. यांना आवर घालण्याची क्षमता ना सरकारमध्ये, ना विचारवंतांमध्ये. अशा पार्श्वभूमीवर श्री. रा. चिं. ढेरे किंवा सामान्य माणसे 'अगतिक', किंवा खंत व्यक्त करण्यापलीकडे काय करू शकतात? आरक्षण व सवलतींच्या भिक्षेचा वाडगा हातात धरलेला समाज नवनिर्मितीची क्षमता बाळगू शकेल याची सुतराम शक्यता नाही. कठोर आत्मपरीक्षण व समाजासाठी पराकोटीचा त्याग हाच समाजाला भानावर आणू शकतो. असे नेतृत्व आकाशातून पडत नाही, तर ते समाजातून निर्माण व्हावे लागते. श्री. रा. चिं. ढेरे यांच्या चिंतनातून व्यक्त होणारी खंत समाजातील अशा अंकुरांना नवी स्फूर्ती देणारी ठरो, एवढीच ईश्वराजवळ प्रार्थना !

✧✧✧

# व्यक्तिस्वातंत्र्य : एक सावळा गोंधळ

{ जुलै २०१० }

स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांतील सीमारेषा फार अस्पष्ट आहे असे म्हटले जाते. या दोन संकल्पनांतील फरक हा फक्त सांस्कृतिक मापदंडांचा आहे. बहुतांशी, स्वातंत्र्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार जास्त केला जातो आणि म्हणूनच, व्यक्तिस्वातंत्र्याचे स्वैराचारात होणारे रूपांतर मानवी समाजाच्या दृष्टीने धोकादायक, विनाशाकडे नेण्यास कारणीभूत ठरू शकते. मनुष्य हा जंगली संस्कृतीकडून सभ्य संस्कृतीकडे आला त्याचा अर्थच असा आहे की, त्याने आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना सीमित केल्या किंवा त्यावर नियंत्रणे आणली. व्यक्तिगत व सामूहिक स्तरावरती समाज काही गोष्टी अनुभवांतून शिकतो व निष्कर्षाप्रत येत असतो. त्याच्या या अनुभवांच्या बेरीज-वजाबाकीचे रूपांतर नीतिमूल्ये आणि सामाजिक संस्थांच्या रचनेत होत असते.

कालांतराने यालाच एका संहितेचे रूप मिळते आणि त्याचीच पुढील निष्पत्ती म्हणजे अनेक पंथांची निर्मिती ही असते. तर्काच्या पातळीवर किंवा शुद्ध विज्ञानाच्या स्तरावर स्त्री, पुरुष व वयाचा फरक सोडला तर कुठलाच भेद असू शकत नाही. वयामुळे निर्माण होणारा भेद काही क्षमतांचा असतो; मूळ रचनेचा नसतो. आई, वडील, भाऊ, बहीण, आपला, परका ही सर्व नाती सांस्कृतिक आहेत. सामाजिक जीवन अधिकाधिक सुसह्य व सुसंगत व्हावे म्हणून यांतील अनेक नात्यांभोवती सांस्कृतिक वलये निर्माण होतात. म्हणूनच आई-वडील आपल्या अपत्याकडे किंवा ते अपत्य आपल्या आई-वडिलांकडे फक्त नर आणि मादी एवढ्याच वैज्ञानिक वास्तवापुरते न बघता, एका हेतुपुरस्सर भावनेने गुंतलेले असते.

विवाह ही यातूनच निर्माण झालेली एक सामाजिक संस्था आहे. ही नाती

आणि या संस्था या एका अदृश्य सांस्कृतिक बंधाने गेली हजारो वर्षे आपण जपल्या आहेत. त्यांचा आदर करण्याची बहुतांशी समाजाची मानसिकता असते. या रचनेत काही व्यक्तींचे अनुभव सुसह्य नसले तरीही व्यापक सामाजिक हिताकरता या चौकटींचा आदर करावा लागतो.

गेल्या काही शतकांत पाश्चात्त्य जगात, विशेषत: अमेरिकेत स्वातंत्र्याच्या भन्नाट संकल्पनांचा उदय झाला. या संकल्पना म्हणजे 'आत्मकेंद्रित' फायद्यातोट्यांचा विचार करत अंगीकारलेली जीवनशैली होती. यातूनच 'भाबड्या' समानतेचा उदय झाला. नव्याने होत असलेल्या औद्योगिकीकरणामुळे या सर्व प्रक्रियेला खतपाणी मिळत राहिले. या सर्वांचा परिणाम असा झाला की, नाती व सामाजिक संस्था मोडकळीस आल्या. व्यक्तिस्वातंत्र्य स्वैराचारात परावर्तित झाले. सामाजिक संस्थांचा निकाल तर लागलाच, पण हव्यासयुक्त उपभोक्तवादामुळे आपण पर्यावरणाची प्रचंड हानी केली. स्वैराचारी पिढ्यांनी काही दशके उपभोगलेल्या या स्वातंत्र्यामुळे भविष्यातील अनेक पिढ्यांचे भवितव्य आज धोक्यात आले.

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन जिवंत संस्कृती आहे. साहजिकच त्याच्या काही परंपरा, नीती-अनीतीच्या संकल्पना, नात्यांचा गुंता इत्यादींना हजारो वर्षांच्या अनुभवाची पार्श्वभूमी आहे. विवाहाचे मनुनेही सात-आठ प्रकार सांगितले आहेत. आपली धर्मशास्त्रे ही कोठल्याही उपासना वा पूजा व्यवहारांशी संबंधित नसून ती समाजशास्त्राची संहिता आहे. मानवी जीवन हे प्रवाही असल्याने अशा संहितातही बदल होणे नैसर्गिक असते. पण बदल म्हणजे मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या मूलभूत संकल्पनांची उलथापालथ नव्हे. त्यामुळेच असे बदल अत्यंत विचारपूर्वक करावे लागतात. आपली सर्व धर्मशास्त्रे मोडीत काढून आज त्यांची जागा घटना व न्याय व्यवस्थेने घेतली आहे. थोडक्यात, घटनेचा आदर व त्यातील मूल्यांची अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयांची गरज अपरिहार्य होऊन बसते. स्वातंत्र्याचा कितीही उद्‌घोष करत राहिले तरी घटना आणि न्यायालये समाजावर मोठ्या प्रमाणात नियंत्रणे आणतच असतात. गाजावाजा करत स्वीकारण्यात आलेल्या आपल्या घटनेत ६० वर्षांत १०० हून अधिक बदल करावे लागले व अलीकडे तर न्यायसंस्थेला आपण पुरोगामी असल्याचे दाखवण्याकरता अनेक 'क्रांतीकारक' निर्णय देण्याचा ध्यास लागला आहे.

विवाहपूर्व संबंधात 'अनैतिक' काहीच नाही, हा असाच एक दिलेला निर्णय. वास्तविक लग्न संस्थेचे अस्तित्व लोप पावलेल्या आणि कुठल्याही नात्यांचा विचार न करता लैंगिक संबंधात स्वातंत्र्य असलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीची भयावह

परिस्थिती आज आपल्या डोळ्यांसमोर आहे. यातून योग्य ते धडे घेण्याऐवजी आपण पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानत आहोत.

गरम वस्तूला हात लावला की चटका बसतो व अशा वस्तूला परत हात न लावणे हे अनुभवांतून मिळालेले शिक्षण असते. याकरता गरम म्हणजे काय व त्याला हात लागतो तो मज्जातंतूंच्या कुठल्या संवेदनांमुळे, असल्या 'शास्त्रीय' वर्णनांची गरज नसते. धूम्रपान, मद्यपान न करणे, चवीला आवडणाऱ्या अन्नाचे अतिसेवन न करणे, परस्त्रीचा मातेसमान आदर करणे ही व अशी अनेक मूल्ये वैज्ञानिक वा तार्किक गणितांचा विचार न करता जतन करावी लागतात. याची मोडतोड करणाऱ्या एखाद्या पिढीला तात्पुरता फायदा होत असला तरी, भविष्यातील पिढ्यांवर त्याचा परिणाम विपरीतच होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अलीकडे प्रकाशित झालेल्या अनेक शोधनिबंधांनीही अशा स्वैराचारी जीवनपद्धतीमुळे भविष्यातील पिढ्यांवर होणाऱ्या घातक परिणामांवर शिक्कामोर्तब केले आहे. पेंबरे (Pembrey), गोल्डिंग (Golding) आणि बायग्रेन (Bygren) या शास्त्रज्ञांनी २००६ च्या 'युरोपिअन जर्नल ऑफ ह्यूमन जेनेटिक्स' (European Journal of Human Genetics) यात दहाव्या वर्षांच्या आत-बाहेर धूम्रपान करणाऱ्या मुलांच्या पुढील पिढ्यांचा अभ्यास केला आणि त्यांतील बहुतेकांच्या अपत्यांवर विपरीत परिणाम झाल्याचे त्यांना आढळून आले. इंग्लंड येथील ब्रिस्टल विद्यापीठाच्या अभ्यासकांनी पालक व त्यांच्या मुलांच्या केलेल्या अभ्यासातून ज्या मातांना (गर्भवती मातांना) मानसिक तणाव होता, त्यांच्या मुलांमध्ये दम्यासारख्या विकाराचे प्रमाण अधिक आढळून आले. हाच अनुभव धूम्रपान, मद्यपान व तत्सम जीवनशैली स्वीकारलेल्या मातांच्या अपत्यांबाबतही आहे.

यातूनच या सर्व शास्त्रज्ञांनी काढलेला निष्कर्ष असे सांगतो की, स्वैराचारी वर्तन करणारे पर्यावरणाची हानी तर करतातच, पण येऊ घातलेल्या पिढ्यांचीही न भरून येणारी हानी करतात. सुदैवाने अशा वैज्ञानिक निष्कर्षांमुळे पाश्चात्त्य जगतात जीवनशैली बदलावर मोठा भर दिला जातोय. सामाजिक संस्था आणि सर्व नाती यांची पुनर्स्थापना कशी करता येईल याचा समाजशास्त्रज्ञ विचार करत आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्याकडील वृत्तपत्रे, दूरदर्शन, तथाकथित पुढारी, सामाजिक, राजकीय नेतृत्व समाजाला दिवाळखोरीकडे नेत आहेत. सवलतग्रस्त बहुसंख्य समाजही याचा गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. अप्रिय होण्याची तयारी आणि आंधळा लोकानूनय न करणारे धार्मिक आणि सामाजिक नेतृत्वच आजची आपली अधोगती थांबवू शकेल.

✧✧✧

# सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची गरज

{ ऑक्टोबर २०१० }

इतिहासाच्या ढोबळ अभ्यासावरूनही एक गोष्ट लक्षात येते की, जगात अनेक संस्कृत्या त्यांच्या रानटी अवस्थेपासून उन्नत होत उत्कर्ष पावल्या व विलयाला गेल्या. सिंधू संस्कृती, सुमेरियन, अक्केरियन, बॅबिलेनियन ग्रीक, रोमन अशा अनेक संस्कृत्यांचे उदाहरण याकरता देता येईल. या सर्व सभ्यता उन्नत अवस्थेस पोहचलेल्या होत्या तरी आज मात्र त्यांचे अस्तित्व इतिहासाची पुस्तके व ग्रंथालये सोडली तर कोठेही दिसत नाही. त्यांनी निर्माण केलेल्या साहित्य व कलांचेही अस्तित्व फारसे दिसत नाही. युरोपमध्ये ख्रिस्ती धर्मगुरुंच्या अतिरेकी व नीतिहीन वागणुकीमुळे आणि राजसत्तेपासून माणसाच्या दैनंदिन जीवनातील दिनक्रमापर्यंत त्यांनी लादलेल्या अतिरेकी नियमांमुळे कंटाळून जाऊन तेथील बुद्धिवादी मंडळींनी प्रबोधनाचे (Renaissance) युग सुरू केले. हे प्रबोधन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपल्या ख्रिस्तपूर्व ग्रीक संस्कृतीकडे पुन्हा वळा असे सांगण्याचा प्रयत्न होता. ग्रीक संस्कृतीतील ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा त्यात पुरस्कार होता; म्हणूनच प्रबोधन (Renaissance) व नंतरच्या काळातील साहित्य, कला, शिल्प या सर्वांवर ग्रीक संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. यातूनच पुढे औद्योगिक क्रांती, वैज्ञानिक क्रांती व सांस्कृतिक क्रांती झाली.

या बदलांना समांतर असे जीवनशैलीत बदल घडले. त्यातून सांस्कृतिक मूल्यांची जडणघडण झाली आणि २० व्या शतकात चंगळवाद, उपभोक्तावाद व आत्मकेंद्रित 'पाश्चात्त्य' संस्कृती निर्माण झाली. प्रबोधन युगात ख्रिस्ती धर्माने आणलेल्या अतिरेकी नियंत्रणांमधून सुटका झाली तरी, परंपरागत नीतिमूल्यांची 'संपूर्ण विल्हेवाट' लागणे ही त्यात अपेक्षा नव्हती. सर्जनशीलतेच्या,

व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या या फतव्यांनी घुसमटलेल्या परिस्थितीची कोंडी फोडण्याचा तो एक प्रयत्न होता. आजच्या पाश्चात्त्य आत्मकेंद्रित, स्वातंत्र्याच्या नावाखालील जीवनशैलीचा 'अमेरिकी आविष्कार' हा प्रबोधनापेक्षा अमेरिकेतील विज्ञान आणि औद्यागिक क्रांती यांचा परिणाम आहे, त्याची बीजे त्यात आहेत.

सर्व सामजिक संस्था, नाती यांची मोडतोड आज या संस्कृतींमधून झाली. या पाश्चात्त्य राष्ट्रांचा भौतिक विकास एवढा प्रचंड झाला की आधुनिकीकरण (Modernisation) म्हणजेच पाश्चात्त्यीकरण (Westernisation) असे समीकरण बनते. स्वातंत्र्योत्तर काळातील भारत हा या पाश्चात्त्यांच्या भौतिक प्रगतीने इतका भारावून गेला की, विज्ञानाच्या उसनवारीतून सुरू झालेले परावलंबित्व सांस्कृतिक उसनवारी आणि सांस्कृतिक गुलामगिरीत होताना आज दिसत आहे. भारतीय धर्म संकल्पना ही पाश्चात्त्य धर्मसंकल्पनेपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. भाषांतराच्या प्रभावात धर्माचे 'रिलिजन' झाले आणि म्हणूनच, रिलिजनमध्ये अभिप्रेत असलेल्या सर्व चांगल्या-वाईट संकल्पनांचे धर्म या संकल्पनेवर रोपण झाले.

यातच स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक बुद्धिजीवींना आपल्या धर्मात आलेली ग्लानी, घातक रूढी व परंपरा यात बदल घडवण्याचा प्रयत्न केला. मूळ संकल्पनेतील चांगल्या धर्म रूढी नष्ट करण्याची त्यांची भावना नव्हती. गोपाळ गणेश आगरकर, साने गुरुजींपासून ते विनोबा भावेंपर्यंत सर्वांना याची चांगली जाण होती. म्हणूनच साने गुरुजींनी 'आई' हे मूल्य, तर विनोबांनी 'गीताई' च्या माध्यमातून सामाजिक सुधारणांचा प्रयत्न केला. पुढे मात्र ज्यावेळी त्यात राजकारण मिसळले तेव्हा 'सुधारणा' 'पुरोगामित्व' परिवर्तनवादाकडे वळू लागल्या.

या वादांचे प्रेषक व अनुयायी यांत एक दुवा म्हणजे हिंदू धर्माचा द्वेष हा होय. 'जडवाद्यांनी' या दिंडीत सामील होऊन 'अंधश्रद्धा निर्मूलन' हे एक नवीन परिमाण त्याला देऊन टाकले. या सगळ्यांची गोळाबेरीज एवढीच झाली की, हिंदू समाज हा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संकल्पनेच्या बाबतीत नेतृत्त्वहीन झाला. चंगळवाद व उपभोक्ता-वादाच्या कुबड्या घेऊन नवीन नेतृत्व या आघाड्यांवर जन्माला येऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणातील घराणेशाही व सत्ता हेच सर्वस्व बनले; त्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण घडण्याच्या प्रक्रियेला वेग आला. उत्तरेकडे सुरू झालेल्या या लाटेने आता सर्व भारत काबीज केला. पुरोगामित्व व परिवर्तन यामुळे गांगरलेला पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करणारा समाज मूल्यहीन, चारित्र्यहीन झाला. स्वार्थीपणा, लाचारी, लांगूलचालन, स्वकेंद्री

जीवन पद्धती ही प्रभावी चलने झाली. एवढेच नाही तर त्यांना सामाजिक प्रतिष्ठा व फायदेही मिळू लागले.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे आज महाराष्ट्रात आपल्या सर्व सणांचे झालेले राजकीयीकरण हे होय! दही हंडी, सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र या सर्व सण-उत्सवांनी आज जे सामाजिक स्वरूप प्राप्त केले आहे ते उबग आणणारे आहे. एकेकाळी पवित्र, मंगल असलेल्या या सणांचे विकृतीकरण करून आपल्या राजकारण्यांनी त्याला हीन, बाजारू स्वरूप दिले आहे. वृत्तपत्रे, माध्यमे, नट-नट्या हे सर्वच अभिरुचीच्या या अधःपतनात हिरिरीने आघाडीवर आहेत. विद्येचे, कलेचे दैवत असणारा गणपती उत्सवांतून निर्बुद्ध, अभिरुची शून्य, अर्वाच्य नाच-गाण्यांनी प्रतिष्ठापित व विसर्जित केला जात असलेला आपण उघड्या डोळ्यांनी बघत आहोत.

दिशाहीन सिद्धांतांच्या दावणीला बांधलेल्या अतिरेकी सुधारणा व परिवर्तनाच्यापोटी दुसरे काय फळ पडणार? आपल्या संवेदनांचे हे अवमूल्यन थांबवण्याचे धाडस आपण दाखवले नाही, तर संपूर्ण अराजक यायला वेळ लागणार नाही. नीतिमूल्ये आणि चारित्र्य यांचे धर्मशास्त्रात असलेल्या संकल्पनांचे पुनरुज्जीवनच हिंदू धर्मातील प्रबोधनास सुरुवात करू शकेल.

✧✧✧

# भाषा आणि संस्कृती

{ जानेवारी २०११ }

२५ ते २७ डिसेंबर २०१० या दरम्यान ठाण्यात ८४ वे साहित्य संमेलन संपन्न होत आहे. भाषा ही कोणत्याही संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. मोजके स्वर व व्यंजने यांच्या आधारावर अनंत, अगणित असे साहित्य निर्माण होते. असे साहित्य प्रकाशित करण्याची माध्यमे बदलत गेली असली, तरी गेली हजारो वर्षे मनुष्य या साधनांचा वापर करत आहे. संस्कृतीच्या सर्व अंगांचा आविष्कार  हा या भाषेच्या माध्यमातून सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न मानवाने केला आहे. महाराष्ट्राची आजची आपली मराठी भाषा ही देखील यास अपवाद नाही.

ठाण्यात होणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे ८४ वे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अशा साहित्य संमेलनांमधून साहित्य विचार, संशोधन हे 'गौण' होत जाऊन 'साहित्येतर' बाबींनाच महत्त्व प्राप्त होत असल्याचे दिसून येते. भारतात इतर कोणत्याही भाषांमध्ये अशा प्रकारची संमेलने होत नाहीत ही एक दुर्दैवी बाब आहे. साहित्यसंमेलनाचा एक भाग म्हणून तरी भाषेच्या विचाराला, संशोधनाला यात स्थान मिळावयास हवे. अशा अभ्यासातूनच भाषेबरोबर तिच्या सांस्कृतिक स्थित्यंतरांचाही अभ्यास होत असतो. सांस्कृतिक विकास म्हणजे माणसाच्या अभिव्यक्तीकरता भाषा सर्व गोष्टींना छेदून जाते. आपल्याकडील संमेलनांमध्ये कथा, कादंबरी, कविता एवढ्यापुरत्या चर्चा मर्यादित राहतात व भाषेवर, संस्कृतींवर अन्याय होतो. भारताने भाषा विज्ञानाला दिलेले योगदान अद्वितीय आहे. ज्ञान मौखिक परंपरेतून उदयास येते. सर्व प्राचीन संस्कृतींवरून हे आपणांस दिसते. वैदिक संहिता अचूकतेने त्यांत कानामात्रेचाही फरक न होता संक्रमित झाल्या. उच्चारणाचे एक शास्त्र बनवण्यात आले आणि या शास्त्रामुळेच

हजारो वर्षे या संहितांचे जतन झाले. या विचारप्रक्रियेतूनच वर्ण उच्चाराचे स्थान व वर्णमालेची रचना निर्माण झाली. कंठ्यांपासून दंत्यांपर्यंत वर्णांच्या उच्चार स्थानांच्या करण्यात आलेल्या या रचनेला जगात तोड नाही. भारताच्याच नाही तर चीनपासून कोरियापर्यंत दक्षिणपूर्व आशिया खंडातील सर्व देशांनी हीच रचना स्वीकारली. यातील महत्त्वाचा मुद्दा हा भाषानिर्मिती व प्रसाराच्या विकासात भारताने केलेला विचार मध्यवर्ती होता हा आहे.

मराठीची निर्मिती ही प्राकृत महाराष्ट्रीय व अपभ्रंश या भाषांतून झाली असे अभ्यासक मानतात. दुर्दैवाने मराठीचा विकास दर्शवणाऱ्या या आधीच्या भाषा जवळ जवळ मृत झाल्या आहेत आणि भारतातील अशा मूलभूत भाषांची संख्याही मोठी आहे. या सर्व भाषांतून थोडेफार साहित्यही निर्माण झाले आहे. पण कुठल्याही प्रांताची, जातीची, पंथाची नसलेली संस्कृत भाषा मात्र गेली अडीच हजार वर्षे टिकून आहे. वर उल्लेख केलेल्या प्रांतिक भाषांपेक्षा कितीतरी अधिक साहित्य संस्कृतमध्ये निर्माण झाले आहे. अफगाणिस्तानापासून आशिया खंडातील दक्षिणपूर्व देशांमध्ये सर्व शाखांतील आदानप्रदान हे संस्कृतमधून होत राहिले. केरळचे शंकराचार्य काश्मीरमध्ये जाऊन वादविवाद करू शकले ते संस्कृत भाषेमुळे. लक्षात घेण्यासारखा महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, संस्कृतची निर्मिती हीच मुळी प्रमाणभाषा म्हणून झाली आहे आणि या प्रमाणित स्वरूपामुळेच बोली-भाषा आणि भौगोलिकतेच्या मर्यादा ओलांडून मोठ्या मानवसमूहाची ती भाषा झाली सर्व प्रमुख भाषांची ती आधार बनली.

मानवाच्या सर्व भाषांना व्यक्त करू शकतील असे शब्द त्या भाषेत निर्माण झाले आणि कथा, कादंबरी, कविता या घाटांपुरते मर्यादित न राहता सर्व विज्ञान शाखांची ती भाषा ठरली. बोली भाषा व प्रमाणभाषा यांतील फरक अभ्यासकांनी लक्षात घ्यावयास हवा. संस्कृत आणि प्राकृत या केव्हाही एकमेकींच्या स्पर्धेत नव्हत्या. अनेक संस्कृत साहित्यपर व विज्ञान ग्रंथांतून प्राकृतचा सढळ वापर झालेला आपल्याला दिसतो.

दुर्दैवाने आज मराठीच्या विकासाच्या संदर्भात मात्र कारण नसताना अनेक वाद निर्माण करण्यात येतात. आज दहा कोटी मराठी माणसांना बिनचूकपणे अर्थ व्यक्त करणे जमेल असे स्वरूप मराठीला द्यावयाचे असेल तर तिला प्रमाणित करणे हे अत्यंत आवश्यक आहे. बोली-भाषा असे स्वरूप देऊ शकत नाहीत ह्या वास्तवाचे भान ठेवावयास हवे. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे आपण

आग्रहपूर्वक म्हणतो. पण हे बोली भाषेबाबत खरे असले तरी प्रमाण भाषेबद्दल नाही. भाषेमध्ये पारिभाषिक शब्द आणणे हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. गेल्या काही शतकांत ज्या राष्ट्रांनी आधुनिक विज्ञानाची निर्मिती केली ती बहुसंख्य राष्ट्रे इंग्रजी, जर्मन, फ्रेंच भाषिक आहेत, परंतु विज्ञानाकरता जे शब्द त्यांनी वापरले ते ग्रीक व लॅटिन आहेत. कारण ग्रीक व लॅटिन याच त्या पाश्चात्त्य संस्कृतीच्या भाषा होत्या. त्या भाषा मृत असल्या तरी आधी निर्माण केलेले आणि झालेले शब्द संस्कृतीच्या सर्व अंगांना भेदून जाणारे होते. यामुळेच वैद्यकशास्त्रापासून संगणकापर्यंत नवीन शब्द शोधण्यासाठी आजही याच भाषांचा वापर करावा लागतो. याबद्दल कधी कोणी वाद घातल्याचे दिसत नाही. पाश्चात्त्य भाषांमध्ये इंग्रजी, जर्मन, फ्रेंच भाषा समृद्ध करण्यात ग्रीक व लॅटिन भाषांचा जो सहभाग आहे तीच स्थिती संस्कृत आणि भारतीय भाषांची आहे. मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी इतर पाश्चात्त्य भाषांची उसनवारी करण्यापेक्षा त्यासाठी संस्कृतचा वापर करणे अधिक शहाणपणाचे आहे.

म्हणूनच, अशा साहित्यसंमेलनांमध्ये बाष्कळ चर्चा करण्यापेक्षा भाषेच्या विकासाला हातभार लावतील अशा विषयांची थोडीफार तरी चर्चा होणे आवश्यक आहे.

✧✧✧

# भ्रष्टाचार, जबाबदार कोण?

**{ एप्रिल २०११ }**

गेल्या काही महिन्यांतील भारतातील भ्रष्टाचाराची प्रकरणे बघून मन सुन्न होते. साठ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आपल्या राजकीय क्षेत्राने नीचांक गाठला आहे. भारत हा सर्वांत मोठा लोकशाही देश आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. तांत्रिक दृष्ट्या हे जरी खरे असले तरी आजच्या पंचायतीपासून ते लोकसभेपर्यंतची भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहिली की या विधानातील फसवेपणा लक्षात येतो. एखादे घर जरी क्षेत्रफळाने मोठे असले; पण त्याचे वासे सडलेले असतील तर अशा घराचा विध्वंस त्याचे क्षेत्रफळ मोठे असले तरी अपरिहार्य असतो.

पंधराव्या शतकानंतर युरोपमध्ये प्रबोधनाचे युग सुरू झाले असे म्हणतात. ख्रिस्ती धर्मसंस्थेतील अधिकारशाही आणि भ्रष्टाचार याविरुद्ध पुकारले गेलेले ते शीत युद्ध होते. साहित्यापासून कलेपर्यंत अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रकट व्हायला तेव्हा पाश्चात्त्य देशात सुरुवात झाली. आठव्या शतकापासून बारा-तेराव्या शतकापर्यंत इस्लामी संस्कृतीचे सुवर्णयुग होते. कला, गणित, विज्ञान, ज्योतिष या सर्व क्षेत्रांत त्यांनी आधाडी मारली होती. इस्लामी संस्कृतीच्या या भरभराटीला हिंदू आणि ग्रीक विचारांचे योगदान होते. अरबी व फारशी भाषेत या विषयांवर हजारोंनी ग्रंथ निर्माण झाले. बाराव्या शतकापासून पंधरा-सोळाव्या शतकापर्यंत त्यांचे लॅटिनमध्ये भाषांतर होऊ लागले. पंधरा-सोळाव्या शतकातील युरोपमधील प्रबोधनाला या विज्ञान ग्रंथांची पार्श्वभूमी होती.

पदार्थविज्ञान, गणित, वैद्यका पासून यंत्रशास्त्रापर्यंतच्या अनेक सिद्धांतांचा उगम हा या प्रबोधनपूर्व साहित्यात होता. प्रबोधनाच्या पुढच्या टप्प्यात वैज्ञानिक

आणि औद्यागिक क्रांती घडली. एका नवीन यंत्रयुगाचा जन्म झाला. जीवन जगण्याच्या, आनंद व समाधानाच्या व्याख्याच बदलायला लागल्या. या यंत्रक्रांतीत अर्थातच युरोप आणि अमेरिका आघाडीवर होते आणि आजही आहेत. या यंत्रक्रांतीचा एक मोठा शिल्पकार देकार्त हा होता. त्याचे 'डिसकोर्स ऑन मेथड' हे पुस्तक बाह्यरंगी तत्त्वज्ञानाचे वाटले तरी त्यात वैज्ञानिक विचारप्रक्रियेवर मूलभूत चर्चा केली आहे. 'शंका' हा देकार्तच्या विचारसरणीचा आत्मा होता. जे गणिती सूत्राने सिद्ध करता येत नाही ते वैज्ञानिक नाही. जे दृग्गोचर आहे तेवढेच सत्य. हे सिद्धांत या मुळे बळकट व्हायला लागले. देकार्त हा निगम तर्कशास्त्राचा (डिडक्टीव्ह लॉजिक) प्रणेता आहे. 'यंत्र' ही संकल्पना पुढे एवढी प्रबळ झाली की, मानवी शरीर हेच एक यंत्र आहे आणि म्हणूनच यंत्राची कामे जशी ठरवून देता येतात, तसेच मानवी शरीराचे यंत्र व त्याची कार्येसुद्धा 'यंत्रवत' झाली. तर्कप्रज्ञा एवढी प्रभावी झाली की तिने अंतःप्रेरणेला हद्दपार केले. शरीर आणि आत्मा, मन यांची फारकत झाली. प्रतिभा, प्रेरणा, वात्सल्य, राग, लोभ, मत्सर यांचे वस्तुनिष्ठ मोजमाप करता येत नाही; म्हणून या मूलभूत मानवी प्रेरणांना विज्ञान कक्षेच्या बाहेर टाकले गेले. तर्कप्रज्ञा (रीझन, इंटलेक्ट) आणि वस्तुनिष्ठता (ऑब्जेक्टिव्हिटी) या कक्षेमध्ये सर्व मानवी व्यवहारांच्या सत्यासत्यतेचे निष्कर्ष ठरू लागले. अंतर्मुखी चिंतन (इंट्रॉस्पेक्टीव्ह थिंकींग), अंतःप्रज्ञा (इंटय़ुशन), साकल्यात्मक दृष्टी (होलिस्टिक ॲप्रोच) आणि व्यक्तिनिष्ठता (सब्जेक्टिव्हिटी) या गोष्टी अवैज्ञानिकच नाहीत, तर मागासलेपणाच्या ठरू लागल्या.

विज्ञानामधील हे बदल मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र या सगळ्याच अभ्यासशाखांवरती परिणाम करू लागले आणि आपण वैज्ञानिक आहोत हे दाखण्याकरता या शाखांनीही पदार्थ विज्ञान व गणितशास्त्रातील सिद्धांतावर आपल्या ज्ञानशाखा बेतायला सुरुवात केली. यातच मनुष्याचे 'मनुष्यत्व' गेले व 'यंत्रपण' शिल्लक राहिले. अध्यात्म 'भोंगळ' आणि 'प्रतिगामी' ठरले. मी आणि फक्त मी, माझे अस्तित्व व त्यासाठी करावी लागणारी धडपड या परिघांत माणसे फिरू लागली. मनुष्य अधिकाधिक आत्मकेंद्रित झाला. सर्व मानवी नात्यांचे 'करारां'मध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न झाला आणि येथेच मानवी 'जीवनमूल्यांच्या' अधःपातास सुरुवात झाली.

आजचा भारतीय समाज हे त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. भ्रष्टाचार हे फक्त रोगाचे लक्षण आहे, मूळ रोग नाही. भारतीय संस्कृतीचा गाभा असलेली

नीतिमूल्ये, चारित्र्य या संकल्पना कालबाह्य ठरल्या. हाव, मत्सर,स्पर्धा आणि यातून मिळणारे 'यश' हेच जीवनाचे अंतिम ध्येय ठरले. 'कारे भुललासी वरलिया रंगा' किंवा 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' ही वचने भिंतीवर तिच्या रंगाइतकीच मृतवत होऊन राहिली.

जिथपर्यंत या मूलभूत बदलाकडे आपण गांभीर्याने पाहत नाही तिथपर्यंत आजच्या भ्रष्टाचारी, मूल्यहीन, चारित्र्यहीन समाजात सुतराम बदल घडणे शक्य नाही. कायदा माणसात बदल घडवत नाही, तो फक्त वकिली व्यवसाय जगवतो. टाळी ही एका हाताने कधीच वाजत नसते. भ्रष्टाचारी समाजाचे नेतृत्व कधीही स्वच्छ असू शकत नाही. 'भ्रष्टाचारी नेत्या'ची चर्चा चवीनी करणारा समाज आपली जबाबदारी मात्र टाळत असतो. लाचारी, भाटगिरी आणि सवलतग्रस्तता ही ज्या समाजाची जीवनमूल्ये बनली आहेत त्या समाजातून 'आत्मसन्मान' हद्दपार झालेला असतो. भ्रष्टाचार शिष्टाचार होतो. आजचे साहित्यिक, विचारवंत यांना हे ज्या दिवशी समजेल तो सुदिन म्हणायचा!

✧✧✧

# पण लक्षात कोण घेतो !..

{ जुलै २०११ }

भारतात घडणाऱ्या सद्यघटनांनी व्यथित होणार नाही असा माणूस सापडणार नाही. वरकरणी या घटना जरी राजकीय, सामाजिक वाटल्या तरी 'नीती' आणि 'मूल्य' या संकल्पनांची समाजातील दिवाळखोरीच त्या दाखवतात. विशेषत: समाजातील तथाकथित साधूसंतांचे पाय जेव्हा मातीचेच असल्याचे स्पष्ट झाले, तेव्हा तर हा विषय अधिक गांभीर्याने घ्यावा लागतो. राजकारण म्हटलं की एक कुटिलता आणि अनेक तडजोडी या गृहीत धरलेल्या असतात. पण अध्यात्म आणि विशेषत: 'संन्यासाश्रम' स्वीकारून प्रवचने देणाऱ्यांना मात्र ही 'सवलत' नसते. संत तुकारामांनी हे अतिशय मोजक्या शब्दांत सांगून ठेवले आहे, ''बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले''. अर्थातच अशी वंदनीय पावले मिळणे हे आजकाल अशक्यच झाले आहे. भारतीय संस्कृती व अध्यात्माचे डांगोरे पिटणाऱ्या या दांभिकांनी, समाजाबरोबरच भारतीय संस्कृती व तिच्या चिन्हांनाही हास्यास्पद बनवून ठेवले आहे.

रामदेव बाबांच्या व अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचाराच्या विरोधातील आंदोलनांना मिळालेला पाठिंबा हा, भ्रष्टाचारामुळे समाज किती त्रस्त झाला आहे याचे खरे प्रतिबिंब होते. या दोघांनाही मिळालेल्या पाठिंब्याच्या मुळाशी राजकारण व राजकीय पक्षांचा लोकांना आलेला उबगही कारणीभूत आहे. राजकारणी हे फसवणूक करतात, भ्रष्ट आहेत, आपला व्यक्तिगत स्वार्थ आणि कुटुंबाचा फायदा ते करून घेतात; मतांच्या राजकारणासाठी लोकांच्या भावनांशी खेळतात. इत्यादींच्या पार्श्वभूमीवर त्यांची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. याबाबत एक प्रकारचा राग आणि तिटकारा लोकांच्या मनात होता आणि आहे. रामदेव बाबा हे स्वत:ला योगगुरु

म्हणवतात. त्यांच्या योगवर्गाबरोबरच ते सामाजिक दुष्टवृत्तींवरही ते प्रवचने देतात. यामुळेच हा लढा ते लढवू शकतील, नेतृत्व करू शकतील असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण झाला होता. मुत्सद्देगिरीचा अभाव आणि नंतर पलायनाचा केलेला केविलवाणा प्रयत्न यातच त्यांच्या ढिसाळ नेतृत्वाचे दर्शन झाले. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांचा हिशेब देताना त्यांची झालेली त्रेधातिरपीट, त्यामुळे त्यांच्या नैतिक अधिष्ठानाचेही वस्त्रहरण झाले. या भ्रष्टाचार विरोधी चळवळीला त्यांनी मागे तर नेलेच, पण लोकांचीही दिशाभूल झाली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, भारतीय 'अध्यात्मा'सारख्या गंभीर विषयाची फसवणूक झाली.

श्री सत्य साईबाबा यांचेही लाखो अनुयायी आहेत. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आश्रमातून मिळालेल्या संपत्तीने पुन्हा एकदा या अध्यात्म्याला हास्यस्पद करून टाकले. शेकडो लेख वा हजारो तास जरी त्यांच्या अनुयायांनी तर्काच्या कोलांट्या घेत या गोष्टींचे समर्थन केले, तरी 'अध्यात्म' संकल्पनांची झालेली हानी भरून निघणार नाही. भारतातल्या सध्याच्या भ्रष्टाचारापेक्षा, एका 'शाश्वत' विचाराचे झालेले हे अवमूल्यन, ही हानी जास्त क्लेशकारक आहे.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आपल्या संस्कृतीत सांगितले आहेत. त्यात कोणीही श्रेष्ठ, कनिष्ठ नसून त्यांचे 'संतुलन' अपेक्षित आहे. 'अर्थ' आणि 'काम' या संकल्पनांचा पुरुषार्थांमधील अंतर्भाव हा भारतीय संस्कृतीला असलेल्या वास्तवाची जाण आहे. राग, लोभ मत्सर, चांचल्य इ. मानवी मनाच्या गुणांची 'समज' भारतीय संस्कृतीइतकी चांगली इतर संस्कृतींमध्ये क्वचितच दिसून येते. जन्माच्या आधीपासून ते मृत्यूपर्यंतच्या संस्कारांचे महत्त्वही म्हणूनच समजून घ्यावे लागते. चार वर्ण, चार आश्रम यांची रचनाही माणसाच्या 'शारीरिक' व 'मानसिक' रचनांवरच आधारित आहे. अगदी जन्मापासून संस्कारित करण्याचा यामध्ये प्रयत्न आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक नीतिमूल्ये रुजू करण्याच्या प्रक्रियेतील ती एक योजना आहे. सगळी नीतिमूल्ये ही वय, लिंग व सामाजिक परिस्थिती सापेक्ष आहेत. त्यांत विवेक आणण्याचे काम शिक्षण करते. शाळेबरोबरच घरादारात मिळणाऱ्या शिक्षणाचा यात अंतर्भाव आहे.

याच सर्व संकल्पनांचे, विचार परंपरांचे झालेले 'अवमूल्यन' ही भारतापुढची आज खरी समस्या आहे. राजकारणी आणि समाजकारणी जेवढे भ्रष्ट होऊ शकतात, तेवढेच लोकायुक्त व लोकपालही भ्रष्ट होऊ शकतील. आज आपण कायद्याचे

जंगल निर्माण करून ठेवले आहे; आणि तरीही गुन्हेगारी दिवसेन्‌दिवस वाढतेच आहे. नवीन कायदे किंवा संस्था हा यावरील उपाय नाही. मूल्यहीन समाज, भविष्यात निर्माण होणाऱ्या सगळ्या संस्था 'भ्रष्ट' करू शकतो. याला अध्यात्मही अपवाद नाही. आणि म्हणूनच यावर उपाय म्हणजे 'नवीन' कायदे किंवा 'लोकपाल' हा नसून, नीतिमूल्ये व पर्यायाने 'चारित्र्या'चे संवर्धन हा आहे. याकरिता लागणारी सगळी साधने व साहित्य आपल्या धर्मात उपलब्ध आहेत. प्रश्न एवढाच आहे की, आपण हे लक्षात घेणार आहोत का? तसे होणार नसेल तर नावे बदलून, संस्था काढून किंवा नवीन आध्यात्मिक गुरू आणि राजकारण्यांच्या प्रवेशानीही ही समस्या सुटणारी नाही. गुरूची निवड काय किंवा लोकप्रतिनिधींची पसंती काय या सर्व गोष्टी लोकशाहीत आपल्याच निर्णयामुळे होत असतात. मूल्यहीन आणि भ्रष्ट समाजाचे 'अघ्यात्म' आणि 'नेतृत्व' हे त्या समाजाचेच 'प्रतिबिंब' असते. आरसा खोटा नसतो. म्हणूनच  नवीन कायदे किंवा नेतृत्व बदलाने या समस्या सुटणाऱ्या नाहीत. बदलाची सुरवात आपल्या पासूनच करावी लागेल. याला गरज आहे ती किमान प्रामाणिकपणाची. पण हे लक्षात कोण घेणार(?) !..

✧✧✧

# भ्रष्टाचार झाला शिष्टाचार !

{ ऑक्टोबर २०११ }

देशातील आजची परिस्थिती बघितली की 'कालचा गोंधळ बरा होता' असे दररोज म्हणण्याची पाळी आली आहे. बहुतांशी ही प्रकरणे आर्थिक गैरव्यवहारांशी निगडित असतात. यालाच आपण 'भ्रष्टाचार' म्हणतो. वास्तविक कुठल्याही गैरव्यवहाराला उद्युक्त होणे, बळी पडणे हे नीतिमूल्याचा आदर करणाऱ्या व्यक्तीकडून अपेक्षित नसते आणि अशी भ्रष्ट व्यक्ती आर्थिकच का, पण कुठल्याही 'अशिष्ट' प्रलोभनांना बळी पडते. समाजामध्ये आज अशा लोकांची संख्या वाढली आहे आणि म्हणूनच फक्त भ्रष्टाचाराबद्दल बोलण्याऐवजी या 'नैतिक' स्खलनाला कारणीभूत असलेल्या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

मानवी समाजाचे समूहाने जगणे आज हजारो वर्षे जुने आहे. भारतापुरता विचार करायचा तर मोहनजोदडो, हडप्पा या संस्कृत्याच मुळी पाच हजार वर्षे जुन्या आहेत. भगवान बुद्ध, भगवान महावीर, व्याकरणकर्ता पाणिनी यांचा काळही अडीच हजार वर्षांच्या आत-बाहेर आहे. तत्कालीन समाज जगत कसा होता, त्याची जीवनमूल्ये काय होती याचे प्रतिबिंब, त्यानीच निर्माण केलेले साहित्य, कला, व्यापर, व्यवहार आणि प्रत्यक्ष उत्खनामधून मिळालेल्या वस्तूंमध्ये प्रतिबिंबित झालेले आहे. या सगळ्या कालावधीत सत्य-असत्य, चांगले-वाईट, नीती-अनीती या संकल्पनांबद्दल यांचा दृष्टिकोनही या साहित्य आणि कलांमधून दृष्टोत्पत्तीस येतो. रामायण आणि महाभारही महाकाव्ये तर धर्म आणि अधर्माच्या संघर्षाचा इतिहास आहेत. भर्तृहरीची नीतिशतके काय किंवा सोळाव्या, सतराव्या शतकातील संत तुकाराम महाराज आणि रामदास स्वामींचे ग्रंथ काय, शतकानुशतकांच्या अनुभवांतून तावून-सुलाखून निघालेल्या शाश्वत नीतिमूल्यांचीच ते पाठराखण

करतात. सुसह्य जीवन जगण्याकरता आवश्यक असलेल्या नीतिमूल्यांची चौकट ते घालून देतात. मानवाच्या अमर्यादित क्षमतांच्या त्यामध्ये अत्यंत साकल्याने आणि खुबीने विचार केला आहे. व्यक्ती आणि समष्टी दोघांचाही यामध्ये विचार आहे. राग, लोभ, मत्सर हे सर्व गुण प्रत्येक माणसाला त्याच्या जन्माबरोबरच मिळत असतात. संघर्षापेक्षा आनंदी जीवन जगण्या करता या गुणांच्या व्यावहारिक वापरा करता काही निर्बंधांचा अवलंब करावा लागतो. या गुणांच्या मात्रे मध्ये 'संतुलन' आणण्याचा प्रयत्न म्हणजेच 'विवेक'. अशा निर्बंधांच्या आवश्यकतेचा सामाजिक आणि सांस्कृतिक 'आशय' समजावून सांगण्याचा, रुजवण्याचा प्रयत्न म्हणजे 'संस्कार', आणि याची सुरुवातसुद्धा आईच्या गर्भापासून व्हायला लागते. वाढदिवस, धार्मिक सण, सामाजिक उत्सव त्याकरताच निर्माण केले गेले. काव्य, साहित्य, कला यांची रचनाही म्हणूनच 'संस्कार' करण्याकरताच केली गेलेली दिसून येते. मॅक्स मुलर या पंडिताचे याबाबतचे निरीक्षण चपखल आहे.

"There is such a thing as social education and education outside of books; and this education is distinctly higher in India than in any part of Christendom. Through recitation of ancient stories and legends, through religious songs and passion plays, shows and pageants, through ceremonials and sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and education which are in no way lower, but positively higher, than the general level of culture and eduction receive through schools and newspapers, or even through the ministration of the Churches in Western Christian lands. It is an education, not in the so called three Rs, but in humanity."

अशा वागणुकीचा आदर करणाऱ्या व्यक्तीला 'चारित्र्यवान' समजले जाई. या वागणुकीचा आदर करणाऱ्या समाजाला 'शिष्ट' किंवा 'महाजन' संबोधले जाई. अशा शिष्टांचा किंवा महाजनांचा समाजात आदर असे आणि संभ्रमाच्या वेळी त्यांनी दिलेल्या निर्णयांचे कटाक्षाने पालनही होत असे.

ही सर्व 'मूल्ये' आणि सर्व 'संस्थांना' मोडीत काढण्यात गेली काही शतके आपण आग्रहाने प्रयत्नशील आहोत. यांना आपण 'सुधारणा' म्हणतो. आता हीच जर का सुधारणेची 'संकल्पना' असेल तर आज आपला समाज व त्याचा 'भ्रष्ट' आचार हा मान्य करायला हवा; आजची दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, राजकारण्यांचे वाढदिवस हे सर्व याच 'सुधारलेल्या' समाजाचीच लक्षणे आहेत. शिवाय व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, बहुजन, ग्रामीण, आदिवासी अशा विशेषणांची खैरात

करून आपले 'समाज' सुधारक हा पुढारलेपणा आणखीन पुढे नेत असतात. पु. ल. देशपांडे असोत, नरहर कुरुंदकर असोत किंवा श्री. ना. पेंडसे असोत, यांनी कळत नकळत याच सुधारणांचे पोषण केले आहे. 'सुधाकर' 'घाशीराम' आणि 'सखाराम' यांची हेतुपुरस्सर भलावण करत राहिल्यावर आजच्या आपल्या दहीहंडी किंवा गणपती विसर्जनातील दिसणाऱ्या 'हिडीस' नाचांकडे बघून का नाक मुरडावे?

आजचा 'भ्रष्टाचार' हे एका चारित्र्यहीन, मूल्यहीन समाजनिर्मितीचे फळ आहे. स्वातंत्र्याच्या नावाखाली 'स्वैराचार' आणि मुक्तीच्या नावाखाली 'आत्मकेंद्रित'पणा हेच आपल्या सिनेमा, साहित्य आणि कलांचे उद्दिष्ट असेल तर आपण ते केव्हाच साध्य केले आहे. 'राजा' हे प्रजेचे 'प्रतिबिंब' असते. भ्रष्ट चारित्र्यहीन प्रजेचे 'नेतृत्व' हे चारित्र्यहीन आणि भ्रष्टच असते. 'कुरुप' माणसाचे आरशातील प्रतिबिंब 'सुस्वरूप' कसे असेल? आरशातल्या प्रतिबिंबाला पावडर लावून मूळ कुरुपता लपू शकेल का? किंवा आरसा फोडून प्रतिबिंबाचे मूळ नष्ट होईल का? 'विकृती'च जेव्हा 'प्रकृती' होते तेव्हा भ्रष्टाचार 'शिष्टाचार' झालेला आसतो. परंपरा मोडून सुधारणा होत नसते. परंपरेचे प्रयोजन समजून घ्यावे लागते. परंपरेवर आलेली बांडगुळे काढणे म्हणजे 'सुधारणा'. दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर म्हणजे पुरोगामित्व. खरा सुधारक, पुरोगामी हा परंपरेचा मित्र आणि पराकोटीचा संयमी असतो. आजच्या आत्मकेंद्रित समाजाला खरी गरज आहे ती 'आत्मपरिक्षणाची'. 'भ्रष्टाचार' म्हणजे भ्रष्ट 'आचार' संपविण्याची ती पहिली पायरी असेल. हे उमजेल तेव्हा पायरीचा जिना व्हायला वेळ लागणार नाही!

✧✧✧

# पुन्हा भ्रष्टाचार

{ जानेवारी २०१२ }

आजचे आपले सगळे जीवन 'भ्रष्टाचारमय' झाले आहे. आग लागली तर पाणी मारून आग विझवता येते; पण पाणी आग लावण्याच्या मूळ कारणाचे निर्मूलन करू शकत नाही. भ्रष्टाचार हे एका सडलेल्या समाजाचे 'लक्षण' आहे. लक्षणांचा अभ्यास करून रोगाचे निदान होते आणि हे निदान अचूक झाले तरच योग्य औषध देऊन रोगावर उपाय होऊ शकतो. निसर्गातील इतर घटक, म्हणजे प्राणिमात्र व वनस्पती या तर आजच्या आपल्या भ्रष्टाचाराला निश्चित जबाबदार नाहीत. विज्ञानाने आज हे सिद्ध केले आहे की, आजच्या बिघडलेल्या पर्यावरणाच्या संतुलनाला मनुष्यच जबाबदार आहे.

युरोपमधील धर्मक्रांती आणि औद्योगिक क्रांती यांमुळे माणसाच्या जीवनशैलीत बदल झाला. या बदलाकरता जी साधने निर्माण झाली, म्हणजे गाड्यांची निर्मिती, ऊर्जेची निर्मिती, अन्नाची निर्मिती इत्यादी. याकरिता निर्माण झालेली साधने जी नैसर्गिक साधनसंपत्तीतूनच निर्माण केली गेली, अशा साधनांच्या निर्मितीचा एक उद्योग झाला. उद्योग आला की त्याची नाळ फायद्याशी बांधली जाते. वस्तूंचा वापर जेवढा जास्त तेवढा उद्योगांना फायदा जास्त. यातूनच उपभोक्तावादाचा (Consumerism) जन्म झाला. आधुनिकता आणि प्रगतीचे मोजमाप हेच मुळी या उपभोक्तावादाच्या आलेखाशी जोडले गेले. सल्फुरिक ॲसिड, साबण, लोखंड इत्यादी इत्यादींचा दर माणसी वापर ज्या देशाचा जास्त, तो देश प्रगत ठरला. विकसित देशाचे बिरुद त्याला मिळाले. वास्तविक नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बेहिशेबी वापरातूनच हे शक्य होत होते. ही साधनसंपत्ती प्राप्त करण्याकरता आपला देश सोडून इतर देशांच्या साधनसंपत्तीचा वापर होऊ लागला. यातूनच वसाहतवाद

फोफावत गेला. भौगोलिक वसाहतवाद जरी संपला असला तरी सांस्कृतिक आणि जीवनशैलीचा वसाहतवाद मात्र अंगी पक्का मुरला. या विकसित राष्ट्रांच्या मानवी व्यवहाराची शैली ही देखील आधुनिक व प्रगत असल्याचा आभास निर्माण झाला.

उपभोक्तावादातून निर्माण होणाऱ्या ऐहिक जीवनशैलीशी सुसंगत असेच मानवी व्यवहार हे नव्या जीवनशैलीचे स्वरूप होऊ लागले. या नवीन जीवनशैलीचा गाभा आत्मकेंद्रितता हा आहे. 'मी आणि मला' हवे ते येनकेन प्रकारे मिळवण्याची लालसा ही त्याच्या पुढची पायरी आहे. यातूनच 'पाश्चात्त्य व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुढची पायरी म्हणजे हक्क व अधिकार धर्माच्या तत्त्वज्ञानाची जागा ही राष्ट्राने निर्माण केलेल्या घटनेने घेतली; आणि या घटनेची मूलभूत संकल्पना या तथाकथित स्वातंत्र्य आणि अधिकार यांचा पायाभूत आधार झाली. त्याच्याच रक्षणाकरता कायदे, कायद्यांच्या रक्षणाकरता पोलिस व तत्सम नियामक संस्थांचे जाळे व त्यांतून निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी निर्माण झालेली न्यायव्यवस्था. स्वातंत्र्याचाच एक कंगोरा म्हणून परावलंबित्व हे कमकुवत व मागासलेपणाचे लक्षण ठरले. वास्तविक संपूर्ण मानवी जीवन परस्परावलंबी आहे. मानवी जीवनाचा क्रम हाच मुळी स्थित्यंतरांच्या पायावर आधारलेला आहे. आपण सगळेच आधी लहान असतो, मग गृहस्थ होतो आणि मग ज्येष्ठ होतो. या वेगवेगळ्या स्थित्यंतरांवर उभ्या असलेल्या कुटुंबातील व समाजातील व्यक्तींशी आपण सतत व्यवहार करतो. यालाच आपण 'सहजीवन' म्हणतो. स्वातंत्र्य आणि जबाबदाऱ्या यांच्या मात्रेची नाळ या सहजीवनाला संतुलित करण्यासाठी हवी असते; पण आत्मकेंद्रितता आणि अधिकारांच्या भ्रामक आणि अवास्तव संकल्पना असे संतुलन उद्ध्वस्त करतात. आजचे उच्चार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य ही याच आत्मकेंद्रित पायावर उभी असल्याने सर्व नाती आणि परस्परावलंबित्वही आज नष्ट झाली आहेत. यांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आजची लग्नसंस्था हे आहे.

जबाबदारीशिवाय जे स्वातंत्र्य आणि अधिकार असतात. त्यालाच स्वैराचार म्हणतात. आजचे वकिली तर्क, युक्तिवाद हे आपल्याच घटनेचा आधार घेऊन कळत-नकळत या स्वैराचाराचे समर्थन आणि पोषण करतात. मनुष्य सगळ्या जगाला फसवू शकतो; पण स्वत:ला कधी फसवू शकत नाही ही जाणीव ज्या व्यक्तीत असते तीच खरी सुसंस्कृत व्यक्ती असते. आणि अशा व्यक्तीला आपल्या चुकांची कबुली देणे यात पराभवाची भावना नसते. उलट त्यात कर्तव्यपूर्तीचे समाधान असते. घटना, कायदा, न्यायालये अशा जाणिवांचा मनुष्य तयार करू

शकत नाहीत. अशा जाणिवेचे बधिरत्व आलेल्या समाजातील न्यायव्यवस्थाच काय तर सगळ्याच संस्था बधिर असतात.

आजचा भ्रष्टाचार हा नीती व मूल्यहीन, आत्मकेंद्रित जीवनशैली जगणाऱ्या सडलेल्या समाजांचे लक्षण आहे. त्याच्या निर्मूलनाची साधने घटनेत, नवीन कायद्यात किंवा लोकपालच्या निर्मितीत शोधणे हा मोठा विनोदाचा भाग आहे. २५% गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सभासदांनी भरलेल्या संविधानाचे पावित्र्य आणि स्वातंत्र्याचा आग्रह हाही तितकाच हास्यास्पद आहे.

आजची खरी गरज आहे ती नीतिवान, चारित्र्यशील माणसाच्या निर्मितीची. आपली धर्मसंस्था आपण उद्ध्वस्त केली आहे. स्वातंत्र्य आणि अधिकाराच्या नावाखाली कौटुंबिक आणि सामाजिक संस्थाही नष्ट केल्या आहेत. बहुसंख्य सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय नेतृत्व हे ठेंगू आहे. यातून मार्ग एकच आहे. तो म्हणजे आपल्याच संस्कृतीतील आणि धर्मातील शाश्वत मूल्यांचा आधार घेणे.

✧✧✧

# निर्णयाचे अधिकार

{ एप्रिल २०१२ }

भारताचे माजी रेल्वेमंत्री श्री. त्रिवेदी यांच्या राजीनाम्याचा किस्सा अजून ताजा आहे. लोकसभेत रेल्वेचा अर्थसंकल्प मांडल्यावर लगेचच द्वितीय वर्गाच्या भाडेवाढीविरुद्ध त्यांच्याच पक्षाने असहमती दाखवली. कारण अर्थातच 'आम आदमी' हे होते. रेल्वेची आजची आर्थिक परिस्थिती व प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत असलेली दिवाळखोरी सांगण्यासाठी आज विशेष तज्ज्ञांची गरज नाही. आधुनिकीकरण व सुरक्षिततेचे उपाय या गोष्टी काल्पनिक आकडेमोडीने होत नसून, त्यांच्या निर्मितीकरता आर्थिक तरतुदीची गरज लागते. पैसे झाडाला लागत नसल्यामुळे रेल्वेलाही आपल्या अंदाजपत्रकात खर्चाचा बोजा सांभाळताना उत्पन्नाची साधने निर्माण करावी लागतात. माल वाहतूक आणि प्रवासी भाडे हेच त्याचे साधन असते. रेल्वे मंत्र्यांनी वरच्या श्रेणी बरोबरच खालच्या श्रेणीच्या प्रवाशांच्या भाड्यात वाढ केली. सर्वसाधारणत: या वाढीचे समर्थन विशेषज्ञांसह सामान्यांपर्यंत सर्वांना समजण्यासारखे होते. रेल्वे मंत्र्यांनीही या भाववाढीच्या समर्थनार्थ प्रवाशांची सुरक्षितता, रेल्वेचे आधुनिकीकरण व व्यापक देशहित अशीच कारणमीमांसा केली! अर्थात ही भाडेवाढ त्यांच्या पक्षाच्या सर्वेसर्वा आणि त्यांची तळी उचलणारे त्यांचे राजकीय सहकारी यांना मात्र 'आम आदमी' वर अन्याय करणारी वाटली. भारतीय राजकारण व समाजकारणात तर्क, वास्तवता, व्यवहार व सारासार विचार यांची फारकत झाल्याचे हे पहिलेच उदाहरण नाही.

रेल्वे मंत्र्यांचा राजीनामा मागण्याचे प्रमुख कारण म्हणजे, त्यांनी या भाववाढीच्या संदर्भात नेतृत्वाला अंधारात ठेवले असे सांगितले जाते. रेल्वे मंत्र्यांनी मांडलेले मुद्दे तर्कसंगत होते, वास्तववादी होते, देशहिताचे होते की नाही हे मुद्दे गौण ठरले.

त्यांच्या नेतृत्वाने मागितलेल्या राजीनाम्याचे बहुतेक सर्व राजकीय पक्षांनी समर्थन केले. रेल्वेमंत्र्यांची नियुक्ती हीच मुळी त्यांच्या या विषयावरील ज्ञान वगैरे गोष्टींवर आधारित नसल्याने नेतृत्वाच्या मेहरनजरेची ती एक बाब होती आणि त्यामुळेच पक्ष प्रमुख असा राजीनामा आपणच नियुक्त केलेल्या मंत्र्याकडून जेव्हा मागतात तेव्हा तो देणे ही मंत्र्याची जबाबदारी ठरते. या विचारावरही बहुतेक सर्व राजकारणी व समाजकारण्यांची सहमती दिसून आली. व्यक्तीस्वातंत्र्य, तारतम्य, बुद्धी या सगळ्या गोष्टी गौण ठरल्या. थोडक्यात, श्रेष्ठींना सर्व समजते आणि अनुयायांनी त्याचा आदरपूर्वक स्वीकार करणे हे नीतीला धरून असते हाच राजकीय संदेश यातून दिला गेला. वास्तविक आजच्या राजकारणात बहुतेक वेळा पक्षातील विद्रोह हा सत्तेचा स्वार्थ डोळ्यांसमोर ठेवून झालेला असतो. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमधील उमेदवारांची निवड व निवडून आल्यावर सत्ता मिळवण्याकरता 'आम आदमीचे' कारण देऊन जे गुणाकार, भागाकार, वजाबाक्या झाल्या त्या आपल्या डोळ्यांसमोर आहेतच.

कुठलीही व्यवस्था चालवायची तर निर्णय हे घ्यावेच लागतात. प्रश्न, हे निर्णय घ्यायचे कोणी हाच असतो आणि हा प्रश्न वाटतो तेवढा सोपाही नसतो. राजकारणात व समाजकारणात जसे व्यापक हिताकरता अनेक अप्रिय निर्णय घ्यावे लागतात तसेच ते कौटुंबिक जीवनातही घ्यावे लागतात. हे निर्णय अप्रिय एवढ्यासाठी असतात की, ते एखादी व्यक्ती, कुटुंब किंवा समूह यांना मान्य होऊ शकत नाहीत, तरीही व्यापक हिताचा जेव्हा विचार करावा लागतो, तेव्हा तो व्यक्ती वा समूह यांना छेदून जायला लागतो. लोकशाहीत सर्वांना समान हक्क आहेत असा आपण कितीही घोष केला तरीही निर्णय देण्याची क्षमता देण्याचा 'अधिकार' हा एका व्यवस्थेकडे द्यावा लागतो. आताच्या निवडणुका, त्यांतून निवडून येणारे सदस्य त्यांच्यात पुन्हा पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री, महापौर अशी रचना करावीच लागते. म्हणजे शेवटी पुन्हा एकच कुठलातरी गट की ज्याला आपण पक्ष म्हणतो आणि त्याचे नेतृत्व यांच्याकडे हे अधिकार 'व्यवस्था' म्हणून सुपुर्द होतात.

लोकशाहीने विकेंद्रीकरण केले आहे हा मोठा 'आभास' आहे. आजच्या लोकशाहीतही निर्णय हे नेतृत्त्वच करते. ही जी गोष्ट आपण राजकारणात मान्य करतो ती कौटुंबिक निर्णय घेतांना मात्र नाकारण्याचा आग्रह धरला जातो. कुटुंबात एकाच वेळेस अनेक वयोगट व स्त्री पुरुषांचा समावेश असतो. वयामुळे, अनुभवांमुळे त्या कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळींना निर्णय घेण्याचा नैसर्गिक अधिकार दिलेला

असतो. अशा निर्णयांचा आदर करणे हे नैतिक कर्तव्य समजले जाते. पण इथे मात्र 'व्यक्ती' स्वातंत्र्य आणि इतर अनेक स्वातंत्र्यांच्या 'गोंडस' नावाखाली 'कुटुंब' या संस्थेला आपण मोडीत काढले आहे.

थोडक्यात, कुठल्याही व्यवस्थेमध्ये 'नेतृत्व' हे असायलाच लागते. आपल्या धर्मशास्त्रांची रचना हे नेतृत्व विवेकी असण्याकडे होती. 'चारित्र्य' हे घटना किंवा कायदे निर्माण करून होत नसते. 'संवेदना', 'ममत्व', 'अनुशासन' हे चार भिंतींच्या शाळेपेक्षा कुटुंबामध्ये अधिक शिकता येते, कारण तेथे दैनंदिन व्यक्तीव्यक्तींमध्ये संबंध असतो. 'सुसह्य' सहजीवनाकरता 'तडजोडीचे' पहिले शिक्षण कुटुंबातच मिळते. आई, वडील, भाऊ, बहीण, काका, आत्या ही नाती या जीवनाची वीण बांधत असतात. हे जीवन 'आत्मकेंद्रित' नसून 'बहुकेंद्रित' असते आणि या बहुकेंद्रातील 'संतुलन' साधण्याची प्रक्रिया ही व्यक्तीला 'सहिष्णू' आणि 'सुसंस्कृत' बनवत असते.

हा आचार आणि विचार हरवलेला शुद्ध आत्मकेंद्रित समाज जेव्हा आपण निर्माण करतो तेव्हा शिल्लक रहातो तो फक्त 'स्वार्थ'. मग याचेच नामकरण कधी 'व्यक्तिस्वातंत्र' तर कधी 'विचारस्वातंत्र्य' इत्यादींमध्ये केले जाते. वास्तविक स्वातंत्र्यात 'घेण्यापेक्षा' 'देण्याचा' विचार अधिक असतो. निदान आपल्या 'धर्म' संकल्पनेत तरी अनेक युक्त्या, कल्पना करून हे मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केलेला आहे. सुधारणांच्या नावाखाली आपण हे सगळेच 'व्यक्त' आणि 'अव्यक्त' बंध तोडून टाकले आणि शिल्लक राहिले ते फक्त स्वार्थप्रेरित राजकीय नेतृत्व व त्याचा अनुनय करणारी आत्मकेंद्रित प्रजा. त्रिवेदी यांची कथा यापेक्षा वेगळी नाही. एका बेगडी, भोंगळ व्यवस्थेचे समर्थन करण्याचा तो केविलवाणा प्रयत्न होता.

✧✧✧

# भारतातला भ्रष्टाचार

{ जुलै २०१२ }

भ्रष्टाचाराचा सध्या बोलबाला आहे. बोलबाला म्हणजे चर्चा. भ्रष्टाचाराचा अभ्यास करणाऱ्या 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या स्वयंसेवी संस्थेने १८२ देशांमध्ये भारताला ८७ वे स्थान दिले आहे. गौतम बुद्धापासून म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले आणि रा. शाहू यांच्या परंपरा सांगणाऱ्या या देशात ही बाब नक्कीच समाधानकारक नाही. अर्थातच व्यक्तिस्तोम आणि घोषणांच्या नशेत जगणाऱ्या देशात ही विसंगती अपरिहार्य आहे.

''लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी, लोकांतर्फे'' निवडलेली व्यवस्था. आजचे आपणच निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे आचार व व्यवहार बघता ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. लोकसभेने अलीकडेच ६० वर्षे पूर्ण केली. लोकसभेचे पावित्र्य, सभासदांना मिळणारे अभय आणि त्यांचे विशेषाधिकार यांची उजळणी ऐकून आपले कान किटले आहेत. उठता बसता 'वर्गहीन' समाजाची चर्चा करणाऱ्या या सर्व महाभागांना स्वत:करता निर्माण केल्या गेलेल्या या विशेष व्यवस्थेबद्दल मात्र काहीही आक्षेप नाहीत. लोकांनी निवडून दिलेल्या ५४३ सभासदांपैकी सुमारे १५८ लोकसभा सभासदांवर गुन्हे दाखल आहेत (२६%); यापैकी ७४ सभासद (१४%) असे आहेत की, ज्यांच्यावर खून, बलात्कार, खंडणी, इत्यादी गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. गरिबांचा कैवारी म्हणवणाऱ्या धर्मनिरपेक्ष अशा काँग्रेसच्या २०५ सभासदांपैकी ५% सभासदांवर आणि हिंदुत्व आणि संस्कृतीचा वसा घेतलेल्या भाजपाच्या १६% सभासंदावर असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. म्हणजे गुन्हेगारीच्या संस्कृतीमध्ये काँग्रेसपेक्षा भाजपा नक्कीच वरचढ आहे. सुमारे अर्ध्या शतकापूर्वी, म्हणजे १९६४ साली तत्कालीन भारत सरकारने भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे गठन केले होते. त्या

अहवालात समितीने स्पष्टपणे सांगितले होते की, तत्कालीन कायदे करणारी रचना ही सक्षम नाही आणि असा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी ती अपुरी आहे. अर्थातच. गेल्या ४५ वर्षांत या समितीच्या शिफारशींवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

'वर्गहीन' समाजाप्रमाणेच 'गरिबी हटाव', 'समाजवादी रचना,' 'पुंजीवादास विरोध,' 'अल्पसंख्याक' आणि 'मागास वर्गीय' यांचा उद्धार असे अनेक ताईत गळ्यात घालून, लोकसेवेत व्यस्त असलेल्या लोकप्रतिनिधींच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक मालमत्तेचे आकडे बघितले की, चक्रावून जायला होते. लोकसभेच्या ५४३ सभासदांमध्ये ३०० सभासद कोट्यधीश आणि १८० सभासद लक्षाधीश आहेत. उत्तर प्रदेशातून सर्वांत जास्त म्हणजे ५२ लोकसभा सभासद करोडपती आहेत. त्याखालोखाल तळागाळातील लोकांचा उद्धार करण्याचे कंकण बांधलेल्या महाराष्ट्रातून निवडून गेलेले ३७ प्रतिनिधी कोट्यधीश आहेत.

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार. निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू केली जाते; म्हणजे खर्चापासून बोलण्या-चालण्यावर निर्बंध येतात. काही संकेतांचे पालन करावे लागते. थोडक्यात, कोणतीही व्यवस्था सुसंस्कृत, संतुलितपणे चालावयाची अपेक्षा असेल तर असे निर्बंध पाळणे, आचारसंहितेचा आदर व पालन करणे अत्यावश्यक असते. आजचा भ्रष्टाचार हा एका सडलेल्या समाजाचे लक्षण आहे. राजकारण्यांच्या भ्रष्टाचाराच्या कथा चवीने चघळाव्याशा वाटतात. त्याचा उगम हा नीतिहीन, चारित्र्यहीन समाजामधेच असतो. अशा समाजाचे सांस्कृतिक, आध्यात्मिक, सामाजिक व राजकीय नेतृत्व हे भ्रष्टच असते. नवीन कायदे हा यावरील उपाय नाही. कायद्यांची संख्या किंवा तीव्रता समाज सुधारू शकत नाही. जबाबदार नीती आणि चारित्र्याचा आदर करणाऱ्या समाजामध्ये कमीतकमी कायद्यांची गरज लागते. भ्रष्ट समाज नेहमीच कांगावाखोर आणि सवलतींचा वाडगा घेऊन उभा असतो. योग्य माणसांना सवलती मिळाल्यास कोणाचा त्याला विरोध असणार नाही. महाराष्ट्र सरकारने दुर्बल घटकांमध्ये 'मागासवर्गीय' या शीर्षकाखाली मोडणाऱ्या, परंतु आर्थिकदृष्ट्या समाधानकारक असणाऱ्या विद्यार्थ्यांकरता फी मधील सवलती बंद केल्या. ही बाब तर्कसंगत होती. त्यात कोणत्याही प्रकारचा अन्याय नव्हता; तरीही राजकीय पक्षांनी या योजनेसाठी आंदोलने सुरू केली. त्यात हजारो रुपयांचा भ्रमणध्वनी, महागड्या दुचाक्यांवर हिंडणारे अनेक विद्यार्थी हे गरिबांकरिता असलेल्या फी मधील फायदा घेतात; हा भ्रष्टाचार नाही काय?

भारतीय धर्म संकलनेतील स्मृती साहित्यात समाजाचा सांगोपांग विचार करून जबाबदाऱ्या व अधिकार यांचे वाटप केले होते. परंतु सुधारणांच्या नावाखाली आपण सर्व व्यवस्था नष्ट केल्या. आजच्या भ्रष्टाचाराचे मूळ हे या दिशाहीन मोडतोडीला आहे. नीतिमान, जबाबदार 'वर्ग' रचनेपेक्षा चारित्र्यहीन, नीतिभ्रष्ट वर्गहीन समाज हा जास्त धोकादायक असतो हे ज्या दिवशी आपल्याला उमगेल, तेव्हा भ्रष्ट आचाराचे निर्मूलन व्हायला सुरुवात होईल. कारण लोकशाही म्हणजे ''लोकांनी, लोकांसाठी, लोकांतर्फे'' निवडलेली व्यवस्था.

✧✧✧

# स्वातंत्र्य फक्त!

{ ऑक्टोबर २०१२ }

असीम त्रिवेदी यांच्या व्यंगचित्रामुळे 'स्वातंत्र्याचा' मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' यांमधील फरकाची रेषा अत्यंत अस्पष्ट आणि नाजूक आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे या संकल्पना प्रत्यक्ष जीवनातील संदर्भांशी निगडित आहेत. शब्दकोशातील अर्थापुरत्या त्या सीमित करता येत नाहीत. या संकल्पनांचे 'संदर्भ' हे सुद्धा आपल्या सामाजिक संस्था, संस्कृतीचे सातत्य व संस्कारांवर अवलंबून आहेत. 'स्वातंत्र्य' ही संकल्पना जेव्हा 'पारतंत्र्य' या शब्दाशी निगडित होते तेव्हा त्याचा संदर्भ 'गुलागिरीतून मुक्तता' असाच होतो. पण हाच शब्द जेव्हा 'व्यक्ति'स्वातंत्र्य होतो तेव्हा मात्र त्याला अनेक सांस्कृतिक संदर्भांना छेदून जावे लागते. 'नीती' आणि 'अनीती' ही अशीच एक एकमेकात गुंतलेली संकल्पना आहे. त्यांच्या सीमारेषाही अस्पष्ट असून त्या जीवनातील संदर्भांशीच निगडित आहेत. 'स्वातंत्र्य' ही संकल्पना जेव्हा या संकल्पनांना छेदते तेव्हा तर मोठा गोंधळच होतो.

यातच आजकाल भर पडली आहे ती 'अधिकारांची'. म्हणूनच राजकारण आणि समाजकारणामध्ये 'स्वातंत्र्य', 'नीती-अनीती' व 'अधिकार' या सर्वांची 'तार्किक' बांधणी आपला मुद्दा पटवताना विद्वान करत असतात. बहुतेकवेळेला तो वकिली युक्तीवादच असतो. असीम त्रिवेदी यांच्या व्यंगचित्रांवर आक्षेप घेणारे, फिदा हुसेन यांच्या चित्रांच्याबाबतीत मात्र 'स्वातंत्र्य हळवे' होतात; तर त्रिवेदी यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करणाऱ्यांची वाचा सलमान रश्दी किंवा

तस्लीमा नसरीन यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात लुळी पडते. आजच्या 'स्वातंत्र्य' या संकल्पनेच्याबाबतीत असल्याच भोंदू वैद्यांचा गलबला अधिक आहे. यांचा 'स्वातंत्र्य' 'नीती-अनीती' आणि 'अधिकार' या संकल्पना त्यांच्या राजकीय किंवा सामाजिक सिद्धांतांना बांधलेल्या आहेत. अनेक विचारवंतांचा, स्वातंत्र्य व अधिकार यांचा पुरस्कार हा आपण पुढारलेले व प्रगतिशील आहोत हे दाखविण्याच्या अट्टाहासापोटी असतो. मराठीतील अनेक 'प्रगतीशील' लेखकांनी चक्क पाश्चात्त्य लेखकांच्या कथा, कादंबऱ्या आणि नाटके यांची उचलेगिरी करूनही, त्याची नोंद आपल्या प्रस्तावनेत न करण्याचा अप्रामाणिकपणा राजरोसपणे केला आहे. यात आपण कोणाच्या अधिकारांचे व स्वातंत्र्याचे उल्लंघन करतो आहोत याचा त्यांना विसर पडतो. अशा 'सखाराम' आणि 'घाशीरामां'चे व्यक्त आणि अव्यक्त चौर्य जेव्हा एखादा समीक्षक उघड करतो, तेव्हा मात्र सर्व आळीमिळी गुपचिळी झालेली असते!

मध्यंतरी मराठीच्या 'स्वातंत्र्य'वीर लेखकांना कर्णाचा पुळका आला होता. कर्णावर झालेल्या अन्यायाने ते व्यथित झाले होते. वास्तविक महाभारतातील व्यक्तिरेखा या महाभारतातील संदर्भांशीच अनुरूप असतात. त्यांना संदर्भहीन करणे हा स्वातंत्र्यापेक्षा विकृतीचा भाग आहे. या सगळ्या महाभागांनी त्यांना अपेक्षित असणाऱ्या कर्णाची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी नवीन महाभारत लिहायला काहीच हरकत नव्हती! पण तसे करायला क्षमता व जीवनातील अनुभव स्वीकारण्याची तरलता लागते. कल्पनेचे स्वातंत्र्य सर्वांनाच असते, पण 'कल्पना' जेव्हा वास्तव किंवा अभ्यास म्हणून सादर केली जाते, तेव्हा ती शुद्ध फसवणूक व अप्रामाणिकपणा असतो.

आपल्या धर्मातील 'कैवल्य', 'निर्वाण' किंवा 'मुक्ती' या संकल्पना, 'स्वातंत्र्य' कल्पनेच्याही खूप वर आहेत. 'घेण्यापेक्षा' 'देण्यावर' तेथे भर आहे. आत्मकेंद्रित होण्याऐवजी आत्मपरिक्षणाची तेथे तहान आहे आणि सर्व 'अधिकार' त्यागाचा अंतिम टप्पा गाठण्याचा कायम प्रयत्न आहे. आजच्या 'स्वातंत्र्य' आणि 'अधिकार' यांचा घसा बसेस्तोवर आक्रोश करणाऱ्यांचा प्रवास मात्र याच्या अगदी उलट आहे.

'जबाबदारी' शिवाय 'अधिकार' अस्तित्वात असू शकत नाहीत.

दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या 'आदरा'शिवाय व्यक्तिस्वातंत्र्य टिकत नाही, आणि आपल्या 'लैंगिक' आणि व्यावहारिक 'स्वैराचाराचे' समर्थन करण्याकरता नीती-

अनीतीस दावणीस बांधता येत नाही; याचे तारतम्य सुटल्यामुळेच आपले स्वातंत्र्याचे, अधिकारांचे, नीती–अनीतीचे सर्व वाद हे शुद्ध वकिली, तार्किक किंवा 'सोयिस्कर' संदर्भांना मिठी मारून होत असतात. समाजाचा सांस्कृतिक किंवा वैचारिक दर्जा त्यामुळे तीळमात्रही वाढत नाही.

व्यंगचित्रकारांच्या कल्पना बधिर होतील किंवा टीकाकारांना शब्दकोशामध्ये शब्द सापडणार नाहीत इतके किळसवाणे आणि ओंगळ स्वरूप आजच्या आपल्या लोकसभा, विधानसभा व पंचायतीतील कारभारात व्यक्त होताना आपल्याला दिसतात. या स्वरूपांचे 'वास्तव' बघता, असीम त्रिवेदी यांचे व्यंगचित्र ठेंगणे वाटते. त्या चित्राचे वास्तव दर्शन व्यक्त करणारी प्रतिभा आज आपल्यात नाही आणि कदाचित कोणी तसे मांडले तर ते स्वीकारण्याची सहिष्णुताही आपल्यात शिल्लक नाही. हा प्रश्न स्वातंत्र्य किंवा अधिकाराचा नसून तो एका 'बधिर', 'सुस्त' आणि 'आत्मकेंद्रित' झालेल्या समाजाचा आहे.

आज हवे आहे ते हे 'वास्तव' स्वीकारण्याचे फक्त स्वातंत्र्य !

✧✧✧

# ‘मी कोण?...’

{ जानेवारी २०१३ }

‘मी कोण आहे’ याचे उत्तर आजही शास्त्रज्ञ शोधताना दिसत आहेत. अर्थातच हा प्रश्न खूप जुना असून, सर्वच सभ्यतांनी आपापल्यापरीने त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानातील त्याची चर्चा ही नक्कीच उजवी ठरते. साहजिकच सृष्टीच्या व्युत्पत्तीचा विचार करणाऱ्या आधुनिक शास्त्रज्ञांपैकी श्रॉडिंगरपासून काप्रापर्यंत सर्वांनाच भारतीय तत्त्वज्ञानामध्ये या विषयाची गंभीर चर्चा आढळून येते. डार्विनच्या उत्क्रांतिवादाने मानवाच्या बाह्य सांगाड्याचा एकपेशीय ते बहुपेशीय प्रवास उलगडून दाखवला. विज्ञानामध्ये अज्ञानाचा एखादा डोंगर सर केल्यानंतर समोरील अथांग दऱ्याडोंगर अजून पार करायचे लक्षात येते. हाच काहीसा प्रकार उत्क्रांतिवादामध्ये झाला आहे. सुटणारा प्रत्येक प्रश्न नवीन प्रश्नांना जन्म देत आहे.

सर्व जग वस्तुमय आहे, म्हणूनच वस्तूच्या किंवा पदार्थाच्या अंतरंगाचा शोध घेतला की अंतिम उत्तर नक्की मिळणार अशी खात्री १७ व्या ते १९ व्या शतकांतील वैज्ञानिकांना वाटत होती. रसायनशास्त्रापासून ते मानसशास्त्रापर्यंतच्या सर्वच विज्ञान शाखांचा विचार हा पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासातून होऊ लागला. अर्थातच या रूढ भौतिकशास्त्रावर न्यूटनची विश्वाविषयीची कल्पना आणि देकार्तचे पदार्थ व आत्मा यांतील द्वैत यांचा प्रभाव होता. यामुळे विज्ञानाच्या ‘वस्तु’निष्ठ अभ्यासातून मानवी अस्तित्व आणि मानवी व्यवहाराचा गाभा असलेल्या भावना, इच्छा, आकांक्षा, द्वेष, संज्ञा या गोष्टी वस्तुमय नसल्यामुळे या अभ्यासातून हद्दपार झाल्या. ज्ञानाच्या उपासनेमध्ये तर्कप्रज्ञा ही अंतःप्रज्ञेपेक्षा श्रेष्ठ ठरू लागली.

अर्थातच यामुळे 'मी कोण' या उत्तराच्या जवळ यायच्याऐवजी शुद्ध तर्कावर आधारलेल्या विज्ञानामुळे ती शक्यता धूसर होऊ लागली.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आइन्स्टाईनचा सापेक्षतावाद आणि मॅक्स प्लँकच्या पुंजवादाने या आधीच्या यांत्रिकी, गणिती, रूढ भौतिकी सिद्धांतांना धक्का लावायला सुरुवात केली. रूढ भौतिकीमध्ये अवकाशाच्या त्रिमितीमध्ये आइन्स्टाईनच्या सिद्धांताने चौथ्या मितीची भर टाकली आणि यामुळेच या सर्व बाजू केवळ स्वतंत्र नसून एकमेकांशी संबंधित आहेत, हे विज्ञानाला मान्य करावे लागले. सापेक्षता आणि पुंज सिद्धांताने हे स्पष्टपणे दाखवून दिले की, पदार्थाचे अणुरेणू हे घन वस्तू (Solid objects) नसून अमूर्त, निराकार अस्तित्वे आहेत (Abstract Entity), प्रकाशाचे द्विगुणी अस्तित्व, सूक्ष्म कण (Particles) आणि तरंग (Waves) या विरोधाभासाला रूढ भौतिकीमध्ये नक्कीच स्थान नव्हते. नवभौतिकीमुळे वस्तुनिष्ठ, तर्कप्रधान विज्ञानामध्ये व्यक्तिसापेक्षता आणि अंतःप्रेरणेलाही यामुळेच स्थान मिळाले.

वस्तूच्या अणुरेणूप्रमाणेच २० व्या शतकात पेशींच्या अंतरंगांचीही नवीन उकल झाली. यातूनच जैवयांत्रिकीशास्त्राचा जन्म झाला. आजची नलिका बालिका (Test Tube Baby) ते बीज पेशींच्या रोपणापर्यंतचा सगळा प्रवास या नवभौतिकीमुळेच झाला. पदार्थविज्ञाना पलीकडे इतर विज्ञान शाखा स्वतःचा स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. तरीही आज 'मी कोण' या प्रश्नाचे अजूनही उत्तर सापडत नाही. नवभौतिकीमध्ये आजही गणिती, यांत्रिकी आणि नियतिवादाचा प्रभाव दिसतच आहे. मस्तिष्कशास्त्र (Brain Science) आणि त्याच्या उपशाखांमध्ये प्रचंड संशोधन होऊनही चेतनेच्या (Consiousness) संशोधनामध्ये आजही फारशी प्रगती होताना दिसत नाही. हा अडथळा विज्ञानातील साधनांचा नसून वैज्ञानिकांच्या मानसिकतेचा आहे.

मानवी संस्कृतींचा प्रवास आजच्या पाश्चात्त्य सभ्यतांपेक्षा हजारो वर्षे आधी पूर्वेकडील सभ्यतांमध्ये चालू आहे आणि चेतनाशास्त्रामधील त्यांचे अभ्यास नक्कीच अधिक उजवे आहेत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला सापेक्षता आणि पुंजवादाच्या प्रवेशानंतर निदान काही दशके तरी भौतिकी वैज्ञानिक किंवा पदार्थ वैज्ञानिक हे भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळले होते. आजच्या 'मी कोण' या शोधाच्या प्रवासामध्ये पुन्हा एकदा या तत्त्वज्ञानामध्ये डोकावून पाहणे फायदेशीरच नाही, तर उत्तराच्या जवळ पोहोचण्यासाठी मदत करणारे आहे.

लंडनची द रॉयल सोसायटी व ब्रिटिश ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'What it means to be human' या विषयावर ८ मार्च २०१२ रोजी परिसंवाद झाला. या परिसंवादातील दोन सत्रांत सहभागी झालेल्या विद्वानांनी या अनुषंगाने 'मी कोण' या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. हा परिसंवाद लंडनची रॉयल सोसायटी आणि ब्रिटिश ॲकॅडमीच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अभ्यासूंनी तो अवश्य ऐकावा.

✧✧✧

# धर्मशास्त्र की घटना ?

**{ एप्रिल २०१३ }**

कुठल्याही सभ्यतेच्या व्यावहारिक आणि संतुलीत जगण्याकरता नुसता 'ऐहिक' किंवा 'आध्यात्मिक' उत्कर्ष किंवा विचार पुरेसा नसतो. पाश्चात्त्य जगतातील खालडियन, बॅबिलोनियन, सुमेर, ग्रिक आणि रोमन या सगळ्या सभ्यतांमध्ये, वैयक्तिक आणि सामूहिक जीवनामध्ये नीती-नियमांची चौकट ही धर्म पालनातूनच घालून दिलेली दिसते. भारतामधेही अगदी वैदिक काळापासून ते ईस्ट इंडिया कंपनीने १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात राज्यशकटाचा ताबा घेईपर्यंत अशी चौकट धर्मशास्त्राच्या माध्यमातून अस्तित्वात होती. पाश्चात्त्य आणि भारतीय संस्कृतीच्या अशा चौकटींच्या निर्मितीच्या तत्त्वज्ञानाचे आणि अंमलबजावण्याच्या पद्धती व स्रोत मात्र संपूर्णतः भिन्न आहेत. पाश्चात्त्य आणि भारतीयांची 'धर्म' संकल्पना ही यामुळेच संपूर्णतः वेगळ्या सिद्धांतावर आधारित आहे. भारतापुरते बोलायचे तर पां. वा. काण्यांचा ५ खंडामध्ये विभागलेला धर्मशास्त्राचा इतिहास (१९६८-७५), डेरेट (१९६८), लिंगट (१९७३) आणि सरकार (१९५८) यांनी या विषयावर विपुल लिखाण केले आहे.

धर्मशास्त्रांच्या ग्रंथामधे मनुस्मृती आणि सर्वच स्मृतीग्रंथ आणि त्यावरील टीका आणि निबंधांचा समावेश होतो. अर्थातच मनुस्मृतीचे यातील अग्रस्थान व अधिकार हा पुढील सर्वच स्मृतींनी मान्य केला असल्यामुळे स्मृती म्हटले की मनुस्मृतीच डोळ्यांसमोर येते. मनुस्मृती ही १२ अध्यायांची असून, त्याच्या सुमारे २७०० श्लोकांमधून तत्कालीन समाजरचनेला आवश्यक असणाऱ्या सगळ्या गोष्टींचा त्यामधे ऊहापोह केला आहे.

समाज हा अनेक व्यक्ती आणि व्यक्ती-समुहांच्या गटांनी बनलेला असतो. यामधे स्त्री-पुरुष हा भेद असतोच, पण जन्मापासून म्हातारपणापर्यंतच्या वयोगटामधे विभागला गेलेला मोठा वर्गही त्यामध्ये असतो. प्रत्येकाचा वयोगट आणि व्यवसाय यावर आधारितच त्याचे इतर व्यक्ती किंवा समुहांशी संवाद होत असतात. म्हणूनच एकाच व्यक्तीच्या या वेगवेगळ्या टप्प्यावरील जबाबदारी व भूमिका भिन्न असतात. जीवनाच्या या एवढ्या मोठ्या व्यापकतेला सर्वच घटकांना न्याय देऊन त्यामध्ये संतुलत्व राहील असे पर्याय देणे हे काम सोपे नाही. मनुस्मृतीने ते आचार, संस्कार, प्रायश्चित आणि व्यवहार या पदरांतून केले. यातला शेवटचा पदर 'व्यवहार' म्हणजे आजचा कायदा. आधीचे तीन पदर माणसाला सु-शिक्षित आणि सुसंस्कारित करतात. चारित्र्यशील नागरिक बनवण्याचा तो अभ्यासक्रमच आहे. राजापासून ते सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय नेतृत्व हे अशाच चारित्र्यवान लोकांच्या हातात रहाण्याची यात तरतूद आहे. अशा मूल्यांचा आदर करणाऱ्या चारित्र्यशील समाजामध्येच व्यवहाराचे म्हणजे कायद्याचे पालन होऊ शकते. फक्त कायद्यामुळे 'चारित्र्यशील' व्यक्ती किंवा 'समाज' निर्माण होत नसतो.

भारतीय धर्मशास्त्रामधे राजकारण, अर्थशास्त्र आणि अर्थव्यवस्था, तसेच नीतिशास्त्राचाही समावेश आहे. आपल्या संस्कृतीत धर्म हा शब्द कर्तव्यवाचक आहे. म्हणूनच धर्मशास्त्रामधे व्यक्तीच्या अधिकारापेक्षा कर्तव्याला प्राधान्य आहे. कुटुंबप्रमुखानी कुटुंबाचे आणि राजाने प्रजेचे संरक्षण आणि पालन करणे हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. कर्ज घेतल्यावर ते परत करणे हा कर्तव्याचाच भाग आहे. कुठल्याही कारणास्तव ते परत न करणे हे म्हणूनच समाजमान्य नाही. कायद्यापेक्षा तो धर्मप्रवृत्तीचा एक भाग आहे. पाश्चात्त्य आणि भारतीय धर्मसंकल्पनेतील हा फरक लक्षात घेतल्याशिवाय पाश्चात्त्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण करून आपण काय गमावले हे लक्षात येणार नाही.

या पार्श्वभूमीवर सध्या घडणाऱ्या काही घटनांचा आढावा घेणे योग्य ठरेल. संजय दत्तच्या गुन्ह्याची माफी, लोकप्रतिनिधींनी विधानसभेच्या आवारात पोलिसाला केलेली मारहाण, लोकसभा, विधानसभेंपासून ग्रामपंचायतीपर्यंत सर्वच पक्षांनी गुन्हेगारांना दिलेले प्रतिनिधीत्व आणि सर्वच स्तरांवरील भ्रष्टाचार आणि बलात्काराच्या या अगणित घटनांचे मूल्यमापन करायला शब्दकोशांत शब्द नाहीत. न्यायालयात लाखोंनी खटले प्रलंबित आहेत आणि दररोज शेकडोंनी त्यामध्ये भर पडत आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत नुकत्याच मांडल्या गेलेल्या हक्कभंगाच्या ठरावामुळे हे

स्पष्ट आहे की, घटनेनुसार सर्वांना एकच न्याय लागू नाही. कायद्यापुढे आपण सर्व समान हा भ्रम यामुळे दूर झाला.

मनुस्मृती ही कुठल्याही राजानी किंवा समाजानी लादलेली व्यवस्था नव्हती. गेल्या २००० वर्षांत भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात याज्ञवल्कीय, पराशर, कात्यायन, नारद अशा अनेक स्मृती, त्यांच्यावरील टीका आणि निबंध भारतीय समाजाला मार्गदर्शन करीत होते. आपण मनुस्मृती जाळली आणि स्वातंत्र्यानंतर लगेचच नवीन घटनेचा स्वीकार केला. ही घटना म्हणजे ब्रिटिशांनी स्वातंत्र्यपूर्व काळात तयार केलेल्या कलमांची भ्रष्ट नक्कल आहे. या घटनेतील २/३ भाग हा कानामात्रेचा फरक न करता जशाचा तसा उचललेला आहे. गेल्या ६५ वर्षांत आपल्या घटनेत आपण १०० हून अधिकवेळा बदल केले. या देशात आज स्त्रियाच काय पण कोणीही सुरक्षित नाही. घटनेप्रमाणे सर्व समान, पण शाळेपासून नोकरीपर्यंत सर्व वाटप हे जातीवर आधारित!! या देशातील प्रत्येक घटक हा आपण किती मागासलेले आहोत हे आग्रहाने सांगण्यात धन्यता मानताना दिसतो. पाश्चांत्त्यांचे अनुकरणच असल्यामुळे अधिकारांचा अतिसार आणि कर्तव्याचे बद्धकोष्ठ झाल्याचे दिसते. बाँबस्फोटासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नालाही निकाल मिळायला २० वर्षं लागतात, तर इतरांची काय कथा? निधर्मी राज्यामधे अल्पसंख्यकांच्या अधिकारांचे राजकारण हे कुठल्या तर्कामधे किंवा समानतेच्या तत्त्वात बसणारे आहे? राजेशाही, सरंजामशाही नको म्हणून आपण लोकशाहीचा स्वीकार केला. पण दिल्लीपासून गल्लीपर्यंत चालू आहे ती घराणेशाही!!

आजचा आपला समाज हा राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक आघाड्यांवर नेतृत्वहीन आहे. आपल्या धर्ममार्तंड्याची परिस्थिती तर केविलवाणी आहे. या भयावह परिस्थितीवर उपाय एकच आहे. तो म्हणजे विचारांचे भारतीयीकरण करणे. म्हणजेच अधिकारापेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे.

✧✧✧

# हतबल केदारनाथ

{ जुलै २०१३ }

उत्तराखंडात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला हाहाकार हा सध्या चर्चेचा विषय आहे. नैसर्गिक आपत्ती या कधीच सांगून येत नसतात आणि इतिहासात अशा शेकडो आपत्तींची नोंद आहे. उत्तराखंडामधील या भीषण आपत्तीची तीव्रता ही मानवाने अनेक नैसर्गिक स्रोतांमध्ये केलेल्या हस्तक्षेपामुळे वाढली, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. जागतिक स्तरावर तापमानामधील बदल हा गेल्या अनेक शतकांमधील मानवी हस्तक्षेपामुळे आहे हे आता विज्ञानाने मान्य केले आहे. हा मानवी हस्तक्षेप म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार, असंतुलित वापर. समाजाला या संबंधात माहिती व्हावी म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये पर्यावरण शास्त्राचा अंतर्भाव केला आहे. पण पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. आपल्या चंगळवादी जीवनशैलीत बदल होत असेल तर जीवनशैली अधिकच चंगळवादी होण्याकडे होत आहे. कोणा विचारवंताने म्हटल्याप्रमाणे माणसाच्या गरजे करता निसर्गात भरपूर आहे, पण हव्यासामुळे फक्त विनाशच आहे. आजकाल होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींची वाढणारी तीव्रता हे याचे उदाहरण आहे.

उत्तरेकडील केदारनाथ, बद्रिनाथ इत्यादी तीर्थस्थाने ही हिंदूंची मोठी श्रद्धास्थाने आहेत. वास्तविक भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण  या सर्व ठिकाणी असे धाम आहेत. गृहस्थाश्रम संपल्यावर सर्वसाधारणपणे अशा धामांची यात्रा हे गेली काही शतकेच नाही, तर सहस्र वर्षे हिंदू श्रद्धेने करत आले आहेत. आपल्या देशभ्रमणाबरोबरच इतर भौगोलिक क्षेत्रांमधील सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीचीही यामुळे ओळख पटत होती. उत्तर आयुष्यामध्ये अधिक अंतर्मुख होण्याकरता लागणारा निवांतपणा आणि संधीही यामुळे प्राप्त होत असे. आजच्या 'सहल' या

संकल्पनेचा त्यामध्ये लवलेशही नव्हता. केदारनाथ, बद्रिनाथ या डोंगराळ भागांत धामे असणाऱ्या या गावांची नवीन नागरिकांना सामावून घेण्याची क्षमता सीमितच होती. पण या धामांना जेव्हा पर्यटन स्थळांचे स्वरूप मिळाले, तेव्हा तेथील मानवी गरजांच्या क्षमतांची वाढ होऊ लागली. रस्त्यांपासून निवासांपर्यंत ही वाढ होत असताना ती पेलण्याच्या क्षमतेचा कधीच विचार केला गेला नाही. उलट दिसेल त्या जागेवर, अगदी नदीच्या पात्रातही, शहरनियोजनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून बांधकामे करण्यात आली. याकरता लागणाऱ्या साधनांकरता जंगलतोड करण्यात आली. नदीच्या प्रवाहांवर बंधारे बांधण्यात आले. या सर्वांना ''अर्थ'' हेच कारण होते. सहल कंपन्यांनी आपली दुकाने थाटली. श्रद्धेचा बाजार मांडून जास्तीत जास्त लोकांना अशा स्थळांकडे आकर्षित केले जाऊ लागले. स्थानिक जनतेनेही या सगळ्या व्यवहारांकडे आर्थिक लाभाच्या दृष्टीनेच पाहिले. यामध्ये 'धर्म' किंवा 'श्रद्धा' याला व्यापारापलीकडे काहीही अर्थ नव्हता. तेथे राहणारे आणि नवीन येणारे सर्व बहुतांशी हिंदूच आहेत. फलाविना कर्म, निरपेक्ष दान, आणि साधे राहणीमान ही हिंदू धर्माची वैशिष्ट्ये आहेत. निसर्गाच्या सर्वच व्यक्त आणि अव्यक्त शक्तींची हिंदू पूजा करतो. वास्तविक ही पूजा म्हणजे या शक्तींचा आदर करणे हे असताना त्याची जागा आता बाह्य निरुपयोगी कर्मकांडांनी घेतली. ही कर्मकांडेही हा आदर व्यक्त करणारी साधने होती; व्यापाराची संधी नव्हती. माणसाला अंतर्मुख बनवणारी, त्यांच्यातील विवेक जागृत करणारी, 'घेण्यापेक्षा' 'देण्यावर' भर देणारी मानसिकता निर्माण करणे, हे हिंदू धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. निर्वाण, मुक्ती, समाधी यांच्याकडे जाण्याकरता कराव्या लागणाऱ्या तयारीचा तो भाग आहे. तो व्यापार नसल्याने श्रद्धेला तेथे स्थान आहे. ही श्रद्धा माणसाला अंतर्मुख करते, समर्पणाला तयार करते. दुर्दैवाने श्रद्धेच्या या ''अर्था'' ला आज त्यामध्ये अपेक्षित असलेल्या विचारांच्या विरुद्ध 'परिमाणे' प्राप्त झाली आणि हीच खरी शोकान्तिका आहे.

दूरदर्शनवरील एका वाहिनीने केदारनाथ येथील शंकराचार्यांची मुलाखत घेतली. हे मंदिर चहूबाजूंनी भाविकांच्या शवांनी वेढले गेले होते. यामुळेच शंकराचार्य सांगत होते की, या देवळाची शुद्धी करून घेण्यात येईल. वास्तविक कोणतेही हिंदू देऊळ हे अस्वच्छ होऊ शकते, पण अशुद्ध होऊ शकत नाही. वास्तविक निश्चल प्रेतांपेक्षा, भ्रष्टाचार, व्यभिचार व स्वार्थाने बरबटलेल्या जिवंत माणसांच्या वावरामुळेच ही मंदिरे अधिक अशुद्ध होत असतात. श्रद्धेचा व्यापार करणारे तेथील बडवे क्षणाक्षणाला तेथील मंदिर अपवित्र करीत असतात. शंकराचार्य किंवा धर्ममार्तंडाचे

काम, निदान हिंदू धर्मात तरी, मानवाला या स्खलनापासून वाचवण्याचे असते. संवेदनाशून्य, बधिर जिवंत माणसांपेक्षा प्रेते कमी धोकादायक असतात. सरकार हे लोकांचे प्रतिनिधित्व करते. भ्रष्ट समाजाचे नेते स्वच्छ असूच शकत नाहीत. खरी आपत्ती आहे ती हिंदूंच्या आजच्या मानसिकतेची, हे ज्या दिवशी आपण ओळखू त्यावेळी नैसर्गिक आपत्ती जरी थांबवू शकलो नाही, तरी त्याच्या विध्वंसाची तीव्रता तरी नक्कीच कमी करू शकू! ही आपत्ती आणि विध्वंस ही या केदारनाथाने श्रद्धेचा व्यापार करणाऱ्या, संवेदना शून्य आणि बधिर समाजाला दिलेली शिक्षा आहे, एवढाच 'अर्थ' यातून निघू शकतो.

✧✧✧

# अधर्म जेंव्हा धर्म होतो !

**{ ऑक्टोबर २०१३ }**

भारतीयांची, विशेषतः हिंदूंची 'धर्म' संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. धर्म आणि पंथ या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. प्रत्येक पंथाला एक प्रेषित व एक पंथ-ग्रंथ असतो. त्या पंथाच्या लोकांना प्रेषिताची वचने आणि पंथ ग्रंथांच्या परिघातच रहावे लागते. धर्म हा कुठली एक देवता, उपासना पद्धती, विश्वास किंवा श्रद्धा यांना बांधलेला नसतो. अनेक देवता, उपासना पद्धती किंवा श्रद्धा, धर्म संकल्पनेत असू शकतात. ही विविधता मान्य करूनही व्यावहारिक संतुलनाकरता सर्व समाज घटकांना काही जबाबदाऱ्या आणि नियमांचे पालन करावे लागते. समाज हा अनेक भिन्न वैचारिक क्षमता, वयोगट, भौगोलिक परिस्थिती यांपासून बनलेला असतो. व्यक्तीला जेवढे स्वातंत्र्य असते, तोच अधिकार समूह किंवा समाजाच्या एकत्रित स्वातंत्र्याचाही असतो. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही, म्हणूनच जबाबदारी शिवाय स्वातंत्र्य अस्तित्वात असू शकत नाही. नीती, अनीती, चांगले, वाईट यांच्यातील सीमारेषा अस्पष्ट असतात. याचे मुख्य कारण म्हणजे, त्यांच्या संदर्भांची पार्श्वभूमी हे होय. हे संदर्भ सामाजिक, सांस्कृतिक किंवा उपासना पद्धतीचे आहेत. या सर्व भिन्न, व्यस्त व विरोधाभासी समूहामध्ये संतुलन आणण्यासाठी, मार्गदर्शन करण्याचे काम जी व्यवस्था करते तिला 'धर्म' असे म्हणतात. ''धारणात धर्ममित्या ह्युधर्म धारयेत'' असे त्याचे वर्णन करण्यात आले आहे. एकाकी न्यायापेक्षा जास्तीत जास्त (परिपूर्ण) न्याय देण्याचा प्रयत्न धर्म संकल्पनेत आहे. म्हणूनच स्वातंत्र्याबरोबरच नियंत्रणाचाही त्यात अंतर्भाव आहे. ही शिकवण (या शिकवणीचा) व्यक्तीच्या गर्भावस्थेतसुद्धा संस्कार करण्याचा प्रयत्न हिंदू धर्मात केला आहे. हा प्रयत्न म्हणजे संस्कारांच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये 'विवेक' निर्माण करणे. याची कार्यशाळा

म्हणजेच दैनंदिन जीवन. आपले आई-वडील, स्वकीय आणि समाजातील इतर महाजन हे अशा विवेकी वागणुकीचे उदाहरण घालून देतील अशी अपेक्षा असते. व्यक्ती आपल्या संस्कारक्षम वयात अशी जेवढी जास्त उदाहरणे अनुभवते, तेवढी ती अधिक सहिष्णु आणि संयमशील बनत जाते. आजची परिस्थिती बरोबर याच्या उलट आहे.

आजच्या हिंदूंचे 'सार्वत्रिक धार्मिक' सण साजरे करण्याची पद्धत बघितली तर समाज नुसताच दिशाहीन नाही, तर किती अभिरुची आणि संस्कारहीन सडला आहे याचे ते उत्तम चित्र आहे. ज्या नेतृत्वाने किंवा यंत्रणांनी यावर अंकुश ठेवायचा त्यांनीच या सणांना बाजारू बनवण्याचा विडा उचलला आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झालेच आहे. आता सार्वत्रिक सण राजकारण्यांनी बिघडवले आहेत. दुर्दैवाने हे सर्व धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली चालू आहे. संघर्षमय जीवनामध्ये क्षणभर आनंद, विरंगुळा देण्याचे काम हे सण करीत असतात. शिवाय हे सर्व सण सर्वांनीच साजरे करावे असाही हट्ट नव्हता.

उपासना जेव्हा सामूहिक होते तेव्हा तिला सामावून घेण्याकरता देवळांची रचना होते. संपूर्ण विचार करूनच अशा देवळांची रचना करण्यात येत असे. छतापासून भिंतीपर्यंत कोरलेली शिल्पेही कलेइतकीच शिक्षणाची आधार होती. नृत्यापासून व्याकरणापर्यंतच्या अध्यापनाचे मंडप त्यात होते. विप्र होण्याची ती एक जागा होती. श्रद्धेएवढे संस्कारालाही तिथे स्थान होते. या सर्व देवळांचे आपण बाजारीकरण केलेच, पण तेही काय कमी पडू लागले की काय म्हणून या राजकारण्यांनी या श्रद्धेचा व्यापार रस्त्यावर सुरू केला! काही अपवाद वगळता सगळ्याच माध्यमांनी भावुकतेचा बाजार मांडला. संशोधन तर सोडाच, पण कृष्णकाल्यापासून गणपतीपर्यंत भाकड कथांचे ही माध्यमे रतीब घालू लागली. ज्या देवांकरता अत्यंत लालित्यपूर्ण स्तोत्रे, आरत्या आणि पोवाडे रचले गेले, तेथे आता अत्यंत अचकट विचकट हिडीस नाच आणि गाणी यांचे कलेच्या नावाखाली प्रदर्शन होताना दिसू लागले. अर्थातच, 'आम्ही सिनेमा किंवा नाटक यांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करत आहोत' अशी व्यापारी बकवास करणारे नट व नट्याही आपला 'अर्थपूर्ण' हातभार याला लावतच आहेत.

राजकारणी याला जितके जबाबदार आहेत तेवढाच समाजही या घसरंडीला जबाबदार आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, देव भरला आहे, हे तत्त्वज्ञान सांगणारे हिंदू , एखादा विशिष्ट देव नवसाला पावतो, या शुद्ध थापेबाजीवर विश्वास

ठेवत, तासन्तास तेथे उभे राहतात या विरोधाभासाला काय म्हणावे? सर्व आघाड्यांवर दिवाळखोर नेतृत्व आज आपण अनुभवत आहोत. सुधारणेच्या नावाखाली आम्ही धर्मग्रंथ जाळून टाकले, अवघ्या साठ-पासष्ठ वर्षात शंभरवेळा बदलाव्या लागणाऱ्या आपल्या राज्यघटनेने आपल्याला काय पर्याय दिला, हे आपल्या समोर आहेच. आज आपण धर्मही घालवला आणि चारित्र्यही हरवले. राजकारण्यांनी समाजाला सवलत ग्रस्त करून, अधिकाधिक स्वार्थी करून ठेवले आहे. आपले आजचे सार्वजनिक उत्सव हे त्याचेच प्रतिबिंब आहे. नीतिहीन समाजाचे नेतृत्व हेही नीतिहीनच असते, तेव्हा अधर्म धर्म झालेला असतो. आज त्याचीच प्रचिती आपल्याला येत आहे.

✧✧✧

# वंदनीय कोण?

{ जानेवारी २०१४ }

‘‘बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले’’ हे संतवचन लिहिले गेले त्याला आज चारशे वर्षे झाली. हजारो पाने लिहूनही जे सांगता येणार नाही असे मार्गदर्शक तत्त्व संतांनी या एका वाक्यात लिहून ठेवले आहे. ‘वंद्य’ होण्याकरता लायक कोण, तर ज्याची उक्ती व कृती यांमध्ये फरक नाही तो. दुर्दैवाने पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. सर्व विधिनिषेध धाब्यावर बसवून, कमरेचे सोडून डोक्याला बांधणारे आणि ज्ञानाच्या क्षेत्रात कवडीमोल किंमत असणारे मंत्री, संत्री हे या संतवचनाला मूठमाती देण्यात आघाडीवर राहिले. यांचे ‘आदर्श’ घोटाळे आता जगजाहीरच झाले आहेत. ‘नावात काय आहे’; हा साळसूद प्रश्न विचारणाऱ्यांनी ‘खोब्रागडे’ नावात किती वजन व जादू आहे हे नुकतेच बघितले. सामाजिक असो, राजकीय असो वा धार्मिक असो, प्रत्येक पदांबाबत काही व्यक्त व अव्यक्त जबाबदाऱ्या या पदस्थांच्या शिरावर येऊन पडतात. पण कुठलीही लायकी नसताना किंवा बेताचीच लायकी असताना यांच्या वागणुकीतून साहजिकच व्यक्त होत असतो तो सत्तेचा माज! या सर्व पार्श्वभूमीवर सध्याचा एक राजदूत, एक न्यायाधीश व संपादक यांची प्रकरणे बोलकी आहेत. ‘‘लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण’’ या उक्तीप्रमाणे या सर्वांची वागणूक आहे. मांजराने डोळे मिटून जरी दूध प्यायले तरी ती चोरी जशी लपत नाही तशी या सर्व महाभागांच्या वागण्याची लक्तरे आज वेशीवर टांगली गेली आहेत.

कारगिलमधील विद्रूप करून पाठवलेली प्रेते, सोमालियन चाच्यांमुळे धरण्यात आलेले भारतीय खलाशी किंवा जॉर्ज फर्नांडिस यांच्यापासून माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना अमेरिकेत दिल्या गेलेल्या वागणुकीमुळे अजूनपर्यंत भारतीय मुत्सद्दी

किंवा परराष्ट्रीय खाते कधी कासावीस झालेले आपण पाहिले नाही. राष्ट्रीय अस्मिताही यामुळे धोक्यात आल्याचे आपण कधी ऐकले नाही. नावातील जादू येथेच दिसून येते. एकूणएक राजकारणी आणि भारतातील सारे विद्वत्‌जन अमेरिकेने आपल्या राजदूताला दिलेल्या या वागणुकीमुळे व्याकूळ झालेले दिसतात. अर्थातच आपल्या राजदूताला अमेरिकेने दिलेली वागणूक, मग ती अमेरिकन कायद्यात बसणारी असली तरी असंस्कृतच होती आणि म्हणूनच आपली प्रतिक्रिया समर्थनीयच आहे.

अमेरिकेची अरेरावी आणि माजोरीपणा पहिल्या महायुद्धापासून, व्हिएतनाम ते अफगाणिस्तानातील युद्धापर्यंत जगजाहीर आहे. लैंगिक समानता, स्त्रीमुक्ती, मानवी अधिकार ते अगदी पर्यावरणाच्या नियमांपर्यंत अमेरिकेने जगाला करावयाचे उपदेश व अमेरिकेतील वास्तव यात कायमच अंतर दिसून आले. या सर्व अधिकारांना आणि समानतेला एक सांस्कृतिक संदर्भ असतो आणि त्यांच्यामधील संतुलन या सांस्कृतिक पार्श्वभूमीवरच साधायचे असते. पण या देशातले डावे, पुरोगामी, मुक्त विचारवंतांना मात्र या अधिकारांची अमेरिकन सांस्कृतिक कुरघोडी सोयीची वाटली. अमेरिकेचा हा दुटप्पीपणा आणि उर्मटपणा याबाबत लिहायचे म्हटले तर जगातील सर्व शाई संपेल. भारताचे बहुतेक सगळेच दूतावास व सरकारी नोकरीतील त्यांचे चालू असणारे व्यवहार हे कोणालाही उबग आणतील असेच आहेत. ही मंडळी तेथे गेल्यावर आपले नातेवाईक, खुशमस्करे यांची 'सुव्यवस्था' लावण्यात मग्न असतात. पाकिस्तान धार्जिण्या एका अमेरिकन व्यक्तीने आणि संस्थेने जगभर आयोजित केलेल्या परिसंवादास हेच संपादक, राजकारणी राष्ट्रहिताला सुरुंग लावून नुसतेच हजर राहिले नाहीत; तर भारतच काश्मीरवर आक्रमण करत असल्याच्या निर्लज्ज प्रसाराला हातभारही लावत राहिले. अर्थातच एकांगी नि तकलादू निधर्मवाद आणि घराणेशाहीच्या मर्जीतले हे मुत्सद्दी असल्यामुळे परराष्ट्र खात्याला राष्ट्रीय धोरण धोक्यात आल्यासारखे कधीच वाटले नाही.

भारतातील पाण्यापासून गरिबीपर्यंत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कोट्यवधी रुपयांचा पैसा अमेरिकेतून येतो; तेव्हा अमेरिकेचा उर्मटपणा यांच्या गावीही नसतो! एम. एफ. हुसेन यांच्या अभिव्यक्तीवर झालेल्या अन्यायाने मुक्त कलावंतांची झोप उडते, परंतु तसलीमा नसरीन यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत बोलताना मात्र यांच्या जिभा लुळ्या पडलेल्या असतात. असले दुहेरी मापदंड सर्रास वापरणारे 'विचारवंत' हे वंद्य तर नाहीतच; पण निंद्य आहेत.

हिंदूंच्या धर्मशास्त्रामध्ये प्रत्येक पदाला, मग ते घरातील आई-वडील असोत

की सामाजिक 'महाजन' असोत, काही जबाबदाऱ्या आणि बंधनांच्या चौकटी आखून दिल्या आहेत. 'जे माझे नाही ते मी घेणार नाही', ही रामायणातील भरताची शिकवण आपण कधीच विसरून गेलो आणि आता अमेरिकन संकल्पनेप्रमाणे 'माझे ते तर माझेच, पण तुझे तेही माझेच (!)' ही संस्कृती आपण स्वीकारली आहे. लाल दिव्यांच्या गाड्यांपासून ते टोल नाक्यांवरील कर्मचाऱ्यांनी टोल विचारला म्हणून धुडगूस घालणाऱ्या, मारामाऱ्या करणाऱ्या राजकारण्यांचा पदोपदी आढळणारा हा उर्मटपणा आपल्या चांगलाच अंगवळणी पडला आहे. या ढोंगी, आपमतलबी आणि स्वार्थी नोकरशाहा व राजकारण्यांनी अमेरिकेच्या उर्मटपणापेक्षा अधिक शरमेने मान खाली घालण्याची वेळ आपल्यावर आणली आहे. म्हणूनच शेवटी म्हणावेसे वाटते की, समाजाने, संतांनी सांगितलेल्या ''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले'' अशा व्यक्ती, त्या जरी दुर्मीळ असल्या तरी त्यांनाच आपले प्रतिनिधी म्हणून निवडणे किंवा स्वीकारणे हितकारक आहे, अन्यथा ही सर्वच मूल्यांची घसरण थांबवणे अशक्य आहे.

'यथा राजा तथा प्रजा ' अशीही उक्ती आपल्याला परिचित आहे. जुने धर्मग्रंथ जाळून नवीन समाज निर्माण करता येत नाही. द्वेष, मत्सर, आहे तेही नष्ट करते आणि नवीन 'भ्रष्ट' निर्माण करते. प्रगती आणि नावीन्याच्या भ्रामक कल्पनांनी लग्नापासून पालकत्वापर्यंतच्या सगळ्या संस्कारांचा आपण पोरखेळ करून टाकला. अमेरिकेची उद्योगशीलता, वक्तशीरपणा, तेथली ग्रंथालये, संग्रहालये आणि विद्यापीठांचे अनुकरण करावेसे आपल्याला वाटत नाही; पण त्यांचा लैंगिक भोगवाद, आत्मकेंद्रित स्वैराचार आणि उर्मट जडवाद आपल्याला स्वीकारावासा वाटतो हीच खरी शोकांतिका आहे. अमेरिकन चपला नि बूट घातलेल्या पायांची इतकी रेलचेल झाली आहे की, या गर्दीत ती, 'बोले तैशी चालणारी' वंदनीय पावले हरवून गेली आहेत.

✧✧✧

# ‘सद्धर्म’ सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१४–२०१५

{ एप्रिल २०१४ }

‘सद्धर्म’ त्रैमासिकाचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६५ ला श्री. गोविंद महादेव नवाथे यांनी प्रकाशित केला. १५ ऑगस्ट २०१५ ला ‘सद्धर्म’ प्रकाशनाला ५० वर्षे पुरी होत आहेत. त्यानिमित्त २०१४–२०१५ हे वर्ष ‘सुवर्णमहोत्सवी’ वर्ष म्हणून सद्धर्मतर्फे साजरे होणार आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात म्हणून सौ. धनश्री लेले यांचा ‘‘कालीदासाचे मेघदूत–आस्वादक रसग्रहण’’ हा कार्यक्रम दि. १८ मार्च ते २१ मार्च (मंगळवार ते शुक्रवार) या दिवशी संध्याकाळी ७ ते ९ या वेळात घंटाळी, ठाणे येथील सहयोग मंदिरात आयोजित केला होता. ठाणे भारत सहकारी बँकेने हा कार्यक्रम प्रायोजित केला होता. आनंदाची गोष्ट म्हणजे श्रोतृवर्गाने या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद दिला. सौ. धनश्री लेले यांचे संस्कृतवरील प्रभुत्व, ओघवती वाणी व कालीदासाच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

श्री. नवाथे यांनी ‘सद्धर्म’ त्रैमासिकाची निर्मितीच एका विशिष्ट हेतूने केली होती. सुसंस्कृत, सदाचारी, नीतिमान आणि प्रामाणिक तरुण पिढीच्या निर्मितीकरता एक ‘साधन’ म्हणून ‘सद्धर्म’ त्रैमासिक त्यांनी चालू केले. संस्कारक्षम वयातील नागरिकांना चांगले साहित्य वाचायला मिळाले तर ते सक्षम राष्ट्र निर्माण करू शकतील हा त्यांचा दृढ विश्वास होता. श्री. नवाथे यांचा स्वतःचा सुगंधी द्रव्ये आणि रंगांचा व्यापार होता. त्यांच्या स्वतःच्या जीवनप्रवासाचाच वेगळा अभ्यास व्हायला हवा.

२० व्या शतकात भारतामध्ये बरेच विचारवंत साम्यवादी विचारसरणीने भारावून गेले होते. साम्यवादी विचारसरणीची मूस हीच मुळी युरोपमधील औद्योगिक

क्रांती, तेथील धर्माचा अतिरेक आणि सरंजामशाहीच्या पार्श्वभूमीवर आधारित होती. प्रस्थापिताला विस्थापित केल्याशिवाय ह्या नवीन विचारसरणीचे रोपटे तग धरणे कठीण होते. संस्कृतिभंजन हा या विचारसरणीच्या प्रसार, प्रचाराचा गाभा होता. श्री. नवाथे हे कट्टर साम्यवादी होते. तत्कालीन साम्यवादी चळवळीला त्यांचा सक्रिय पाठिंबा होता. भारतामध्येही हा साम्यवाद रुजवायचा असेल तर तेथील सांस्कृतिक पाळेमुळे खणून काढणे गरजेचे होते. इतिहासाला आपल्या सोयीप्रमाणे वळवणे आवश्यक होते. साहजिकच प्रस्थापित राजे असोत अथवा विद्वज्जन असोत, हे सगळ्या समाजाची पिळवणूकच करत होते, या अंगानेच हा सगळा इतिहास लिहिला जाऊ लागला. रामायण, महाभारतापासून धर्मशास्त्रापर्यंत आणि साहित्यापासून सर्व कलांची निर्मितीसुद्धा समाजशोषणाकरता केली गेली असे अनैतिहासिक, अनैसर्गिक जावईशोधही संशोधनाच्या वेष्टनात बांधून सादर केले गेले. कुठल्याही सभ्यतेमध्ये चांगल्या आणि वाईट गोष्टी असतातच. सभ्यतेचा 'पट' जेव्हा रुंदावतो, तेव्हा अनेक यशापयशाची शिखरे येऊन गेलेली असतात. या सगळ्या उलथापालथीमध्ये 'नित्य' आणि 'शाश्वत' तेवढे टिकून राहते. पण संस्कृतिभंजनामध्ये अशा मूल्यांनाही 'उद्ध्वस्त' केले जाते. भारत हा साम्यवादी देश जरी नसला तरी भारताच्या इतिहासलेखनामध्ये आणि समाजघडणीमध्ये या साम्यवादी विचारसरणीचा मोठा हातभार लागला आहे.

म्हणून श्री. नवाथे यांचा जीवनपट आणि त्यांनी चालू केलेल्या 'सद्धर्म' त्रैमासिकाला विशेष महत्त्व आहे. श्री. नवाथे यांचा 'साम्यवादी' विचारसरणी आणि 'प्रचारतंत्र' याबाबतीत लवकरच भ्रमनिरास झाला. वैदिक आणि भारतीय संस्कृतीचा त्यांनी स्वतः सखोल अभ्यास केला. भारतीय संस्कृती, त्यावर आधारलेली भारतीय जीवनशैली आणि त्यातूनच निर्माण झालेले साहित्य नि धर्मसंकल्पना यांची उंची व खोली बघून ते विस्मयचकित झाले. त्या विचारामधील शाश्वत आणि सनातन सत्य त्यांना अधिक प्रेरणादायी वाटू लागले. व्रतवैकल्ये आणि पोथ्या यांच्या वाङ्मयाची सामाजिक गरजही त्यांच्या लक्षात आली. म्हणूनच सद्धर्म प्रकाशनातर्फे त्यांनी अनेक स्तोत्रे प्रकाशित केली. प्रत्येक 'समाजाला' आणि 'व्यवस्थेला' सुधारण्याची आवश्यकता असते. प्रत्येक शतकामध्ये अशा प्रकारचे झालेले प्रयत्न आपण बघतो. जेव्हा असे प्रयत्न एका 'विवेकी' आणि खऱ्याखुऱ्या 'निरपेक्ष' नेतृत्वाकडून होतात तेव्हा मूळ व्यवस्थेवर आलेली 'जळमटे' व 'पुटे' दूर होतात आणि सामाजिक संतुलन टिकून राहते. आगरकर, टिळक, गोखले, रानडे आणि

सावरकर या सगळ्यांनाच धर्माची 'शाश्वत' तत्त्वे नष्ट न करता धर्मसुधारणा हवी होती. अर्जुनाला कार्यप्रवृत्त करण्याकरता गीता ही वारंवार सांगावीच लागते. भारताच्या इतिहासात अनेक आचार्य आणि संतपरंपरेने हेच कार्य केलेले आपण बघतो. श्री. नवाथे यांची 'सद्धर्म' त्रैमासिक चालू करण्यामागील प्रेरणा ही या समाजाला भारतीय वैचारिक साहित्याची ओळख करून देण्याची आहे, आणि तेच मार्गदर्शक तत्त्व गेली ५० वर्षे 'सद्धर्म' त्रैमासिकाने कटाक्षाने पाळले आहे.

श्री. नवाथे यांनी शेवटी संपूर्ण निवृत्ती घेतली होती. आपला चांगला व्यवसाय त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना देऊन टाकला. सद्धर्माकरता त्यांनी 'गुंडोपंत हरिभक्त' हे टोपणनाव घेतले. सद्धर्मकरता आपल्या पत्नीच्या नावाने न्यास चालू करून त्याच्या खर्चाची सोय करून ठेवली. आपले नाव कुठेही राहणार नाही याची त्यांनी इतकी खबरदारी घेतली की, आपल्या पारपत्रावरील छायाचित्रही त्यांनी काढून टाकले होते.

भारतीय संस्कृतीमधील सणांचे, दहिहंडीपासून गणपती उत्सवापर्यंतचे राजकारण्यांनी केलेले विकृतीकरण आज आपण अनुभवत आहोत. राजकारणातील 'कुटुंबशाही' आणि 'नाममाहात्म्य' बघून समाजाला आज उबग आला आहे. निवृत्ती तर सोडाच, पण ज्येष्ठांचा सत्तेचा हव्यास सगळ्यांना स्तंभित करणारा आहे. या पार्श्वभूमीवर श्री. नवाथे यांचे उदाहरण नक्कीच अनुकरणीय आहे.

अशा विचारांना वाहून घेतलेल्या नियतकालिकांना आज वाचक मिळणे कठीण असतानाही, सद्धर्मची कुठलीही जाहिरात न करता आज १३०० वर्गणीदार आहेत व रोज त्यांमध्ये नव्याने भर पडत आहे. श्री. नवाथे यांच्या कार्याला वाचकांची ही पावतीच आहे आणि सद्धर्म चालू राहण्याकरता ती प्रेरणादायी ऊर्जाही आहे. संवाद हे आत्मपरीक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. सद्धर्ममधील लिखाणाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया ऐकण्यास आम्ही उत्सुक आहोत. अशा मोजक्या प्रतिक्रियांना प्रसिद्धीही दिली जाईल. या सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्व वाचकांनी सद्धर्मकरिता आणखी एक तरी नवीन वाचक देण्याचा संकल्प केल्यास ते सद्धर्म त्रैमासिकाकरता उचित योगदानच होणार आहे.

✧✧✧

# विज्ञान आणि समाज

{ जुलै २०१४ }

विज्ञानाची प्रगती जेवढी विस्मयकारक आहे तेवढीच ती आत्मपरीक्षणासाठी प्रेरक असते. विज्ञानभाटांनी अशी एक सोयीस्कर समजूत करून दिली आहे की, विज्ञानाचे पुढे पडणारे प्रत्येक पाऊल हे परंपरागत विचार, समजुती आणि श्रद्धांना लाथाडूनच पुढे जात असते. श्रद्धा-अंधश्रद्धांच्या वादविवादात समाजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांना तर विज्ञान हे एक हत्यारच वाटते. ''वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवा'' हा 'मंत्र'ही असाच परवलीचा आणि सोयीस्कर उपदेश आहे.

'खरे' बोला किंवा 'सत्याचा' आग्रह धरा हा वास्तविक एक सामाजिक दृष्टिकोन आहे. समाजशास्त्राएवढाच तो विज्ञानामध्येही महत्त्वाचा आहे. 'खरे बोलणे' या मूल्याची जोपासना ही अगदी लहानपणापासूनच संस्कार, अनुभव आणि शिक्षणाच्या माध्यमातून करावी लागते. विज्ञानाचा पदवीधर किंवा विज्ञानशाखेत संशोधन करणारा, केवळ विज्ञानशाखेचा सभासद आहे म्हणून 'खरे बोला' हे मूल्य पाळणारा असतोच असे नाही. विज्ञान संशोधन / निबंधांमधील चोरी किंवा उचलेगिरीने आज चिंताजनक स्वरूप धारण केले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची गफलत आपण नेहमीच करत असतो आणि म्हणूनच, तंत्रज्ञान म्हणजेच विज्ञान असा ठाम सिद्धान्तही आपण उराशी कवटाळून बसतो. वास्तविक वैज्ञानिकाला नैसर्गिक किंवा सामाजिक ''नित्या'' मागील कारणमीमांसा शोधण्याची प्रेरणा ही त्याच्या सांस्कृतिक जडणघडणीतून किंवा अंतःप्रेरणेतूनच मिळत असते. 'का?' हा प्रश्न जेवढा विज्ञानाची प्रेरणा होऊ शकतो, तेवढाच तो तत्त्वज्ञानाचाही प्रेरक मुद्दा होऊ शकतो. भारतीय तत्त्वज्ञानाची सुरुवातच मुळी ''मी कोण? कुठून आलो? आणि माझा या निसर्गाशी संबंध काय?'' या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रक्रियेत आहे.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला परंपरागत म्हणजे न्युटोनियन पदार्थविज्ञानाला मॅक्स प्लँक आणि आइन्स्टाईन यांच्या 'पुंज' आणि 'सापेक्षतावादी' सिद्धान्तांनी धक्के द्यायला सुरुवात केली. हा बदल विज्ञानापेक्षा, जीवनाच्या व्यापक दृष्टिकोनामध्ये होता. 'पदार्थ' केंद्रित विज्ञान 'ऊर्जा' केंद्रित व्हायला लागले. 'शरीर' किंवा 'जग' हे यंत्रवत आहे ही संकल्पनाच अ-वैज्ञानिक ठरू लागली. प्रकाशाचे एकाच वेळी ''कण'' आणि ''तरंग'' स्वरूप असणे ही कल्पनाच मुळी परंपरागत विज्ञानालाच काय, पण तर्कालाही धक्का देणारी होती. निरीक्षक आणि निरिक्षिली जाणारी वस्तू यांच्यामधील संबंधाला नव-विज्ञानाने एक विशेष 'समज' दिली. ती 'समज' म्हणजे त्यांच्यामधील 'परस्परावलंबित्व'. समजुतीतील हा बदल क्रांतिकारक होता. वास्तविक तो आपल्याला समजला म्हणून त्याला 'शोध' म्हणायचे; पण ते सत्य, शोधांचे आणि शोधानंतरचे सनातन वास्तव होते. माझे अस्तित्व हेच मुळी समाज आणि सर्व निसर्गघटकांवर अवलंबून आहे, हा या नव-विज्ञानाचा गाभा आहे.

पदार्थाच्या अंतरंगाचे स्वरूप जाणून घेण्याची ही सुरुवात, पेशीच्या अंतरंगातल्या हालचालीही समजून घेण्याच्या दृष्टीने मार्गक्रमण करू लागली आणि २० व्या शतकाच्या शेवटी नि २१ व्या शतकाच्या सुरुवातीला या क्षेत्रातही क्रांतिकारक बदल होऊ लागले. हे बदलही पुन्हा शरीरातल्या सर्वच पेशींमधील परपस्परावलंबित्व अधोरेखित करू लागले. शरीरातील प्रत्येक अवयव हा स्वतंत्र असतोच, पण त्याचे कार्य एकमेकांना पूरक असते. शरीरावर अनेक बाह्य प्रभाव पडत असतात. एका सीमेपर्यंत शरीरातल्या सगळ्या अवयवांच्या या प्रभावांमुळे होणारे बदल पचवू शकण्याच्या क्षमतेमुळेच आपण आपले जीवन जगत असतो. शरीरातले अनेक अवयव आणि त्यांच्या पेशींची क्षमता कायम संतुलित ठेवण्याकरता शरीरातच अनेक 'नियंत्रणांचे' स्तर निर्माण केलेले असतात. ही सर्वच रचना प्रचंड गुंतागुंतीची असली तरीही या नियंत्रण यंत्रणेमुळे शरीराचे कार्य संतुलितपणे चालू असते.

''न्यू सायन्टिस्ट'' (New Scientist) या संशोधनपत्रिकेच्या ३१ मे २०१४च्या अंकातील एका बातमीने हेच परस्परावलंबित्व पुन्हा एकदा प्रकर्षाने दाखवून दिले आहे. आईच्या पोटातील गर्भाचे पोषण आईच्या शरीरातूनच नाळ आणि वारेच्याद्वारे मिळणाऱ्या अन्नातून होत असते. ह्या परस्परावलंबित्वावर प्रचंड संशोधन झाले आहे. वर उल्लेख केलेल्या संशोधनाने असे दाखवून दिले आहे की, आईच्या तोंडातील जीवाणूही गर्भापर्यंत पोहोचू शकतात. अर्थात हा प्रवास कसा होतो हे अजून समाधानकारकरित्या समजलेले नाही. संशोधकांना असेही आढळून आले

आहे की, आईच्या तोंडाच्या स्वच्छतेचा आणि अपुऱ्या दिवसांचे बाळ जन्माला येण्याचा संबंध आहे. अलीकडेच जननावरण (Epigenitics) विज्ञानशास्त्राने आई-वडिलांच्या आणि विशेषतः आईच्या जीवनशैलीचे, अपत्याच्या नुसत्या गर्भावस्थेतच नाही तर त्याच्या पुढच्याही जीवनावर काय चांगले-वाईट परिणाम होऊ शकतात हे दाखवून दिले आहे. आईच्या खाण्याच्या सवयी, धूम्रपान किंवा मद्यपान यांचा या अपत्यांवरील विपरीत परिणाम आता सिद्ध झाले आहेत. या संशोधनाचा निष्कर्ष किंवा संदेश एकच आहे की, आई आणि अपत्याचा संबंध फक्त शारीरिकच नसून; दोन्ही पालकांच्या सवयी, खाण्यातील आवडीनिवडी आणि जीवनशैलीशी तो निगडित आहे. लठ्ठपणापासून ते हृदयरोग ते अगदी कॅन्सरपर्यंतचे कित्येक रोग हे वडील आणि आईच्या गर्भावस्थेतील जीवनशैलीवर अवलंबून असल्याचे दिसून आले आहे. आपल्या संस्कृतीत गर्भधारणेआधी आणि नंतर संपूर्ण ९ महिने आईची घेतली जाणारी काळजी ही या पार्श्वभूमीवर बरेच काही सांगून जाणारी आहे. अनेक सण वा संस्कारांतून आईची आणि तिच्या गर्भाच्या सशक्त वाढीची काळजी कल्पकतेने घेतली जाते. व्यापक सामाजिक हिताचा विचार केला तर आत्मकेंद्रित, अनियंत्रित स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचारी जीवनशैलीमुळे आपण स्वतःचे तर नुकसान करतच असतो; पण आपण जन्माला घातलेल्या संततीलाही त्याची शिक्षा देत असतो.

विज्ञानाने दाखवून दिलेल्या या परस्परावलंबी अस्तित्वावर आधारितच, परंपरागत सामाजिक संस्थांची उभारणी झालेली दिसते. ही उभारणी करताना सहाजिकच 'नियंत्रण' आणि 'नियंत्रण केंद्र' यांची निर्मितीही करावी लागते. समाज हा स्त्री-पुरुष आणि अनेक वयोगटांनी बनलेला असतो. त्यांच्या 'क्षमता' आणि 'गरजा' ही भिन्न असतात. त्यांच्यामध्ये संतुलन आणण्याकरताच अनेक नियम आणावे लागतात. नीती-अनीती, पाप-पुण्य, चांगले-वाईट या सगळ्या सांस्कृतिक संकल्पना असून, सामाजिक संतुलन आणि न्यायाशी त्याचा संबंध आहे. या संकल्पनांचे संदर्भ बदलतही असतात. या अनिवार्य बदलांचा आदर करून या संकल्पनांचा पायाही विस्तारित करावा लागतो. आपल्या 'धर्म' संकल्पनेचा आधारही हाच आहे. एखाद्या व्यक्तीचे किंवा समूहाच्या वागणुकीचे दुष्परिणामही बऱ्याच वर्षांनी दिसू शकतात. संस्कृतीचा कालपट हजारो वर्षांचा असतो. अशा अनेक अनुभवांतूनच वागणुकीच्या संदर्भातील नियम केलेले असतात. या सगळ्यांची तर्कांवर आधारित उत्तरे प्रत्येक वेळी देता येणे शक्य नसते, आणि म्हणूनच सामाजिक संस्थांची उभारणी सोपी नसते.

‘कुटुंब’ आणि ‘लग्न’ संस्था या अशाच व्यापक विचार आणि दूरदृष्टी ठेवून निर्माण केल्या गेलेल्या संस्था आहेत. पराकोटीचा आत्मकेंद्रितपणा, स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचारी जीवनशैली आणि आचरट ‘‘मुक्ती’’ संकल्पना या नुसत्याच अशा संस्था उद्ध्वस्त करत नसतात, तर अनेक वर्षे न भरून येणारी समाजाची हानीही करत असतात. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आजचे पर्यावरणाचे प्रश्न.

विज्ञान आणि समाजजीवन यांचे अतूट नाते दृष्टिआड करता येणे शक्य नाही. शरीरव्यवस्थेमध्ये जशी बाह्य प्रभाव आणि बदलांना सामावून घेण्याची शक्ती असते, तशीच ती समाजसंस्थांमध्येही असते. चांगले स्वास्थ्य जर हवे असेल, तर आहारापासून जीवनशैलीपर्यंत जसे नियंत्रित जीवन जगावे लागते तसेच सामाजिक लवचीकपणा झेपेल एवढेच वैयक्तिक स्वातंत्र्य किंवा स्वैराचार अंगीकारावा लागतो. विज्ञानाने दिलेली आणखी एक दृष्टी म्हणजे ‘रचना’ आणि ‘कार्या’मध्ये दिसणारा विरोधाभास. समाजामध्येही प्रत्येक मानवाच्या जीवनात, कुटुंबामध्ये जीवनाच्या कुठल्यातरी टप्प्यावर तो हा विरोधाभास अनुभवत असतो. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे महाभारतातील व्यक्तिरेखा. खऱ्या समाजजीवनाचेच ते प्रतिबिंब आहे. चांगल्यामध्येही वाईट असते आणि वाईटामध्येही चांगले असते. खरी वैज्ञानिक दृष्टी तीच, की जी हे ‘वास्तव’ स्वीकारते आणि खरी सामाजिक सुधारणा तीच, की जी काळाच्या कसोटीवर तावून सुलाखून निघालेल्या ‘परंपरा’ आणि ‘संस्थां’चा आदर करते, त्यामध्ये शिरलेल्या विकृतींना दूर करून मूळ प्रकृतीशी त्यांची नाळ जोडते.

२० व्या शतकातील विज्ञानाने अध्यात्मातील विज्ञान आणि विज्ञानातील अध्यात्म दाखवून दिले. अविवेकी विज्ञान आणि अतिरेकी अध्यात्म समाजाला सारखेच मारक असते.

✧✧✧

# मंगळ आणि ‘मंगळ’

{ ऑक्टोबर २०१४ }

भारताने नुकत्याच केलेल्या यशस्वी मंगळ मोहिमेमुळे भारतीयांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला आहे. अमेरिका, युरोपियन देश या सर्वांनी मिळून अजूनपर्यंत पन्नासहून अधिक मंगळस्वाऱ्या केल्या असल्या तरी, पहिल्याच प्रयत्नात भारताची मंगळ मोहीम यशस्वी झाल्यामुळे तिला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय या मोहिमेमध्ये तिच्या आखणीपासून ते अंतिम कार्यवाहीपर्यंत सर्व टप्प्यांवर भारतीय वैज्ञानिकांचाच सहभाग होता. एवढेच नाही तर, याकरता लागणारी सर्व यंत्रसामग्रीही भारतीय बनावटीचीच होती. याचमुळे दुसऱ्याही एका ‘मंगळ’ मोहिमेच्या चर्चेला चालना मिळाली. यामागचे दोन प्रवाह मात्र समाजातील दोन भिन्न विचारांशी जोडलेले आहेत. मंगळयान ही ‘विज्ञाननिष्ठ’, तर ज्योतिषशास्त्रातील मंगळाचा मानवावरील प्रभाव हा ‘अंधश्रद्धे’चे प्रतीक, या विचारासभोवतीच ही चर्चा होत राहते. साहजिकच यामुळेच देव, धर्म, कर्मकांड आणि त्यांचा लोकांवरील प्रभाव हे सर्वच ‘अंधश्रद्धा’ समजून, त्यांना ‘अ-वैज्ञानिक’ म्हणून वर्ग करण्याचाही काहींचा प्रयत्न असतो. सुदैवाने प्रचारकी सुधारकांचा तसा आग्रह असला तरी धर्म आणि विज्ञानाच्या समाजशास्त्रीय आणि इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांचे मात्र तसे मत दिसत नाही. माणसाच्या जगण्याकरता जेवढी विज्ञानाची आवश्यकता आहे, तेवढीच श्रद्धाच काय; परंतु अंधश्रद्धांचीही आवश्यकता आहे. यातील कोठल्याही विचारांचा अतिरेक हा हानिकारकच असतो, आणि म्हणूनच या दोन्ही बाजूंचा विचार हा परस्परविरोधी आणि एकांगीपणे करणे हे समाजाला हितकारक नसते. याच विषयावर १९९२

साली 'शोध अंधश्रद्धेचा' हे पुस्तक प्रकाशित करून त्यामध्ये या चळवळीमागील वैचारिक प्रवाहांचा मी विस्ताराने ऊहापोह केला आहे.

वास्तविक मानवाचा ज्ञात इतिहास हा हजारो वर्षांचा आहे. भारतापुरता जरी विचार केला तरी वेदांपासून ते सतराव्या शतकापर्यंत अगदी गणितासारख्या गहन विषयात लिहिल्या गेलेल्या ग्रंथांमध्येही कमी-अधिक प्रमाणात दैवी शक्तींची उपासना इत्यादींचा ऊहापोह केलेला दिसतो. भारतीय संस्कृतीमध्ये वेदांना एक अनन्यसाधरण महत्त्व आहे. वेदांमधील धर्म, दैवतशास्त्र आणि भाषा यावर प्रचंड विश्लेषणात्मक अभ्यास आज उपलब्ध आहे. मॅक्समुल्लर हा वेदांचा आधुनिक अभ्यासक. मानवाचा इतिहास (अर्थातच समाजशास्त्राच्या अंगाने) म्हणजे मानवाच्या धर्मसंकल्पनेचा इतिहास असा त्याचा दृढ विश्वास होता. एवढेच नाही तर, मानवाच्या धर्माचा प्रारंभ आणि त्याचा विकास यांच्या सम्यक माहितीकरता वेदवाङ्मय आणि त्यावर आधारित साहित्य अत्यंत उपयुक्त आहे हाही त्याचा सिद्धान्त होता. थोडक्यात, आजच्या भारतीय माणसांच्या 'श्रद्धा' आणि 'अंधश्रद्धां'ची जडणघडण समजावून घेण्याकरता भारतीय संस्कृतीच्या सर्व साहित्याचा, कलांचा अभ्यास असणे आवश्यक आहे. कारण यामध्येच माणसाला जगण्याकरता 'श्रद्धा' आवश्यक का आहेत याचे कारण शोधता येते.

दुर्दैवाने मानवी जीवन हे विरोधाभासाने भरलेले असते. आयुष्यात कित्येक गोष्टी का आणि कशा घडतात याचे तार्किक उत्तर सापडू शकत नाही. या सगळ्या असंतुलित जीवनप्रवासाला सुसह्य करण्याचे काम अनेक वेळा श्रद्धा करतात. माणसामधील मनुष्यपण त्यामुळे जागे राहते. या श्रद्धांना संस्कारित करणे हे संस्कृतीचे काम असते. श्रद्धेची ही गरज जर आपण ओळखली नाही तर धर्मच काय, पण विज्ञानही समाजाची तेवढीच हानी करू शकते. धर्मावरील अंधश्रद्धेइतकी विज्ञानावरील अंधश्रद्धाही समाजाचे न भरून येणारे नुकसान करू शकते.

महाराष्ट्र हा सर्वच क्षेत्रांत 'पुरोगामी' असल्यामुळे नुकताच जादूटोणा, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भातही एक कायदा आपल्या कायदेमंडळाने पारित केला. कायद्याचे जंगल आणि त्यामुळे होणाऱ्या भ्रष्टाचारामध्ये त्यात आणखी एक भर पडली. अर्थातच या कायद्याचा मूळ मसुदा आणि त्याचे आजचे स्वरूप यामध्ये खूपच फरक आहे. या कायद्याचा मूळ मसुदा हा वास्तविक एका विशिष्ट सिद्धान्ताला बांधलेला होता. वास्तविक ही सर्वच अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ, त्याचे प्रेषक

आणि सच्चे कार्यकर्ते हे जडवादी सिद्धान्ताला बांधलेले आहेत. विज्ञान हे त्यांचे एक हत्यार आहे. विज्ञान म्हणजे आधुनिकता, तर्कसंगतता, वस्तुनिष्ठता; तर धर्म म्हणजे या सगळ्या संकल्पनांचा अभाव अशी एक सोयीस्कर मांडणी केली जाते. धर्माइतकेच विज्ञानाचेही अज्ञान त्यामधून दिसून येते.

समाजाची आजची अगतिकता ही त्याच्या विकृत धर्म–उत्सवांतून दिसून येते यात शंकाच नाही. ज्योतिषातील मंगळामुळे मानसिक दुर्बलता निर्माण होऊन अनेकांची आयुष्येही दिशाहीन झाली याबद्दलही दुमत असण्याचे कारण नाही. आजची आपली देवळे, सण आणि व्रतवैकल्यांच्या सादरीकरणाची पद्धत हे सगळेच मूळ विचारापासून दूर गेले आहे इतकेच नाही, तर त्यामध्ये एक विकृतीही आली आहे. या सगळ्याच उपचारांमध्ये श्रद्धेपेक्षा देखावा आणि स्वार्थाचाच भाग दिसून येतो. दहीहंडी, गणपती ते नवरात्रीच्या सर्व उत्सवांचा राजकारण्यांनी आज ताबा घेतला असून त्यांना अक्षरशः रस्त्यावर आणून ठेवले आहे. सगळ्यांनीच या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. श्रद्धेची याहून वाईट विटंबना होणे शक्य नाही. दैनंदिन जीवनातील अस्थिरता, त्यातून निर्माण होणारे वैषम्य आणि ज्यांच्याबद्दल आदर बाळगायचा अशा घरातल्या, समाजातल्या, राजकारणातल्या आणि धर्माच्या नेतृत्वातील उक्ती व कृतींमधील तफावत आणि दांभिकपणा समाजाला दिशाहीन करून टाकतो. राजकारणातील भाई, दादा, अण्णा आणि काका, तसेच आजच्या धर्मातील संत, महंत, भगवान आणि गुरूंनी मानवी श्रद्धांचा पोरखेळ करून टाकला आहे.

मानवाच्या मूलभूत मानसिक क्षमता आणि गरजांचा विचार हा अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने न केल्यामुळे, ही चळवळ फक्त धर्म, देव आणि कर्मकांड या केंद्रांभोवतीच फिरत राहिली. आजच्या समाजाला खरोखरच अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज आहे. देव, धर्म आणि कर्मकांड यांची सामाजिक गरज समजावून घेतल्याशिवाय ही चळवळ उभीच राहू शकणार नाही. नाहीतर ती केवळ नास्तिकवाद अथवा जडवादाच्या प्रसाराचे साधन होऊन बसते. याचे उत्कृष्ट उदाहरण हे डॉ. दाभोळकरांच्या अनैसर्गिक मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांना त्यांच्या जयंत्या, पुतळे इत्यादींची गरज भासणे आहे. हीच या चळवळीच्या वैचारिक दिवाळखोरीची सुरुवातीची लक्षणे आहेत. त्यांच्या अनुयायांनाही ‘दैवत’वाद दूर करणे कठीण जात आहे. आपल्या श्रद्धेय किंवा आवडत्या व्यक्तीचे पूजन करणे, त्याची सगुण उपासना करणे हे

नैसर्गिक आहे. मग ते आपले वैचारिक नेतृत्व असो किंवा पितर असोत. पितृपंधरवड्यामध्ये जवळच्याच नाही तर फार मागच्या पितरांची आठवण करणे, त्यांचे ऋण मानणे, काही कालावधीकरता दैनंदिन नित्यकर्मां पासून दूर राहून आत्मचिंतन करणे ही अंधश्रद्धा कशी होऊ शकते?

आधुनिक जगामध्ये प्रत्येक गोष्टींचा हल्ली एक दिवस साजरा केला जातो. त्याला प्रेमापासून ते पर्यावरणापर्यंतची वेष्टणे दिली जातात. त्यांचे कार्यक्रम होतात. त्यांची प्रतीके म्हणून अनेक वस्तू विकल्या जातात. ही सर्व कर्मकांडे कुठल्या वैज्ञानिक विचारात बसतात? भाऊबीज, रक्षाबंधन यांसारखे उपक्रम मागासलेले! आणि 'फ्रेंडशिप डे' किंवा 'व्हॅलेंटाइन डे' सारखे शुद्ध व्यावसायिक सूत्रावर आधारलेले दिवस मात्र पुढारलेपणाचे द्योतक!!; हा विरोधाभास कुठल्या वैज्ञानिक तर्कसंगतीने समर्थनीय होऊ शकतो?

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमधील कमकुवतपणा हा ती चळवळ फक्त धर्म आणि कर्मकांडापुरती मर्यादित केल्यमुळेच आला आहे. विज्ञानावरील अंधश्रद्धांनीही मानवाचे आणि पर्यावरणाचे तेवढेच नुकसान केले आहे. याचे मुख्य कारण वैज्ञानिक हाही मनुष्यच असतो आणि मनुष्याच्या स्वाभाविक, नैसर्गिक लालसा व लोभ यांपासून तो मुक्त असूच शकत नाही. विज्ञान म्हणजे पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि जैवशास्त्र हाही समज तितकाच धोकादायक आहे.

वस्तुनिष्ठता ही वस्तुरूप असलेल्या पदार्थांचा अभ्यास करताना एक वेळ येऊ शकेल; पण मानसशास्त्र, कला आणि एकंदरीतच मानवी सर्जनता या वस्तुरूप नसल्यामुळे त्यांचे मूल्यमापन किंवा मोजणी वस्तुरूप पदार्थासारखी करता येणार नाही. शिवाय जेवढ्या व्यक्ती तेवढ्या प्रकृती हे गृहीत धरले तर त्यामध्ये यांत्रिकी एकसूत्रताही आणता येणार नाही. या गोष्टींच्या अभ्यासाची, मूल्यमापनाची वेगळी पद्धती असू शकते. संगीत किंवा शिल्पातून आनंद कसा घ्यायचा हे शिकवता येऊ शकते, पण तो 'आनंद' हा व्यक्तिनिष्ठच असू शकतो. विज्ञान हे सुद्धा तर्कापेक्षा विवेकाला बांधून ठेवणे आवश्यक आहे. अर्थव्यवहार, व्यवस्थापन याही गोष्टी विज्ञानाचा भाग होऊ शकतात. या सगळ्यांच्या संदर्भातसुद्धा त्यांच्या उपयुक्ततेबाबत अंधश्रद्धा असतील तर त्या समाजाचे नुकसान करू शकतात. अंधश्रद्धा आणि त्यांचे निर्मूलन हे शिक्षणसंस्कार, परंपरा या साधनांतूनच साध्य करता येऊ शकेल.

विज्ञानभाट आणि वैज्ञानिक यांमधील फरक ओळखणे जरुरीचे आहे. विज्ञानभाट हा, 'प्रचलित विज्ञान म्हणजेच अंतिम उत्तर' या ठाम अंधश्रद्धेवर जगतो; तर वैज्ञानिक हा 'प्रचलित विज्ञानामधील त्रुटी शोधून नवीन वाटा शोधण्याचा प्रयत्न करतो'. वैज्ञानिक हा परंपरागत धर्म पाळणाराही असू शकतो किंवा धर्म आणि कर्मकांडावर विश्वास ठेवणारा चांगला वैज्ञानिकही होऊ शकतो. म्हणूनच 'अंधश्रद्धा' हा विषय कुठल्याही सिद्धान्ताशी न जोडता तपासणे अतिशय महत्त्वाचे आहे. शरीरातल्या चांगल्या पेशींमध्येच विकृती येऊन कर्करोग होतो. कर्करोगाच्या उपाचारामध्ये 'विकृत' पेशीच काढून टाकण्यात येतात. चांगल्या पेशींना शक्यतो जपण्यात येते. अंधश्रद्धेचे निर्मूलन हीसुद्धा एक अत्यंत कठीण सामाजिक शस्त्रक्रिया आहे. श्रद्धा शाबूत ठेवूनच ती करावी लागते, कारण श्रद्धेशिवाय माणूस जगूच शकत नाही.

✧✧✧

# संस्कृतचा अभ्यास

{ जानेवारी २०१५ }

भाषेबद्दलचा वाद हा भारतामध्ये एक फावल्या वेळचा धंदा होऊन बसला आहे. ह्यामध्ये जेव्हा राजकारण येते, तेव्हा तो भावना आणि अस्मितेचा मुद्दा होऊन बसतो. या वादाला जेव्हा जातीय रंग येतो तेव्हा तर तो अधिकच गंभीर होतो. पुरोगामी, सुधारणावादी हे जेव्हा त्यात उतरतात तेव्हा तर त्याला एका संग्रामाचे रूप येते. भाषा बाजूला राहून तो एक सिद्धान्ताचा लढा होऊन बसतो. आजच्या मराठी शाळांची परिस्थिती आणि इंग्रजीचे मराठीवरील वर्चस्व हे या वादाचेच फलित आहे.

भाषा हे संपर्काचे, म्हणूनच दळणवळणाचे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. भाषेमध्ये जेव्हा साहित्याची निर्मिती होऊ लागते तेव्हा तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंबही त्यात पडलेले दिसते. भाषा जेव्हा शास्त्रीय आणि अचूक होऊ लागते तेव्हा विज्ञानाचे ग्रंथही तीमध्ये निर्माण होऊ लागतात. याकरिता भाषेला लागणारी ताकद ही अनुभव आणि संशोधनातूनच प्राप्त होत असते. सध्याच्या केंद्रीय विद्यालयांतून तिसरी भाषा म्हणून जर्मन ऐवजी संस्कृत आणण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्नही असाच वादामध्ये सापडला आहे. कुठल्याही गोष्टीची सक्ती ही मूळ उद्दिष्टांना मारकच असते.

भाषेच्या क्षेत्रामध्ये संस्कृतला एक अनन्यसाधारण महत्त्व आणि स्थान आहे, याबद्दल जगातल्या भाषेच्या अभ्यासकांमध्ये दुमत नाही. संस्कृतचे सामर्थ्य हे तिच्या रचनेमध्येच आहे. संस्कृत ही भारताच्या कुठल्याही प्रांताची भाषा नाही, तरीही गेल्या अडीच हजार वर्षांत, संस्कृतमध्ये जेवढे साहित्य उपलब्ध झाले तेवढे

जगातील इतर कुठल्याही भाषेमध्ये झाले नाही. संस्कृत ही पाणिनी या भाषा-वैज्ञानिकांनी मांडलेली एक कृत्रिम भाषा आहे. पाणिनी हे सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी होऊन गेले. अष्टाध्यायी हा त्यांचा सुमारे चार हजार सूत्रांमध्ये लिहिलेला व्याकरण ग्रंथ. भारतात पाणिनीच्या आधी आणि पाणिनीकालीनही अनेक भाषा होत्या, पण त्यांच्या भौगोलिक मर्यादेमुळे व्यापक संवादाकरिता त्या पुरेशा नव्हत्या. कदाचित यामुळेच पाणिनीला एका प्रमाणभाषेची निर्मिती करावीशी वाटली असेल. पाणिनी स्वतः अष्टाध्यायीमध्ये आधीच्या नऊ ते दहा व्याकरणकर्त्यांची नावे देतात. दुदैवाने त्यांचे कुठलेही ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. पाणिनींच्या संस्कृतच्या निर्मितीनंतर ही सगळी व्याकरणे निष्प्रभ झालेली दिसतात. पाणिनीनंतरही जैनांनी आपले एक व्याकरण करण्याचा प्रयत्न केलाच होता, पण तो फारसा यशस्वी झाला नाही.

आज इंग्रजीमुळे जग जसे जवळ आले आहे, तसेच संस्कृतमुळे कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंतचा भारत एक झाला होता. यामुळेच भारताच्या सगळ्या प्रांतांमधून कथा, कादंबऱ्या, अध्यात्म, विज्ञान या संस्कृतीच्या सगळ्या अंगांवरती संस्कृतमध्ये विपुल लिखाण झाले. आज कित्येक हस्तलिखिते नष्ट झाली असली तरी तीस लाखांहूनही अधिक संस्कृत हस्तलिखिते भारत आणि भारताबाहेरील ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत. संस्कृतमध्ये उपलब्ध असलेले साहित्य हेच संस्कृतचे बलस्थान आहे. अडीच हजार वर्षांच्या भारतीय संस्कृतीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, आध्यात्मिक, कला आणि विज्ञानाचे प्रतिबिंब या लिखाणामध्ये आहे. १९५३ साली India as known to Panini, A study of the cultural material of the Ashtadhyayi, हा सुमारे ६०० पानांचा वासुदेवशरण अगरवाल यांनी लिहिलेला ग्रंथ लखनौ विद्यापीठाने प्रकाशित केला. अडीच हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या अष्टाध्यायीमध्ये प्रतिबिंबित झालेल्या तत्कालीन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक अंगांवर या ग्रंथामध्ये चर्चा आहे. बौद्ध आणि जैन धर्मही सुमारे अडीच हजार वर्षे जुने आहेत. त्यांचे सुरुवातीचे ग्रंथ अनुक्रमे पाली आणि अर्धमागधी भाषेतून असले, तरी पुढे त्यांना या भाषांचा त्याग करून आपली सगळी ग्रंथसंपदा ही संस्कृतमध्येच करायला लागली. याचे कारण जरी आपण शोधण्याचा प्रयत्न केला, तरी कुठल्याही संस्कृतीला आपला विकास आणि ज्ञानप्रसाराकरिता प्रमाणभाषेची गरज का लागते हे सहज लक्षात येईल.

सोळाव्या शतकात युरोपमधून भारतामध्ये धर्मप्रसारक येऊ लागले. प्रामुख्याने ते दक्षिण भारत आणि गोव्यामध्ये जास्त कार्यरत होते. लोकांशी संवाद साधायचा

तर भाषेवर प्रभुत्व असणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांच्या लक्षात आले, आणि त्यातूनच त्यांनी संस्कृत आणि प्रादेशिक भाषांच्या अभ्यासाला सुरुवात केली. धर्मप्रसाराचे काम करत असताना त्यांना आपल्या संस्कृतीतील अध्यात्म आणि विज्ञानाच्या प्रगतीने आश्चर्यचकित करून टाकले. हे बहुसंख्य लेखन संस्कृतमधून होते. संस्कृत आणि प्रांतिक भाषांच्या अभ्यासातून त्यांनी ते विज्ञानपर लेखन आणि त्याची माहिती युरोपमध्ये द्यायला सुरुवात केली. आजही या माहितीचा अभ्यास, पाश्चात्त्य विद्यापीठांतून चालू आहे.

१५६३ साली गार्सिया दी ओर्ता (Garciade Orta) या गोव्यामध्ये काम करणाऱ्या पोर्तुगीज अभ्यासकाने भारतातील औषधे आणि वनस्पतींची माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ लिहून तो युरोपमध्ये प्रकाशित केला. हेंड्रिक ॲड्रियान व्हॅन रीड (Hendrit Andrian Van Rheede) हे केरळमध्ये धर्मप्रसाराचे काम करीत होते. १६७८ ते १६९३ या कालावधीत त्यांनी हॉलंडमधून 'हॉर्टस मलबारिक्स्' (Hortus Malabaricus) हा बारा खंडातील लॅटिन भाषेमधील, दक्षिण भारतातील औषधी वनस्पतींची माहिती देणारा ग्रंथ प्रकाशित केला. ही माहिती त्यांनी अत्यंत काटेकोरेपणे तत्कालीन पंडित आणि वैदू यांच्याकडून मिळविली होती. युरोपमध्ये नंतर लिहिल्या गेलेल्या वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासामध्ये या दोन्ही धर्मप्रसारकांनी दिलेली माहिती कमी-अधिक प्रमाणात अंतर्भूत करण्यात आलेली आहे. सर्पदंशापासून स्थापत्यशास्त्रापर्यंतचे अनेक ग्रंथ धर्मप्रसारकांनी भाषांतरित करून किंवा मूळ पोथीस्वरूपात युरोपमध्ये नेले. जर्मन धर्मप्रसारक हेन्री रॉथ (Heinrich Roth) हा १६५२ साली गोव्यामध्ये आला. पर्शियन, कन्नड, उर्दू या भाषांबरोबरच त्याने संस्कृतवरही प्रभुत्व मिळविले. इतकेच नाही तर, १६६० च्या सुमाराला त्यानी चक्क पाणिनीच्या व्याकरणाचे लॅटिनमध्ये भाषांतर केले. १६५१ साली अब्राहम रॉजिरियस (Abraham Rogerius) या डच धर्मप्रसारकाने हिंदू देवदेवतांची माहिती युरोपमध्ये प्रकाशित केली. 'पद्मनाभ' या पंडिताच्या मदतीने त्यांनी भर्तृहरीच्या नीतीशतकांचे पोर्तुगीज आणि लगेचच डच भाषेत भाषांतर केले. संस्कृतमधील अशा अनेक विषयांवर धर्मप्रसारकांनी केलेल्या भाषांतराची यादी खूप मोठी आहे.

१७८३ साली सर विल्यम जोन्स (William Jones) कलकत्त्यामधील न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले. १७८४ साली त्यांनी एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. प्रथम शाकुंतलचे (१७८९) आणि नंतर मनुस्मृतीचे (१७९४) भाषांतर करून भारतीय संस्कृती आणि संस्कृतच्या अभ्यासाच्या एका

नव्या अध्यायाला त्यांनी सुरुवात केली. चार्लस् विल्किन्स (Charles wilkins,1749-1836), ॲलेक्झांडर हॅमिल्टन (Alexander Hamitton, 1762-1824) आणि कुलब्रुक (Colebrook) या त्यांच्या सहकाऱ्यांनीही संस्कृतचा अभ्यास करून संस्कृतमधील महत्त्वाच्या ग्रंथांचे भाषांतर करणे चालू केले. हा सगळा इतिहास फार मोठा आहे आणि त्यावर अनेक संशोधनपर ग्रंथही उपलब्ध आहेत. विल्यम जोन्स यांना पर्शियन, ग्रीक आणि लॅटिन भाषांची चांगली जाण होती. संस्कृतचा अभ्यास करत असताना, संस्कृत आणि या भाषांमध्ये दिसणारे विलक्षण साम्य त्यांना दिसून आले. त्यांनी स्थापन केलेल्या एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक सभेमध्ये ते भाषण देत. आपल्या १७८६ साली दिलेल्या भाषणामध्ये त्यांनी या भाषासाधर्म्यावर क्रांतिकारक भाष्य केले –

"So strong indeed, that no philologer could examine them all three, without believing them to have sprung from some common source, which perhaps, no longer exists; there is a similar reason, though not quite so forcible, for supposing that both the Gothick and Celtick, though blended with a very different idiom, had the same origin with the Sanscrit : and the old persian might be added to the same family...."

'भारोपीय' (Indo europian) भाषासमूहाचा सिद्धान्त यातूनच पुढे विकसित झाला आणि या भाषांचा तौलनिक अभ्यास करीत भाषविज्ञानाची वेगळी शाखाच युरोपमध्ये उदयाला आली. विल्यम जोन्स यांच्याआधी हालहेड (Halhed) या अभ्यासकाने Grammar of Bengal Language हे पुस्तक १७८७ साली प्रकाशित केले. त्यालाही ग्रीक, लॅटिन आणि संस्कृतमधील साधर्म्य बघून आश्चर्य वाटले आणि त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्याने लिहून ठेवले –

"every part of speech and every distinction, which is to be found in either Greek or Latin and that in some particulars it is more copious than either... I do not attempt to ascertain as a fact, either Greek or Latin are derived from this language, but I give a few reasons where in such a conjecture might be founded : and I am sure that it is a better claim to the honour of a parent than, Phoenician or Hebrew".

फिलिपो सॅसेट्टी (Filippo Sassetti 1540-1588) हा इटालियन धर्मप्रसारक १५८३ साली कोचीनमध्ये आला. तेथील चालीरिती, धार्मिक समजुती आणि संस्कृत भाषेचा तो अभ्यास करू लागला. संस्कृत आणि इटालियन भाषेतील अनेक शब्दांमधील साधर्म्य पाहून तोही चक्रावून गेला. 'भारोपीय' भाषांच्या सिद्धान्ताआधी हे साधर्म्य मांडणारा हा पहिलाच युरोपीय अभ्यासक म्हणायला हवा.

या सगळ्याचाच परिपाक म्हणून युरोपमध्ये विद्यापीठांमधून संस्कृतच्या अभ्यासाची सुरुवात झाली. १८१४ साली फ्रान्स, १८१६ साली जर्मनी, नंतर लगेचच इंग्लंड, १८३५ साली फिनलंड, तसेच हॉलंड, डेन्मार्क, रशिया या देशांच्या विद्यापीठांमधून संस्कृतच्या अभ्यासाची सुरुवात झाली. गेल्या दोन शतकांमध्ये तेथून तौलनिक भाषाविज्ञान आणि संस्कृत भाषेवरती मूलभूत संशोधन झाले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारत यामध्ये खूपच मागे आहे. आजही, कुठल्याही भारतीय प्रांतिक भाषांपेक्षा संस्कृतीचा अभ्यास करणारी विद्यापीठांची दालने जगात जास्त आहेत. संस्कृतच्या जागतिक परिषदेला सबंध जगातून सुमारे वीस-पंचवीस देशांचे प्रतिनिधित्व करीत ३०० ते ४०० प्रतिनिधी उपस्थित असतात.

आजचा आपला संस्कृतचा द्वेष कुठल्याही प्रांतीय भाषेला तसूभरही पुढे घेऊन जाऊ शकत नाही. संस्कृतचे अतिउत्साही प्रचारक, राजकारणी आणि भाषावैज्ञानिक हे सर्वच या गोंधळाला सारखेच जबाबदार आहेत. संस्कृतमध्ये आज भारतीय संस्कृतीशी निगडित एवढे साहित्य उपलब्ध आहे की, त्याचा अभ्यास आणि संशोधन हे जगभर चालूच राहणार आहे.

संस्कृतच्या नाही तर आपल्या फायद्याकरिता संस्कृत शिकणे किती आवश्यक आहे हे ज्या दिवशी आपल्याला कळेल तो सुदिन म्हणायचा !

✧✧✧

# धार्मिक सण की संकट?

{ एप्रिल २०१५ }

कार्ल मार्क्स यांचे 'धर्म ही अफूची गोळी आहे', हे विधान सुपरिचित आहे. त्यांच्या या विधानाला युरोपमधील औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक क्रांती या दोन्हींची पार्श्वभूमी होती. आजच्या आपल्या 'सण' आणि 'उत्सवांना' आलेले 'आवाजी' आणि 'बाजारू' स्वरूप सर्वांनाच हतबल करणारे आहे. ज्यांनी आयुष्यभर तोडफोड केली असे सम्राट आणि सध्याच्या 'राष्ट्रवादी भ्रष्टाचार' आणि 'मूल्यहीन' राजकारणाचे महामेरू यांच्या अनुयायांनी या सणांचा आज ताबाच घेतलेला दिसतो. उच्च न्यायालयाच्या 'रस्त्यावरचे मंडप' आणि उत्सवातील 'ध्वनिप्रदूषण' या संदर्भात आपले 'संस्कृती' मंत्री आणि त्यांचे 'स्वकीय' आणि 'आप्त' यांनी सर्वच माध्यमांतून या सणांच्या आजच्या स्वरूपाचे केलेले छुपे समर्थन थक्क करणारे आहे, मार्क्स किती दूरदृष्टीचा विचारवंत होता यावर त्यातून शिक्कामोर्तबच झाले आहे.

युरोपमध्ये प्रबोधनयुगाची (Renaissance) सुरुवात ही १३ व्या, १४ व्या शतकातच झाली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरील, तसेच राज्ययंत्रणेवरील ख्रिस्ती धर्म आणि चर्चचा पगडा हा नुसता जाचकच नाही तर असह्य होऊ लागला होता. कोपर्निकस, गॅलिलिओ, ब्रुनो यांची निसर्गासंबंधीची निरीक्षणे ही बायबल वचनांच्या विरोधात जात होती. 'धर्मवचने' आणि 'वास्तव' यामधील विसंगती आणि विरोधाभास हा नेहमीच नवीन विचारांना जन्म देतो. परंपरागत ख्रिश्चॅनिटीच्या संदर्भात हेच होऊन १५ व्या शतकात प्रोटेस्टंट पंथ जन्माला आला. कॉंस्टॅंटिनोपोलच्या राजांनी तिसऱ्या शतकातच ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. त्या वेळी प्रचलित असलेल्या पॅगन जीवनपद्धतीशी त्यांचा संघर्ष होतच होता, आणि पुढील शतकांमध्ये

ख्रिश्चॅनिटीमध्येही अनेक पंथ निर्माण झाले. ख्रिस्त हा त्या सर्वांचा प्रेषित आणि बायबल हा एकच धर्मग्रंथ असला तरी, वास्तवाशी असलेला विरोधाभास जुळवून घेण्याकरता प्रत्येक पंथाचे अनुयायी बायबलमधील वचनांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे बदलून घेऊ लागले. एकविसाव्या शतकातील अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रामध्येही बहुसंख्य ख्रिस्ती समाजाचा गर्भपात, जैविक तंत्रज्ञान किंवा तत्सम वैज्ञानिक प्रगतीला आजही कडाडून विरोध होताना दिसतो. इस्लामचा उदय हा तुलनेने नवा म्हणजे सातव्या शतकातील असला तरी गेल्या १२००-१३०० वर्षांत त्यामध्येही अनेक पंथ आणि उपपंथ निर्माण झाले. या दोन्हीही धर्मांत युरोपमध्ये धर्मयुद्धे झाली आणि आजही ती चालू आहेत.

भारतातील परिस्थितीही वेगळी नाही. वैदिक आणि व्यापक हिंदू धर्म आणि बौद्ध, जैन ते अलीकडील शीख पंथ हे सर्वच 'धर्मवचने' आणि 'वास्तव' यांतील विसंगती दूर करण्याकरता नवीन अभिनिवेश घेऊन जन्माला आले. 'हिंदू' म्हणजे कोण याची व्याख्या आधीही केली गेली नाही आणि आजही करता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा एक प्रेषित नाही किंवा एक धर्मग्रंथही नाही. 'श्रद्धा' आणि 'अश्रद्धा' या दोघांनाही या जीवनशैलीमध्ये सामावून घेतले गेले. व्यक्तीला तिचे देव, उपासनापद्धती आणि श्रद्धास्थाने निवडण्याची मुभा होती. साहजिकच आपले तेहतीस कोटी देव आणि दर बारा कोसांवर बदलणारी बोली भाषा याच लवचीकपणाचे द्योतक आहेत.

साहित्य, कला, विज्ञान या कशाच्याच निर्मितीच्या आड या धर्मश्रद्धा येत नव्हत्या. गणित, ज्योतिष असो की अगदी कामसूत्रे असोत, त्यांच्या लिखाणाकरता कोणालाच धर्मबाह्य करण्यात येत नव्हते. उपासनापद्धतीत नसली, तरी एकंदरीत जीवनरचनेमध्ये वर्णाश्रम धर्म, पुनर्जन्म आणि कर्मसिद्धान्त या संकल्पनांची वीण कमी-अधिक प्रमाणात मजबूत होती. नीती, अनीती, चांगले-वाईट, पाप-पुण्य या सगळ्या संकल्पना समजबांधणीकरता यांतूनच निर्माण होत होत्या. काही अभ्यासकांच्या मते रामायण, महाभारत आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथांत, प्रत्येक शतकामध्ये बदलणाऱ्या नवीन संदर्भांना सामावून घेण्याकरता बदल होत गेले. आपली पुराणे ही याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून घेता येईल. यांची संख्या वाढली एवढेच नाही तर त्यांतील कथाही वाढत गेल्या. यामधील काही कथा तर वास्तवापासून इतक्या विसंगत आहेत, की श्रद्धाळू माणसालाही त्यांवर विश्वास ठेवणे कठीण वाटू लागले. तरीही हे वाङ्मय अतिशय महत्त्वाचे आहे, कारण ते

गेल्या २-३ हजार वर्षांच्या समाजाच्या चालीरिती, विश्वास आणि त्यांतील बदल यांचे प्रतिबिंब आहे. म्हणूनच पुराणातील प्रत्येक गोष्ट ही खरी नसली, तरी ते सर्व वाङ्मय भाकड आहे अशी समजूत करून घेणे हीसुद्धा मोठी घोडचूक होईल. या सर्व गोंधळ निर्माण करणाऱ्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरताच कदाचित, वेळोवेळी पुढे आचार्यांचीही निर्मिती झाली. या आचार्यांना प्रस्थानत्रयी म्हणजे ब्रह्मसूत्र, उपनिषदे आणि भगवद्गीतेवर आपले विचार मांडून समाजाला मार्गदर्शन करावे लागत होते. अर्थातच त्यांच्या लिखाणामध्येही बदलत्या वास्तवामुळे बदल होत होता. आपले सर्व आचार्य आठव्या ते पंधराव्या शतकांमधील आहेत. हळूहळू मूळ जीवनशैलीमध्ये असलेला लवचीकपणा कमी होत जाऊन आचार्य आणि त्यांचे लिखाण म्हणजे प्रेषित आणि त्यांचे ग्रंथ असे स्वरूप त्यांना प्राप्त झाले. या प्रत्येक आचार्यांचा एक पंथ होऊन, अनुयायांनी त्यांना बंदिस्त करून टाकले.

सातव्या/आठव्या शतकात आपल्या देशावर इस्लामी आक्रमणे चालू झाली ती अगदी सोळाव्या शतकातील ईस्ट इंडिया कंपनीपर्यंत अव्याहतपणे चालू होती. साहजिकच हा संस्कृतींमधील संघर्ष, मूळ संस्कृतींमध्ये आलेली बेदिली, यामुळे एकंदरीतच मूळ प्रवाहामध्ये बदल होण्याऐवजी त्याला विकृत स्वरूप यायला लागले. परकीयांशी झगडणे, हा 'अस्तित्वा'चा मूळ मुद्दा ठरला; तो अगदी १९४७ च्या स्वातंत्र्यापर्यंत. भाषा, ग्रहगणित, वैद्यक, स्थापत्य, राज्यशास्त्र, व्यापार, विधी, सर्व कला आणि साहित्य यांमध्ये प्रचंड सर्जनशीलता दाखविणारा हा समाज, आक्रमकांच्या जीवनशैलीचे 'अनुकरण' अपरिहार्यपणे करू लागला. या आधीही इजिप्त आणि युरोपमध्येही असेच घडल्याचे आपल्याला दिसते. युरोपमधील प्रबोधनाच्या उत्तरकाळात त्यांनी आपल्या विकासाच्या सर्व मूळ संकल्पना ग्रीक संस्कृतीत शोधणे काय; किंवा पारतंत्र्यातील आणि आजच्या भारतीयांनी आपल्या वैदिक किंवा वैभवशाली इतिहासामध्ये अगदी आजच्या विज्ञानाच्या मूळ संकल्पना शोधणे काय, ह्या दोन्ही 'प्रतिक्रिया' सारख्याच आहेत. यामध्ये जेव्हा तारतम्य सुटते, तेव्हा अशा अभ्यासातील संशोधन संपते आणि ते एक हास्यास्पद स्वरूप घेते. पण म्हणून असा शोध घेणे म्हणजे ते संशोधन नाही, किंवा 'गुन्हा' आहे असा समज करून देणेही विज्ञानाच्या इतिहासाकरता मारकच ठरते.

आज भारताला स्वतंत्र होऊन ६७ वर्षे झाली. तंत्रज्ञानामुळे केव्हाही नव्हते एवढे जग एकमेकांच्या जवळ आले, एवढेच नाही तर ते परस्परावलंबीही झाले. जुन्या सर्व पुराणकथा आणि धर्मग्रंथ बाजूला सारून १९५० साली आपण आपली

एक नवीन घटना स्वीकारली. घटनेमध्येच समाजवाद, निधर्मीवाद हा आपण आपल्या सामाजिक आणि राजकीय संस्थांचा पाया बनविला. सरंजामशाही, घराणेशाही संपुष्टात येऊन लोकांनी लोकांसाठी चालविलेली आणि निवडलेली, संख्याबळावर आधारित लोकशाही आपण स्वीकारली. सर्वांना समान संधी मिळावी म्हणून जातिव्यवस्थेवर आपण कायद्याने बंदी आणली.

दुर्दैवाने साम्राज्यशाहीने केली नाही एवढी भयावह परिस्थिती स्वतंत्र भारतात आज आपण करून घेतली. जातिनिर्मूलनाऐवजी गेल्या पन्नास वर्षांत आपण जाती घट्ट करण्याचे कार्यक्रम राबविले. भारत हा जगातील असा एकमेव देश असेल की, त्यातील प्रत्येक जण आपण मागासलेले कसे आहोत हे आग्रहाने दाखविण्याचा प्रयत्न करताना दिसतो. जाट आणि मराठ्यांचे आरक्षण हा याचा परमोच्च बिंदू आहे. जाटांचे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविलेच आहे आणि मराठा आरक्षणाचेही तेच होण्याची शक्यता आहे. पण यातले नागडे सत्य म्हणजे सगळ्याच राजकीय पक्षांनी आपली सारासार विवेकबुद्धी गहाण ठेवून याचे केलेले समर्थन. एरवी प्रत्येक क्षणाला एकमेकांवर कुरघोडी करणारे राजकीय पक्ष, अशा मुद्द्यांच्या बाबतीत मात्र एक होताना दिसतात. प्रबोधनक्षमता तर दूरच राहिली, पण सत्तेकरता कुठल्याही थराला जाण्याची यांची मानसिकता, बुद्धी बधिर करणारी आहे. अर्थसंकल्प म्हणजे समाजातल्या घटकांना 'याचक' बनवून करायचा 'दानयज्ञ' असाच यांचा अर्थसंकल्पाबद्दलचा समज झालेला दिसतो. ग्रामीण-शहरी, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत अशा अनेक घटकांमध्ये समाजाला विभागून आम्हीच तुमचे तारणकर्ते आहोत हे दाखविण्याचा यांचा केविलवाणा प्रयत्नही आता सहनशीलतेपलीकडे गेला आहे.

गेल्या साठ वर्षांत लोकांनी पक्ष बदलून बघितले; पण पक्षांच्या 'राजकारणा'मध्ये मात्र त्यांना काहीच बदल दिसला नाही. समाजकारणाचे राजकारण, राजकारणात शिरलेली गुन्हेगारी आणि अनेक वेळा याचेही केलेले निर्लज्ज समर्थन; यामुळे सर्वसामान्य नागरिक हतबल झाला आहे. केंद्रापासून ते राज्य आणि गल्लीतील पक्षांमध्ये असलेली 'घराणेशाही' आणि त्या घराणेशहांच्या नवीन पिढीची वक्तव्ये, सरंजामशाही राहणीमान हे लोकशाहीत कुठे बसते हे त्या परमेश्वरालाच माहीत! गांधी, नेहरू, आंबेडकर, फुले, सावरकर, विवेकानंद ही सगळी मंडळी थोरच नाहीत; तर सगळ्याच भारतीयांना त्यांच्याबद्दल आदर आहे. आदर याचा अर्थ असा की, त्यांची शिकवण आपण थोडीफार तरी अंमलात आणण्याचा प्रयत्न

करणे, पण आजच्या राजकारण्यांनी त्यामध्ये ‘अर्थपूर्ण’ बदल करून जास्तीतजास्त भव्य आणि उंच पुतळे नि स्मारके बांधायला सुरुवात केली. गांधीजींचे सत्य, अहिंसेवरील प्रेम आणि वैयक्तिक जीवनामधील साधेपणा व नीतिमत्तेचा आग्रह यांबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. पण आजच्या गांधी अनुयायांच्या संपत्ती, वागणूक आणि राजकारणामधल्या कोलांट्या उड्या बघितल्या की, गांधीजींच्या पुतळ्यानेही अश्रू ढाळले तर आश्चर्य वाटायला नको.

सर्वांत भयावह परिस्थिती आहे ती आपल्या धार्मिक सणांची. गणपतिउत्सव असो, नवरात्र असो की दहीहंडी असो, त्यांचे आजचे ‘रस्त्यावरचे’ स्वरूप या सणांच्या पावित्र्यालाच नाही, तर मूळ उद्देशालाही हरताळ फासणारे आहे. त्यांच्या आगमनापासून विसर्जनापर्यंतच्या मिरवणुकांमधील हिडीस नाच आणि फेविकॉलपासून, मुन्नी बदनामसारखी त्यांमध्ये वाजवण्यात येणारी गाणी पाहून, हे सण देवांचे आहेत की दानवांचे असा प्रश्न पडला आहे! यांमध्ये नवीन नवीन सणांची भर पडते आहे. आता गुढीपाडवाही ढोल-ताशांनी त्यामध्ये सामील झाला आहे. या सगळ्या प्रकारांना सगळ्याच राजकीय पक्षांचा असलेला पाठिंबा आश्चर्यापेक्षा चीड आणणारा आहे. आजच्या आपल्या देवळांची भयानक परिस्थिती, गंगेपासून सर्वच पवित्र नद्यांचे आपण केलेले प्रदूषण आणि महाकुंभापासून अर्धकुंभामधील गोंधळ, अस्वच्छता आणि चेंगराचेंगरी, धर्ममार्तंडांच्या दिवाळखोरीशिवाय दुसरे काय दाखवतात?

‘हेच जर का या धर्माचे रक्षण करणारे असतील, तर हे परमेश्वरा, आम्हांला यांच्यापासून वाचव’ असे म्हणण्याची वेळ सर्व जनतेवर आज आली आहे.

✧✧✧

# योग-दिवस

{ जुलै २०१५ }

२१ जून २०१५ हा जागतिक 'योग-दिवस' म्हणून साजरा झाला. एखाद्या विषयाला विशेष महत्त्व देण्याकरता अशा प्रकारचे दिवस साजरे करण्याची प्रथा गेली काही वर्षे रूढ झाली आहे. दुर्दैवाने असे महत्त्वाचे विषय, तो दिवस संपला की संपतात. वास्तविक असे विषय ही कायमस्वरूपी अंमलात आणण्याची गोष्ट असते. योगाच्या बाबतीत म्हणाल तर, 'योग' हा नक्कीच कुतूहलापलीकडे जाऊन गांभीर्याने घेण्याचा विषय आहे. योग-साधना करणाऱ्या आणि योग शिकवणाऱ्या हजारो संस्था देशात आणि परदेशांत आज आहेत. ''योग'' दिवसामुळे यामध्ये काही फारसा फरक पडेल अशी शक्यता नाही. योग-दिवसानिमित्ताने भारतातील काही विद्वान आणि राजकारण्यांनी व्यक्त केलेली मते मात्र दुःखकारकच नाहीत तर हास्यास्पदसुद्धा आहेत.

पतंजलींनी लिहिलेला 'योगसूत्र' (सुमारे इ.स. पूर्व १०० ते इ.स.३००) हा योगशास्त्राचा प्रमाण ग्रंथ. योगासंबंधीचे प्रचंड सैद्धान्तिक ज्ञान केवळ १९६ सूत्रांमध्ये ग्रथित करण्यात आले आहे. गेल्या दोन हजार वर्षांत अनेक विद्वान आणि आचार्यांनी यावर काही शेकड्यांनी भाष्य आणि टीकाग्रंथही लिहिले आहेत. पतंजलींनी योगशास्त्र सूत्रबद्ध करण्याआधीही हा विषय कठोपनिषदासारख्या उपनिषदांमधून (सुमारे इ.स.पूर्व ५००-३०० ते इ.स.चे १ ले शतक) मांडण्यात आला होता. शिवाय या योगाचे तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष व्यवहारही भारताची दर्शनशास्त्रे, आयुर्वेदापासून ते कलांच्या शास्त्रांमध्येही मुक्तपणे वापरण्यात आला आहे. दुर्दैवाने भारतातच हे योगशास्त्र आज प्राणायाम आणि आसनांच्या पलीकडे जाताना दिसत नाही. योग-दिनाच्या दिवशी तर यावर अधिकच शिक्कामोर्तब

करण्यात आले. दुर्दैवाने सत्य, अहिंसा, मानवता आणि समाजवादासारखा राजकारण्यांना चघळण्याचा हा एक 'योग-वाद' बनू नये याची कटाक्षाने काळजी घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

१९ व्या, २० व्या शतकामध्ये भारतातल्या काही संत, महंत आणि स्वामींमुळे भारतीय संस्कृतीबद्दलचे कुतूहल पाश्चात्त्य जगतामध्ये वाढले. एरवी साधू किंवा विचारवंतांपर्यंत सीमित असलेला योग हा विषय नवशिक्षित, विशेषतः विज्ञानवाद्यांना आकर्षणाचा वाटू लागला. मॅक्स प्लँक (Maks Plank) आणि अल्बर्ट आइन्स्टाइन (Albert Einsten) यांच्या पुंज आणि सापेक्षतावादांनी विज्ञानातच नाही तर तत्त्वज्ञानातही एक प्रचंड क्रांती घडवली. ग्रीक तत्त्वज्ञानाव्यतिरिक्त हिंदू, बौद्ध, जैन तत्त्वज्ञानांकडेही त्यांचे लक्ष वेधले गेले. एवढेच नाही तर विज्ञानाच्या नवीन सिद्धान्तांचे उपनिषदांमधील अनेक विचारांशी त्यांना साधर्म्य दिसू लागले. नील्स बोहर (Niels Bohr), श्रोडिंगर (Schrodinger) इ. अव्वल दर्जाच्या वैज्ञानिकांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार हे मुळातच वाचायला हवेत. शुद्ध तत्त्वज्ञानाच्या काही गोष्टी आपण बाजूला ठेवल्या; तरी योगामुळे प्राप्त होणाऱ्या अनेक सिद्धी, वैज्ञानिक कसोट्यांवर तपासण्याची सुरुवात यामुळेच झाली.

१९६० च्या दशकानंतर अमेरिकेत आणखी एक क्रांती होत होती. प्रचंड आर्थिक आणि भौतिक सुखांमध्ये डुंबल्यावरही अमेरिकेतील नवीन पिढीला खऱ्या सुखाची प्राप्ती होत नव्हती. यातूनच 'हिप्पी' आणि तत्सम अनेक संप्रदाय जन्माला आले. भोगापासून ते योगापर्यंतचे अनेक पर्याय त्यांनी शोधायला सुरुवात केली. मारक औषद्यांच्या सेवनातून स्वप्नांच्या दुनियेत ते तरंगायला लागले. पण औषधांचा अंमल उतरल्यावर स्वप्नातून त्यांना वास्तवातच यावे लागत होते. योगसाधनेच्या संदर्भात यामुळेच ज्या वेळी जास्त चिकित्सा व्हायला लागली, तेव्हा साहजिकच त्याच्या सर्व अंगांचा वस्तुनिष्ठ अभ्यास व्हायला लागला. योगसाधनेतून ज्या सिद्धी प्राप्त होतात तो एखादा 'चमत्कार' किंवा 'थोतांड' नसून ते वास्तव असल्याचे हळूहळू सिद्ध होऊ लागले. १९६२ मध्ये जो कामिया (Joe Kamiya) या जैवमानसशास्त्रज्ञाने अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने प्रथमच योगसिद्धींच्या वास्तवाबद्दल वैज्ञानिक अहवाल प्रसिद्ध केला. विज्ञानाला अशक्य वाटणाऱ्या, म्हणजे हृदयाचे स्पंदन किंवा श्वसनक्रियेचा वेग कमी-जास्त करणे, योगामुळे शक्य असल्याचे यातून सिद्ध झाले. रूढ (Classical) शरीरक्रियाशास्त्र आणि मस्तिष्कविज्ञानाच्या (Physiology Am{U Brain Science) समजुतींमध्ये यामुळे

मोठी क्रांती घडून यायला लागली. माणसाच्या शरीराच्या अनेक क्रिया या स्वैच्छिक (Voluntary) असतात. म्हणजे हात-पाय हलवणे, पापण्यांची हालचाल इ. क्रिया या आपल्या इच्छेच्या अधीन असतात. तर मेंदूच्या क्रिया, हृदय, यकृत, आतडी इ. ची स्पंदने या अनैच्छिक (Involuntary) आहेत. या क्रिया चालवणारी व्यवस्था ही स्वयंचलित असून, ती आपल्या इच्छेच्या अधीन नाही. शरीराची स्वैच्छिक कार्ये आपण जाणीवपूर्वक करत असतो, तर अनैच्छिक कार्ये आपल्याला न समजता होत असतात. डॉ. एल्मर ग्रीन (Elmer Green) या संशोधकांनी स्वामी राम या योग्यावर या संदर्भातले अनेक प्रयोग केले. योगसाधनेने अनेक अनैच्छिक (Involuntary) शारीरिक क्रिया या ऐच्छिक असल्यासारख्या करता येतात हे यामुळे साधार सिद्ध झाले. यात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे योगसाधनेमुळे सामान्यातल्या सामान्य माणसालाही या गोष्टी प्राप्त करून घेता येतात हेही सिद्ध झाले. ही एक मोठी क्रांतीच होती. आज या विषयावर अभ्यासकांकरता प्रचंड साहित्य उपलब्ध आहे. हा सर्व प्रकार योगाचाच एक भाग असलेल्या हठयोगाशी संबंधित आहे. पण योग म्हणजे फक्त हठयोग नाही.

योग हा शब्द ''युज्'' म्हणजे जोडणे या अर्थाने आहे. प्राथमिक स्तरावर मन आणि शरीर यांचे ऐक्य आधी साधले जाते. हठयोगामुळे मनाने शरीरावर मिळणाऱ्या प्रभुत्वापुरतेच पतंजलीचे योगशास्त्र मर्यादित नाही. यापुढे जाऊन शरीर, मन, निसर्ग आणि एकंदर परिसर यांच्यामधे एकत्व आणणे हेच योगाचे अंतिम उद्दिष्ट आहे. वास्तवामध्ये ते तसे असतेच, पण मनुष्य हा अज्ञानामुळे ते स्वतंत्र असल्याचे समजतो. योगशास्त्राच्या अभ्यासामुळे हे अज्ञान दूर होते आणि मन, शरीर नि परिसर यांचे परस्परावलंबित्व आपल्याला समजते. अनियंत्रित मानवी लालसेने निसर्गाच्या केलेल्या हानीमुळे बिघडलेले पर्यावरणाचे संतुलन हे याचे जिवंत उदाहरण आहे. योगशास्त्रामुळे या विश्वाच्या एकतेची जी प्रत्यक्ष जाणीव होते ती 'जाणीव' म्हणजेच 'कैवल्या'ची स्थिती. योगाचे अंतिम ध्येय हे हठयोगामुळे प्राप्त होणाऱ्या सिद्धी नसून, 'समाधी' किंवा 'कैवल्य' ही त्याची अंतिम पायरी आहे. एवढेच नाही तर, अशा सिद्धी या अंतिम ध्येयामध्ये अडथळे निर्माण करू शकतात अशी धोक्याची सूचनाही स्वतः पतंजलीने देऊन ठेवली आहे.

समाज हा अनेक व्यक्तींचा बनलेला असतो. समाजातल्या सर्व घटकांच्या क्षमताही वेगवेगळ्या असतात. समाजाच्या नैसर्गिक गरजा सुरक्षित आणि संतुलितपणे पार पाडाव्यात म्हणून अनेक सामाजिक संस्थांची निर्मिती करण्यात येते. नाती-

गोती, लग्न, वर्ण, आश्रम इ. अनेक संस्थांची निर्मिती हा त्याचाच एक भाग आहे. याशिवाय मानवी व्यवहारातूनही अनेक संस्था निर्माण होत असतात. ही सगळी जीवनपद्धती सुरळीत, कमीत कमी संघर्षमय आणि जास्तीत जास्त हितदायी व्हावी म्हणून अनेक नियमांचेही जाळे विणण्यात येते. यातूनच व्यक्तिगत आणि सामाजिक नीतिशास्त्राचा जन्म होतो. हिंदू पुरताच विचार करायचा तर या व्यापक परस्परावलंबी जीवनाला मार्गदर्शन करणारी 'यंत्रणा' म्हणजेच 'धर्म'. आपली दर्शने, योग, आयुर्वेदच काय; पण महाभारत, रामायणासारखे आपले इतिहासग्रंथही, व्यक्ती आणि समाजाला 'अधर्मा' पासून निवृत्त करून सदाचारी जीवन जगण्याचाच कायम आग्रह धरतात. भर्तृहरीची नीतिशतके असोत, रामदासांचे मनाचे श्लोक असोत किंवा दासबोध असो, तुकारामांचे अभंग असोत, एकनाथांची भारुडे असोत, किंवा मोरोपंतांच्या आर्या असोत; सगळ्यांचा हेतू एकच आहे, तो म्हणजे माणसाला नीतिमूल्यांचा आदर करायला शिकवणे. राग, लोभ, मत्सरापासून, मनाचा चंचलपणा हा नेहमीच 'सद्धर्माच्या'मध्ये येणारा एक मोठा अडथळा असतो. हा अडथळा दूर करण्याचा सर्वांत सोपा आणि साधा उपाय म्हणजेच आसनापलीकडील पतंजलीने सांगितलेले 'योगदर्शन'. सामान्य माणसाप्रमाणेच सामाजिक आणि राजकीय नेतृत्वालाही याची तेवढीच गरज असते. राजकारण्यांनी आणि स्वयंघोषित स्वामी नि गुरूंनी केलेली नीतिमूल्यांची आजची बोळवण बघता, यांना योगप्रचारापासून दूर ठेवणे हीच खरी योगसेवा ठरणार आहे. भविष्यातील योग-दिवस तरी, या 'राज' योगापासून मुक्त असतील एवढीच आशा आपण बाळगू शकतो.

✧✧✧

# उत्सवांची अरेरावी!

{ ऑक्टोबर २०१५ }

सण, उत्सव, खेळ हे जगातील सगळ्या समाज गटांचे अविभाज्य अंग आहेत. समाज जसा विकसित होत जातो, तसा विरंगुळा आणि करमणुकीपलीकडे कला, तत्त्वज्ञान, अध्यात्म यांचे पदरही त्यामध्ये समाविष्ट होतात. कालांतराने त्याला एका परंपरेचे स्वरूप येते. या सगळ्या सांस्कृतिक छटा, शेवटी व्यक्तीला किंवा समाजाला आनंद तर देत असतातच, पण त्यातून समाजाचे एक प्रबोधनही होत असते. यांची सुरुवात ही जशी एखाद्या महत्त्वाच्या घटनेमध्ये असते, तसेच निसर्गामध्ये होणाऱ्या बदलांची नोंद घेणारीही ती असते. रक्षा बंधन किंवा भाऊबीज जशी नाती दृढ करतात, तसेच नारळीपौर्णिमा, बैलपोळा यांचे प्रयोजन वेगळ्या सामाजिक घटनेमध्ये असते. हे सगळेच सण आणि उत्सव लेखक, कवी आणि कलाकारांच्या सृजनशक्तीचे स्रोत असतात. बदलत्या काळाप्रमाणे यांच्यामध्येही लवचिकता आणि बदल हे अपेक्षित असतात.

जनू ते सप्टेंबर महिन्यापर्यंत पंढरपूरची वारी, दहीहंडी, गणेशोत्सव, यावर्षी नाशिकचा कुंभमेळा हे महाराष्ट्राच्या संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचे उत्सव साजरे झाले. यांचे आजचे स्वरूप मात्र वर सांगितलेल्या प्रयोजनापासून मैलोगणती दूर गेलेले दिसते. या सणांच्या साजरीकरणामध्ये आलेल्या विकृतीचा शोध घेणे आवश्यकच नाही तर अपरिहार्य आहे.

१७ व्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी, तुकाराम आणि रामदासस्वामीं सारखे महान संत होऊन गेले. शिवाजी महाराजांना जुलमी यवनीशक्तींपासून समाजाची सुटका करून, हिंदवी स्वराज्य आणि 'सुराज्य' स्थापन

करायचे होते. तर याच समाजामध्ये आलेली मरगळ आणि कालबाह्य रूढीं पासून त्यांना मुक्त करून एक ‘नीतिमान’, ‘सशक्त’ आणि ‘सुसंस्कृत’ समाज घडवण्याचे कार्य रामदास स्वामी आणि तुकाराम महाराज करत होते. तुकाराम महाराजांच्या गाथा आणि रामदास स्वामींचे दासबोध आणि मनाचे श्लोक हे याचेच प्रतिबिंब आहे. समाज प्रबोधना करता त्यांचे ग्रंथ आजही तेवढेच मार्गदर्शक आहेत. कित्येक पुस्तके लिहून किंवा व्याख्याने देऊन जे स्पष्टपणे सांगता येणार नाहीत असे विचार त्यांनी अत्यंत सोप्या, साध्या शब्दांत मांडले आहेत. ‘बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले’ याला म्हणूनच सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला आहे.

‘विठ्ठल’ हे तुकाराम महाराजांचे दैवत होते, तर ‘श्रीराम प्रभू’ हे समर्थांचे स्फूर्तीस्थान होते. भक्ती हा त्यांच्या लिखाणाचा गाभा असला तरी समाज प्रबोधन हे त्याचे उद्दिष्ट होते. भक्तीमध्ये समर्पण असते ते अहंकार, हिंसक प्रवृत्ती, द्वेष, मत्सर, स्वार्थ आणि लोभाचे. हे झाले तरच सहिष्णु, विवेकी व्यक्ती आणि समाज निर्माण होऊ शकतो. भक्तीचा हा आत्मा हरवला, तर शिल्लक राहतो तो दांभिक उपचार. तुकाराम महाराजांच्या काळातही कुडमुडे ज्योतिषी आणि टिळा-माळा घालून वावरणारे संत होते. त्यांचा समाचार तुकाराम महाराजांनीच खालील पंक्तीत घेतला आहे.

**‘बरें जालें निघाले दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ।।**
**अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ।।**
**बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ।।**

विठ्ठल भक्ती आणि तुकाराम महाराजांच्या नावांनी होत असलेल्या आजच्या पंढरीच्या वाऱ्यांचा म्हणूनच पुनर्विचार करणे आज नक्कीच गरजेचे आहे. ‘दूर झाला विचार, राहिला फक्त उपचार’ असेच त्याचे वर्णन आता करावे लागेल. दृक माध्यमांनी त्यांची केलेली प्रसिद्धी, आणि त्यावेळी निवेदकांनी बहुतेक वेळा अज्ञानावर आधारित केलेली निवेदने, हास्यास्पद आणि तार्किक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरील होती. संस्कृती रक्षण तर सोडाच, पण नवीन पिढीकरता हे सगळेच निरर्थक वाटावे असे होते.

हाच प्रकार नाशिकच्या कुंभमेळ्याचा. प्रत्येक धर्माला एक ऐहिक बाजू असते तशी आध्यात्मिक बाजूही असते. हिंदुंच्या वर्णाश्रम व्यवस्थेमध्ये याचा पुरेपूर विचार सामान्य माणसाकरता केला आहे. सामान्य मनुष्य ऐहिक आणि पारमार्थिक

दोन्हीही पदरांनी जीवन जगण्यास उत्सुक असतो. साधू, ऐहिक जीवनाचा त्याग करून आपले सगळे आयुष्य 'चिंतन' आणि 'मनना'मध्ये व्यस्त करीत असतात. यामुळे मानवाच्या षड्रिपुंवरती साधुंचा ताबा आलेला असतो, अशी समाजाची धारणा असते. यामुळेच हिंदू समाजामध्ये साधुंबद्दल एक आदर असतो. तो त्या व्यक्तीपेक्षा त्यांनी केलेल्या त्याग-भावनेचा असतो.

कुंभमेळ्याला आलेल्या साधुंच्या बाबतीत त्याचा लवलेशही दिसत नव्हता. दृक् माध्यमांना साधुंनी दिलेल्या मुलाखती हा तर एक विनोदाचा भाग होता. निवेदकांचे प्रश्न आणि त्यांतून हिंदुधर्माबद्दल दिसणारे त्यांचे अज्ञान, हा आणखीन एक संशोधनाचा विषय आहे. आपण किती संस्कृती आणि धर्मनिष्ठ आहोत याचे नाशिकला राजकारण्यांनी केलेले प्रदर्शन हा तर दांभिकपणाचा कळस होता. सोन्यानी मठलेले साधू काय, किंवा त्यांच्या आखाड्यांमधली भांडणे काय, हा सगळाच प्रकार किळसवाणा होता. प्रत्येक धर्मप्रेमी माणसाला आपल्या धर्माची चाललेली ही 'विटंबना' बघून खरं म्हणजे राग यायला हवा.

कुंभमेळा ही 'संधीसाधुं'ची भाऊगर्दी होती. दिशाहिन, अर्थहीन अशा या गर्दीचं नियोजन करताना सर्वच व्यवस्थेंवर परकोटीचा ताण पडला. 'साधु'पणाचा लवलेशही नसलेल्या या गर्दीच्या अभ्यंगस्नानाकरता पाण्याचा केलेला वापर तर अक्षम्य आहे. 'साधू' या संकल्पनेची आज समाजाला नितांत आवश्यकता आहे. अनिर्बंध 'चंगळवादी' जीवनशैलीला नियंत्रणात आणण्याकरता तो एक आवश्यक 'उपचार' आहे. दुर्दैवानी नाशिकच्या कुंभमेळ्यात दिसले ते 'भोंदूबाबां'चे सरकारी खर्चाने झालेले आदरातिथ्य!

पंढरपूरची वारी किंवा नाशिकचा कुंभमेळा परवडला, यापेक्षा भयानक अधोगती दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरे करण्यामध्ये आपल्याला दिसते. या सणांच्या मूळ प्रयोजनाचा लवलेशही सध्याच्या या उत्सवामध्ये आपल्याला दिसत नाही. या दोन्हीही उत्सवांचा ताबा सध्या सर्व पक्षांच्या राजकारण्यांनी घेतला आहे. रस्त्यांवरील मंडपांपासून ते ध्वनीप्रदूषणापर्यंत सर्व नियम या राजकारण्यांनी धाब्यावर बसवल्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाला आहे. याचीच नोंद घेऊन न्यायालयाने या सणांच्या साजरीकरणावर काही बंधने घातली.

दहीहंडीमध्ये दरवर्षी उंच थरावरून पडून अनेक तरुण जखमी होतात, तर काहीजणांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. थरांच्या उंचीच्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये

लहान मुलांना सर्वात वरच्या थरावर चढवण्यात येते. यात सहभागी होणारी मंडळे, कलाकार किंवा आयोजक हे इतके संवेदनाशून्य आहेत की, आपण काही चूक करत आहोत हेही त्यांना मान्य नाही. हे सर्व उत्सव, सण चक्क रस्ते अडकवून, रहदारी आणि वाहतुकीचा खेळखंडोबा करून साजरे होत असतात. न्यायालयानी सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षितता आणि नागरिकांची गैरसोय टाळण्याकरता या सणांच्या साजरीकरणावरही काही बंधने घातली.

सध्या राजकारणामध्ये गुंडप्रवृत्तीच्या धटींगणांचा भरणा जास्त आहे. यामुळेच कोर्टाचे निर्बंध असूनही, या वर्षी या राजकीय लोकप्रतिनिधींनी कोर्टाचे निर्बंध धाब्यावर बसवून थरांची मर्यादा आणि ध्वनीप्रदूषणाचे सर्व नियम पायदळी तुडवून, रस्ते अडवून दहीहंडी साजरी केली. ज्यांनी कायदे करायचे आणि पाळायचे त्यांनी बेधडकपणे ते मोडले. गणेशोत्सवांच्या मंडपांच्या बाबतीतही हेच घडले. उत्सवांकरता वर्गणीही व्यापारी आणि नागरिकांकडून खंडणीसारखी वसूल केली जाते. गणपतीचे आगमन आणि विसर्जनाच्यावेळी मिरवणुकांमधून होणारी गाणी आणि हिडीस नाच हे तर 'उबग' आणणारे आहेत. गणपती हे 'विद्या' आणि 'कले'चे दैवत आहे. त्याच्या उपासनेतून अनेक साहित्यकृती आणि सर्जनशील नृत्ये, चित्रकलांची निर्मिती महाराष्ट्रात झाली आहे. इतकी निर्बुद्ध आणि अभिरुचीहीन नाच-गाणी त्याच्या उत्सव, आगमन किंवा विसर्जन मिरवणुकीत सादर करणे हा सांस्कृतिक गुन्हा आहे. सर्वात वाईट म्हणजे ही 'अरेरावी' आणि 'धटींगणशाही' धर्म आणि संस्कृती रक्षणाकरता चालू असते. महाराष्ट्रातल्या एकूणएक राजकीय पक्षांच्या झेंड्याखाली आणि आशीर्वादाने हे सराईतपणे चालू आहे.

धर्म, संस्कृती किंवा परंपरेची यापेक्षा मोठी विटंबना दुसरी कुठली असू शकते का?

हा सगळा 'कायदेभंग' पोलिस, पालिका आणि महापालिकेचे 'सक्षम' अधिकारी मख्खपणे पहात असतात. राजकारणी, गुंड, पोलिस आणि नोकरशहा यांच्यातील अभद्रयुतीचे यापेक्षा चांगले उदाहरण सापडणार नाही.

ही एक अतिशय गंभीर बाब आहे.

येणाऱ्या 'अराजकतेची' ही एक नांदी आहे.

लोकशाहीमध्ये सामान्य माणसाकरता न्यायालय ही एक 'अंतिम' पायरी असते. न्यायालयाची 'निष्प्रभता' ही गुंडप्रवृत्तींच्या राजकारणी आणि भ्रष्ट नोकरशहांना

एक वरदानच असते. 'सवंग' लोकप्रियता आणि मतांच्या राजकारणाकरता संस्कृतीरक्षणाखाली, पक्षीय नेतृत्व जेंव्हा अशा अरेरावी आणि धटिंगण प्रवृत्तींना पाठिंबा देते तेंव्हा सर्व विवेक आणि संकेतांचा भंग झालेला असतो. आपल्या दिलेल्या आश्वासनांची पूर्ती जेंव्हा होत नसते तेंव्हा समाजाला असल्या 'बाजारू' उत्सवांमध्ये 'गुंतवून' ठेवण्यात कदाचित राजकारण्यांची सोय होत असेल, पण धर्म आणि संस्कृतीचा त्यांच्याशी काडीचाही संबंध नसतो.

राजकारणातील सत्ताबदल हा समाजाकरता 'धटींगण', 'अरेरावी' असून राजकीय संस्कृतीचे नव्या कागदावरील पुनर्मुद्रण वाटावे अशीच आजची परिस्थिती आहे.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात मराठेशाही संपून ब्रिटिशांचे राज्य महाराष्ट्रातही चालू झाले. श्री. बी. आर. सुंठणकर यांनी १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासावरती पुस्तक (१९८८) लिहिताना त्याकाळचे जे वर्णन केले आहे ते म्हणूनच वाचण्यासारखे आहे.

''ब्रिटिशांनी महाराष्ट्र ताब्यात घेतला तेंव्हा परस्पर विघातक अशा लढायांनी देश जर्जर होऊन गेला होता. खेड्यापाड्यावर पेंढाऱ्यांच्या आणि लुटारूंच्या धाडी पडत. खानदेशासारखा सुपीक मुलूख दुष्काळ आणि लुटीमुळे ओसाड झाला होता. सुरक्षितता आणि शाश्वती नसल्याने शेतकरी खचून गेला होता. पेशवे जाऊन परके ब्रिटिश आले होते. ब्रिटिशांची सत्ता स्वीकारली गेली, पण त्यात फारसा उत्साह किंवा आशा नव्हती.''

आज परके ब्रिटिश नसले, तरी सामान्यांशी काडीचाही संबंध नसलेले राजकीय वाद, लढायांसारखे लढणारे स्वकीय राजकारणी आहेत. लुटारू नसले तरी उत्सवांकरता वर्गणी, खंडणीसारखी वसुली करणारे उत्सववीर आहेत. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या पोलिस आणि प्रशासकीय निष्क्रियतेमुळे साम्राज्यावाद बरा होता असे दुर्दैवाने म्हणण्याची पाळी आज आली आहे. परकीयांपेक्षा स्वकीयांशी लढणे जास्त क्लेशकारक असते.

खंडणी सदृश्य वर्गणी, रस्ते अडवून मंडप, अभिरुचीहीन नाच-गाण्यांचा धिंगाणा, आणि ध्वनी प्रदूषण या सर्व गुन्ह्यांची तीव्रता कमी करण्याकरता, अवर्षण ग्रस्तांना मदत, रक्तदान अशा सामाजिक कामांचे 'वेष्टन' या उत्सवांच्या समर्थनार्थ देण्यात येते. याहीपेक्षा भयानक म्हणजे गणरायाच्या मंडपाबाहेर दुतर्फा, ज्यांच्यावर खून, बलात्कार, अपहरण इ. गुन्हे दाखल आहेत अशा लोकप्रतिनिधींचे

फोटो लावलेले असतात. राजकारण्यांनी या उत्सवात केलेल्या घुसखोरीचे यापेक्षा चांगले उदाहरण सापडणार नाही. विद्या आणि कलांची देवता असलेल्या गणेशाची इतकी प्रचंड विटंबना दुसरी कोणतीही असू शकत नाही.

या उत्सवांच्या वेळी जी गर्दी जमते त्यामुळे 'जातपात' लोक विसरतात हा या उत्सवांच्या समर्थनार्थ केलेला दुसरा एक जावई शोध! दुसऱ्याच दिवशी त्यांची धावपळ चालू होते ती आपल्या 'जातीय' मागसलेपणाचा दाखला घेऊन, लहान शिशु किंवा महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी. धनगर, मराठा इत्यादींना आरक्षण मिळवण्याकरताही गर्दीचा यामुळेच तुटवडा नसतो. गर्दी हा 'जातपात' निर्मुलनाचा मार्ग असेल तर मुंबईच्या रेल्वेतील गर्दीने जातपातीचे केंव्हाच उच्चाटन केले आहे. असल्या बाजारू उत्सवांची त्याला गरज नाही.

'यथा प्रजा तथा राजा' अशी एक जुनी म्हण आहे. अविवेकी, असंस्कृत आणि संवेदनाशून्य समाजाचे नेतृत्वही तेवढेच असंस्कृत असते. दुर्जनांच्या जुलमापेक्षा सज्जनांची निष्क्रीयता अधिक धोकादायक असते. म्हणूनच आपल्या या सणांचे, उत्सवांचे विकृतीकरण आणि व्यावसायिकीकरण थांबवायचे असेल तर प्रत्येक सुजाण नागरिकाने आपल्या क्षमतेनुसार याला विरोध करायला हवा.

संस्कृती आणि धर्म रक्षणाकरता यासारखा दुसरा सनदशीर मार्ग नाही.

✧✧✧

# भारतीय राज्यघटना आणि बिचारा मनु

{ जानेवारी २०१६ }

दरवर्षी २६ नोव्हेंबर हा 'संविधान' (घटना, Constitution) दिवस म्हणून साजरा करण्याचे आदेश भारत सरकारने दिले आहेत. २०१५ हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष आहे. ११ ऑक्टोबर २०१५ ला मुंबई येथील इंदू मिलच्या जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणार्थ बांधण्यात येणाऱ्या संकुलाचा शिलान्यास करताना ही घोषणा आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केली. या आधी २६ नोव्हेंबर हा विधी दिवस (Law day) म्हणून साजरा करण्यात येत होता. पंतप्रधान मोदींनी याचवेळी (शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०१५) लोकसभेमध्ये निक्षून सांगितले की, "For the government, the only 'dharma' is India First, the only 'dharma granth' (holy book) is the constitution." (शुक्रवार, २७ नोव्हेंबर, द हिंदू). ७० मिनिटे दिलेल्या पंतप्रधानांच्या भाषणात या विषयावर बरेच काही सांगितले गेले.

भारताच्या घटनेसंदर्भात जे अनेक 'समज' आणि 'गैरसमज' आहेत त्यामध्ये या विधानामुळे भरच पडणार आहे. 'धर्म' आणि 'पंथ' या संकल्पनांची गफलत ही भारतीयांना तरी नवीन नाही. हिंदू धर्म सोडून बाकी सगळ्या पंथांना 'चौकटीत' बांधता येते किंवा त्यांची 'व्याख्या' करता येते. त्या सगळ्यांचा एक 'प्रेषित' असतो, आणि स्वतःचा असा एक 'पवित्र' ग्रंथ असतो. म्हणूनच त्या पंथांच्या अनुयायांना 'प्रेषित' आणि 'पवित्र' ग्रंथाच्या परिघामध्ये आपले सगळे व्यवहार करावे लागतात. सृष्टीच्या निर्मितीपासून, सर्व तत्त्वज्ञान आणि संकल्पनांना या परिघात बांधून ठेवावे लागते. ख्रिस्ती आणि इस्लाम पंथीयांमध्ये अनुक्रमे 'बायबल' आणि 'कुराण' यांना 'पवित्र' (holy) ग्रंथ म्हणून संबोधण्यात येते. 'पवित्र' म्हणून

जेव्हां एखाद्या ग्रंथाला संबोधण्यात येते तेव्हा हा संदर्भ लक्षात ठेवावा लागतो. 'हिंदू धर्म' हा एकच असा 'धर्म' आहे की, तो या चौकटीत बसू शकत नाही. त्याला त्याच्या देव संकल्पनेपासून, दैनंदिन जीवन शैलीपर्यंत कुठलेही 'आचार्य' किंवा 'पंथ' स्वीकारण्याची मुभा आहे. म्हणूनच घटनेलाही ''हिंदू कोण?'' याची व्याख्या नकारार्थी करावी लागते. उच्चतम न्यायालयालाही (बुधवार, १६ डिसेंबर २०१५) नुकत्याच दिलेल्या एका निकालामधेही हिंदू धर्माबद्दल सांगताना, -

"It is a religion that has no single founder, no single scripture and no single set of teachings. It has been described as Sanatan Dharma, namely, eternal faith, as it is the collective wisdom and inspiration of the centuries that Hinduism seeks to preach and propagate."

असे म्हणावे लागलेले आहे.

जगातले सगळे 'पवित्र' ग्रंथ आणि 'वास्तव' यामध्ये कालांतराने फार मोठी दरी निर्माण होते. हे पवित्र ग्रंथ प्रेषितांनी लिहिलेले असल्यामुळे त्यांच्यामध्ये कुठलाही 'बदल' करण्याचा 'अधिकार' हा त्यांच्या अनुयायांना नसतो. या भूमिकेमुळे अनुयायांना एकतर कट्टरपंथी व्हावे लागते किंवा पंथ सोडून जावे लागते.

'भारतीय घटने'च्या बाबतीत त्याचा 'शिल्पकार' किंवा 'प्रेषित' ठरवताना, किंवा त्याला रूढार्थाने 'पवित्र ग्रंथ' करण्याआधी, त्याच्या निर्मितीचा इतिहास बघणे हितकारक ठरेल.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. इ.स. १६०० च्या आधी बहुतेक उत्तर हिंदुस्थान हा मोगलांच्या आधिपत्याखाली आणि इ. स. १६०० नंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या वसाहतवादी राज्ययंत्रणेखाली आला. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर इंग्लंडच्या राणीचे राज्य भारतावर चालू झाले. इंग्लंडमध्ये राणीचे राज्य असले, तरी राज्यकारभार हा त्यांची लोकसभा आणि राज्यसभेच्या माध्यमातूनच चालत असे. तेव्हा आणि आजही इंग्लंडला लिखित राज्यघटना नाही. १८५८ पासून ते १९४६ पर्यंत अनेक टप्प्यांवर, स्वातंत्र्यलढ्याचा एक प्रभाव म्हणून भारतीयांना त्यांचे राज्य चालवण्याकरता अनेक अधिकार मिळू लागले. याकरता अनेक समित्या स्थापन झाल्या. भारतीय घटनेच्या निर्मितीमध्ये या इतिहासाचा फार मोठा वाटा आहे.

नोव्हेंबर १९४६ ला भारताच्या 'घटना सभे'ची (Constituent Assembly) निर्मिती झाली. त्याची पहिली सभा ९ डिसेंबर १९४६ ला झाली. डॉ. सच्चिदानंद

सिन्हा हे त्याचे त्यावेळचे प्रभारी अध्यक्ष होते. पुढे डॉ. राजेंद्र प्रसाद त्याचे अध्यक्ष झाले. एच. सी. मुखर्जी हे त्याचे उपाध्यक्ष होते. बी. एन. राव (B.N. Rau) यांची घटना सल्लागार म्हणून समितीवर नेमणूक झाली. समाजातल्या सगळ्या घटकांना प्रतिनिधित्व देण्याकरता सुमारे ३८९ सभासदांचा या घटना समितीमध्ये अंतर्भाव केला गेला. सुमारे ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ११ वेळा समितीच्या बैठका झाल्या. ही घटना बनवताना ६० देशांच्या घटनांचा विचार केला गेला. राष्ट्रभाषेपासून, न्यायदान, व्यक्ती स्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य ते अगदी आरक्षणाच्या मुद्यांपर्यंत सर्व सभासदांनी आपले विचार मांडले. पं. नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. आंबेडकर आणि कृष्णास्वामी अय्यर या सगळ्यांचा हा मसुदा बनवण्याकरता मोठा हातभार लागला. घटना सल्लागार श्रीयुत राव यांनी त्याचा एक संकलित मसुदा तयार करून फेब्रुवारी १९४८ साली तो घटना समितीला सादर केला. डॉ. आंबेडकर हे या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. सुमारे १ वर्ष या मसुद्यावर चर्चा झाली. आलेल्या सुमारे २००० सूचनांचा विचार केला गेला, आणि त्यातल्या काहींचा स्वीकारही झाला. डॉ. आंबेडकरांनी त्याचे सर्व संकलन करून तो मसुदा घटना-समिती पुढे मांडला, आणि २६ नोव्हेंबर १९४९ ला त्या मसुद्याचा समितीने 'भारताची घटना' म्हणून स्वीकार केला.

२४ जानेवारी १९५० ला घटना-समितीची शेवटची बैठक बोलावण्यात आली. एच. व्ही. आर. अय्यंगार यांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे नाव पहिले राष्ट्रपती म्हणून सुचवले, आणि त्यांची त्याकरता एकमतांनी निवड झाली. २६ जानेवारी १९५० ला हाच 'मसुदा' भारताची 'राज्यघटना' म्हणून अंमलात आला.

२४ जानेवारीच्या सभेमध्ये घटनासभेच्या सर्व सभासदांनी त्या हस्तलिखित मसुद्याखाली सह्या केल्या. अर्थातच पहिली सही जवाहरलाल नेहरू यांची होती. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सगळ्यात शेवटी सही करण्याचे नाकारले. शेवटी सर्वसंमतीने हस्तलिखित घटनेची शेवटची ओळ आणि नेहरूंची सही यामध्ये असलेल्या लहान जागेमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपली सही केली. अधिकार आणि श्रेष्ठत्वाच्या बाबतीत पंतप्रधानांच्या वरती राष्ट्रपती आहेत हेच बहुधा राजेंद्रप्रसाद यांनी यातून दाखवून दिले. ९०,००० शब्द असलेल्या घटनेची ही प्रत इंग्रजी आणि हिंदीमध्ये आहे. भारताच्या लोकसंख्येचा विचार करता, गरीब आणि वंचितांमध्ये ही भाषा जाणणारे संख्येने फारच अल्प होते. इंग्रजी शिक्षित समाजाच्या उच्च वर्गालाच इंग्रजी भाषा सोईची होती. हा झाला या घटना निर्मितीचा इतिहास. कुठलाही

'धर्म', 'पंथ' किंवा 'व्यक्ती' यांचा या मसुद्यामध्ये उल्लेख नाही. 'निधर्मी'पणा हे त्याचे वैशिष्ट म्हणून आग्रहाने सांगितले जाते. 'घटना समिती' ही या घटनेची 'शिल्पकार' आहे. कुठल्याही एका व्यक्तीने ती लिहिलेली नाही. या हस्तलिखित घटनेचे आणखीन एक वैशिट्य म्हणजे, हस्तलिखित घटनेच्या पानांवरती असलेले नक्षीकाम. त्यांची शैली ही अजंठा लेण्यांमधील भिंतीचित्रांशी जुळणारी आहे.

ही भारतीय घटना बहुतांशी पाश्चात्त्य देशांच्या घटनांच्या मसुद्यामधील चांगल्या गोष्टी एकत्रित करून बांधलेली 'गोधडी' आहे. वास्तविक वेद, उपनिषद, वेदांग, दर्शने, धर्मशास्त्र, स्मृती, रामायण, महाभारत, बौद्ध आणि जैन दर्शन या भारतीय संस्कृतीच्या मार्गदर्शक साहित्याचा यामध्ये अंतर्भाव नाही. पंचतंत्रापासून नीतिग्रंथांपर्यंत अनेक ग्रंथांनी 'भारतीय' मानसिकता आणि व्यक्तिमत्त्व बनवले आहे. स्थापत्यापासून ते नृत्यापर्यंतच्या सगळ्या भारतीय कलांवरती त्यांचा प्रभाव आहे. दुर्दैवाने घटना समितीला यातील 'शाश्वत' विचारांची त्यातील 'संदर्भ' देऊन नोंद घ्यावीशी वाटली नाही. 'स्वातंत्र्य', 'समता' आणि 'बंधुता' यांचे प्रतिबिंब, ३ ते ५ हजार वर्षांच्या या साहित्यामध्ये अनेक ठिकाणी दिसून येते. १७ व्या शतकानंतरच्या 'भारतशास्त्रा'(Indology)च्या अनेक अभ्यासकांनी यावर भरपूर लिखाण करून ठेवले आहे. ही कमतरता भरून यावी म्हणूनच की काय, शांती निकेतनचे प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मिळून सुमारे २२ लघुचित्रे (Miniatures) या हस्तलिखित घटनेचा भाग झाली आहेत. ही सर्व लघुचित्रे वर सांगितलेल्या भारतीय इतिहासावर आधारलेली आहेत. यामध्ये श्रीराम, लक्ष्मण, सीता, कृष्ण, अर्जुन, वैदिक काळ, बुद्ध, महावीर, गुप्त व मौर्य घराणी, नद्या, पर्वत ते अगदी अकबरापासून, राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस या सगळ्यांचा त्यामध्ये समावेश आहे.

भारतीय घटना ही जगातील सर्वांत मोठी राज्यघटना आहे. आपले न्यायदान आणि राज्यकारभार हा या घटनेच्या आधारावरच चालतो. भारत हे एक लोकशाही 'प्रजातंत्र' आहे. घटनेच्या निर्मितीनंतर नवीन कायदे करण्याचा अधिकार हा या प्रजेमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनाच आहे. पण भारताच्या नागरिकत्वापलीकडे, लोकप्रतिनिधी होण्याकरता कुठलीच पात्रता लागत नाही. निवडणुकीत संख्याबळावर लोक प्रतिनिधी निवडले जातात. दिल्लीपासून गल्लीपर्यंत निवडून आलेल्या आपल्या लोकप्रतिनिधींमध्ये ५०% च्या जवळपास सभासदांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. यामध्ये खून, बलात्कार आणि अपहरण अशा

गंभीर गुन्ह्यांचाही समावेश आहे. उच्च शिक्षणाची पात्रता असलेले फारच कमी प्रतिनिधी निवडून येतात. या सगळ्यांनी आपला एक विशिष्ट 'वर्ग' बनवला असून, सामान्य नागरिकाला लागू पडणारे अनेक नियम यांना लागू होत नाहीत.

'गरीब' आणि 'वंचितां'करता आरक्षणाचा कायम आग्रह धरणारे हे बहुसंख्य राजकीय लोकप्रतिनिधी मात्र 'कोट्यधीश' आणि 'लक्षाधीश' आहेत. जनता आज कितीही 'असुरक्षित' असली, तरी दिल्लीपासून, गल्लीपर्यंतचे हे लोकप्रतिनिधी मात्र, पुढे व मागे बंदूकधाऱ्या रक्षकांची फौज घेऊन फिरतांना दिसतात. 'जातीयवाद' म्हणजेच 'वर्ग'वादाला मूठमाती देणारी आपली 'निधर्मी', 'समाजवादी' घटना, या नवीन 'राजकीयवर्ग'वादाला संमती देते असाच याचा अर्थ आहे का? कारण हे सर्वच आपल्या 'पवित्र' घटनेचा आधार घेऊनच होत आहे. तुम्हाला-आम्हाला नाक्यावर टोल द्यावा लागतो. यांना मात्र त्यापासून मुक्ती आहे. ही सगळीच यंत्रणा भ्रष्टाचाराने किती बरबटलेली आहे हे आपण सगळेजण अनुभवत आहोतच. या घटनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य 'कायद्याचे राज्य', म्हणजे कायद्यापुढे सगळे समान हे आहे. 'नोकरशहा' किंवा 'सत्ताधाऱ्यां'पुढे घटनेनुसारच कायदा किती लवचिक होतो हा आपला रोजचा अनुभव आहे. चांगल्याची 'ठिगळं' लावत किंवा संहिता जाळून कुठलीच संहिता किंवा राज्यघटना 'पवित्र' होत नाही. 'अंतर्मुख' करायला लावणाऱ्या सगळ्याच 'संहिता' किंवा 'घटना' पवित्र होतात.

'धर्म', 'जात', 'लिंग' असा भेदभाव भारतीय नागरिकांमध्ये केला जाणार नाही अशी ग्वाही भारतीय घटना देते. पण याच घटनेचा आधार घेत ५०% भारतीयांना आरक्षण मिळते. १९५० नंतर चार-पाच पिढ्या हे आरक्षण मिळाल्यावरही त्यांच्या आजच्याही पिढ्या तेवढ्याच गरीब, मागासलेल्या आणि वंचित आहेत, हे समजून घेणे कठीण आहे. आतातर शालेय शिक्षणात २५% आरक्षण हे जातीवर आणि आर्थिक मागासलेपणावर दिले जाणार आहे. म्हणजे जन्मापासून जातीचा दाखला अनिवार्य आहे. जातीनिर्मूलनासाठी जातीयवाद भक्कम करणारा हा कार्यक्रम अजबच म्हणायला हवा. भारत हा जगातला एकच देश असेल की, जेथे आम्ही 'मागासलेले' आहोत हे सांगण्याची चढाओढ लागते. घटनेनुसार 'घराणेशाही'ला तर कुठेही स्थान असू शकत नाही. 'पवित्र' घटनेचा आधार घेतच, आज या देशामध्ये केंद्रापासून खेड्यापर्यंत, 'सत्तेची ऊब' ही घराणेशाहीलाच मिळत असल्याचे आपण उघड्या डोळ्याने पहात आहोत. जगातल्या सगळ्या चांगल्याची उसनवारी करून बांधलेल्या या घटनेमध्ये गेल्या ६५ वर्षांत शंभरहून अधिकवेळा बदल करावे

लागले. यातले अनेक बदल तर मूलभूत आहेत. 'गरीब' आणि 'वंचितां'ना न्याय देण्याकरता घटनेनुसार स्थापन झालेल्या न्यायालयातून सर्व व्यवहार मात्र इंग्रजीमधून चालतात. केवढा विरोधाभास हा !

'वास्तवाची' आपल्या घटनेपासून झालेली फारकत समजावून घेण्याकरता हा इतिहास माहीत असणे आवश्यक आहे. घटनसमितीच्या ३८९ सभासदांनी घटना बनवताना केलेली चर्चा ही ६ खंडांमध्ये आज उपलब्ध आहे. राजकीय 'सोय' म्हणून सुद्धा अशा राज्यघटनेला 'धर्मा'चे किंवा 'पवित्र' ग्रंथाचे स्थान देणे म्हणूनच धोकादायक आहे. घटनेमुळे नागरिक सुधारत नाही, तर 'प्रबुद्ध' नागरिकच संपन्न राष्ट्र निर्माण करू शकतो. त्याकरता गरज असते ती 'चारित्र्य' घडवण्याची. अशा समाजाची निर्मिती करणाऱ्या यंत्रणेलाच आपल्या परंपरेमध्ये 'धर्म' म्हटले आहे. त्याचा 'एक' शिल्पकार म्हणजे 'प्रेषित' किंवा 'पवित्र ग्रंथ' नसतो. अनेक वर्षांच्या अनुभवातून विकसित होत जाणारी ती 'प्रेरक' प्रक्रिया असते. म्हणूनच मनुनी सांगितलेली धर्माची १० लक्षणे आजच काय पण सदासर्वकाळ शाश्वत रहातील.

**धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ।।**

मनुस्मृती ६/९२.

याच मनुला आपण अग्नीच्या तोंडी दिला आहे. बिचारा मनु !

आज अस्तित्वात आहे तो 'वकिली' तर्कवाद आणि 'बुद्धीवादा'चा आधार घेत, गुन्हेगारांच्या पाठिशी उभा असलेला 'घटना' नावाचा 'पवित्र' ग्रंथ. सामान्य माणूस आणि हा 'पवित्र' ग्रंथ यामध्ये एवढी दरी आहे की, 'वकील' नावाची महागडी शिडी लावल्याशिवाय तो त्यापर्यंत पोहोचूच शकत नाही.

मनुने सांगितलेली धर्माची १० लक्षणे ही सुद्धा मुळात मनुची नाहीत. वेद, दर्शने, रामायण, महाभारत, बौद्ध आणि जैन पंथांमधूनही याच लक्षणांचा पुरस्कार केला आहे. म्हणूनच ती 'सनातन' आणि 'पवित्र' आहेत. त्यांच्या अंमलबजावणी करता कुठल्याही वकील किंवा दलालांची गरज नाही. या आणि अशा मूल्यांचा 'स्वीकार', 'प्रसार' आणि 'व्यवहार' करणारी प्रत्येक 'व्यक्ती' आणि 'ग्रंथ' हा भारतीयांना 'पवित्र' आहे. या अपौरुषेय मूल्यांमुळेच सदाचारी, विवेकी आणि सहिष्णू समाज निर्माण होते. समाजातल्या सगळ्या स्तरांना कळेल अशा सोप्या

भाषेत, दृष्टांतांचा आधार घेत, भारतातील सर्व संत आणि महंत याच मूल्यांचा प्रसार करताना दिसतात. म्हणूनच त्यांचे साहित्यही भारतीयांना ‘पवित्र’ आहे. राजाला किंवा रंकाला ती मूल्यें सारखीच लागू आहेत. मतांचे राजकारण किंवा कायद्याच्या सक्तीतून हे ‘पावित्र्य’ लादता येत नाही. भारतीयांच्या या धर्माला कोणी एक ‘प्रेषित’ नाही, किंवा एकच ‘पवित्र’ ग्रंथ का नाही, हे समजून घेणे म्हणूनच महत्त्वाचे आणि गरजेचे आहे.

✧✧✧

# बोले तैसा चाले त्याची...

{ एप्रिल २०१६ }

११ ते १३ मार्च २०१६ च्या कालावधीत आध्यात्मिक गुरू श्री. रविशंकर यांच्या संघटनेतर्फे अत्यंत भव्य, दिव्य आणि नेत्रदीपक असा सोहळा दिल्ली जवळील यमुनेच्या पात्रामध्ये उरकण्यात आला. अशा भव्य आणि दिव्य कार्यक्रमांचे नियोजन हे मोठे आव्हानच असते. यांच्या आर्थिक आणि व्यावहारिक नियोजनाकरता कित्येक महिने आणि वर्षांची गरज असते. यामुळे अशा कार्यक्रमांच्या संदर्भात आयत्यावेळी वाद निर्माण करणे किंवा तांत्रिक त्रुटी काढून कार्यक्रम रद्द करण्याची मागणी करणे, हे त्रासदायकच नाही तर अशी मागणी करणाऱ्यांच्या हेतूंबद्दलही शंका निर्माण करते. कुठल्याही सभ्य समाजामध्ये (civilized society) अशा कार्यक्रमांच्या नियोजनाकरता अनेक परवान्यांची गरज असते. व्यापक जनहीत लक्षात घेऊनच त्यांची रचना केलेली असते. म्हणूनच परवाना मागणाऱ्या आणि परवाना देणाऱ्या घटकांनी वेळेच्या बंधनाचा मान राखत, आणि कुठलीही संदिग्धता न ठेवता आपले विहित कर्तव्य पार पाडणे अपेक्षित असते. दुर्दैवानी या कार्यक्रमाच्या बाबतीत मात्र या संकेतांचे कसोशीने पालन झाले असे दिसत नाही.

अशा भव्यदिव्य कार्यक्रमामुळे एखाद्या संघटनेच्या आर्थिक आणि अनुयायी क्षमतेचे प्रभावी प्रदर्शन होत असले तरी ‘अध्यात्म’ किंवा ‘विश्वशांती’ करता यामुळे तसूभरही फायदा होतो असे दिसत नाही. अध्यात्मामध्ये तर ‘मी’ आणि ‘माझा परिसर’ यांचे एक अतुट नाते असते. मानवाच्या अनिर्बंध जीवनशैलीमुळे पर्यावरणाचे संतुलन आणि जैव वैविधता धोक्यात आली आहे या करता आता वेगळ्या पुराव्याची गरज नाही. यामध्ये संतुलन राखण्याकरता म्हणून मानवी

व्यवहारावर अनेक निर्बंधही सुचवण्यात आले आहेत. अध्यात्म, शांती किंवा इतर कुठल्या कारणाकरता या संकेतांचा भंग होणे स्वागतार्ह नाही.

शुक्रवार १८ मार्च २०१६ च्या 'Times of India' मध्ये एक प्रदीर्घ मुलाखत देऊन श्री. रविशंकर यांनी आपली बाजू मांडली आहे. आपण यमुनेच्या पात्रातील पर्यावरणाची कुठलीही हानी केली नसून, राष्ट्रीय हरीत आयोगानेही आम्ही कुठल्याही कायद्याचा भंग केला नाही असे सांगितले आहे. हरीत आयोगाचा मुख्य आक्षेप हा आमच्या भव्य व्यासपीठाला होता. आम्ही कुठल्याही कायद्याचा भंग केला नसल्यामुळे आम्हाला कुठलाही दंड मान्य नाही आणि आम्ही तो भरणार नाही, या आपल्या भूमिकेचाही त्यांनी या मुलाखतीत पुनरूच्चार केला.

लोकशाहीत कुठल्याही गोष्टींच्या बाबतीत वाद निर्माण झाला की योग्य निर्णयाकरता सर्वांनाच न्यायालयात जावे लागते. पर्यावरणाच्या संदर्भामध्ये अशा वादांमध्ये 'निर्णय' देण्याची पात्रता घटनेनीच स्थापन केलेल्या 'राष्ट्रीय हरित लवादाकडे' (NGT, National Green Tribunal) सुपूर्त करण्यात आली आहे. म्हणूनच हरित लवादाचा निर्णय हा महत्त्वाचा आहे. अर्थातच या निर्णयालाही उच्चतम न्यायालयात आव्हान देता येते, पण तोपर्यंत तरी लवादाचा निर्णय हा अंतिम असतो. वकिली तर्क आणि शाब्दिक श्लेष हे अशावेळी संपलेले असतात. राष्ट्रीय हरित आयोगाचा निर्णय त्यांच्या संकेतस्थळावर तर उपलब्ध आहेच, पण The Indian Express या वृत्तपत्रानेही १० मार्च २०१६ ला तो प्रकाशित केला आहे. आपल्या निर्णयामध्ये लवादाने घ्यायच्या परवानग्या आणि यमुना नदीच्या पात्राच्या जैव वैविद्यतेबद्दल काय लिहिले आहे हे मुळातूनच वाचणे आवश्यक आहे.

(7) It is the consistent view of the Experts and is sufficiently evident from the documents placed on record that the flood plains have been drastically tampered with while destroying the natural flow of the river, reeds, grasses, natural vegetation on the river bed. It has further disturbed the aquatic life of the river and destoryed water bodies and wet lands on the flood plains, which were in existence as noticed in our judgment in the case of Majoj Misra vs UNion of India and Ors., OA No.6 of 2012 decided on 13th January, 2015. Furthermore, they have constructed ramps, roads, compaction of earth, pontoon bridges and other semi-permanent or temporary structures etc. even without the permission of the concerned authorities including Ministry of Water Resources. The permission granted by Government of NCT of Delhi is of no consequence as it is not the

competent authority for rights over the river and in any case, it was a permission for only flood situation as is evident from the bare reading of the permission. In fact, that is the stand of Government of NCT of Delhi itself before the Trubunal.

For the damage caused to the environment, ecology, biodiversity and aquatic life of the river, the Foundation should be held liable for its restoration in all respects. in that regard and in exercise of our powers under Sections 15 and 17 of the NGT Act, 2010 we impose an Environmental Compensation, initially of Rs. 5 crores.

एखाद्या पंथाच्या अनुयायांना 'गुरूवचन' हे अंतिम असू शकते, पण लोकशाहीमध्ये घटनेनी निर्माण केलेल्या 'व्यवस्थे'चा आदर हा प्रत्येकालाच करायला लागतो. याचे प्रमुख कारण म्हणजे आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याकरता तेथे तटस्थ व्यवस्था केलेली असते. लवादाचे निर्णय मान्य नसतील तर वरच्या व्यवस्थांकडे जाता येते, पण तोपर्यंत मात्र अशा निर्णयांचा आदर करायला लागतो. माध्यमांनी कदाचित 'दंड' हा शब्द वापरला असेल, पण आयोगाने compensetion हा शब्द जर का वापरला होता, तर त्याचा आदर करणे हे बंधनकारक होते. युक्तिवाद, तर्कवादाचा आधार घेत 'पळवाटा' शोधणे हे नक्कीच स्वागतार्ह नाही, निदान अध्यात्म्यामध्ये तरी. राजकीय दडपण, भव्यदिव्यता, संख्याबळ, कदाचित व्यावहारिक सत्यामध्ये 'भ्रम' निर्माण करू शकेल, पण 'विश्वशांती' किंवा 'अध्यात्म' यामध्ये यामुळे काडीचाही फरक पडत नाही.

भारताने सांख्य, योग, भक्ती, कर्म, राज, ज्ञान इ. दर्शनांचा आधार घेत २०व्या शतकाच्या उत्तरार्धात जगाला अनेक 'गुरू' दिले. या सगळ्यांचा प्रभाव प्रामुख्याने 'सुबत्ता' आणि 'चंगळवादा'चा प्रभाव असलेल्या अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांमध्येच अधिक दिसून आला. गेल्या ५० वर्षांत जागतिक शांतता तर सोडाच, पण सामाजिक किंवा वैयक्तिक नीतिमध्ये सुद्धा प्रचंड ऱ्हास झाल्याचे दिसून येते. 'जडवाद' किंवा 'चंगळवादाचा' लंबक केंद्रापासून जेंव्हा दूर जाऊ लागतो तेंव्हा व्यक्तीमधील अध्यात्माची 'भूक' वाढायला लागते असा निष्कर्ष या पार्श्र्वभूमीवर काढावा लागतो.

अध्यात्म 'बहिरंगा'चा फोलपणा दाखवून 'अंतरंगा'चा शोध घ्यायला शिकवते. २१ व्या शतकातल्या गुरूंना आता अंतरंगाबरोबर बाह्यरंगाचाही 'अर्थ' समजला आहे. सकाळी उठल्यावर तुम्ही कुठले 'दंतमंजन' वापरता किंवा कार्यालयात जाताना कुठला 'मुख आलेप' लावता यावर तुमच्या अध्यात्म्याची उंची आणि

खोली मोजली जाण्याची वेळ आता दूर नाही. 'भव्य' आणि 'दिव्य' अध्यात्म्याबरोबरच आता योगांतील 'अर्थ' ही नवीन व्यापार-शाखा आता भारताने जगाला दिलेली दिसते.

महाराष्ट्रामध्ये संत विचारांना एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'चा महाराष्ट्राच्या 'ऐहिक' आणि 'आध्यात्मिक' जीवनावर मोठा प्रभाव आहे. अत्यंत साध्या आणि व्यावहारिक 'रूपकां'मधून समाजाचे प्रबोधन आणि जीवन जगण्याचा मोठा आशय ते आपल्याला देतात. म्हणूनच संत चोखामेळ्याचे खालील वचन त्या काळाएवढेच आजही तेवढेच लागू पडते.

**ऊस डोंगापरी । रस नोहे डोंगा।**
**काय भुललासी। वरलिया रंगा।**
**चोखा डोंगापरी। भाव नाही डोंगा।**
**काय भुललासी। वरलिया सोंगा।**

अध्यात्माची जेव्हा संस्थाने होतात, तेंव्हा अध्यात्म मूळ दार्शनिक विचारापासून खूप दूर गेलेले असते. भव्य दिव्य आणि प्रचंडतेच्या प्रदर्शनामुळे ही दरी भरून तर येत नाहीच, पण ती आणखीन रुंदावते. यातल्या अनेक गुरूंची 'आर्थिक' साम्राज्ये, आणि भ्रष्टाचारापासून बलात्कारापर्यंतचे त्यांच्यावरील आरोप मती गुंग करतात.

आपले गणपती, दहीहंडी आणि नवरात्र हे सण राजकारण्यांनी पळवले आहेत. ढोल-ताशे, ध्वनिप्रदूषण, वर्गणीच्या नावाखाली खंडणी वसुली आणि मिरवणुकीतील हिडीस नाच आणि गाणी यांनी या सणांच्या मागचा मूळ सांस्कृतिक हेतू आणि पावित्र्य केव्हांच नाहीसें करून टाकलें आहे. हे सर्व जेव्हा आपत्री संस्कृती जपण्याकरता चालू आहे असे सांगितले जाते, तेव्हां तर दांभिकतेने परिसीमा गाठलेली असते.

वास्तविक 'श्रद्धा' किंवा 'भक्ती' माणसाला अधिक अंतर्मुख करते. यातूनच तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करायला शिकतो. यातला डोळसपणा जेव्हा हरवतो तेंव्हा या श्रद्धेचा व्यापार व्हायला लागतो. मनुष्य श्रद्धाहीन असू शकत नाही, पण म्हणून श्रद्धांचा व्यापार होणेंही योग्य नाही. गुन्हेगारीचा राजकारणातील शिरकाव आणि प्रभाव जेवढा हानिकारक आहे, तेवढाच किंवा त्याहूनही अधिक धोकादायक राजकारणावरील 'गुरू' प्रभाव ठरण्याची शक्यता आहे.

वंदनीय कोण हे आपल्या संतांनी स्पष्टपणे सांगून ठेवले आहे.

''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले''

'योगगुरू' किंवा 'आध्यात्मिक' गुरूही याला अपवाद नाहीत.

✧✧✧

# वसाहतवाद, धर्मप्रसार आणि भारतीय संस्कृती

{ जुलै २०१६ }

इंग्लंडमध्ये युरोपियनसंघामध्ये राहायचे की बाहेर पडायचे या संदर्भात एक सार्वत्रिक कौल नुकताच घेण्यात आला(Referendum). इंग्लंडमध्ये जनता या संदर्भातील 'होय' आणि 'नाही' या गटामध्ये जवळ जवळ समसमान विभागली गेली होती. सर्व प्रमुख राजकीय पक्षही या दोन्हीही गटात विभागले गेले होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने हा 'राजकीय' कौल नाही तर, 'जनमत' कौल होता. अवघी २% मतं जास्त पडून ब्रिटिश नागरिकांनी युरोपियन संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य की अयोग्य हे पुढील काळच ठरवील. दुर्दैवाने ब्रिटिश लोकसभेच्या एका सभासदाची हत्या वगळता, हा सगळा प्रकार आणि चर्चा ही परिपक्व आणि लोकशाही मूल्यांचा आदर करणारी होती. विजयी आणि पराभूत नेत्यांनी या निर्णयावरती दिलेली मते ही अत्यंत संयमित आणि सभ्य समाजाला शोभतील अशीच होती. भारतामध्येही लोकशाहीच आहे. लोकशाही म्हणजे विचारस्वातंत्र्य असेही आपण मानतो. दुर्दैवाने, भारतामध्ये आज 'स्वातंत्र्य' नक्कीच आहे; पण ते विचारपूर्वक, रचनात्मक दृष्टीने विचार मांडण्यापेक्षा 'टिंगल', 'टवाळी', 'बेताल' वक्तव्ये, आणि हे कमी पडते म्हणून की काय 'गुद्यां'नीही व्यक्त करण्याकडे जास्त आहे!

इंग्लंडने जगाला लोकशाही दिली असा समज आहे. याच इंग्लंडचे साम्राज्य इतके मोठे होते की, त्यावर 'सूर्य कधी मावळत नाही' असे म्हटले जायचे. महाराष्ट्रापेक्षा, क्षेत्रफळ आणि लोकसंख्येने कमी असलेल्या इंग्लंडची लोकसंख्या, जागतिक लोकसंख्येच्या फक्त १% आहे, तर भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या १७% आहे. इंग्लंडची 'ईस्ट इंडिया' कंपनी आणि राणीने मिळून

जवळ जवळ ३५० वर्षं भारतावर राज्य केले. आदर्श लोकशाहीच्या या इंग्लंडमध्येच राणीचीही 'ओळख' आहे. राणीचे वाढदिवस साजरे होतात असेच नाही तर लोकप्रतिनिधींनाही राणी संबोधित करते. राणी असली तरी तिचे 'साम्राज्य' इंग्लंडवरती नाही. लोकशाहीने निवडून दिलेले लोकप्रतिनिधीच इंग्लंडचा राज्यकारभार चालवतात. राजघराण्याला 'सैद्धान्तिक' विरोध असणारे राजकीय पक्ष आणि त्यांचे प्रतिनिधीही लोकसभेत आणि लोकसभेबाहेर राणीच्या अस्तित्वाचा संयमित आदर करतात. एकाधिकारशाही आणि लोकशाहीमधला हा फरक आहे. लोकशाहीमध्ये 'विरोधही' सन्मानाने मान्य केला जातो, आणि तो 'सभ्य' समाजचौकटीमध्येच व्यक्त केला जातो.

भारत ही जगातली एक सर्वात मोठी लोकशाही. लोकशाहीत 'सत्ते'पेक्षा 'प्रतिनिधीत्व' अपेक्षित असते. दुर्दैवाने भारतीय लोकशाहीत संख्याबळावर निवडून आल्यावर, 'प्रतिनिधीत्व' संपते आणि 'सत्ता' सुरू होते. भारत गणराज्य (Republic) झाल्यावर 'घराणेशाही' म्हणजे 'राजेशाही' तत्त्वतः खालसा झाली. तरीही गेल्या ६० वर्षांत लोकशाहीच्या माध्यमातून एकाच पक्षात नाही, तर कमी अधिक प्रमाणात सर्वच राष्ट्रीय आणि प्रांतीय पक्षांमध्ये 'घराणेशाही' किंवा 'व्यक्तीकेंद्रित' राज्यकारभार चालू झाला. दुर्दैवाने 'सुबुद्ध' नागरिक बळापेक्षा, 'संख्याबळ' हाच तिचा आधार झाला.

१९४७ साली भारत भौगोलिकदृष्ट्या स्वतंत्र झाला. पण प्रशासन ते शिक्षणापर्यंत असलेल्या 'सांस्कृतिक' वसाहतवादापासून मात्र 'स्वातंत्र्य' तो आजही मिळवू शकलेला नाही. १५०० वर्षांहून अधिक काळ आक्रमकांशी लढण्यात गेल्यावर हा बदल एका रात्रीत घडेल अशी अपेक्षा कोणाचीच नाही. ज्या भारताने जगाला चांगली प्रमाण भाषा दिली (पाणिनी), राज्यशास्त्र दिले (कौटिल्य), तत्त्वज्ञान आणि वादविवादाची साधनं दिली (आस्तिक आणि नास्तिक दर्शने), त्या भारताला आजही आपली सांस्कृतिक 'ओळख' का शोधावी लागते, हा एक संशोधनाचाच विषय आहे.

'इंग्रज' आणि 'युरोपियन' धर्मप्रसारकांच्या कार्यपद्धतीमध्ये कदाचित याची उत्तरे मिळू शकतील.

८ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत, 'इस्लामी' आणि 'पोर्तुगीज' आक्रमकांचा भर हा 'युद्ध', 'बळजबरी' आणि 'जुलूम' यावरच होता. १६ व्या शतकाच्या पुढे मात्र, इंग्लंड आणि युरोपमधून जे 'धर्मप्रसारक' आले, विशेषतः

दक्षिण भारतामध्ये, त्यांची धर्मप्रचाराची कार्यपद्धती संपूर्णतः भिन्न होती. हाच काळ युरोपमध्ये 'प्रबोधनकाळ'(Renaissance) म्हणून ओळखला जातो. चर्च आणि ख्रिस्ती धर्माची उलट तपासणी याच वेळेस सुरू झाली. युरोपमध्ये प्रबोधनकाळ म्हणजे, त्यांच्या संस्कृतीचा जो मूळ 'स्रोत' ग्रीक संस्कृती, तिच्या तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक मूल्यांचा पुनःस्वीकार करणे. वसाहतवादानंतर भारतामध्ये 'प्रबोधन' काळ म्हणजे, आपल्या मूळ संस्कृतीच्या स्रोतांना टाकून देऊन, आधुनिकतेच्या नावाने संस्कृतीचे पाश्चातीकरण स्वीकारण्यात आले.

भारताप्रमाणेच हळूहळू अफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेवरही युरोपियन राष्ट्र आणि त्या पाठोपाठ ख्रिस्ती धर्मप्रसारकांचे आक्रमण चालू झाले. १६ व्या शतकाच्या सुरुवातीला मार्टीन ल्यूथर (Martin Luther, 1483-1546) यांनी रोमन चर्चच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारून अनेक सुधारणांचा आग्रह धरला आणि यातूनच ख्रिस्ती धर्मामध्ये 'प्रोटेस्टंट' पंथ उदयाला आला. भारतामध्ये, विशेषतः दक्षिण भारतामध्ये, 'प्रोटेस्टंट' आणि त्याच्या जवळच्या इतर शाखांचा प्रभाव जास्त असला, तरी पश्चिम आणि मध्य भारतामध्ये मात्र जेझुईट (Jesuit-Society of Jesus) पंथाचे धर्मप्रसारक मोठ्या प्रमाणावर कार्यरत होते.

अफ्रिका किंवा दक्षिण अमेरिकन देश आणि भारत यामध्ये एक फार मोठा 'सांस्कृतिक' फरक होता. भारत हा 'तत्त्वज्ञान' ते 'भाषे'पासून 'कला', 'स्थापत्य' इ. सर्वच क्षेत्रांमध्ये आपले 'वेगळे' सांस्कृतिक अस्तित्व राखून होता. आपल्या व्यतिरिक्त उर्वरित सगळे जग हे 'रानटी' आहे अशी ठाम समजूत असलेल्या धर्मप्रसारकांना हा फार मोठा धक्का होता. शुद्ध 'बळजबरी' किंवा 'प्रलोभनांनी' धर्मप्रसार करणे इथे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आले.

इथेच 'धर्मप्रसारा'च्या साधनांमध्ये 'मूलभूत' फरक झाला.

ज्या समाजामध्ये धर्मप्रसार करायचा, त्या समाजाची 'भाषा' आणि 'संस्कृती'च्या अभ्यासाचा उगम हा त्यातून झाला. प्रचंड 'चिकाटी', 'मेहनत', 'निरिक्षण शक्ती', आणि 'गुणग्राहकते'च्या आधारावर या धर्मप्रसारकांनी आपली भाषा आणि संस्कृतीचा जो अभ्यास केला त्याला जगात तोड नाही. या अभ्यासातूनच, 'तुलना' व त्यावर आधारित 'भेदनीती', आणि त्याची परिणिती म्हणजे 'ख्रिस्ती'धर्माचे आणि 'पाश्चात्त्य' विज्ञानाचे श्रेष्ठत्व, या क्रमाने हा संस्कृतीच्या वसाहतवादाचा प्रवास सुरू झाला.

ख्रिस्ती धर्मीयांकरता, 'विश्वरचने'पासून मानवी व्यवहारांच्या सर्व 'मार्गदर्शक

संस्थां'चा उगम म्हणजे 'बायबल'. हे बायबल प्रांतीय भाषांमध्ये भाषांतर करण्याकरता, त्या त्या प्रांतांच्या भाषांचा अभ्यास धर्मप्रसारकांनी सुरू केला. हा प्रयत्न नुसत्या 'रूपांतरांचा' नव्हता, तर बायबलमधील मूळ वचनांचा 'आशय' व्यक्त करू शकेल अशा भाषांतराचा होता. भाषांतर करताना बायबलच्या वचनांचा तसूभरही विपर्यास होणार नाही याकरता हा प्रयत्न होता. धर्मप्रसारकांच्या ते लक्षात आले की, भारतामध्ये प्रांतांमधून 'बोलीभाषा' अनेक असल्या, तरी 'बिनचूक' आशय व्यक्त करील अशा त्या प्रमाण भाषा मात्र नव्हत्या. साहजिकच ही बाब त्यांच्या लक्षात आल्यावर आणि 'भाषा' ही संस्कृती वहनाचे काम करते हे त्यांना माहीत असल्यामुळेच, भाषेच्या त्यांच्या अभ्यासाचा पाया 'व्यापक' व्हायला लागला.

१८०० साली कलकत्ता येथे 'फोर्ट विल्यम' हे कॉलेज ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय नोकरांना भाषा, आणि त्यामधून संस्कृती शिकवण्याकरता चालू झाले. प्रांतीय भाषांची 'आशय' व्यक्त करण्याची क्षमता सीमित असली, तरी दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या धर्मप्रसारकांना दुसरा मोठा धक्का बसला तो म्हणजे, एका अत्यंत विकसित प्रमाण भाषा, 'संस्कृत'च्या अस्तित्वाचा. त्याहीपेक्षा मोठा धक्का होता तो म्हणजे, दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या सर्व पंडितांना ही भाषा सहज अवगत होती. हळूहळू या भाषेमधील तत्त्वज्ञानापासून कलेपर्यंतच्या प्रचंड साहित्याचीही धर्मप्रसारकांना कल्पना येऊ लागली. त्यांच्या सहज लक्षात आले की, त्यांना जो आशय व्यक्त करायचा होता तो संस्कृतमधून सहजरित्या व्यक्त करणे शक्य आहे.

सर विल्यम जोन्स यांनी १७८५ ला कलकत्त्यालाच 'एशियाटीक सोसायटी'ची स्थापना केली. त्यांनी 'संस्कृत', 'ग्रीक' आणि 'लॅटीन' भाषांमधील 'साधर्म्य' जगाला दाखवून दिल्यामुळे, भाषाशास्त्राच्या अभ्यासालाच एक नवीन कलाटणी मिळाली. 'तौलनिक' आणि 'ऐतिहासिक' भाषाशास्त्र हे पुढे त्यातून विकसित झाले. त्यामुळे साहजिकच संस्कृत मधील साहित्याच्या अभ्यासाची तीव्र उत्सुकता संपूर्ण पाश्चात्त्य जगतामध्ये निर्माण झाली, आणि संस्कृतमधील सर्व ग्रंथांचा सखोल अभ्यास 'धर्मप्रसारक' आणि 'संशोधकां'नी चालू केला. १७९० ते १८१० या २० वर्षांच्या काळात ५ संस्कृत व्याकरणाची पुस्तके लिहिण्यात आली.

1. 1790 - Paulinus of St. Bartholomew
2. 1804 - William Carey
3. 1805 - H. T. Colebrook
4. 1808 - Charles Wilkins
5. 1810 - H. P. Forster

संस्कृतचा त्यांचा हा अभ्यास आजही सुरू आहे.

संस्कृतवर ताबा घेतल्यावर धर्मप्रसारकांनी प्रांतीय भाषांच्या अभ्यासाला सुरुवात केली. Henrique Henriques, Balthazar da Costa, Philippus Baldaeus, and Bartholomew Ziegenbalg या सर्वांनी पोर्तुगीज आणि लॅटीनमधून तमिळचे व्याकरण लिहिले. यातूनच त्यांनी तमिळ 'गद्य' आणि 'पद्य' साहित्याचा विकास करायला सुरुवात केली. प्रत्येक शब्दांच्या सांस्कृतिक छटांचा कुठेही विपर्यास होणार नाही याचा कसोशिने प्रयत्न केला. हे सर्व प्रयत्न बायबलचे तमिळमध्ये मूळ आशयासकट भाषांतर करण्याकरिताच होते. हे करत असतानाच तमिळ संस्कृतीच्या सर्व अंगांचा, तिथल्या 'शेती'पासून 'वैद्यक' आणि 'स्थापत्य'शास्त्राचा अभ्यासही त्यांनी सुरू केला.

इकडे बंगालमध्ये John Zephaniah Holwell (1711-1798), Alexander Dow (1739-1779), Nathaniel Brassey Halhed (1751-1830), Charls Wilkins (1749-1836), आणि William Jones (1746-1794) यांचा हिंदू धर्म आणि संस्कृत भाषेचा अभ्यास चालूच होता. William Carey (1761-1834) हा स्कॉटीश धर्मप्रसारक, कलकत्त्याच्या 'फोर्ट विल्यम' कॉलेजमध्ये 'संस्कृत', 'मराठी' आणि 'बंगाली'चा प्राध्यापक म्हणून रुजू झाला. १८०१ मध्ये त्यानी बंगाली भाषेचे व्याकरण लिहिले तर, १८०५ मध्ये त्यांनी मराठीचे व्याकरण लिहिले. कॅरे भारतीय विज्ञान आणि शेतीचाही अभ्यास करायला लागला. Roxburgh या साहेबानी वनस्पती शास्त्राचा अभ्यास करून Hortus Bengalensis हा ग्रंथ लिहिला. कॅरेची त्याला १२ पानांची अभ्यासू प्रस्तावना आहे. Roxburgh यांनी २ खंडांमध्ये Flora Indica हे भारतीय वनस्पतींवर पुस्तकही लिहिले आहे. १८३३ साली कॅरे 'ॲग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया'चे अध्यक्ष झाले. रामायणाचे भाषांतर करायलाही त्यांनी सुरुवात केली होती. अर्थात त्यांचा हा प्रकल्प पुरा होऊ शकला नाही.

हा भाषा आणि संस्कृतीचा एवढा व्यापक अभ्यास बिनचूक बायबलच्या भाषांतराकरता! १८३४ साली कॅरे यांचा मृत्यू झाला तेंव्हा बायबलची अनेक भाषांतरे आणि न्यू टेस्टामेंटची २३ भाषांतरे झाली होती.

कॅरे यांनी १८०५ मध्ये व्याकरण लिहून मराठी भाषेला प्रमाणभाषा करण्याचा जो प्रयत्न चालू केला तो महाराष्ट्रामध्ये इतर ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी त्याच उत्साहाने पुढे नेला. कँडी या साहेबांनी मराठीला 'विरामचिन्हे' दिली. मराठीचे प्रमाणीकरण

आणि त्याच्या व्याकरण शुद्धतेबद्दल तो आग्रही होता. अर्थातच हा सगळा प्रयत्न भारतीयांना ख्रिस्ती बनवण्याकरिता होता. त्यांना नुसतेच 'धर्मांतर' नको होते तर भारतीयांच्या आचार-विचारांचेही 'पाश्चात्ती'करण पाहिजे होते. ग्रेव्ह (Graves) हा अमेरिकन धर्मप्रसारक म्हणतो,

"The language of Marathas as well as the people themselves, must be Christanized."

मोल्सवर्थ (Molesworth) यानी मराठीतला पहिला शब्दकोश लिहिला. आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

"It was undertaken from a desire to promote the propagation of the glorious gospel and it has been continued by the energy of this desire."

बहुतेक सर्व धर्मप्रसारकच नाही, तर भारतीय भाषा आणि संस्कृतीचे तत्कालीन पाश्चात्त्य अभ्यासक आणि संशोधकांचे कमी-अधिक प्रमाणात हेच मत होते. यावर आज भरपूर संशोधन उपलब्ध आहे.

भाषा म्हणजे नुसती 'मुळाक्षरे' नसतात, तर ते एक सांस्कृतिक 'अनुभवाचे' संचित असते. भाषेच्या 'प्रमाणिकरणा'करता जसे व्याकरण लागते, तसे शब्दकोश आणि ज्ञानकोशही लागतात. दक्षिणेपासून ते उत्तरेपर्यंतच्या सर्व प्रमुख भाषांची व्याकरणेच नाहीत, तर शब्दकोश आणि ज्ञानकोशही प्रामुख्याने या धर्मप्रसारकांनीच केले आहेत.

'प्रगल्भ' भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृतीच्या प्रचंड 'वृक्षा'ची पाळेमुळे किंवा 'शक्तीस्थान' म्हणजे त्यांच्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' संस्था आहेत, हेही ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या लक्षात आले. यातूनच या संस्थांच्या मूळ वास्तवांचे 'विपर्यास' करणारी चिकित्सा त्यांनी चालू केली. काळानुरूप प्रत्येक समाजामध्ये बदल हा अपेक्षित असतो, पण 'सुधारणा' म्हणजे 'मोडतोड' नसते. भारतातील इंग्रजी शिक्षणाचा पाया आणि भूमिका ही याच मोडतोडीच्या मानसिकतेतून १८३५ ला जन्माला आली. या भूमिकेचा शिल्पकार टी. बी. मेकॉले (T. B. Macaulay, 1800-1859) याचे लिखाण याच्या समर्थनार्थ पुरेसे आहे. १८३५ सालचा विल्यम ॲडम (William Adam, 1796-1881) चा बंगाल आणि बिहार प्रांताचा, टी. बी. जार्विस (T. B. Jerris) १८२३/२४ सालचा महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटकचा आणि याच सुमाराचा मद्रास इलाख्याचा शैक्षणिक अहवाल, अभ्यासक्रम, शिक्षकांची संख्या, शुल्क इ. सगळ्याची माहिती देत, या प्रांतांच्या

प्रत्येक खेड्यात शाळा असल्याचे नोंदवतात. ही माहिती देणारे बहुतेक सर्व हे धर्मप्रसारक किंवा ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासकीय अधिकारीच होते. या सगळ्या अहवालांचे संशोधन करून श्री. धर्मपाल यांचे ''द ब्युटिफल ट्री'' (The Beautiful Tree) हे पुस्तक प्रकाशित होऊनही आज ३५ वर्षे होऊन गेली तरीही हजारो वर्षांच्या अन्यायाच्या भाकड कथा आजही स्वतंत्र भारताच्या 'आर्थिक' आणि 'शैक्षणिक' धोरणाचा पाया असतात, यासारखे दुसरे मोठे दुर्दैव कोणते? याचे श्रेय हे सांस्कृतिक वसाहतवादाचे जनक धर्मप्रसारकांना द्यायचे की प्रबोधनापेक्षा सवंग लोकप्रियतेच्या आहारी गेलेल्या आपल्या राजकीय मानसिकतेला? हे सांगता येणं अवघड आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केलेल्या या मोडतोडीची किंमत आजही आपण भोगत आहोत. इंग्लंडला १९३१ साली 'गोलमेज' परिषदेकरता गेले असताना महात्मा गांधींनी याचे अचूक वर्णन केले आहे.

"..... the British administrators, when they came to India, instead of taking hold of things as they began to root them out. They scratched the soil and began to look at the root... and left the root like that, and the beautiful tree perished."

ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या दोन-तीनशे वर्षांच्या अथक प्रयत्नांतून लोकसंख्येच्या तुलनेने धर्मांतर फार झालं असं म्हणता येणार नाही. पण सांस्कृतिक 'वसाहत'वाद प्रस्थापितच नाही तर 'घट्ट' करण्यात ते अपेक्षेबाहेर यशस्वी झाले.

इंग्रजांच्या भाषेबरोबरच त्यांची 'चिकाटी', 'शिस्त', 'संयम' आणि 'गुणग्राहकता'ही आपण घेतली असती, तर राणी असूनही घराणेशाही नसलेली इंग्लंड मधील लोकशाही भारतामधेही रुजली असती. आज 'पाश्चात्त्य' धर्मप्रसारक नसले, तरी 'भगवी' वस्त्रे घालून बेताल वक्तव्ये करणारे धर्ममार्तंड आणि 'शून्य अभ्यास' आणि शून्य 'संशोधना'ची पार्श्वभूमी असलेल्या 'स्वामी' आणि 'गुरूं'ची भारतात सध्या चंगळ आहे. संस्कृती आणि धर्मापुढे 'वसाहतवादा' पेक्षा ते मोठे आव्हान आहे. हे आपल्याला जेव्हां उमगेल आणि ''हे आमचे प्रतिनिधी नाहीत'' हे सांगण्याचे धाडस जेव्हां आपल्यात येईल तो सुदिन समजायचा !

✧✧✧

# आजच्या ‘उन्मादी’ उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ‘धर्म’ आणि ‘परंपरा’

{ ऑक्टोबर २०१६ }

‘धर्म ही अफूची गोळी आहे’ या मार्क्सच्या वचनाशी, त्यांच्या ‘अर्थ’ आणि ‘साम्यवादी’ सिद्धांताशी मतभेद असलेल्या विचारवंतांनाही सहमत व्हावे लागेल. वास्तविक ‘धर्म’ हा आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनामध्ये अधिकाधिक सुसंगती आणण्याचा प्रयत्न करत असतो. या करता शिक्षण, संस्कार इत्यादींच्या माध्यमातून सामाजिक जबाबदाऱ्या आणि सारासार विवेकबुद्धीची मशागत करण्यात येत असते. अगदी बाल्यावस्थेपासून वृद्धावस्थेपर्यंत आपण अनेक अनुभवांतून संक्रमीत होत असतो. अनुभवाला कुठल्याही पुराव्याची गरज नसते. खऱ्या सहिष्णुतेची सुरुवात या अनुभवांतूनच होते.

नैसर्गिकरित्या मनुष्य हा आत्मकेंद्रित आहे. पण त्याचे जगणे हे बहुकेंद्रित असल्यामुळे आपल्या परिसराचाही विचार त्याला करावा लागतो. या जाणिवेतूनच संस्कृतीची वीण बांधली जाते. आपला परिसर आणि निसर्गक्रमाचे नित्यत्व आणि त्याचे परस्परावलंबित्व याचीही जाणीव त्याला वाढत्या वयाबरोबर होत असते. ऊन, पाऊस, वारा हे केंव्हाही उग्रस्वरूप धारण करू शकतात हेही तो अनुभवांतूनच शिकत असतो. यामुळेच ‘दृष्टी’ आणि ‘तर्का’पलीकडे असलेल्या या घटकांपुढे नतमस्तक होण्यापलीकडे माणसाकडे दुसरा कोणताच पर्याय नसतो. या शक्तींची ‘स्तुती’ आणि ‘विनवणी’ यांचा उगमही या अगतिकतेतच झाला असणार. आपल्या प्राचीन साहित्यामध्ये याच्या खुणा जागोजागी आढळतात. या शक्तींची पुढे ‘दैवतं’ होतात. या दैवतांशी संवाद साधण्याच्या प्रक्रियेतूनच ‘सण’ आणि ‘उत्सवांचा’ जन्म होतो. म्हणूनच आपले सगळे शाश्वत सण हे निसर्गक्रमाशीच निगडित

आहेत. एवढेच काय, पण या उत्सवांमध्ये वापरायची फुलं असोत किंवा खायचा प्रसाद असो, हे त्या ऋतुप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनांशी किंवा उत्पादनांशीच निगडित आहेत. माणसाच्या कल्पकतेतून या प्रक्रियेमध्ये भर पडायला लागते आणि यातून अनेक स्तोत्रं, स्तवनं, आरत्या, कथा इ. साहित्याची निर्मिती होते.

व्यक्ती, कुटुंब, मित्रपरिवार, आणि त्याही पुढे जाऊन, व्यापक मानवी समुहांचा यामध्ये जेव्हा अंतर्भाव व्हायला लागतो तेव्हा त्याला सामाजिक उत्सवाचे रूप आलेले असते. आपला धर्म किंवा देशापुरता विचार केला तरी, हिमालयापासून केरळपर्यंत हजारो वर्षे साजरा होणाऱ्या सण आणि उत्सवांमध्ये ही सुसंगती दिसून येते. फरक असला तर तो भौगोलिक कारणांमुळेच असतो. यालाच आपण 'परंपरा' म्हणतो.

या परंपरेवर मग 'समजुती' आणि 'श्रद्धे'ची पुटं चढायला लागतात. यात अदृश्य व्हायला लागतो तो या सणांमागील, निसर्गक्रमाशी जुळवून घेण्याचा मूळ हेतू, अगदी मारुतीवरती शेंदुराची पुटे चढतात तसा. मारुती ही बलोपासनेची देवता. शेंदुराच्या पुटामध्ये ती झाकली गेल्यावर बलाची उपासना 'लुप्त' होऊन, त्यावर तेलाचा अभिषेक व्हायला लागतो.

गणपती ही 'विद्ये'ची आणि 'कले'ची देवता. आजच्या गणेश उत्सवांचं स्वरूप बघितल्यावर मात्र 'विकृती'लाही सीमा नसते हेच दिसून येते. या देवतांचे झालेले उत्सवी विकृतीकरण हे सामाजिक अधःपतनाचेच लक्षण आहे.

दहीहंडी असो, गणेशोत्सव असो किंवा दुर्गापूजा असो, त्याचे झालेले आजचे 'बकाली'करण म्हणूनच गांभीर्यानी घेणे गरजेचे आहे.

हिंदूंना त्यांच्या मूर्तीपुजेमुळे पाश्चात्त्य धर्मप्रसारकांनी बराच त्रास दिला. 'सगुण', 'निर्गुण' किंवा 'रूप', 'अरूप' या तत्त्वज्ञानाचा गंधही नसलेल्या या धर्मप्रसारक आणि धर्म अभ्यासकांना 'मूर्ती' उपासनेमागील मानसिक विज्ञान कळलेच नाही. पण ते पाश्चात्त्य होते. इस्लाममध्ये नसली तरी ख्रिश्चन पंथात काही प्रमाणात मूर्तीपूजा आहे. तरीही आपल्या संस्कृतीत विकसित झालेले 'शिल्पशास्त्र' आणि 'भक्ति'चे तत्त्वज्ञान हे अत्यंत प्रगत आणि नावीन्यपूर्ण आहे. म्हणूनच आजच्या राजकारण्यांनी गणपती किंवा दुर्गेच्या उत्सवात आणलेला 'उन्माद' आणि 'बाजारू'पणा बघून दुःख होते. 'संस्कृती' आणि 'परंपरेच्या' पाठीमागे उभे राहून

या विकृतीचे समर्थन करणाऱ्या या महाभागांच्या 'धर्म' संकल्पनेच्या संदर्भात असलेल्या अज्ञानाची कीव येतेच, पण त्याहीपेक्षा त्याची जास्त चीड येते.

घरच्या मूर्तीला 'देव्हाऱ्यात' बसवावे लागते, आणि सामाजिक मूर्तींना 'देवळात' बसवले जाते. मानवी कल्पकतेची साथ मिळाल्यावर यातूनच उगम होतो तो मंदिर वास्तुशास्त्राचा. आजची आपली मंदिरे, विशेषतः दक्षिणेकडील, ही बांधकाम विज्ञानाचा अद्भूत नमुना आहेत. जिथे समाज एकवटतो तिथे समाज प्रबोधनालाही सुरुवात होते. मूर्तीची पूजा गाभाऱ्यात होते, पण तिथपर्यंतचा प्रवास हा अनेक मंडपांतून होतो. या मंडपांचे खांब, त्याच्या पायापासून छतापर्यंत कलाकुसरींनी मढवलेले असतात. ही मंदिरं म्हणजे एक मोठी विद्यापीठंच होती. त्यांच्या बाह्य भागावरती रामायण, महाभारत, पंचतंत्र यांच्या कथा कोरलेल्या असत, तर नृत्याच्या अनेक मुद्रा या खांब आणि छत यांच्या कोपऱ्यांना कोरून ठेवलेल्या असत. प्रत्येक मूर्ती आणि त्याचे परिमाण हे इतके नेटके आणि व्यवस्थित आहेत की ते सौंदर्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना होऊन जातो. दक्षिणेकडील मंदिरांचे हे मंडप नाट्य, नृत्यापासून व्याकरण, तत्त्वज्ञानापर्यंतच्या ज्ञानाच्या आदान-प्रदानाची केंद्रे होती. 'भौतिक' आणि 'आध्यात्मिक' दोन्हीही मानवी गरजांची भूक या मंडपांतून भागवली जात होती. या मंदिरांतून सण आणि उत्सव साजरे होत असत. वाद्यांचे सूर हे निसर्ग आणि माणसांच्या लयींमध्ये मिसळून समाधान आणि आनंदाची निर्मिती करत होते. ती वाद्ये पूजा किंवा उत्सवांमध्ये 'उन्माद' आणि 'बळजबरी' आणत नव्हते. उत्सव हे ईश्वर चरणी लीन होण्याचे माध्यम होते, आार्थिक किंवा राजकीय फायदे घेण्याचे ते साधन नव्हते. नृत्य, नाट्य आणि संगीताच्या माध्यमातून समाजाची 'अभिरुची' विकसित करण्याचा तो प्रयत्न असे.

१२ व्या शतकातील भास्कराचार्यांच्या गणित ग्रंथांच्या अभ्यासाचे विद्यापीठ हे पाटण येथील पाटणादेवीच्या मंदिराच्या परिसरात होते, तर १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञानी ग्रहगणिताचे धडे हे माणगाव जवळील (नंदीग्राम) नांदगांवच्या मंदिरात घेतले.

ही मंदिरं इतर कुठल्याही देवतेची असली तरी गणपती हे 'विद्या' आणि 'कले'चे दैवत असल्यामुळे गणेशाला तिथं महत्त्वाचे स्थान आहे.

गुप्तकाळ हा आपल्या संस्कृतीच्या भरभराटीचा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. अभ्यासकांना गणपती उपासनेचे उल्लेख हे तेंव्हापासून मिळतात (५ वे

शतक). वराहमिहीराच्या बृहद्संहीतेमध्ये गणेशमूर्ती बनवण्याची माहिती मिळते. मुंबई जवळील घारापुरी, एलोरा आणि बदामी येथील गुंफांमध्येही गणपती कोरलेले आहेत. अफगाणिस्थानामध्ये काबुल जवळ दोन गणपतींच्या मूर्ती मिळाल्या आहेत. त्यातली एक मूर्ती ही उर्ध्वरेत या तांत्रिक मुद्रेत उभी आहे. भारतातही गणपतीची अशी मूर्ती बघायला मिळत नाही.

हिंदू संस्कृती बरोबर हिंदू मंदिरशास्त्रही दक्षिण पूर्व आशियामध्ये पोहोचले. ब्रह्मदेश, इंडोनेशिया, बाली, कंबोडिया, व्हिएतनाम या सगळ्या देशांमधील मंदिरांमध्ये गणेशाच्या मूर्ती आहेत. बौद्धधर्माच्या प्रसारामुळे जपान आणि चीनमध्येही आपल्याला गणपतीच्या मूर्ती मिळतात. बौद्ध, जैन, वैष्णव, शैव सगळ्यांच्या उपासनेमध्ये गणपतीला स्थान आहे ते विद्येची आणि कलेची देवता म्हणूनच.

ही परंपरा असलेल्या गणपतीची आज आपण काय दुर्दशा केली आहे?

विद्या आणि कलेच्या या देवतेची पूजा आपण शाळा महाविद्यालयांना ८ दिवस सुट्टी आणि आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकीतून बेसूर, कानठळ्या बसवणारे एकसूरी ढोल पथके बडवून, आणि द्वैअर्थी गाण्यांवर नाचून करतो. या बाजारूपणाचा आर्थिक फायदा कलाकारांनी घेतला नाही तर नवलच. हरीभक्त अवधूत गुप्ते, आणि किंचित भारी, पाळण्यातच राजकारणाचे बाळकडू मिळालेले रितेश देशमुख यांनी या बाजारूपणात, आवाजी आरत्या प्रस्तूत करून खांद्यापर्यंत हात धुऊन घेतले! आता नवनिर्माण महाराष्ट्रातील शाळेतील मुलांना गणपती उत्सवाच्या आरत्या विचारल्यावर, 'कोंबडी पळाली, वाजले की हो बारा, पोरी जरा जपून दांडा धर,' अशी उत्तरे मिळाली तर नवल वाटायला नको. शिक्षकही ताबडतोब मुलांना आठवण करून देतील, 'अरे, आवाज वाढव DJ तुला आईची..., झिंगझिंग झिंगाट विसरलात की!!!'

अर्थात परंपरेच्या नावाखाली आपल्या सणांना आलेल्या या बाजारूपणाची परंपरा ही मकरंद जोशी यांनी ११ सप्टेंबर २०१६ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये 'उत्सव आणि उन्माद' या लेखामध्ये १५० वर्षांपूर्वीच चालू झाल्याचे दाखवून दिले आहे. ते लिहितात –

''मग ठाण्यासारख्या एरव्ही सांस्कृतिक परंपरेची मिरास मिरवणाऱ्या शहरातही न्यायालयाला आव्हान देऊन दहीहंडीचे थर रचले जातात आणि सार्वजनिक वाहतुकीचा विचार न करता रस्ते अडवून गणपतीचे मांडव घातले जातात...

सन १७७४ मध्ये ठाणे शहर इंग्रजांच्या ताब्यात गेले. १८५३ मध्ये लोकांनी होळी पेटवण्यासाठी राजमार्गावर खड्डे खणून वाहतुकीला अडथळा करू नये, असा सरकारी हुकूम काढण्यात आला. या हुकूमात गैर काहीच नव्हते. लोकांनी खड्डे खोदू नयेत वा होळी साजरी करू नये, असा सरकारचा फतवा नव्हता. पण आमच्या चालीरीती आणि धार्मिक सण-समारंभ साजरे करायला सरकार आडकाठी करतोय म्हणून ठाण्यातील हिंदू व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली आणि बाजारपेठ बंद केली.''

आजच्या दहीहंडी आणि गणपती उत्सवाला आलेल्या 'बीभत्स' आणि 'व्यापारी'करणाला पायबंद घालण्याकरता मुंबई उच्च न्यायालय आणि दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली. सण, उत्सव साजरे करू नका असे त्यांनी कुठेही म्हटलेले नाही. तरीही आपल्या राजकारण्यांनी, 'न्यायालयांनी आमच्या उत्सवामध्ये हस्तक्षेप करू नये' अशी टीका करत, 'परंपरेने' उत्सव साजरा करा असा फतवा काढला!

कुठली ही 'परंपरा'?

रस्ते अडवून मंडप घालून, रहदारीला अडथळा करण्याची? दंडेलीनी वर्गणी वसुल करण्याची? गणपती मंडपांत ठेऊन मंडपाबाहेर, ज्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत अशांची पोस्टर्स लावण्याची? आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकीत अचकट-विचकट गाण्यांवर हिडीसपणे नाचण्याची? का ध्वनी-प्रदूषणाच्या सगळ्या नियमांना धाब्यावर बसवण्याची?

कुठला धर्म, कुठल्या संस्कृतीशी या परंपरेचा संबंध आहे?

दुर्दैवाने गेली काही दशकं तरी, 'धर्मा'ला 'वीर'पण आणण्याची ही परंपरा ठाण्याची आहे. याची सुरुवात ठाण्याच्या टेंबीनाक्यापासूनच झाली. सरकार आणि पोलिसांनी याकडे कानाडोळाच नाही, तर सर्व नागरी नियमांना धाब्यावर बसवणाऱ्या या उत्सवांना सोयीस्कर पाठिंबाही दिला. पोस्टर्स लावून वाढदिवस साजरे करण्याची कुप्रथाही इथेच चालू झाली. याच पाठशाळेत साधे नाही पण उच्च शिक्षण घेऊन मुंबईपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत आज या ''सांस्कृतिक परंपरेची'' पाठराखण चालू आहे. फारसे शालेय शिक्षण न घेता किंवा कुठल्याही CET च्या फंदात न पडता या नवनिर्मित महाराष्ट्रात बेरोजगारी वाढू नये म्हणून या पाठशाळेतून रोजगाराची सोय झाली.

यातूनच या सणांचे 'गुन्हेगारी'करण, 'बकाली'करण आणि 'राजकीय'करण चालू झाले. कलाकार आणि दूरदर्शनच्या वाहिन्यांना तर ही 'व्यवसाया'ची पर्वणी वाटते. अभ्यास नाही, संशोधन तर नाहीच, फक्त तरुणाई थिरकली, गणपतीबाप्पा मोरया यांची आवर्तने करत, गणपतीपेक्षा कलाकारांचीच जाहिरात करत यांचे कार्यक्रम चालू असतात. याला फारच थोडे अपवाद आहेत. सामान्य नागरिक आज या उत्सवांना विटला आहे.

'Eco-friendly' गणपती हा दुसरा 'परवलीचा' शब्द. या 'eco-friendly' गणपतीच्या सजावटीपासून मांडवापर्यंत थर्मोकोल आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंचा मुक्त वापर केलेला असतो. 'Plastor of Paris' पेक्षा किंवा काकणभर जास्तच या वस्तू पर्यावरणाची हानी करतात. दिवसभर ध्वनी-प्रदूषणांनी पर्यावरणाची हानी तर चालूच असते!

कुठली ही 'परंपरा' आणि कुठली ही 'संस्कृती'?

सण, उत्सव, मराठी 'भाषा', आणि 'अस्मिते'चा राजकीय धंदा करणाऱ्या या नेतृत्वांनी महाराष्ट्राला आज कुठे नेऊन ठेवलं आहे?

उद्योगधंद्यामध्ये महाराष्ट्र हा एकेकाळी देशामध्ये सगळ्यात पुढारलेला होता. जाचक कामगार कायद्यांपासून, बेसुमार स्थानिक करांच्या ओझ्यामुळे देशातील इतर राज्ये आज महाराष्ट्राच्या पुढे जायला लागली आहेत. विद्यापीठांना तर एवढी अवकळा आली आहे की; परीक्षा, प्रवेश, निकाल या सगळ्या बाबतीत आज दिवाळखोरी आहे. बलात्कार, अपघात, कैदेतून चोरांचे पलायन या बाबतीत महाराष्ट्र आज आघाडीवर आहे. आय. आय. टी. प्रवेशाच्या संदर्भात एकेकाळी महाराष्ट्र हा अग्रभागी होता. अ-विभाजित आंध्रप्रदेश धरला तर आज महाराष्ट्राचा क्रमांक चौथा आहे. परदेशातून महत्त्वाच्या विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवण्यामध्ये आंध्रप्रदेश, आणि तमिळनाडूनी महाराष्ट्राला केव्हाच मागे टाकले आहे.

मराठीच्या बाबतीत तर काय सांगावे ! मराठी वाहिनींच्या कार्यक्रमांच्या अनेक शीर्षकांपासून, मराठी नाटक, सिनेमांची शीर्षकेही इंग्रजीमध्येच! दुकानांच्या पाट्यांपासून मराठी अस्मितेचे राजकारण करणाऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेत!! मराठी ग्रंथालये, संग्रहालये, प्रगत विज्ञान-शिक्षणाकरता लागणारे पारिभाषिक शब्द-निर्मिती, सगळ्या क्षेत्रात आनंद आहे. ढोल-ताशे यांच्या पथकांमध्ये मात्र नेत्रदीपक, उत्साही वाढ आहे. धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आघाडीवरील

‘दिवाळखोर’ नेतृत्वाला म्हणूनच गरज लागते ती ‘भाषा’, ‘प्रांत’, ‘अस्मिता’ आणि ‘श्रद्धा’ यांच्या भांडवलाची.

भाषा असो, सण असो किंवा उत्सव असोत, हीच ‘उन्मादी’ आणि ‘राजकारण’ग्रस्त अशी आपली धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा राहाणार असेल; तर दुर्गा काय, गणपती काय, किंवा खुद्द भगवान श्रीकृष्णही आपल्याला वाचवू शकणार नाहीत.

आहोत का आपण गंभीर आपल्या ‘संस्कृती’ आणि ‘परंपरे’बद्दल?

विसर्जनाचा प्रत्येक दिवस हा सर्वसामान्य नागरिकांकरता ‘भय’ दिवस असतो. आपले उत्सव, परंपरा आणि धर्माच्या रक्षणाची जबाबदारी न्यायालय, सरकार आणि पोलिसांची नाही. ज्या संख्येने आपण या धांदलीत सामील होतो ते बघितल्यावर आत्मपरिक्षणाची आणि स्वेच्छा निर्बंधांची जबाबदारीही आपलीच आहे.

तुम्ही श्रीकृष्णाचे, दुर्गेचे आणि गणपतीचे खरे भक्त असाल, तर थांबवा या उत्सवांच्या व्यापारी आणि गुन्हेगारीकरणाला.

सरकार आणि पोलिसांच्या नाकर्तेपणाला जाब विचारा आणि ठरवा खोटं मार्क्सच्या वचनाला की, –

‘धर्म ही अफूची गोळी आहे.’

✧✧✧

# ‘विशेष ज्ञान’ ते ‘विज्ञान’

{ जानेवारी २०१७ }

‘धर्म’ आणि ‘विज्ञान’ हे एकमेकांना ‘पूरक’ की ‘मारक’ ही चर्चा आज अनेक शतकं चालू आहे. काहीजणांच्या मते तर हा आता वाद म्हणून सुद्धा राहिला नसून, विज्ञानाची केंव्हाच सरशी झाली आहे. नुकतीच ठाण्यामध्ये मराठी विज्ञान परिषद झाली आणि आय.आय.टी. पवईमध्ये प्रसिद्ध टेक-फेस्टिवलही झाले. या दोघांतूनही विज्ञानाचे जीवनाशी जोडले गेलेले अतूट नातेच नाही, तर विज्ञानच फक्त जीवनाला तारू शकेल, असाही सूर अनेकांनी लावला. शाळा-संमेलनांपासून ते राजकीय सभांपर्यंत सांगण्यासारखे फारसे जेंव्हा काही वक्त्यांकडे शिल्लक नसते, तेव्हा तो ‘विज्ञानवादी व्हा, विज्ञाननिष्ठ व्हा’, असे सल्ले देताना हमखास दिसतो.

अर्थातच ‘विज्ञान म्हणजे काय?’ याची व्याख्या मात्र कोणाला विचारली, तर सामान्य प्रामाणिक मनुष्य गोंधळलेला दिसतो, किंवा विज्ञान म्हणजे ‘विशेष ज्ञान’ अशी सोपी व्याख्याही तो देतो. ‘नेता’ किंवा ‘वक्ता’ मात्र यापुढे जाऊन तंत्रज्ञानातली दोन-चार उदाहरणे देऊन आपल्या विज्ञाननिष्ठा आणि विज्ञान भक्तीची प्रचिती देतो.

सर्वसाधारणपणे गणित, पदार्थ, रसायन, जैवशास्त्र म्हणजे विज्ञान अशीच सगळ्यांची दृढ कल्पना आहे. विद्यापीठांच्या विषयांमध्येही विज्ञानशाखेमध्ये यांचा किंवा यांच्यावर आधारित उपशाखांचा समावेश असतो. इतिहास, भाषा, नागरिक, अर्थ, भूगोल, राजकारण, समाजकारण इ. सगळ्या विषयांचा अभ्यास हा ‘‘मानव्य’’ विभागात करण्यात येतो. अर्थात या सगळ्या विषयांना शास्त्र हे पालुपद जोडलेलं

असतं. साहजिकच दहावी नंतर ज्या विद्यार्थ्यांना गणित फारसं जमत नाही, त्या विद्यार्थ्यांचा कल हा विज्ञानशाखेपेक्षा मानव्य शाखेकडे जाण्याचा असतो. 'विज्ञान' म्हणजे 'विशेष ज्ञान' म्हणजे 'विशेष बुद्धी' या संकल्पनेचा एवढा प्रभाव समाजावर आहे की, जवळ जवळ वरची श्रेणी मिळालेले ९०% विद्यार्थी विज्ञानाचाच पर्याय निवडतात.

विज्ञानाविषयी असल्या 'भाकड' आणि अ-वैज्ञानिक समजुतींमुळे, विज्ञान आणि मानव्य या दोन्ही शाखांचे आज प्रचंड नुकसान झाले आहे. भाषेचे यामुळे झालेले नुकसान तर अपरिमीत आहे. दुसऱ्या भाषा तर सोडाच, पण आपली मातृभाषा ही आज आपल्याला धड लिहिता किंवा बोलता येत नाही.

लोकसंख्येमध्ये भारत हा जगातला दोन नंबरचा देश आहे. चीन हा देश सोडला तर अभियांत्रिकी, वैद्यक आणि संगणक या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान प्राप्त केलेल्या भारतीयांची संख्या प्रचंड आहे. तरीही दुर्दैवानी आधुनिक विज्ञान आणि त्यावर आधारलेले तंत्रज्ञान यांच्या संशोधनामध्ये भारताचे योगदान नगण्य आहे. भारतातील शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणाचे सरकारीकरण म्हणजे केंद्रीकरण झालेले आहे. परीक्षा, शुल्क, सुट्ट्या, आरक्षण, सवलती यांच्या वेष्टनांमध्ये शिक्षण केंव्हाच लुप्त झाले आहे. महाराष्ट्र हे अतिप्रगत राज्य असल्यामुळे महाविद्यालयांमधून आता निवडणुकांचाही समावेश करण्यात आला आहे. परीक्षांची सर्वच रचना ही स्मरणशक्तीशी निगडित केली आहे. स्मरणशक्ती ही महत्त्वाची आहेच, पण या परीक्षांच्या पद्धतीमध्ये 'कल्पकता' आणि 'सृजनशीलतेला' काडीचाही वाव नाही.

उठता-बसता विज्ञानाचे एवढे गोडवे गाऊनही, स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षांमध्ये भारतीय वंशाच्या आणि भारतात काम केलेल्या श्री. सत्यार्थी यांनाच फक्त नोबेल पारितोषिक मिळाले आहे. तेही सेवा आणि समाजशास्त्रामधील कामाकरता. मदर टेरेसा यांनाही नोबेल पारितोषिक मिळाले असले, तरी त्या वंशानी आणि ज्या धार्मिक प्रेरणेनी भारतात काम करत होत्या त्या पाश्चात्त्य आहेत. हवेतर त्यांची कर्मभूमी भारत होती असे म्हणता येईल. बाकी नोबेल पारितोषिक मिळालेल्या भारतीय वंशाच्या सर्व अभ्यासकांची कर्मभूमी ही अमेरिका आहे. साहजिकच विद्यापीठांचा दर्जा असो किंवा दर्जेदार शोधनिबंध असोत, जगातल्या क्रमवारीमध्ये भारत कुठेतरी तळालाच रेंगाळताना दिसतो.

भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास बघितला तर भारतीयांच्या

विज्ञानाच्या योगदानाचे संपूर्ण वेगळे चित्र दिसते. कोपर्निकस, न्यूटन, आइनस्टाईन हे आजच्या विज्ञानाचे आधारस्तंभ तेव्हा अस्तित्वात नव्हतेच. पण तत्कालीन भारतीय समाज आणि संस्कृती ही पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त आणि वर्णाश्रम धर्मावरती आधारित होती. आजचे भारतीय विचारवंत, समाजशास्त्रज्ञ आणि राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने भारत हा प्रचंड मागासलेला देश होता. तरीही शून्य, अंक, वैद्यकशास्त्र, गणित, स्थापत्य, रसायन, खनिजशास्त्र, एवढेच नाही तर तत्त्वज्ञान, भाषा, संगीत, वाङ्मय, खगोल, ज्योतिष इ. अनेक क्षेत्रांमध्ये भारतीयांनी मूलभूत, ज्यांना शुद्ध 'भारतीय' म्हणता येईल, असे सिद्धान्त मांडून ठेवले आहेत.

कुठल्याही विज्ञानाचा विकास हा त्या समाजाच्या तत्त्वज्ञान आणि संस्कृतीच्या गाभ्याशी निगडित असतो. 'सृजना'चे मूळ हे त्या तत्त्वज्ञानांत आणि संस्कृतीत असते. त्या गाभ्याचे आकलन जेवढे स्पष्ट, तेवढे त्या संस्कृतीचे वाङ्मय आणि विज्ञान 'सजग' आणि 'उपयुक्त'.

सध्या 'योग' याला चांगले दिवस आले आहेत असे आपल्याला वाटते. वास्तविक योग हा एक भारतीय दर्शनाचा भाग आहे. आसन म्हणजे योग नाही. पण योग-दिवस साजरा होतो तो राजकारण्यांबरोबर केलेल्या आसनांनी. साहजिकच भारतीय विचारांचा गाभा असलेले 'योगदर्शन' हे यामध्ये लुप्त झालेले असते. हे फार मोठे दुर्दैव आहे.

भारतीय विज्ञान समजण्याकरता योगाचा इतिहास तपासणे म्हणूनच आवश्यक ठरते. आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर योगाची तपासणी अमेरिकेमध्ये जो कामिया (Joe Kamiya) ह्या जैवमानसशास्त्रज्ञाने (biopsychologist) चालू केली. १९६२ साली त्यांनी आपले निष्कर्ष एका शोधनिबंधातून प्रकाशित केले. त्याच सुमारास ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (AIIMS) मधील डॉक्टर आनंद, डॉ. छिना आणि डॉ. सिंघ यांनी एका योग्यावर केलेले प्रयोगही प्रकाशित केले. आधुनिक वैद्यक आणि शरीरक्रियाशास्त्रांच्या (physiology) समजुतीला तो एक फार मोठा धक्का होता. १७ व्या शतकामधील तत्त्वज्ञ-गणिती डेकार्ट (Descartes-1596-1650) यांनी आत्मा, मन (Spirit, Soul, Mind) आणि शरीर यांच्यामधील द्वैत मांडले. यामुळेच आत्मा सचेतन असून पदार्थ (matter, body) अचेतन आहे ही कल्पना रूढ झाली. न्यूटनपासून पुढच्या सगळ्या पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या विचार आणि संशोधनाचा, ''आत्मा आणि पदार्थामधील द्वैत'', हा गाभा आहे.

'योग' हा शब्द 'युज्' म्हणजे जोडणे, ऐक्य करणे यापासून झालेला आहे. योग-साधनेमुळे मन आणि शरीरामध्ये 'द्वैत' न राहता त्यामध्ये ऐक्य प्रस्थापित होते. योगाच्या कल्पनेप्रमाणे शरीर, मन, निसर्ग, आपला परिसर हे संयुक्तच आहेत. अज्ञानामुळे मनुष्य त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र मानतो. योग-साधनेमुळे त्याला स्वतःच्या अंतर्बाह्य आणि निसर्गावरती प्रभुत्व मिळवता येते. ही एक केवळ कवीकल्पना नसून, योग-साधनेमुळे या गोष्टी कुठल्याही माणसाला आत्मसात करता येतात; हेच जो कामिया आणि इतर अभ्यासकांनी, आधुनिक विज्ञानाच्या कसोट्यांवर सिद्ध करून दाखविले.

मनुष्य 'ऐच्छिक' आणि 'अनैच्छिक' अशा दोन्ही क्रिया करत असतो. उदा. पायानी चालणे, हातानी वस्तू उचलणे इ. क्रिया स्वैच्छिक आहेत (Voluntary). तर हृदयाचे स्पंदन, नाडीचे ठोके, रक्तवाहिन्यांचे कार्य, पचनक्रिया, ग्रंथींची कामे या सगळ्या क्रिया अनैच्छिक आहेत. त्या क्रिया स्वायत्त-तांत्रिका-तंत्राद्वारे (म्हणजे autonomic nervous system द्वारे) चालतात. त्या आपल्या इच्छेच्या आधीन नसतात. ही अनैच्छिक कार्ये आपल्याला न समजता अचेतन अवस्थेत घडत असतात.

डॉक्टर एल्मर ग्रीन (Elmer Green) यांनी स्वामी राम यांच्यावरती १९७० साली अनेक प्रयोग केले. आधुनिक वैद्यकशास्त्राला धक्का देणारे असे हे प्रयोग होते. माणसाच्या अनैच्छिक असणाऱ्या जवळ-जवळ सर्व क्रियांवर त्यांनी योग साधनेतून नियंत्रण मिळवल्याचे दाखवून दिले. हृदयाचे स्पंदन कमी-जास्त करणे आणि शरीरामधील अवयवांमधल्या तापमानात बदल करणे, याबरोबरच शरीराच्या रक्तप्रवाहावरही आपले ऐच्छिक नियंत्रणही त्यांनी दाखवून दिले. सामान्य माणसाच्या इलेक्ट्रोकार्डिओग्रॅम मध्ये R तरंग हा T तरंगापेक्षा उंच असतो. हृदयाच्या दोन वेगळ्या भागांची कार्ये हे तरंग दाखवतात. स्वामी राम यांनी T तरंग R तरंगापेक्षा मोठा करून दाखवला. पुढेही असे अनेक प्रयोग योग्यांवर करण्यात आले.

मन आणि शरीर यामध्ये असलेले 'अतुट' नाते हा सगळ्याच भारतीय तत्त्वज्ञान आणि तत्कालीन विज्ञानाचा गाभा होता. देकार्तच्या मन आणि शरीरामध्ये द्वैत मानणाऱ्या आधुनिक विज्ञान सिद्धान्ताला तो छेद होता.

योगशास्त्रावरील पहिला प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे 'योगसूत्र'. पतंजली यांनी हा ग्रंथ इ. स. पूर्व १०० मध्ये लिहिला असल्याचा अभ्यासकांचा तर्क आहे. या

नंतरही याविषयावरती अनेक ग्रंथ लिहिले गेले. हे ग्रंथ संस्कृतमध्ये असल्यामुळे त्याचा अभ्यास संस्कृत विभागात होतो. तो विज्ञान विभागात होणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

जे योगाचे तेच गणित आणि आयुर्वेदाचे. भारतीय गणित शास्त्राविषयी ७ व्या शतकातील सिरियन धर्मगुरू Severus Sebokiit याची टिपणी उल्लेखनीय आहे.

"I shall not now speak of the knowledge of the Hindus,... of their subtle discoveries in the science of astronomy-discoveries even more ingenious than those of the Greeks and Babylonians-of their rational system of mathematics, or of their method of calculation which no words can praise strongly enough-I mean the system using nine symbols. If these things were known by the people who think that they alone have mastered the sciences because they speak Greek they would perhaps be convinced, though a little late in the day, that other folk, not only Greeks, but men of a different tongue, know something as well as they."

भारतीयांची गणितातील कल्पकता आणि योगदान यावर आज मुबलक संशोधन अभ्यासकांना उपलब्ध आहे. S. D. Srinivas यांनी या विषयावर अत्यंत मौलिक संशोधन आणि लिखाण केले आहे.

आयुर्वेदाच्या सुश्रुत आणि चरकांचे ग्रंथ सर्वश्रुत आहेत. रविगुप्त यांनी इ. स. ६५०च्या सुमारास 'सिद्धसार' हा आयुर्वेदावरती एक महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे तिबेटियन, खोतानीज्, विगर, टर्कीश, अरेबिक अशा अनेक भाषांमध्ये पुढील काही शतकांमध्ये भाषांतरे झाली. याचा अभ्यास करून H. W. Bailey आणि R. E. Emmerick यांनी यावर अनेक शोधनिबंध लिहिले. अगदी अलीकडे म्हणजे २००७ साली Peter Zieme यांनी विगर भाषेत मिळालेल्या काही पानांचे भाषांतर इंग्रजीमध्ये करून ते छापले. ९ व्या, १० व्या शतकातील पर्शीयन अभ्यासक Rhazes यांनी २० खंडामध्ये Kitab-al-Hawi हा एक वैद्यक शास्त्रामधील ग्रंथ लिहिला. ग्रीक, सिरियन आणि तत्कालीन इस्लामिक वैद्यक माहिती प्रमाणेच त्यांनी रवीगुप्ताच्या सिद्धसाराचाही त्यामध्ये विपुल वापर केला. १३ व्या शतकामध्ये ज्यू वैद्यक Faraj Ben Salim यांनी Kitab-al-Hawi Mo Liber Continens या शीर्षकाखाली लॅटीनमध्ये भाषांतर केले. १६ व्या शतकापर्यंत या ग्रंथाच्या ५ आवृत्त्या निघाल्या. पुढे पाश्चात्त्य वैद्यक म्हणजे Allopathy च्या विकासामध्ये या ग्रंथाचा मोठा वाटा आहे.

‘पाश्चात्त्य’ आणि ‘भारतीय’ विज्ञानाचे काही मूलसिद्धांत हे परस्परविरोधी आहेत. विज्ञान आणि त्यावरील आधारित तंत्रज्ञानाच्या भयावह व्यापारीकरण समजण्याकरताही हा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. आज प्रचंड हव्यास आणि लालसेमधून ‘उपयुक्तते’चे वेष्टन चढवून पर्यावर्णाची आपण केलेली हानी समजण्याकरताही हा बदल समजणे महत्त्वाचे आहे. आपल्या गरजेकरता ‘तंत्रज्ञान’ किंवा ‘यंत्रां’ची निर्मिती चालू झाली असली, तरी आज यंत्राच्या सोईकरता आपण आपली ‘जीवनशैली’ बदलत आहोत. हा व्यवहार जेव्हा ‘मूल्यहीन’ आणि ‘अनियंत्रित’ होतो, तेव्हा त्याचे आपल्या स्वास्थ्यावर आणि एकंदरीतच समाज मूल्यांवर अनिष्ट परिणाम होतात.

हा इतिहास देण्याचे मुख्य कारण हेच की, विज्ञानाची व्याख्या फक्त १५ व्या शतकानंतर झालेल्या पाश्चात्त्य विज्ञानापुरती मर्यादित ठेवून करता येत नाही. ‘मन’ आणि ‘शरीरा’मधील ‘द्वैत’ हा देकार्तचा सिद्धान्त पाश्चात्त्य विज्ञानाचा ‘गाभा’ आहे; तर २००० वर्षांपूर्वी भारताच्या योगशास्त्राने सांगीतलेल्या ‘मन’ आणि ‘शरीरा’मधील ‘ऐक्य’ हा भारतीय विज्ञानाचा ‘आत्मा’ आहे. विज्ञान आणि संस्कृतीमधील हे अतूट नाते समजल्याशिवाय ‘विशेष ज्ञान’ आणि ‘विज्ञान’ यामधील फरक समजणे अशक्य आहे. हा फरक ज्यादिवशी उमगेल त्यादिवशी गणित, पदार्थ, रसायनाप्रमाणेच भाषा, तत्त्वज्ञान आणि इतिहासही ‘विज्ञान’ या शीर्षकाखाली शिकवले जातील.

‘सृजनता’ हा त्यावेळी शिक्षणाचा पाया होईल. विज्ञान ‘भाट’ आणि ‘वैज्ञानिक’ यातला फरकही लोकांना उमजेल आणि मग ‘विज्ञान’ आणि ‘धर्म’ यातले द्वैतही नाहीसे होईल.

भारतीय ‘विज्ञाना’चे म्हणजेच ‘धर्मा’चे हेच वैशिष्ट्य आहे.

✧✧✧

# गुढीपाडवा, पंचांग आणि ढोल

{ एप्रिल २०१७ }

महाराष्ट्रामध्ये नुकताच आपण गुढीपाडवा साजरा केला.

गुढीपाडवा म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा. हिंदू वर्षाचा तो पहिला दिवस. आपल्या कालगणनेप्रमाणे शालीवाहन शके १९३९ चालू झाले. हेमलंबीनाम संवत्सराची सुरुवातही या गुढीपाडव्यापासूनच झाली. गुढीपाडवा हा साडे-तीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त. सगळ्या चांगल्या नवीन कामाला सुरुवात आपण गुढीपाडव्याला करतो. गुढी हे एक त्या नावीन्याचं, मांगल्याचे प्रतीक म्हणून प्रत्येक घरामध्ये गुढी उभारून हा सण आपण साजरा करतो.

महाराष्ट्रात आपण नवीन वर्ष जरी चैत्रामध्ये सुरू करत असलो, तरी भारतामध्ये काही ठिकाणी नवीन वर्षाची सुरुवात कार्तिक किंवा आषाढ महिन्यापासूनही होते. आपल्या सगळ्या सणांचा कुठे ना कुठेतरी निसर्गाशी संबंध आहे. सर्वसाधारणपणे आपल्याला उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे हवामानातले बदल माहीत असतात. निसर्गामध्ये शेतीपासून वनस्पतींवरही या बदलाचे अनेक परिणाम होत असतात. हे कालचक्र काही हजारो वर्षं चालू आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्या साहित्यामध्येही पडलेले आपल्याला दिसते.

हिंदू वर्षाचे बारा महिने हे या निसर्गक्रमाने वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर अशा सहा ऋतूंमध्ये विभागले गेले आहेत. आहारापासून उत्सवापर्यंत पाळायच्या किंवा साजरा करायच्या पद्धतींची नाळ ही त्या ऋतूमधील निसर्गाच्या बदलाशी जोडलेली असते. साहजिकच हिंदूंचे वैद्यकशास्त्र म्हणजे आर्युवेद, यामध्येही या ऋतूंमुळे शरीरात होणारे बदल आणि त्याचा आपल्या आहाराशी

असलेला संबंध याचा सखोल विचार केला गेला आहे. एवढेच काय पण आपल्या शास्त्रीय संगीतामधले रागही दिवसाच्या ठरलेल्यावेळीच गायचे संकेत आहेत.

पावसाचा संबंध शेतीशी आहे हे वेगळं सांगायला नकोच. आपल्या आजच्या जीवनशैलीमुळे आपण निसर्गाचा समतोल बिघडवला. त्यामुळे तापमान आणि पावसावरही त्याचा परिणाम झाला हे आता सर्वमान्य आहे. पण याही पलीकडे निसर्ग, आणि पावसाचा असलेला संबंध नाकारता येत नाही. यामुळे पावसा प्रमाणे दुष्काळ का पडतो याचाही अभ्यास करावा लागतो. शेतकरी हा सध्या राजकारणाचा विषय असल्यामुळे अशा मूलभूत संशोधनाकडे साहजिकच आपले दुर्लक्ष आहे. १८९६ साली मोठा दुष्काळ पडला होता. या संदर्भात ग्रह आणि निसर्गचक्र याचा सूक्ष्म अभ्यास करून दामोदर भास्कर बापट यांनी ''पर्जन्यनूतन विचार'' हे अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले. आज ते दुर्मीळ आहे.

आकाशस्थ ग्रह-तारे, सूर्य-चंद्र यांचे भ्रमण, त्यांचे परस्परसंबंध या सगळ्याचा सारासार विचार करून व्यवहार्य जीवनाकरता कालमापनाची पद्धत पंचांग आपल्याला उपलब्ध करून देते.

जगातल्या सगळ्या प्राचीन संस्कृतींनी पंचांगं निर्माण केलेली आहेत. अर्थातच हिंदू संस्कृतीही त्याला अपवाद नाही.

पंचांग निर्मिती ही एक अत्यंत गुंतागुंतीची, चिकित्सक पद्धत आहे. तिथी, वार, नक्षत्र, योग आणि करण या पाच अंगांचा विचार पंचांगामध्ये केलेला असतो. दिवस आणि रात्र हे दिवसाचे भाग आपल्याला वेगळे सांगावे लागत नाहीत. पण ग्रह-नक्षत्रांची खगोलीय परिस्थिती मात्र अनेक निरिक्षणांनंतरच निश्चित करता येते. शिवाय त्यांचे स्वतः भोवतीचे आणि पृथ्वीचे सूर्याभोवतीचे भ्रमण यांचाही ताळमेळ पंचांग लिहिताना विचारात घ्यावा लागतो.

कालगणना आणि कालनिर्देश ही पंचांगाची प्रमुख कार्ये आहेत.

आपल्या दैनंदिन जीवनातल्या घटनांप्रमाणेच आपण साजरे करत असलेले सगळे सण आणि संस्कार यांची योग्य वेळ ठरवण्याकरता पंचांगाचा वापर केला जातो. वैदिक काळामध्ये दिवस, नक्षत्रे, ऋतू यांचा संबंध वेगवेगळ्या कृत्यांशी जोडलेला आढळतो. काही अभ्यासकांच्या म्हणण्याप्रमाणे यातूनच पंचांग निर्मिती झाली असावी. साहजिकच गेल्या ५००० वर्षांमध्ये या कालमापन पद्धतीमध्ये स्थित्यंतरं झालेली दिसतात.

पंचांगाचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे गणित शास्त्राची निर्मिती.

ज्योतिष म्हणजे प्रामुख्याने ग्रहगणित (Astronomy). फलज्योतिष (Astrology) हा त्याचा एक भाग आहे. १० व्या शतकातील श्रीपती, १२ व्या शतकातील भास्कराचार्य आणि १५ व्या शतकातील गणेश देवज्ञ ते १९ व्या शतकातील बापूदेव शास्त्री या मराठी गणितींचे या विषयाला मोठे योगदान आहे. ग्रहगणिताची त्यांची कोष्टके आणि ग्रंथ सबंध भारतभर पंचाग निर्मितीकरता वापरले गेले आणि आजही जात आहेत. दुर्दैवाने आपल्या गणिताच्या किंवा इतिहासाच्या पुस्तकांमधून यांची माहिती अभावानेच देण्यात येते.

वैदिककाळापासून आजपर्यंत अक्षरशः काही हजारोंनी ग्रंथ यावर लिहिले गेले आहेत. Theodor Aufrecht या जर्मन अभ्यासकाने १८९१ मध्ये संस्कृत ग्रंथांची एक मोठी सूची तयार केली. त्यावेळी त्यामध्ये सुमारे दोन हजार ज्योतिष ग्रंथ नोंदवले गेले आहेत. David Pingre यांनी पाच खंडांमध्ये Census of the Exact Sciences in Sanskrit याचे संकलन केले आणि हजारो भारतीय गणिती आणि त्यांनी लिहिलेल्या हस्तलिखितांची सूची तयार केली. १८९६ साली शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास हे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक लिहिले. ग्रहगणित, आणि पंचांगावरती अजूनपर्यंत इतकी चांगली माहिती देणारे पुस्तक निर्माण झालेले नाही. थिबो या एका संस्कृत संशोधकाला दीक्षितांच्या पुस्तकातली माहिती एवढी महत्त्वाची वाटली, की त्याकरता तो मराठी शिकू लागला. दीक्षितांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये पुण्याच्या आनंदाश्रमामध्ये पाचशे ज्योतिष ग्रंथ असल्याची माहिती त्यावेळी दिली आहे. दीक्षितांच्या पुस्तकाच्या हिंदी आणि इंग्रजीतील भाषांतरीत प्रती भारत सरकारने आता उपलब्ध करून दिल्या आहेत. आज सुमारे ७०,००,००० हून अधिक संस्कृत हस्तलिखितांची सूची उपलब्ध आहे! अर्थातच वर दिलेल्या सूचींमध्ये नसलेले हजारो ज्योतिष ग्रंथ यामुळे आज आपल्याला समजले आहेत. प्रतीक्षा आहे ती या ज्योतिष, गणित ग्रंथाच्या तौलनिक अभ्यासाची.

दुर्दैवाने खगोलीय ग्रहताऱ्यांचा प्रत्यक्ष वेध घेऊन पंचांगातील गणित मांडणे मध्ययुगीन काळामध्ये तुलनेने कमी होऊ लागले. भारतामध्ये यामुळेच ३० हून अधिक पंचांगे वापरात आली.

पंचांगात सुधारणा करण्याचा पहिला प्रयत्न शिवाजी महाराजांनी ३०० वर्षांपूर्वी

केला. कृष्ण नावाच्या एका ज्योतिषाला प्रत्यक्ष वेध घेऊन ज्योतिष ग्रंथ लिहायला सांगितला. ''करण कौस्तुभ'' नावाचा ग्रंथ याकरता त्यांनी लिहिला. इ.स. १८७६ मध्ये पंडित बापूदेव शास्त्री यांनी नवीन पंचांग लिहिले. १९/२० व्या शतकामध्ये छत्रे, लेले, मोडक आणि दीक्षित यांनीही सायन किंवा निरयन पद्धतीवर आधारित पंचांगांची निर्मिती केली. व्यंकटेश बापूजी केतकर यांनीही ''केतकी'' नावाचे एक पंचांग सुरू केले होते. १९०४ साली मुंबई येथे पहिले ज्योतिष संमेलन भरले होते. त्यामध्ये रैवत पक्षाच्या तत्त्वांचा पुरस्कार करून सर्व पंचांगांमध्ये एकवाक्यता आणावी हा विचार लोकमान्य टिळकांनी मांडला होता. अर्थातच लोकमान्य टिळकांनी लिहिलेले नवीन पंचांग आपल्या सर्वांना माहिती आहेच.

पंचांगांमध्ये एकसूत्रता आणण्याकरता भारत सरकारनी १९५२ मध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ मेघनाथ साहा यांच्या अध्यक्षतेखाली पंचांग सुधारणा समितीची नियुक्ती केली. या पंचांगामध्ये परंपरागत शक गणना आणि ग्रेगरीयन कालगणनेचा वापर करून नवीन पंचांग तयार केले. २२ मार्च १९५७ मध्ये (१ चैत्र शके १८७९) भारत सरकारने ते प्रत्यक्षात अंमलात आणले.

सखोल गणिताच्या अध्ययनाशिवाय कुठलेही पंचांग निर्माण करता येत नाही. शून्य असो, आकडे असोत, Trignometry किंवा Calculus असो, यांची निर्मिती भारतात का झाली, हे कळण्याकरता पंचाग म्हणजेच ज्योतिष किंवा ग्रहगणिताच्या विकासाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. आजची आधुनिक उपकरणे तर सोडाच, पण दुर्बीण सुद्धा या अभ्यासाकरता उपलब्ध नव्हती. याच पंचांगाचा उपयोग भारतीयांनी त्यांच्या नौकानयामध्येही केला. वास्तविक पाश्चात्त्य जगतामध्ये पंचांग (Calender) सुधारण्याची सुरुवात १६ व्या शतकात होण्याचे एक कारण, नौका नयनातील अडचणी हेही होते. यातूनच ग्रेगरियन (Gregorian) कालमापन पद्धतीला सुरुवात झाली.

ख्रिस्तपूर्व काळात पाश्चात्त्य देशांमध्ये रोमन पंचांग (Calender) चालू होते. साहजिकच पंचागातील कालमापन आणि वस्तुस्थिती यांचा मेळ बसत नव्हता. Jullius Caesar यांनी यामध्ये सुसुत्रता आणण्याकरता ख्रिस्तपूर्व ४५/४६ मध्ये रोमन पंचांगामध्ये सुधारणा केल्या. त्यानंतर या सुधारित पंचांगाला 'ज्युलियन' पंचांग असे संबोधिले जाऊ लागले. काही शतकानंतर पुन्हा पंचांगामधील दिवस आणि वस्तुस्थिती यामध्ये तफावत दिसू लागली. इ. स. ३२५ मध्ये Nicaea येथे ख्रिस्ती धर्म परिषद भरली होती. त्यावेळेस २१ मार्च हा वसंतसंपाताचा दिवस

ठरवण्यात आला. ईस्टर हा ख्रिस्ती धर्माचा सर्वात महत्त्वाचा सण. ख्रिस्ताचे पुनरुत्थान त्यावेळी झाले असे समजण्यात येते. म्हणूनच या सभेमध्ये असेही ठरवण्यात आले की, २१ मार्च नंतरची लगेच जी पौर्णिमा असेल, त्यानंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी, ईस्टर साजरा केला जाईल. हजार वर्षांनंतर पुन्हा एकदा सूर्य आणि इतर ग्रहताऱ्यांच्या आकाशस्थ परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास न केल्यामुळे तयार झालेली पंचांगं, आणि वस्तुस्थिती यामध्ये बरीच तफावत निर्माण व्हायला लागली.

१६ व्या शतकामध्ये पुन्हा एकदा ईस्टर सण साजरा करण्याकरता या तफावतींमुळे अडचणी येऊ लागल्या. या अडचणी दूर करण्याकरिता पोप ग्रेगरी (Gregory) XIII यानी पंचांग सुधारण्याकरता अभ्यासकांना पाचारण केले. २४ फेब्रुवारी १५८२ ला या सुधारणेवर व्हॅटिकनने शिक्कामोर्तब केले. पंचांग (Calender) वस्तुस्थिती दर्शक होण्याकरता त्यामधून १० दिवस काढून टाकण्यात आले. ४ ऑक्टोबर नंतर एकदम १५ ऑक्टोबर अशी पंचांगामध्ये सुधारणा करण्यात आली. या सुधारित पंचांगाला 'ग्रेगरिन' पंचाग असे संबोधण्यात येऊ लागले. आजतागायत हेच पंचांग सर्व जगात 'प्रमाण पंचांग' म्हणून वापरण्यात येते.

युरोपमधील बहुतेक सर्व कॅथोलिक देशांनी हे पंचांग वापरायला सुरुवात १६ व्या शतकातच केली असली तरी, इंग्लंड हा प्रोटेस्टंट देश असल्यामुळे इंग्लंडमध्ये त्याचा स्वीकार व्हायला इ.स. १७५२ साल उजाडायला लागले. अर्थातच यामुळे त्यावेळी वापरात असलेल्या ज्युलियन पंचांगातून ११ दिवस कमी करायला लागले. न्यूटनच्या या देशात शास्त्रावर आधारित या बदलाला काही प्रमाणात विरोध सहन करावा लागला याची नोंद घेणे म्हणूनच आवश्यक आहे.

वैज्ञानिकांमध्ये आजही या पंचांगामध्ये बदल करून ते अधिक सोपे करण्याचा आग्रह आहे आणि तसा प्रयत्नही चालू आहे.

सर्वत्र वापरात असलेले आजचे ग्रेगरीयन पंचांग प्रामुख्याने वार, महिना आणि वर्षापुरतेच मर्यादित आहे. हिंदू पंचांग अधिक व्यापक असून सूर्योदय ते सूर्यास्तापासून ग्रहांच्या स्थिती, ऋतू इ. अनेक व्यावहारिक आणि सांस्कृतिक गोष्टी त्यामध्ये दिलेल्या असतात. भारत हा एक खंडप्राय देश आहे. सांस्कृतिक आणि भाषिक विविधतेमुळे, अनेक वेळा प्रयत्न करूनही या पंचांगामध्ये एकवाक्यता येत नाही ही एक दुर्दैवी गोष्ट आहे.

भारतीय पंचांग अधिक वस्तुस्थितीदर्शक करण्याकरता भारतीय ज्योतिषांनी

वेध घेण्याकरता अनेक यंत्रांची निर्मिती केली. ५ व्या शतकापासून पंचांग तयार करण्याकरता सिद्धांत ग्रंथाचा प्रामुख्याने वापर करण्यात आला. या सगळ्या ग्रंथांचा सखोल अभ्यास करून जपानी अभ्यासक Yukio Ohashi यांनी १५९ पानांचा प्रबंध Astronomical Instruments in classical siddantas या शीर्षकाखाली Indian Journal of History of Science २१ (२) च्या १९९४ च्या अंकात प्रकाशित केला. यातली अनेक यंत्रे आज भारतात उपलब्ध नाहीत. अनेक महत्त्वाची यंत्रे पाश्चात्त्य संग्रहालयात बघायला मिळतात. जगातल्या अशा सगळ्या यंत्रांची सूची करण्याचे काम सध्या S. R. Sarma हे करत आहेत. हा अभ्यास हे भारताच्या विज्ञान इतिहासाचे फार मोठे साधन आहे. शर्मांच्याच शब्दात सांगायचे तर, –

"The value of scientific instruments as a source for the history of science and technology cannot be underestimated. In India, various kinds of astronomical and time-measuring instruments have been in use since time immemorial. Their construction and use are discussed in a numer of Sanskrit texts. While a few such texts have been published, the instruments themselves did not receive much scholarly attention."

या पार्श्वभूमीवर आज आपण ज्या पद्धतीने गुढीपाडवा साजरा करतो ती एक चिंतेची बाब आहे. आता तो गुढीपाडवा नसून 'ढोलबडवा' पाडवा आहे. ढोल वाजवण्याचा आणि गुढीपाडव्याच्या परंपरेचा काडीचाही संबंध नाही.

अस्मिता आणि तरुणांचा उत्साह, कर्तव्य आणि सृजनशीलतेचाही या बडवण्याशी काहीही संबंध नाही. या गोष्टींशी फारसा संबंध नसलेले राजकारणी आणि सर्व माध्यमांनी मात्र तसा आभास निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. परंपरेचा ढोल वाजवत आपला गुढीपाडवाही आता दहिहंडी, नवरात्र आणि गणेश उत्सवाच्या वाटेनीच वाटचाल करताना दिसत आहे.

हिंदू परंपरेचे आणि सणांचे यापेक्षा दुसरे कुठले मोठे दुर्दैव असणार?

✧✧✧

# होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।।

{ जुलै २०१७ }

**माझ्या जीवीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।**
**पांडुरंगी मन रंगले। गोविंदाचे गुणी वेधले।।**

कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी वरील शब्दात पंढरपूरच्या वारीचे महत्त्व विशद केले आहे. आषाढी व कार्तिकी अशा दोन वाऱ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. पेरणीची कामे आटोपून बळीराजा पंढरीच्या आसेने वारीला निघतो व मोठ्या श्रद्धेने मुखी 'ज्ञानोबा-तुकाराम' अशा जयघोषात पंढरपूरला पोचतो. लाखो भाविक अगदी शिस्तबद्ध पद्धतीने आपापल्या गावावरून दिंडी घेऊन वारीला निघतात. दूरचित्रवाहिन्या देखील या पालखी व दिंडीचे वार्तांकन करताना दिसतात. मात्र वारीच्या मागची आध्यात्मिक पार्श्वभूमी समजून घेताना कोणी दिसत नाही. हातात टाळ व वीणा घेऊन हजारो मैलांचे अंतर वारकरी कापतात ते विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने. यामागील तात्विक भाव समजून घेणे प्रसंगोपात्त ठरते.

'वारी' या शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती सांगता येतील. संस्कृत भाषेत 'वारि' म्हणजे पाणी. पाण्याचा प्रवाह जसा अनेक वळणं घेऊन समुद्राला मिळतो तसा वारकऱ्यांच्या भक्तिप्रेमाने भारलेला प्रवाह पंढरपुरी मिळतो. अमरकोषात 'वार' हा शब्द 'समुदाय' या अर्थाने वापरला आहे. यावरून भक्तांचा समुदाय असा 'वारी' शब्दाचा अर्थ काढता येतो. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत 'वारी' हा शब्द 'फेरा' किंवा 'खेप' या अर्थाने वापरला आहे. ही वारी कधी सुरू झाली याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मात्र ज्ञानेश्वर माउलींनी 'वारी' ची महती अधिक प्रमाणात वाढवली असे म्हणता येईल. मात्र पंढरपूर हे देवस्थान म्हणून खूप प्राचीनकाळापासून प्रतिष्ठित होते असे पद्मपुराण व स्कंद पुराणातील उल्लेखावरून दिसते. तेव्हापासून

लोक पंढरपूरला दर्शनासाठी येत होते. 'दर्शनास आलेल्या सर्वांची पापे नष्ट कर' असा वर भक्त पुंडलिकाने मागितला असा उल्लेख पद्मपुराणात आहे.

एकदा श्रीकृष्णावर रुसून रुक्मिणी दिंडीर वनात गेली. कृष्ण तिला शोधताना पुंडलिक जिथे आई-वडिलांची सेवा करत होता तिथे आले व पुंडलिकाने दिलेल्या विटेवर 'युगे अठ्ठावीस' उभे राहिले.

**'इति स्तुत्वा ततो देवं प्राह गद्‌गदया गिरा।**
**अनेनेव स्वरुपेण त्वया स्थेयं ममांतिके।।**
**ज्ञानविज्ञानहीनानां मूढानां पापिनामपि**
**दर्शनान्ते भवेन्मोक्षः प्रार्थयामि पुनः पुनः'** (स्कंदपुराण - ५८-५९)

अर्थात कृष्णाने विटेवर विठ्ठलाच्या रूपात उभे राहून सर्व भक्तांचा उद्धार करावा हा 'वर' पुंडलिकाने देवाला मागितला व तेव्हापासून ही 'वारी' चालू झाली. वारकरी पंथातील काही सांप्रदायिक भक्तांची अशीही एक धारणा आहे की, पहिली वारी महादेवांनी केली. इसवीसनाच्या आठव्या शतकात आदिशंकराचार्यांनी 'पांडुरंगाष्टक' नावाचे एक प्रासादिक स्तोत्र लिहिलं आहे -

**'महायोगपीठे तटे भीमरथ्यां**
**वरं पुंडरिकाय दातुं मुनिन्द्रै**
**समागत्य तिष्ठं तमानंद कंदं**
**परब्रह्म लिंगं भजे पांडुरंगम्।।**

याचा अर्थ असा की, संत ज्ञानेश्वरांच्या आधी पंढरपूर हे देवस्थान प्रसिद्ध होते. ज्ञानेश्वरांचे आजोबा सिधोपंत देखील पंढरीचे वारकरी होते. पुढे ज्ञानेश्वरांनी या वारीला एक विशाल स्वरूप प्राप्त करून दिले. सर्व जाती व पंथांच्या लोकांना भक्तिमार्ग कळावा म्हणून 'विठ्ठल' नामाचा गजर करत पंढरपूरला पायी जाण्याचा वारीरूपी प्रवाह ज्ञानदेवांनी वृद्धिंगत केला. ज्ञानेश्वरांनी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांचे सुंदर वर्णन केले आहे.

**टाळघोळ चिपाळी या नाद। दिंडी पताका मकरंद।**
**नाना बागडियांचे छंद। कवच अभेद नामाचे।**
**वैष्णव चालिले गर्जत। महावीर ते अद्‌भुत।**
**पुढे यमदूत पळत। पुरला अंत महादोषा।**
**निवृत्ती संत हा सोपान। महावैष्णव कठीण।**

**मुक्ताबाई तेथे आपण। नारायण जपतसे।**
**ज्ञानदेव वैष्णव मोठा। विठ्ठल नामे मुक्तपेठा।**
**स्नानदान घडे श्रेष्ठा। वैकुंठ वाटा संत गेले।।**

ज्ञानेश्वरांनी वारीचे केलेले वर्णन हे त्याकाळातील वारीला येणाऱ्या वैष्णवांच्या चैतन्यमयी सळाळत्या प्रवाहाचे वर्णन आहे. ज्ञानेश्वर स्वतः एक सिद्ध पुरुष असून त्यांनी केवळ समाजामध्ये भक्तीचा प्रवाह खळाळत रहावा व नामस्मरणाचे सोपे तंत्र जनतेच्या मनी रुजावे म्हणून वारीची परंपरा पुनर्जीवीत केली. ज्ञानप्राप्ती झाल्यावर सामान्य जनांप्रती असलेली कणव या साधू पुरुषाच्या आचरणाने स्पष्ट होते. त्यांच्या या विश्वात्मक जाणिवेमुळे त्यांना 'माउली' हे बिरुद सार्थ वाटते. ते म्हणतात –

**अवघाची संसार सुखाचा करीन।**
**आनंदे भरीन तिही लोक।**
**जाईन गे माये तया पंढरपुरा**
**भेटेन माहेरा आपुलिया।।**

हे जग आनंदाने भरून टाकून माझ्या माहेरी म्हणजे पंढरपुरी जाईन असं माउली म्हणतात. त्यांच्या दृष्टीने वारी हे एक आनंदाने ओसंडून वाहणारं स्नेहसम्मेलनच होय. केवळ पायी चालत टाळ कुटत जाणारे लोक वारकरी नसून, पदोपदी ज्यांना देवाची प्रचिती व प्रतीती होते ती वारी. वारीमुळे अहंकार विसरून एकमेकांच्या पायी लोटांगण घालणारे वैष्णव दिसतात. अध्यात्ममार्गावरील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रद्धा व भक्ती. श्रद्धा दृढ होण्यासाठी वारीचे प्रयोजन आहे. श्रीशिवलीलामृत ग्रंथात श्रीधरस्वामी म्हणतात –

**'ज्यासी न घडे सत्समागम**
**त्याने करू जावे तीर्थाटन।।'**

अर्थात रोजच्या रहाटगाडग्यात ज्याला सत्समागम होत नाही त्याने तीर्थाटन करावे. तीर्थाटन करताना आपोआपच संत दर्शन होते. पंढरपूरच्या वारीत या दोनही गोष्टी होतात. सर्व जातीभेद विसरून 'वासुदेवः सर्वम्' या प्रतीतीचा बोध घेत जनसामान्यही भक्तीचा रस चाखू शकतात.

ज्ञानेश्वरांनी म्हटलं की, परमेश्वर जर कुठे असेल तर तो जिथे हरिदास भगवंताचे चिंतन, कीर्तन करतात तिथे असेल.

ज्ञानेश्वर म्हणतात -

**'तो मी वैकुंठी नसे। भानुबिंबीही नसे।**
**योगियांच्या मानसे। उमरडोनी जाय।**
**परी तयापाशी पांडवा। मी हरपला गवसावा**
**जेथ नामघोष बरवा। करिती माझा।।'**

(ज्ञानेश्वरी अ.९)

केवळ पायी चालणं म्हणजे वारी नसून पदोपदी भगवंताचं कीर्तन करणं म्हणजे वारी. भगवंताच्या नामस्मरणाने जगातील सर्व दुःखाचा विसर पडतो व अवघे विश्व महासुखाने भरून जाते. माउली म्हणतात -

**'ऐसे माझेनि नामघोषे। नाहीचि करिती विश्वाची दुःखे।**
**अवघे जगचि महासुखे। दुमदुमित भरले।।**

(ज्ञानेश्वरी अ.९.२०८)

वारकरी परंपरेनुसार ज्ञानेश्वरांनी जेव्हा समाधी घेण्याचा निर्णय पांडुरंगासमोर जाहीर केला तेव्हा सर्व संत ज्ञानेश्वरांसोबत आळंदीला आले. आळंदीची वारी ही संतांची वारी, तर पंढरीची वारी ही देवांची वारी. पुढे एकनाथ महाराजांनी वारीची परंपरा चालू ठेवली. इस्लामी आक्रमणांच्या धामधुमीत महाराष्ट्रात भक्तीपरंपरा वारीच्या माध्यमातून एकनाथांनी चालू ठेवली. यामुळे कठीण काळातही समाज धर्मप्रवण व ईश्वरार्पित चित्त राहिला. वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्रावर या अर्थाने मोठे उपकार आहेत. एकनाथांनी ग्रंथातील वेदांत भारुडाच्या रूपाने अधिक लोकांपर्यंत पोचवला. भागवताच्या एकादश स्कंदावर त्यांनी लिहिलेली प्राकृत टीका 'एकनाथी भागवत' नावाने प्रसिद्ध आहे. यात त्यांनी भक्तीचे विशुद्ध स्वरूप वर्णिले. श्लोकांना लोकांपर्यत पोचवण्याचे हे महत्‌कार्य नाथांनी केले. म्हणूनच त्यांना वारकरी पंथाचा 'खांब' म्हणतात. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' ही वारकरी परंपरेची नामदेवांनी दिलेली हाक एकनाथांनी खऱ्या अर्थानी जागृत ठेवली. एकनाथ म्हणतात-

**'साधन ते सार पंढरीची वारी।**
**आन न तू करी सायासास।**

**वेद तो घोकिता चढे अभिमान।**
**नाडेल तेणे जाण साधन ते।**

**शास्त्रमतवाद कासया पसार।**
**करी सारासार वारी एक।**

**ग्रंथ पहावे तरी आयुष्य क्षणिक।**
**व्यर्थ खटपट करुनी काई।**

**एका जनार्दनी साराचे पैसार।**
**विठ्ठल त्रिअक्षरी जप करी।।**

भजन, नामस्मरण, कीर्तन यांच्या माध्यमातून परमेश्वराला प्राप्त करणे हा वारकरी पंथाचा सरळसोपा मार्ग आहे. भागवत संप्रदायात याला 'नवविधा-भक्ती' म्हणतात -

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम्।।**

श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन या नऊ भक्ती एक 'वारी' केल्याने सिद्ध होतात व 'याची देही याची डोळा' माणसाचे जीवन कृतार्थ होते. हा वारीचा मूळ गाभा आहे. हा संप्रदाय जड व चेतनात फरक करत नाही तर स्पृश्य व अस्पृश्य हा भेद येतोच कुठे? एकनाथांनी तर म्हटलं, 'हरीच्या दासाला हरी सर्व दिशांमध्ये व्यापून भरलेला दिसतो. एकदा चित्तात समतेचा भाव आला की अवघे त्रैलोक्य आनंदाने भरून जाते.'

नाथांची परंपरा पुढे तुकाराम महाराजांनी चालू ठेवली. पंढरीच्या वारीबद्दल तुकोबांनी अनेक अभंग लिहिले. त्यांनी पांडुरंगाकडे एकच इच्छा व्यक्त केली आहे व ती म्हणजे 'माझी वारी कधी चुकू देऊ नको'.

वारकरी संप्रदायात तुकोबांचा हा अभंग नित्यपाठात आहे-

**'हेचि व्हावी माझी आस।**
**जन्मोजन्मी तुझा दास।**
**पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरी।**
**संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा कल्लोळ।**
**चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान।।'**

ज्या प्रमाणे ज्ञानदेवाचे 'पसायदान' प्रसिद्ध आहे तसे तुकोबांनी मागितलेलं हे एक दान आहे. 'वारी' हा या दानाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम या प्रमुख संतांनी वारीची परंपरा अधिकाधिक वृद्धिंगत केली. ज्ञानदेवांचे समकालीन अनेक जाती-पंथांचे संत सामाजिक समरसतेच्या भावनेतून एकत्र आले. हा वसा अगदी आजपर्यंतच्या पालखी व दिंडी सोहळ्यात पहावयास मिळतो.

या प्रमुख संतांच्या निर्याणानंतर त्यांच्या नावाने पालख्या व दिंड्या नेण्याचा प्रघात हैबतबाब अरफळकर यांनी सुरू केला. हैबतबाबा हे ग्वाल्हेरच्या शिंद्यांच्या दरबारी सरदार होते. त्यांनी सर्वप्रथम ज्ञानेश्वरांच्या पादुका गळ्यात बांधून पायी दिंडी काढली. ते लष्करी शिस्तीचे असल्यामुळे व त्यांचे तत्कालिन राजेरजवाडे व सरदारांशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीला एक भव्य-दिव्य स्वरूप मिळवून दिले. हत्ती, घोडे, पालखी इत्यादी व्यवस्था त्यांनी माउलींच्या पालखीला करवली. महाराष्ट्रातील प्रमुख संतांच्या पालख्या आजही मोठ्या दिमाखात व शिस्तीत आषाढी एकादशीला पंढरपुरात पोहचतात. नियोजनाचे व प्रशासनिक शिस्तीचे धडे वारीच्या एकूणच व्यवस्थेतून आजच्या पिढीला घेता येतील. सद्य प्रचलित असलेल्या दिंड्या व पालख्या आणि त्यांची व्यवस्था हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

पंढरीची वारी म्हणजे भक्तीचा एक चैतन्यमयी प्रवाह आहे. गेली हजारो वर्षे ही वारी चालू आहे व पुढे 'यावच्चंद्रदिवाकरौ' ही संतांची पावन परंपरा चालतच राहील असा विश्वास ज्ञानदेवांनी मांडला आहे -

**'पाठी महर्षी येणे आले। साधकाचे सिद्ध झाले।**
**आत्मविद् थोरावले। येणेचि पंथे।'**

अर्थात याच वारीच्या मार्गावर अनेक महर्षी चालले. साधकांचे सिद्ध झाले व आत्मविद् संत अधिकाराने थोर झाले. संतांनी केवळ या मार्गावरचे काटे दूर करून 'उजळावया आलो वाटा' असं म्हणत भक्तीचा मार्ग वारीच्या रूपाने उजळून टाकला आहे. वारी म्हणजे जीवाचं परमात्म्याशी मिलन आहे व पायी चालणं, टाळमृदंग वाजवणं, कीर्तन व नामस्मरण ही साधनं आहेत. हे विश्व आनंदाने दुमदुमून जावो ही वारीच्या मागची आध्यात्मिक पृष्ठभूमी आहे. म्हणूनच संतांनी म्हटलं -

**'होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी।।'**

✧✧✧

# भोंदूबाबा आणि आपले अध्यात्म

{ ऑक्टोबर २०१७ }

२५ ऑगस्ट २०१७ ला पंचकुल हरियाणा येथील CBI च्या न्यायालयाने डेरा सच्चा सौदाचे प्रमुख श्री. गुरमीत राम रहिम सिंग यांना आपल्याच आश्रमातील दोन साध्वींशी अतिप्रसंग केल्याचे आरोप सिद्ध झाल्यावर, २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा आणि ३० लाख रु. चा दंड ठोठावण्यात आला.

२००२ ला तत्कालीन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना रामरहिम सिंग यांच्या या दुष्कृत्याची माहिती देणारे निनावी पत्र पाठवण्यात आले होते. तत्कालीन गृहमंत्री, CBI चे Director आणि पंजाब उच्च न्यायालयालाही या पत्राच्या प्रती पाठवण्यात आल्या होत्या. याच आधारावर पंजाब न्यायालयानी कारवाई चालू केली, आणि १५ वर्षांनंतर म्हणजे २०१७ ला त्याचा निकाल लागला.

२५ ऑगस्टला या बाबांना शिक्षा ठोठावल्यावर पंचकुलामध्ये जमा झालेल्या बाबांच्या काही लाख अनुयायांनी दंगा आणि जाळपोळ केली. त्यामध्ये ३० पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि कित्येक जखमी झाले. या सगळ्या घटनांचे धावते वर्णन दूरचित्रवाणीच्या माध्यमांमधून लोकांपर्यंत सतत पोहोचत होते. अध्यात्माचा संदेश देणाऱ्या या बाबांच्या जीवनशैलीच्या सुरस आणि धक्कादायक नवीन कथा अक्षरशः दर क्षणाला ही माध्यमं देत होती.

सर्वसामान्य नागरिकाला या देशामध्ये व्यापार, उद्योग करण्याकरता अनेक सरकारी नियमांना सामोरे जावे लागते. त्यातच त्याला चांगला फायदा झाला तर, आयकरापासून अनेक कायद्यांना त्याला तोंड द्यावे लागते. हे सगळे करताना त्याचा

जीव मेटाकुटीस आलेला असतो. पण या आध्यात्मिक गुरुंनी केलेली माया आणि त्यांचा ‘मायाबाजार’ बघून मती गुंगच नाही तर बधिर होऊन जाते.

बाबांच्या या सगळ्या लीलांना देशातल्या सगळ्या राजकीय पक्षांचा पाठिंबा बघून दुःखापेक्षा चीड जास्त येते. राजाश्रयाखाली चाललेली ही विदुषकगिरी, मर्कटलीला, भोंदूगिरी आपल्या समाजाचे कोणते चित्र आपल्यासमोर उभे करते? हाच का आपला धर्म आणि अध्यात्म? एक दोन नाहीत तर, डझनभर असे बाबा, गुरू आणि संतांच्या ‘आध्यात्मिक’ लिलांमधील ‘फसवेगिरी’ आणि ‘भोंदूपणा’ उघडकीस आला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सगळ्या भोंदूंना कुठल्या ना कुठल्या प्रकारांनी राजाश्रय मिळत होता. या सगळ्या घटनांची चर्चा होते, त्यावर टीका होते पण या भोंदूंचे आश्रम आजही श्रद्धाळूंनी भरून वाहताना दिसतात. महाराष्ट्रात तर आपल्या सगळ्या उत्सवांचे झालेले बकालीकरण आणि राजकारण्यांनी, ‘परंपरा’ आणि ‘संस्कृती’च्या नावाखाली घेतलेला त्यांचा ताबा उद्वेगजनक आहे.

‘अध्यात्म’, ‘धर्म’ आणि ‘श्रद्धा’ या सगळ्यांवरतीच आज एक मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अध्यात्म हे थोतांड आहे, श्रद्धा ही अंधच असते, धर्म ही अफूची गोळी आहे, या सगळ्या सिद्धांतांना यामुळे पुष्टीच मिळत आहे. या सगळ्यांच्या बाबतीत डोक्यावरून पाणी केव्हाच वाहून गेले आहे. याला जबाबदार कोण हाच प्रश्न आहे.

ज्या संस्कृतीने जगासमोर ‘अध्यात्म’, ‘धर्म’ या सगळ्यांच्या संदर्भात एक वेगळा सनातन विचार मांडला त्याच संस्कृतींचे पाईक असल्याचा दावा करणाऱ्यांनी त्याचा चालवलेला धंदा क्लेशकारकच नाही तर अक्षम्य आहे. भोंदूपेक्षा त्यांच्या भोंदूगिरीला सामाजिक प्रतिष्ठा देऊन त्याचा फायदा उठवणारे हे सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय नेतृत्व याकरता जास्त गुन्हेगार आहे. अर्थातच, आपली ‘सारासार’ विवेक बुद्धी गहाण ठेवून या भोंदूबाबांच्या मागे लागलेले श्रद्धाळूही त्याकरता तेवढेच गुन्हेगार ठरतात. इतक्या हास्यास्पद विदुषकी भोंदूबाबांच्या पुढे आपण नतमस्तक होणार असू तर त्याचा दोष भोंदूबाबांपेक्षा आपल्या वैचारिक दिवाळखोरीला जास्त द्यायला हवा.

हिंदू धर्म व्यवस्थेचं स्वरूप याकरता समजावून घेणं आवश्यक आहे.

जगातल्या इतर सगळ्या प्राचीन आणि नंतर आलेल्या अशा धर्मव्यवस्थेपेक्षा

ते स्वरूप नुसतेच वेगळे नाही तर, मूलभूतदृष्ट्या ते भिन्न आहे. अशा सगळ्या धर्म व्यवस्थांमध्ये त्यांचा एक 'प्रेषित' असतो; आणि एक 'धर्मग्रंथ' असतो. त्या धर्मग्रंथातील 'वचन' किंवा 'विचार' हे अपरिवर्तनीय असतात. त्या व्यवस्थेच्या अनुयायांना आणि त्यांच्या जीवन व्यवहाराला त्या परिघातच रहावे लागते. अन्यथा ती व्यक्ती व्यवस्थेबाहेर ढकलली जाते. ख्रिस्ती धर्माचा प्रेषित 'येशू ख्रिस्त' आहे, तर त्याचा धर्मग्रंथ 'बायबल' आहे. इस्लामचा प्रेषित 'महम्मद' आहे, तर त्यांचा धर्मग्रंथ 'कुराण' आहे. झोरेस्ट्रीयन आणि ज्यू या सगळ्यांनाही त्यांचे प्रेषित आहेत आणि धर्मग्रंथही आहेत.

हिंदूंना कोणीही प्रेषित नाही किंवा त्यांचा एक धर्मग्रंथ नाही. हिंदूंच्या धर्मग्रंथाची रचना ही सर्वतः भिन्न आहे. काळाच्या ओघात हिंदू धर्मामध्येही अनेक देवदेवता झाल्या. त्यांची स्तोत्रे झाली. त्यांच्या पूजा-अर्चांकरता कर्मकांडेही चालू झाली. तरीही कुठल्या व्यक्तींनी कुठल्या देवाची पूजा करायची याचे त्याला संपूर्ण स्वातंत्र्य असते. एवढेच काय पण, अशाप्रकारे देवांचे अस्तित्व नाकरणाऱ्यांनाही या व्यवस्थेमध्ये स्थान आहे. या सगळ्या इतिहासाचा ऊहापोह इथे करणं अशक्य आहे. हिंदू धर्माची ओळख ही त्यांच्या 'देवदेवतां'पेक्षा त्यांचे 'वैचारिक' ग्रंथ आणि समाजरचनेवर आधारित आहे.

'मी कोण? मी कुठून आलो? आणि माझा या चराचराशी काय संबंध?' याची चर्चा उपनिषदांमध्ये आढळते. हिंदूंची षट्‌दर्शनेही याच विचार प्रक्रियेचा भाग आहे. त्यांचा सर्वात मोठा श्रद्धेचा ग्रंथ 'भगवद्‌गीता' हा सुद्धा सर्वसामान्य माणसाला जगण्याकरता लागणाऱ्या 'आध्यात्मिक' आणि 'ऐहिक' दोन्ही विचारांचे संतुलित मार्गदर्शन करतो. 'पुनर्जन्म' आणि 'कर्मसिद्धान्त' हेही या व्यवस्थेचे महत्त्वाचे आधार आहेत, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व ज्यांच्याकरता आहे, त्यांच्या समाजव्यवस्थेची रचना म्हणजे 'वर्णाश्रमधर्म', हाही त्याचाच भाग आहे.

वर्णाश्रमधर्मांचा विचार हा कुठल्याही जन्माला आलेल्या व्यक्तीची नैसर्गिक स्थित्यंतरं आणि त्यानुसार त्याला करावी लागणारी कार्ये यांच्याशी निगडित आहे. जीवनाचा इतका सखोल आणि चिंतनशील विचार आणि त्यानुसार त्याला दिलेली कार्ये ही कुठल्याही इतर व्यवस्थेत मिळत नाहीत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या क्रमाने ही व्यवस्था आहे. सर्व वर्णांना ती सारखी आहे. समाज म्हणून जेव्हा एखादी व्यवस्था अस्तित्वात येते तेव्हा त्यांच्या गरजांचीही निर्मिती झालेली असते. बहुतांशी या सर्व गरजा या भौतिक गरजा

असतात. त्यावरच आधारित हिंदूंची वर्णव्यवस्था आहे. ब्राह्मण ज्ञानग्रहण आणि वितरणाचे कार्य करतो, क्षत्रिय संरक्षणाचे कार्य करतो, वैश्य व्यापार व अर्थकारण करतो, आणि क्षुद्र या सगळ्या व्यवस्थेमध्ये त्यांना लागणाऱ्या सेवांचे वहन करतो.

भारत ही एक सुवर्णभूमी होती आणि त्यात सोन्याचा धूर निघत होता, अशीच त्याची ओळख अलेक्झांडरपासून १६ व्या शतकात इस्ट इंडिया कंपनीचे आगमन भारतात झाले तिथपर्यंत होती. या दोन-अडीच हजार वर्षांच्या कालावधीमध्ये बौद्धिक, चिंतनशील, वैचारिक ग्रंथांच्या निर्मितीपासून व्यापार, उद्योग, वस्त्रनिर्मिती, शिल्प, नाट्य, साहित्य, चित्रकला, व्यापाराकरता लागणारे नौकानयन, भाषा, वैद्यक अशा जीवनाकरता आवश्यक असणाऱ्या सर्व क्षेत्रांमध्ये विकास, आणि शेकड्यांनी नाही तरी हजारोंनी मार्गदर्शक ग्रंथांची निर्मिती त्या त्या क्षेत्रात करण्यात आली. साम्य-समाजवादी आणि नंतर वर्गकलहाच्या पिशाच्यांनी झपाटलेल्या इतिहासकारांच्या सांगण्याप्रमाणे २५०० वर्षे या देशांमध्ये जर फक्त 'वर्गकलह' चालू असेल, तर वर सांगितलेल्या गोष्टींची निर्मिती होणे शक्य आहे का? वर्णाश्रमधर्म हा या सगळ्या व्यवस्थेची ऊर्जा होती. कमीत कमी २५०० वर्ष तरी त्यामध्ये संतुलन होते.

शून्य आणि आकड्यांची निर्मिती भारतात झाली हे सर्वश्रुत आहे. ते युरोपमध्ये पोचायला तेरावे शतक उजाडायला लागले. १२०२ मध्ये फिबोनाची (Fibonacci) या इटालियन अभ्यासकाने Liber abacci या आपल्या ग्रंथामधून या आकड्यांची ओळख युरोपला करून दिली. त्याला या आकड्यांची माहिती पूर्व आफ्रिकेमधील अल्जेरिया या देशामध्ये, बुजिया (Bugia) या बंदरामध्ये शिकत असताना मिळाली. या बंदरामध्ये भारतीय व्यापाऱ्यांची ये-जा होत होती, आणि आपल्या व्यवहारामध्ये ते ह्या आकड्यांचा वापर करत होते. म्हणजे हे आकडे युरोपमध्ये, आर्यभट किंवा तत्सम गणिताच्या पंडिती ग्रंथांनी पोहोचले नसून, ते व्यापाराच्या माध्यमातून तेथे पोहोचले. 'दमास्कस' पोलाद म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोलाद निर्मितीचे तंत्रज्ञान काय किंवा इजिप्तमध्ये उत्खननात सापडलेली भारतीय वस्त्रे काय, ही जगभर पंडिती ग्रंथांपेक्षा व्यापारांनी पोचवली. वर्णाश्रम व्यवस्थेमध्ये, त्यांच्या कार्यक्षेत्राच्या वितरणातील संतुलनाशिवाय या गोष्टी शक्य आहेत का? ब्राह्मण, वैश्य, क्षुद्र या सगळ्या वर्णांचा अशा निर्मितीमध्ये सहभाग असल्याशिवाय त्याचा व्यापार होणे शक्य आहे काय? थोडक्यात; वर्णाश्रम धर्म हा समस्त समाजाच्या 'ऐहिक' आणि 'आध्यात्मिक' उन्नतीला कारणीभूत होत होता.

या ऐहिक वस्तूंच्या व्यापाराप्रमाणेच, आणखीन एक गोष्ट भारताने जगाला दिली, आणि ती म्हणजे 'योग'. अलेक्झांडरच्या काळापासून ते २० व्या शतकातील विज्ञानाच्या शिखरावर पोचलेल्या अमेरिकेपर्यंत त्याचा प्रभाव आज तसूभरही कमी झालेला नाही.

५ व्या शतकातील रोमन साम्राज्याच्या अस्तापासून, १५ व्या शतकातील प्रबोधनयुगाच्या (Renaissance) उदयापर्यंतचा हजार वर्षांचा काळ हा युरोपच्या इतिहासामध्ये 'अंधारयुग' म्हणून ओळखला जातो. प्रबोधन युगामुळे ख्रिस्तीधर्म सत्तेचा प्रभाव कमी व्हायला लागला आणि युरोपमध्ये विज्ञानक्रांतीला सुरुवात झाली. यातूनच पुढे औद्योगिक क्रांती झाली, आणि 'समाजरचना' व त्यांची 'कार्ये' ही या औद्योगिक क्रांतीला सुसंगत होऊ लागली. परंपरागत ग्रीक किंवा रोमन व्यवस्थेपेक्षा ती भिन्न होती. यातूनच इंग्रजांचा वसाहतवाद निर्माण झाला, आणि १६ व्या शतकानंतर भारत हा इंग्रजांची वसाहत झाला. याची सुरवात अर्थातच व्यापार हीच होती.

१६ व्या शतकामध्ये जगातील व्यापार आणि अर्थकारणामध्ये भारताचा हिस्सा हा २३% टक्के होता. तर १९४७ साली इंग्रज जेव्हा हा देश सोडून गेले तेव्हा त्याचे प्रमाण ४% पेक्षाही खाली आले होते. म्हणजे या तीन-साडेतीनशे वर्षांत येथील कुटीरउद्योग, त्यावर आधारलेले उद्योगधंदे हे सर्व नष्ट झाले होते. ती पोकळी पाश्चात्त्य देशांतून औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वस्तू भरून काढत होत्या. ब्रिटिश सत्तेमुळे भारताचे झालेले आर्थिक शोषण आणि त्यामुळे झालेली त्याची आर्थिक दिवाळखोरीची कारणमीमांसा, दादाभाई नौरोजींनी १८७६ साली लिहिलेल्या 'Poverty and Un-British Rule in India' या पुस्तकामध्ये सविस्तरपणे मांडली आहे. याच सुमाराला इंग्रजी शिक्षण पद्धती तयार होऊन नवशिक्षितांची पिढीही तयार होत होती. परंपरागत शिक्षण पद्धती यामुळे संपूर्णतः नष्ट झाली. याचे व्हायचे तेच सांस्कृतिक आणि सामाजिक परिणाम आजही आपण भोगत आहोत. आर्थिक दिवाळखोरी बरोबरच येथील वर्णाश्रमावर आधारलेली समाजव्यवस्थाही मोडकळीस यायला लागली. अस्तित्वाकरता असलेला त्याचा पायाच उद्ध्वस्त झाला आणि त्यावर आधारलेले व्यवसायही कोलमडून पडले. सांस्कृतिकदृष्ट्या संपूर्ण 'भिन्न' असलेल्या व्यवसायांशी जुळवून घेण्याची धडपड चालू झाली. हजारो वर्षांच्या अनुभवातून विकसित झालेली 'व्यवसाय' कौशल्ये मातीमोल झाली. 'आश्रम' तेच असले तरी, व्यवस्थेमध्ये त्याचे महत्त्व नाहीसे होऊन वर्णव्यवस्थाही

संदर्भहीन झाली. या धडपडीमध्येच त्यामध्ये अनेक अपप्रवृत्ती, आणि दुर्दैवाने त्यांची पाठराखण चालू झाली.

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी याच वैगुण्याचा फायदा घेतला. या व्यवस्थेचा लोकांवरचा प्रभाव त्यांच्या धर्मप्रसाराच्या आड येत होता. ख्रिस्तीपंथातील 'Priest', आणि वर्णाश्रमधर्मातील 'ब्राह्मण' यांचा दूरान्वयानेही संबंध नव्हता. साधर्म्य असलेच तर ते पूजापाठ करणाऱ्या 'पुरोहित' वर्गाशी होते. पुरोहित ब्राह्मण होते, पण सगळे ब्राह्मण पुरोहित नव्हते. युरोपमध्ये या Priest मंडळींनी चर्चच्या माध्यमांतून लोकांची प्रचंड पिळवणूक केली होती. त्यांच्या ताब्यातील लहान मुलांचे लैंगिक शोषण ते आतापर्यंत करत होते. प्रबोधनयुगामध्ये यांचे वर्चस्व झुगारून, युरोप एका नवीन स्वातंत्र्याचा अनुभव घेत होता.

भारतामध्ये अशी कुठलीही परिस्थिती नव्हती. याउलट सर्व वर्णांचे संबंध परस्परावलंबी आणि एकमेकांना पूरक होते. 'पोथी'निष्ठ मार्कस्वाद्यांनी, आणि त्यावर आधारीत समाजशास्त्रज्ञांनीही युरोपमधील 'Priest' आणि भारतातील 'ब्राह्मण' वर्ण एकच समजून 'विकृत' इतिहास लिहिला.

याचवेळी धर्मप्रसाराकरता आलेले ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हिंदू संस्कृतीच्या अभ्यासाला सुरुवात केली. १७८५ ला Charles Wilkins यांनी भगवद्गीतेचे पहिले इंग्रजी भाषांतर केले. १७८९ साली विल्यम जोन्स यांनी शाकुंतलचे भाषांतर केले, आणि त्यांनीच केलेले मनुस्मृतीचे भाषांतर त्यांच्या मृत्यूनंतर १७९४ साली प्रकाशित झाले. तेव्हापासून चालू झालेल्या हिंदू संस्कृतीचा 'चिकित्सक' अभ्यास आजपर्यंत पाश्चात्त्य देशांमध्ये चालू आहे.

औद्योगिकीकरण आणि वसाहतवादामुळे ऐहिक गरजा भागवता येऊ लागल्या असल्या तरी, मनुष्य अधिक 'आत्मकेंद्रित' होऊ लागला होता. बंदिस्त ख्रिस्ती तत्त्वज्ञान हे समाजाला पडणाऱ्या नवीन प्रश्नांना उत्तर देऊ शकत नव्हते. अशाचवेळी हिंदू तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचे ग्रंथ युरोपमध्ये त्याला उपलब्ध होऊ लागले. उपनिषद आणि दार्शनिक तत्त्वज्ञानातील चिंतन बघून तो त्या विचारांकडे जास्तीत जास्त आकर्षिला जाऊ लागला. १९ व्या, २०व्या शतकामध्ये जर्मनी आणि अमेरिकेमधील अनेक विचारवंत यामुळे प्रभावित झाले. नवभौतिकेच्या निर्मितीचे वैज्ञानिक नील्स बॉर (Niels Bohr) हायसेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Shrodinger) आणि जे. रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheimer)

या सगळ्यांनी आपल्या लिखाणातून पौर्वात्य 'हिंदू' आणि 'बौद्ध' तत्त्वज्ञान, विशेषतः उपनिषदांचा त्यांच्या चिंतनावरील प्रभाव प्रामाणिकपणे लिहून ठेवला आहे. अमेरिकेतील विचारवंत राल्फ वाल्डो इमरसन (Ralph Waldo Emerson), हेन्री थोरो (Henry Thoreau) आणि वॉल्ट व्हाइटमन (Walt Whitman) या सगळ्यांनीही पौर्वात्य तत्त्वज्ञानातील, विशेषतः उपनिषद्, दर्शने आणि भगवद्गीतेच्या प्रभावाचे ऋण त्यांच्या लिखाणातून मान्य केले आहे. प्रसिद्ध इतिहासकार टॉयनबी (Arnold Toyenbee) यांनी १९५२ साली धर्म आणि नवीन तंत्रज्ञानावर भाष्य करताना लिहिले आहे की,-

"India, the conquered, will conquer it's conquerors ...... catholic minded Indian religious spirit .... is the way of salvation for all religions in an age in which we have to learn to live as a single family if we are not to distroy ourselves".

१८९३ साली स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील धर्म-संसदेमध्ये केलेल्या भाषणामुळे, 'योग' आणि 'वेदांत' यांचा अभ्यास अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. १९२० साली परमहंस योगानंद यांनी बोस्टन येथील अशाच एका धर्म-संसदेमध्ये भाषण करून या तत्त्वज्ञानाची पाश्चात्त्यांची भूक वाढवली. २० व्या शतकाच्या मध्यावर अमेरिकेमध्येही मोठ्या प्रमाणावर भौतिकसुख उपभोगूनही अशांत आणि अतृप्तवर्ग निर्माण होत होता. परंपरागत ख्रिस्ती विचार किंवा भौतिक अमेरिकन संस्कृतीमध्ये त्यांना पडलेल्या प्रश्नांना उत्तरे मिळत नव्हती. या घुसमटीतून सोडवणूक करण्याकरिता तो अंमली पदार्थांचे सेवन करून शांती मिळते का? हे बघू लागला. याचवेळी पुन्हा एकदा 'योग' आणि 'वेदांत' घेऊन नवीन हिंदू स्वामींनी अमेरिकेवर प्रभाव टाकायला सुरुवात केली. महर्षी महेश योगी, रजनीश, हरे कृष्ण हरे राम, नित्यानंद अशा अनेक स्वामींनी अमेरिकन मनावर भुरळ घातली. यांचे पंचतारांकित आश्रम उभे राहिले.

आज अमेरिकेमध्ये शेकड्यांनी योगाच्या शिक्षण देणाऱ्या संस्था आणि वेदांत शिकवणारे अभ्यासक्रम विद्यापीठांमधून शिकवले जात आहेत. गुरू, पंडित, मंत्र, योग, ध्यान, कर्म, निर्वाण, मोक्ष, कुंडलिनी इ. शब्द आणि त्यामागचे विचार हे आज इंग्रजी भाषा आणि अमेरिकन संस्कृतीमध्ये रुजू झाले आहेत. अलीकडेच फिलिप गोल्डबर्ग यानी ''अमेरिकन वेद'' हे पुस्तक लिहून यामध्ये या सगळ्या गोष्टींची कारण-मीमांसा आणि विवेचन केले आहे. २००९ च्या Newsweek या अमेरिकेतील प्रसिद्ध साप्ताहिकामध्ये लिसा मिलर यांनी चक्क "We all are

Hindus now". या शीर्षकाखाली लेख लिहून एकच खळबळ माजवली.

आजच्या भोंदूबाबांची पार्श्वभूमी आणि त्यांना राजकारण्यांचा मिळणारा पाठिंबा समजण्याकरता हा इतिहास समजणे आवश्यक आहे. पाश्चात्त्यांना भुरळ घालणारे तत्त्वज्ञान किंवा वर सांगितलेल्या स्वामीनी अमेरिकेत जे आश्रम स्थापन केले त्याच्या मुळाशी उपनिषद्, योग आणि दार्शनिक सिद्धान्तांची बैठक होती. यातही काहींनी 'भोंदूपणा' आणि 'व्यावसायिकता' आणली असली, तरी मूळ विचार आजही या पाश्चात्त्य देशांमध्ये गांभीर्यानी स्वीकारला जातोय. याविरुद्ध, भारतामध्ये फोफावलेल्या आजच्या या स्वामींना, मर्कटलिलांवर जास्त भर द्यावा लागत आहे.

अलीकडचा 'योग'दिवसही साजरा होतो तो पंतप्रधानांपासून मुख्यमंत्र्यापर्यंत केलेल्या आसनांच्या वर्णनांनी. 'योग' हा एक दर्शनाचा भाग आहे. तो समजल्याशिवाय केवळ आसनं निरुपयोगी आहेत, याकडे लक्ष द्यायला आज कुणीच तयार नाही. हिंदू तत्त्वज्ञानांतील 'चिंतन' आणि 'वैचारिक' खोली बघून पाश्चिमात्य ज्याकडे आकर्षित झाले ती उपनिषद्ही आज आपल्याकडे फारशी वाचली जात नाहीत, ही आपला 'धर्म' आणि 'अध्यात्मा'ची एक शोकांतिका आहे. सर्व क्षेत्रांमधील नेतृत्वाच्या दिवाळखोरीचे ते एक जिवंत उदाहरण आहे.

रामरहिम किंवा आसारामबापू यांना एक वेळ शिक्षा होईल, पण ज्यांच्या जीवावर ते मोठे झाले त्या श्रद्धांळूंनी जर 'तारतम्य' सोडले, तर असले 'विदुषकी' नवीन नवीन बाबा राजकारणांच्या खांद्यावर उभे राहून निर्माण होतच राहतील आणि धर्म, अध्यात्म आणि संस्कृतीची घसरण चालूच राहील. वर्णाश्रम धर्माचे वास्तव स्वरूप आणि त्याचे 'समाज' आणि 'संस्कृती' निर्मिती आणि त्याच्या संरक्षणातले योगदान, 'वस्तुनिष्ठ' आणि 'तटस्थ' संशोधनानी समजावून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, हजारो वर्षांच्या वर्गकलहाच्या निराधार थापांनी भरलेला साम्यवादी इतिहास, आणि त्यालाच पोषक ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केलेली संस्कृतीभंजनाची समाजशास्त्रीय झापडे दूर करणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

'भोंदू'बाबा आणि 'जातीय'वादापासून या समाजाला आणि अध्यात्माला वाचवायचे असेल तर विचारवंतांनी तरी याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

✧✧✧

# वदनी कवळ घेता.... अन्न हे पूर्णब्रह्म...

{ जानेवारी २०१८ }

सद्धर्मच्या सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !

गेली हजारोवर्षे सगळ्या सभ्यतांमधून (civilization) कालगणनेचा प्रयत्न केलेला दिसतो. भारतीय संस्कृतीने या विषयामध्ये प्रचंड प्रगती केलेली होती. अतिसूक्ष्मापासून अनंतापर्यंत मोजमाप करण्याचा भारतीयांचा हा प्रयत्न मती गुंग करणारा आहे. कालमापनाची ही रचना प्रामुख्याने श्रेणीयुक्त (Linear) आहे. साहजिकच येणारा प्रत्येक दिवस आणि वर्ष हे मागील घटनांच्या अनुभवांवर उभे राहते.

अनुभवांतून आपण शहाणे होतो असे म्हणतात. अनुभवासारखा दुसरा शिक्षक नाही.

वास्तवामधे मात्र चित्र याच्या उलटे दिसते. दैनंदिन जीवनामध्ये रस्त्यावरील अपघातापासून उपाहारगृहांमधील आगीमध्ये शेकडोजणांचा मृत्यू दरवर्षी होताना दिसतो. या सगळ्या घटनांमधे खऱ्या अपघातांचे प्रमाण फारच कमी आहे. बहुतांशवेळा या घटना ह्या आपल्याच बेजबाबदारपणा आणि बेफिकिरीमुळे होत असतात. या गोष्टी टाळण्याकरिता बरेच कायदे केले गेले आहेत. अनेक व्यवस्था आणि यंत्रणांचं अवडंबर उभं केलं आहे. तरीही अशा घटनांचे प्रमाण हे भयावहरीतीने वाढतच आहे. अनुभवांतून आपण का शिकत नाही?

''अन्न हे पूर्णब्रह्म'' हे वचन आपल्या सर्वांना माहिती आहे. सामान्य गृहस्थाची जीवनातील सर्व धडपड हीच मुळी चार घास सुखाने मिळवण्याकरता असते. अन्न

शिजवणे, अनेक पाककृती करणे याची एक वेगळी संस्कृती आपल्यामधे आहे. दारावर आलेल्या भिक्षुकाला आपण पैशापेक्षा अन्नाची भिक्षा देतो. गाईला चारा देतो, एवढेच नाही तर सापालाही आपण दूध पाजतो. आपल्या संस्कृतीमधे 'अन्नदाना'सारखे श्रेष्ठ दान नाही. शिळ्या अन्नापेक्षा ताज्या शिजवलेल्या अन्नपदार्थांना आपण जास्त महत्त्व देतो.

आपले वैद्यकशास्त्र म्हणजे आयुर्वेदामध्ये आहाराला सर्वात जास्त महत्त्व आहे. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात 'भोजन-कुतूहल' हा ग्रंथ रघुनाथ या पंडिताने लिहिला. असे शेकडो पाकशास्त्रावरील संस्कृत आणि प्राकृत ग्रंथ ग्रंथालयात संशोधनाच्या प्रतिक्षेत पडून आहेत. २००१ मध्ये ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने Dietetics in Ancient Indian ही आंतरराष्ट्रीय परिषद भरविली होती. बऱ्याच संशोधकांनी आपले शोधनिबंध त्यामध्ये वाचले. Bibliography of Dietetics in Ancient and Medieval India ही या विषयावरील महत्त्वपूर्ण सूची डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी संपादित करून संस्थेने प्रकाशित केली. अभ्यासूंनी ती अवश्य वाचावी.

काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि अन्नप्राशनाला फक्त ''उदरभरण'' एवढीच किंमत राहिली.

निसर्गचक्रातील असंतुलनामुळे कधीकधी या देशामधे दुष्काळ पडल्याची उदाहरणे असली, तरी सर्वसाधारणपणे पोट भरेल एवढे अन्न लोकांना मिळत होते. इंग्रजांच्या वसाहतवादाच्या काळामधे सरकारी धोरणांमुळे शेतीवर परिणाम होऊन दुष्काळ पडल्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामधे जगाप्रमाणेच भारतातील शेती-उत्पादनात मोठी क्रांती झाली. दळणवळणांमधील सुधारणांमुळे देशाच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत विनासायास अन्न पोहोचू लागले. उद्योगधंद्यातील प्रगतीमुळेही मोठ्या प्रमाणावरती शहरे आणि त्यामधला मध्यमवर्ग निर्माण झाला. ही सगळी जमेची बाजू असली, तरी जीवनशैलीमध्ये जे बदल होत होते ते मात्र नक्कीच 'शरीर' आणि 'मन' यामधील संतुलन बिघवडणारे ठरू लागले. दळणवळणामधील क्रांतीमुळे शारीरिक 'कष्ट' किंवा 'श्रम' जवळजवळ नाहीसे झाले. जीवनशैलीतला सर्वात मोठा बदल हा त्याच्या 'कार्य'शैलीमधे झाला. व्यापक स्वरूपात आपण ज्याला 'नोकरी' म्हणतो हाच प्रत्येकाचा व्यवसाय झाला.

याचा सर्वात मोठा परिणाम त्याच्या खाद्यसंस्कृतीवर झाला. सीमित उपलब्धतेने

म्हणा किंवा जेवणाखाण्यामधील वेळेसंबंधी असलेली सांस्कृतिक शिस्त म्हणा, सकाळच्या न्याहारीपासून रात्रीच्या जेवणापर्यंत काय खायचे आणि किती खायचे यामधे काहीतरी सुसंगती होती. विशेष किंवा गोडधोड खाणे हे सण किंवा समारंभांपुरतेच मर्यादित होते. ताज्या शिजवलेल्या अन्नाला जास्त किंमत होती.

सुबत्ता आणि जीवनशैलीमधील बदलामुळे बाजारातील तयार अन्नाची बाजारपेठ प्रचंड प्रमाणात वाढू लागली. कुटुंबाचे एकत्र जेवण हेही यामुळे दुर्मीळ झाले. बाजारांमधे निर्माण होणारे अन्न हे त्याच्या पोषणमूल्यापेक्षा, साठवण आणि विक्री मूल्याशी निगडित झाले. यात आणखीन भर पडली ती जीवनशैली प्रमाणेच खाद्यशैलीतही पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण झाले याची.

प्रचंड प्रमाणातील औद्योगिकीकरण आणि आर्थिक सुबत्ता यामुळे पाश्चिमात्य देशांमधे खाद्यसंस्कृतीतील हे बदल विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच सुरू झाले होते. शारीरिक कष्ट जवळजवळ नाहीत, खाण्यातील अनियमितता आणि सुटसुटीतपणाच्या नावाखाली असंतुलित पिष्टमय पदार्थांचे अतिसेवन याचा व्हायचा तोच परिणाम त्यांच्या शरीर प्रकृतीवर दिसू लागला.

साखर, जास्त पिष्टमयता, मिठाळ आणि शिळे पण गरम केलेल्या अन्नाचे 'जंक फूड' (Junk Food) असे नामकरण झाले. १९७२ साली Michael F. Jacobson या समाजविज्ञान संस्थेत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याने हा शब्द प्रथम अशा अन्नाला वापरला. अशा अन्नामुळे आणि कमी झालेल्या व्यायामामुळे अमेरिकन नागरिकांचा स्थूलपणा तर वाढू लागलाच, पण हृदयरोगापासून कर्करोगापर्यंतच्या सगळ्या रोगांचे प्रमाण बेसुमार वाढत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. शेतीमाल आणि खाद्यपदार्थांचे बाजारीकरण हा औद्यागिकीकरणाचाच पुढचा टप्पा होता. घरी ताजे अन्न शिजवून खाण्यापेक्षा उपहारगृहामधे खाण्याला जास्त प्रतिष्ठा मिळू लागली. चटपट, झटपट अन्न मिळण्याचे, मॅकडोनल्ड आणि बर्गर संस्कृतीची उपहारगृहे यामधूनच निर्माण झाली. जंकफूडच्या ह्या अनिर्बंध सेवनामुळे अमेरिकेतील मुलांमधे येणारा स्थूलपणा आणि त्यामुळे येणाऱ्या अनेक व्याधी यांचे प्रमाण आजही बेसुमार वाढतच आहे.

अमेरिकेतील सरकार आणि तेथील समाजस्वास्थ्याशी निगडित असलेल्या संस्थांनी यावर प्रचंड संशोधन चालू केले. निष्कर्ष त्यांच्या डोळ्यांसमोरच होते, फक्त गरज होती ती आकडेशास्त्रावर आधारित वैज्ञानिक पुराव्यांची. सगळ्याच

बाबतीत सांस्कृतिक साम्य असल्यामुळे युरोपमधील देशांमधेही या 'जंक'फूडचा मोठा प्रादुर्भाव होता.

सुदैवाने आणि अनुभवांतून धडे घ्यायच्या वृत्तीमुळे अमेरिकेमध्ये आणि युरोपमध्येही आज या जंकफुडवरती बरेच निर्बंध आले आहेत. शाळेमधून आणि शाळेच्या जवळपास जंकफुड विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. साखर, मीठ, पिष्टमय पदार्थ, शर्करायुक्त, सोडायुक्त थंडपेय या सगळ्या वस्तूंच्या विक्रीवर यातील घटकांचे प्रमाण लिहिण्याचे बंधन घालण्यात आले. अशा पदार्थाच्या अन्नसेवनामुळे शरीरावर विपरीत परिणाम होतो याचे शिक्षण शाळा-महाविद्यालयांतून मिळू लागले. या पदार्थांच्या जाहिरातबाजींवरही नियंत्रणे घालण्यात आली. थोडक्यात, मनुष्य जे अनुभवांतून शिकतो त्याची प्रत्यक्षात कुठेतरी अंमलबजावणी करण्याचा हा प्रयत्न होता. आज अमेरिकन जनता आपल्या या जीवनशैलीची फार मोठी किंमत मोजत असली तरी त्यांचा बदलण्याचाही मोठा प्रयत्न चालू आहे. आपल्याकडे बदल तर सोडाच, पण आपला ओढा 'जंक फूड' खाण्याकडे अधिकाधिक झुकत आहे. न्याहरीतील शिरा, गाकर किंवा पानगी हे पदार्थ केव्हाच इतिहासजमा झाले आहेत. जेवणातील चौरस आहाराची जागा आता 'बर्गर' आणि 'पिझ्झा' या जंकफूडने घेतली आहे.

हा प्रश्न फक्त शेती उत्पादन किंवा शाकाहारा पुरताच मर्यादित नाही. अमेरिका किंवा युरोपमधील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मांसाहारही केला जातो. मटण, कोंबडीचे मांस किंवा मासे हे मांसाहारी खाण्याचे प्रमुख घटक आहेत. शेतीप्रमाणेच या सगळ्या घटकांच्या उत्पादनाच्या वाढीवरही भर देण्यात आला. विज्ञानातल्या अनेक क्लृप्त्या याकरता वापरल्या गेल्या. याच्याही बाजारपेठा किंवा व्यापार चालू झाला. व्यापार आला की अर्थकारण आले, अर्थकारण आले की स्पर्धा आली. अमेरिकेतील व्यापार आणि वैज्ञानिकांनी कोंबडीचे मांस पावाच्या तुकड्याइतके स्वस्त करण्याचा विडा उचलला आणि त्यात ते यशस्वीही झाले. अर्थातच याची फार मोठी किंमत अमेरिकाच नाही तर सगळ्या मानव जातीला आज द्यावी लागत आहे.

यातूनच कोबड्यांची पैदास वाढवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. माणसांप्रमाणे कोंबड्यांमध्येही रोग असतात. हे रोगही विषाणुंमुळेच होतात. आपल्या रोगांवरती प्रतिजैविके (antibiotics) वापरून अशा रोगांवर बऱ्याच मोठ्याप्रमाणावर विजय मिळवण्यात आला. साहजिकच अशा प्रतिजैविकांचा बेसुमार आणि अनिर्बंध वापर चालू झाला. कोंबड्यांमधेही त्यांना रोग होऊ नये म्हणून कमी मात्रेने ही प्रतिजैविके

देण्यात येऊ लागली. याचा व्हायचा तोच विपरीत परिणाम दिसायला लागला.

या प्रतिजैविकांना हळूहळू या जीवाणूंनी प्रतिसाद देणे कमी होऊ लागले. प्रतिजैविकांची मात्रा वाढू लागली तशी जीवाणूची प्रतिकारशक्ती तर वाढलीच, पण त्यांच्यामध्ये उत्परिवर्तन (Mutation) होऊन त्यांच्या नवीन जाती निर्माण व्हायला लागल्या. या नवीन जिवाणूंच्या जातींचे वैशिष्ट्य असे की, ते प्रतिजैविकांशी झगडण्याची प्रतिकारशक्ती घेऊनच जन्माला येतात. अर्थात अशा जिवाणुंवर पारंपरिक प्रतिजैविकांचा वापर निरुपयोगी असतो. साहजिकच नवीन प्रतिजैविकांचा शोध घेण्यात येतो. जीवाणू प्रतिकारशक्ती घेऊन पुन्हा जन्माला येतात. आज या लढाईमधे जीवाणू यशस्वी झाले असून, आपली नवीन प्रतिजैविके काढण्याची ताकद क्षीण होऊ लागली आहे. महत् प्रयत्नांनी अशी काही प्रतिजैविके जरी काढण्यात आली तरी ती भयानक महागडी आणि सीमित काळापुरतीच उपयुक्त ठरणारी असतात.

शेतीमध्ये वापरण्यात येणारी खते आणि कीटकनाशकांचा वापरही बेसुमार वाढला आहे. आज आपली सगळी शेती हीच 'संकरित' आहे. त्याच्या पिष्टमयतेत वाढ झाली असली तरी त्याचे खाद्यमूल्य आणि गोडी दोन्ही आज आपण हरवले आहे. नावीन्य, प्रगती आणि हव्यासामुळे परंपरागत शेती आणि विविधतेने नटलेली खाद्यसंस्कृती आज आपण जवळजवळ नष्ट केली आहे. समाजात वाढत जाणारा लठ्ठपणा आणि मधुमेहाचे वाढते प्रमाण ही त्याचीच लक्षणे आहेत.

संसर्गजन्य रोगांवरती आपण विजय मिळवला असे आपल्याला वाटत होते. आज आपण ती लढाई हरायला सुरुवात झाली आहे. संसर्गजन्य आणि मटण किंवा कोंबडीचे मांस सेवन केल्यामुळे होणाऱ्या विषबाधेवर आज प्रतिजैविके निष्प्रभ ठरताना दिसत आहेत.

केवळ हव्यास, अविवेकी आणि नीतीशून्य व्यापाराच्या प्रभावामुळे संपूर्ण मानवजातीपुढे आज एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

कुठल्याही युद्धापेक्षा याचा धोका मानवजातीला अधिक असल्याचा वैज्ञानिकांचा कयास आहे. याची दखल नुकतीच संयुक्त राष्ट्रसभेनेच नाही, तर जागतिक आरोग्य परिषद (WHO), G.8., G20 इ. राष्ट्रसमुहांनीही याची गंभीर दखल घेतली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिव Ban-ki-Moon यांच्याच शब्दात सांगायचे तर,–

"Antimicrobial resistance poses a fundamental, long-term threat

to human health, sustainable food production and development. It is a very present reality - in all part of the world, in developing and developed countries, in rural and urban areas in hospitals on farms and in communities. We are losing our ability to protect both people and animals from life-threatening infections.:

अनुभवांतून आपण खरेच शहाणे होतो का?

''पुढच्यास ठेच मागचा शहाणा'' असं आपण नेहमीच म्हणत असलो तरी आपल्याला 'शहाणपणा' सुचतोय अशी आजची आपली परिस्थितीबघून नक्कीच वाटत नाही. जंकफूड, खत, कीटकनाशक किंवा प्रतिजैवकांचा अती वापर असो किंवा सामाजिक क्षेत्रातील आपली जाणीवशून्य बेजबाबदार वागणूक असो, ज्या पाश्चात्त्य संस्कृतीचे आपण अंधानुकरण करतो, त्यांच्याकडून आपण फार काही शिकायला तयार नाही. पेहरावापासून, भाषेपर्यंत या परिस्थितीत फारसा फरक नाही. धर्म नेतृत्वापासून, राजकारणापर्यंत सर्वचजण लोकानुनय करण्यात मग्न आहेत. 'प्रबोधन' किंवा वेळप्रसंगी वाईटपणा घेण्याची कोणाचीच तयारी नाही. अशावेळी आठवण होते ती समर्थ रामदास स्वामींची दासबोधामध्ये दिलेल्या शंभरहून अधिक मूर्खांच्या लक्षणांची. रामदास स्वामी म्हणतात–

''अक्षरे गाळून वाची। का ते घाली पदरिची। निगा न करी पुस्तकांची। तो येक मूर्ख।
आपण वाचिना कधीं। कोणास वाचावया नेदी। बांधोन ठेवी बंदी। तो येक मूर्ख।।''

पुढच्याच समासामधे रामदासस्वामी उत्तम लक्षणांचीही यादी देतात. त्यातले एक महत्त्वाचे लक्षण–

''वाट पुसिल्याविण जाऊं नये। फळ वोळखिल्याविण खाऊं नये। पडिली वस्तु घेऊ नये। येकायेकी।।''

संतांची शिकवणही आज आपण विसरू लागलो आहोत हेच खरे!

✧✧✧

# धर्मरक्षण – गरज आणि धोका

{ एप्रिल २०१८ }

सध्या मुक्त अर्थव्यवस्थेचे दिवस आहेत. या व्यवस्थेमध्ये बाजारपेठेमधील स्पर्धेला महत्त्व असते. आपल्या वस्तूला किंवा विचाराला विकण्याकरता खऱ्या-खोट्या उपायांनी सजवा-धजवायला लागते. पण हे सगळेच अल्पजीवी असते. दुर्दैवाने धर्मासारख्या मूलगामी विचाराच्या संदर्भातही अलीकडे अशाच गोष्टी होताना दिसतात. म्हणूनच त्यांचा गांभीर्याने विचार करायला हवा.

आपला धर्म हा कमीत कमी पाच हजार वर्षं जुना आहे. आपल्या विचारप्रक्रियेचे उगम ज्यामध्ये आहेत ते वेद ज्या भाषेमध्ये लिहिले गेले आहेत त्याचे व्याकरण आणि ती भाषाही आज आपल्याला संपूर्णपणे अवगत नाही.

साहाजिकच त्यामुळे काळामधले हे अंतर नक्कीच हजारो वर्षांचे असणार. पाणिनीने संस्कार केलेली ती संस्कृत भाषा. स्वतः पाणिनी आपल्या पूर्वीच्या व्याकरणकर्त्यांचा उल्लेख करतो. यावर आज प्रचंड संशोधनात्मक साहित्यही उपलब्ध आहे. हे येथे सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, आपल्या धर्म संकल्पना व त्याच्याशी निगडित असलेल्या दैवतशास्त्रापासून ते पूजेअर्चेपर्यंत त्याचा झालेला विकास हा हजारो वर्षांचा आहे. म्हणूनच इतर धर्मांना आहे तसा हिंदू धर्माला एक संस्थापक नाही. त्याचा एक धर्मग्रंथ नाही. एवढेच नाही तर, दैवतशास्त्रांवरती ज्यांचा विश्वास नाही असेही लोक या व्यवस्थेचे घटक असतात. इतर धर्मांमध्ये 'प्रेषित' व 'धर्मग्रंथ' यांच्या परिघामध्ये राहू न इच्छिणारे लोक धर्मबाह्य होतात. हिंदू धर्मामध्ये असे होत नाही. हिंदू विचाराच्या सर्वसमावेशक व उदारमतवादाचे यापेक्षा दुसरे चांगले उदाहरण आणखीन काय पाहिजे?

अशा या व्यापक संकल्पनेला काही घटक जर आकुंचित करू लागले तर त्याकडे फक्त बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. हिंदू धर्मामध्ये गाय देवता मानली आहे. तरीही या व्यवस्थेमध्ये गोमांस भक्षण करणारा वर्गही होताच. शिवाय गेली काही हजारो वर्षे स्थायिक झालेले इतर धर्मीयही गोमांस भक्षण करतच होते. शाकाहार, मांसाहार या संदर्भातही अनेक मतमतांतरे आहेत. मानवतावाद, भूतदया या सगळ्या अंगांनी याची चर्चा होत असते. पण म्हणून कोणी एकमेकांच्या जीवावर उठून या संदर्भात आपल्या विचारांशी सहमत नसलेल्या व्यक्तींचे जीव घेत नाही. दुर्दैवाने गेल्या काही महिन्यांत अशा ज्या घटना घडल्या त्या व्यथित करणाऱ्या आहेत. यापेक्षाही मोठे दुर्दैव म्हणजे या घटना हिंदू धर्माचे रक्षण करण्याच्या नावाखाली होत आहेत. त्याहीपेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे राजकीय, सामाजिक आणि धार्मिक नेतृत्वाने याची करायला हवी तेवढी निंदाही केलेली दिसत नाही. अर्थात गुळमुळीत व देखाव्याची वक्तव्ये खूप झाली. थोर क्रांतिकारक व हिंदू विचारधारेचे खंदे पुरस्कर्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही गाईला उपयुक्त पशू मानले आहे.

चीनपासून मध्य, दक्षिण आशिया खंडात बौद्ध-हिंदू तत्त्वज्ञान परंपरांचा प्रसार हा शुद्ध वैचारिक आदानप्रदानातून झाला. अनेक बौद्ध तत्त्वज्ञानाचे आणि विज्ञानाचे संस्कृत ग्रंथ त्यामुळे भाषांतरीत झाले. पूजा, सणांपेक्षा योग, आयुर्वेद यांचे ग्रंथ आणि व्यवस्थांचा स्वीकार त्या त्या संस्कृतींनी केला. यामुळेच विशेषतः दक्षिण पूर्व आशियात त्याच्या बोलींमधून मोठ्या प्रमाणावर संस्कृत शब्दही आढळतात. अहिंसक धर्मप्रसाराचे यापेक्षा चांगले उदाहरण जगात सापडणार नाही.

हिंदूंच्या धर्मप्रसार पद्धती आणि इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या पद्धती यामध्ये म्हणूनच मूलगामी फरक आढळतो.

हिंदू तत्त्वज्ञानाचा गंधही नसलेल्या, गळ्यापर्यंत भ्रष्टाचारामध्ये बुडालेल्या राजकारणी आणि व्यावसाईक बाबा आणि महंतांचे धर्म-प्रेम आणि धर्म-रक्षणाची म्हणूनच गांभीर्याने दखल घ्यायला हवी. महाराष्ट्रात तरी आपल्या सणांचा राजकारण्यांनी घेतलेला ताबा आणि त्याचे चालवलेले बकालीकरण आणि व्यावसायीकरण याचा धर्म-रक्षणाशी काडीचाही संबंध नाही हे समजून घेणे म्हणूनच गरजेचे आहे.

गेल्या दोन-चारशे वर्षांमध्ये हिंदू तत्त्वज्ञान, जीवनपद्धती आणि त्याचे प्राचीनत्व

याचा अभ्यास आणि संशोधन करण्याची स्फूर्ती जगातल्या अनेक धर्मप्रसारक आणि अभ्यासकांना झाली. ही जिज्ञासा, हिंदू गोमांस भक्षण करतात की करत नाहीत, त्यांची मूर्तीपूजा, होमहवन इत्यादींपेक्षा त्यांचे तत्त्वज्ञानाचे ग्रंथ, अर्थात उपनिषदं व दार्शनिक ग्रंथ यांच्यामुळे झाली. याची सुरुवात पाचव्या शतकामध्ये गुंडिशापूर या इराणमधल्या ज्ञानपीठापासून झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्याला सप्रमाण पुरावा आहे असा भारतातील पहिला भाषांतरीत ग्रंथ हा 'पंचतंत्र' आहे. त्यावेळी त्याचे पहेलवी व जुन्या सिरीयन भाषेमध्ये भाषांतर झाले व ८ व्या १०व्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत मध्यआशियापासून युरोपपर्यंत सर्व भाषांमध्ये त्याची भाषांतरे झाली. हा ग्रंथ देवदेवतांचा नसून प्राण्यांच्या कथांच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील व्यवहारचातुर्याचे ती उदाहरणे आहेत. त्याच सुमाराला ब्रह्मगुप्ताची गणिती कोष्टकं भाषांतरीत झाली. गणित ग्रंथांच्या भाषांतरांची ६-७ व्या शतकात सुरू झालेली ही साखळी १६ व्या शतकांपर्यंत सुरू होती. 'शून्य' आणि 'अंक' हे भारताने जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे. याबद्दल आता दुमत नाही. चौथ्या-पाचव्या शतकातील बख्शाली हस्तलिखितात त्याची नोंद आहेच, आणि सातव्या शतकातील सिरीयन धर्मगुरु सिव्हीरस सेबोख्त यांनीही हीच माहिती जगाला दिली. चिनी प्रवासी युवेश सेन (xuan zang-602-644 AD) यांनीही भारतीय जीवनपद्धतीचे बरेच वर्णन करून ठेवले आहे. आपल्या प्रसिद्ध तक्षशिला विद्यापीठात त्याने काही काळ अध्ययन केल्याचीही नोंद आहे.

१६-१७ व्या शतकात युरोपियन वसाहतवादाला सुरुवात झाली आणि भारतीय जीवनशैलीच नाही तर भारताच्या भौतिक व आधिभौतिक विचारांचा सखोल अभ्यास पाश्चात्यांनी सुरू केला. सुरुवातीला आघाडीवर फ्रेंच अभ्यासक होते. फ्रेंच राजा पंधरावा लुई याच्या ग्रंथपालाने १८ व्या शतकाच्या सुरुवातीला भारतामध्ये धर्मप्रसारासाठी आलेल्या जेजुइट धर्मप्रसारकांना संस्कृत हस्तलिखितं जमवून आणायला सांगितली. युरोपमधल्या संस्कृतच्या शास्त्रशुद्ध हस्तलिखित संग्रहांची ही सुरुवात म्हणायला हरकत नाही. बंगालमधील चंद्रनगर येथील फ्रेंच वसाहतीतील धर्म-प्रसारक जाँ फ्रांक्वाज पाँ (Jean - Francois Pons) यांनी अनेक विषयांवरील संस्कृतची हस्तलिखितं जमवून त्याचे वर्गीकरण करून फ्रान्स मधील या ग्रंथालयात जमा केली. ॲन्तोन लिओनार्द (Antoine Leonard Chezy) हे फ्रान्स व युरोपमधील पहिले संस्कृत शिक्षक. पाँच्या जमा केलेल्या संस्कृत हस्तलिखितामधून ते संस्कृत शिकले. याच परंपरेतील अनेक फ्रेंच संस्कृत अभ्यासकांनी

भारतीय खगोलशास्त्र, गणितशास्त्र व जीवनशैली यावर अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले. फ्रेंचांची ही परंपरा आजही चालू आहे. त्याहूनही अधिक मोठी परंपरा जर्मन लोकांची आहे ती सर्वांना ज्ञातच आहे. हॉलंडपासून रशियापर्यंत बहुतेक सर्व देशांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून ठेवला. दैवतशास्त्राचा अभ्यासही त्यांनी मोठ्या प्रमाणात केला असला तरीही त्यांचे खरे आकर्षण हे वेद, उपनिषदं व भारतीय दर्शनशास्त्र हेच राहिले आहे.

फ्रेचांनी या बाबतीत संस्कृत अध्ययनात आघाडी घेतली होती तरीही त्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला सुरुवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज वसाहतवाद्यांनी केली.

सर विल्यम जोन्स (Sir William Jones) यांच्याकडे या अभ्यासाचे अध्वर्युपद जाते. १७८४ साली त्यांनी बंगालला एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. १७८८ साली त्यांनी एशियाटिक रिसर्चेस (Asiatick Researches) ही संशोधन पत्रिका या अभ्यासाकरता चालू केली. त्यामध्ये भारतीय वनस्पतीशास्त्रापासून ते तत्त्वज्ञानापर्यंत अनेक लेख पुढील शतकात प्रकाशित करण्यात आले. आज आपण शिकत असलेल्या आपल्या इतिहासाचा मूळ स्रोत हे लिखाण आहे. या संशोधन पत्रिकेच्या लगेचच इंग्लंड व युरोपमध्ये त्या त्या भाषांमध्ये आवृत्याही निघू लागल्या. भारतासंबंधातील शास्त्रशुद्ध अभ्यासाला या संशोधन पत्रिकांनी १८-१९ व्या शतकामध्ये फार मोठ्या प्रमाणात हातभार लावला.

विल्यम जोन्सनी हे काम १७८४ साली चालू केले असले तरी याची खरी सुरुवात ही, जेजुईट धर्मप्रसारक आपले अनुभव व अभ्यासाची टीपणं हे पत्र स्वरूपात युरोपमध्ये आपापल्या देशात पाठवत असत त्या पत्रांमधून झाली. या पत्रसंग्रहांचे संकलन करून Lettres editiantes et curieuses या शीर्षकाखाली यांचे खंड प्रकाशित झाले. यामध्ये मात्र भारतीय तत्त्वज्ञानापेक्षा भारतीय जीवनशैली, उपासना पद्धती, मूर्तीपूजा, देवळांची रचना यांची वर्णने अधिक आहेत. १७७१ मध्ये अब्राहम अंक्वातिल द्यूपेराँ (Abraham Anquetil Du perron) यांनी पारशी धर्मग्रंथ अवेस्ताचे भाषांतर प्रकाशित केले. त्याबरोबरच त्यांनी अनेक संस्कृत हस्तलिखितेही जमा करून फ्रान्सच्या ग्रंथालयात जमा केली. दयूपेराँ या शृंखलेतील विल्यम जोन्स एवढाच महत्त्वाचा दुवा आहे. अवस्ताप्रमाणेच त्यानी औरंगजेबाचा भाऊ दारा शिकोह यांनी १६५७ मध्ये उपनिषदांचे पर्शियन भाषेतील केलेल्या भाषांतराचे फ्रेंचमध्ये भाषांतर केले. ते अप्रकाशित राहिले. १८०१-०२ मध्ये

त्याचे लॅटिनमध्ये भाषांतर झाले. अभ्यासकांच्या मते हे भाषांतर अत्यंत बोजड आणि फारसे चांगले नाही. तरीही या भाषांतराने युरोपमधील प्रज्ञावंतांमध्ये भारतीय तत्त्वज्ञानाबद्दल आकर्षण व कुतूहल निर्माण केले. आर्थर शोपेनहर (१७८८–१८६०) या जर्मन तत्त्ववेत्ता या उपनिषद तत्त्वज्ञानाने प्रभावित झाला आणि त्यामुळे १९ व्या शतकामध्ये अनेक जर्मन व फ्रेंच प्रज्ञावंतांनी वेद उपनिषद व भारतीय दार्शनिक साहित्याच्या अभ्यासाला प्राधान्य दिले. येथे पुन्हा हा मुद्दा अधोरेखित करावासा वाटतो की, शतक कुठलेही असले तरी पाश्चात्त्यांना वारंवार प्रभावित केले, संशोधनाला प्रवृत्त केले ते भारताच्या उपनिषदांमधील तत्त्वज्ञानानी.

विसाव्या शतकामध्ये आधुनिक विज्ञानाने मोठी क्रांती केली. नील्स बॉर (Niels Bohr), हायजेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger) आणि जे. रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenneimer) हे सर्व या आधुनिक विज्ञानाचे शिल्पकार. श्रोडिंगर यांनी पूंजसिद्धांताचे मूलभूत समीकरण संख्यासूत्रबद्ध केले. त्यांना नोबेल पारितोषिकही मिळाले होते. १९२५ च्या आत बाहेर, My view on the world आणि Mind and matter ही दोन अभ्यासपूर्ण पुस्तके त्यांनी लिहिली. औपनिषदीक विचारांचा त्यांच्यावरील प्रभाव त्यांनी या पुस्तकांमधून स्पष्टपणे मांडला आहे. प्रत्येक भारतीयाने ही पुस्तके वाचायला हवी. अणुस्फोटाच्या संशोधनामध्ये ऑपेनहायमर यांचा सिंहाचा वाटा आहे. अणुस्फोटा नंतर दिसलेल्या प्रकाशाचे वर्णन त्यांनी गीतेमधील खालील श्लोकानी केले आहे –

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद् युगपदुत्थिता।
यदि भाः सहशिसास्यात् भासस्तस्य महात्मना।।

भारतीय तत्त्वज्ञानाची किंमत आणि गरज ही बाजारी वस्तूंच्या किंमतीपेक्षा कितीतरी मौल्यवान आहे. भारतीय जीवनशैली, देवताशास्त्रापासून स्थापत्य शास्त्रापर्यंत सखोल संशोधन झालं असलं तरीही, शतकोन–शतकं उपनिषदं, आणि दार्शनिक तत्त्वज्ञानानी जगातील सर्व प्रज्ञावंतांना नवीन विचार करण्यास उद्युक्त केले आहे.

आज आपण आपल्या सणांपासून देवतांपर्यंत सर्वांचं बाजारीकरण केलं आहे. दहीहंडी असो, गणेशोत्सव असो किंवा दिवाळी असो त्यांचा ताबा आज राजकारण्यांनी घेऊन त्याचे व्यावसायिकरण केले आहे. आज आपणच आपल्या तत्त्वज्ञानाला पारखे झालो आहोत. सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रांतील दिवाळखोरीच याला जबाबदार आहे. भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या दानाची

मोठमोठ्या मंदिरांमधून चाललेली लूटमार लाजीरवाणीच नाही तर क्लेशकारक आहे. यातूनच चारित्र्यहीन, दिशाहीन, जडवादी समाज निर्माण होतो. त्याची प्रेरणास्थळंच नष्ट झाल्यावर सगळ्याच गोष्टींवरचा त्यांचा विश्वास उडतो.

स्वयंघोषित, अति उत्साही धर्मरक्षक आणि धर्माची ढाल पुढे करून त्यामागे राजकारण करणाऱ्यांकडे धर्मरक्षणाची जबाबदारी सोपवणे धोक्याचेच नाही, तर आत्मघातकीही आहे. पूजेपेक्षा यांचा डोळा वर्गणी आणि देणगीवर असतो. अशा तत्त्वांना वर्गणीच नाही, तर भावनिक पुरस्कारही देऊ नका. धर्म-रक्षणाकरता त्यांचा प्रतिकार करा. आज खरी गरज आहे ती हा धोका ओळखून, आपल्या धर्माचे 'सनातन' तत्त्व जाणून घेण्याची. तेच खरे 'धर्म' रक्षण आहे.

✧✧✧

# धर्म आणि अल्झायमर

{ जुलै २०१८ }

जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूमधला प्रवास म्हणजे 'जीवन.' पण या बिंदूंना जोडणारी रेषा ही सरळ नसते. अनेक व्यक्त-अव्यक्त वळणे तिने घेतलेली असतात. म्हणून जीवन हे जगावे लागते. अनुभवासारखा दुसरा शिक्षक नाही हे म्हणूनच म्हटले जाते. आयुष्यामध्ये वय जसे वाढत जाते तसे सगळ्याच अवयवांची क्षमता शिथिल होत जाते. पण अनुभवाला जर का 'अवयव' म्हटलं तर तो मात्र जास्त 'प्रगल्भ' आणि 'मार्गदर्शक' होत असतो.

माणसाचा इतिहास हा काही लाखो वर्षांचा आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या त्याच्या गरजा सुरुवातीपासून आजही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. मानवाच्या उत्क्रांतीवर डार्विन नंतर बरेच लेखन झाले आहे. पण त्याच्या उत्क्रांतीची सर्वात मोठी प्रमाणं ही त्यांनीच निर्माण केलेल्या 'साहित्य', 'शिल्प', 'कला', 'नीती', 'अनीती'च्या कल्पना यातून शोधावी लागतात.

अलीकडे 'अल्झायमर' हा रोग आपणा सर्वांना परिचित झाला आहे. या रोगामध्ये मनुष्य असतो तसाच दिसतो, पण तो स्वतः मात्र सर्व काही विसरलेला असतो. काहीशी अशीच परिस्थिती आपल्या धर्म आणि इतिहासाची झालेली आहे.

नवं आणि जुनं या शब्दांना जोडलेले सांस्कृतिक भार अनेकवेळा 'क्षमतांचे' सांस्कृतिक पूर्वग्रह निर्माण करतात. जुने म्हणजे मागासलेले, अप्रगत, उपयुक्तता हरवलेले; तर नवीन म्हणजे आधुनिक, प्रगतीशील व उपयुक्त असा अगदी सहज समज होऊन जातो. एखादं यंत्र किंवा औषध इत्यादी तत्सम गोष्टींच्या बाबतीत तो खराही असतो. पण मानवाच्या इतिहासाच्या संदर्भामध्ये, सृजनशीलतेच्या क्षमतेच्या

संदर्भात तो खरा असेल असं नक्कीच नाही. १५०० वर्षांपूर्वीची अजंठामधील भित्तिचित्रे किंवा हजार वर्षापूर्वीची दक्षिणेतील मंदिरे ही खूप जुनी झाली, पण ते निर्माण करणारे कल्पक हात जुने होते असं म्हणणं कलेवरच नाही तर त्या संस्कृतीवरही अन्यायकारक आहे. अडीच हजार वर्षांपूर्वीचा भाषावैज्ञानिक पाणिनी हा जुना आहे, म्हणून भाषा-विज्ञानामध्ये तो कमी दर्जाचा ठरतो का? आपल्या इतिहासामध्ये अशी अनेक उदाहरणे देता येतील.

यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो, या कलाकारांना किंवा पाणिनीला त्यांची कल्पकता आणि सृजनतेला उत्तेजित करणारा पोषक समाजही त्याकाळी असणारच ना?

दुर्दैवाने वर्ग-संघर्षाच्या सिद्धांताच्या विचाराची काविळ झालेले इतिहासकार मात्र असा विचार करायला तयार नाहीत. त्यांच्या दृष्टीने विशेषतः भारतीय इतिहास व धर्मसंकल्पनेच्या बाबतीत 'वर्गसंघर्ष' हाच फक्त चालू होता. यातूनच हजारो वर्षांच्या अन्यायाच्या कपोलकल्पित कथांचा उगम होतो.

एकदा आपला इतिहास हा एकमेकांच्या उरावर बसून विषमता पसरवणारा होता असा ग्रह करून सुधारणांना सुरुवात केली, की आपली आजची परिस्थिती निर्माण होते. सुधारणा म्हणजे तोडफोड नाही. कुठल्याही जुन्या व्यवस्थेमध्ये अनेक कोळीष्टकं जमा झालेली असतात. चांगल्या-वाईट गोष्टीही असतात. फक्त चांगली किंवा फक्त वाईट अशी कुठलीच व्यवस्था नसते. म्हणूनच सुधारकाला मूळ व्यवस्थेमागील विचार समजून घेऊन त्यावर आलेली जळमटे, अव्यवस्था दूर करायची असते. व्यवस्थाच संपुष्टात आणायची नसते. विशेषतः जी व्यवस्था सहस्रावधी वर्षांच्या अनुभवांतून तावून-सुलाखून निघालेली असते त्यांच्या बाबतीत तर हा विचार अतिशय गांभीर्याने करावा लागतो. कुठलीही व्यवस्था निर्माण करणे ही गोष्ट साधी नसते. साहजिकच अशावेळी नक्कल करण्याची प्रवृत्ती बळावते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात म्हणजे इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या काळात आपल्या सुधारणांमध्ये अनेक ठिकाणी ही प्रवृत्ती दिसून येते. इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या समर्थनार्थ त्यांचा एक महत्त्वाचा दावा हा तुम्हाला सुसंस्कृत करण्याचा होता (Civilising mission). म्हणजे तुमची संस्कृती मागासलेली आहे, तुमचा धर्म अंधश्रद्धेने बरबटलेला आहे हे पटवून देण्याकरता आधी सर्व व्यूहरचना करायची, आणि मग तुम्हाला जर का आधुनिक, प्रगतिशील व्हायचं असेल तर 'पाश्चात्त्य'

आचार-विचार आणि विज्ञानाचा स्वीकार करा हा पर्याय द्यायचा; यात 'असंबद्ध' चालीरीती किंवा 'अंधश्रद्धा' दूर करण्यापेक्षा तुमच्या 'धर्म' व 'श्रद्धे'ला तिलांजली देणे हाच मुख्य हेतू होता. ख्रिस्तीधर्मप्रसारकांनी अत्यंत कुशलतेने नोकरशहांच्या माध्यमातून तो राबवला.

मेकॉलेने शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल केला. त्याला हाडामांसाचे भारतीय आणि आचार-विचारांनी पाश्चिमात्य असे भारतीय बनायचे होते. फार थोड्या काळात त्याला यात यश मिळाले. अनेक स्वकीयांमध्येही आपल्या व्यवस्थेबद्दल 'न्यूनगंड' आणि साम्राज्यवाद अबाधीत ठेवण्याच्या विषाणूंची लागण झाली होती. दुर्दैवाने लोकहितवादी किंवा न्या. महादेव गोविंद रानडे यांना इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान असल्यासारखे भासे ते यामुळेच.

आपल्या धर्म आणि संस्कृती बद्दल झालेला 'अल्झायमर'चा रोग सगळ्यांना दिसत नसला तरी विष्णुशास्त्री चिपळुणकरांना मात्र त्यावेळीही तो दिसून आला होता. आपल्या 'काव्येतिहास संग्रह' या निबंधात ते लिहितात,-

''आपल्या आजा-पणज्यांचे नांव वेळेनुसार आठवायचे नाही. रामायणातील, महाभारतातील अति प्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीही माहीत नसतील, पण ग्रीस व रोमच्या इतिहासातील शक विचारा किंवा इंग्लंडची वंशावळ म्हणायला सांगा, म्हणजे विल्यम् राजापासून तो तहत केसर-इ हिंदपर्यंत तडक आगगाडी! मोरोपंताची सामान्य आर्या लागायची नाही, तुकारामाचे साधारण अवतरण लक्षात यावयाचे नाही; पण इंग्रजी कवितेतली काय ती सर्व माहिती! याप्रमाणेच धर्माचीही गोष्ट. आता कोणतेही ज्ञान संपादन केले तरी ते प्रशस्थच होय हे खरे, पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारो कोसांवरच्या मुलखांची! हे हास्यापद होय यात संशय नाही, शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार, व त्यास सुधारणेची कला आणणार, त्यांस तर वरच्यासारखा 'दिव्याखाली अंधार' अगदीच उपयोगी नाही. तर मॉरिस साहेब सांगतील तो आमचा इतिहास, मेकॉलेबाबा सांगतील ती आमची नीती, डॉ. विल्सन सांगतील तो धर्म, ही लज्जास्पद स्थिती आजपर्यंत जी चालत आली... तीच पुढे चालू नसावी असे ज्यांच्या मनात असेल त्यांनी हल्ली प्राचीन विद्येच्या उज्जीवनार्थ जे प्रकृत पुस्तकासारखे उद्योग आमच्या काही देशबंधूंनी हाती धरले आहेत त्यांचा चांगला पुरस्कार करणे अत्यंत आवश्यक होय.

नवशिक्षित भारतीयांची ही परिस्थिती का बरे झाली होती?

याचे एक मुख्य कारण म्हणजे, भारतीयांचे परंपरागत शिक्षण हे 'जुने' आणि 'उपयुक्त' नाही म्हणून बंद करा, आणि पाश्चिमात्य धाटणीचे 'नवीन' व 'उपयुक्त' शिक्षण त्यांना द्या या विचारामध्ये आहे. पाणिनी, कालिदास यांचे हे सगळे ग्रंथ इतिहासजमा करण्यात आले आणि त्यांच्या जागी धर्मप्रसारकांनी लिहिलेला भारताचा इतिहास आणि नव-विज्ञान शिकवायला सुरुवात झाली.

जेम्स मिल या धर्मप्रसारकाने सहा खंडांमध्ये "History of British India" हा भारताचा इतिहास १८१७ साली लिहिला. ICS अधिकाऱ्यांना तर याची पारायणे करावी लागायची, पण नवशिक्षित भारतीयांनाही हाच इतिहास वाचावा लागे. पुस्तकाच्या आवृत्यावर आवृत्या निघू लागल्या. जेम्स मिल यांच्या पुस्तकातील ''General Reflections'' मध्ये हिंदूबद्दल त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे 'वाचनीय' आहेत.

"Under the glosing exterior of the Hindu, lies a general disposition to deceit and perfidy... "the same insincerity, mendacity, and perfidy; the same indifference to the feelings of others; the same prostitution and venality"..."In truth, the Hindoo like the eunuch, excels in the qualities of a slave"... "dissembling, treacherous, mendacious, to an excess which surpasses even the usual measure of uncultivated society." "In physical sense, disgustingly unclean in their persons and houses"...

१८४०च्या सुमाराला त्याच्या नव्या आवृत्तीला H. H. Wilton या संस्कृत पंडिताने प्रस्तावना लिहिली आहे. मिल चे सर्व संदर्भ हे ख्रिस्ती धर्म प्रसारकांचे होते. या संदर्भात विल्सन यांनाही हे मान्य करावे लागले आणि आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात,-

"As missionaries...they see the emors and vices of a heathen people through a medium by which they are exaggerated beyond their natural dimension, and assume an enormity which would not be assigned to the very same defects in christians".

विन्सेंट स्मिथ (Vincent Smith) यांचे "The Early History of India" हे असंच भारताच्या इतिहासावरील एक प्रभावी पुस्तक. १९१४ साली त्याची ३ री आवृत्ती निघाली. भारत हे 'एकसंघ' राष्ट्र केव्हाच नव्हते, हा विन्सेंट स्मिथ यांचा प्रमुख सिद्धांत, इंग्रजांच्या साम्राज्यवादाचे समर्थन करण्याकरता मांडला गेलेला हा

सिद्धांत. विन्सेंट स्मिथ यांनी भारतीय कलांवरही बरेच लिखाण केले आहे. त्यांच्या मते "India has never produced an artist of original genius in either painting or sculpture" (Imperial Gazetter, ii, 131).

या सगळ्यांचा परिपाक होता तो म्हणजे आपला धर्मच आपल्या अधोगतीला कारणीभूत आहे या समजूतीचा. आपल्याकडील अनेक सुधारकांचाही रोख तोच होता. वास्तविक आपल्या धर्म या संकल्पनेमध्ये फार मोठी व्यापकता व सर्वसमावेशकता आहे. मानवी सृजनशीलतेला आड येईल असे कुठलेही प्रमाणवचन (dogma) त्यात नाही. वात्स्यायनाचे 'कामसूत्र' हे म्हणूनच आपल्याकडे रसिकतेने स्वीकारले गेले. खजूराहोच्या शिल्पांच्यासमोर कधीही धर्ममार्तंडांची आंदोलने झाली नाहीत. उलट कलेचा एक उत्कृष्ट आविष्कार म्हणून त्याकडे पाहिले गेले. एवढेच कशाला, चार्वाक तत्त्वज्ञानही आपल्या दर्शनाचा एक भाग म्हणून अभ्यासले जाते. मतप्रवाह, मतभिन्नता ती लिहायला, वाचायला वा व्यक्त करायला धर्माची कधी आडकाठी आली नाही.

धर्माचा अर्थ, 'किती वेळा आचमन करा, किंवा पूजा करा' असा केव्हाही नव्हता. इतर व्यवस्थांप्रमाणेच 'कर्मकांड' हाही त्याचा एक भाग होता, पण कर्मकांड म्हणजेच धर्म नव्हता. ही संकल्पना ख्रिस्ती धर्म प्रसारकांना आकलन होणे अशक्य होते. त्यांच्याकडे त्यांचे चर्च आणि धर्मगुरू हेच त्यांच्या पंथांचे रक्षणकर्ते आणि मार्गदर्शक होते. सर्व समाजाचे भवितव्य त्यांच्या हातात असे. प्रबोधनपूर्व काळात त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचारही माजला होता. आपल्या वर्णव्यवस्थेतील ब्राह्मण हे त्यांना असेच पुजारी वाटले. पुजारी ब्राह्मण होते पण सगळे ब्राह्मण हे पुजारी नव्हते. दुर्दैवाने धर्माचे भाषांतर इंग्रजीमध्ये 'Religion' असे केले गेले आणि 'Religion' चा अर्थ 'धर्मा'वर लादला गेला.

'Religion मध्ये एक प्रेषित असतो व एक धर्मग्रंथ असतो आणि त्या परिघातच त्या पंथाच्या सभासदाला वावरावे लागते. ख्रिस्ती धर्माचा प्रेषित 'येशू' हा आहे, तर 'बायबल' हा त्याचा धर्मग्रंथ आहे. इस्लामचा 'मुहम्मद' हा प्रेषित आहे तर, 'कुराण' हा धर्मग्रंथ आहे. आपल्याकडेही शैव, वैष्णव हे संप्रदाय हे 'Religion' संकल्पनेच्या जवळचे असले तरी ते हिंदू धर्माचे अविभाज्य भाग आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे 'धर्म' या व्यापक संकल्पनेमध्ये 'संप्रदाय' किंवा 'पंथ' असू शकतात, पण म्हणून त्या पंथाच्या परिघाबाहेर असलेले सभासद धर्मबाह्य होत नाहीत. एवढेच कशाला, तर मानवा व्यतिरिक्त, सृष्टीमधील प्रत्येक

घटकामध्ये त्याच चैतन्याचे सातत्य धर्मामध्ये अभिप्रेत आहे. अगदी अलीकडेपर्यंत आपल्याकडील सामान्य माणूसही 'जळी स्थळी, काष्ठी, पाषाणी' परमेश्वर आहे असेच मानत होता.

सर्व कला, साहित्य, भौतिक आणि आधिभौतिक संकल्पना या आपल्या व्यापक, सर्व समावेशक 'धर्म' विचाराच्या अविभाज्य भाग होत्या. जुडोख्रिस्ती पंथामध्ये या संकल्पनांमध्ये द्वंद होते. म्हणूनच त्यांना हिंदू चित्रकला आणि शिल्पांचे आकलन होऊ शकले नाही. पार्थ मिट्टर (Partha Mitter) या कला इतिहासाच्या अभ्यासकांनी आपल्या Much Maligned Monster या पुस्तकात याचा चांगला समाचार घेतला आहे. १६ व्या शतकातल्या प्रवाशांपासून, १९ व्या शतकातील तत्त्वज्ञ हेगेल ते रस्किन पर्यंत सर्वांनी भारतीय चित्रकला किंवा शिल्प, ख्रिस्ती विचारांच्या दृष्टीने बघितली. त्यांच्यामागील भारतीय 'तत्त्वविचार' त्यांना समजू शकला नाही. मिट्टर यांची आपल्या पुस्तकातील प्रस्तावनेतील टिप्पणी बोलकी आहे,-

"Arguably, Indian art presented a test case for the Western understanding of India, because it's aesthetic standards differed so much from those of the classical West. In the early periods of European exploration of Asia, travellers saw Hindu sacred images as infernal creatures and diabolic multiple limbed monsters.........what is remarkable is that the attitude persisted even into the modern period...........Thus, Hegele saw in the supposedly formless images of Indian art an expression of Indian mentality which was identified by him as dreaming consciousness.......... Ruskin approved of the sense of colour and form of the native Indian craftsman but abhorred Indian sculpture, painting, and architecture as representing unchristian ethos"

दुर्दैवाने पाश्चात्त्य शिक्षणाबरोबर आपल्या धर्म संकल्पनेचेही 'पाश्चात्त्यीकरण' झाले. 'व्यष्टी', 'समष्टी', 'ब्रह्म', 'आत्मा' या संकल्पना, पाश्चात्त्यांनाच नाही तर आपल्यालाही अनाकलनीय झाल्या.

सुदैवाने पाश्चात्त्य देशांमधील शरीरशास्त्राचे अभ्यासक जेव्हा हिंदू संकल्पनांचा अभ्यास करू लागले, तेव्हा त्यांना भारतीय विचारांचे झालेले पाश्चिमात्यीकरण व त्यामधून निर्माण झालेला 'संभ्रम' प्रकर्षाने दिसू लागला. डॉ. जून सिंगर या विश्लेषक मानसशास्त्रा (Analytical - Psychology) च्या प्रख्यात विदुषी. १९७७ साली त्यांनी Androgyny : Towards a New Theory of Sexuality हा विचारप्रवर्तक

ग्रंथ प्रकाशित केला. त्यात त्यांनी पुरुष-प्रकृती आणि ‘शिव-शक्ती’ या भारतीय संकल्पनेवर एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. आपल्या या पुस्तकात त्या म्हणतात,-

‘‘पाश्चात्त्यांनी प्रशंसिलेली भौतिकवादी मूल्ये आत्मसात करण्यात आज पौर्वात्य आपले श्रम खर्चीत आहेत, अशावेळी पौर्वात्यांच्या महान अलौकिक परंपरांचे जतन करणाऱ्या काही लोकांना आश्रय देण्याचे प्रयत्न अमेरिका करत आहे ही एक उपरोधाची घटना आहे. आशिया खंडाचे प्राचीन वाङ्मय व संस्कृती ही (व्यवस्थित) ग्रथित व जतन करण्याची जरुरी आहे. ह्या कल्पनेला काही दूरदर्शी लोकांनी (पौर्वात्यांनी) प्रतिसाद दिलेला आहे. त्याचा परिणाम म्हणजे आमच्या देशांत (अमेरिकेत) व आमच्या काळात या (पौर्वात्य) विद्या पुनर्जन्म घेतील. पण हे होण्याकरिता ह्या विद्या ज्यांना अवगत आहेत त्यांनी त्यांचा प्रसार करण्याच्या मार्गासंबंधी (योग्य ती) खबरदारी घेतली पाहिजे. आमच्या (पाश्चात्त्यांच्या) ज्यूडिओ-ख्रिश्चन परंपरेने आत्म्याचे प्रचंड सामर्थ्य शारीरिक मार्गांनी अनुभवण्याची क्षमता आम्हाला प्रदान केलेली नाही. ह्या (पौर्वात्य) प्रज्ञावंतांनी शिकवलेले शिकण्याची ग्रहणशक्ती अंगात बाळगण्यापूर्वी आम्हाला आपल्या वृत्तीमध्ये व जीवनमार्गामध्ये पुष्कळसे बदल करावे लागतील. ह्या विरोधाचे बुद्ध्या एकात्मीकरण करण्याची जरुरी आहे ह्याची तर त्यांना (पौर्वात्य प्रज्ञावंतांना) जाणीव आहेच- विशेषतः पुरुषतत्त्व व स्त्रीतत्त्व यांचे एकात्मीकरण- पण अशा प्रकारच्या एकात्मीकरणाची प्रक्रिया मनुष्याच्या शरीरात होऊन ते त्यांच्या जीवनात उतरावे ह्याकरिता त्यांनी सुस्पष्ट विधी तयार केले आहेत. हे करताना त्यांनी मन व शरीर यांतील द्वंद्व विसर्जित केले आहे.’’

(भाषांतर : पंढरीनाथ प्रभू यांच्या ‘भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास’ या पुस्तकातून)

दुर्दैवाने ख्रिस्ती धर्म प्रसारकांनी आपल्या धर्मविचारांची जेवढी हानी केली नाही तेवढी आज भाषा, अस्मिता यांचा व्यापार करणारे करत आहेत. आपल्या उत्सवांना आपण अक्षरशः रस्त्यावर आणून ठेवलंय. त्यातली भक्ती, कला, श्रद्धा केव्हाच लुप्त झाली आहे. राजकारण्यांनी त्याचे व्यावसायिकरण करून या सगळ्याचे प्रचंड अवमूल्यन केले आहे. असा धिंगाणा आणि मस्ती म्हणजेच ‘धर्मरक्षण’ असा एक समज आपल्याकडे आज दृढ झालेला दिसतो. न्यायालयांनी याची दखल घेऊन सरकार व पोलिस यांना या धिंगाण्यावर आवर घालण्याची वारंवार विनंती केली. दुर्दैवानी आज या सर्व व्यवस्था एवढ्या भ्रष्ट व सडल्या आहेत की, आपण

धर्माच्या नावाखाली विकृतीला प्रोत्साहन देत आहोत याचेही त्यांना भान राहिलेले नाही.

संत, महंत सध्या मोठ्या प्रमाणावर बोकाळले आहेत. राम-रहीम, आसाराबापू यांनी श्रद्धाळूंचा केलेला व्यापार चीड आणणारा आहे. धर्माच्या मूळ संकल्पनेशी आपण केव्हाच फारकत घेतली आहे. आपल्या इतक्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या जगात कुठेच साजऱ्या होत नाहीत.

भारतीय 'धर्म' संकल्पनेत पंथ, संप्रदाय मानणारे आणि झिडकारणारे या सगळ्यांचा अंतर्भाव आहे. अशा सर्वसमावेशक संकल्पनेला 'निधर्मी' करणे आत्मघातकी आणि हास्यास्पद आहे. अशा जीवन-दिग्दर्शक धर्मातील विचारतत्त्वापासून समाजाला निवृत्त केले की आजच्या सारखा दिशाहीन, गोंधळलेला, कायम असंतुष्ट, मतलबी समाज निर्माण होतो.

स्मृतिभ्रंशा इतकेच, स्मृतीरंजनही धोकादायक असते. जीवनात वेड्यावाकड्या वळणांची दाहकता कमी करायची असेल तर निदान सामान्य माणसाला तरी श्रद्धेची गरज असते.

म्हणूनच अशा अति स्मृतिरंजन करणाऱ्या व श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांपासून धर्माचे रक्षण होणे गरजेचे आहे.

✧✧✧

# उत्सवांची परंपरा आणि इतिहास

{ ऑक्टोबर २०१८ }

कुठल्याही समाजाचे सण आणि उत्सव हे त्याच्या संस्कृतीचे प्रतिबिंब असते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. भारत हा एक अति प्राचीन देश आहे. भारताचे जगाला दिलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे भाषाविज्ञान. संस्कृत हे त्याचेच अपत्य. जगातल्या बहुतेक सर्व सभ्यता ज्या आज माहिती आहेत, त्या त्यांच्या भाषांमुळे. अनेक सभ्यता नष्ट झाल्या असल्या तरीही त्यांचे लिखाण कुठे तरी उत्खननांत सापडते. सुदैवाने भारतात मात्र संस्कृत भाषा कमीत कमी २५०० वर्षे प्रचलित आहे आणि त्यामध्ये प्रचंड साहित्य निर्माण केले गेले आहे. आपल्या सण आणि उत्सवांची माहिती, वर्णनं या साहित्यामध्ये शोधता येतात. पण तो अभ्यासाचा विषय असतो. आपण एखादा सण किंवा उत्सव साजरा करतो तो परंपरेने आपल्यापर्यंत आलेला असतो म्हणून. आपले अनेक सण आणि त्यावेळी होणारे उत्सव याचा कुठेतरी निसर्गाशी संबंध असतो. या पार्श्वभूमीवर सध्याचे आपण साजरे करत असलेले दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव हे सण बघायला लागतात.

आज या सणांचे बकालीकरण, व्यावसायिकरण आणि राजकियीकरण झाले आहे. या सणांच्या इतिहासामध्ये डोकावून पाहिलं तरी २५-३० वर्षांपूर्वी देखील आपण हे सण असे साजरे करत नव्हतो. परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली एक अत्यंत हिडीस आणि विकृत प्रथा रुजू होत आहे. ती विकृती अशीच चालू दिली तर कालांतराने त्यावर 'परंपरा' आणि 'प्रथेचे' शिकामोर्तब होईल. म्हणून याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

बहुतेक सण किंवा उत्सव हे जरी धर्माच्या चौकटीत बसवले असले तरी, त्याला एक समाजशास्त्रीय असा महत्त्वाचा आशय असतो. आधुनिक जीवनशैलीमध्ये आपल्या राहणीमानामध्ये इतके प्रचंड बदल झाले आहेत की, यातल्या अनेक सणांनी त्यांचा आशयही आज हरवला आहे. कित्येक कुटुंबामधून एक परंपरा किंवा प्रथा म्हणूनच ते आज साजरे केले जातात. कुटुंबाला एकत्र आणण्याचा यातला आशय मात्र यातून नक्की साध्य होतो. हे जरी खरं असलं तरी आजच्या सणांच्या स्वरूपामध्ये हजारोंनी लोक सामील होतात. त्यात येणारे नाच, गाणी, ध्वनीप्रदूषण यात आपले कुठतरी चुकतंय हेही कदाचित त्यांच्या लक्षात येत असेल. पण तरीही ते असे का वागतात याचा मनो-सामाजिक अभ्यास होणे आवश्यक आहे.

या सण व उत्सवांच्या सार्वत्रिकीकरणाचे नेतृत्व आज संपूर्णतया धटींगणांच्या हातात गेले आहे. समाजाने आपले सारासार-विवेकी, प्रगल्भ नेतृत्व हरवलं आहे का? अशा नेतृत्वाच्या निर्मितीसाठी हवी असलेली सामाजिक परिस्थिती आज महाराष्ट्राने गमावली आहे का? असे अनेक प्रश्न पडतात, आणि मग या सर्वांचा विचार आपल्याला इतिहासात डोकावून करावा लागतो.

इतिहासाचा अभ्यास म्हणजे केवळ सणावळ्यांची जंत्री नाही. आपण वर बघितल्याप्रमाणे ते तत्कालीन समाजाचे प्रतिबिंबच असते. आधुनिक भारताचे एक अभ्यासक थॉमस ट्रॉटमन (Thomas Trautman) यांनी "The Past in the Present" या आपल्या लेखाची सुरुवातच मुळी इतिहास म्हणजे काय? या टिपणीने केली आहे. ते म्हणतात,

" .... that the ancient past is essential to the understanding of the present because the past lives in the present. If the argument succeeds it follows that the study of ancient history is not something that comes to an end at some date in the past, but has a continuing life in the present. It also follows that historians of the recent past cannot elucidate their field fully without the help of historians of the ancient past. It is not easy to demonstrate, because contemporary forces actively tried the continuing life of the past in the present. The hiddenness of this history is produced."

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाचे सार्वत्रिकीकरण केले, तसेच त्यांनी शिवजयंती उत्सवही साजरा करवला होता. त्यांचा तत्कालीन संदर्भ आपण स्वातंत्र्यलढ्याशी जोडतो. गणपती उत्सवामुळे लोक एकत्र येतात. त्यांच्यापुढे केलेल्या भाषणांच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याला दिशा देण्याचे काम करता येणे

शक्य होते हा हेतू त्यात नक्कीच होता. पण तो तेवढ्यापुरताच सीमित होता का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुढे काय? प्रबुद्ध, प्रगल्भ समाजच स्वातंत्र्य टिकवू शकतो. उत्सव हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम होऊ शकते हा दृष्टीकोन लोकमान्य टिळकांचा नक्कीच होता.

गणपती ही बुद्धीची देवता आहे. तशीच ती कला व सृजनाचीही देवता आहे. विद्येच्या माध्यमातून आपण सारासार विचार आणि विवेक साधू शकतो. स्वातंत्र्यानंतर अनेक संस्थांची निर्मितीसुद्धा आवश्यक होती. गणपती उत्सवाला सार्वत्रिक करण्यामागे टिळकांचा हाही हेतू असू शकतो का?

टिळकांचे केसरीमधील काही अग्रलेख आणि इतर वाङ्‌मयाचा अभ्यास केला तर गणपतीची म्हणजे बुद्धीच्या देवतेची त्यांनी का निवड केली असावी याचे उत्तर आपल्याला नक्कीच शोधता येते.

तोच प्रश्न शिवजयंतीचा आहे. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. निवडक मावळ्यांची सेना निर्माण करून गनीमी काव्याने औरंगजेबाचे मोगली आक्रमण दक्षिणेकडे त्यांनी थांबवले. पण शिवाजी महाराजांनाही अभिप्रेत असलेला सुजाण, विवेकी समाज निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाकडे आपण फारसे लक्ष देत नाही. लढाई जिंकणं एकवेळ सोपं असतं, पण प्रगल्भ समाज निर्मिती ही सोपी गोष्ट नसते. त्याची आयुधं वेगळी असतात.

स्वराज्याला स्वतःची भाषा असावी लागते. तत्कालीन मराठी भाषा ही साहाजिकच इस्लामी आक्रमणांमुळे उर्दू व फारसी युक्त झाली होती. महाराजांनी 'राज्यव्यवहारकोशा'ची निर्मिती करून भाषाशुद्धीचा पहिला प्रयत्न केला. त्यांनी फारसी, उर्दू शब्दांना संस्कृत पर्याय दिले. वजीराच्या ऐवजी प्रधान, दिवाणच्या ऐवजी सचिव, सेनापती, सुमंत, आमात्य, न्यायाधीश हे आजच्या मराठीत वापरले जाणारे शब्द ही या कोशाचीच देणगी आहे. इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी संशोधनामधून हे दाखवून दिले आहे की, १६२८ साली तत्कालीन मराठी पत्रलेखनामध्ये मराठी शब्दांचे प्रमाण फक्त १४.४% होते, १६७७ साली ते ६२.०७% इतके झाले, तर १७२८ मध्ये ते ९३.७% पर्यंत वाढले. भाषाशुद्धीच्या या चळवळीला पुढे हातभार सावरकरांनी लावला. १९२४ साली सावरकरांनी मराठी भाषेच्या शुद्धीकरणावर केसरीमध्ये लेख लिहिले होते. दिनांक, नगरपालिका, महापौर, दूरदर्शन, शिरगणती, ध्वनिक्षेपक असे अनेक शब्द सावरकरांनी आपल्याला दिले आहेत.

हिंदूंच्या दैनंदिन व्यवहारांप्रमाणेच त्यांच्या सणांना मार्गदर्शक असते ते पंचांग. भारतीयांचे गणितात असलेले योगदान आज सर्वमान्य आहे. पंचांग निर्मिती करिता ग्रहताऱ्यांचे प्रत्यक्ष वेध घेऊन गणिती कोष्टकं मांडावी लागतात. शिवाजी महाराजांच्या काळी गणेश दैवज्ञ या मराठी गणितज्ञाने १५२० साली लिहिलेला 'ग्रहलाघव' हा ग्रंथ वापरला जात असे. प्रत्येक शतकामध्ये वेध घेऊन अशी पंचागे तयार करावी लागतात. नाहीतर पंचांगामधील नक्षत्र व वस्तुस्थिती यात तफावत निर्माण होते. सतराव्या शतकात अशी तफावत निर्माण झाली होती. शिवाजी महाराजांनी कृष्णदैवज्ञ या खगोलशास्त्रीयाकडून 'करणकौस्तुभ' हा दृक्प्रत्ययी ग्रंथ तयार करून घेतला. केवढी मोठी दूरदृष्टी महाराजांनी यात दाखवली होती. कृष्णदैवज्ञांनी 'तंत्ररत्न' हा खगोलशास्त्रीय ग्रंथही लिहिला होता. दुर्दैवाने तो आज उपलब्ध नाही.

१९९० नंतर शिकागो, अमेरिका येथे दक्षिण आशियाच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी, भारतात इंग्रजी वसाहत सुरू व्हायच्या आधीच्या साहित्याच्या अभ्यासाला सुरुवात केली. आज त्याचे काही खंड प्रकाशितही झाले आहेत. शेल्डन पोलॉक हे त्यातील एक अभ्यासक. नीलकंठ चतुर्धर यांची संस्कृतमधील महाभारतावरील टीका प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांनी ही टीका लिहिली. महाभारतावरील एक प्रमाणभूत टीका म्हणून सबंध भारतभर ती प्रसिद्ध आहे. ही टीका लिहिण्याकरता नीलकंठ यांना महाराजांनी प्रोत्साहित केले होते हे शेल्डन पोलॉक यांनी नमूद केले आहे.

लोकमान्य टिळकांना गणपती आणि शिवजयंती उत्सव यांच्या सार्वत्रिकीकरणामागे प्रबोधनाबरोबरच व्यवस्थाशुद्धी हाही हेतू असू शकतो हे आपण कधीच विचारात घेतलेलं दिसत नाही. ७० वर्षांनंतर आज आपल्या स्वातंत्र्याची काय परिस्थिती आहे? भौगोलिक स्वातंत्र्य हे जेवढे महत्त्वाचे असते, तेवढेच सांस्कृतिक, व सामाजिक स्वातंत्र्य हेही महत्त्वाचे असते. एकंदरीतच आपला आजचा संस्कृतीचा प्रवास हा पाश्चिमात्य संस्कृतीच्या गुलामगिरीच्या दिशेने चालू आहे. पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये असलेला सारासार विवेक, संशोधनवृत्ती, तारतम्य या कशाचाच स्वीकार न करता, त्यांचा चंगळवाद मात्र आपण संदर्भ सोडून घेत आहोत.

दुर्दैवाने संस्कृती आणि परंपरेच्या रक्षणाच्या नावाखाली आजच्या दहीहंडी व गणेशोत्सवाने जे रूप धारण केले आहे ते आत्मघातकी आणि अभिरुचीहीन समाज निर्माण करणारे आहे. सर्जनाची, भरीव, रेखीव करण्याची क्षमता हरवलेला

समाज यातून निर्माण होत आहे. लोकमान्यांच्या मूळ हेतूच्या बरोबर विरुद्ध गोष्टी परंपरेच्या नावाखाली आज होत आहेत.

या वर्षी विसर्जनाच्यावेळी ३५-४० जणांना नाहक आपला जीव गमवावा लागला. दहिहंडीच्या बक्षिसांपासून गणपतीच्या मंडपांकरता अक्षरशः हजारो कोटी रुपये आपण दरवर्षी खर्च करीत आहोत. तरीही लाखोंच्या संख्येनी आम्ही 'मागासलेले' आहोत म्हणून मोर्चेही काढत आहोत.

सरकार किंवा पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे साथीच्या रोगासारखी या उन्मादी सणांची लागण आज खेडोपाडी पसरत आहे. न्यायालयाने घालून दिलेले आदेशही न पाळणे हे आज पुरुषार्थाचे लक्षण होऊन बसले आहे. सार्वजनिक गणपतींची उंची असो, किंवा बळजबरीने जमा होणारी वर्गणी असो, सगळ्यांनीच तारतम्याच्या लक्ष्मणरेषा ओलांडल्या आहेत. यात सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या सगळ्यांचे उघड किंवा छुपे समर्थन आणि नेतृत्व आजचे सगळेच राजकीय पक्ष करत आहेत. 'सवंग' लोकानुनय हेच यांचे भांडवल आहे. प्रबोधनाची क्षमता या नेतृत्वांनी केव्हाच हरवली आहे.

रस्ते अडवून, सर्व घालून दिलेले नियम धाब्यावर बसवून साजरा होणारा दहीहंडीचा सण काय किंवा बीभत्स गाण्यावर नाचत निघणाऱ्या गणपतीच्या आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणूका काय; आपल्या संस्कृतीचा इतिहास, उत्सवांची आणि सण साजरे करण्याची हीच परंपरा आपल्याला दाखवतात का? आपण हे कधीच थांबवू शकणार नाही का?

✧✧✧

# व्यवस्था परिवर्तन आणि त्याचे परिणाम

{ जानेवारी २०१९ }

१८५७–५८ साली आपण इंग्रजांच्या वसाहतवादाविरुद्ध बंड पुकारले. या बंडामध्ये आपला पराभव झाला असला तरीही; ईस्ट इंडिया कंपनीचे आधिपत्य संपले आणि इंग्लंडच्या राणीचे राज्य चालू झाले. बरोबर १०० वर्षांआधी प्लासीच्या लढाईमध्ये रॉबर्ट क्लाइव्ह विजयी झाला आणि ईस्ट इंडिया कंपनीकडे आपली प्रशासकीय सूत्रे हस्तांतरीत व्हायला लागली. व्यापाराकरता आलेले इंग्रज, या नवीन जबाबदाऱ्याही तेवढ्याच कुशलतेने हाताळायला लागले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच हे सगळेच व्यापाराकरता भारतात आले आणि वखारींच्या निमित्ताने हातापाय पसरू लागले. १७५७ साली तोही विषय संपला व इंग्रजांचा वसाहतवाद चालू झाला.

वॉरन हेस्टींग हा कंपनीचा पहिला गव्हर्नर जनरल. आपल्या प्रशासकीय व्यवस्थेकरता त्याने एक अत्यंत महत्त्वाचे धोरण अवलंबले होते. भारतीयांवरती राज्य करायचे ते त्यांच्याच सामाजिक, सांस्कृतिक आणि धर्मविषयक संकल्पनांना अनुसरून करायचे. पाश्चिमात्य भाषा, विचार व संस्कृती ही त्यांच्यावर लादायची नाही. अर्थातच ख्रिस्ती धर्मप्रसारकांकरता ही बाब फारशी अनुकूल नव्हती.

दक्षिणेप्रमाणे उत्तरेकडेही काही ख्रिस्ती धर्मप्रसारक आले असले तरी लंडनमधील इंग्रज सरकार मात्र त्यांना तशी परवानगी देत नव्हते. १८ व्या शतकाच्या शेवटी व १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी या संदर्भात इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये व बाहेर या धोरणाविरुद्ध चळवळी चालू केल्या. हिंदू धर्म आणि त्याच्या सर्व चालीरीती या अतिशय मागासलेल्या आहेत; त्यांचा भौतिक व

आधिभौतिक विचार आणि तत्त्वज्ञान बुरसटलेले आहे, त्यामुळे हा समाज 'नीतीभ्रष्ट' व 'मूल्यहीन' झाला आहे. त्याला या दुष्टचक्रातून बाहेर काढायचे असेल; तर त्याचे ख्रिस्तीकरण करणे आवश्यक आहे, आणि हे कार्य भारतामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांना परवानगी दिली तरच होऊ शकते. हा त्यांचा प्रसार हळूहळू इंग्लंडमध्येही प्रभावी होऊ लागला. त्याचीच परिणती म्हणून १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला राणीने पुन्हा जेव्हा व्यापाराकरता सनद दिली त्यावेळी धर्मप्रसारकांना देखील येण्याची मुभा दिली.

इंग्रजी आणि ख्रिस्ती वसाहतवादाचा गाभा हा वर्ण, संस्कृती श्रेष्ठत्व किंवा अहंकाराशी निगडित होता. ख्रिस्तीधर्म आणि इंग्रजी भाषा यांच्या माध्यमातूनच या समाजाला सुसंस्कृत करता येईल अशी त्यावेळचे ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासकीय अधिकारी यांची ठाम समजूत होती. वसाहतवादाची सूत्र राणीकडे गेल्यावरही या मानसिकतेमध्ये काडीचाही बदल झाला नव्हता. म्हणूनच १९ व्या शतकामध्ये वसाहतवाद्यांची धोरणे आणि कार्यशैली यांच्या अभ्यासाकरता ही पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे.

अर्थातच वॉरन हेस्टिंग्ज याला हव्या असलेल्या धोरणांच्या बरोबर विसंगत अशी ही मानसिकता होती. हिंदूंचे ख्रिस्तीकरण व्हायला हवे याबाबत एकवाक्यता असली तरी त्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र काही मतभिन्नता होती.

काही धर्मप्रसारकांना हे परिवर्तन हिंदूंची प्रमाणभाषा संस्कृत किंवा त्यांच्या प्रांतीय भाषा यांच्या माध्यमातून करणे सयुक्तिक वाटत होते (Orientalist). तर काहींचा मात्र इंग्रजी भाषा आणि पाश्चिमात्य विज्ञानाच्या माध्यमातूनच हे परिवर्तन होऊ शकेल असा त्यांचा आग्रह होता (Anglicist).

सर विल्यम जोन्स, चार्ल्स विल्किन्स, कोलब्रूक इत्यादींनी हिंदूंचे साहित्य व धर्मग्रंथांचा अभ्यास करून त्यांची भाषांतरे इंग्रजीमध्ये या सुमारास उपलब्ध केली होती. अर्थातच यामुळे भारतीय संस्कृती ही मागासलेली तर नाहीच; पण त्याचा आशय आणि विचार प्रगल्भ आहे याची जाणीव धर्मप्रसारक व प्रशासकीय अधिकाऱ्यांना व्हायला लागली. तरीही वसाहतवादाच्या समर्थनार्थ हिंदू धर्म आणि विचार हे मागासलेले आहेत आणि त्यामध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे या विचारावर आधारितच प्रशासन, महसूलापासून शिक्षणापर्यंतच्या धोरणांची आखणी व्हायला लागली. काही वर्षांच्या आतच अशा धोरणांच्या अंमलबजावणी नंतरचे

परिवर्तन काय होते याची वर्णने पाश्चिमात्य अभ्यासकांनी लिहिलेल्या पुस्तकांमधून आपल्याला पहावयास मिळतात.

रॅमसे मॅक्डोनल्ड आपल्या १९१० साली प्रकाशित केलेल्या "Awakening of India" या पुस्तकात लिहितात -

"In all, attempts to govern a country by a 'benevolent despotism', the governed are crushed down. They become subjects who obey, not citizens who act. Their Literature, their art, their spiritual expression go. They descend to the level of mere limitators and copyist .... When we recall the riches of Indian civilization in the past it becomes plain that the loss of initiative and self-development has been greater in India than in almost any other country" (p.213)

रॅमसे मॅक्डोनल्ड सारख्या अनेक पाश्चिमात्त्य अभ्यासकांना भारतातील तत्त्वज्ञानच नाही तर इतरही भौतिक विज्ञानातील भारताची प्रगती अचंबित करत होती. तरीही धर्मप्रसारकांना मात्र इंग्रजी भाषा व पाश्चिमात्य विज्ञान यांच्या माध्यमातून भारतीय विचारातील न्यूनत्व दाखवत रहायचे होते. दुर्दैवाने यामध्ये ते मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले.

जॉन मूर (John Muir) हा एक स्कॉटीश, ईस्ट इंडिया कंपनीमधील प्रशासकीय अधिकारी. त्याने संस्कृतभाषेचा अभ्यास केला एवढेच नाही तर त्यावर प्रभुत्वही मिळवले. भारतामध्ये शैक्षणिक व इतर धोरणांच्या आखणीमध्ये त्याचा सिंहाचा वाटा आहे. तो कट्टर धर्मप्रसारक होता. त्यांनी १८३९ साली ‘मतपरीक्षा’ हे भारतीय धर्मातील विचारांचा फोलपणा दाखवणारे पुस्तक लिहिले. अर्थातच हे पुस्तक संस्कृतमध्ये लिहिले. यावर तो संस्कृतपंडितांशी वादविवाद करू लागला. सुबाजी बापू या मराठी पंडिताने १८३९ सालीच त्याला ‘मतपरीक्षा शिक्षा’ हे उत्तरही दिले. हिंदू धर्मावरील हल्ल्याचे हे एक उदाहरण आहे.

धर्मप्रसारकांनी ताबा घेतला होता तो शिक्षण पद्धतीचा. १८३५ सालच्या मेकॉलेच्या शैक्षणिक इतिवृत्ताने (Minutes on Indian Education) या ‘धोरण परिवर्तनाला’ मोठी गती मिळाली. त्याचे प्रसिद्ध विचार हे पुढील शिक्षण धोरणाचे प्रमुख सूत्र राहिले. मेकॉले म्हणतो -

"We want to create a class of persons, Indian in blood and colour, but English in taste, in opinions, in morals, and in intellect."

सांस्कृतिक वसाहतवादाचा हा मार्गदर्शक आकृतिबंध होता.

भौगोलिक वसाहतवाद संपू शकतो, पण सांस्कृतिक वसाहतवाद जनुकांपर्यंत जाऊन पोहोचतो. मेकॉलेचे धोरण हे 'शैक्षणिक' वाटले तरी ते 'सांस्कृतिक' होते. आज स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनीही आपण त्यातून मुक्तता करून घेऊ शकलो नाही.

२५०० वर्षांपूर्वीचा पाणिनी काय, किंवा १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञ काय, भाषा आणि गणिताच्या क्षेत्रात त्यांचे योगदान एका वेगळ्या प्रतिभेचे द्योतक आहे. कला, स्थापत्य ते भौतिकीच्या अनेक क्षेत्रांमध्येही वसाहतपूर्व भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर अशी प्रगती दिसून येते. धार्मिक साहित्य सोडून या विषयावर हजारोंनी हस्तलिखित पोथ्या आज भारतातील आणि परदेशातील ग्रंथालयात उपलब्ध आहेत. अगदी २३००-२४०० वर्षांपूर्वी अलेक्झांडरबरोबर आलेले इतिहासकार असोत, की १६ व्या १७ व्या शतकातील इंग्रज, पोर्तुगीज वसाहतवाद्यांनी लिहिलेली वर्णने असोत, आपल्याला याची अनेक प्रमाणे मिळतात. 'व्यवस्था परिवर्तना' आधीच्या एका सर्जनशील समाजाचे ते प्रतिबिंब आहे.

ही प्रगती ही भारताच्या संतुलित सामाजिक रचनेमुळे होती. त्या रचनेचा पाया हा त्यांचा 'व्यवसाय' आणि 'कौशल्यावर' आधारित होता. मुख्य म्हणजे भारताची सर्व अर्थव्यवस्था ही 'खेडे केंद्रित' होती. प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण होते. प्रत्येक व्यवसाय हा परस्परावलंबी होता. प्रत्येक नागरिकाला त्याच्या व्यवसायाचे 'कौशल्य-शिक्षण' हे त्याच्या कुटुंबातच मिळत होते. विकेंद्रित व्यवसाय शिक्षण, की ज्याचे केंद्र हे त्याचे कुटुंब असे. हे भारताच्या व्यवसाय/कौशल्य शिक्षणाचे वैशिष्ट्य होते. पंडिती किंवा पाठशालेतील शिक्षणाहून ते वेगळे होते. हे दोनही स्तर व्यापक भारतीय शिक्षण व्यवस्थेचे अविभाज्य भाग होते.

भारताच्या समाजव्यवस्थेला अस्थिरता ही ८ व्या ९ व्या शतकातील इस्लामिक आक्रमणांमुळे यायला लागली. पुढील सात-आठशे वर्षांमध्ये या कायम युद्धसदृश परिस्थितीमुळे या संतुलित समाजव्यवस्थेचे अनेक घटक आणि त्यांची व्यावसायिक कौशल्ये 'कमकुवत' व 'अस्थिर' व्हायला लागली. १६ व्या शतकात वसाहतवाद्यांनी सुरू केलेले 'व्यवस्था परिवर्तन' १९ व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जवळजवळ पुरे झाले होते. त्याचा केंद्रबिंदू मेकॉलेची शिक्षणपद्धती असली तरी महसूलापासून शिक्षणापर्यतच्या सगळ्या 'परंपरागत' व्यवस्था मोडीत निघत होत्या आणि त्यावर सांस्कृतिकदृष्ट्या संपूर्णतया भिन्न असलेल्या पाश्चिमात्य व्यवस्थांचे रोपण होत

होते. मेकॉलेला हवा असलेला, 'हाडामासाचा भारतीय पण आचार-विचारांनी पाश्चिमात्य' असा भारतीय या शिक्षण पद्धतीतून बाहेर पडत होता. सुमारे १०० वर्षांपूर्वी म्हणजे १९१७ साली ॲनी बेझंट (१८४७-१९३३) यांनी लिहिलेल्या The Case for India यामध्ये याचे अतिशय चपखल वर्णन केले आहे.

"The stunting of the Indian race under British rule begins with the education of the children. The schools (which are under British control) differentiate between British and Indian teacher; the colleges do the same. The students see first class Indian teachers superseded by young and third-rate foreigners : the principals or presidents of colleges must be foreigners: foreign history is more important than Indian : to have written on English villages is a qualification for teaching economics in India: the whole atmosphere of the school and college emphasizes the superiority of the foreigner. The whole education of the country is planned on foreign models, and its object is to serve foreign rather than native ends, to make docile government servants, rather than petriotic citizens. High spirtit, courage, self-respect are not encouraged and docility is regarded as the most precious quality in the student. Pride in country, patriotism, ambition, are looked down upon as dangerous. English instead of Indian ideals are exalted : the blessings of a foreign rule and the incapacity of Indians are constantly inculcated".

भौगोलिक दृष्ट्या भारत आज स्वतंत्र असला तरी, सांस्कृतिक दृष्ट्या तो पाश्चिमात्य 'व्यवस्था' आणि 'संस्कृती'चा मांडलिक आहे. इतिहासाची यांत्रिकी आवर्तने किंवा सोईस्कर मांडणी; भविष्य निर्मितीचे स्रोत होऊ शकत नाहीत, किंवा इतिहासातील वैभवही परत आणू शकत नाहीत. आजची राजकीय परिस्थिती आणि नेतृत्व सवलती, आणि आरक्षणाच्या कुबड्या देऊन समाजाला 'आत्मसन्मानहीन' करत आहे. ज्या देशामध्ये सोन्याचा धूर निघत होता त्याचे नागरिक आता स्वतःला 'मागासलेले' आहोत म्हणून मोर्चे काढत आहेत, यासारखे दुसरे मोठे दुर्दैव कुठलं? आज ॲनी बेझंट हयात असत्या तर या 'आत्मसन्मान' गमावलेल्या, 'मागासलेपणा'चा आग्रह धरणारा भारतीय बघून, काही लिहिण्याचे त्यांचे धारिष्ट्यच झाले नसते. इंग्रजी शब्दकोषात या परिस्थितीचे वर्णन करणारे शब्दही त्यांना मिळाले नसते.

भारतीय धर्मविचारातील 'चिंतन' आणि 'सर्जनशीलते'ची ओळख काही ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि वसाहतवादी नोकरशहांना नक्कीच झाली होती. निदान तसा प्रामाणिकपणातरी आपल्याला त्यांच्या लिखाणातून दिसून येतो. सर चार्ल्स

विल्कीन्स यांनी १७८५ साली भगवत्‌गीतेचे पहिले इंग्रजी भाषांतर केले. वॉरन हेस्टिंग यांची त्याला एक सुंदर प्रस्तावना आहे. त्यामध्ये ते म्हणतात–

"The writers of the Indian philosophies will survive when the British Dominion in India shall long have ceased to exist, and when the sources which it yielded of wealth, and power are lost to remembrance."

आपल्या धार्मिक उत्सवांचे 'व्यावसायीकरण' आणि 'विकृतीकरण' करणाऱ्या आपल्या राजकारण्यांच्या मानसिकतेमध्ये याचा लवलेशही नसावा हीच आजची खरी शोकांतिका आहे.

✧✧✧

# विज्ञान आणि धर्म

{ एप्रिल २०१९ }

विज्ञान आणि धर्म एकमेकांना 'तारक' की 'मारक'? हा तसा चर्चेचा जुना विषय.

खरं म्हणजे हा विषय पाश्चिमात्य जगतामध्ये १६ व्या शतकानंतर जास्त चर्चेत येऊ लागला. आजही ही चर्चा दोन्ही क्षेत्रांतील अभ्यासकांमध्ये गांभीर्याने होताना दिसते. जागतिक स्तरावरचा विचार केला तर, यामधला 'धर्म' म्हणजे प्रामुख्याने ख्रिश्चॅनिटी आणि इस्लाम, आणि 'विज्ञान' म्हणजे पाश्चात्त्य देशामध्ये प्रबोधन क्रांतीनंतर विकसित झालेले विज्ञान.

कुठल्याही सभ्यतेमध्ये किंवा समाजामध्ये सामाजिक मूल्य, किंवा नीती-अनीतीच्या कल्पनांवर त्या त्या संस्कृतीमधील धर्मकल्पनांचा पगडा असतो. युरोपमधीलही संस्कृती त्याला अपवाद नव्हती. युरोपच्या इतिहासामध्ये 'मध्ययुगीन' काळ म्हणजे ५ वे शतक, रोमन साम्राज्याचे पतन ते १५ वे शतक, प्रबोधन युगाची सुरुवात, हे अंधकार युग (Dark Age) समजले जातं. या कालावधीमध्ये आज आपण ज्याला विज्ञान म्हणतो अशी कुठलीच निर्मिती तेथे होत नव्हती. भौतिक व आधिभौतिक व्यवहार हे ॲरिस्टॉटल, टॉलेमी व बायबलकेंद्रित होते. सहाजिकच या परिघाबाहेर जीवनाच्या कुठल्याच क्षेत्राचा विचार होत नव्हता. बाबीलोनियन व मेसापोटेमियन संस्कृत्या टिग्रीस व यूफ्रेटिस नदीच्या परिसरात विकसीत झाल्या होत्या. इस्लामपूर्व इराक, सीरिया, टर्कीचा काही भाग व सौदी अरेबिया हे सर्व या विकसित संस्कृतीचे भाग होते. इराणमध्ये झरथ्रुस्ट्र पंथ होता. या सर्व संस्कृत्यांचे ग्रीक आणि हिंदू विज्ञान, आणि धर्म विचारांशी आदानप्रदान होत होते. इराणमधील गुंडीशापूर या गावी इसवीसनाच्या ५ व्या शतकातच पंचतंत्रासारखा ग्रंथ पहेलवी

भाषेत भाषांतरित झाला होता. याचबरोबर अनेक हिंदू वैद्यक आणि गणिती ग्रंथही भाषांतरित झाल्याची नोंद त्या काळात मिळते.

यामुळेच ५ व्या शतकात इराणमधील गुंडीशापूरची ओळख हे विद्येचे माहेरघर (House of Wisdom) म्हणून होत होती. पुढे काही शतकांनी हे विद्येचे माहेरघर सध्याची इराकची राजधानी बगदाद येथे स्थलांतरित झाले. पुढील काही शतकं तिथेही ग्रीक विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाप्रमाणेच हिंदू गणिताचे ग्रंथ, पर्शियन व अरेबिक भाषांमध्ये भाषांतरित व्हायला लागले. इराणमधील गुंडीशापूर किंवा इराकमधील बगदाद मधील हे ज्ञानाचे आदानप्रदान अत्यंत उदार व उत्साहवर्धक वातावरणात होत होते. दुर्दैवाने इस्लामचा प्रभाव वाढलेल्या या देशामधील ती सहिष्णुता पुढे जवळजवळ नाहिशी झाली.

सीरिया, स्पेन, पोर्तुगाल ही एकेकाळची ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रे इस्लामच्या प्रभावाखाली आली होती. त्या राष्ट्रांना परत ख्रिस्ती करण्याकरता ११, १२ व १३ व्या शतकामध्ये ख्रिश्चन व इस्लाम पंथीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर धर्मयुद्ध (Crusades) झाली. स्पेन व पोर्तुगाल परत ख्रिश्चन झाली. या धुमश्चक्रीमध्ये दोन्ही बाजूंकडून त्यांची ग्रंथालयं जाळली जाऊ लागली. याचवेळी सुमारे १२ व्या शतकाच्या आत-बाहेर स्पेनमधून काही वैज्ञानिक पर्शियन व अरेबिक ग्रंथ लॅटीन भाषेत भाषांतरित होत होते.

१२ ते १५ वे शतक हे युरोपकरता प्रबोधन पूर्व युग होते. युरोपचा मूळ ग्रीक भाषेशी संबंध केव्हाच तुटला होता. पण यातले अनेक ग्रंथ ५ ते १२ शतकांपर्यंत पर्शियन किंवा अरेबिक भाषांमध्ये भाषांतरित झाले होते. युरोप आपल्या संस्कृतीचे स्रोत रोमन व ग्रीक संस्कृतीमध्ये असल्याचेच मानत होता. अरबांकडून भाषांतरित ग्रीक विज्ञान व साहित्य घेण्याऐवजी पुन्हा एकदा ग्रीक शिकण्याची चळवळ युरोपमध्ये सुरुवात झाली. पर्शियन विज्ञान ग्रंथांची तर लॅटीनमध्ये भाषांतरं झालीच; पण प्लेटो, ॲरिस्टॉटल, आर्किमिडीज यांच्या ग्रंथांचेही पुन्हा लॅटीन व पुढे इंग्रजीत भाषांतरं व्हायला लागली. पुन्हा आपल्या मूळ संस्कृतीकडे जाण्याची प्रक्रीया म्हणजे रनेसाँ (Renaissaince) युगाचा प्रारंभ १२ व्या १३ व्या शतकात झाला असला, तरी तिने बाळसं मात्र १५ व्या शतकात धरलं. परंपरागत बायबलकेंद्रित सृष्टीच्या निर्मितीच्या भाकडकथांना प्रथमच आव्हान मिळायला लागले.

ही पार्श्वभूमी कळल्याशिवाय, 'विज्ञान' आणि 'धर्म' यामधील परस्परविरोधी भूमिका आणि त्याची विरोधाची परंपरा लक्षात येणे शक्य नाही.

युरोपमधील पुढच्या वैज्ञानिक क्रांतीचे स्वरूप हे संपूर्णतः भिन्न आहे. चर्चच्या विचाराच्या परिघाबाहेर जाऊन या वैज्ञानिकांना विचार करावा लागत होता. सहाजिकच त्याची सुरुवात कोपर्निकस (१४७३-१५४३) पासून होते. सृष्टीच्या निर्मितीची बायबल सम्मत भूकेंद्रित संकल्पना कोपर्निकसनी मोडीत काढली, व सूर्यकेंद्रित सिद्धांत मांडला. पृथ्वी आपल्या स्वतःभोवती फिरते हा सिद्धांत ६ व्या शतकातच आर्यभटांनी भारतात मांडला होता.

कोपर्निकस पाठोपाठ त्याच्याच सिद्धांताचा आधार घेत गॅलिलिओ (१५६४-१६४२), ब्रूनो (१५४८-१६००) आणि केप्लर (१५७१- १६३०) यांनी ग्रहगणितामध्ये क्रांतीकारक सिद्धांत मांडले. अर्थातच या सगळ्यांना चर्चबरोबर संघर्ष करायला लागला. ब्रूनोला तर जीवंत जाळण्यात आले.

पाश्चात्त्य धर्म म्हणजे ख्रिश्चॅनिटी आणि विज्ञान यांच्या परस्पर संबंधांची ही पार्श्वभूमी आहे. भारतातील धर्म आणि विज्ञानाच्या परस्पर संबंधांची पार्श्वभूमी सर्वथा भिन्न आहे. त्यांचे सांस्कृतिक संदर्भही संपूर्णतः भिन्न आहेत.

६ व्या शतकातील आर्यभट्ट, पुढे ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य-१, १० व्या शतकातील श्रीपती, १२ व्या शतकातील भास्कराचार्य-२, ते १५ व्या शतकातील गणिती गणेश दैवज्ञ यांनीही ग्रहगणितामध्ये सातत्याने सुमारे १००० वर्षं नवनवीन सिद्धांत मांडले. आपल्या पूर्वसुरींच्या काही सिद्धांतांच्या बाबतीत त्यांची असहमतीही होती. तरीही यापैकी कोणालाही त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाकरता समाजबाह्य व्हायला लागले नाही. १५ व्या शतकातील गणिततज्ज्ञ गणेश दैवज्ञ यांचा अभ्यास तर त्यांचे गाव 'नंदीग्राम'च्या देवळामध्ये होत होता.

गणिता इतकाच, कामशास्त्रावरील वात्स्यायनाचा ग्रंथ हाही विद्यापीठामधून अभ्यासला जात होता. १३ व्या शतकामध्ये यशोधन यांनी 'जयमंगला' नावाची कामसूत्रावरील टीका लिहिली आहे; २ ऱ्या शतकातील भरताचे नाट्यशास्त्र हाही असाच रसिकांच्या पसंतीला उतरलेला एक ग्रंथ. अभिनवगुप्ताने (९५० ते १०१६) १० व्या शतकात नाट्यशास्त्रावर 'अभिनवभारती' नावाची टीका लिहिली. काश्मीरपासून, कन्याकुमारीपर्यंतच्या मंदिरांच्या अनेक हस्तलिखित संग्रहांमध्ये हे सर्व मूळ ग्रंथ व त्यावरील टीका लीलतया मिळतात. वास्तुशास्त्रापासून नौकानयनापर्यंतचे अनेक वैज्ञानिक ग्रंथही याच काळात भारतात लिहिले गेले व त्यांचा प्रत्यक्ष मंदिर बांधण्यापासून नौका बनवण्यापर्यंत उपयोग होत होता.

कोपर्निकस नंतर पाश्चिमात्य विज्ञानातला आणखीन एक क्रांतीकारक सिद्धांत चार्ल्स डार्विनने (१८०९ ते १८८२) १८५९ साली लिहिलेल्या आपल्या Origin of Species या पुस्तकातून मांडला. त्यानंतर निर्माण झालेले जैवशास्त्र व त्याच्या विविध शाखांचा पाया म्हणजे डार्विनचा उत्क्रांतीवाद आहे. साहाजिकच चर्चनी त्याला कडाडून विरोध केला, कारण सृष्टीनिर्मितीचे सर्वच ख्रिश्चन सिद्धांत यामुळे कोलमडून पडले. हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर अवघ्या सात महिन्यांत ऑक्सफर्ड येथील ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये प्रसिद्ध विचारवंत थॉमस हक्स्ले आणि बिशप सॅम्यूअल विल्बरफोर्स यांच्यामध्ये कडाक्याचा वाद झाला. दोन्ही बाजूंनी ऑक्सफर्डमधील विचारवंत व धर्ममार्तंड हजर होते. सध्या आपण २१ व्या शतकात आहोत तरीही आज चर्चचा डार्विनच्या उत्क्रांतीवादाला विरोध आहे. डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे सर्व प्राणीमात्रांची निर्मिती ही एकपेशीय जीवापासून, बहुपेशीय मानवापर्यंत झाली आहे. सगळंच प्राणी जगत हे कुठल्यातरी उत्क्रांतीच्या मार्गावरील टप्पे आहेत. साहाजिकच ईश्वराने सृष्टी निर्माण केली हा सिद्धांत यामुळे फोलच नाही तर अवैज्ञानिकही ठरतो. युरोपमध्ये व अमेरिकेतून कित्येक शाळांमधून उत्कांतीवादाबरोबरच आजही सृष्टीची निर्मिती ही ईश्वरेच्छेप्रमाणे झाली (Creationism) हा पर्यायी सिद्धांत म्हणून शिकवायला लागतो.

१९७८ साली आणखीन एक क्रांतीकारक पाऊल विज्ञानाने टाकले, ते म्हणजे कृत्रिम गर्भधारणेचे (In-Vitro Fertilization -IVF). हजारो वर्षं मानवाची निर्मिती ही स्त्री-पुरुष मिलनातून होते. शास्त्रज्ञांनी 'स्त्री' आणि 'पुरुष' गन्तुक (Gamete) यांचे शरीराबाहेर मीलन घडवून गर्भधारणा केली. हा गर्भ जसा वाढू लागतो तसा तो पुन्हा स्त्रीच्या गर्भाशयामध्ये रोपण करण्यात येतो. वंधत्व किंवा तत्सम व्याधींमुळे ज्या स्त्री-पुरुषांना अपत्य होऊ शकत नाही अशा हजारो स्त्री-पुरुषांना या वैज्ञानिक संशोधनामुळे अपत्य होऊ शकते. या संशोधनाला व वैद्यकीय प्रक्रियेलाही चर्चने कडाडून विरोध केला होता.

आज विज्ञानाची ही घोडदौड जनुकांच्या रचनेपर्यंत येऊन पोहोचली आहे. आधुनिक अनुवंशशास्त्राचे जनकत्व ग्रेगॉर मेंडेल (१८२२ - १८८४) या वैज्ञानिकाला मिळते. वनस्पतीशास्त्रामध्ये संशोधन करून त्यानी अनुवांशिकतेचा सिद्धांत मांडला. पेशीच्या प्रकलामध्ये (nucleus) रंगसूत्र (Chromosomes) असतात, व रंगसूत्रांमध्ये जनुकं (Genes) असतात. आपल्या सर्वच शरीररचना, व आनुवंशिकतेचे सूत्र या जनुकांमध्ये आहे. अगदी अलीकडे म्हणजे २०१५ साली वैज्ञानिकांनी CRISPR हे

असं साधन निर्माण केले की, त्यामुळे जनुकांच्या शृंखलेत हस्तक्षेप (Gene editing) करता येऊ लागला. यामुळे काही असाध्य आनुवंशिक रोगांवरती नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे. साहाजिकच या हस्तक्षेपालाही ख्रिस्ती धर्माचा विरोध आहे.


नुकतंच एक चिनी शास्त्रज्ञ, (He Jiankui) ही जनकुई यांनी CRISPR च्या सहाय्याने जनुकशृंखलेत हस्तक्षेप करून दोन जुळ्या बहिणींना जन्माला घातले. यामुळे जगातले सगळेच या क्षेत्रातील वैज्ञानिक खडबडून जागे झाले. हा शोध कितीही क्रांतीकारक असला तरीही या प्रक्रीयेच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या गर्भाच्या सुरक्षितेबद्दल पुरेसं संशोधन आज झालेलं नाही. यामुळे अनेक सामाजिक आणि नैतिक प्रश्नही उभे राहण्याची शक्यता आहे. म्हणून यांची वारंवार तपासणी करून त्यांच्या सुरक्षितेबद्दल संपूर्ण खात्री होईपर्यंत असे प्रयोग करू नयेत असे संशोधकांचंही मत आहे. त्यामागील कारणे ही वैज्ञानिक आहेत. हे सर्वच संशोधन नवीन असल्यामुळे आज त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा चालू आहे. चर्चचा या संशोधनालाही विरोध आहे.

वरच्या विवेचनावरून आपल्याला एक गोष्ट लक्षात येईल की, विज्ञानाला प्रखर विरोध झाला तो ख्रिस्ती धर्मसंस्थेकडून. भारतामध्ये पूर्वी आणि आजही वर उल्लेखलेल्या कुठल्याही सिद्धांतांना किंवा प्रयोगांना कधीही धर्मसत्तेकडून विरोध झाला नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे भारताची धर्म-संकल्पना ही फक्त उपासनाकेंद्री नाही. दुर्दैवाने विज्ञान आणि धर्माचा विचार करताना, पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये तसा विरोध अस्तित्वात आहे म्हणजे आमच्याकडेही तसा तो असणारच, हे गृहीतक अनेक चांगल्या विचारवंतांनीही अंगिकारलेले दिसते.

१६ व्या शतकापर्यंत जो भारतीय गणितामध्ये प्रचंड कल्पकता दाखवत होता, तो गेल्या ३००-४०० वर्षं तशी का दाखवू शकत नाही, याची कारणे त्याच्या धर्मापेक्षा, वसाहतवादामध्ये शोधावी लागतील. २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील थोर गणिती श्रीनिवास रामानुजन हे देवीचे भक्त होते. त्यांच्या धर्मश्रद्धा गणितातील त्यांच्या सृजनामध्ये कुठेही उणेपण आणू शकल्या नाहीत. हे एकच उदाहरण भारतामध्ये 'विज्ञान' आणि 'धर्म' यांचा संबंध हा मारक तर नाही, पण पूरक आहे हे दाखवायला पुरेसा आहे!

विज्ञानालाही आपला धर्म असतो आणि धर्माला आपले विज्ञान. कोणाहीएकाचा अतिरेक हा घातकच असतो.

✧✧✧



| | |
|---|---|
| **नाव** | **: विजय वासुदेव बेडेकर** |
| जन्म | : मुंबई, ९ ऑक्टोबर १९४७ |
| वैद्यक व्यवसाय | : स्त्रीरोग तज्ज्ञ. ठाणे येथे गेली ४५ वर्षे व्यवसाय. MBBS (१९७२) DGO (१९७७) |
| व्यवसायाव्यतिरिक्त | : प्राच्यविद्या, इतिहास, भारतीय संस्कृती, समाजशास्त्र इ. च्या अभ्यासाची आवड, वाचन व प्रवासाचा छंद |

**अनेक स्वयंसेवी शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निगडित. प्रामुख्याने :**

१. संस्थापक अध्यक्ष, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

२. विश्वस्त व कार्याध्यक्ष - विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

३. संस्थापक अध्यक्ष, द म्युझिअम ट्रस्ट ऑफ वेस्ट कोस्ट ऑफ इंडिया, ठाणे

४. संस्थापक व माजी अध्यक्ष, ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे

५. संस्थापक अध्यक्ष, सत्यशोध संस्था, ठाणे

६. सभासद, रेग्युलेटइंग कौन्सिल - भांडारकर प्राच्यविद्या अभ्यास संस्था, पुणे

७. आजीव सदस्य - भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

८. आजीव सभासद - एशियाटीक सोसायटी, मुंबई

९. आजीव सभासद – न्युमीझमेटीक एंड एपिग्रफीक सोसायटी ऑफ इंडिया

१०. सदस्य : इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ संस्कृत स्टडीज

११. आजीव सभासद : ब्रिटिश लायब्ररी, लंडन, यूके

१२. सभासद : ब्रिटिश म्युझियम, लंडन, यूके

१३. सभासद : V & A संग्रहालय, लंडन, यूके

१४. सभासद : बोडलेयन लायब्ररी, ऑक्सफर्ड, यूके

१५. फेलो : रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन यूके

१६. सभासद : अॅशमोलियन म्युझियम, ऑक्सफर्ड, यूके

१७. फेलो : द लिनिअन सोसायटी ऑफ लंडन

१८. सदस्य : द मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, न्यू यॉर्क, यूएसए

१९. सदस्य : गुगेनहेम संग्रहालय, न्यू यॉर्क, यूएसए

- ऑल इंडिया रेडिओवर ओरिएंटल स्टडीज, प्राचीन–औषधी विज्ञान, आयुर्वेद इ. विषयांवर भाषणे

- वैद्यक, संस्कृत, इतिहास इत्यादींवरील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चासत्रांमध्ये सहभाग. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत –

  - सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका, १९८२ : स्त्रीरोगविषयक आंतरराष्ट्रीय परिषद
  - फिलाडेल्फिया, अमेरिका, १९८४ : ६वी जागतिक संस्कृत परिषद
  - सिंगापूर, १९८६ : प्रजनन आणि वंध्यत्वावरील जागतिक परिषद
  - सिंगापूर, १९८६ : आशियाई इतिहास काँग्रेस
  - चीन प्रजासत्ताक, १९८६ : पहिला गैर–राजकीय आणि गैर–सरकारी अभ्यास दौरा

- लाहोर, पाकिस्तान, १९८७ : पेरिनेटोलॉजीवर जागतिक परिषद
- हॉलंड, १९८७ : लीडेन येथे ७वी जागतिक संस्कृत परिषद
- व्हिएन्ना, ऑस्ट्रिया, १९९० : ८वी जागतिक संस्कृत परिषद
- पूर्व युरोप, १९९० : साम्यवादाच्या पराभवानंतर रुमानिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, पूर्व जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया आणि इतर पूर्व युरोपीय देशांचा अभ्यास दौरा
- मेलबर्न, ऑस्ट्रेलिया, १९९४ : ९वी जागतिक संस्कृत परिषद
- दिल्ली, भारत, १९९४ : तिसरी जागतिक पुरातत्त्व काँग्रेस
- टोरिनो, इटली, २००० : ११वी जागतिक संस्कृत परिषद
- हेलसिंकी, फिनलंड, २००३ : १२वी जागतिक संस्कृत परिषद
- एडिनबर्ग, यूके, २००६ : १३वी जागतिक संस्कृत परिषद
- अथेन्स, ग्रीस, २००९ : IAIE वार्षिक परिषद
- बुडापेस्ट, हंगेरी, २००९ : विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या इतिहासाची २३वी आंतरराष्ट्रीय काँग्रेस.
- क्योटो, जपान. २००९ : १४वी जागतिक संस्कृत परिषद
- नवी दिल्ली, २०१० : डिजिटल लायब्ररीवर आंतरराष्ट्रीय परिषद
- बुखारेस्ट, रोमानिया सप्टेंबर २०११ : ५वी आंतरराष्ट्रीय वैदिक परिषद
- कोलकाता, २०११ : डिजिटल लायब्ररी आणि व्यवस्थापनावर आंतरराष्ट्रीय परिषद
- नवी दिल्ली २०१२ : १५वी जागतिक संस्कृत परिषद
- ममैया २०१२ : ५वा आंतरराष्ट्रीय परिसंवाद ''द बुक, रोमानिया, युरोप''

- नवी दिल्ली २०१३ : ICT फॉर डेव्हलपमेंट कॉन्फरन्स २०१३
- नवी दिल्ली २०१३ : इंडिया टेलिकॉम २०१३ (FICCI द्वारे आयोजित)
- केरळ जानेवारी २०१४ : ६वी आंतरराष्ट्रीय वैदिक कार्यशाळा २०१४
- बँकॉक २०१५ : १६वी जागतिक संस्कृत परिषद
- व्हँकुव्हर, कॅनडा २०१८ : १७वी जागतिक संस्कृत परिषद

**इंटरनॅशनल सायन्स काँग्रेस आणि स्टडी टूरमध्ये सहभाग :**

शालेय विद्यार्थ्यांच्या चमूचे गेल्या अकरा वर्षांपासून ‘चीन विज्ञान काँग्रेस’मध्ये नेतृत्व उदा. चीन किशोरवयीन विज्ञान आणि तंत्रज्ञान इनोव्हेशन स्पर्धा (CASTIC) आणि ऑक्टोबर २०१३, २०१५, २०१७ मध्ये ब्राझील येथे आयोजित MOSTRATEC - आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मेळा, तसेच डेन्मार्क येथे २०१६, २०१७ मध्ये आयोजित डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर आणि लक्झेंबर्ग येथे २०१८ आणि २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय एक्स्पो सायन्सेस मध्ये सहभाग.

विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डॉ. व्ही. एन. ब्रिम्स) च्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय औद्योगिक अभ्यास दौऱ्या दरम्यान नेतृत्व केले उदा. २०१७, २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (PGDM) च्या विद्यार्थ्यांचा सिंगापूर दौरा आणि २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये Executive MBA (EpMBA) विद्यार्थ्यांचा दुबईचा दौरा.

२००४ ते २०१९ या कालावधीत विद्या प्रसारक मंडळाच्या ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन (U.K.) येथील शैक्षणिक दौऱ्यामध्ये भारतीय विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संघाचे नेतृत्व केले.

- ‘इतिहास पत्रिका’ या संशोधनपत्रिकेचे १९८२–१९८५ पर्यंत संपादन.
- विद्या प्रसारक मंडळाच्या ‘‘दिशा’’ मासिक प्रकाशनाचे संपादक.
- सद्धर्म प्रकाशन, ठाणे द्वारा प्रकाशित ‘‘सद्धर्म’’ मासिकाचे संपादक.
- शिक्षण, जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक महत्त्व अशा विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित.